
# नाट्यचित्रपट परीक्षणे

चं. प्र. देशपांडे



(' तिरंदाज ' या टोपण नावाने **' आरपार '** हे सदर ' सुयोग साधना ' या मासिकात चालवले. त्यातील नाट्य-चित्रपट परीक्षणे :--)

**साथी**

तर आता राजेंद्रकुमार या माणसाला ' दिल एक मंदिर ' मध्यें कॅन्सरच्या बाबतीत महान यश मिळालं होतं की नाही ?  पण ते तहानभूक विसरणं न् रात्रंदिवस अभ्यास करून कॅन्सरचं अमूक एक ऑपरेशन यशस्वी कसं होईल याचा ध्यास घेणं इत्यादी जे काय होतं ते सगळं बेटा इथं विसरला. त्यामुळं झालं काय की नायिकेची आई ऑपरेशनमध्ये पंचत्वात विलीन झाली. हा मग बाहेर येऊन वैजयंतीमालेला ( शांतीला ) ' आय ॲम सॉरी ' म्हणाला, आणि तिला तशी रडत टाकून पुढं निघून गेला ! ' दिल एक मंदिर ' मध्ये हमखास मरू घातलेल्याला त्यानं वाचवलं होतं आणि इथं कदाचित वाचू शकणाऱ्या बाईला मात्र....तर हे असं आहे. 'दिल एक मंदिर ' मध्ये जे यश मिळेल ते ' साथी ' मध्ये मिळेलच असं नाही. महात्मा श्रीधर यांच्याबद्दलही याहून अधिक काही बोलण्यासारखं नाही.

आता तसं बघितलं तर शांतीची आई मेली हे एका दृष्टीनं बरंच झालं. कारण त्यामुळे शांती पोरकी झाली. त्यामुळं मग हिरो अशा त्या डॉक्टरनं ' तुम मेरे साथ ब्याह करोगी ?' असं प्रपोजल टाकलं आणि सनई वाजली.

त्यात परत एक थोडासा घोळ असा होता की हा नायक होता ' एक पाला हुआ लडका.'  तर चाकांच्या खुर्चीवरच्या त्या पालनकर्त्याची इच्छा अशी की हा मासा आपल्याच पोरीच्या तोंडात पडावा. पण एकंदर परिस्थितीचा विचार करून त्यांनी त्याला त्याच्या मनासारखं तर करू दिलंच, पण वर एक सुसज्ज अशी प्रयोगशाळा लग्नाचा आहेर म्हणून दिली. ( तर या इंडियात स्वत: श्रीमंत असून लहान मुले पाळण्याचे वगैरे षोक करणारी आणि शिवाय मोठ्या मनाची अशी माणसं गल्लोगल्ली पडलेली आहेत -- असं हिंदी पिक्चर्स पाहून आम्हालाही वाटू लागलेलं आहे.)

एक दिवशी डेव्हिड ( म्हणजे मोठा डॉक्टर ) येऊन वैजयंतीमालेला सांगतो की हे मौजमजा वगैरे सगळेच करतात. पण तुझ्या नवऱ्याला जर तुला असामान्य करायचं असेल तर त्याला रीसर्च करायला लाव( म्हणजे अर्थात कॅन्सरबद्दल ). एवढं म्हटल्यावर मग ती ठरवतेच, आता आयतीच संधी आहे तर भारतीय स्त्रीचा एक आदर्श उभा करून टाकू. मग अर्थातच ती त्याला कामाला लावते.

तर या रीसर्चमध्ये त्याला हिची साथ. मग एक वाजलेलं घड्याळ, दोन वाजलेलं घड्याळ, वगैरे. यात गंमत अशी होते की हिलाच त्यात कॅन्सर होतो. सत्काराच्या हारावर हिच्या ठसक्यातून रक्त पडेपर्यंत या एवढ्या थोर डॉक्टरला याचा

पत्ता लागत नाही. बरं, परत तो ' ये तुमने क्यूं छुपाया ?' म्हणून तिलाच विचारतो. इथं आम्ही ओळखलं की या डॉक्टराचं काही खरं नाही.

आता हे असं किती सांगायचं ? आपला आजार पतीच्या कर्तव्याच्या आड येतोय म्हटल्यावर ती घर सोडून काय जाते, गाडीत तिला पूर्वी तिनं सेवा केलेला अंकल काय भेटतो, तो तिला झुरिचला काय पाठवतो, तिथून ती दुरुस्त होऊन परत काय येते, तेवढ्यात हा रजनीशी ( म्हणजे पालनकर्त्याच्या पोरीशी ) विवाहबध्द काय झालेला असतो, त्यात तो शांतीला विसरत नाही म्हणून रजनी ॲसिड प्यायला जाते तर तिच्या हातून ते काढून घेताना ते सांडून याचा चेहरा काय जळतो, डोळे काय जातात...काही विचारू नका. तर परत आलेली शांतीच शारदा या टोपण नांवानं त्याची प्रायव्हेट नर्स होते आणि पिक्चरमध्ये ' आयरनी ' भरू लागते. ऑडियन्समधल्या बायका इथं अगदी हळहळतात हो !

तर शेवटी त्याचं डोळयांचं ऑपरेशन होतं आणि गेली हजारो वर्षं जो फोटो त्यानं कुणालाच दाखवला नव्हता तो, तो बायकोला व मेव्हण्याला दाखवतो. तर ती म्हणजे तीच. तोपर्यंत ही रेलकी पटरीपर. तर शारदा म्हणजेच शांती आहे आणि ती आता इथं नाही -- म्हणजे निघून गेलेली आहे ( भारतीय स्त्रीच्या आदर्शाप्रमाणे तिचा त्यागाचा वगैरे विचार आपल्याला बरोबरच धरला पाहिजे.)-- हे कळताच तो खचाखच डोळयांवरच्या पट्टया ओढून काढून फेकून देतो आणि अगदी टक्क बघायला लागतो की हो ! अरे बाळ, तुला आता दिसतंय का वगैरे विचारायच्या आत हा धूम बाहेर. मोटार घेतो न् फुल स्पीडमधे सुटतो.

ही शांतपणे, कृतनिश्चयवृत्तीने रुळांवरून चालतेय, मागून हा लख्ख उन्हातून ( नुकत्याच डोळयांवरच्या पट्टया काढून फेकलेला असा ) ' शांती ऋ शांती ऋ ऋ करत पळत येतो, आणि ( अरे बापरे ! ) धडाड धुडुम्-- धडाड धुडुम् -- गाडी येतेय ! पण काही होत नाही. गाडी निघून जाते आणि मग ही पुलावरून खालच्या नदीत उडी मारते.( आता वैजयंतीमालेला काय टॉप पोहता येतं हे काय ' संगम ' पाहिलेल्यांना माहीत नाही ? ) मग तोही उडी मारून तिला बाहेर काढतो, वगैरे. पण तिला जर एवढी आत्महत्या करायचीच होती तर धडाड-धुडुम् गाडीखाली पडायला तिला काय हरकत होती, असा एक सूक्ष्म विचार आमच्या डोक्यात येऊन गेला. ते असो. वैजयंतीमालेकडून आपण एवढ्या बुध्दीची अपेक्षा करण्यात काही अर्थ नाही. ती आपली सांगकामी नटी.

तर आणखी काय ? ऐन प्रॉब्लेमच्या वेळी देवळाच्या पार्श्वभूमीवरचं गाणं ? आहे. मिट्ट अंधार -- कडकड किंवा -- घनघोर पाऊस ? -- आहे. पार्टी ? -- आहे, व्हिलन ? -- आता रजनीची आई शांतीला घराबाहेर काढते म्हणजे -- आहेच. शेवटी मारामारी ? -- नाही, ती मात्र नाही. तर लोकहो, देखो, सोचनेकी बात है, शेवटी थोडीशी मारामारी नसलेलं पिक्चर काढणं ही काय सामान्य गोष्ट आहे ? केवढं हे धाडस !

फोटोग्राफी सुंदर, ' मेरा प्यार भी तू है, ये बहार भी तू है ' हे पॉप्युलर व्हायच्या लायकीचं गाणं. ठाकठीक, गोरागोमटा अभिनय.

अशा या ' साथी ' त श्रीधर कुठे दिसणार ? आपण त्यांना क्षमा करू.

--- ००० ---

**घरची राणी**

' संसाराच्या सुरुवातीला अपेक्षांचे पांगुळगाडे घेऊन चालणारी नवराबायको अशीच अडखळून पडतात. ' -- ज्यांची इतकी तारीफ तुम्ही आम्ही ऐकली ते हे संवाद असले !

'' विश्वासाशिवाय प्रेमाला अर्थ काय ? ' - ? घ्या लिहून ! अहो सुभाषितंच ही ! भालजींच्या संवादांनी या सिनेमाचं फालतू नाटकासारखं काहीतरी झालेलं आहे असं म्हणायला तशी फारशी हरकत असायचं कारण नाही.

एकूण सिनेमाही तसलाच. बोगस. या सिनेमाबद्दल चांगलं असं म्हणण्याजोगं काहीही नाही. फोटोग्राफी, दिग्दर्शन, संगीत -- सगळंच थर्डरेट. दिग्दर्शक राजदत्त म्हणजे भालजीच असावेत अशी आम्हाला एक प्रामाणिक शंका आहे.

बेगडी ध्येयवादाचं हास्यास्पद चित्रण म्हणजे हा सिनेमा. शेवटी तर कहरच. खेड्यातल्या ' माणसा' शी लग्न करणारी शहरी मुलगी त्यानं आपली शंका घेतली म्हणून त्याला घराबाहेर जायला सांगते. तर हा आपल्या वडिलांच्या तसबिरीला आणि मातोश्रीना कुर्निसात करून, 'धाकट्या मालकीणबाईंनी मला घर सोडायला सांगितलंय ' असं म्हणून आपला चालला ! आम्हाला वाटलं आता हा बहुतेक घोड्यावर टांग मांडणार ! तर मंडळी, आमचा आपला एक छोटासा प्रश्न असा की भालजीबाबांनी ही ' चित्रं ' कुठल्या म्युझियममधून पैदा केली ?

सुलोचनाबाईंचा महान आईचा निर्ढावलेला चेहरा सोडला तर इतर कुणाचाच चेहरा हलत नाही. भरताड वाक्यांखेरीज तो आपणहून काही बोलत नाही. गोवईकरांबद्दल काही न बोलणंच बरं. सुधीरकुमार ढगळ वाटतो. राहता राहिली अनुपमा. नवा चेहरा. ही एक नाजुक, कोमल, गुलजार नटी आहे.पण नटी म्हणून खूपच कच्ची. एखाद्या

’शहाण्या ’ सिनेमात काम मिळालं तर ही नटी काय आहे याबद्दल अधिक बोलता येईल. तूर्त तिच्याहीबद्दल बोलण्यासारखं काही नाही.

तर काय हो भालजी, नाही म्हणजे एवढ्या स्ट्रिक्ट आईवडिलांचा पोरगा... आईला ’ ममी ’ म्हणता कामा नये अशी सुनेला सूचना देणाऱ्या आईचा पोरगा -- अशा या परमपूज्य आईचा परमभक्त असा हा पोरगा ...नाही म्हणजे आम्ही त्यात काही मानत नाही... पण तरीसुध्दा एवढ्या टायटमटाईट अशा गच्च पँटी का घालत होता हो ?

तुम्ही उत्तर नका देऊ. पंचवीस...तीस वर्षांच्या त्या घोड्याला पिताजींच्या तसबिरीपुढं नाक घासायला लावा आणि दोन दिवस त्याला जेवायला घालू नका. वाटल्यास थोडंसं कोंडूनही ठेवा.

आणि बरं का हो, एवढं झाल्यावर आम्हाला कळवा. म्हणजे आम्ही मग त्याच्याकडे एक आदर्श चिरंजीव म्हणून पाहू.

--- ००० ---

**संघर्ष**

सूडाचं चक्र कुठंतरी थांबायला हवं...हा संदेश. दोन घराण्यांतल्या वैराची कहाणी. ढोबळ आणि भडक असूनही सुसह्य.

भवानीप्रसादचं भयानक रूप पाहून कुंदन पळून जायचा प्रयत्न करतो तो प्रसंग एका अरुंद अशा बोळात घेण्याची कल्पना खास.

भवानीप्रसद ’लैला’ला ( वैजयंतीमालेला ) धक्क्याबुक्यांनी घराबाहेर काढतो त्यावेळचा वैजयंतीमालेचा अभिनय...विशेष.

’ मेरे पास आओ, नजर तो मिलाओ ’, ’ अगर ये हुस्न मेरा प्यारके शोलोंमें जल जाये ’, ’वो शीशा हमने टोड दिया’ आणि ’ तो तब मेरी चाल देख ले ’...ही नौशादची मस्त गाणी.

एकंदर पिक्चर ठीक. पैसेच खर्चायचे तर मग हे घ्या बघून

( आरपार, सुयोग साधना, फेब्रुवारी ६९ ).

--- ००० ---

**अडीच घरं वजिराला**

’ महाराष्ट्रीय कलोपासक ’सारखी एखादी नावाजली गेलेली संस्था हे असलं नाटक निवडते तेव्हा नाही म्हटलं तरी आश्चर्य वाटतंच. त्याला इलाज नाही. या नाटकाची गंमत अशी आहे की दिग्दर्शक आणि नायकाचं काम करणारा नट या दोघांनीही काहीही केलं तरी ते हमखास चुकणार. राजा नातूंसारखा दिग्दर्शक या दरीत उडी घेतो ही मराठी रंगभूमीवरची एक विनोदी घटना.

उत्पल दत्त यांच्या ’ मेघ ’ या बंगाली कादंबरीवरून प्रा.यशवंत केळकर यांनी हे मराठी नाटक लिहिलं. पण आपण आपलं या नाटकापुरतंच बोलू. नाटकाचा विषय काय वगैरे गोष्टी दुय्यम ठरवून हे नाटक रहस्यमय झालं पाहिजे असा लेखकानं विडा उचलेला. त्यामुळे कसा एक महान पेच उभा राहतो तो पहा. ’ अडीच घरं वजिराला ’ या नाटकाच्या नावात जी एक सर्वसामान्य पातळी सोडून भ्रमिष्टपणात प्रवेश केल्याचा अर्थ आहे, तो या नाटकाचा विषय. पूर्वी एकदा शिझोफ्रेनिया हा मानसिक आजार हाऊन गेलेला समर नावाचा एक लेखक हा या नाटकाचा नायक. हा माणूस आता रहस्यकथा लेखनाकडं वळलेला. बुध्ददेव चौधरी हा त्याच्या रहस्यकथेचा नायक. हा माणूस निर्दोष खून करू शकतो. ( म्हणजे त्या खुनाचा काहीही पुरावा राहणार नाही असा खून करू शकतो. ) तर या सगळया परिस्थितीत समरची पूर्वीची प्रेयसी सुजाता ( की जिनं एका गुंडाशी विवाह केलेला आहे ) त्यानं तिला लिहिलेली पत्रं त्याच्या बायकोला दाखवण्याचा धाक घालून काही एका रकमेची मागणी करते. इथपर्यंत हे सगळं ठीक. या एवढ्या प्रकारानंतर सुजाताचा खून घडतो. म्हणजे समर तिचा खून करतो. आपल्या समक्ष रंगमंचावर हे घडतं.( त्यात पुन्हा खून झाल्यावर प्रेतानं हातबित हलवल्यानं खुनाची लज्जत वाढली ते सोडा.) आता हा खून म्हणजे प्रत्यक्ष घडलेला खून नसून समरच्या भ्रमिष्टपणानं कल्पिलेला खून आहे असं जर तुम्हाआम्हाला समजा आधीच सांगून टाकलं असतं तर हे नाटक रहस्यमय होणं शक्य होतं का ? तर नाही. म्हणजे मग ते लोकांना आधी कळणार नाही अशी व्यवस्था करायला हवी. म्हणजे यातला भ्रमाचा भाग लोकांना कळता कामा नये. त्यासाठी नायक हा खूपच नॉर्मल दाखवणं भाग. सारांश काय की नायकाची परिस्थिती कशी ठेवायची
हे ठरवणं दिग्र्दशकाला आणि नटाला दोघांनाही कठीणच. म्हणजे राजा नातूंचा दिग्दर्शनाचा आणि यशवंत महाडिकांच्या अभिनयाचा -- असे दोन्ही मुद्दे बऱ्याच प्रमाणात सोडून देणं भाग आहे.

प्रेतावस्थेत केलेली हालचाल सोडली तर शोभा मांडके यांनी उभी केलेली सुजाता पूर्णपणे ’ खरी ’ होती. कल्पना गोसावी यांनी माधुरीचा गोडवा आणि पतीबद्दलची तिची काळजी -- सगळं सहज दाखवलं. ’ बीस साल बाद ’ किंवा ’ कोहरा ’ अशा हिंदी रहस्यपटांतून जो एक संथ, म्हातारा गडी असतो तसा तो इथंही होता. तो गडी जसा उभा केला जातो तसाच माधव वझ्यांनी हाही उभा केला.

धड ना विषयाचा पक्केपणा आणि खरेपणा ना लोकप्रिय तंत्राचा सर्रास वापर -- असा हा एक ढिसाळ. ठिसूळ फोलपट प्रकार.

आनंद पैंचं नेपथ्य मात्र टॉप !

--- ००० ---

**तीसरी कसम**

जीव गहाण टाकून काढलेला, जीव गहाण टाकून पाहावा असा हा अप्रतिम चित्रपट. साधा, सरळ, सच्चा आणि कसदार. हिरामण नावाचा एक गाडीवान एका नौटंकी नर्तकीला जत्रेच्या ठिकाणापर्यंत पोचवतो-- हा तीस तासांचा प्रवास एवढंच मध्यांतरापर्यंत घडतं. पण एक क्षणही असं वाटत नाही की ही बैलगाडी किती वेळ पाहायची. अनेक बारीकसारीक गोष्टींतून हिरामण आणि ती नर्तकी हिराबाई यांच्यातले संबंध फुलत जातात. सहजपणे विकसत जातात. मुळात हिरामण हा एक भाबडा माणूस. रात्रीच्या वेळी आपण एका बाईची सवारी घेऊन चाललोय हे त्याला काही बरं दिसत नाही. कारण त्याची आयडिया अशी असते की एखादं भूतच अशा वेळी बाईच्या रूपानं गाडीत येतं. तर असा तो हैराण असतो. वाटेत देऊळ लागल्यावर तो ' मला या संकटातून सुखरूप सोडव ' म्हणून प्रार्थनाही करतो. असे अनेक प्रसंग. तो बैलाला चाबूक मारताना तिनं अडवण्याचा प्रसंग, वाटेतल्या झऱ्यात ती अंघोळ करू इच्छिते तेव्हा अमुक एका ठिकाणी कुमारिकांनी न्हाऊ नये अशा त्या झऱ्याबद्दलच्या एका समजुतीवरचा त्याचा विश्वास दिसतो तो प्रसंग, त्यांच्या जेवणाचा प्रसंग, ती गाडीत झोपलेली असताना तिच्या पायावर मुंगी चढत जाते तो प्रसंग, ती त्याला नाटकातला एक संवाद वाचून दाखवते तो प्रसंग...असं कितीतरी. क्षण न् क्षण असा चैतन्यमय आणि सहज.

मध्यांतरानंतरचा बहुतेक सगळा भाग त्या जत्रेतला आहे. सगळया घटना कथा-स्वरूपात इथं सांगण्यात काही अर्थ नाही. ते सारं प्रत्यक्ष पाहायलाच हवं. ' लाली लाली डोलियामे ' या गाण्याचा मात्र इथं मुद्दाम उल्लेख करायला हवा. खेड्यातली पोरंटोरं हिराबाईला ' दुल्हनिया ' समजून डुलत, नाचत, गाडीमागनं धावत हे गाणं म्हणतात. हा प्रकार सर्व दृष्टींनी अप्रतिम. वहीदा रेहमान ( हिराबाई ) नुसती हसताना दिसते. बस्स्. वहीदाचं हे हास्य अमर आहे. आणि या गाण्याचा शेवट तर असा घेतलाय की ' चांगलं ' या अर्थाचे सगळे शब्द वापरून टाकावेत.

जसा त्या गाण्याचा शेवट तसाच चित्रपटाचा शेवटही विसरू म्हणता विसरणार नाही.

फक्त बेगडी चित्रपटांना पोसणाऱ्या जनतेला आमचे दंडवत !

--- ००० ---

**लोभ नसावा ही विनंती**

हे एक अनुवादित नाटक. आग्नेय आशियातल्या युध्दभूमीवरच्या एका इस्पितळाच्या एका वॉर्डमध्ये हे सगळं घडतं. सुरुवातीला पहाट आणि मागंपुढं होणारा बॅटरीचा झोत. म्हणजे बाहेरच्या कॉरिडॉरच्या लांबीची कल्पना देणारा.

तर त्या वॉर्डमध्ये पाच पेशंट्स्. हसत खेळत -- चिडत-भांडत - चेष्टा करत -- मस्करी करत दिवस काटणारे. आणि या सगळया मोठ्या मुलांना आपल्या मुठीत ठेवणारी नर्स. या सगळयांवर एक महान जबाबदारी येऊन पडते. लेची नावाचा मरू घातलेला, तुटक स्वभावाचा, एक तिरसट रोगी त्या वॉर्डमध्ये येणार असतो. तो मरणार आहे हे त्याला माहीत

नसतं. तर अशा माणसाबरोबर वागण्याची ही जबाबदारी. बस्स. हा विषय. तीन अंकांत तऱ्हतऱ्हांनी आपल्यापुढं फुलतो. प्रेम, सहानुभूती, चीड, वैताग यांचं एक खरंखुरं दर्शन आपल्याला घडतं.

अरविंद कारखानीस ( लेची -- म्हणजे तो तिरसट रोगी ), अनुया पालेकर ( नर्स ) आणि नारायण पै ( यांक )यांचं आपापल्या भूमिकेतलं कसब खास वाटलं. टपालाचा प्रसंग, लेचीच्या वाढदिवसाचा प्रसंग, फोटोचा प्रसंग -- हे महत्त्वाचे प्रसंग. त्यांच्या सहज जिवंतपणानं जाणवले.

हॉस्पिटलमधलं दैनंदिन जीवन आणि हा विचित्र प्रकार यांचं हे मिश्रणरूप नाटक भरणं ही एक वेगळीच गोष्ट आहे. अरविंद देशपांडे अर्थातच उणे पडलेले नाहीत.

तेंडुलकरांचं भाषांतरही फारसं खटकलं नाही.

--- ००० ---

**इतर**

इतर म्हणजे ’ साधू औ शैतान ’ आणि ’खिलाडी’. ’ साधू..’ .मध्ये धमाल करमणूक आहे. ’ कभी आगे कभी पिछे ’ हे गाणं मुद्दाम जाऊन पडद्यावर पाहावं असं. मेहमूद तर आहेच पण किशोरकुमारनं उभा केलेला गायक हा एक कहरच.

’ खिलाडी ’ तला दिलीपराज मात्र दुबळा वाटतो. हाणामारीत हा नायक खराच वाटत नाही. पण फिअरलेस नादिया हा मात्र एक अजब प्रकार आहे. त्यामुळं या चित्रपटातली मारामाऱ्यांची दृश्यं वेगळी आणि खास.

( आरपार,सुयोग साधना, मार्च १९६९ )

**नवे चेहरे**

नव्या चेहऱ्यांच्या जाहिराती म्हणजे तशा आवश्यकच. चित्रपटाचं नाव काय तर ' सपनोंका सौदागर.' म्हणून हेमा मालिनी म्हणजे ' ड्रीम गर्ल. ' तो सिनेमा येण्यापूर्वी कितीतरी दिवस आधीपासून कित्येकजण ही ड्रीमगर्ल कशी दिसेल त्याची स्वप्नं रंगवत होते. दुसरी ' इज्जत ' मधली जयललिता. तिची तर चक्क मापंच येत होती. म्हणजे एलिझाबेथ टेलरसारखी मोजून घ्या. ' मन का मीत ' मधल्या चार नव्या चेहऱ्यांच्या तडाखेबंद घोषणांबद्दल तर काही सांगायलाच नको. सोमदत्त, लीना, विनोद खन्ना आणि संध्याराणी.

लोक म्हणाले की हेमा मालिनीला प्रथमच राजकपूरबरोबर काम करायला मिळालं ही गोष्ट भाग्याची आहे. तर राजकपूर म्हणाला की उलट त्यालाच हिच्याबरोबर काम करायला मिळालं. आपण विचार करताना अर्थात् या सगळया गोष्टी थोड्या बाजूला ठेवू. हेमा मालिनी काय किंवा जयललिता काय दोघींचंही सौंदर्य वगैरे ठीक आहे ; पण या दोघींनीही निर्भीडपणाच्या बाबतीत एक छलांग मारलेली आहे हे अधिक वैशिष्ट्यपूर्ण. हेमा मालिनी ही बंजारन आणि जयललिता ही एक आदिवासी लडकी. त्यामुळं दोघींनाही ग्रामीण ठसका दाखवायला खूपच वाव. ग्रामीण ठसका आणि शिवाय अडाणीपणातला उन्मुक्तपणा ! ( हा उन्मुक्तपणा डोळयांसमोर आणायचा असेल तर ' माय फेअर लेडी ' -- मधली ऑड्रे. हेपबर्न आठवा. अर्थात तिच्याशी तुलना व्हावी एवढा या दोघींच्याही अभिनयात दम नाही -- हेही आहेच.) चुंबनाचं काय व्हायचं असेल ते होवो पण मिठी हा प्रकार मात्र अधिकाधिक प्रगत होतो आहे.(' मन का मीत' मध्ये असा एक विशेष प्रकार आहे.) थोडक्यात, सेक्स अपीलच्या क्षेत्रात या दोघींचेही पदार्पण अर्थपूर्ण आणि परिणामकारकही ठरेल असा भरोसा वाटतो.

आता ' मन का मीत ' मधली चौकडी. आमची कल्पना अशी की सोमदत्त - लीना आणि विनोद -- संध्या अशी दोन युगुलं असतील, पण तसं काही नाही. संध्या राणीला या चित्रपटात लीनाची सखी-- इतकाच वाव आहे. ती लीनाकडे सुट्टी घालवायला आलेली असते इतकंच. सारांश, एकंदरीत विशेष दखल घेण्यासारखं सध्या तरी तिच्याबद्दल काही नाही. त्यामुळं सोमदत्त, लीना आणि विनोद खन्ना हे तीनच यातले विचारार्ह. लीनाच्या बाबतीत पुन्हा सेक्स अपील वगैरे मुद्दे आहेतच. अभिनयातला कस म्हणाल तर तनुजाची लेव्हल. पॉलिशड आणि आकर्षक, पण गांभीर्य फारसं पेलणार नाही. ही नटी नक्कीच तनुजाहून अधिक लोकप्रिय होईल. पण, एकंदरीत ते तितकंच.

सोमदत्त हा एक नाचताबिचता येणारा नट. ठीक आहे. खेड्यात तो अधिक बरा वाटतो. शहरात मधून मधून शशीकपूरचा भास होतो, त्याला आता इलाज नाही. पण आपल्यातला शशीकपूर जर तो वजा करू शकला तर बरीच आशा आहे. विदोन खन्ना तर सरळ सरळ प्रति'राजकुमार म्हणूनच आणलेला.( राजकुमार सुरुवातीला खलनायकच होता हेही लक्षात घ्या.) खन्नानं केलेलं राजकुमारचं अनुकरण खूपच स्तुत्य आहे. पण हालचालीतला - अभिनयातला मितपणा जरी उचलता आला तरी राजकुमारच्या डोळयांची ताकद कशी उचलणार ? तरीही खन्नानं उत्सुकता निर्माण केलेली आहे एवढं म्हणता येईल.

--- ००० ---

**वासना**

तर स्टार्टिंगलाच केस पिकलेली पद्मिनी । म्हटलं काय १९८०-९० साली बाहेर येणाऱ्या कुठल्या पिक्चरचं ट्रेलरबिलर आहे का काय, पण नाही, लवकरच फ्लॅश बॅक सुरू झाला. म्हणजे असं की तिचा मुलगा दीपक, त्याच्या एक्कीसवी सालगिरहच्या दिवशी क्लबातून उशिरा परत येतो, आणि येतो तो पिऊन येतो. तत्पूर्वी अर्थातच क्लबातला हेलनचा डान्स आहे.( डान्स घेतलाय टॉप. सावल्यांवरून फिरत जाणारे रंगीत प्रकाश वगैरे.) पद्मिनी त्याला फडाफडा मारते. इथून मग दारूमुळं त्याच्या बापाचा कसा नाश झाला ते सांगण्यासाठी फ्लॅश बॅक सुरु होतो.

साहजिकच यंग स्वरूपात पद्मिनी येते. ती कुठून नाचून आलेली असते आणि तिच्या मुलाला बरं नसतं ( बरोबर, म्हणजे दीपकलाच. ) तर ती शप्पथच खाऊन टाकते की यापुढं अजिबात नाचणार नाही म्हणून. आला का वांधा ! म्हणजे सबंध पिक्चरभर पद्मिनी असूनच्या असून पुढं तिचा एकही नाच नाही ! मग आम्हाला साहजिकच असा प्रश्न पडला की नाच सोडल्याची शप्पथ घेणाऱ्या नर्तकीच्या कामाला खरोखरची नर्तकी कशाला हवी ? मीनाकुमारीसुध्दा चालली असती की. अगदी तो एकमेव नाच हवाच असला तर फार तर ' चित्रलेखा 'तल्यासारखी एखादी डमी वापरायची. शिवाय 'काजल' ची जोडीही जमली असती. विषयही पुन्हा दारूबिरूचाच होता. पण ते नाही. त्यांनी आपली खरोखरची नर्तकीच घेतली. हा ' वास्तववाद ' जिथं तिथं नडतो बघा.

तिचा दारूमुळं नाश पावणारा नवरा म्हणजे कैलाश - म्हणजे राजकुमार. त्याच्या नाशाचा इफेक्ट वाढवण्यासाठी शेवटी त्याच्या बहिणीचं लग्न टाकलंय. हे लग्न आणि कुठलं आलं मधेच असं तुम्हा-आम्हाला वाटायला नको म्हणून तिचं ( कुमुद छुगानी ) आणि डॉ.शेखरचं (विश्वजित ) प्रकरण मधून मधून पेरलंय. ( शिवाय राजेंद्रनाथ आणि मुक्री आहेतच. )

शेवटी नाही म्हटलं तरी थोडी भीती होतीच. म्हटलं इकडं शहनाईयाँ बजू लागल्या आणि हा भाई तर सरळ सागर ( म्हणजे गुंडांच्या एका टोळीचा नायक -- हे लोक त्याचा उपयोग करून घेण्याच्या प्रयत्नात कसे होते वगैरे आधी आहे -- ) असलेल्या बंगल्यात शिरतोय. पण म्हटलं ' प्यार का बंधन ' मधेसुध्दा असंच त्याच्या बहिणीचं लग्न होतं आणि मधे मारामारी वगैरे होती, पण तेव्हा तो जस्ट इन टाइम येऊन पोचला होता ( नंतर मरून गेला ते सोडा ) -- म्हणून थोडासा निर्धास्त होतो. पण पुलीसला खबर मिळालेली होती, त्यामुळे ते केव्हा टपकतील त्याचा नेम नव्हता. त्यात गंमत अशी झाली की तो त्या बंगल्याच्या पायऱ्यांवरून जात असताना सरळ त्याच्याबरोबर एक झोत सरकत असलेला दिसायला लागला. म्हटलं टाकला बहुतेक पोलीसांनी सर्चलाईट ! पण शुटिंगच्या वेळीही असे झोत असतात हे लवकरच ( खरं म्हणजे असली हजार शूटिंगं पाहिलेल्या आमचा विचार करता उशिराच ) लक्षात आलं. मारामारी कंप्लीट होऊन त्या गुंडाला दरीत पाडून टाकणं वगैरे व्हायच्या आत पोलीस येतात कशाला तिथं मरायला ? ते आपले जगायला नंतरच आले.

बाकी कथाभाग वगैरे इथं सांगत बसण्यात काही अर्थ नाही. फक्त इतकंच सांगतो की तो काही त्याच्या बहिणीच्या लग्नाला पोचू शकला नाही. म्हणजे पोलिसांच्या तडाख्यातून वगैरे तो सुटला, पण सलोनीकडे ( ही एक नाचणारी नर्तकी ) दारू पिऊनच त्याचा अंत झाला. शेवटी आमची भीती खरी ठरली. पण दारूबिरूची थीम सुधाकर गेल्याशिवाय पूर्ण होत नाही हेही खरंच.

तरीपण म्हटलं दु:खान्त असा शेवट होतोय की काय ! भारतीय जनतेचा विचार करता,म्हणजे हे कठीणच. 'आह ' सारखं एक धडधडीत उदाहरण समोर असताना ! ) पण तो सगळा फ्लॅश बॅक असल्यानं पुन्हा दीपकच्या इक्किसव्या सालगिरहचा दिवस आला. एवढं सगळं ऐकल्यावर दारू न पिण्याची अर्थातच त्यानं शपथ घेतली. तेवढ्यात बाहेर मेहमान आलेले आहेत अशी वर्दी मिळालीच. मग अभिनंदन, ' हॅपी बर्थडे टू यू ' वगैरे. इथं एन्ड.

आता एवढं सगळं जरी असलं तरी या पिक्चरची जमेची बाजूही सॉलीड आहे. राजकुमारची भकास-शून्य नजर ! सबंध पिक्चर ओलांडून ती आपल्यापर्यंत पोचते. आणि शेवटी परिणाम राहतो तोही तिचाच.

उत्तम छायाचित्रण आणि उत्तम संकलन या आणखी दोन जमेच्या गोष्टी.

पण हा चित्रपट पहा असं सांगायला, यात राजकुमार आहे एवढं सांगितलं तरी पुरे.

--- ००० ---

**दुनिया**

हा चित्रपट म्हणजे हरवलेल्या माणसांचा तमाशा. बापाचा मुलगा, पत्नीचा नवरा, मित्राचा दोस्त, बहिणीचा भाऊ, भावाची बहिण, मित्राची मैत्रीण, वगैरे वगैरे असं कुणाचं कोण कोण हरवलेलं होतं. शाम बहल आणि अमरजीत यांनी जादूची कांडी फिरवून सगळयांना एकत्र आणलं आणि ' ये दुनिया है ' असा रंगीत चित्रपट काढला.

तर स्पष्टच सांगायचं म्हणजे हा चित्रपट फालतू आहे. आणि ' ये दुनिया है ' असा सारांश काढण्यासारखं तर यात काहीही नाही. तसं काय मग कुठल्याही चित्रपटाचं नाव ' दुनिया ' ठेवता येईल -- विशेषत: लहानपणाच्या बालकांना मोठेपणाच्या तरुणपणी एकत्र आणणाऱ्या, म्हणजे उदाहरणार्थ ' संगम ' किंवा ' बेटी-बेटे '. सारांश, आमच्या दृष्टीनं म्हणाल तर या चित्रपटाचं नाव ' दुनिया झुकती है '-- हेच.( या नावाचा एक चित्रपट आधी येऊन गेलेला असला तरी. )

तरीही या चित्रपटाची एक गोष्ट आम्हाला आवडलीच. ती म्हणजे 'स्क्रीन' मधून झळकून गेलेल्या याच्या अनेक प्रकारच्या जाहिराती. एवढ्या सुंदर जाहिरातींचा चित्रपट बोगस निघावा हा एक प्रचंड दैवदुर्विलास. पण काय करणार, ' ये दुनिया है '.

--- ००० ---

**जिव्हाळा**

' घरच्या राणी ' ला बक्षीस देण्याच्या या जमान्यात याही चित्रपटला बक्षीस मिळून जायला हरकत नाही. कारण 'ध्येयवाद ' ! हे असे ध्येयवादी चित्रपट आम्हीही भारून जाऊन बघतो. म्हणजे आम्हालाही किमान एखादं सर्टिफिकेट तरी हवंच.

आईबापांनी टाकलेल्या, समाजाने डोळेझाक केलेल्या, मायेसाठी हपापलेल्या एका अनाथ बाळाची ही कथा. मातृप्रेम आणि पुत्रप्रेम यांची ही महान गाथा. पाहावी, भडभडून रडावं आणि धन्य व्हावं.

जयश्री गडकर आणि मास्टर राजीव यांचा हा जिव्हाळा. ती अनाथाश्रमात कशी आली वगैरे परत सांगत बसण्याइतका उत्साह आमच्यात नाही. पण जिव्हाळा लागतो. आणि या सगळया प्रकारात काय संवाद आहेत महाराजा ! विशेषत: त्या अनाथ मुलाचे ! पुढल्या कुठल्यातरी अशाच एखाद्या सोज्वळ चित्रपटाचे संवाद त्या मुलाकडून लिहवून घ्यावेत अशी एक शिफारस आम्ही इथे करून ठेवतो.( अर्थात गर्दीची क्षमा मागूनच. )

या सबंध चित्रपटात आम्हाला काय आवडलं असं विचाराल तर त्या मुलाला कोंडून ठेवलेलं असताना वरच्या खिडकीतून करेक्ट खालच्या खिडकीवर तो कुलूप फेकून मारतो तो प्रसंग. मा. राजीव हा मुलगा एकंदरीतच ठीक आहे. श्रीकांत मोघेही ठीक. जयश्री गडकरचं सोज्वळ काम ठीक आहे. पण ती मुसमुसलेली जाणवतेच.

एकंदरीत विचाराल तर अलीकडच्या मराठी चित्रपटांत आमचं मत 'एक गाव बारा भानगडी ' ला. एरवी, वेडगळ हळवेपणा आणि भोंगळ खोटेपणा यांच्याच समया जिकडं तिकडं तेवताना दिसतात. का असेना, त्या निमित्तानं मराठी चित्रसृष्टी ' पवित्र ' राखण्याचं तरी काम होतंय. आणि 'हेही नसे थोडके' असं म्हटलेलं आहेच !

--- ००० ---

**काळं बेट लाल बत्ती**

विचारप्रधान चर्चात्मक असं नाटक लिहिताना बऱ्याच वेळा लेखकावर सत्त्वपरीक्षेचा प्रसंग येतो. माणसांसंबंधीचे एखादे सार्वकालीन सत्य प्रतिपादणारं नाटक किंवा समाजाविषयीच्या काही नव्या कल्पना मांडणारं नाटक -- अशा नाटकांतून येणारी पात्रं ही बहुतेक समाजाच्या कोणत्या ना कोणत्या घटकाचं प्रतिनिधित्व करणारी असतात ( नायक बऱ्याच वेळा अपवाद असतो ) त्यामुळं ही पात्रं ठोक वैशिष्ट्यांनी युक्त -- ढोबळ असतात. आणि या गोष्टीमुळे, तात्त्विक विचार एक तत्त्वज्ञान म्हणून मांडण्यात विचारांच्या सूक्ष्मातिसूक्ष्म क्षेत्रांत शिरण्याची जी मोकळीक लागते, तीवर मर्यादा येण्याची शक्यता असते. आणि शिवाय संपूर्ण समाजाचं प्रतिनिधित्व उभं करणं हे पुन्हा अशक्यच असतं. म्हणजे चार पात्रं आणखी घातली तरी चालतील किंवा आहेत त्यातलं एकाददुसरं काढून टाकलं तरी चालेल असा हा प्रकार असतो. या सगळया गोष्टींतून, विषयाची चर्चात्मकता कंटाळवाणी होणार नाही याची काळजी घेत नाटक उभं करायचं !

माणसाचं मूळ स्वरूप काळंकुट्ट -- क्रूर असूनही तो समाजात संत--सज्जन म्हणून शुभ्र स्वरूपात वावरत असतो हे लेखकाचं सूत्र. हे सांगण्यासाठी समाजाचे काही घटक ( उदा. धर्मपरायण ब्राम्हण, शास्त्रज्ञ, कामगार, नेता, व्यापारी, स्त्री,) एका अनपेक्षित विचित्र परिस्थितीत आणून त्यांना उघडं पाडावं ही लेखकाची कल्पना. त्यासाठी मग अर्थात त्यानं प्रेक्षकांच्या कल्पनाशक्तीवर सर्वसामान्यपणे टाकला जातो त्याहून अधिक विश्वास टाकला.( शिवाय पडद्यावर गरुड, स्वस्तिक, तराजू, पिंड, कुलूप, मोर, झेंडे, कवट्या, कबूतरे, क्रॉस, स्तूप, मशीद, आणि लहान मासे - मोठे मासे - अशी सूचक चिन्हंही काढली. त्यात गंमत अशी की आमची जागा दाराकडे उजव्या बाजूला होती. उजव्या बाजूचा पडदा पाहण्यासाठी मधल्या सत्कारसमारंभाच्या काळात आम्ही मुद्दाम दुसऱ्या टोकाला जाऊन आलो !) त्यामुळं काही लोकांना

या नाटकाला 'प्रायोगिक ' म्हणायचाही मोह झाला. पण एकदम उत्साहानं काही बोलण्याचा प्रकार सोडून या नाटकाकडे पाहावं असं वाटतं.

माणसाची शुभ्र आणि काळया रंगात विभागणी कल्पिणारं तोडरमलांचं तत्त्वज्ञान हे मुळातच ढोबळ -- उथळ -- आणि कुठल्याही सामान्य कलावंताचं असणारं असं तत्त्वज्ञान आहे. यात एक तर डोक्याला फारसा ताप नसतो आणि दुसरं म्हणजे भडक बोधप्रदतेत डोक्याला गुंगीही छान येते. हिंदी-मराठी चित्रपटांचे नायक-खलनायक उभे करताना हेच गुंग करणारं तत्त्वज्ञान वापरलेलं असतं. मानवजात आपला क्रूरपणा टाकून देत नाही हा बुध्द - ख्रिस्त - गांधींचा पराभव आहे असं म्हणण्यामागं तरी याह्न वेगळा कोणता दृष्टिकोण आहे ? सारांश, तोरडमलांमधला विचारवंत ह अत्यंत ढोबळ आणि सामान्य आहे. यातून मग नाट्य, नाट्यमय संवाद ( ' सांगितलं तरी समजत नाही, समजलं तरी उमजत नाही ' -- असे वा याह्न टाळीदार ), थ्रिल वगैरे ज्या गोष्टी उभ्या राहतात त्यांची पाहिजे तर हिंदी-मराठी चित्रपटांइतकी कौतुकं जरूर करावीत.

तर नाटक म्हणून हा प्रकार यथायथाच आहे हे एकदा सिध्द झाल्यानंतर इतर गोष्टींकडे वळू. प्रयोग अतिशय नीटनेटका बसवलेला होता. मोहन मुंगी ( शास्त्रीबुवा ), मधुसूदन देशमुख ( आरामे ) आणि बाळासाहेब हिरे ( डॉ.अब्जबुध्दे --म्हणजे शास्त्रज्ञ ) यांचा अभिनय विशेष वाटला. तोडरमलांच्या बाबतीत लेखक -- दिग्दर्शक --अभिनेता या तीनही अंगांबद्दल एकाच वेळी बोलायचं झालं तर पापीलर पठडीतला एक महान माणूस असं बोलता येईल.

राज्य पातळीवरची बक्षिसं या नाटकाला मिळावी ही अत्यंत रास्त गोष्ट. पण मग ' लोभ नसावा ही विनंती ' हे दुसरं कसं ? गूढ विनोद !

--- ००० ---

**जहांगीर जहांगीर**

पिरांदेल्लोच्या ' हेन्री द फोर्थ ' चा हा बंगाली अवतार बघितला. दिग्दर्शक होते ' तिसरी कसम ' चे बसु भट्टाचार्य.

हा प्रकार खूपच आवडला. कथा सांगायची झाली तर अशी. कॉलेजमध्ये ' जहांगीर ' हे नाटक बसतंय. प्रेमाचा त्रिकोण -- दोन पुरुष, एक स्त्री. ज्यानं हमखास जहांगीर व्हावं आणि नूरजहाँ पळवावी अशाला, दुसरा, विजेचा शॉक बसवतो. आणि गंमत अशी होते की त्या शॉकमुळं तो मुलगा डायरेक्ट जहांगीरच्या रोलमध्ये जातो,जहांगीरच होतो. इथे पहिला अंक.

दुसऱ्या अंकात जहांगीरचं सिंहासन आणि झळझळीत पोषाखातला जहांगीर. अहो तो त्याचा दरबारच. नोकरचाकर, सैनिक वगैरे वगैरे. मग आपल्याला कळतं की त्याच्या वेडाला अनुकूल असं वातावरण भोवती ठेवून एक मानसशास्त्रज्ञ त्याच्यावर प्रयोग करीत असतो. त्यासाठी दिमतीला माणसं असतात.( जहांगीर झालेला मुलगा घरचा श्रीमंत असतो. ) त्या काळातले पोषाख घालून त्या काळातल्या माणसांसारखं वागायचं हे त्यांचं काम.( शेवटी शेवटी हे लोक चिकार वैतागतात. एकजण म्हणतो, '' च्यायला, सिगरेट प्यायचीसुध्दा सोय नाही. सारखं आपलं जहांगीर. अरे आहे काय ! घरी जातो तेव्हा मी इतका थकतो बघ की आहे या लुंगीबिंगीच्या पोशाखातच झोपून टाकतो. सकाळी उठलं की पुन्हा आहेच.' म्हणजे ही माणसं अशी ऐतिहासिक होतात ! )

नंतर गंमत अशी होते की एका धक्क्यानं जहांगीर शुध्दीवर येतो. आजूबाजूचा हा दरबार पाहून त्याला चक्रावल्यासारखं व्हायला लागतं. तर तेवढ्यात त्याला नमाज पढायला नेणारा बुढ्ढा येतो. त्या बुढ्ढयाला तो म्हणतो, ' अरे हे काय आहे काय ? हे सिंहासन, माझा हा पोषाख न् हे ... अरे मला वेड लागेल ! काय आहे हे ? ' तर बुढ्ढ्याला कळतं की हा आला माणसात. तो त्याला सगळा प्रकार समजावून सांगतो. मधल्या काळात खलनायकानं याच्या नूरजहाँशी लग्न करून काही वर्षं संसारही केलेला असतो. आणि याचं कसं काय वगैरे बघण्यासाठी ती दोघं मधूनमधून त्या मानसशास्त्रज्ञाकडं येत असतात. हे सगळं समजल्यावर जहांगीरवाला त्या बुढ्ढ्याला म्हणतो की मी शुध्दीवर आल्याचं कुणाला सांगू नकोस. पुढं मग अक्षरश: धमाल. जहांगीर हा जहांगीर राहिलेला नसतो आणि हे लोक तो प्रचंड डोलारा सावरत राहतात.

तर सगळे संवाद वगैरे काही आम्हाला समजले नाहीत. आणि तरीही खूपच समजलं. काळाची गल्लत हा विषयच मुळात महान आहे. तो इतक्या भरघोसपणे पाह्यला मिळणं हे दुर्मिळच. माणसाच्या आयुष्याबद्दलचे आणि माणसाबद्दलचे धडाधड सारांश काढण्यापेक्षा हे तसं अवघडच. मग त्यापेक्षा ' दुनिया ' किंवा ' काळं बेट--' यात रमून जाणं काय वाईट ?

वाहव्वा ! हाच प्रश्न खरा !

(आरपार, सुयोग साधना, मे ६९ )

--- ००० ---

जंगलमे मोर नाचा किसने देखा **' शतरंज ' !**

तुम्हाला ' एलिएनेशन इफेक्ट ' नावाचा एक प्रकार असतो तो माहिती आहे का ? उदाहरणार्थ नाटक. तर नाटकात समोर जे काय चाललेलं असतं त्याच्यात प्रेक्षकानं रंगून जाता कामा नये -- म्हणून नाटकावर विश्वास टाकण्याच्या प्रेक्षकांच्या भाबडेपणाला अटकाव घालण्यासाठी हे तंत्र वापरलं जातं. यामुळं नाटक अधिक तटस्थपणे आणि समजुतीच्या दृष्टिकोणातून पाहिलं जातं असं या मागचं तत्त्वज्ञान आहे. बर्टोल्ट ब्रेख्ट या माणसानं हा प्रकार सुरू केला. पुढं मग हे तंत्र अनेक ठिकाणी अनेक तऱ्हांनी येऊ लागलं. रॉबर्ट बोल्टच्या ' अ मॅन फॉर ऑल सीझन्स ' या ऐतिहासिक नाटकातही ते वापरलं गेलं...वगैरे.

पण या प्रकाराची ही एवढी जागतिक कौतुकं कशाला हे काही आम्हाला कळत नाही. आमच्याकडचे हिंदी सिनेमे बघा. जरा कुठं तुम्ही विश्वास ठेवायला लागलात की झालाच अटकाव. 'शतरंज' हा चित्रपट म्हणजे याचं एक उत्तम उदाहरण.

' हरगिज नही ' वगैरे -- असलं सराईत हिंदी बोलणारी चिनी माणसं या चित्रपटात आहेत. शशिकलेसारखी हमखास आपली बाई चीनच्या बाजूनं हेरगिरीची कामं करते. मेहमूद जेव्हा राजेंद्रकुमारचा चेहरा चढवतो तेव्हा ते काम राजेंदकुमारच करतो ( म्हणजे म्हटलं तर थोडासा डबल रोलच. तसं जर नाही केलं तर मेहमूदच्या आणि राजेंद्रकुमारच्या फिगरांमधले फरक चीनसारख्या भन्नाट देशाची हेरगिरी करणाऱ्या बाईला न कळणं कठीणच. ) फक्त पडद्यावरच सावलीच्या रूपात दिसणारा चिनी अधिकारी त्याच्या चुकार गार्डसना हिंदी गोळया घालतो.( म्हणजे हिंदीतून फायरिंग करतो -- कबूल आहे की एका परीनं हे जमवून घेता आलं पाहिजे, पण ऐका तर खरं.) तर चीनला भारतीय माणसं पळवायचा जो छंद आहे त्या छंदावर रामबाण म्हणून एक जवान असतो. तो म्हणजे नायक, ऊर्फ राजेंद्रकुमार. त्यांनी माणसं पळवली की हा डायरेक्ट चीनमधे जाऊन त्यांना सोडवून आणतो. या चित्रपटात त्यानं वहिदा रेहमानला आणि तिच्या आईला कसं सोडवून आणलं तो कथाभाग आहे. आता वहिदा रेहमानवर पाळत होतीच पण त्या पाळतवाल्या बाईला काही हिंदी येत नव्हतं. त्यामुळं ' कुछ भी कहो, ऐसे कहो, जैसे कही कुछ ना कहा ' असं ती गाण्यातनं नायकाला सांगू शकली. ( खरं म्हणजे मग डायरेक्ट बोलायला तरी काय हरकत होती ? ) आणि लोटस थिएटरमध्ये सक्तीनं ती काम करत होती तर तिथंही 'अजनबी हूं मैं इस जहानमें, मेरी दुनिया तो कुछ और है ' असलीच गाणी ती म्हणत होती. आता एवढं शंकरजयकिशनचं म्युझिक आहे तर आपली असू देत गाणी जसा चिन्यांनी विचार केला असावा. सारांश म्हणजे आम्हाला इतकंच सांगायचंय की या चित्रपटात चिनी लोक इतके मूर्ख दाखवलेत की तेवढ्या मूर्ख लोकांविरुध्द ' शतरंजकी चाल हमारी ' म्हणून जिकणं यात विशेष काहीच नाही. त्यात परत आणखी एक मुद्दा आहेच. आता बाँड, फ्लिंट वगैरे लोक कसे जाताना छोटीछोटी पण महाकामसू शस्त्रं आणि यंत्रं घेऊन जातात की नाही तर हा आमचा इंडियन हीरो नायिकेला बापाचा आशीर्वाद आणि देवीकी कृपा बरोबर घेऊन जातो. पुन्हा मग नायकाच्या जिंकण्याला काय अर्थ

राहिला ? अशा आणखी सतराशे साठ गोष्टी सांगता येतील. पण त्या सांगत न बसता सगळयाचा सारांश काय तर हे पिक्चर असंख्य बंडलांनी भरलेलं आहे. प्रत्येक बंडल म्हणजे ' एलिएनेशन इफेक्ट ' चा नवा नवा आविष्कार.

राहता राहिलेलं आशेचं ठिकाण म्हणजे वहिदा रेहमान. पण ती काय नुसती पळवून नेलेली एक मशहूर हिंदुस्तानी अदाकारा. आईचे हाल होणार म्हटलं की काय काय कबूल करून टाकायचं इतकंच तिचं काम. त्यातही आज रात्री दोन वाजता तो आम्हाला सोडवायला येणार आहे असा तिला मिळालेला संदेश, जो तिनं कबूल केला त्यात आज रात्री दोन वाजताच्या ऐवजी उद्या रात्री चार वाजता असं थोडंसं खोटं बोलण्याची बुध्दीही तिला नसावी याचा आम्हाला थोडासा खेद झाला. त्यामुळं राजेंद्रकुमारला नाहक त्रास झाला हो, असं काय करता ! तर सांगायचा मुद्दा असा की, वहिदाच्या अभिनयाचा या चित्रपटात -- आणि बुध्दिबळपटात फारसा प्रश्न नाही. पण ' जंगलमे मोर नाचा किसने देखा ' हे तिचं एक अफलातून नृत्य यात असल्यामुळं काही बोलता येत नाही.

म्हणजे मग मेहमूद आणि शशिकला यांचे प्रवेशच तेवढे निखळपणे बरे वाटून घ्यायचे असा प्रकार होतो आणि त्यांना तसा वावही आहे. तेव्हा त्यात काही वावगं वगैरे म्हणत बसण्यातही अर्थ नाही.

आता ' आओ तुम्हे प्यार करना सिखा दूँ '  हे लहान मुलांना घेऊन एक आपलं मजा म्हणून सरळ सरळ टाकलेलं गाणं. अर्थात अशा टाकलेल्या गाण्यांची आम्हाला पुरेशी सवय आहे. तेव्हा तो प्रश्न नाही. तर या गाण्यात कॅमेऱ्याच्या गतीचा जो उपयोग केलेला आहे तो आम्हाला वैशिष्ट्यपूर्ण वाटला.

आता दिग्दर्शक एस.वासन ( हो, तेच अनेक रौप्यमहोत्सवी चित्रपटांचे दिग्दर्शक )यांना बरं वाटेल असं थोडंसं सांगतो. वहिदावर पाळत ठेवणाऱ्या चिनी आईला त्यांनी जो विणण्याचा उद्योग ( म्हणजे बिझिनेस ) दिलेला आहे तो खरोखरच कौतुकास्पद आहे. पण ती बाई जर अशी खुळी दाखवली गेली नसती तर हा उद्योग भयंकरच भेदक वाटला असता -- असंही म्हणावंसं वाटतं. काही काही दृश्यांचं चित्रीकरण उत्कृष्ट वाटलं. उदाहरणार्थ झाडूवाल्याच्या पोषाखातल्या राजेंद्रकुमारचा चिनी शिपाई पाठलाग करतात आणि तो बाजारपेठेतून शिपायांच्या मार्गात निरनिराळे अडथळे तयार करत पळत जातो ते दृश्य. तसंच रात्रीच्या वेळी भिकाऱ्याच्या वेषात मेहमूद वहिदाला संदेश पोचवतो तो प्रकार.(
चीनमधे भिकारी आहेत की नाहीत याबद्दल कुणी अधिकृत माहिती देईल काय ?)

पण ' चतकोराने मला न सुख ' असं म्हणणाऱ्या तुम्हा-आम्हाला या तुकड्यांचं हो काय ? आपण म्हणणार बाकीच्या भाकरीचं काय ? म्हणजेच -- पिक्चर बंडल आहे.

--- ००० ---

**आम्ही जातो आमुच्या गांवा**

विनोद हा ' करत ' जाऊ नका बुवा

आता याची कल्पनाच कुठून आणली वगैरे मूलभूत गोष्टी आपल्याला फार गंभीरपणे घ्यायचं कारण नाही. हा तयार चित्रपट काय लायकीचा आहे तेवढंच आपण बघायचं. शिवाय अकरा घसघशीत बक्षिसं मिळवलेली, त्यामुळे तो थोडासा दबाव, पण असले दबाव -- बिबाव आपण कशाला मानणार ? आपलं काम खुल्लं.

तर या तीन सुटून आलेल्या कैद्यांनी श्रीधरपंतांना सांगितलं की आम्ही जगप्रवासी आहोत. तर पंत आपले लगेच -- बरं तर आजपासून तुम्ही आमचे पाहुणे असं म्हणाले. याला भाबडेपणा म्हणायचं की येडपटपणा ? बरं हेसुध्दा आपण विचारणार नाही, पण केव्हा -- तर त्यातून काही धमाल विनोद उभा केलाय बुवा -- असं तरी असायला हवं. इथला विनोदच मुळात ओशाळवाणा. आपले विनोद केविलवाणे का होतात याचा एकदा मराठी चित्रपटवाल्यांनी जरूर विचार करावा. दत्ता भटांचा विनोद खरा का वाटतो याचाही विचार करावा. पण आमचा एक संदेश देऊन ठेवायचा झाला तर -- विनोद हा ' करत ' जाऊ नका बुवा.

' आज मी फूल झाले ' हे गाणं टॉप घेतलंय. मधे तिची सावलीही फार सुंदर घेतलीय. 'हवास मज तू' हे गाणंही तसंच बरं घेतलेलं. पण हे गाणं श्रीकांत मोघे आणि उमा यांच्यापेक्षा मधू आपटेमुळं अधिक खुललेलं आहे असं आमचं मत.

जुलाबाच्या गोळया दिलेले आणि सारखं परसाकडला पळवणारे बाप--मुलगा हा या चित्रपटातल्या विनोदाचा कळस ! अहो पोरंसुध्दा धबाधबा हसतात, असं काय करता !

--- ००० ---

**मेरे हुजूर**

कलर फुल , कलर पिक्चर

नावापासूनच सुरुवात करू. ' मेरे ' जसंच्या तसं कायम. ' मेहबूब ' च्या ऐवजी ' हुजूर '. तर सरळ सरळ ' मेरे मेहबूब ' च्या यशाची प्रेरणा घेऊन आलेली ही कृती. तशीच रंगीत, भव्यदिव्य आणि प्रेमाच्या गाथेतले भावनांचे कल्लोळ

चित्रित करणारी. या चित्रपटातले काही प्रसंग पाहताना ' मेरे मेहबूब ' मधले समांतर प्रसंग आपल्याला आठवतात त्याला अर्थातच इलाज नाही.

कथेबद्दल म्हणाल तर ' संगम ' काय, ' आदमी ' काय, ' अभिलाषा ' काय, किंवा ' मेरे हुजूर ' काय, थोड्याफार फरकानं तेच दोन पुरुष, एक स्त्री आणि त्याग. हिंदी चित्रपटांतली माणसं जर अशी त्यागी नसती तर त्या चित्रपटांतले असंख्य कूट प्रश्न सोडवणं फार कठीण गेलं असतं -- हे आम्ही त्या माणसांच्या त्यागांच्या गौरवार्थ इथे सांगून ठेवू इच्छितो.

अख्तर हुसेन अख्तर ( जितेंद्र ) या माणसानं काही वर्षांपूर्वी नबाबसाहेबांचा ( राजकुमार ) प्राण वाचवलेला असतो. तर असा तो शायरगायक. अख्तर बऱ्याच वर्षांनी नबाबसाहेबाकडे येतो. येताना त्याच्या फर्स्ट क्लास डब्यात माला सिन्हा. या प्रवासाबरोबरच त्यांच्या भानगडीची गाडी सुरू होते. इकडे दुसरा प्रकार असा असतो की माला सिन्हा म्हणजे नबाबसाहेबांच्या बहिणीची जिवलग मैत्रिण. त्यामुळे तिचं येणजाणं असतं. नबाबसाहेब तिला आपली समजायला लागतो. पण तिचं काही त्याच्यावर प्रेम नसतं. तिला आपला अख्तर आवडतो. अर्थातच नबाबसाहेबांचा लवकरच भ्रमनिरास होतो
आणि प्यार उद्ध्वस्त झालेली त्यांची जिंदगी वीरान बनते. पण तो हे सगळं मूकपणे सहन करतो. अख्तरला यातलं काही सांगत नाही. उलट त्याला आपली दौलत बहाल करतो. त्याच्या हिताहिताची काळजी घेतो. त्याच्या मुलाला प्रेमानं खेळवतो वगैरे. पण त्यानं अख्तरला दिलेल्या दौलतीचा परिणाम असा होतो की एक वेश्या अख्तरला आपल्या जाळयात पकडते. आणि हे प्रकरण मग इतकं टोकाला जातं की अख्तर काडीमोड घेतो. त्यात त्या अख्तरची आई थोडीशी आपल्या मराठी ' कन्यादान ' मधल्यासारखी असते. ती आपल्या सुनेचं नबाबसाहेबांशी लग्न लावून देते. लोकापवाद नको म्हणून नबाबही या गोष्टीला तयार होतो. पण तो तिच्याकडं एक ' स्त्री ' म्हणून कधीच पाहात नाही.

तर तुम्हाला कथेची आयडिया आली असेल, तेव्हा पुढचं सगळं काही सांगत नाही. शेवटी नबाबसाहेबांना मोटारीची धडक देऊन पिक्चर अशा काही चमत्कारिक पध्दतीनं गुंडाळलंय की काही विचारू नका. बरं त्याला मारूनसुध्दा यांचं पुनर्मीलन वगैरे प्रकार नाहीच. सगळेच आपले दैवगतीनं इकडंतिकडं फेकले गेल्यासारखे. पण असा भयंकर दु:खद शेवट परवडणार कसा? ( पुन्हा ' आह ' चं धडधडीत उदाहरण. ) तर केस पिकलेली माला सिन्हा मोठ्या झालेल्या मुन्न्याला घेऊन थडग्यासमोर येते आणि म्हणते की ये देखो, मुन्ना आज बडा होकर उच्च शिक्षणके लिए लंदन जा रहा है, वगैरे. झाला की नाही शेवट गोड ?

या सगळया प्रकारात पुन:प्रत्ययाचा आनंद वगैरे म्हणजे फक्त एकच गोष्ट आणि ती म्हणजे राजकुमारची थोरवी.

’ वक्त ’ नंतर त्याला तितक्या प्रकर्षानं त्या उंचीवर नेणारा चित्रपट म्हणजे हाच. ’ झनक झनक तोरी बाजे पायलिया ’ हे गाणं, त्यानंतर बोटांतून रक्त येईपर्यंत वाजवलेली सतार आणि नंतरचं ’ दिन तो गुजर जाता है चाचाजान, मगर ये रात क्यों आती है ...’ हे वाक्य...अक्षरश: महान.( पण आमची एक शंका आम्ही मांडून ठेवतोच. प्यायलेलं काम तो अफलातून करतो म्हणून त्याला प्रत्येक पिक्चरमध्यें दारू पाजणार काय ?) आत्मकीवेत संपणारे या चित्रपटातले भावनांचे कल्लोळ केवळ राजकुमारमुळंच बरेचसे सुसह्य झालेले आहेत.

माला सिन्हा ठीक. ’ फर्ज ’ मधल्या प्रकारानंतर जितेंद्र हा नुसता ’ प्रणय पंढरीचा वारकरी ’ होऊन बसणार अशी चिन्हे दिसत आहेत. जॉनीवॉकर, डेव्हिड हेही मधनंमधनं आहेत. तेही ठीक.

दिग्दर्शन ठीक. संगीतही ठीक.( पण अशा पिक्चरला नौशादच पाहिजे.) तर असं हे कलरफुल कलर-पिक्चर. ’अल्ला अल्ला अल्ला ’ -- टाळया, शिट्या. ’गम उठानेके लिए मै तो जिये जाऊंगा ’-- हळहळ !

-- धंदा करणार हे नक्की.

( आरपार, सुयोग साधना, जून ६९)

--- ००० ---

**माधवी**

’ ज्ञान आणि मनोरंजन ’ याना वाहिलेलं एक ’ अमृत ’ नावाचं मासिक मराठीत असून ते अजून अमृतावस्थेत जिवंत आहे हे आपल्याला माहीत असेलच. तर त्या मासिकातून आम्हाला मिळालेलं थोडंसं ज्ञान आधी सांगणं भाग आहे. लोकांच्या जिज्ञासेचं निरसन करण्याचा ( अर्थात त्या त्या क्षेत्रातल्या तज्ज्ञांकडून ) एक सदरवजा प्रकार. एकानं प्रश्न असा विचारला होता की पुंगी वाजवल्यावर साप का डोलतो ? तज्ञाचं यावरचं उत्तर असं होतं की ही अज्ञानातून आलेली समजूत आहे. सापाचं श्रवणेंद्रिय अत्यंत दुर्बल असतं ( किंवा त्याला ते नसतंच ? ) सारांश त्याला काहीही ऐकायला वगैरे येत नाही. तो डोलतो याचं कारण पुंगीवाला इकडून तिकडे डुलत पुंगी वाजवत असताना सापाला एकदा इकडून मारतो आणि एकदा तिकडून मारतो. त्यामुळं पुंगीच्या हलण्यानं सापाला डुलण्याची सवय लागते. तर ’माधवी ’ या सिनेमातले साप मात्र अत्यंत तिखट कानांचे आहेत एवढंच आम्हाला या ठिकाणी सांगायचं आहे.

आता दुसरा एक प्रश्न. समजा एखादा माणूस गळफास लावून मेला, आणि तो मेल्यानंतर त्या लटकत्या प्रेताचा फास आपण सोडवला तर ते प्रेत ऊर्फ तो माणूस परत जिवंत होईल का ? या चित्रपटात राजकुमार साप चावून मरतो. त्याचं प्रेत तसंच ठेवलेलं असतं. काही दिवसांनी त्याला चावणारा साप येऊन आपलं वीष शोषून घेतो. त्याबरोबर हळूहळू डोळे उघडत राजकुमार जिवंत होतो. एकदा मेलेलं माणसू ते मरण्याचं कारण दूर करताच उठून बसणं शक्य नाही हे कळायला अर्थातच ' अमृत ' मासिक नको. कुठल्याही जिवंत माणसाकडून इतपत ज्ञानाची अपेक्षा करायला काही हरकत नाही. निर्माते बी.राधाकृष्ण, बी.कॉम. किंवा दिग्दर्शक चाणक्य यांच्याकडूनसुध्दा.

कै.राम गणेश गडकऱ्यांच्या ' पुण्यप्रभाव ' वरून हे पिक्चर काढलं की आणखी कशावरून काढलं ही म्हणजे अगदीच दुर्लक्षणीय गोष्ट वाटावी असा हा एकंदर प्रकार आहे. मुळात गडकऱ्यांच्या या नाटकातल्या कथानकाची लायकी काय ठरवायची ती कुठलाही डोकं ताळयावर असलेला माणूस ठरवतोच. मानावं काय लागतं तर गडकऱ्यांचं रचनाचातुर्य, भाषाप्रभुत्व आणि संवादचातुर्य. गडकऱ्यांचे संवाद दुसऱ्या कुठल्याही भाषेत भाषांतरित करून वापरण्याची कल्पना खूप मजेदार ठरेल. त्यात सिनेमात असं काही करायचं म्हटलं तर प्रचंड विनोद आणि प्रचंड कंटाळा हे एकत्रितपणे नांदण्याच्या चमत्काराचीच शक्यता अधिक. त्यामुळं त्यांच्या भाषाप्रभुत्वाला सोयीस्कर असणारी कथानकाची मूळ बांधणीही टाकून देणं अटळच. आता आहे या स्थितीतच भलभलत्या ठिकाणी हंशे पिकण्याचे प्रकार या सिनेमात होताहेत, त्यात जर ' घाला माळ...' वगैरे पुण्यप्रभावाचा प्रवेश यात टाकला असता तर प्रेक्षकांच्या हसून हसून मुरकुंड्या तरी वळल्या असत्या किंवा ते निघून तरी गेले असते किंवा त्यांनी उठून पडद्यावर खुर्च्या तरी भिरकावल्या असत्या. त्यामुळं इथं तसलं काही नाही. वृंदावन ( विक्रमसिंह ) याचा इथं हृदयपरिवर्तनानंतर आत्महत्येनं शेवट होतो.

पण हा सिनेमा लोकांनी पाहावा अशी आमची इच्छा आहे. कारण लोकांना थोडीशी खुळचटपणाला हसायची सवय लागावी असं अजूनही कधीकधी आम्हाला वाटतं. गडकऱ्यांचं नाटक या दृष्टीनं उपयुक्त ठरावं ही मराठी प्रतिभेची एक वेगळीच थोरवी !

--- ००० ---

## मुरळी मल्हार रायाची

आता सरळ तुलनेनंच पाह्यचं म्हटलं तर ' माधवी ' तली घोडदौड आणि या सिनेमातली घोडदौड यांच्यामधे हिंदीच्या आणि मराठीच्या रुबाबामधल्या फरकाइतका फरक आहे. पण मराठीतलं एक ॲक्शन -- पिक्चर म्हणून याच्याकडे पाहणं हेच अधिक बरं.

मराठी चित्रपट हे बहुतेक वेळा प्रवेशानुगामी नाट्यतंत्रानंच चित्रित केलेले असतात. नुसती वारेमाप बडबड. कॅमेरा या चित्रपटाच्या माध्यमाच्या शक्यता त्यामुळं फारशा धुंडाळल्या न जाता ढोबळच राहतात. हृषिकेश मुखर्जी या माणसाची या बाबतीतली महात्मता आम्हाला विशेष जाणवलेली आहे. त्यांचा ' अनुपमा ' हा चित्रपट ज्यांनी पाहिला असेल किंवा कोणार्कच्या सूर्यमंदिरावरचा माहितीपट पाहिला असेल त्यांना कॅमेऱ्याचं सामर्थ्य ओळखणं म्हणजे काय हे लक्षात येईल. हिचकॉकचा ' सायको'--सुध्दा या दृष्टीनं विशेष वैशिष्ट्यपूर्ण चित्रपट. अर्थात या उदाहरणांशीही या चित्रपटाची तुलना करण्यात अर्थ नाही. पण इतर मराठी चित्रपटांच्या तुलनेनं या चित्रपटात कॅमेऱ्याचा वापर बऱ्याच मोकळेपणानं केलेला आहे -- एवढ्या प्राथमिक स्तरावर का होईना पण हा चित्रपट जरा वेगळा वाटला. इतपत ॲक्शन असलेलं चित्र एका किमान सफाईनं का होईना पण मराठीत निघू शकतं आणि चित्रीकरणाचे इतपत प्रकार तरी ' मराठी कॅमेऱ्यानं ' सुध्दा होऊ शकतात हेही या चित्रपटात एकदा सिध्द झालं.

मानलेल्या भावाला बरं वाटावं म्हणून ईश्वराच्या आदेशाप्रमाणे सीता मुरळी होते. पाटलाचा तिच्यावर डोळा. तिला पळवण्याचा त्याचा प्रयत्न. तुरुंगातून नुकत्याच सुटलेल्या एका दरोडेखोरामुळं ( किंवा दरोडेखोर समजल्या गेलेल्या पण खऱ्या ' चांगल्या ' माणसामुळं ) फसतो. यात सीताचं त्या दरोडेखोरावर मन बसतं. पुढं मग त्यांच्यात अडथळे आणण्याची पाटलाची कारस्थानं, वगैरे.

आता गंमत अशी होते की ' पावनं तुमी बरंच दिसताय की ...गालात हसताय की ' वगैरे लावण्या यात असल्या तरी लोकांना त्यांचा मजा घेणं जरा कठीणच जातं. कारण हे सगळं वाईट आहे, तिला ते नकोसं वाटतं, पण तरीही तिला ते स्वीकारावं लागलेलं आहे असा हा प्रकार. त्यामुळं लोकांना घायाळ करण्यासाठी नाचणारी बाई आणि ही मुरळी यात मुळातच फरक पडतो. म्हणूनच लावण्या आणि नृत्यं यांचा चित्रपटाच्या जाहिरातीसाठी जरी उपयोग होत असला तरी ही नृत्यं नृत्यं म्हणून पाहणं जरा अवघडच आहे.

दुसरी एक गंमत म्हणजे चित्तरंजन कोल्हटकर. खलनायकाचा जो एक ठराविक अभिनय असतो -- म्हणजे एक भुंवई उचलणं वगैरे त्यात ते कुठंही कमी पडत नाहीत. पण त्यांच्या एकंदर फिगरचा विचार करता आपली खलत्वाची बहुतेक सगळी कामं ते दुसऱ्यांना पैसे देऊन करून घेतात. ते पाहताना नाही म्हटलं तरी करमणूक होते.

ते काहीही असो, गोविंद कुलकर्णींना धन्यवाद द्यावेत इतपत हे चित्र निश्चितच बरं आहे.

--- ००० ---

**आशीर्वाद**

या चित्रपटातही कथानकाच्या जुळवणीचे आणि घडवणीचे प्रकार आहेत. नाहीत असं नाही. पण ॲरिस्टॉटल ज्याला घ्द्दद्दडठ्ठडथ्ङ्ग त्थ्रद्रद्धद्दडठ्ठडत्थ्त्द्यत्र् म्हणतो तेवढी समर्थनीयता त्यात निश्चितच आहे. ( अर्थात असली मूल्यं अर्धवट ठरावी अशाही कलाकृती असतात हे आम्ही जाणतो, पण हिंदी-मराठी चित्रपटांना ही मूल्यं पुरून उरतात. ) हृषिकेश मुखर्जींच्या लौकिकात नवी भर घालणारा हा त्यांचा नवा चित्रपट.

ही कथा आहे जमीनदार आणि शेतकरी यांच्यांतल्या संबंधांमधली. अमानुषता नष्ट करायला निघालेल्या एका माणसाची. जातीयता वगैरे भुक्कड गोष्टी बाजूला ठेवून माणसांमधली माणसं ओळखणाऱ्या माणसाची. एका कलंदर मनाच्या शायराची. हा माणूस अर्थातच एकंदर सामाजिक परिस्थितीच्या संदर्भात वेगळा ठरतो. आणि या ' वेगळया ' माणसाचे हाल होणं ही तर माणसाच्या सामाजिक इतिहासातली एक स्वाभाविकता आहे ! त्या स्वाभाविकतेचाच हा एक बळी.

असा विषय घेऊन तो धाडसानं उभा करणाऱ्या हृषिकेश मुखर्जींचं त्यांच्या दिग्दर्शनातले बारकावे आणि एकूणच धमक या बाबतीत कौतुक करायची अर्थातच जरूर नाही. प्रत्येक प्रसंग अत्यंत जिवंतपणे आणि तंतोतंत खरेपणानं उभा करण्याचं या माणसाचं कसब केवळ अजोड आहे. एका विचारवंत मनाची प्रखर आच हेच याचं प्रमुख कारण. त्यामुळं त्यातल्या काही सुट्या सुट्या प्रसंगांबद्दल बोलायची आमची इच्छा नाही. यातल्या कलावंतांचा अभिनय, यातलं संगीत याबद्दलही आम्हाला स्वतंत्रपणे काही बोलायचं नाही. ही एक खरीखुरी शोकान्तिका आहे एवढंच आम्ही सांगू इच्छितो. अक्षरश: शोकान्तिका. शेवटी शेवटी तर आमच्यावरसुध्दा थोडंसं टेन्शन आलं. बायका बियकांची तर बातच सोडा. सर्वच स्त्रीपुरुष अत्यंत गंभीर.

या संदर्भात बर्ट्रांड रसेलचा एक उतारा आम्ही इथे उद्धृत करतो. तो असा : --

' वेडी व्यक्ती, प्रेमी, आणि कवी यांचा शेक्सस्पियर एकत्रितपणे उल्लेख करतो -- कारण ' जबर कल्पनाशक्ती.' प्रश्न असा आहे की यातला प्रेमी आणि कवी राहून वेडपटपणा कसा टाळता येईल ? मी एक उदाहरण देतो. १९१९ साली मी ओल्ड व्हिकमधे ' द ट्रोजन वुमेन ' चा प्रयोग पाहिला. त्या नाटकात ग्रीक लोक छोट्या ॲस्टिॲनेक्सला ठार करतात असा एक असह्य असा शोकरसपूर्ण प्रसंग आहे -- कारण ॲस्टिॲनेक्स मोठा झाला तर त्याचा दुसरा हेक्टर होईल अशी त्यांना भीती असते. ते सगळं पाहून क्वचितच कुणाचे डोळे कोरडे राहिले असतील. लोकांना ग्रीकांचा तो क्रूरपणा अगदी विश्वास सुध्दा बसू नये इतका भयानक वाटला. पण तिथं रडत असलेली तीच माणसं, त्याच क्षणी, इतक्या मोठ्या प्रमाणावर तोच क्रूरपणा अंमलात आणीत होती की युरिपायडिसच्या ( त्या नाटकाचा लेखक ) कल्पनेच्याही ते पलिकडचं ठरावं.

त्यांच्यापैकी बहुतेकांनी नुकतीच अशा एका सरकाराची निवड केलेली होती की ज्यानं तहानंतरही जर्मनीची नाकेबंदी चालूच ठेवली आणि रशियाचीही नाकेबंदी केली. यामुळं त्या देशांतली असंख्य मुलं मरत होती ही गोष्ट सगळयांना माहीत होती पण तरीही त्या देशांची लोकसंख्या अशी कमी होणं आवश्यक भासत होतं. कारण नाहीतर ॲस्टिॲनेक्ससारखी ती मुलंही मोठी होऊन आपल्या बापाचा कित्ता गिरवण्याची शक्यता होती. युरिपायडिस या कवीनं प्रेक्षकांच्या कल्पनेत प्रेमी जागा केला ; पण कवी आणि प्रेमी -- दोन्हीही थिएटरच्या दाराशी विसरले गेले आणि वेडा मनुष्य ( -- हिंसकाच्या रूपात ) तेवढा या लोकांच्या राजकीय क्रिया हाताळायला शिल्लक राहिला. तीच ती माणसं की जी स्वत:ला अत्यंत दयाळू आणि गुणवान समजत होती.'

...आम्हाला माहिती आहे की हे सगळं तसं चित्रपटाच्या मूल्यमापनाच्या वगैरे बाहेरचं झालं. पण तरीही, हा चित्रपट पाहिल्यावर अशा कलाकृती पाहून रडणं एवढीच आमची लायकी आहे की काय असा प्रश्न उपस्थित करावासा वाटला म्हणून हे केलं. पाहिजे तर हा त्या चित्रपटाचाच प्रभाव असं म्हणा.

( आरपार, सुयोग साधना, जुलै ६९ )

--- ००० ---

**हसीना मान जायेगी**

हा तो की, तो हा की, हा तो नसून हा तो, असं वाटतं आहे ; आणि म्हणून तोच हा असं आपण समजतोय की, मुळात तोच हा आहे आणि आपण फसून याला तो समजतोय...बस्स ! या पिक्चरचं सार हे एवढंच !

शशीकपूरचा डबल रोल. नायकही तोच आणि खलनायकही तोच. त्यामुळं फायटिंगच्या वेळी प्रेक्षकांचे फार हाल. एखाद्यानं दुसऱ्याला दणकावून लोळवलं तर ' वाहवा ' म्हणायचं की ' च् च् ' म्हणायचं हे काही लक्षातच येत नाही. शेवटी फायटिंग संपेपर्यंत, बिचारे जीव मुठीत धरून बसून राहतात.

शशीकपूरनं यात बराच शम्मीकपूरसारखा धांगडधिंगा घातलेला आहे हे खरं असलं, तरी ते त्यानं खलाच्या रूपात केलेलं असल्यामुळे नायकच ' प्रोफेसर ' किंवा ' राजकुमार ' असल्यानं जो एक ' कल्लोळ करू आवघा ' अशी धमाल येते ती इथं येत नाही. तरीही शशीकपूरनं जर मनात आणलं तर तोही शम्मीसारखा एक कल्लोळी नायक म्हणून सहज प्रस्थापित होऊ शकेल.

आता बबिता म्हणाल तर ठीक आहे. तीही तुमच्याआमच्यासारखीच दुग्ध्यात पडलेली. हा तो की हा हाच ? -- हा आदिकालापासून चालत आलेला सनातन प्रश्न तिलाही पडलेला. मग ' पाठलाग ' सारखा कोर्टाचा सीन वगैरे. पण

काहीही म्हणा, वहिदा रेहमान, मीनाकुमारी, माला सिन्हा किंवा शर्मिला टागोर यांच्या अभिनयात अवखळपणाबरोबरच गांभीर्याचाही जो एक कस आहे तशी खात्री काही अजून या नव्या पोरीबद्दल वाटत नाही.

--- ००० ---

**तुमसे अच्छा कौन है**

तीन भन्नाट तरुणींना सुधारायला शम्मीला नेमलेलं आहे असं म्हटल्यावर आपल्या डोक्यात ज्या काही खळाळ कल्पना येतात त्या सगळया इथे खोट्या पडतात. त्या तरुणींचा भन्नाटपणा या चित्रपटात फारसा दिसतच नाही. मोटारीतनं सुटकेस पळवण्याचं एक दृश्य आणि बबितानं जखमी केलेल्या तरुणाचं दृश्य एवढं सोडलं तर त्या भन्नाट आहेत हे आपलं केवळ ललिता पवार म्हणतेय म्हणूनच खरं मानायचं. बबिताचं थोडं तरी खरं धरता येईल पण त्या दुसऱ्या दोन इतक्या तकलादू आहेत की काही विचारू नका. त्यामुळं शम्मीनंही मग त्यांना सुधारण्याच्या फंदात पडायचं काही कारण नाही हे ओळखून बबिताचाच पिच्छा पुरवलेला आहे.

' तूमचे अच्छा कौन है ' आणि ' किस किस को मैं जवाब दूं ' ही दोनच त्यातल्या त्यात गतिमान गाणी ; पण ज्यांनी ' आ आ आ आजा ' ' तारीफ करूं क्या उसकी ', किंवा ' याह्यहूह्य ' वगैरे पाहिलेलं आहे त्यांचं काही या गाण्यांनी समाधान होत नाही. तेव्हा याही बाबतीत ते शिव्या देतच बाहेर पडतात.

ललिता पवारचा डबलरोल हे या चित्रपटाचं वैशिष्ठ्य. तिची पांढऱ्या पोशाखातली करडी विधवा माताजी नेहमीचीच आहे. पण दुसरी, म्हणजे खलस्त्रीची, सिगरेटबिगरेट शिलगावणारी भूमिका जरा वेगळी आहे. पण ट्रेलर बघताना या डबलरोलबद्दल जी काही उत्सुकता वाटलेली होती तेवढीही प्रत्यक्ष चित्रपटात वाटली नाही. इतक्या पराकोटीच्या फुसक्या कथेनं दुसरं काय होणार ?

मेहमूद, धुमाळ आणि मोहन चोटी हे त्रिकूट यात विनोद करण्यासाठी आहे. यातल्या मोहन चोटीला काही स्पष्ट आकारच दिला गेलेला नाही. मेहमूद आणि धुमाळ यांत अर्थातच मेदमूद सरस पण एकूणच मेहमूद म्हणूनच बघाल तर विशेष काही नाही. मग त्या मानानं ' माधवी ' तला मेहमूद सुध्दा परवडला.

करमणूक याने की तीन तास घालवणे एवढाच शुध्द हेतू ठेवून हा चित्रपट काढलेला आहे हे दिसतेच आहे. तेव्हा हे असं कसं आणि ते तसं का वगैरे विचारण्याचा करंटेपणा आम्ही करणार नाही. पण मंडळी, सॉरी. आपल्याला थोडासा कंटाळा मात्र आला. आणि ' तिसरी मंझिल ' पाहून लगेच हा चित्रपट पाहिला त्यामुळं तर हा कंटाळा विशेषच जाणवला.

--- ००० ---

**जसमा ओडन**

गुजरातीत ' भवई ' नावाचा एक लोकनाट्याचा प्रकार आहे हे ऐकून होतो. परवा अशा एका भवईचा ( हिंदी का होई ना ) पण अवतार बघण्याचा योग आला. तो म्हणजे शांती गांधी लिखित ' जसमा ओडन ' चा कमलाकर सोनटक्के यांनी सादर केलेला प्रयोग. दिल्लीला आल्काझींच्या नाट्यशाळेतून शिकून आलेल्या या तरुण दमदार कलावंतानं मुंबईत नाट्यभारती नावाची एक नाट्यशाळा सुरू केली. त्या आपल्या शाळेतल्या विद्यार्थ्यांना हाताशी घेऊन हा भरघोस प्रयोग उभा केला. या प्रयोगातली बरीचशी मुलंमुली आयुष्यात प्रथमच रंगभूमीवर येत होती हे लक्षात घेतलं तर या प्रयोगाचं यश खरोखरच आश्चर्यकारक ठरेल.

कथा नेहमीचीच. पठडीतली. एका मुनीचं प्रखर तप. इंद्राची चिंता. काही पऱ्यांवर त्याचं तप मोडण्याची कामगिरी. कामकुंडला आणि तिच्या सखी पऱ्या त्यात यशस्वी. हे लक्षात येताच मुनीचा संताप. 'तू पृथ्वीवर ओड जमातीत जन्म घेशील आणि तुझा नवरा काळा, कलुटा, आणि लंगडा असेल '-- शाप. ' तो नवरा तूच असशील '-- तिचा प्रतिशाप. नंतरची सबंध कथा अर्थातच पारंपरिक पतिपरायण हिंदू स्त्रीची.

जसमाची भूमिका मीना सुखठणकरनं केली. तिचा पती रूपा - कैलास संजावनं उभा केला. ' नाटककाराच्या शोधात सहा पात्रं ' मधली मुलगी जितकी भडक, स्फोटक आणि रखरखीत तितकीच ही जसमा नाजूक, कोमल, भावुक आणि रोमँटिक. मीना सुखटणकरनं याही स्वरूपात कमाल केली. ' नाटककाराच्या शोधात ' मधे काही ठिकाणी ती अपरिपक्व वाटली होती. पण इथे ती संपूर्ण सफाईदार वाटली. नदीवर जसमा रूपाला भेटते तो प्रसंग, त्यांच्या लग्नाचा प्रसंग, तिच्यावर डोळा ठेवून पाटणचा राजा तिला भुलवायला येतो तो प्रसंग, तिच्या पतीच्या मृत्यूचा प्रसंग -- प्रत्येक प्रसंग तिनं अत्यंत सूक्ष्म समजुतीनं उभा केला. लहान सहान विभ्रम, लयदार हालचाली आणि शब्दांच्या पदरात त्यांचं पुरेपूर माप टाकणारं उच्चारण -- या मीनाच्या गुणांनी ही जसमा फारच वेधक झाली आहे. ( मीनानं नृत्याचं तसं शास्त्रशुध्द असं फारसं शिक्षणं घेतलेलं नाही -- या पार्श्वभूमीवर पाहता तिची यातली नृत्यंही अतिशय कसबी वाटतात.)

कैलास संजाव हे एक नवंच नाव. लंगडा पण लंगडेपणाच्या व्यंगावरही मात करणारा भाबडेपणा असलेला रूपा उभा करणं हे काही सोपं काम नव्हतं. पण या मुलानं ही भूमिका एका अट्टल हुकमीपणानं उभी केली आहे. या मुलाकडं रंगभूमीनं बेलाशक काही अपेक्षेनं पाह्यला हरकत नाही.

आपल्या लोकनाट्यासारखाच सादर करण्याच्या पध्दतीच्या बाबतीत भवई हा प्रकार मुक्त असतो. स्थलकालाच्या विवक्षिततेचा बडिवार माजवण्याच्या नेपथ्याची इथेही आवश्यकता नसते. पण बांधणीच्या बाबतीत मात्र ' भवई ' ही जवळजवळ संपूर्णपणे ' बसवलेली ' असते. अधिक संगतवारपणे उलगडत जाणारी असते.

या प्रयोगाच्या संगीतमयतेनं तर आम्ही फारच भारून गेलो. सौराष्ट्र-कच्छ कडच्या लोकगीतांच्या चालींची ही तडाखेबंद उडती गाणी आजच्या तरुणांची जाझची भूक भागवण्याइतकी समर्थ वाटली. ( गाणी म्हणणाऱ्या व्यक्ती स्टेजवर दिसत होत्या, इतकंच नव्हे तर एक सुमारे बारा वर्षांचा मुलगा तिथं प्रेक्षक म्हणून बसलेला होता -- खळखळून हसत होता -- गंभीर होत होता... ब्रेख्टप्रणीत तंत्राचा हा एक नवाच आविष्कार ! )

या प्रयोगाबद्दल श्री. सोनटक्क्यांना जितके धन्यवाद द्यावेत तितके थोडेच ठरावेत इतका हा प्रयोग नेटका आणि भरदार झालेला आहे.

--- ००० ---

**माकडाला चढली भांग**

खानोलकरांची प्रत्येक कृती ही नेहमीच त्या त्या क्षेत्रातली एक ' घटना ' ठरत आलेली आहे. ही घटना लोकनाट्याच्या क्षेत्रातली.

काव्यमयता आणि शब्दांची विशेष जाण, तसंच परंपरेत मुरलेला बाज आणि अभिजात सूचकता ही या मुक्तनाट्याची वैशिष्ट्यं. असं हे एक जरा वेगळया तब्येतीचं लोकनाट्य. ( मुक्तनाट्य म्हणा ) लोकांसमोर मांडण्याची तयारी हे साबळे-पार्टीचं कर्तृत्व. यशापयश हे नंतरचं.

साबळे स्वत: लोकगीतं वगैरे म्हणण्यात जरी हातोटीवाले असले तरी इथली गीतं म्हणण्यात -- आणि ती ' रंगभूमीवर ' म्हणण्यात ते खूपच कमी पडतात. ( आणि एकूणही कमीच पडतात. ) त्यामुळं सुहास भालेकरांची विडंबक फेक खूपच अचूक असूनसुध्दा विरोध म्हणून थोड्या कमी उंचीवरच राहते. आणि या मुक्त नाट्याची सबंध उभारणीच मुळी या विरोधावर आहे. याचा विचार करता ही मर्यादा अधिक जाचक ठरते.

शेरशायरी आणि सवाल जवाब या दोन्हींची रंगत घेऊन लिहिलेलं काव्य आणि त्याचं विडंबन ( माणूस आणि त्याचं विडंबन हा मागचा पदर ) -- यांचं हे मुक्तनाट्य याहून खूपच बहारदार होऊ शकलं असतं. मंगल याहून स्पष्ट हवा होता आणि एकूदंत याहून खूपच मोकळा हवा होता.

लीलाधर हेगडे आणि निळू फुले यांच्याकडे या जागा असत्या तर -- असा एक विचार आमच्या मनात येऊन गेला.

(आरपार, सुयोग साधना,ऑगस्ट ६९ )

--- ००० ---

**तबला कलकत्ता**

अनपेक्षितपणे एकदम काहीतरी चांगलं बघायला मिळालं. माणसाच्या जगण्याच्या साधनेचं एक मूर्तिमंत तटस्थ दर्शन. तात्पर्यबित्पर्य काही नाही. बघायचं आणि समजून घ्यायचं.

जीवनसाधनेची सांगड तबल्याच्या रियाझाशी बसवलेली. या अवाढव्य शहरातल्या एका इमारतीच्या गच्चीवर एक माणूस रियाझ करत बसलेला आहे. आणि तबल्याच्या ठेक्यांच्या आणि बोलांच्या असंख्य तऱ्हांतून तुम्हाला कलकत्त्याचं खळाळतं, धपापतं, उत्साही, थकलेलं, शांत आणि हिंसक जीवन दिसतं आहे.

एका बाजूला ही तबल्याची साधना चालू आहे तर दुसऱ्या बाजूला एक तरुणी नृत्याचे धडे गिरवते आहे. कॅमेरा इकडे तिकडे शहरात, माणसांत सरकत राहतो. तबल्याच्या घनगंभीर तालावर जुनाट दगडाची किनारपट्टी ओलांडून तो एका एकाकी प्रार्थनामंदिरात शिरतो. एक पुजारी नगाऱ्यावर संथपणे एकेक मात्रा आळवीत असतो. तिथून कॅमेरा बाहेर पडतो. बाजारात जातो. तीर्थक्षेत्री जातो. धावपळ दाखवतो. भक्तीत डुंबण्यासाठी हपापलेली माणसं दाखवतो. भक्ती, श्रध्दा हीसुध्दा एक सवयीचा भाग झालेली थंड माणसं दाखवतो. प्रेतयात्रा दाखवतो. बोकडाला बळी देणारी माणसं दाखवतो. प्रचंड दंगल, गगनाला भिडणाऱ्या ज्वाळा, बसांचे सांगाडे दाखवतो. बरगड्यांवर कातडं बसवल्यासारखा एक मुलगा, जीव खाऊन दगड उगारतोय हा क्षण स्थिरपणे चित्रासारखा तुमच्यापुढे ठेवतो. टांगा ओढणारा घामेजला माणूस दाखवता दाखवता माणसाच्या टापांवरून तो घोड्याच्या टापांकडे म्हणजे रेसकोर्सकडे वळतो. तंग तरुणी, काळे चष्मे, भुऱ्या केसांचे पॉश तरुण, अगडबंब शेट, उतावीळ देह आणि... आणि रुबाबदार, तुकतुकीत, तजेलदार, बुलंद घोडे. करकचून ताणलेले क्षण. आणि पुन्हा माणसाच्या टापा. पुन्हा घोड्यांच्या टापा. कुठं मधेच उभी असलेली एक संथ टॅक्सी. ड्रायव्हर खिडकीवर पाय टाकून पहुडलेला. त्याचा तो पायाचा पुरेपूर तळवा. हळू हळू रात्र होते. अंधार येतो. शहर निजू लागतं.

आणि कॅमेरा फुटपाथवर येतो. झोपलेल्यांना जाग येता कामा नये अशा नाजुकतेनं सरकत राहतो. कुठं कुत्री झोपली आहेत. कुठं माणसं झोपली आहेत... इकडे तबल्याची साधना चालू आहे...तिकडे नृत्याची...

कलकत्त्याच्या मॅक्समुलर भवनात हे चित्रक काढलेलं आहे. बारापंधरा मिनिटांचंच, पण प्रचंड, भरदार, तबल्याच्या एका तटस्थ पण समजुतदार लयीवर या प्रचंड शहराची आणि इथल्या माणसांच्या जगाची नस पकडून दाखवण्याचा तो प्रकार तसा अव्दितीयच.

माणसं दाखवणाऱ्या चित्रपटांची जितकी वानवा तितकीच अशा चित्रकांचीही आहे. सुखदेव यांच्या ' आफ्टर द इक्लिप्स ' मधे एकदा माणसं दिसली होती त्यानंतर ती पुन्हा दिसली ती या 'तबला कलकत्ता ' मधे.

पण माणसं तरी कशाला दिसायला पाहिजेत असा एक समजुतदार प्रश्न आपल्यापैकी कित्येकांना सुचू शकतोच की.

--- ००० ---

**देव चालले**

या नाटकात एक विहीर आहे. विहिरीत बादली सोडली जाते. आपल्याला वाटतं आता ही बादली पाण्यानं भरून हिंदकळत, निथळत वर येणार. बादली हळूहळू ओढली जाऊ लागते. आली, आली, आली, येते. हिंदकळत जरूर पण रिकामी. थिएटरात एकच हंशा पिकतो. पण शांता ती बादली जणू काय भरलेलीच आहे अशा भारदस्तपणे काढून घेऊन जाते.( पुढल्या खेपेला एखादं पोरगं जसं रस्त्यातून रिकामी पिशवी फडकवत घेऊन जातं तशा प्रकारे हलवीत ती बादली नेते. ही आणखी वेगळीच व्हरायटी. )

आमचं असंच झालं. म्हटलं दिवांची कृती आहे. पीडीएचा रंगमंच आहे, बघू, असं म्हणून आम्ही स्वत:ला थिएटरात सोडलं. बाहेर येताना आम्ही खरं म्हणजे निराशच होतो पण तरीही आपण काही तरी भरदार पाहून आलोय अशी स्वत:ची समजूत करून घेण्याचाही प्रयत्न करावासा वाटत होता. आडात असूनसुध्दा कधी कधी पोहऱ्यात येत नाही याचा हे नाटक म्हणजे एक मासलेवाईक प्रत्यय.

चार तऱ्हांचे चार भाऊ. त्यांची प्रकांड जुन्या वळणाची घरगुती आई आणि जाऊ घातलेले ( तसंच नेऊ घातलेले ) देव. यांच्या भोवती गुंफलेली ही कथा. कथा म्हणण्यापेक्षा एका परिस्थिती--मालिकेतून उलगडत जाणारी ही माणसं, असं अधिक उचितपणे म्हणता येईल. सुरुवातीचा काही भाग ही माणसं प्रस्थापित करण्यात जातो आणि मग या प्रस्थापित पात्रांवर वेगवेगळया परिस्थित्या टाकून त्यांची चव घेत राह्यचं असा हा मामला आहे. भटजी येईल आणि सांगेल की देव हलवायला मुहूर्त अमुक दिवशी नाही, पुढच्या दिवशी केव्हाही न्या. एखादा हरिकाका येईल

आणि त्या मुलांच्या वडिलांना स्वप्नात देवांच्या तिथे धनाचा हंडा पुरला असल्याचं सांगितल्याचं सांगून जाईल. कित्येक वर्षांपूर्वी निघून गेलेला संन्याशीकाका येईल आणि आपला तिथंच राहण्याचा निर्णय जाहीर करील. असे एकेक एकेक गोळे टाकायचे आणि त्यानंतरचे वादळतरंग दाखवायाचे. एकाचे तरंग विरताहेत तोवर पुढचा गोळा टाकायचा. अशी ही रचना आहे. त्यामुळं देव नेले जातील किंवा नेले जाणार नाहीत या दोनच शक्यता असलेलं हे नाट्य एक प्रत्यक्ष परिस्थिती आणि त्या परिस्थितीच्या संदर्भातली विशिष्ट माणसं यांच्यातच रमून लोकांनी पाहावं अशी साहजिकच अपेक्षा आहे. पण मूळ कादंबरीची सलगता आणि एकसंधपणा या प्रसंगप्रधान -- परिस्थितीप्रधान नाटकात जवळजवळ हरवल्यामुळं समोर चाललेल्या गोष्टींची मजा चाखण्याची वृत्ती प्रेक्षकात निर्माण होते आणि मग त्याचाही कंटाळा येऊन आरतीच्या प्रसंगाची संधी घेऊन प्रेक्षक टाळयांचा ताल धरतात. किंवा रंगमंचावर सगळयांची निजानीज सुरू झाली की खो खो हसून ती नीरवता नष्ट करून टाकतात. जगूनं शांताला टेकडीवरून ' आपलं घर ', झाडं, बगळे वगैरे दाखवण्याचा प्रसंग तर अगदीच तुटका आणि हास्यास्पद वाटतो.( पीडीएनं त्यातल्यात्यात शहाणपणा म्हणून पुढच्या प्रयोगात हा प्रकार अजिबात काढून टाकावा.)

दिग्दर्शनात काही ढोबळ चुका राहून गेलेल्या आहेत. बादलीचं सोडलं तरी आबाचं काय ? तो आपला पाय धुवायला म्हणून मागं बाहेरच्या बाजूला जातो तो लेखकाला हवं असेल तेवढा वेळ नुसता आपला पाय धूत राहातो. इतके याचे पाय कुठं मळले ? तसंच दार उघडण्याचा प्रकार. कधी हे दार पाव मिनिटात उघडलं जाऊ शकतं तर कधी त्याला तब्बल तीनचार मिनिटं लागतात. हे हिशोब दिग्दर्शकाला काही वेगळया प्रकारानं बसवता आले नसते काय ?

एकंदरीनं पाहता दिग्दर्शन अर्थातच ठीक आहे. ठीक म्हणजे हालचाली, संवादांचं उच्चारण वगैरेंमधे नेटकेपणा आहे, हिशोबीपणाही आहे, तसंच प्रकाशयोजना आणि पार्श्वसंगीतही तो तो प्रसंग खूप समृध्द करतात. 'चला रे आरतीला'
असं म्हटल्यावर प्रकाशाची, पार्श्वआवाजांची आणि ताराबाई घारपुरे यांच्या अभिनयाची जी जुगलबंदी सुरू होते तो यातला
एक अविस्मरणीय प्रसंग.

यातले वेळ खाणारे भाग व त्यांचे परिणाम तेवढे हवे तितके जाणवतील इतपत काढून छाटून नाटकाला जर थोडी अधिक गती आणली आणि ते जर अधिक आटोपशीर केलं तरच ते रंगमंचावर सुसह्य होणं शक्य आहे.

नाही तर शेवटी आम्हाला यातलं सगळयात काय आवडलं असं विचारलं तर आम्ही सांगू की, घड्याळदुरुस्तीचा मनमुराद रंजक प्रसंग. आणि आमच्या या उत्तराला उध्दटपणा म्हणणं तुम्हाला जड जाईल.

तर पीडीए हो, देवादिकांना चालवायच्या भानगडीत जरूर पडा, पण नाटकही किमान चालू शकेल हेही बघा. नाही तर देव चालण्याच्या आधी प्रेक्षकच चालायला लागतील.

--- ००० ---

**एक फूल दो माली**

काहीतरी करून कृत्रिम भावविवश प्रसंग तयार करायचे असलंच हे एक पिक्चर. नायक मेला आहे असं समजल्यामुळं पण खरा तो जिवंत असल्याचं नंतर कळल्यामुळं मधल्या काळातील परिस्थितीतून निर्माण होणाऱ्या पेचप्रसंगमय चित्रपटांत याची एक भर. नायक मेला आहे या गैरसमजातून जन्म पावणाऱ्या हिंदी चित्रपटांतलाच हा एक. नायकाला थोडा सुध्दा वेळ न मारता आम्ही चित्रपट काढू अशी एक प्राथमिक प्रतिज्ञा चित्रपटवाल्यांकडून करून घेण्याची आता वेळ आलेली आहे.

आता तरीही त्यातल्यात्यात काही गोष्टींचं कौतुक करता येतं ही गोष्ट वेगळी. सफरचंदाच्या बागेतले मोकह प्रसंग, बॉबी आणि बलराज सहानी यांचा विशेष अभिनय, पर्वतारोहणाची प्रचंड दृश्यं आणि एकदोन बरी गाणी यांचा तसा उल्लेख करता येईल. बाकी दिग्दर्शन वगैरे म्हणाल तर तिकडे होणाऱ्या बर्फ वादळांची, कडे कोसळण्याची सूचना देवळातून बाहेर पडणाऱ्या साधनेच्या अंगावरचा दुपट्टा वाऱ्यानं उडवून त्यातून देणे असं ढोबळच आहे.

असे प्रश्न सुटायला शेवटी दोघांतला कुणीतरी खरोखरच मरणं बरं असतं. यात बहुधा बिन--प्रियकरच मरायचा असतो. तर शेवटी बलराज सहानीचा मृत्यू उगवावा म्हणून यात एक गुंड पेरला आहे. अगदी टोकावर सगळयांना वाचवून तो मरतो. ट्रॅजेडी.

पण तरीही या चित्रपटात एक नाजूक आणि अधिक गंभीरपणे घेता आल्यास पाहावं असा एक भाग आहेच. तो म्हणजे पुरुषत्व हरवून बसलेल्या पुरुषाची एक व्याकूळ अपत्य-तहान आणि ती काही काळ पुरी झाल्यानंतर पुन्हा ती परिस्थिती बदलण्याची शक्यता निर्माण होताच त्याला समोर जाणवणारी भयाण पोकळी. पण माणसाचा हा दुबळेपणा किंवा त्याची ही असहायता हाच एक मध्यवर्ती विषय घेऊन तो पोखरणारा चित्रपट काढण्याचं धाडस कोण करणार ? ते तितकंच.

गुंड पेरा. मृत्यू उगवतो. प्रश्न सुटतात.

--- ००० ---

**जीने की राह**

या चित्रपटाच्या सुरुवातीचा काही भाग फारच चांगला आहे. पण मानसिक विकृती असलेली एक तरुणी आणि तिच्या सहवासात आलेला एक होतकरू तरुण हा विषय हिंदीला कसा पेलणार ? पुढं मग कथा वेगळया लायनीनं जाते.

यातलं ' आ मेरे हमजोली आ खेले आँख मिचोली आ ' हे गाणं फारच छान घेतलंय. दुसरा एक सुटा प्रसंग सांगायचा तर म्हणजे आई विचारते, काय रे एवढं तू चोवीस तास तुझ्या मालकाच्या दिमतीला राहतोस तर तुझा पगार काय ? तो म्हणतो असं ठरलेलं काही नाही - लागेल तेवढं घ्यायचं. तर एक छोटी मुलगी ( सबंध कुटुंब दरिद्री -- हे लक्षात घ्या ) म्हणते, मग सगळे पैसे इकडंच घेऊन या. आणि तिच्या या वाक्यावर सगळे विनोद म्हणून हसतात.

पण ते हास्य जाणवून घ्यायला यात फारसा वाव नाही. चित्रपट, त्यातले प्रसंग, हे सारं भरण्याच्या अनेक प्रयुक्त्यांमधली ती एक एवढंच तिचं महत्त्व राहतं.

(आरपार, सुयोग साधना, सप्टेंबर ६९ )

--- ००० ---

**यकीन**

कुणावर तरी काहीतरी उडवून लावायची कामगिरी असते आणि ती यशस्वी किंवा अयशस्वी होते ( परदेशाची असेल तर अयशस्वी ) अशा प्रकारचे अनेक परदेशी चित्रपट आपण पाहिलेत ना ? मग हा एक हिंदी चित्रपट निर्लज्जपणे परकीयांच्या पावलावर पाऊल ठेवण्याचा खुळचट प्रयत्न करणारा. आणि या चित्रपटवाल्यांना देशभक्तीचा एवढा उमाळाच आला होता तर श्रेयनामावली इंग्रजीत कशाला ? आपल्या देशाची राष्ट्रभाषा श्रेयनामावली व्यक्त करण्याएवढी निश्चितच समृध्द आहे. आणि हेच मग लोकांना देशभक्तीचे डोस वगैरे देणार ! धन्य आमचे चित्रपटावाले आणि धन्य आमची जय हिंद -- जनता !

शास्त्रज्ञांची एक तुकडी प्रयोगशाळेत खपते आहे. काहीतरी अत्यंत महत्त्वाचा शोध लागतो आहे. तुम्ही म्हणाल की इतकं महत्त्वाचं हे आहे तरी काय तर ते सोडून द्यायचं. ते महत्त्वाचं आहे एवढं लक्षात ठेवायचं. अहो, त्याशिवाय का दुसऱ्या देशाचे लोक त्या शोधाच्या रहस्यामागं लागतील ? तुम्ही म्हणाल, आता हा आणि कुठला देश आला मधेच -- तर तेही सोडून द्यायचं. कुठलातरी देश त्यामागं आहे एवढंच आपण लक्षात ठेवायचं.

धर्मेंद्र हा त्या शास्त्रज्ञांच्या तुकडीतला एक. तर त्याच्यासारखाच दिसणारा एक माणूस ( म्हणजे अर्थात धर्मेंद्रच ) दुसरा देशवाल्यांकडे असतो. साहजिकपणेच मग ते याला पळवून त्याला याच्या जागी सोडतात. प्रयोगशाळा उडवून लावायची ही त्याच्यावरची कामगिरी. त्याला धर्मेंद्रशी संबंधित लोकांची माहिती दिली जाते. त्याचा नोकर भोला, प्रेयसी शर्मिला टागोर वगैरे. पण गंमत अशी होते की नव्या धर्मेंद्रला जुन्या धर्मेंद्रचा कुत्रा ओळखत नाही. (हे एवढं त्यातल्यात्यात खरं वाटलं. ) तो गुरगुरायला लागतो. साहजिकपणेच कुत्र्याचा खून होतो. त्यानंतर भोलाचा नंबर लागतो.पोलीसखात्याचे तीन प्रमुख शंका घ्यायला लागतात.( आता सगळयात कहर म्हणजे त्या तिघांमधलाच एक परदेशाला फितूर असतो. हे अर्थात आपल्याला शेवटी कळतं.) मग सगळया खुणाबिणा करेक्ट येतात. बरं हातांचे ठसे तपासतात तर तेही करेक्ट.( आता तपासणाराच फितूर म्हटल्यावर करेक्ट का नाही येणार ?)

इकडे जुना धर्मेंद्र बंदिस्त असतो. कोळशानं रेघा ओढून तारखा मोजत असतो. कारण आम्ही तुझी प्रयोगशाळा अठरा तारखेला उडवणार आहोत असं त्याला सांगून ठेवण्याइतके परदेशी लोक मूर्ख असतात. आणि नेमके त्याच सुमारास सगळे परदेशी दारूच्या धुंदीत आणि तंग बाईच्या नृत्यात बेहोष होतात. ती संधी साधून हे गृहस्थ तिथून निसटतात. आणि मधले अनेक अडथळे पार करून ( पोलीसांनाही लाथाडून ) अगदी टायमात प्रयोगशाळेत दाखल होतात. तिथं साहजिकच दोन धर्मेंद्रांची दे दनादन अशी धुमाकूळ मारामारी होते. स्वदेशी धर्मेंद्राचा अर्थातच विजय होतो. फितुराला अटक होण्यापूर्वीच तोही खलास होतो. आणि मग पुन्हा एकदा ' यकीन कर लो, मुझे मुहोब्बत है तुमसे तुमसे ' हे गाणं वाजतं. इथं ' द एन्ड '( शेवट अर्थात पुन्हा इंग्रजीतच. )

आता शर्मिला टागोर. आपल्या परीनं तिनं द्यायचं ते दिलेलं आहे. उदाहरणार्थ रेखीव लयीत पळणं, वगैरे. तिचा एकंदर आकार एकदम पसंत पडण्यासारखा आहे हे मान्य. पण म्हणून काय तिच्यासारख्या कसदार बाईनं फक्त आकाराचंच प्रदर्शन करत बसायचं ? एक ' अनुपमा ' सोडला तर या बाईनं हिंदीत काय केलं आहे ? ' अनुपमा 'त तिची ताकद दिसली आहे म्हणूनच ही दोनचार जास्तीची वाक्यं.

धर्मेंद्रचं ठीक आहे. तो एक सफाईदार नट आहे आणि चित्रपटांना सफाईदार नट लागतातच. या चित्रपटातली नायकाची जबाबदारी आणि खलाचीही ( म्हणजेच डबल रोलची ) त्यानं पार पाडलेली आहे.

शंकर-जयकिशन. ' यकीन कर लो ' आणि ' अगर तुम भुला न दोगे ' ही त्यातल्या त्यात ऐकावीशी वाटणारी गाणी. पण एकूणच संगीतात कुठेही नवेपणा, जोम जाणवत नाही. जोडी थकली का काय ?

चित्रपटाचं रंगकाम बरंच बरंच बरं आहे. तांत्रिक कारणं सांगणं जरा कठीण पण या चित्रपटाच्या रंगांत एक वेगळाच ताजेपणा जाणवला.

पण एकंदरीत आमचं मत विचाराल तर हिंदी लोकांनी परदेशी हेरपटांची खत्रूड नक्कल करण्यापेक्षा सरळ सरळ त्यांची विडंबनं सादर करावीत. निदान याहून जरा अधिक प्रमाणात त्यांचा मजा तरी लुटता येईल.

--- ००० ---

**सौभाग्य**

नीतीअनीतीचा ठोकळेबाज बडेजाव माजवणाऱ्या नाटकांत आणखी एकाची भर. प्रेमाच्या त्रिकोणात बहुतेक वेळी शेवटी दोन कोन ठेवावे लागतात आणि तेही बहुधा खरं प्रेमवाले ( म्हणजे काय ) असेच असतात. पूर्वीचा प्रियकर लग्न झालेल्या स्त्रीच्या आयुष्यात येण्याचे प्रकार अनेक वेळा अनेक तऱ्हांनी हाताळले गेलेले आहेत. मुळात अशा प्रकारात आपण ज्याला प्रेम म्हणतो तो एक भावनिक अवलंबित्वाचा प्रकार असतो. पण याला जरी माणसाचा कमकुवतपणा म्हणता आलं तरी ' हाणा, बडवा, मारा, ठोका ' स्टाईल अनीती म्हणणं हा एक शुध्द क्रूरपणा आहे. आणि हा क्रूरपणा हा माणसाचा एक दुसऱ्या प्रकारच्या कमकुवतपणाच आहे. आणि कोणत्याही कमकुवतपणाला जर अनीती म्हणायचं असेल तर हे नाटक लिहिणारे पु.भा.भावे हे कलावंत म्हणून अनीतीमान ठरलेले आहेत. आणि भाव्यांच्या या अनीतीचा पुरावा म्हणजे रंगमंचावर अविनाशविरुध्द कितीही वातावरण गढूळ होत असलं--तापत असलं -- तरी प्रेक्षक कधीच त्याच्याकडे एक ' खल ' म्हणून पाहू शकत नाहीत. उलट अनंतराव जेव्हा त्याला मारतो तेव्हा ते हळहळतात. भाव्यांच्या अमानुष दृष्टिकोणाचा हा एक ढळढळीत पराभव आहे. कलावंत हा माणसांना माणसं म्हणून पाहीनासा झाला की तो स्वत:चीच कशी सफाईदार धूळधाण उडवून घेऊ शकतो याचं हे नाटक म्हणजे एक उत्तम उदाहरण.

हे सगळं एका त्रयस्थ भूमिकेतून -- ठोकळेबाजीचा वेध घेण्याच्या भूमिकेतून जर समोर आलं असतं तर मग हे सगळंच वेगळं झालं असतं. इथं मात्र मामासाहेब हे पात्र सरळसरळ लेखकाचं भाष्यपात्र आहे. तो आपल्या मतामधे प्रेक्षकांना सामील धरून चालतो. आपल्या विनोदावर लोकांना सक्तीनं हसायला लावतो. या सगळयाचा अर्थ काय ?

आता दिग्दर्शनाची एक गंमत सांगतो. एक फूल आधी अविनाशच्या हातात असतं, नंतर ते जमिनीवर पडलेलं असतं, आणि जेव्हा अनंतराव येतो तेव्हा तो ते फूल उचलतो आणि हुंगत बसतो. स्वतंत्रपणे पाहता ढोबळ दिग्दर्शनाच्या दृष्टीनं हा एक कौतुकास्पद प्रकार आहे. पण त्यात गंमत अशी आहे की मधे खोली साफसूफ करण्याचा, नीट लावण्याचा एक प्रकार आहे. अनंतराव विमलला पाह्यला येणार म्हणून तिचे आई-वडील ही तयारी करत असतात. या सगळया धामधुमीत मोठ्या कष्टानं बिचाऱ्यांना जमिनीवरच्या त्या फुलाकडं दुर्लक्ष करावं लागतं. आपल्या दिग्दर्शनाच्या स्पर्शासाठी फुलाची आणि पात्रांची इतकी केविलवाणी दशा करणारा दिग्दर्शक धन्य होय.

पण अपवाद सोडता दिग्दर्शन एकंदरीत ठीक आहे. दिग्दर्शनाबरोबरच तोरडमलांनी यातली लेखकाचं प्रतिनिधित्व करणारी अशी महत्त्वाची मामासाहेबाची भूमिकाही केली आहे. ती अर्थातच त्यांनी चोखपणे केलेली आहे. लेखकाच्या अपेक्षा तंतोतंत जाणून केलेली आहे. बाकी सगळया भूमिकाही सफाईदार ठाकठीक आहेत.

जॅक नाईफ हा रंगमंचकाचा एक वेगळा प्रकार. नाटकात सिनेमाचं तंत्र घुसडण्याच्या दृष्टीनं उपयोगी. याचा दोष म्हणजे यात पात्रांना फारच दाटीवाटीनं हालचाली कराव्या लागतात आणि दुसरा म्हणजे एका कुठल्यातरी बाजूचा प्रवेश सुमारे अर्धा तास चालू राहिला तर प्रेक्षकांच्या माना अवघडण्याची शक्यता. नाहीतरी सुरीचा आणि मानेचा जवळचा संबंध आहेच !

--- ००० ---

**वेड्याचं घर उन्हात**

गाजलेलं नाटक आणि गाजलेले लागू आणि एकमेकांमुळे गाजलेले दोन्ही. शहाणपण, वेडेपण, भ्रम, सत्य, माया, संतापीपणा, समज, गैरसमज वगैरेंच्या भडक ठोकळेबाजीतून रंगवत नेलेलं धन्य हे नाटक आणि धन्य ते श्रीराम लागू जे दादासाहेबांची भूमिका रायगडाला जाग आलेल्या शिवाजी महाराजांसारखी करतात. आम्ही तिथं काय प्रकाशयोजना बघायला आलो होतो होय हो लागू ? ( पण ते तरी काय करणार, कदाचित नाटकामुळंच त्यांचा नाईलाज झाला असेल. )

त्यातल्यात्यात आनंद म्हणजे काय तर गणेश सोळंकी, सतीश दुभाषी, नारायण पै आणि कुसुम कुलकर्णी.

या एकंदर नाटकात आणि श्रीराम लागूंच्या या दादाच्या भूमिकेत विशेष कौतुकास्पद असं काय आहे ? -- हा एक भाबडा सवाल आम्ही इथं टाकून ठेवतो. प्रकाशयोजना मात्र खरोखरच टॉप !

--- ००० ---

**रंग ( पेन्ट्स् )**

स्वत:ची संवेदनशीलता कोणत्या ना कोणत्या कारणानं एकदा आपण हरवून बसलो की हलत्याबोलत्या शरीरानं हयात असूनसुध्दा एकूण आपण मृतांप्रमाणेच होऊ शकतो. रोजगारीचं धडाड्धुम जीवन आणि असंख्य सवयींनी बंदिस्त झालेलं जीवन...या सगळयात डोळयांना रंग कुठून जाणवायचे आणि कानांना आवाज कुठले ऐकू यायचे ? असं एखादं चित्रक जेव्हा रंगांचं स्वतंत्र अस्तित्व आपल्याला जाणवून देऊ पाहतं तेव्हा ते म्हणूनच महत्त्वाचं ठरतं.

नुसते रंग. अनेक प्रकारचे, अनेक छटांचे, चांदण्या, गोल, त्रिकोण, चौकोन...सुसाट धावते रंग...संथ हलके रंग...पातळ गार रंग...दाट मुलायम रंग...ओघळते रंग...पसरते रंग. आणि रंगाचं पोत. कधी खडबडीत, कधी रखरखीत तर कधी मार्दवी. रंगांच्या जाळया...नजर ठरू नये अशा तऱ्हा... रंगांचे कारखाने... रंगांचे फवारे...रंगवलेल्या गाड्या...रंगवलेल्या इमारती... नुस्ते रंग...रंग जे केवळ रंग म्हणूनच पाह्यचे. सोबतीला विजय राघवराव यांचं पार्श्वसंगीत.

या जगात रंग आहेत याची आठवण करून देणारं हे चित्रक...आणि आपल्या डोळयांच्या मृत्यूची जाणीव करून देणारंही.

बाकी विशेष कलात्मक मूल्यबिल्य बाजूला ठेवलं तरी ही काही कमी महत्त्वाची गोष्ट नाही.

(आरपार, सुयोग साधना, ऑक्टोबर ६९ )

--- ००० ---

**( ' अलिबाबा ' या टोपणनावाने ' राजस ' मासिकात लिहिलेली चित्रपट -- परीक्षणे : -- )**

दोन व्यावसायिक- आणि एक अक्षरश: प्रचंड चित्रपट

**गोपी**

चित्रपटात विशेष काही नाही. सगळा नेहमीचाच मसाला. शेवटी तर हा गोपी आणि जमीनदार या दोघांचीही लग्नं एकदम होतात आणि त्यांची वरात ज्या रामाच्या देवळात येते तिथेच गोपीचा सौतेला ( पण बडा प्रेमळ ) बडा भाई आणि भाभी फाटक्या कपड्यांत, हलाखीत, धडपडत आलेले. मग सद्गदित, गलबलीत भेट ! मग वाचक हो, यात इतर आल्तूफाल्तू गोष्टी महत्त्वाच्या नाहीच आहेत. दिलीपकुमार किती तऱ्हेचा अभिनय करू शकतो हेच आपण पाह्यचं आणि खूष होऊन यायचं !

फोटोग्राफी चांगली, संगीत चांगलं -- असं चांगलंही बोलता येईल. आणि अगदी मनापासून जर काही विशेषच सांगायचं झालं तर भजनाच्या वेळच्या पब्लिकमधे सर्वांगानं हिंदकळत तल्लीन झालेला एक माणूस. असल्या भरगच्च पण रिकाम्या चित्रपटाच्या दिग्दर्शकाच्याही असं काही तरी डोक्यात यावं हे विशेषच नाही तर काय ?

--- ००० ---

**मस्ताना**

' गोपी ' जसा दिलीपकुमारच्या अभिनयासाठी पाह्ययचा तसा ' मस्ताना ' मेहमूदसाठी. पण ' मस्ताना ' नं निदान एक बरा विषय तरी हाताळलाय एवढं बरं आहे. अगदी भांबड्या सामान्य विनोदापासून ते अगदी दणदणीत मेलोड्रॅमॅटिक असे सगळे प्रकार यात मेहमूदनं करून दाखवलेले आहेत.

तर इन्स्पेक्टर साबच्या ( विनोद खन्ना ) लग्नाच्या जिलब्यांच्या डब्यात रमेश देव विष टाकतो. या जिलब्या नाही म्हटलं तरी पाच पन्नास माणसांच्या तोंडांत जाणार असाव्यात ! पण या ना त्या कारणानं त्या इतर कुणाच्याच तोंडात जात नाहीत. फक्त लहान ताराच्या तोंडात ही जिलबी जाते आणि तिला विषबाधा होऊन इस्पितळात नेण्यापर्यंत प्रकरण जातं - हे पाहिल्यावर दैववादावरचा माणसाचा विश्वास का बळावणार नाही सांगा. पटकथालेखक आणि दिग्दर्शक म्हणजे चित्रपटातल्या पात्रांचं साक्षात दैवच !

' सोये जा तारा ' है गाणं छान घेतलंय. थोडक्यात म्हणजे सर्वसाधारणपणे हिंदी चित्रपट ज्यासाठी पाहिले जातात त्या दृष्टीने ' गोपी ' आणि ' मस्ताना ' हे दोन्हीही चित्रपट निश्चितच पाहण्यासारखे आहेत.

--- ००० ---

**द फनी ओल्ड मॅन**

फिल्म इन्स्टिट्यूटमध्ये हा एक महान चित्रपट पाहिला. नव्वद मिनिटांचा एक अक्षरश: प्रचंड पट ! दोनतीन वैशिष्ट्ये सांगायची तर अशी : -- रंगीत आणि ब्लॅक अँड व्हाईट यांचे बेमालून मिश्रण, हेतूपूर्वक योजलेले अस्पष्ट छायाचित्रण, आणि सतत कॅमेरा सत्तर वर्षाच्या म्हाताऱ्या हार्ट-पेशंटवर रोखलेला. रूढीबाह्यता सांगण्यासाठी ही वैशिष्ट्यं सांगितली ; महानता सांगण्यासाठी चित्रपट सांगतो.( सांगून काही उपयोग नाही. पाहिलाच पाहिजे ! -- हे परत आहेच ! )

जगायची इच्छा नसलेला एक म्हातारा, हार्ट-ट्रान्स्प्लांटेशनची झेकोस्लोव्हाकियातली पहिली यशस्वी शस्त्रक्रिया झालेला आणि ती यशस्वी झाली म्हणून वैतागलेला. प्राध्यापक म्हणून काम केलेला. सायबरनेटिक्सवर टेक्स्ट लिहिलेला. ( ते टेक्स्ट अजून हस्तलिखित स्वरूपात असतं आणि ते हा कुणालाच देत तर नाहीत पण त्याची पानं फाडून त्याचे स्वॅलो पक्षी करून दुसऱ्या इमारतीतल्या पोरांकडे टाकतो. तो पक्षी हातात आला की पोरं टाळया वाजवतात. बस्स् ! हा खूष ! ) डॉक्टरांनी दिलेली औषधं त्यांना चुकवून थुंकणारा आणि विश्रांतीच्या वेळी मुद्दाम फिरून कष्ट करून घेणारा.

या माणसाला हॉस्पिटलमधे ठराविक वेळी खिडकीत येऊन बसणारं एक कबूतर दिसतं. त्याच्याशी हा दोस्ती जमवतो. आणि दुसरी गोष्ट म्हणजे दूरच्या एका हिरव्या टॉवरच्या इमारतीत एक मुलगी सकाळी आणि दुपारी ठराविक वेळी गच्चीत येऊन तिची पाळलेली कबुतरं उडायला सोडते -- ते बघण्याचा एक त्याला चाळा लागतो. बस्स -- ! होतं काय की एक दिवशी ती मुलगी गच्चीत येतच नाही. सकाळीही नाही आणि दुपारीही नाही. याला घोर लागतो. झालं काय ? दुसऱ्या दिवशीही नाही. मग याला वाटतं की काही तरी घडलं असणार. आणि ते काय ते कळेपर्यंतचा त्याचा प्रचंड आटापिटा म्हणजे...सांगून खरंच उपयोग नाही. आजूबाजूच्या माणसांनाही पत्ता नसतो की ती मुलगी विष घेऊन पडलीय म्हणून. हा धडपडत तिथे जातो तेव्हा कुठं पब्लिक जमतं. हा जिवाच्या करारानं गच्चीवर जातो आणि तिची कबुतरं सोडतो.

शेवटी अर्थात् मृत्यू ! पण मृत्यूच्या छायेतलं हे साधं, धिमं पण अर्थगर्भ प्रकरण पाहणे हा खरोखरच एक प्रचंड अनुभव आहे.

आम्ही नुसती दिलीपकुमारच्या अभिनयाचीच कौतुकं करावीत !

पण तुलना तरी कशाला ! त्यांचे ते, आपले आपण !

( राजस, फेब्रुवारी ७१)

--- ००० ---

**ययाती आणि देवयानी**

ॲक्टिव्ह थिएटर्सच्या रौप्यमहोत्सवी वर्षातली  ही त्यांची निर्मिती. उत्तम निर्मिती. नोकरीनिमित्त इकडे तिकडे फिरत असल्यामुळे मी हे नाटक, यापूर्वी कधी पाहिलं नव्हतं. वाचलंही नव्हतं. ' नटसम्राट' पेक्षा मला हे महत्त्वाचं नाटक वाटलं कारण इथे उधार माल नाही. शिरवाडकरांना स्वत:ला जाणवलेला एक अतिशय गुंतागुंतीचा विषय या नाटकात त्यांनी मांडला आहे. लेखनतंत्रही नाट्यदृष्ट्या प्रभावी आहे. खूप दिवसांनी मी एक संगीत नाटक बघितलं.

विषय पौराणिक असूनही त्याचा भरजरीपणा दिग्दर्शक माधव वझे यांनी आटोक्यात ठेवला आहे. हे मुख्यत: संवादांचे नाटक आहे हे ओळखून त्यांनी डोळे आणि कान यातून विक्षेप वाटेल असे काहीही होऊ दिलेले नाही. बाळ मोघे यांची सौम्य - स्मूथ प्रकाशयोजनाही या दृष्टीनं विचारपूर्वक योजलेली दिसून आली. नेपथ्यात दोन दणदणीत समयांचा इम्पॅक्ट सुरुवातीलाच देऊन भव्यतेची कल्पना रुजवली गेली.

नाटकाची गती संथ असणं आवश्यकच होतं, नाहीतर संवाद पोचणं हे या नाटकातलं महत्त्वाचं काम बिघडलं असतं. आवश्यक त्या प्रसंगांत जोरकसपणा ठेवल्यानं हा संथपणाही नाटकभर नाट्यमय वाटत राहिला. अभिनेते रमेश भाटकर यांची मी पाहिलेली ही चांगली भूमिका. संवादांवर त्यांनी खूप मेहनत घेतल्याचं दिसून येत होतं. बागेश्री देसाईंनी देवयानीचं अहंकारी बेअरिंग अत्यंत समजुतीनं राखलं, त्यामुळे, त्यांच्या या अभिनयाच्या पार्श्वभूमीवर काही गाणी अधिकच नाट्यमय झाली. दिलीप जोगळेकरांचा विदूषक छान होता. त्यामुळे शेवटच्या भागातले ययातीला ' वार्धक्य 'अवस्थेतही साथ देण्याबाबतचे त्यांचे संवाद प्रभावी ठरले. सायली ठाकूर यांची शर्मिष्ठा पटत होती पण त्यांची गाणी तितकीशी प्रभावी वाटली नाहीत. चारुदत्त आफळेंचा कच सर्वांगपरिपूर्ण होता.

मुळातच हे प्रेक्षकांच्या आवडीचं नाटक आहे. त्याचा हा प्रयोगही उत्तमच होतोय. पण संहितेत काही घोळ जाणवले. यापूर्वी याबद्दल कुणी काही लिहिलं, बोललं आहे की नाही ते मला माहीत नाही. त्यामुळं मला जे वाटलं ते लिहितो. मुख्य विषय असा दिसतो की देवयानी ही ययातीची पट्टराणी असूनही ती त्याला स्त्रीसुख नाकारतेय. आता हे ययातीच्या दारू पिण्यामुळंच घडत राहिलं असेल का की कचाबाबतच्या तिच्या आसक्तीची याला पार्श्वभूमी समजायची ? या प्रकारामुळं ययातीनं प्रतिक्रिया देत जाणं पटत जातं. पण अगदी शेवटी शाप देण्याचा तणावपूर्ण प्रसंग चाललेला असताना देवयानी, ती गर्भवती असल्याचं सांगते. चाललेल्या तणावात हे पटकन घुसवलं जातं. म्हणजे यांचे संबंध येत होते ? मग नेमका प्रॉब्लेम काय होता असा विचार करेपर्यंत ती ययातीला शाप देते. हा या नाटकातला, मुख्य विषयातलाच एक बनवाबनवीचा प्रकार आहे असं मला वाटलं.

थोडं संवादांबद्दल.' अपमान करणारे आहेत, सहन करणारे आहेत...पण ' माणूस ' कुणी नाही '' हा शर्मिष्ठाचा संवाद किंवा '' दुराचारापेक्षा सदाचाराचा अभिमान किती घातक आहे... '' हा ययातीचा संवाद  -- हे चांगले संवाद  वाटले पण  '' विदूषकाच्या डोळयांत अश्रू आले म्हणजे पृथ्वीचा समारोप जवळ आला असं समजावं ''  अशा प्रकारचं जे वाक्य

आहे ते मला निरर्थक वाटलं. तसंच ’’ दु:ख कधी एकटं नसतं - अहंकार एकटा असतो ’’ हे वाक्य ! या नाटकातली असली काही वाक्यं मला खोटी - बनावट वाटली.

आता आणखी एक -- शरीराची आणि मनाची तयारी नसताना यती परमार्थाच्या शोधात गेला म्हणून भ्रमिष्ट झाला. तो आत्मा मानतो आणि शरीराकडं दुर्लक्ष करतो म्हणून शरीर बंड करतं आणि तो भ्रमिष्ट होतो ! कच, ययातीला आत्मा जागृत करायला सांगतो म्हणजे ययातीचं शरीर ओके ! शेवटी देवयानी अहंकार सोडून ’ सर्वात्मका ’ मध्ये सामील होते म्हणजे तिची शरीराची आणि आत्म्याची दोन्ही तयारी झालेली असते का ? की अहंकार सोडण्याचे पारमार्थिक आणि प्रापंचिक असे दोन प्रकार असतात ? परमार्थ या विषयाबाबत शिरवाडकर स्वत:चं आकलन मांडत आहेत असं म्हणावं तर त्यात खूप गोंधळ दिसतो आणि क्लॅरिटीचा अभाव दिसतो. त्यामुळं हे नुसते शब्दांचे बुडबुडे ठरतात. परमेश्वराशिवाय काहीच पूर्ण असू शकत नाही, त्यामुळे शरीराची आणि मनाची ’ पूर्ण ’ तयारी संभवतच नाही -- असं आकलन संत वाङ्मयावरून दिसतं. कोणतीही परिस्थिती ही परमेश्वरप्राप्तीच्या आड येऊ शकत नाही असंही संत सांगतात. इथं काय सांगितलं जातंय ते लक्षात येत नाही. शेवट गोड केल्यासारखा दिसतो, पण या एकूण प्रकारात देवयानी सगळंच गमावून बसली आहे. तिची काय परिस्थिती आहे ? की अहंकार सोडल्यामुळं ती परमेश्वराशी एकरूप झालेली आहे ? ’दु:ख कधी एकटं नसतं ’ हे वाक्य तिनं नुकतंच ऐकलेलं असल्यामुळं आता तिला तशी चिंता नसावी !

एक गुंतागुंतीचा पट तरी पूर्ण अंतर्गत समजुतीनं हे नाटक दाखवतंय का ? शक्तीचे अहितकारक- हितकारक उपयोग, अहंकाराचे दुष्परिणाम असं काहीतरी असावं. यातला कच हा ’ पोचलेला ’ माणूस ! मग ययातीनं, कच-देवयानी प्रकाराबद्दल संशय व्यक्त केल्यावर त्याच्यावर कुणाचंच काहीच म्हणणं नाही ? शेवटी कचानंच ययातीला त्याचं तारुण्य पुन्हा प्राप्त करून दिल्यामुळं आता ययातीही काही बोलू शकत नाही ! झालं गेलं सोडून देतो ! ही कचाची ’पोलिटिकल ’ पॉवर समजायची का ? हे वरवर चटपटीत असलेलं, महान-गंभीर पणाचा आभास निर्माण करणारं नाटक आतून फसलेलं आहे असं मला वाटतं. मराठी लेखकाचा हा एक महत्त्वाचा पराभव आहे-- असं काहीतरी उदात्त बोलता येईल का ?

(मत कलावंताचे, व्यक्त-अव्यक्त,जून २००० )

--- ००० ---

**पूज्य गुरुजी**

दिलीप जगताप यांचे दोन अंकी नाटक

या नाटकात जगतापांनी उभे केलेले असे एक भाषिक जग आहे. या जगाची सत्यता या जगाबाहेर कुठे शोधायची नाही असे एक स्वयंपूर्ण जग. जुन्यानव्याचे, ग्रामीण--शहरी जीवनाचे असे अगणित संदर्भ सामावून घेणारे हे जग आहे. इथे तमाशा-- लोकनाट्याप्रमाणे, सर्वच पात्रे स्थलकालाचे आणि त्यांच्या विशिष्ट भूमिकांचीही बंधने न पाळता संवादांच्या बाबतीत चौफेर स्वातंत्र्य घेतात. भाषेच्या अशा भरघोसपणात आणि तिच्या 'पुष्कळा ' वळणावाकणांत असा सहज पोहणारा लेखक आज अभावानेच सापडेल. ' मला ठाऊक आहे तिचा पत्ता. एखाद्या अंधाऱ्या कोपऱ्यात रडत रडत तो अंधार रातकिड्याच्या चिकाटीनं ती कुरतडत असेल.' -- अशी भरपूर समृध्द वाक्ये या नाटकात आहेत. काव्य, नाट्य आणि चौफेरता या गुणांनी युक्त असे या नाटकाचे भाषिक अंग हे या नाटकाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

नाटकाचा विषय काय आहे ? सुधारणा--प्रगती-- हा विषय आहे. ही दोन प्रकारांनी होऊ शकते. एक म्हणजे माणसाचा ' मानवी चेहरा ' ठेवून किंवा बिनचेहऱ्याची -- माणसाला ' यंत्र ' बनवणारी. हा विषय नवा नाही. विशेषत: नोस्टाल्जिक मनोवृत्तीतून तर हा विषय हाताळण्याची एक ठरीव पध्दतच आहे. इथे वेगळेपणा हा आहे की दोन्ही प्रकारांतल्या गुणावगुणांचे भान ठेवले जाते. कुठल्याच बाजूला स्वप्नीलपणे अधिक महत्त्व न देता एका समतोल दृष्टिकोणातून पूर्ण विषयाचे भान घेणे हेच इथे उद्दिष्ट दिसते. एका बाजूला आदिम जोश, पर्यावरणाचे -- निसर्गाचे महत्त्व, भावनाप्रधानता, मानवीयता यांचबरोबर मालकी हक्क, रानटीपणा, अत्याचार, गुलामगिरी, हेही आहेत. हे गुणावगुण बोकारो या सत्ताधारी -- म्होरक्या -- वनराज असलेल्या पात्रातून व्यक्त होतात. तर दुसऱ्या बाजूला पर्यावरणनाश, चंगळवाद, कृतिशून्य वैचारिकता, जीवनशक्तीचा ऱ्हास या अवगुणांबरोबरच स्वातंत्र्य, प्रबोधन, अधिक सुखसोयी इत्यादी गुणही आहेत. हे गुणावगुण धारण करणारे पात्र म्हणजे मास्तर. मास्तरचे सिध्दी नावाच्या मुलीवर प्रेम असून तीच मुलगी बोकारोला, म्हातारपणातही, आणखी एक राणी म्हणून हवी आहे. सादिकू ही बोकारोची राणी या एकूण प्रकाराला गती देण्याचे काम करते. शेवटी ' निवड' करायची वेळ येते तेव्हा सिध्दी आदिम जोश आणि जगण्याची शक्यता यांची निवड करून बोकारोकडे जाते. अर्थात ही निवड 'पूर्णपणे ' बरोबर आहे असे कुणालाच वाटणे शक्य नाही, पण तरीही, सर्वनाश की जगणे असेही या प्रश्नाचे एक स्वरुप आहे ते नाकारता येत नाही.

जगतापांनी या नाटकासाठी एक मोकळाढाकळा घाट निवडलेला असल्याने हे नाटक फक्त एकढ्याच विषयापुरते मर्यादित राहात नाही. गर्दी खेचणारी कला, माणसाला गिळंकृत करण्याची लोकशाहीतलीही शक्यता, व्यापारीकरण, उन्मादकता, तारुण्यसुलभ आकर्षण वगैरे अनेक विषयांना हे नाटक स्पर्श करत जाते. अमुक म्हणजे तमुक अशी समीकरणे फार ताणायची नाहीत अशी समजूत ठेवली तर नाटकाची ही शैली कुठेही अडथळा वाटायचे कारण नाही. आजच्या जगण्याच्या प्रश्नांचे असंख्य कंगोरे -- पापुद्रे असण्याचे स्वरुप आणि त्यामुळे ' निवड ' अशक्य होण्याची अवस्था याचे भान हे नाटक देत जाते. शेवटी ज्याने सापळा रचून, डाव टाकून सिध्दीला फसवले त्या बोकारोचीच निवड

ती करते यात ' बरोबर ' असणेही आहे आणि ' कारुण्य ' ही आहे आणि मुख्य म्हणजे बरोबर असण्याबाबतचा संशयही आहे.

या सगळया प्रकारात सिध्दीचे पात्र उभे करताना काही बाबतीत गोंधळ वाटतो. पहिल्यापासूनच सिध्दी ही मास्तरला फारशी अनुकूल असल्याचे दिसत नाही. तो हुंडाही देऊ शकत नाही या वस्तुस्थितीबरोबरच ' तुम्ही बोलता तो करतो ' असेही ती मास्तरला सुनावते. त्यामुळे मुळातच तिच्यात ' निवडी' बाबत फारसा संघर्ष दिसत नाही. बोकारोकडून फसवणूक झाल्यावर ती रडते, हुंदके देते पण ते तेवढ्यापुरतेच. नाटकातला संघर्ष ज्या पात्रातून फुटायला हवा तेच पात्र कच्चे राहिल्यासारखे वाटते. त्यामुळे नाटकाची ' नाट्यमयता ' तर उणावतेच पण नाट्यविषयातली जी ' पेचा 'त्मकता आहे तीही बोथट होते. त्यामुळे ' बाजू ' घ्यायचे जगतापांनी ठरवल्यासारखेही होते.( मास्तरची असहायताही फार स्पष्टपणे व्यक्त होत नाही हेही इथे लंक्षात घेण्यासारखे आहे.)

हीच गोष्ट आणखी एका गोष्टीतूनही दिसते. ' पूज्य गुरुजी ' हे एक तर उपरोधिक नाव असूनही, नाटक पाहिल्याशिवाय त्यातला उपरोध लक्षात येत नसल्याने, ते मिळमिळीत वाटू शकते हा मुद्दा जरा बाजूला ठेवू. पण नाटकाचा पूर्ण फोकस गुरुजींवर आहे का ? सगळयाच बाजूंमधला अपुरेपणा, विसंगती यांचा हे नाटक वेध घेऊ पाहते की नाही ? मग असे मर्यादा घालून घेणारे, गैरसमज निर्माण करणारे नाव कशासाठी ?  हीही गोष्ट जगताप अमूक बाजूला वजन टाकू इच्छितात हेच दाखवते. त्यामुळे, बाळबोध नसलेला विषय बाळबोध पातळीवर पाहिला जाण्याचा धोका पत्करला जातो.

या नाटकाचा प्रयोग पाहण्याची संधी मला मिळाली. राहुल सोलापूरकर बोकारोच्या भूमिकेत आणि अनंत राऊळ मास्तरच्या भूमिकेत होते.     दोघांनीही आपापल्या भूमिका चांगल्या केल्या. नाटकाच्या सादरीकरणाआधी आणि प्रक्रियेच्या काळात फारशा चर्चा, खल झाला नसावा असे वाटले. नाहीतर नाटकातले काही दोष घालवले जाऊ शकले असते. तरीही, सिध्दी बोकारोकडे येते तेव्हाचे कुस्ती आणि संवाद असे जे एक दृश्य आहे ते विशेष लक्षात राहण्यासारखे झाले हे नोंदवायला हवे.

संपूर्ण निर्दोष माणूस जसा अस्तित्त्वात असू शकत नाही तसेच संपूर्ण निर्दोष कलाकृतीही नसते हे लक्षात घेतले तरी  'मूळ 'च बिघडवतील अशा दोषांबाबत जागरूकता हवीच. हे म्हणतानाही इथे एक स्पष्टपणे म्हणावेसे वाटते की दिलीप जगताप हा एक चांगला नाटककार आपल्याकडे काहीसा दुर्लक्षित राहिलेला आहे. त्यांचे ' एक अंडे फुटले ' या नावाचे एक नाटक पूर्वी गाजले होते. त्यानंतर त्यांनी बरीच नाटके लिहिली असे कळते. ती का दुर्लक्षित राहिली याचा शोध घेऊन त्याचे विश्लेषण होणे ही आजच्या कलाजीवनातली एक महत्त्वाची गोष्ट ठरेल असे वाटते. जगतापांची

सगळीच नाटके अशी मुक्त ' स्वातंत्र्य ' घेणारीच आहेत का, ते फार जटिल विषय हाताळतात का, त्यांच्या रचना--शैलीतल्या काही गोष्टी प्रेक्षकांना ' अवघड ' वाटतात का हे पाहायला हवे. परंतु, भाषेवर हुकुमत असलेला, चांगले, नाट्यमय संवाद लिहू शकणारा हा लेखक निव्वळ एकढ्याच गुणांमुळेसुध्दा आज महत्त्वाचा ठरावा. आणि जगताप तर याहीपलीकडे जाणारे एक चिंतनशील लेखक आहेत. त्यामूळे, त्यांच्या लेखनाबाबतची सध्याची परिस्थिती दुर्भाग्यपूर्ण वाटते. प्रायोगिक रंगभूमीवरही अशा एखाद्या कसदार लेखकाला जागा मिळणे अवघड जावे हा एक बिकट प्रश्न आहे.

या बाबतीत दिलीप जगतापांचे स्वत:चेही काही चिंतन चालू असेलच. नुसताच प्रेक्षकांना दोष देऊनही यातून मार्ग दिसणार नाही.या प्रश्नावर निश्चितपणे मात करण्याची गुणवत्ता असलेला हा लेखक आहे. असे काही घडण्याची निश्चितच आशा आणि उत्सुकता आहे. जगतापांचा एक समकालीन लेखक म्हणून आणि एक मित्र म्हणूनही माझ्या त्यांना मन:पूर्वक शुभेच्छा आहेत.

--००--००--

**अडकलेला ' श्वास '**

' श्वास ' या मराठी चित्रपटाला राष्ट्रीय सुवर्णकमळ मिळाले. आता हा चित्रपट ऑस्करलाही पाठवला जात आहे. मराठी चित्रपटाच्या क्षेत्रातली ही धक्कादायक वाटणारी घटना असल्याने या बाबतीत खूपच हलचल निर्माण झाली आहे. मराठी अस्मितेचा मानबिंदू असेही स्वरूप त्याला आलेले असून सार्वत्रिक उदोउदो आणि देणग्यांचा वर्षाव चालू आहे. सांस्कृतिक आकलनाच्या क्षेत्रातले नेतृत्व करणारेही या सगळया प्रकारात सामील झालेले दिसताहेत. एरवी पुरोगामी म्हणून प्रसिध्द असलेले तसेच प्रतिगामीपणाचा शिक्का बसलेलेही या चित्रपटाच्या बाबतीत एकत्र येत आहेत. चांगली कलाकृती ही

सगळे भेदाभेद ओलांडून प्रकाशमान होत असते असे म्हणतात, तसेच हे काही घडत आहे की काय अशी शंका यावी इतपत वातावरण सनसनाटी झालेले आहे.

हे सगळे ठीक आहे. तरीही सांस्कृतिक क्षेत्रात आकलनाचे अभिसरण होत राहण्याचे महत्त्व टिकणेच हिताचे आहे. कारण सांस्कृतिक प्रक्रिया ही तो चित्रपट पाहात असताना जे घडते त्यात असते, बक्षिसाच्या बातमीत नव्हे. त्या दृष्टीने या चित्रपटाच्या बाबतीत काही विचार मांडावेसे वाटतात. हा चित्रपट बऱ्याच जणांनी पाहिला आहे असे गृहीत धरून लिहीत आहे म्हणजे निवेदनावर जागा वाया जाणार नाही.

दुष्टाचा पाडाव दाखवणे, पारंपरिक नीतीमत्तेचा विजय दाखवणे, एखाद्या समाजसुधारणेची गरज सुचवणे किंवा एखादा आदर्श बोध देणे -- अशा प्रकारांतला हा चित्रपट नाही. यातला प्रॉब्लेम तसा हाताबाहेरचा आहे. साताठ वर्षांच्या एका मुलाचे कॅन्सरमुळे दोन्ही डोळयांचे ऑपरेशन करणे भाग आहे आणि त्यानंतर तो मुलगा आंधळा होणार आहे. तो मुलगा, त्याचे आजोबा आणि त्याचा मामा यांचे या ऑपरेशनसाठी कोकणातल्या एका खेड्यातून शहरात येणे आणि त्यांचे या उलघाल करणाऱ्या अनुभवातून जाणे हा या चित्रपटचा विषय आहे. त्यामुळे, या अनपेक्षितपणे कोसळलेल्या धक्कादायक संकटातून बाहेर पडता येणे किंवा त्यातल्या त्यात बऱ्या पध्दतीने हे संकट पेलता येणे हेच इथे महत्त्वाचे ठरते.

यांचे अज्ञान, दवाखाना, तपासण्या, हॉस्पिटल यांतले अनुभव वगैरे ठीक आहे. यातला क्लायमॅक्सचा भाग म्हणजे ऑपरेशन एक दिवस पुढे ढकलले जाणे, आजोबा आणि नातू यांचे बेपत्ता होणे, शोधाशोध आणि मग संध्याकाळी त्यांनी परत येणे हा आहे. हा मुलगा चोवीस तासांनी पूर्ण अंधारात जाणार आहे, तर जाताना त्याने औषधांचे वास, पेशंट, हॉस्पिटलचे वातावरण हे सगळे बरोबर घेऊन जायचे काय -- हा आजोबांचा प्रश्न. तसे होऊ नये म्हणून ते नातवाला शहरातून फिरवून आणतात. संतप्त डॉक्टरनाही हे पटते आणि ते म्हणतात की आता त्याच्या डोक्यात पाहिलेले हे सगळे ताजे आहे तोवर त्या रात्रीच त्याचे ऑपरेशन करून टाकू. त्याआधी त्याला स्पेशल खोलीत हलवावे आणि ती खोली फुलांनी, खेळण्यांनी सजवावी असेही ते सांगतात. नाहीतर पुन्हा, अंधारात जाण्यापूर्वीचा शेवटचा अनुभव हॉस्पिटलचाच असे व्हायचे ! इथे एक महत्त्वाचा प्रश्न येतो. अंधारात जाताना बरोबर काय घेऊन जायचे किंवा हे अमुक अमुक त्याला नंतर बघायला मिळू शकेल काय? -- हा विचार आजोबांच्या डोक्यातला आहे, नातवाच्या नव्हे. हाव आणि भीती मनात फिट्ट बसल्यावरच आपण म्हणतो की हा मोठा झाला -- बालक राहिला नाही. नातवाची तशी अवस्था नाही. तो बालकच आहे. त्याची अस्वस्थता, चिडचिड ही हॉस्पिटलचे वातावरण, गावच्या आठवणी अशा कारणांमुळे असू शकते. ती तशीच असणार याला शेवटच्या दृश्याने पुष्टीही मिळते. आता तो पूर्ण अंधारात गेलेला असूनही गावाचा किनारा जवळ येऊ लागल्याचे जाणवताच तो टाळया पिटू लागतो. याचा अर्थ आजोबांबरोबर फिरून येणे हा त्याला विरंगुळा होतो, अस्वस्थतेतून बाहेर पडण्याचे एखाद्या खेळण्यासारखे साधन होते. म्हणजे, हाव आणि भीतीयुक्त अशा आजोबांच्या

विचारांचे नातवाच्या मनावर आरोपण करायचा हा एक अत्याचारी प्रयत्न होता असे ठरते. डॉक्टर त्यावर कळस चढवतात. पण नातू अजाण असल्याने तो या अत्याचारातून बचावतो आणि शेवटी टाळया वाजवताना दिसतो. तरीही या चित्रपटाला मात्र आजोबांच्या आणि अर्थातच नंतर डॉक्टरनाही पटलेल्या विचारांचेच उदात्तीकरण करायचे आहे हे स्पष्ट आहे. आजोबांचे आणि नातवाचे विचार जणू एकच आहेत अशा आभासात हे सगळे हाताळलेले आहे. प्रेक्षकांनाही त्या मुलाबद्दल अनुकंपा वाटत असल्याने हे सहज स्वीकारले जाते. हे लक्षात घेता मग असेच म्हणावे लागते की आजोबांनी या संकटप्रक्रियेतून जाणे हाच या चित्रपटाचा मुख्य विषय आहे. त्या दृष्टीनेच चित्रपटाच्या आशयाकडे पाहायला हवे.

लहान मुलावर आलेल्या संकटाच्या नाजूक पार्श्वभूमीवर आजोबांच्या भावनिक क्रियाप्रतिक्रिया यांचा अनुभव देणे हे या चित्रपटाचे उद्दिष्ट ठरते. आजोबांच्या सगळया क्रियाप्रतिक्रिया अपेक्षित या अर्थाने सामान्य आहेत. अर्थातच, मोठ्या माणसाचे मन लहान मुलावर आरोपित करण्याचा त्यांचा सत्प्रवृत्त ( तरीही अत्याचारी ) प्रयत्न सोडून. नुसता काही भावनिक आंदोलनांचा अनुभव देण्याने एखादी कलाकृती मूल्यात्मकतेच्या स्तरावर जात नाही. अनुभवाच्या रचनेचे आकलनात्मक भान येणे हे मोठ्या कलाकृतीत अपेक्षित असते. तसे इथे घडत नाही. एका भावनिक मन:स्थितीचे उदात्तीकरण करायचा हेतू बाळगल्यामुळे असे घडते. अशा खुज्या हेतूंमुळेच कलाकृती खुज्या होत असतात. एखाद्या अपेक्षित अशा सामान्य भावस्थितीचे उदात्तीकरण करण्याचा सोस हा मराठी नाट्यचित्रपट सृष्टीचा बळावलेला कॅन्सर आहे. हा चित्रपटही त्याच लायनीतला -- त्यातच अडकलेला -- असल्याचे दुर्लक्षिले जाते ते परशुरामबद्दलच्या अनुकंपेमुळेच ! परशुराम हा या चित्रपटाचा मुख्य विषयच नाही हे लक्षात आल्यावर याचे आशयदारिद्र्य उघडे पडते.

इतरही काही प्रश्न आहेत :--

१. परशुरामला चारपाच फुटांवरचेही नीट दिसत नाही हे डॉक्टरी तपासणीच्या वेळी दाखवले आहे. मग त्याला शहर फिरवून दाखवले तरी त्याला कितपत काय बघता येणार होते? या सगळया नव्या गोष्टी नीट दिसत नसल्याने त्याला त्रास होणार नाही का? पण ठीक आहे. त्याचा वातावरणबदलाचा -- विरंगुळयाचा प्रश्न महत्त्वाचा होता असे म्हणून हे सोडून देता येईल.

२. ऑपरेशनपूर्वी, डॉक्टर, त्यांचे सहकारी इत्यादी सर्व तयारी झाल्यावर पेशंटला ऑपरेशन थिएटरकडे नेतात अशी पध्दत दिसते, पण इथे ठरल्या वेळी पेशंटला नेण्यात येते आणि ऑपरेशन थिएटरच्या दारावर निरोप मिळतो की आजचे ऑपरेशन उद्यापर्यंत पुढे ढकलले आहे !

३. आधीच्या एका दृश्यात ऑपरेशनच्या आदल्या रात्री बारानंतर पाणीही द्यायचे नाही असे नर्स सांगते. (ॲनेस्थेशियामुळे शरीर शिथिल होत असते, त्यामुळे ऑपरेशनच्या वेळी उलटी होणे, ती श्वास नलिकेत जाणे वगैरे कॉम्प्लिकेशन्स होऊ नयेत हा त्यातला हेतू असतो असे समजते.) संध्याकाळी आजोबा परशुरामला घेऊन परत येतात

आणि डॉक्टरांबरोबरचे त्यांचे सगळे संवाद होतात तेव्हा डॉक्टर त्याचे ऑपरेशन लगेचच त्याच रात्री करायचे ठरवतात ! त्याआधी आजोबा--नातू मसालेडोसा वगैरे खाताना दाखवलेले आहेत !

४. आजोबा--नातू बेपत्ता झाल्याचे कळल्यावर डॉक्टर त्यांचे सर्व लटांबर घेऊन वॉर्डात येतात, तिथे नवीन काहीच माहिती मिळत नाही, त्यामुळे डॉक्टरांचे स्मार्ट वागणे जरा फुटकळच दिसते.

५. आजोबा आणि समाजसेविका यांच्या एका प्रसंगात ' डोळे मिटून चार पावलं चालून दाखवा ' अशा अर्थाचे आजोबांनी बोलणे आणि ' थोडा सराव करून चालून दाखवलं तर चालेल? ' -- असे तिने म्हणणे हे मूळ प्रश्नाच्या गांभीर्याच्या मानाने उथळ दिसते.

६. ऑपरेशनबाबतचा निर्णय पालकांनीच घ्यायचा आहे हे आधी ठसवलेले असूनही पेशंटला याची माहिती दिली पाहिजे या अटीचा एक घोळ घातला आहे. इथेही मोठ्या माणसाच्या मनात येणारी भीती त्या लहान मुलाच्या मनात भरून मग त्याचा होकार मिळवायचा आहे की काय? त्याची कुठे सही घेतलेली दिसली नाही हे एक बरे आहे. त्यातही, पेशंटला माहिती देण्यासाठी डॉक्टरच्या मदतीवर अडून बसणे, आंधळी कोशिंबीर, इत्यादी जरा घोळवत ठेवणेच दिसते.

७. परशुराम शेवटी टाळया पिटताना दिसतो त्यावरून या चित्रपटाला ज्या गोष्टीचे उदात्तीकरण करायचे होते ती गोष्ट परशुरामच्या बाबतीत यशस्वी न झाल्याचे पाहून दिलासा मिळतो आणि शेवट दुप्पट चांगला होतो ! हे या चित्रपटाचे यश की अपयश?

-- हे सगळे विचारात घेता, आपण हुरळून चाललोय काय हे पाहायला हवे. समाजाची सांस्कृतिक अवस्थाच कलेचा कस ठरवते असे बोलले जाते. खरे तर, चांगली कलकृती ही समाजाच्या मर्यादा पार करणारीच असते. जगण्यातल्या प्रश्नांचे आकलन पेलण्याचे आव्हान हे कुठलाही चांगला कलावंत समाजाच्या पाठिंब्यावर घेत नसतो. पण ऑस्करला जाण्यासाठी मात्र समाजाच्या पाठिंब्याची गरज पडते हे खरे आहे.

--o--o--o--

**धूसर**

-- चं. प्र. देशपांडे.

मानवी संबंध हे कलाक्षेत्रातले मोठे आणि महत्त्वाचे आव्हान असते, हे पुन्हा एकदा अधोरेखित करणारा, कोणत्याही प्रबोधनाचा आव न आणणारा, गंभीर विषयावरचा म्हणजेच विनोदी नसलेला, एक साधा, छान

चित्रपट मराठीत सादर केल्याबद्दल प्रथमत: अमोल पालेकर आणि संध्या गोखले यांचे अभिनंदन केले पाहिजे. विनोदी नसलेला, दीड तासाचा, तारुण्याचे प्रदर्शन नसलेला असा हा चित्रपट, मराठी प्रेक्षकांच्या अभिरुचीत थोडा बदल घडवण्याची शक्यता

असल्याने त्यासाठीही या चित्रपटाचे स्वागत करणे योग्य ठरेल. यासाठी, या चित्रपटाने, ' डोक्याला त्रास नको ' ही मराठी प्रेक्षकांची मूलभूत अपेक्षा पाळण्याचाही प्रयत्न केलेला आहे. विचार करावा लागेल, समजून घेत राहावे लागेल, असे

काही फारसे चित्रपटात येऊ नये, हेही पाहण्यात आलेले आहे. गंभीर असणे, विषयाला पुरेशा अशा दीड तासाचाच असणे,

आक्रमक गाण्यांचा मारा नसणे, सामाजिक प्रबोधन नसणे, आणि मानवी संबंध, निसर्ग आणि सुंदर छायाचित्रण यांवर चित्रपट पेलण्याचे धाडस करणे, या गोष्टींना गुण म्हणावे की अवगुण म्हणावे, हे, दर्जा आणि धंदा यांचे मराठीतले अति-व्यस्त प्रमाण पाहता, सांगणे अवघड आहे. हा चित्रपट यशस्वी ठरण्याने एखादा साधा, छान चित्रपटही मराठी प्रेक्षक पाहू शकतात, हे सिद्ध होईल आणि अनेकांच्या अनेक प्रकारच्या सर्जक चित्रनिर्मितीला ऊर्जा मिळू शकेल असे वाटते.

या चित्रपटातल्या जमेच्या बाजू अशा आहेत : -- (१) उत्कृष्ट छायाचित्रण. एकूणच निसर्ग, विशेषत: समुद्रदृश्ये अप्रतिम. (२) सगळयांचाच, विशेषत: रीमा लागू यांचा अप्रतिम अभिनय. (३) एकूण कथानक पटत जावे याची ' बऱ्यापैकी ' घेतलेली काळजी. (४) संयत प्रकारचे आणि ढोबळपणा टाळणारे दिग्दर्शन. (५) साधे, ओघवते संवाद.

अशा या सौम्य आणि सकारात्मक पार्श्वभूमीवर या चित्रपटाच्या उणीवांची चर्चा करावी का, हा एक प्रश्नच आहे. पण जाणवणारे मुद्दे नोंदवणेही आपसातील संपर्कांच्या दृष्टीने उपकारकच असल्याने, तेही काही मांडत आहे.

याच चित्रपटात अशा अर्थाचे एक वाक्य आहे की कॅमेऱ्याने काढलेल्या फोटोत वास्तव येते पण सत्य येत नाही. वास्तव हे एखादा आयाम पकडते पण सत्य बहुआयामी असते, या अर्थाचेच हे वाक्य आहे. ते या चित्रपटालाही लागू

पडते. हा चित्रपट एकरेषीय कथा सांगणारा, घटना वा निष्कर्ष सांगणारा, प्रक्रियेला स्पर्श न करणारा, असा आहे. याचे बहुआयामित्व हे वास्तवातल्या तपशीलांचे आहे. हा चित्रपट ' स्मृतिभ्रंश '  या रोगाबद्दल आहे, आईला झालेल्या या रोगामुळे मुलीच्या येणाऱ्या दु:खाच्या प्रतिक्रियांचा आहे, ' परक्या ' माणसाच्या हृदयपरिवर्तनाबद्दल आहे आणि तो परका माणूस घरचा होण्याबद्दलही आहे -- अशा प्रकारचे घटनारूप वास्तव इथे आहे. यांतल्या कोणत्याच प्रक्रियेला चित्रपट फारसा स्पर्श करत नाही. स्मृतिभ्रंशाची रोगी व्यक्ती कणाकणाने मरत असतेच पण तिच्या जवळच्या नात्यातल्या व्यक्तीचाही काही प्रमाणात तो मृत्यूच असतो. मुलीच्या दु:खाच्या, करुणेच्या वगैरे प्रतिक्रिया दिसतात पण आपल्या

आईच्या जगण्यातल्या आपल्या स्मृती नष्ट होत जाण्याच्या रूपातला तिचा स्वत:चाही तो मृत्यू असतो, हा तिचा मानसिक प्रश्न अस्पर्शित राहतो. अर्जुन हा त्याच्या प्रेयसीसह मुळात वाईट हेतूने या घरात शिरकाव करून घेतलेला माणूस पण त्याचे

नुसते हृदयपरिवर्तनच होत नाही तर अत्यंत सद्‌गदित होऊन तो सुहासिनीची सेवा करत राहायचे ठरवतो. तो एक ' वाया गेलेला ' माणूस होता आणि आता त्याच्या जीवनाला हेतू मिळाला, असे तो म्हणतो. त्याची प्रेयसी वाईट वागते तेव्हा त्याला ते चुकीचे असल्याचा साक्षात्कार घडतो. हे सगळे घटनात्मक पद्धतीने येते, त्यामुळे हे कसेही घडवता आले असते, असे वाटते. त्यातली अपरिहार्यता जाणवत नाही. परदेशात मुलीचा प्रियकर आहे, त्या संबंधाचा नोकरीसह त्याग करून ती

इथेच राहायचे ठरवते. एकूणात हे सगळे पाहता, हा चित्रपट त्या मुलीवर फोकस व्हायला हवा होता, असे वाटते. म्हणजे या सगळयाच प्रश्नांचा गोंधळ एका ठिकाणी केंद्रित झाला असता आणि अधिक खोलात जाता आले असते. पण एक तर तो हेतूच नसावा किंवा चित्रपटाच्या प्रेक्षकांचे मानसिक वय सुमारे बारा वर्षे धरावे, हा दंडक इथेही मान्य केला गेला असावा. चित्रपट गंभीर विषयावरचा असला तरी तो आपल्या प्रेक्षकांच्या गळी उतरवायचाही प्रयत्न केला पाहिजे, याची जाणीव दिसते. अत्युत्तम निसर्गदृश्ये, एका पॉप गाण्यासह गाणी, आणि हळूहळू चित्रपट अशा शेवटाकडे नेणे की ' आता काळजी नाही, ही दोघे तिची काळजी घेणार आहेत ' असा इथे होऊ शकणारा ' त्यातल्या त्यात सुखांत ' घडवणे, यांवरून हे लक्षात यावे.

आता या चित्रपटाच्या एका पायाभूत वास्तवाकडेही पाहिले पाहिजे. ते म्हणजे मुलगी दोन वर्षे परदेशात असणे आणि तिचा तिच्या आईशी संपर्क होऊ शकलेला नसणे. ती इथेच राहात असती तरी तिच्या प्रतिक्रिया अशाच आल्या असत्या पण एका परक्या माणसाचा गृहप्रवेश ही अचाट कल्पना राबवायची असल्याने मुलगी इथे असून चालणारे नाही. त्या गावात यांना ओळखणारी आणखी काही कुटुंबे असू शकतील, भारतात इतरत्र काही नातेवाईक असू शकतील, ती मुलगी बऱ्यापैकी शिकलेली दिसते तर तिच्या काही मित्रमैत्रिणी असू शकतील, तिच्या अमेरिकेतल्या मित्रमैत्रिणींचे कुणी जवळपास असू शकेल, अशा काहीही शक्यता लक्षात न घेता, आईने फोन काढून टाकला म्हणून संपर्क तुटला, असे ' ऐच्छिक अविश्वासस्थगिती ' या तत्त्वात घ्यावे लागते. थोड्याफार कलात्मक सवलती द्यायला प्रेक्षक तयारही असतात पण त्यांचा उपयोग करून काय साधले जाते आहे, हेही पाहिले पाहिजे. परका मनुष्य घरात घुसवून कथा थोडीफार वाढवायची संधी घेणे एवढेच यातून साध्य होत असेल तर ते फारसे अर्थपूर्ण ठरत नाही. आधी, या रोगावर चित्रपट काढायचा, असे ठरले असावे आणि त्याची डॉक्युमेंटरी होता कामा नये, यासाठी ही कथा विणली गेली असावी, असे दिसते. अर्जुन आणि त्याच्या प्रेयसीने घरात घुसणे, अर्जुनने बाहेर स्वत:च्या नावाची पाटी लावणे, यांचे काय उद्योग आहेत, हे कुणालाही माहीत नसणे, हेही सगळे धकून नेलेले आहे. प्रेक्षकांच्या दृष्टीने, चला, बिचारीकडे लक्ष तरी दिले जाते आहे ना, हे बरे आहे, या सहानुभूतीच्या खात्यात याकडे दुर्लक्ष केले जाते. यांचे चालते कसे बाबा तर अर्जुन हॉटेलात

गाणी म्हणतो किंवा मध्यंतरी  त्याने कॉलसेंटरवर नोकरी केली, असे सांगितले जाते. तो हॉटेलात गाणी म्हणत असल्याने एक आत्ताचे उसळते गाणेही चित्रपटात टाकता आलेले असून त्याने बाहेर त्याच्या नावाची पाटी लावल्याने, पुरुषाचे नाव पाहून अवांतर लोकांपासून सुहासिनीला आपोआप प्रोटेक्शन मिळणे, अशा गोष्टीही कथा विणता विणता साध्य झालेल्या आहेत. एकूणात पटणेबल कथा विणत जाणे आणि तिला लाईफटचेस देत जाणे, अशी ही प्रक्रिया दिसते. शेवटी, चला, आता काळजी नाही, या समाधानात प्रेक्षक घरी जातात.

अमुक एका विषयावर चित्रपट असणे, हे हल्ली जरा वाढलेलेच दिसते. निव्वळ एखाद्या सामाजिक विषयावर आहे म्हणून जसा एखादा चित्रपट ग्रेट ठरत नाही, तसेच रोगांचेही आहे. कॅन्सर, एड्स, स्किझोफ्रेनिया किंवा आता हा स्मृतिभ्रंश असा विषय घेतला म्हणून चित्रपट मौल्यवान ठरू शकतो का ? हल्ली, उदाहरणार्थ, अशी एक ठाम प्रणाली मांडली जाते की मध्यमवर्गीय जीवनात अनुभवाच्या फारशा शक्यताच नसल्याने त्या प्रकारच्या जीवनाचे क्षेत्र हाताळणारी कलाकृती महत्त्वाची असू शकत नाही. म्हणजे अनुभवाचे क्षेत्र कोणते, समस्या कोणत्या, पात्रे कोणती यांवर कला कमीअधिक मौल्यवान ठरते, अशी ही समजूत आहे. आपल्या लोकांना महायुद्धांचे अनुभव नाहीत म्हणून आपल्या कलाकृती निकृष्ट निपजतात, असे म्हणण्यासारखेच हे आहे. मटेरियल कोणते घेतलेले आहे यावर कलेचे मूल्य ठरते, या भ्रमातून बाहेर पडल्याशिवाय इथे ग्रेट म्हणावी अशी कलाकृती निर्माणच होऊ शकणार नाही, हे या निमित्ताने आपण लक्षात घेतले पाहिजे. तुकारामाचे अभंग कशामुळे ग्रेट आहेत ? कोणत्या मटेरियलमुळे ? की मटेरियल कोणतेही असले तरी मानवी जगण्याबाबतची इनसाईट अशी काही असते ? जी मटेरियलनिरपेक्ष असते ? तसे नसेल तर एकूण निरीक्षण करून, जगातल्या सर्वोत्तम कलाकृती या फक्त फ्रान्स या देशातूनच येणे शक्य आहे, असे काहीतरी निष्पन्न होऊ शकले असते.

इथे, साहजिकच, मग, इनसाईट म्हणजे काय, हा प्रश्न समोर येतो. इनसाईट ही अमुक एक प्रकारच्या मटेरियलमधूनच व्यक्त होते, असे काही नाही. नुसती घटनानुक्रम देणारी, थोडीफार पटणारी, एकरेषीय कथा म्हणजेही इनसाईट नव्हे. जगण्याच्या प्रक्रियेचे अंतर्बाह्य भान म्हणजे इनसाईट. हे भान मटेरियलवर अवलंबून नसते. पण ते व्यक्त होते ते कलावंताने निवडलेल्या आणि ते भान व्यक्त करणेच महत्त्वाचे आहे, या जाणीवेने त्याने कुशलतेने हाताळलेल्या मटेरियलमधूनच, हे खरे आहे. ते भान माणसाला परिपक्वता बहाल करते. नुसता सवयीतल्या सुखदु:खाचा पुन्हा एकदा अनुभव देणे, यासाठी ग्रेट कलाकृती जन्माला येत नसते. असा ग्रेटनेस नाही पण नुसताच करमणुकीचा मसाला, असेही म्हणता येणार नाही, अशा कलाकृतीला, म्हणूनच, तुलनेने, त्यातल्या त्यात चांगली, हे लक्षात घेऊन, वाखाणणे घडते. ’ धूसर ’ ला वाखाणणे हे तसे आहे.

---  ०००  ---

**१७ मे २०१७ नंतर इथे घेतलेला वाढीव मजकूर**

March 30, 2014 at 3:14pm

## सत्य

खरे तर कार्यक्रम संपला होता.

तेवढ्यात एक सामान्य गरीब माणूस हीरोपुढे आला आणि त्याने त्याचा उजवा हात पुढे केला. " बांधा तो तिरंगी दोऱ्यांचा गंडा ! " म्हणाला.

हीरोला मौज वाटली. निघालेले लोक पुन्हा खाली बसले. हीरोने स्मित करत त्या माणसाला गंडा बांधला.

" मी शप्पथ खातो ", तो गरीब माणूस म्हणाला, " मी दागी माणसाला मत देणार नाही आणि पैसे घेऊन मत देणार नाही ! "

टाळ्यांचा कडकडाट झाला !

" आता आणखी एक गंडा द्या ", तो म्हणाला, " आणि तुमचा हात पुढे करा -- "

हीरोने सस्मित तसे केले.

" आता तुम्हीपण खा शप्पथ, " तो म्हणाला, " ज्या फिल्म इंडस्ट्रीत काळ्या पैशाचा आणि अंडरवर्ल्डचा इतका प्रभाव आहे, तिथे माझी बुद्धी आणि कला विकून मी पैसे कमावणार नाही ! " यावर हीरो जरा चपापला पण ते दिसू न देता त्याने तशी शप्पथ खाल्ली ! पुन्हा टाळ्या कडाडल्या !

क्षणभर दोघांनीही एकमेकांकडे पाहिले आणि मग ते एकदम मोठ्यांदा हसत सुटले ! हेही काहीतरी चांगलेच असावे असे समजून लोकांनी पुन्हा टाळ्या वाजवल्या ! लोकांच्याही चेहऱ्यांवर हसू आले !

" मी सांगतो, आपण का हसलो ते ", तो गरीब माणूस म्हणाला, " आपण जातिवंत भारतीय आहोत, शप्पथ मोडणे, ये तो अपने बाये हाथका खेल है -- और गंडा तो दाये हाथमें बांधा है ! " इथे मात्र सगळे मनापासून हसले आणि सगळ्यांनी हसत जोरात टाळ्या वाजवल्या !

" पण मघाशी आपल्या डोळ्यांत आलेले अश्रू ऍक्टिंगचे -- खोटे नव्हते हं ! " -- हीरो म्हणाला.

" अजिबात नाही, ते सत्यच होते ! " तो गरीब माणूस उत्तरला ! पुन्हा टाळ्या वाजल्या !

तोवर मिस्ड कॉल्स आणि देणग्या यांची रीघ लागली होती !

--- ००० ---

March 28, 2014 at 10:07am

## थिय्याम यांचे नाटक

१. मी -- व्यावसायिक, विनोदी, नुसत्या क्रिया-प्रतिक्रिया म्हणजेच जगणे असे समजणाऱ्या, निव्वळ करमणूक प्रधान नाटकांनाही – हे सोपे नाही, ते अप्रतिम आहे, काय अभिनय आहे – अशा तुकडेबाज कारणांनी ' चांगले ' – ' ग्रेट ' म्हणत असेन तर तशाच कारणाने मी थिय्याम यांच्या नाटकाला ग्रेट का म्हणत नाही ? – एक तर श्रीखंड खाण्याची मर्यादा लौकर संपते म्हणून असेल किंवा थिय्यामना वाईट म्हटल्याने इथले माझे सर्कल फारसे विचलित होणार नाही, हे समजत असल्यानेही असेल. एकीकडे आपल्याला ' मी सर्व चांगल्या गोष्टींचे कौतुक करणारा आहे ' अशी आपली प्रतिमा सादर करायची आहे आणि दुसरीकडे – तसेच, सोपे नसलेले, बिनचूक सादर होणारे थिय्याम यांचे नाटक आवडले नाही, असे म्हणून स्पष्टवक्तेपणाही दाखवायचा आहे !

२. त्यांच्या कौशल्याचे आपण कौतुकही करू पण कलाकृती म्हणून हे काहीतरी प्रचंड मौल्यवान सादर होते आहे, असा जो एक माहोल, भ्रम पसरवला जातो, त्यामुळे आपली प्रतिक्रिया जरा तीव्र येते. ' हेच अंतिम ' असे म्हटले जाऊ लागल्याने आपले मूल्यभान जागे होते आणि आपण या वेळी तुकड्यांचे महत्त्व मानणे नाकारतो.

३. आशयप्रधान कलाकृती असेल तर तंत्राचा बडेजाव अडथळा ठरतोच. एखादा गायक ख्याल गात असताना तबलजी आणि पेटीवाला यांनीच खूप करामती चालू केल्या तर ते विसंगतच होते. याचाच अर्थ थिय्याम आशयाला फारसे महत्त्व देत नाहीत, असा होतो. त्यांना झगमगाट आणि दृश्यात्मक भव्यता यांचेच आकर्षण असावे. त्यामुळेच त्यांना पौराणिक, ऐतिहासिक, राजेरजवाड्यांची पोषाखी, श्रीमंती नाटकेच आकर्षित करतात.

४. तंत्राने स्तिमित करणे, चकित करणे – हे कलेतले तसे मर्यादित उद्दिष्ट आहे.

५. अशा नाटकात अभिनयाला फारसे स्थान नाही. अभिनय क्षेत्रात असलेल्या काही व्यक्ती अत्यंत चिंतनशील आणि जगण्याची अत्युच्च समज व्यक्त करणाऱ्या असतात. अशा व्यक्ती एखाद्या नाटकाला फार मोठी देन देतात. थिय्याम यांच्या नाटकात हे तत्त्व वगळले जाते. हे नाट्यमाध्यमाचे मोठे नुकसान आहे.

६. जगण्यातले प्रश्न समजून घेण्यातले इंटरेस्टच लोप पावत चालल्याने, कलेत, आता पॉलिश आणि मार्केटिंग यांनाच महत्त्व येणे अपरिहार्य झाले असावे.

मी थिय्याम यांचे ‘ मॅक्बेथ ‘ पाहिले – मला ते मुळीच आवडले नाही !

--- ००० ---

## अलिबाबा आणि चाळिशीतले चोर

December 30, 2013 at 6:57pm

काल ‘ अलिबाबा आणि चाळिशीतले चोर ‘ हे डॉ. विवेक बेळे लिखित आणि अजित भुरे दिग्दर्शित एक धमाल-मस्त नाटक पाहिले ! मी एका खेड्यात होतो नोकरीनिमित्त, तिथल्या टेलर दुकानाचे नाव होते ‘ दिलखुश ‘ टेलर्स ! ते नाव आठवले ! कारण मी दिलखुश झालो ! इंटेलिजेंट संवादांचा बहारदार तडका ! या नाटकाचे निर्माते आहेत अजित भुरे ( माझ्या‘ ढोलताशे ‘ या नाटकाचा नायक साकारणारा ) आणि महेश मांजरेकर. ‘ ढोलताशे ‘ तली आणखी एक भूमिका करणारा विद्याधर जोशी माझा जुना मित्र. खरे तर त्याच्यासाठीच मी या नाटकाला गेलो ! त्याचा यातला अभिनय तर अप्रतिम आहेच, शिवाय माझा मित्र आनंद इंगळे ( ज्याच्या एका टीव्ही कार्यक्रमात मी सहभागी झालो होतो ), राजन भिसे ( माझ्या ‘ दिनकर पुरोहितचा खून ‘ या टीव्हीवर झालेल्या नाटकात एक महत्त्वाची भूमिका करणारा ), आणि सीमा देशमुख ( माझ्या ‘ डावेदार ‘ या नाटकात जिने एक महत्त्वाची भूमिका केली ) यांनीही यात सिक्सर्स आणि फोर्स मारण्याची जबाबदारी सहज पार पाडलेली आहे ! बाकीचे कलाकार माझ्या नीट माहितीतले नसले तरी त्यांनीही तोडीस तोड धमाल उडवलेली आहे ! अर्थात, हे सगळे ज्या शाळेचे खेळ दाखवतात त्या शाळेचे मुख्याध्यापक ( दिग्दर्शक ) अजित भुरे आहेत, हा मुद्दा अधोरेखितच करायला हवा ! नेपथ्यकार काय जादू करू शकतो, ते, यातले प्रदीप मुळ्यांचे नेपथ्य पाहून कळू शकेल ! सर्व दृष्टींनी अप्रतिम निर्मिती ! विषय म्हणाल तर माझ्या ‘ बुद्धिबळआणि झब्बू ‘ या नाटकात होता तोच काहीसा ! स्त्री-पुरुष संबंधांतले भूमिगत प्रवाह ! लाजवाब सादरीकरण ! जबरदस्त गर्दी खेचणारे नाटक ! इतक्या मोठ्या संखेने आलेला प्रेक्षकसमूह, हे असे सणसणीत संवाद डोक्यावर घेतो, हे पाहून, एक लेखक या नात्याने मला फारच आनंद झाला ! फक्त एक थोडे न्यून वाटले, तेही सांगतो. तीन जोडपी आणि एक अविवाहित पुरुष –असे हे मित्रमैत्रिणी – भूमिगत आकर्षणांचे खेळ खेळणारे. सगळ्यांना असे काही घडत असावे,असे संशय आहेतच. तरीही त्यांची मैत्री शाबूत आहे, हे जरा पटले नाही. पण लेखकाला प्रश्न पडला असावा की एवढा दोष पत्करला नाही तर एकत्र आणणार कसे हे नमूने ? जनरली मित्रामित्रांत इतकी लाईनबाजी होत नाही, असे माझे निरीक्षण सांगते. ओपन मॅरेजच्या कल्पनेतसुद्धा – पती व पत्नी  विवाहबाह्य संबंध ठेवू शकतात पण त्या त्या व्यक्ती वैवाहिक जोडीदाराच्या ओळखीच्या वा माहितीच्या असता कामा नयेत, अशी अट असते. पण नाटक इतके मजेदार आहे की प्रेक्षक ही शंका सोडून द्यायला तयार होतात ! सर्व तांत्रिक अंगेही नाटकाची मजा वाढवणारी – छान आहेत ! भरपूर करमणुकीचे आणि मुख्य म्हणजे ‘ आज ‘ चे नाटक !

--- 000 ---

October 23, 2013 at 10:33am

## धादांत खैरलांजी

काल या नाटकाचा प्रयोग पाहिला.

"त्या भोसडीच्याची अशा ठिकाणी बदलीची ऑर्डर काढा की शनिवार-रविवार घरी जाण्यायेण्यासाठी त्याचे किमान दहा दहा तास गेले पाहिजेत ! " – वरच्या साहेबाला दुखवणाऱ्या कोणत्याही कर्मचाऱ्याबाबत हे होऊ शकते. अर्थात दुखवणाऱ्या त्या व्यक्तीची ताकद जोखून ! बऱ्यापैकी ताकद असेल तर साहेब शेपूट घालून गप्प बसू शकतो ! हे फक्त दलितांबद्दलच होते असे नाही आणि आता दलितांकडे ताकद नाही, असेही कुणी समजत नाही. हे या नाटकातल्या इतिहासाच्या दलित प्राध्यापिका वैशाली यांना दिला जाणारा त्रास पाहून वाटते. हा अन्याय आणि खैरलांजीतला अन्याय-अत्याचार यांची समांतर मांडणी करणारे ' धादांत खैरलांजी ' हे नाटक. प्रा. प्रज्ञा दया पवार या कवयित्रीचा पहिलाच नाटक-प्रयत्न. ' खैरलांजी ' इथे मुख्यतः वैचारिक संदर्भ म्हणून येत राहते पण नाटक शहरी वातावरणातच घडत राहते. त्या प्राध्यापिकेला छळण्यासाठी तिच्या चारित्र्यावर हल्ला करत तिच्या, तिच्या विद्यार्थ्याशी असणाऱ्या लफड्याबद्दल उठवलेली अफवा, त्यामुळे त्या मुलाच्या वाग्दत्त वधूच्या घरी प्रॉब्लेम होणे, तिला मानसोपचार घ्यावे लागणे – हा या नाटकातला भाग मला महत्त्वाचा वाटला – एकरेषीय कथा सांगण्यापेक्षा जगणे सामावून घेणारा वाटला. पण नाटकाचा हेतू – दलितांवरचे अन्याय प्रोजेक्ट करणे आणि जाति-अंताचे ध्येय व्यक्त करणे – हा ठरलेला असल्याने त्याच दिशेने नाटक जाते. या नाटकात " आंबेडकरी चळवळीतले पुरुष असतात का स्त्रियांबद्दल लिबरल ? " हा टोमणा खूप अर्थपूर्ण आहे. मी अन्याय भोगत असलो तरी मी अन्याय करतही असतो – इकडे लेखिका लक्ष वेधते. पण नाटकाचे उद्दिष्ट ठरलेले असल्याने,हे असे फक्त जाता जाता ( काहीशा कौतुकाने ? ) येते. प्राध्यापिकेसाठी एका पुढाऱ्याने फोन केल्यावर तिचे सस्पेन्शन मागे घेतले जाणे, हे तिला स्वतःला व्यथित करते – हाही एक वेगळा पीळ या नाटकात दिसतो – आदर्श बाळगायचे पण प्रसंगी सोडायचेही आणि त्याची खंतही करायची ! हा अंतर्विरोध जाता जाता दाखवणे, हे प्रज्ञा पवार ही एक प्रगल्भ लेखिका असल्याचे दर्शवते. नाटकातले काही संवाद उथळ – ठिगळासारखे वाटले – उदा पोस्टमॉडर्निझमचा उल्लेख असलेला संवाद. ते जरा ठाकठीक करायला हवेत. सगळ्यांनी आपापल्या भूमिका नीट केल्या, दिग्दर्शनही समजून केलेले होते. इतर कलाकार माझ्या माहितीतले नाहीत, पण मी नोकरीत असताना अनेक वर्षे माझा सहकारी असलेला श्रीकांत सागर यात सिनेनिर्माता आनंद याची भूमिका करतो – उत्तम ! आवश्यक ते बारकावे सहज व्यक्त करणारा अनुभवी अभिनेता ! मला प्रज्ञा पवारांचा हा एक महत्त्वाचा प्रयत्न वाटला आणि भविष्यात त्या खूपच गुंतागुंतीचे आशय आवाक्यात घेऊ शकतील, हा विश्वास वाटला. एकूण टीमचे अभिनंदन ! पण एक प्रश्न – प्रेक्षागृहात समाजवादी खूप होते !

अथर्वशीर्ष महत्त्वाचे वाटणाऱ्यांनी दगडूशेठपुढे त्याचे पाठ करायला जमावे, अशी ही आपल्या कलाक्षेत्रातली कंपूबाजी कधी संपणार ?

--- ००० ---

Monday, January 16, 2012 at 1:01pm

## चाफा

कै. चिं. त्र्यं. खानोलकर यांच्या कथेवर आधारित ' चाफा ' हा अभिवाचन / नाट्यप्रयोग काल पाहिला. अत्युत्कृष्ट कलाकृती पाहिल्याचे समाधान मिळाले. ऋषिकेश पेटवे यांनी संहिता लेखन केलेले असून सचिन जोशी यांचे दिग्दर्शन आहे. महाराष्ट्र कल्चरल सेंटर, पुणे यांची ही एक उल्लेखनीय कृती ठरावी. तंत्राचा फार बडेजाव नाही, कलाकृतीचा सखोल विचार करणारे संयत सादरीकरण, सर्वांचा, विशेषतः चंद्रशेखर कुलकर्णी यांचा प्रमुख भूमिकेतला खूप बारकावे व्यक्त करणारा परिपक्व अभिनय, संगीत, प्रकाशयोजना आणि अर्थातच एकूण प्रवाहात विरघळून गेलेले अभिवाचन – सगळेच कलाकृती समजून सादर होत असल्याचे निदर्शक. ( प्रवेशद्वारावर प्रेक्षकांना अत्तर लावण्याची कल्पना मात्र याच्याशी विसंगत वाटली. ) एक तर अराजक व्यक्त करा नाही तर परिवर्तनाच्या अंगाने तरी जा, अशा या काळात जगण्याचे सर्वांगीण भान देणारी अशी अपवादात्मक कलाकृती पाहून धन्य झाल्यासारखे वाटले. थंडी, अंधार, साप, रस्ते, चाफा, कंदील, वेगवेगळ्या मानसिक रचनांत अडकलेली माणसे – हे सगळे खानोलकरांनी उभे केलेले जग म्हटले तर साधे, म्हटले तर निरुपायी जगण्याचे सखोल भान देणारे आहे. ' अनुभव असा काही नसतोच ' हे विष्णूने उद्वेगाने उच्चारलेले वाक्य सत्य तर नसेल, या प्रश्नाच्या अध्यात्मिक उंचीला जाऊन भिडणे, ही साधी गोष्ट नाही. खानोलकरांच्या लेखनातल्या या उत्तुंग वैशिष्ट्याकडे आपले या कलाकृतीच्या निमित्ताने लक्ष गेले तर मराठीतली ही एक महत्त्वाची सांस्कृतिक घटना ठरेल.

--- ००० ---

Saturday, March 5, 2011 at 9:33am •

## जत्रेतलं जायंट व्हील.

हिमांशू स्मार्त लिखित आणि प्रवीण भोळे दिग्दर्शित हे नाटक काल दि. ०३-०३-११ रोजी पुण्यात सुदर्शनला पाहिले. " प्रत्येक प्रेक्षकाला दिसलेले आणि जाणवलेले नाटक वेगळे असेल कारण प्रत्येकाचा दृष्टिकोन मुळात वेगवेगळा असतो " या उत्तरआधुनिक धारणेतून सादर केलेले हे नाटक. आजची झगमगती स्वप्ने, मॉलसंस्कृती आणि जगण्यातले अनेक विरोधाभास  हा आशय व्यक्त करणारे हे नाटक. ' रंगीबेरंगी, चमत्कारांनी भरलेलं, स्वीट आणि हॉटही ' असे हे ' द व्होल

न्यू वर्ल्ड ' आहे, असे परिचय-पत्रकात म्हटले आहे. हा आशय नाटकातून व्यक्त होतोच. उत्तरआधुनिक धारणांमध्ये, एक कौशल्यपूर्ण मांडणी एवढेच दाखवायचे असते. याला ' उथळ, बाळबोध, प्रगल्भ, सखोल ' वगैरे म्हणणाऱ्याला हे ' बावळट ' म्हणणार. मूल्यमापन शक्यही नसते आणि कुणी केलेच तर ते निरर्थक असते, अशी ही मान्यता असते. त्यामुळे, ' अनुभव देण्याचा प्रयत्न करतो ' एवढाच, म्हटला तर, हेतू असतो. मला यात जरा घोळ जाणवला. हिमांशू स्मार्त हा अलिकडच्या काळातला एक चांगला लेखक आहे. ' रिसायकल करता येतील अशी स्वतःची रिफ्लेक्शन्स ' असले अचाट सुचणारा हा लेखक आहे. मधेमधे त्याची चिंतनशीलताही जाणवते. तरीही, या दृष्टीने पाहता, या नाटकात लेखक कमी आणि पर्फॉर्मन्स जास्त असेच अनुभवाला आले. हिमांशूचे काही संवाद अशा थिएट्रिकल पर्फॉर्मन्सशिवाय पोचलेही नसते. पण, उत्तर-आधुनिक व्हायला तुम्हाला कोण ' भरीला पाडतेय ' ? की काही लेखकांमधला हा आंतरविरोध असू शकेल ? हे नाटक पाहताना माझ्याबरोबर प्रा. विजय कारेकर होते. त्यांनाही असाच प्रश्न पडला होता की हे अनुभव देतायत की त्यावर टीका, उपरोध व्यक्त करतायत ? थिअरी नको म्हणत उत्तरआधुनिक हीच थिअरी करून स्वीकारणे असे तर हे होत नाहीय ना ? मला असे वाटले की याच आंतरविरोधाचे आकलन व्यक्त करणारे नाटक हिमांशूने लिहावे !

बाकी या गोंधळासहही नाटक चांगले आहे, प्रयोग उत्तम होतो.

--- ००० ---

## लालबाग परळ

Tuesday, January 25, 2011 at 1:21pm •

' लालबाग परळ ' हा चित्रपट परवा बघितला. जयंत पवारांच्या ' अधांतर ' या नाटकावर आधारित हा चित्रपट आहे.

१. गिरणीकामगारांवर झालेल्या अन्यायाबाबतच्या या चित्रपटाची सुरुवात झकास लावणीने होते. ( अहो, चित्रपटात लागणारच हे ! आणि पुढे कुठे लावणीला जागा करणे अवघड आहे. )

२. चित्रपटात सेक्स व हिंसा यांचे प्रमाण बऱ्यापैकी आणि आकर्षक आहे.

३. चित्रपट संपाच्या प्रश्नाला फारसा हात लावत नाही.

४. जुन्या हिंदी सिनेमांतल्याप्रमाणे भांडवलदारांची किरकोळ व्हिलनिश दृश्ये आहेत.

५. प्रश्न चिघळत जाण्याची प्रक्रिया न दाखवता नुसते परिणाम दाखवले आहेत.

६. ' रशिया कोलमडला तिथे आपले काय ! ' किंवा ' या भांडवलदारांशी टक्कर घेणे अवघड आहे ' अशा अर्थाची डाव्यांच्या दृष्टीने पराभूत म्हणावीत अशी वाक्ये या चित्रपटात आहेत. म्हणजे गिरणीकामगारांबरोबरच एक मराठी लेखकही भांडवलशाहीने खाल्ला, असे म्हणावे की काय !

७. सगळ्या प्रश्नांची उत्तरे देऊन, सूड वगैरे घेऊन मगच चित्रपट संपतो !

८. चीड, करुणा, उद्वेग, कीव अशा भावनांचा प्रेक्षकांना फारसा त्रास होऊ नये याची काळजी घेण्यात आलेली आहे.

९. बाकी एकूण चित्रपट सफाईदार, छान आहे.

१०.कुठल्याही विषयातून करमणूक उभी करता येते हे मान्य, पण मग ऑस्कर कधी मिळणार ?

--- ००० ---

Friday, September 3, 2010 at 12:17pm •

## प्राची दुबळे यांचे गाणे – अभिप्राय

संगीताबद्दलचा अभिप्राय भाषेतून देताना त्याला मर्यादा पडणारच. ऐकताना आपल्याला काय वाटले, त्या ऐकण्याची सर्जक प्रक्रिया आपल्यात जिवंतपणे कशी घडली, हे जसेच्या तसे पोचवताच येणार नाही . तरीही –

चिंतनात्मकता हे तुमच्या आवाजाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य आहे. तंत्रावर हुकुमत असूनही या वैशिष्ट्याचा अभाव असलेले खूप गायक – गायिका लोकप्रिय आहेत, परंतु, बडे गुलाम, किशोरी अमोणकर यांच्यासारखे चिंतनशील गाणे हेच खरे मानवी संस्कृतीचे जगणे असते असे मला वाटते. तुमच्या गाण्याचा आवाका हा असा सखोल आणि विस्तीर्ण आहे. त्यामुळे, त्यात एक परिपक्व साधेपणा आहे. हुकुमत दाखवत बसायची तुम्हाला गरज वाटत नाही. आणि तरीही, कणाकणावर हुकुमत आहे. तुम्हाला काय करायचे आहे याची स्वच्छ समज हाच तुमचा आत्मविश्वास. त्यामुळे त्याला अचीव्हमेंटचा ( कमावल्याचा ) वासही नाही. गाण्यातून मिळणार काय याबाबतची पूर्ण बेफिकिरी या गाण्याच्या सर्जक प्रक्रियेतच मौजूद आहे. व्यक्तिगत अनुभवाच्या मर्यादा झुगारून दिल्याचा सेन्स या गाण्यात येतो. इथे जगण्याचे तत्त्वज्ञानच व्यक्त होते, असे मला वाटते.

या गाण्यांच्या भाषिक बाजूसह ती ऐकण्यात अधिकच समृद्धता असणार. तो भाग तर मी अजून ऐकलेलाच नाही. शिवाय गाण्याचे तांत्रिक व्याकरण मला समजत नाही. पण, भीतीचा लवलेश नसलेल्या अशा संगीताचा नम्रतापूर्वक स्वीकार मी करू शकतो, कारण एका वेगळ्या क्षेत्रात मी असेच स्वतःला फेकून देण्याची कृती करत असतो, असे मला वाटते. मी खूप संगीत ऐकतो असे नाही, विश्लेषणात्मक पद्धतीने मला ते फारसे कळतही नाही, तरीही, तुमचे गाणे ऐकून मला जे वाटले ते कळवले आहे.

इतर क्षेत्रातल्या कलावंतांना येणारे रिसेप्टिव्हिटीच्या अभावाचे प्रश्न संगीत - क्षेत्रातही असतीलच. आपले काम आपल्या आकलनाप्रमाणे करत राहाणे हेच सत्य.

साथसंगतवाले उत्तम ! रेकॉर्डिंग छान ! समीर दुबळे यांना सप्रेम नमस्कार. खूप दिवसांनी महान गाणे ऐकले. धन्यवाद !

--- ००० ---

# मेघदूत

काल गणेश दिघे या आपल्या मित्राचा ‘ मेघदूत ‘ हा बॅले बालगंधर्व रंगमंदिरात बसून ऐकला आणि मराठी रंगभूमीदिन ( ०५ नोव्हेंबर ) साजरा होण्यात सामील झालो. हा जर ठरल्याप्रमाणे प्रयोगरूपात सादर झाला असता तर नक्कीच काही भव्य घडले असते, यात शंका नाही. कळलेल्या माहितीप्रमाणे विश्वासघात, शत्रुत्व, आणि मराठी माणसचे आवडते तथाकथित मतभेद यांमुळे अनेकांची मेहनत आणि निर्मात्याचे ( म्हणजे गणेशचेच ) पैसे बऱ्याच प्रमाणा
त वाया गेले. एवढी मोठी आणि वेगळी गोष्ट मराठीत घडत असताना ( ‘ मेघदूत ‘ चा बॅले करून तो रंगभूमीवर सादर करावा असे ‘ दिसणे ‘ आणि त्यासाठी जिवाचे रान आणि पैशाचा चुराडा करायला तयार होणे, हे अद्वितीय आहे ! ) सर्वांनीच धीराने आणि समंजसपणाने हे घडवायला हवे होते, असे वाटले. पण ते काहीही असले तरी गणेशच्या जिद्दीला सलामच केला पाहिजे ! लौकरच हा प्रयोग आवश्यक त्या भव्यतेने साजरा करणारच, हे गणेशने जाहीर केले आहे. हा प्रयोग अंध व्यक्तींसाठी विनामूल्यच नव्हे तर त्यांना सन्मानाने निमंत्रण देऊन ठेवण्यात आला होता. ते सर्व ' मेघदूत ' ऐकताना त्या अंध प्रेक्षकांची जी दाद येत होती ती पाहून, हे किती ग्रेट ‘ प्रेक्षक ‘ आहेत, या जाणिवेने ऊर भरून आला. गणेशला ‘ मेघदूत ‘ शिकवणाऱ्या प्रा. चिपळूणकर जाहिरात बघून आल्या होत्या. गणेशने त्यांना अभिवादन करून त्यांचा तर सत्कार केलाच, शिवाय त्यांच्या हस्ते दोन अंध शिक्षकांचाही सत्कार केला. खेद, दुःख, आनंद यांच्या मिश्र मनःस्थितीत कालची संध्याकाळ गेली. शिवाय इतक्या तीव्र प्रेमाने बद्ध असणाऱ्या यक्ष-यक्षिणीना, त्या प्रेमाची शिक्षा म्हणूनच जणू, विरहाचा शाप देणारे कुबेरासारखे आपले तथाकथित देव किती गधडे आणि भयानक होते, हे सतत जाणवत होते, ते
वेगळेच ! गणेशचे त्याच्या या स्वप्नाबद्दल मनःपूर्वक अभिनंदन आणि लौकरच त्याला हा बॅले त्याच्या इच्छेप्रमाणे उभा करता येवो, ही शुभेच्छा !!!

--- ००० ---

## मिडनाईट इंटरल्यूड

ओंकार कुलकर्णी आणि नेहा जोशी यांची ही शॉर्ट फिल्म काल पाहिली. शहरात एकटा राहणारा तरुण आयटी तज्ञ आणि त्याची एक मध्यरात्र – असा विषय. मनोव्यापारांचे तंत्र या पद्धतीने त्याचा हा जीवनतुकडा त्याच्या एकूण जगण्याचाच वेध घेतो. एकच खोली, बियरच्या बाटल्या खाली पाडून फोडणारे उंदीर, नळाला पाणी नसणे, संडासात गाणे म्हणावे तरी शेजाऱ्याला त्रास, दुरावलेली प्रेयसी, संवाद नसणे, एकाकीपणा – हा स
गळा नमूना आपल्यापुढे आधुनिक झगमगीतपणाचा फील देत सादर होतो. प्रत्येक गोष्ट अशी खरेच घडली का, हा प्रश्न नाही. त्याने हाताची नस कापून घेणे हे मनात साठत चाललेल्या हिंसेचेही सूचन करते. अशा जगण्याची हीच होणार परिणती – असे वाक्य आपल्या डोक्यात येतानाच – आपलेही असेच क्रियाप्रतिक्रियांचेच आयुष्य ताबाहीन चाललेले नाही का – हा प्रश्न आपल्या डोक्यात येतो. आजच्या जगण्याचे दर्शन घडवत काही मूलभूत प्रश्न ही फिल्म समोर आणते, हे

महत्त्वाचे आहे. मधेच “ इतिहास शिका, इतिहासातून शहाणपण येते “ अशा अर्थाच्या काही वाक्यांचे आवर्तन आहे. ते तर अनुभवातून शिकण्याच्या कल्पनेचीच खिल्ली उडवणारे आहे ! याच संदर्भात, त्याची पुस्तके जाळण्याची कृतीही बरेच सांगून जाते. जमल्यास जरूर पाहा ही फिल्म. थोडक्या वेळात उत्तम, अर्थपूर्ण अभिव्यक्ती !

--- ००० ---

## ' शिवाजी अंडरग्राउंड इन भीमनगर मोहल्ला '

हे नाटक आज पाहिले.अप्रतिम !!! असा प्रयोग वारंवार पाहायला मिळत नाही. नाववाल्या कलाकारांनी तोंडात बोटे घालून पाहावा असा अभिनय ! नंदू माधवांचे दिग्दर्शन लाजवाब ! राजकुमार तांगडे यांचे लेखनही अभ्यासपूर्ण आणि शिवाय आवश्यक ती मजा आणणारे ! मस्ट सी, असे नाटक !

--- ००० ---

## ' तुकाराम '

पाहिला.

तुकारामाचा भाऊ देवाच्या शोधात घर सोडून जातो -- तुकाराम संसारात राहून देवाला प्राप्त करतो ( म्हणजे काय, कोण जाणे ! ). पुढे जेव्हा एका ठिकाणी त्यांची गाठ पडते तेव्हा तो भाऊ म्हणतो, " मी बाहेर शोधण्याऐवजी आत शोधायला हवे होते का ? " -- हे वाक्य या सिनेमालाही लागू पडते. इथे ' बाहेरचा ' तुकाराम आहे, आतला शोधलेला नाही. अहो, आतला तुकाराम शोधला तर बघायला कोण येणार ? म्हणजेच बाहेरचा धर्म सांगणारे पंडित आणि हा सिनेमा दोन्ही सारखेच म्हणावे लागतात.

आणि प्रेक्षकही जर आतला तुकाराम पाहण्यात इंटरेस्ट नसलेले असतील तर त्यांनाही तुकाराम-विरोधी म्हणजेच मंबाजीच्या बाजूचे का म्हणू नये ?"

--- ००० ---

' मिती चार ', कल्याण या संस्थेने सादर केलेला

## ' सर्व्हायव्हल '

हा दीर्घांक काल पाहिला. डॉ. संजय रणदिवे लिखित आणि रवींद्र लाखे दिग्दर्शित असे हे नाटक अनेक तात्त्विक प्रश्नांची घुसळण करणारे होते. सादरीकरण अवघड होते. लाख्यांचे अत्युत्कृष्ट दिग्दर्शन आणि ललित-माणिक जोडीचा लाजवाब अभिनय यांमुळेच ते शक्य झाले. सत्तर मिनिटांचे उत्तम संवाद-नाट्य ! अभिनंदन !

--- ००० ---

पुरुषोत्तममध्ये पहिली आलेली एकांकिका

## ' सीरियल किलर्स '

पाहिली. वारंवार गर्भपाताचे प्रसंग आणणारी सुखवादी मुलेमुली आणि त्यांतून निर्माण होणारे गुंताडे हा विषय. हे समाजवस्तव असल्याचे सगळ्यांना मान्य. या तथाकथित सुशिक्षित मुलामुलींना सेफ सेक्स चे महत्त्व कळत नसेल ? पालकांनी हे पाल्यांना समजावणे आवश्यक आहे ? पालकांनी स्वतःच्या जीवनातून जुन्या नीतिमूल्यांचे उच्चाटन करत जाणे हा एक ' एकोपा ' साधण्याचा उपाय ठरू शकेल ?

--- ००० ---

**एफबी पोस्टस २०१३ मधून –**

महंमद रफी -- **काला बाजार** -- ' अपनी तो हर आह एक तूफान है । ' -- महाग्रेट गाणे ! द्व्यर्थी गाण्यांमधले भारतातले सम्राटपद या गाण्याला ! वाफेच्या इंजिनाची गाडी. खाली देव आनंद आणि त्याच्या समोरच्या बाकावर वहिदाचे आईवडील. देवच्या वरच्या बर्थवर वहीदा ! पूर्ण गाणे, म्हटले तर परमेश्वरासाठी आणि म्हटले तर वहीदासाठी ! दोन्ही अर्थ अति-सफाईदार ! तिचे आईवडील खुश, वहीदा खुश आणि देव तर खुशच खुश ! पाहणाऱ्याच्या चेहऱ्यावर सतत स्मित ठेवणारे हे एक दैवदुर्लभ गाणे ! ( तसेच ' तीसरी कसम ' मधले ' लाली लाली डोलिया में ' -- तीन मिनिटे वहीदा नुसती हसते आहे ! जान कुर्बान करावी, असे हास्य म्हणतात, ते हेच ! -- हे इथे असंबद्ध असले तरी वहीदामुळे आठवले, म्हणून सांगितले ! )

--- ००० ---

भाषा, संवाद आणि संपर्क -- या विषयावर गोपूंनी एक नाटक लिहिलेले आहे -- ते म्हणजे

**' म्यूझिक सिस्टम '** -- ( ' सिस्टिम ' म्हटलेले त्यांना चालत नसे आणि हे नाटक विजय केंकरेने बसवले होते म्हणजे त्याला ते माहीतच होते -- तरीही मटामधल्या आज आलेल्या त्याच्या प्रतिक्रियेत त्याने ' सिस्टिम ' च म्हटले आहे ! ) -- ते नाटक डावी विचारसरणीबिरणी काही सांगत नव्हते -- सरळ मानवी प्रश्नावर होते -- त्यामुळे मला ते आवडले होते -- गोपूंनी असे नाटक लिहिले याचा एक जास्तीचा आनंदही त्यात होता ! विशेष म्हणजे, त्यांच्या चाहत्यांसह अनेकांना ते

नाटक आवडले नाही. काही लोक मधूनच निघून जात. जे पूर्ण पाहात ते, नाटक संपताच तुरंत बाहेर पळून जात ! पुण्यातला त्या नाटकाचा प्रयोग पाहिल्यावर मी माझे मत सांगायला आत गेलो होतो -- तिथे गोपू होते -- गोपूंचे अभिनंदन करणारा मी एकटा होतो ! ते त्या वेळी मला ओळखत होते की नाही, कोण जाणे, किंवा मी सांगितलेही असेल. हा कोण वेडा, एकटाच कसा काय माझे अभिनंदन करतोय, असेही त्यांच्या मनात येऊन गेले असेल ! ऐसा भी होता है !

--- ००० ---

## गजब कहाणी

जोसे सारामागो ( कुणी जूझे सारामागू म्हणतात. ) यांच्या ' द एलेफंटस जर्नी ' या कादंबरीच्या, आपले इथले एफबी-मित्र ( आणि माझे जुने मित्र – मोहितने दिग्दर्शन केलेल्या माझ्या ' नाणेफेक ' या पीडीए निर्मित नाटकापासून ) प्रदीप वैद्य यांनी केलेल्या ' गजब कहाणी ' या नाट्यरूपांतराचा प्रयोग काल पाहिला. केवळ अप्रतिम ! नेपथ्य, प्रकाशयोजना, संगीत, रंगभूषा, वेषभूषा, दिग्दर्शन, अभिनय – हे सगळे एकजीव होऊन जमून आल्यावर काय घडू शकते याचा हा जिवंत अनुभव ! मोहित टाकळकरचे अत्युत्तम दिग्दर्शन हा अर्थातच या प्रयोगाचा पाया ! एका राजाच्या राणीने बेडवर शय्याक्रीडेत असताना राजापुढे एक इच्छा व्यक्त करणे – इथून या नाटकाचा आणि यातल्या हत्तीचा प्रवास सुरू होतो. तुम्ही नुसती एक कथा म्हणून पाहाल तर कदाचित कंटाळाल, पण थोडी स्वतःची कल्पनाशक्ती जागी ठेवून पाहाल तर हे एक अर्थस्फोटक नाटक आहे. त्या एका इच्छेतून किती लोक कामाला लागताहेत, त्यांच्यांत कायकाय घडते आहे, किती प्रदेशांतून, वातावरणांतून, माणसांच्या प्रकारांतून तो हत्ती आणि बरोबरचा सगळा लवाजमा जातो आहे – हे सगळे अचंबित करणारे आहे ! आणि तो हत्ती ! ही एक वेगळीच अजब कहाणी आहे ! गीतांजली कुलकर्णी ! ( या अभिनेत्रीने माझ्या ' बुद्धिबळ आणि झब्बू ' या नाटकात एक भूमिका केली होती, त्यामुळे मला तिचा जरा जास्तच अभिमान ! ) ही जर नुसती अशीच तुमच्यापुढे आली आणि ही हत्तीचा रोल करणार आहे असे तुम्हाला सांगितले तर तुम्ही हसत सुटाल – पण निव्वळ अभिनयातून अगडबंब हत्ती कसा उभा करता येतो, हे या जातिवंत, गुणवान अभिनेत्रीने दाखवून दिले ! यात गाणी आणि नृत्येही आहेत ! आणि ( बहुतेक ) जपानी भाषेतले काही संवाद ! ' परिपूर्ण नाटक ' असे क्वचित बघायला मिळते – मी या नाटकाला त्या विभागात घेईन – परिपूर्ण नाटक !

--- ००० ---

माझी एक मैत्रीण उत्तम गायिका आहे. तिची कधी भेट वगैरे झालेली नव्हती – अशीच थोडी लिखापढी होती. काही महिन्यांपूर्वी आमच्या घरापासून चालत दहा मिनिटांवर तिच्या गायनाचा कार्यक्रम होता पण दुसऱ्या काही व्यस्ततेमुळे मला जाता आले नाही. पण माझी पत्नी त्या कार्यक्रमाला गेली होती. ही एक उत्तम गायिका असल्याने, तू हा कर्यक्रम चुकवू नकोस, असे मी तिला सांगितले होते. ऐकून आल्यावर ती त्या गायिकेबद्दल छान बोलली होती. आज पुणे आकाशवाणीवर

‘ स्नेहबंध ‘ या महिलांच्या कार्यक्रमात त्या गायिकेची मुलाखत होती. माझी पत्नी तो कार्यक्रम नेहमी ऐकते. आज त्या गायिकेचे नाव ऐकल्यावर मला तिने ते सांगितले आणि मला ती मुलाखत ऐकायची आहे का, असे विचारले. म्हटले, नक्कीच ! प्रश्नच नाही ! माझ्या त्या गायिका मैत्रिणीची मुलाखत ऐकून धन्य झालो ! काल आपण जिला एक छोटी मुलगी, उभरती गायिका म्हणत होतो, ती हे असे प्रचंड काम करतेय, हे समजून तिचा अभिमान वाटला. कोण असेल ती ? अहो, आपली साधी, सुंदर, बुद्धिमान, ग्रेट मैत्रीण -- **प्राची दुबळे !**

--- ००० ---

काल गणेशचे **' मेघदूत '** पाहिले. उत्तम भरजरी पोषाख, रंगोबेरंगी प्रकाशयोजना, १५ नर्तकी, १५ नर्तक, गाणी, पार्श्वसंगीत, नृत्ये आणि काव्य ! मराठीत हा एक वेगळा प्रकार आहे ! एक दीर्घ विरहगीत ! मेहनतीने बसवलेला नेत्रसुखद प्रयोग ! आज पुण्यातल्या सर्व वृत्तपत्रांनी या प्रयोगाचे आवर्जून फोटोंसह स्वागत केलेले आहे. गणेश आणि टीमचे मनःपूर्वक अभिनंदन !

--- ००० ---

नेहा जोशी या आपल्या फ्रेंडच्या निमंत्रणावरून काल

**‘ बेचकी ‘**

या नाटकाचा पुण्यातला शुभारंभाचा प्रयोग पाहिला. तुडुंब गर्दी होती -- प्रसाद ओक किती लोकप्रिय आहे याचा तो पुरावाच होता. एकूण टीमच छान होती आणि प्रयोग पक्का बांधलेला आणि अर्थातच अति- नाट्यमय करमणूक करणारा होता. लोकांचे पैसे वसूल होतात, यात शंका नाही. या निमित्ताने माझ्या जुन्या ओळखीचे कलाकार अभय राणे आणि स्वरूपा खोपकर हेही भेटले याचा आनंद झाला. तेही या नाटकात कामे करतात. प्रसाद तर जानामाना अभिनेता असून तो प्रेक्षकांना तृप्त करतो, यात नवल नाही. मुख्य म्हणजे, आपली फ्रेंड नेहा ! भरपूर व्हरायटी असलेला तिचा रोल आहे. साध्या, जणू दबलेल्या स्त्रीपासून ते कामांध होऊन वेडीपिशी झालेली स्त्री अशा असंख्य अवस्था ती जबरदस्त ताकदीने व्यक्त करते ! तिची संवादफेक आणि आवाजाचा वापर विलक्षण परिणाम साधणारे आहेत ! मराठी रंगभूमीला आणि एकूण अभिनयकला जगताला ही एक समर्थ अभिनेत्री मिळाली आहे, हे निश्चित ! धन्यवाद नेहा !

--- ००० ---

**२०१४ च्या पोस्टस मधून –**

काल एक फ्रेश, छान, सुंदर, मजेदार, गंभीर, ऐब्सर्ड, पोस्टमॉडर्न नाटक पाहिले.

**‘ एफ वन – वन झीरो फाईव्ह ‘**

या नावाचे. हा अर्थातच एका शहरातल्या गृहरचना संस्थेतला फ्लॅट नंबर आहे. आशुतोष पोतदार या आपल्या फ्रेंडची उत्तम संहिता आणि मोहित टाकळकर या आपल्या फ्रेंडचे तगडे दिग्दर्शन ! पूर्ण टीम आणि तंत्रज्ञ यांची बिनचूक, दर्जेदार साथ ! ८५ मिनिटांचा सलग खेळ ! खूपच मजा आली ! यातल्या नायकाच्या स्वयंपाक करण्याच्या आवडीपासून नाटक सुरू होते. स्वयंपाक ही त्यांच्या घराण्याची परंपराच असल्याचे तो सांगतो. त्यातून हळूहळू माणसाच्या मनाचे परिणामबद्ध असणे, कंडिशन्ड असणे हे दिसत जाते. मग येतो फ्लॅट रंगवण्याचा विषय ! पेंटर आणि नायिका ( नायक-नायिका या जुन्या शब्दांना खरे तर इथे काही अर्थ नाही. ) यांच्या संवादात, न उच्चारले गेलेले पण परिणामबद्धतेमुळे डोक्यात असलेले असे काही येते आणि पुढचे महानाट्य उभे राहते ! लोकांना गॉसिप आणि सेन्सेशनची हाव असल्याने त्यातून काहीच्या काहीच निघत जाते ! निसर्गात रंग हे खरे तर ‘ असतात ‘ – माणूस त्यांना अर्थबद्ध करत जातो आणि त्यातून सगळ्या समस्या, हिंसा वगैरे घडत राहतात – याचे आपल्याला भान येत जाते. अर्थमुक्त करून रंगांना साधे, छान जीवनदान देणारे हे नाटक आहे ! बाकी सगळे तर उत्तमच पण राजकुमार तांगडेचा पेंटर केवळ अविस्मरणीय !

मी म्हणेन, जरूर बघा हे नाटक ! आज आणि उद्या सुदर्शनला आहेत प्रयोग.

पूर्ण टीमचे अभिनंदन आणि एक अत्युत्तम नाटक पेश केल्याबद्दल धन्यवाद !

--- ००० ---

बिंदूमाधव खिरे या लेखकाची ‘ पुरुषोत्तम ‘ ही एकांकिका आपल्या परिनिरीक्षण मंडळाने अडवलेली आहे. त्याबद्दलची बातमी आणि काही मते आजच्या ‘ पुणे मिरर ‘ च्या प्रथमपृष्ठ स्थानावर आहेत. सदर एकांकिका समसंभोग आणि त्यातले नातेसंबंध आणि त्यातून निर्माण होणारी गुंतागुंत, हा विषय हाताळते. त्या एकांकिकेतल्या संवादांत काही शिव्या व स्त्रियांना अवमानकारक आणि प्रेक्षकांना अस्वस्थ करणारे वाटू शकते, असे शब्द व वाक्ये आहेत, असा आक्षेप आहे. या बाबतीत माझे मत विचारण्यात आले होते – ते मी असे दिले आहे – The use of language reflects the conditioning of characters in which they flourish. If they use sophisticated language just for the sake of it, it will be deemed fake.To ask playwrights or authors to omit certain portions, just because it does not match with the standards of few, needs to be strongly objected to. Language is an indispensable part of that artwork so it cannot be compromised. शक्य असेल त्यांनी ही पूर्ण बातमी जरूर वाचा.

' **एंटरटेनमेंट** ' या नावाचा, भरपूर मूर्ख कल्पनाविलासाने भरलेला, उत्तमोत्तम शाब्दिक कोट्या असलेला, मस्त हसवणारा सिनेमा हिंदीत आहे, हे मला माहीतच नव्हते ! आत्ता थोडा भाग पाहिला ! मस्त ! मला खूप मजा वाटली ! उद्या पूर्ण पाहणार, हे नक्की ! कोण म्हणावा याचा शिल्पकार ? उद्या कळेलच !

‘ अभिनय ‘, कल्याण निर्मित, संजय कृष्णाजी पाटील लिखित आणि अभिजित झुंजारराव दिग्दर्शित आणि बहुचर्चित आणि अनेक पारितोषिकांनी सन्मानित झालेले

## ‘ लेझिम खेळणारी पोरं ‘

हे दोन अंकी नाटक आज पाहिले. पूर्ण टीमने अत्यंत परिश्रमपूर्वक बसवलेला चोख, बिनचूक प्रयोग ! ( माझी नेहमीची तक्रार – नटनट्यांनी वाक्यांचे शेवटचे भाग पाडल्याने नीट ऐकू न येणे – हिला इथेही अनेकदा वाव आहेच. ) संवाद तसे सोपे नाहीत – हे कवितांना दिलेले नाट्यरूप आहे. अर्थांसह या ओळी, काही वेळी खूप अवघड असणाऱ्याही, शिताफीने म्हणणे, हे नक्कीच दाद देण्यासारखे आहे. आक्रमकांचे – बेफिकीर असणाऱ्यांचे जग आणि त्याचे परिणाम भोगणाऱ्यांचे – पीडितांचे जग – असे दोन प्रकार मानले तर हे नाटक पीडितांच्या जगाचे नाटक आहे. ( हे काही ठळकपणे असे विभागता येत नसते – काही माणसे कधी इकडे, कधी तिकडे असतात. ) ही सगळी अन्यायित, पिडली जाणारी, दुःखे भोगणारी, सहन करणारी, पिचलेली, तुटलेली, फाटलेली, चिंध्या झालेली, रडणारी, ओरडणारी, नाइलाजाने जगणारी, नाइलाजाने मरणारी – अशी माणसे आहेत. पात्रांचे पोषाख रंगीबेरंगी ठेवल्याने, नाचगाणी आणि भरपूर प्रकाशयोजना ठेवल्याने ते रटाळ होत नाही. हा नक्कीच एक सुविहित प्रयोग होतो. त्याबद्दल पूर्ण टीमचे अभिनंदन !

आता मला एका वेगळ्याच प्रश्नाबद्दल बोलायचे आहे. हे पीडितांचे जग दाखवून-पाहून काय होत असावे ? प्रेक्षकांची संवेदनशीलता वाढणे, काहींनी असे अन्याय करण्यापासून परावृत्त होणे, संपूर्ण राजकीय-सामाजिक-मानसिक रचनाच बदलायला समाजाने उद्युक्त होणे, या पृथ्वीचा स्वर्ग होण्याच्या मार्गात एक पाऊल पुढे पडणे, असे अन्याय होण्याच्या शक्यता कमी होणे, माणसे समंजस – कमी हिंसक होणे, आपल्या मतांनी आपले रेटत जगायचे बंद पडणे, आत्मकेंद्रितता, भीती, स्वहिताची आणि स्वसुखाची हाव कमी होणे – यांतले काय घडत असेल ? घडत असेल का यांतले काही ? आणि नसेलच असे काही घडत तर अशा कलाकृतीचे जीवितकार्य काय ?

हा प्रश्न अर्थात त्या नाट्यप्रयोगाशी संबंधित नसेल पण कला क्षेत्रातला वा नाट्यक्षेत्रातला एक प्रश्न म्हणून याकडे पाहिले जायला हवे, असे वाटते.

--- ००० ---

“ आदिवासी संगीत हे कुणाची करमणूक करण्यासाठी, कुणाला खुश करण्यासाठी वा धंदा करण्यासाठी नसते – तो असतो मानवी जगण्याने निसर्गाला दिलेला प्रतिसाद ! ते आदिवासींच्या अंतर्यामात नांदणारे संगीत असते ! ते आणखी कुणाला आवडते की नाही आवडत, याची त्यांना मुळीच चिंता नसते ! “ आपली फ्रेंड **प्राची दुबळे** काल तिच्या एका दीड तासाच्या कार्यक्रमात, तिच्या त्या संगीताच्या अभ्यासाची थोडी झलक दाखवताना सांगत होती. ते मूळ संगीत ऐकवणे, काही क्लिप्स दाखवणे आणि स्वतः गाऊन काही गोष्टी समजावून सांगणे – असा भरगच्च कार्यक्रम होता. पहाडी

प्रदेशातल्या आदिवासींचे संगीत वरच्या सप्तकात असते कारण त्याशिवाय ते ऐकू येणेच तिथे अवघड असते, उलट जंगल भागातले आदिवासी संगीत मंद्र सप्तकात असते कारण तिथल्या शांततेत तेच सुसंगत असते ! – अशी खूप माहिती देत, प्राचीने, एकूण आदिवासी जगणेच कसे निसर्गाबरोबर एकात्मतेने गुंफलेले असते ते दाखवले. तिने भारतातल्या अनेक आदिवासी भागांत जाऊन त्या त्या संगीताचा अभ्यास केलेला आहे – गेली पाच वर्षे ती हे काम करते आहे – आणि अजूनही तिचे ते काम चालू आहे. या सर्व आदिवासी संगीताचा आत्मा मुळात एक आहे, असे तिचे विवेचन होते. किंबहुना इतर देशांतल्या अशा संगीताशीही या संगीताचे सखोल नाते आहे, असे तिने सांगितले. हे पाहिल्यावर, राष्ट्रांच्या सीमा निरर्थक ठरतात, असे एक अत्यंत महत्त्वाचे सत्य ती सांगून गेली ! अनेक संकटांशी सामना करत, ४७-४८ तापमानासारख्या हाल-अपेष्टा भोगत तिने हा मौल्यवान खजिना जमवलेला आहे. तिने आणखी एक मजेदार गोष्ट सांगितली -- एक गाणे पाच मात्रांचे होते – ते सतत त्या पाच मात्रांची शिस्त पाळेल, असे नाही – मधेच ते तीन वा सहा मात्रांचेही होते ! एक उत्स्फूर्त, सहज नैसर्गिक आविष्कार, अशा एकूण आदिवासी संगीताची अशी अनेक वैशिष्ट्ये तिने उलगडून दाखवली ! मानवी जगण्यातली एकात्मता जाणवून देणारा हा कार्यक्रम खरोखर ग्रेट आहे ! प्राची दुबळे म्हणजे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जगण्यातला एक अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. तिला तिचे जगणे सापडलेले आहे. किमान पंचवीस वर्षे करण्याचे हे काम आहे, मी तर फक्त गेली पाचच वर्षे यात आहे – हे ती सहज सांगून जाते ! या संगीताचा अभ्यास करताना त्याबाबत येणारे नैतिक प्रश्न आणि त्यांकडे ती कसे पाहते, हेही ती प्रेक्षकांशी शेयर करते ! प्राचीला तिच्या या चाललेल्या कामाबद्दल आणि कालच्या तिच्या कार्यक्रमाबद्दल आदरयुक्त सलाम !
हा कार्यक्रम पुण्यातल्या ' आसक्त ' या संस्थेने आयोजित केला होता.

--- ००० ---

सलग दोन चित्रपट चित्रगृहात जाऊन पाहिले ! ' **पोश्टर बॉयज** ' आणि ' **रेगे** ' ! आपले काही फ्रेंडस त्यांत असल्यामुळे ! अभिजित झुंजारराव, महेश जोशी, प्रवीण तरडे, हृषिकेष जोशी, विद्याधर जोशी, नेहा जोशी, अदिती देशपांडे, राजू बावडेकर आणि आणखीही असतील ! मस्त वाटले ! मला ' पोश्टर बॉयज ' जास्त आवडला ! हा असा कारनामा खूप वर्षांनी केला ! पूर्वी मी एका मासिकात नाट्यचित्रपट परीक्षणे लिहीत असे तेव्हा दोनतीनदा असे केले होते -- एकदा तर तीन सलग ! मानधन मिळत नसे पण झालेला खर्च मिळे ! तेवढेच बघून तर होतेय, या विचाराने मी ते काम करत असे !

--- ००० ---

डब्ल्यूबी चॅनेल -- चित्रपट **' सेक्स अँड द सिटी '** . एक जोडपे बेडवर. स्त्रीच्या हातात एक पुस्तक. ते तिला खूप आवडते, असे ती सांगते. ते असते अनेक मोठ्या माणसांच्या प्रेमपत्रांचे संकलन. पुरुष तिला काही विचारतो -- ती स्त्री नेपोलियनने त्याची प्रेयसी जोसेफाईन हिला लिहिलेले प्रेमपत्र वाचून दाखवते. उत्तम प्रेमपत्र ! विचार आला, आपल्याकडच्या कोणकोणत्या ' मोठ्या ' माणसांनी प्रेमपत्रे लिहिली असतील ? त्यांचे असे पाचेकशे पानांचे संकलन

व्हावे, एवढी असतील ? इतिहास आणि मोठ्यांची चरित्रे यांची मला खरेच कमी माहिती आहे. एक उत्सुकता वाटली. की, मोठ्यांनीच अशी प्रेमपत्रे लिहिली असती तर पुढच्या पिढ्यांवर किती वाईट परिणाम झाले असते -- असेच म्हणावे ?

--- ००० ---

सहज इंग्लिश पिक्चरची चॅनेल्स पाहात होतो तर एमजीएम वर ' **हार्ड प्रॉमिसेस** ' हा पिक्चर चाललेला दिसला. एक तरुण, एक तरुणी रस्त्याने बोलत चाललेले होते. निवांत. म्हटले, एवढे निवांत ? पाहात राहिलो. तिचे घर आले. दोनतीन चुंबने घेऊन निरोप दिला-घेतला गेला. तिने दार लावून घेतले. तो अजून उभा होता. तिने दार उघडून, काही बोलून त्याला आत घेतले. त्यानंतरच्या तीन मिनिटांत त्यांनी सुमारे पन्नास चुंबने घेतली ! --- या सहजतेपुढे आपले नायक-नायिका खूपच बिचारे आणि गरीब वाटतात ! -- हा उच्च संस्कृतीचा परिणाम की महाढोंगी संस्कृतीचा ?

--- ००० ---

आमच्या घराजवळ झालेले ' लोकशाहीर अण्णाभाऊ साठे ' रंगमंदिर आजपासून सुरू होत आहे. दुपारी १२-३० ला तिथे ' **नांदी** ' या नाटकाचा प्रयोग आहे. योगायोग म्हणजे त्यात माझ्या एका नाटकातला एक सीन असून तो प्रसाद ओक आणि तेजस्विनी पंडित सादर करतात. सपत्निक जाणार आहे.

( नाट्यमाध्यमातून स्त्री-पुरुष संबंध कसे हाताळले गेले -- यावर हे नाटक असून कालिदासापासून आजपर्यंतच्या निवडक दहा नाटकांतले सीन्स, विवरणासह, या नाटकात आहेत. माझ्या ' बुद्धिबळ आणि झब्बू ' या नाटकातला एक सीन आहे ).

आता त्याच्यापुढचा कहर सांगतो ! गेलो त्या नाटकाला -- हाऊसफुल ! ' **नांदी** ' ! आमच्या सीटस होत्या, तो प्रश्न नव्हता. तर नाटकाची तिसरी घंटा देण्यासाठी डॉ. लागू आलेले होते -- कारण नव्या नाट्यगृहातला पहिला नाट्यप्रयोग होता. सुरुवातीला काही सत्कार, स्वागत होणार होते. तेव्हा बोलताना ऋषिकेष म्हणाला, यात समाविष्ट असणाऱ्या एका नाटकाचे लेखक चं. प्र. देशपांडे हेही या प्रयोगाला उपस्थित आहेत ! -- फ्रेंडस, आले का लक्षात ? हे नवे नाट्यगृह सुरू होताना त्यात पहिले नाव कोणते उच्चारले गेले ? ! आपोआप, असंख्य योगायोगांनी घडून आलेली गोष्ट ! क्षणभर खूप मजा वाटली !

--- ००० ---

February 17

## फँड्री

‘ फँड्री ‘ पाहिला. ‘ श्वास ‘ आणि ‘ वळू ‘ यांच्यापेक्षा तो खूपच चांगला वाटला. कारण तो सरळ, साधा आणि खरा आहे. पडद्यावर दिसणारे जगणे बनावट वाटत नाही. फँड्री म्हणजे डुक्कर – वळचणीतले, घाणीतले, तिरस्कृत जगणे. तसे जगताना ‘ पिसाळणे ‘ झाले तर नष्ट करायच्या लायकीचे. जब्या या कैकाडी समाजातल्या मुलाचे शालू या उच्चवर्णीय मुलीवर प्रेम असणे आणि ते सफल न होणे. यात जातवास्तवाचा एक बिकट आणि लांछनास्पद प्रश्न आहेच – हे वास्तव असेच राहू नये, असे कोणाही संवेदनशील माणसाला वाटेलच. हा प्रकार जरा व्यापक मानवी संदर्भात पाहावा की पाहू नये, हा प्रश्न आहे. तसा तो पाहिला तर कसा दिसेल ? कोणत्या ना कोणत्या कारणाने ‘ पहुँचके बाहर ‘ असलेली गोष्ट प्राप्त न होणे. जात, धर्म, गरिबी, व्यंग, वर्ण, आरक्षण, परदेशात जाता न येणे, अमुक शिक्षणासाठी प्रवेश न मिळणे, अशी असंख्य कारणे असू शकतात की ज्यांमुळे साध्या, न्याय्य मानवी अपेक्षा अप्राप्य राहू शकतात. त्यामुळे एखाद्या परिस्थितीत उद्रेकही होऊ शकतो – हिंसक प्रतिक्रियाही येऊ शकते. आणि हे कोणत्याही व्यक्तीच्या जगण्यात या ना त्या कारणाने घडू शकते. कोणतीच विषमता वा भेदभाव नाही, समान संधी आहे आणि सर्वांच्या सर्व न्याय्य अपेक्षा पूर्ण होत आहेत, असे मानवी जीवन कल्पनेतही शक्य दिसत नाही. तर काय ? – हा खरा प्रश्न आहे. या प्रश्नाला सामोरा जाण्याचा आवाका इथे घेतलेला नाही -- तसा हेतूही नसावा. त्यामुळे, जातवास्तवातला अन्याय दर्शवणे, एवढेच घडते. बाकी सगळे अत्युत्तम असूनही या एका मर्यादेत हे सगळे सिमटते. त्या जातवास्तवाला बळी पडत नसलेल्यांनाही तो आपल्या जगण्यातला प्रश्न वाटावा, असे घडत नाही. फक्त सहानुभूती दाखवणे वा हे अयोग्य आहे, असे म्हणणे – एवढेच घडते. स्वतःचे जगणे समजून घेण्याचे आव्हान हा चित्रपट प्रेक्षकांपुढे आणू शकत नाही.

तरीही मराठी सिनेमा, माणसाच्या प्रत्यक्ष जगण्याच्या खूप जवळ आणल्याबद्दल नागराज मंजुळे यांचे अभिनंदन करायला हवे. खोटे भावनिक किंवा विनोदी करायचे हे ठरवून पोरकटपणा करणारे चित्रपट सतत निर्माण करणाऱ्या मराठीत ही एक वेगळी घटना घडलेली आहे, हे निश्चित !

--- ००० ---

January 10

Champra Deshpande updated his status.

काल ' बावनकशी ' निर्मित, प्रफुल्ल मोरे यांनी सादर केलेले, समीर मोनेलिखित

आणि अजित भगत दिग्दर्शित **' द डेथ ओफ ए काँकरर '** हे नाटक पाहिले. ज़बरदस्त

आणि सर्वांगपरिपूर्ण बिनचूक प्रयोग ! जर्मनीचा क्रूरकर्मा हिटलर याच्या शेवटच्या दिवसांवर हे नाटक आहे.अजित भगत यांनी खूप विचारपूर्वक आणि अनेक दृश्यात्मक तपशील भरून हे नाटक बसवलेले आहे.अनेक ठिकाणी बऱ्यापैकी मोठे विराम ( पॉजेस ) आहेत. त्यांतले खूप बारकावे दाद द्यावी, असे आहेत. ध्वनी आणि प्रकाश यांचा मेळ तर अप्रतिमच

आहे. पूर्ण टीमची कामगिरी खास जमून आलेली आहे .निव्वळ, सुशील इनामदार यांनी अभिनीत केलेला हिटलर पाहण्यासाठीसुद्धा हे नाटक जरूर पाहावे. म्हटले तर स्टार कलाकार कुणीही नाही, पण प्रयोग अत्यंत सफाईदार होतो, यात वादच नाही. असे गंभीर नाटक मराठी रंगभूमीवर आणण्याचे धाडस केल्याबद्दल प्रफुल्ल मोरे यांचे खास अभिनंदन करायला हवे. Do see this play !

--- ००० ---

**एफबी पोस्ट २०१५ मधून –**

सहज चॅनेल्स बदलत होतो तर एका ठिकाणी - ' **द फास्ट अँड द फ्युरियस-३** ' चालू होता. एका बाजूला एक हीरो आणि समोर साताठ हीरो, असे आव्हानाच्या पवित्र्यात उभे होते. म्हटले काय आहे अडचण, बघू या तरी ! तर ते कार-रेस साठी आव्हान देणे चालले होते ( हे नंतर कळले ). तेवढ्यात एक सौंदर्याचा ऍटम बाँबच म्हणावी अशी हिरॉईन समोर आली ! " हाऊ अबाऊट मी ? द विनर गेटस मी ! " ( मी कशी वाटते ? विजेत्याला मी मिळेन ! ) -- असे म्हणाली ! पुढे काय होणार ते लगेच कळले ! तुफान शर्यत ! हिंसा ! एका हीरोचे सगळे दात पडून त्याचे तोंड रक्तबंबाळ झालेले दिसले ! मी चॅनेल बदलले –

--- ००० ---

**बाजीराव मस्तानी**

नुसताच फक्त चाकोरीबद्ध विचार नको. एक साधे पहा – त्या दोघींना वाटले नसेल का कधी, की आपण नृत्य करावे, आपल्यातल्या कलागुणांचा विकास करावा ? पण, नियमांनी जखडलेले होते आयुष्य त्यांचे. एकीचा तर पाय अधू होता. काय हे असले अधू पायाचे जगणे, असे वाटले नसेल तिला ? पण, त्यांना त्या नाराजीतून मुक्त व्हायला एकविसावे शतक यावे लागले ! त्यांच्यांत म्हणे सख्य नव्हतेच ! अहो, मरणांते वैराणी – मृत्यूनंतर सर्व वैर, द्वेष नष्ट होतात ! एवढ्या उशिरा त्यांना उत्फुल्लपणे, आनंदाने पिंगा नृत्याची संधी मिळाली ! त्यासाठी एका देवदूताला भन्साळीचे रूप घेऊन पृथ्वीवर यावे लागले ! त्याने त्या दोघींच्याही आत्म्यांना आजच्या ब्यूटीफुल नृत्यांगनांच्या देहांची कोंदणे दिली ! नृत्यासाठी प्रचंड महाल आणि अनेक सख्या दिल्या ! आणि कोट्यवधी लोक आनंदाने बघतील असे गाणे दिले ! त्या दोघींचे आत्मे किती आनंदित झाले असतील ! कदाचित मुक्तही झाले असतील ! – असा करा ना विचार ! अशा जरा स्त्रीवादी म्हणा वा स्त्रीमुक्तीवादी म्हणा, दृष्टीकोणातूनही बघा ना !

--- ००० ---

# कट्यार ---

जॅकी चॅनचे पिक्चर्स आवडतात की नाही पाहायला ? त्यात कराटे वा कुंग फू ( या दोन्हींतला फरक मला समजत नाही ) यातल्या कौशल्यावर तो विजयी होत जातो आणि आपण खुश होतो. समजा एक कराटे घराणे आणि एक कुंग फू घराणे अशी जुंपली तर ? मजाच मजा येईल. तोच आनंद आपल्याला ‘ कट्यार ‘ पाहून मिळू शकतो ! संगीतातल्या दोन घराण्यांची टक्कर ! ते पंडितजी बिचारं सरळमार्गी, साधं गायक असतं – ते निष्कारण आजच्या ( म्हणजे त्या वेळच्या ) मार्केटिंगच्या आणि कोणत्याही मार्गाने यश मिळवण्याच्या बाजारात कायमचं खलास होतं ! त्याचा शिष्य म्हणवणारं असूनही, “ मी सूड घेईन, पण, सुरांनी “ असं म्हणणारं एक सदाशिव नामक पोरगं पुढे, कहर म्हणजे, दुष्टाचं हृदयपरिवर्तन करून जिंकतं ! हे पाहून, अर्थातच, त्या सरळमार्गी पंडिताचे डोळे पाणावतात ! सचिनजींनी गातानाचे ऍक्टिंग चांगले केले आहे पण दुष्टपणाची टिंज देण्यासाठी एक संवाद चक्क गब्बरच्या पद्धतीने म्हटला आहे ! थोडक्यात, संगीत हे एक विकण्याचे, मिळवण्याचे, कुरघोडी करण्याचे साधन समजून काढलेले हे पिक्चर आहे ! तुम्हाला अभिनय येत असला तर ( या चित्रपटात अभिनयाचीही सप्तके त्रासदायकपणे फिरण्याचे प्रकार आहेत ! ) तुम्ही दोन मिनिटांत आमूलाग्र हृदयपरिवर्तन करून घेऊ शकता ! ते सदाशिव नामक इसम शेवटी एक मस्त डायलेमा टाकतं – तुम्हाला माझं गाणं आवडलं तर तुम्ही मला शिष्य करून घ्यायचं – आणि नाही आवडलं तर जगून उपयोगच काय ? इतका चांगला माणूस पाहून आपण जाम खुश होतो ! माणूस दुष्ट असो की चांगला – तो उत्तम कलावंत असू शकतो – हे एक महत्वाचे सत्य हा चित्रपट आपल्याला दाखवतो ! आणि खरेच, चांगलेच गातात की सगळे ! बुद्दू राजा, मुकी राणी आणि प्रजा आंधळी -- असा मस्त भरजरी माहोल ! जाऊ द्या, असा लिहीत बसलो तर एक मोठा लेखच होईल – इतके नको ! थोडक्यात बोलायचे तर – हा एक -- खोट्या कथेचा, अभिनयाने बरबटलेला, बावळट, दिमाखी चित्रपट आहे ! काळजात वगैरे काहीच घुसत नाही, पण, मराठी माणसाच्या खिशात गॅरंटीड हात घुसवण्याची कुवत असलेला हा चित्रपट आहे ! भरपूर गर्दी !

--- ००० ---

# सुसाट

आज ‘ सुसाट ‘ हे नाटक पाहिले. मला नुसते आवडले असे नाही तर महत्त्वाचेही वाटले. जवळजवळ हे पूर्ण नाटक एका निनावी रेल्वे स्टेशनच्या फलाटावर आणि तिथल्या वेटिंगरूममध्ये घडते. नाटक सुरू झाल्यावर थोड्याच वेळात प्रेक्षकांना हे कळते की ही एखादी वास्तववादी कथा मांडली जात नाहीय. तो तर्क बाजूला ठेवून, या नाटकाचे सत्य स्वीकारून हे

पाहायचे आहे. या बाबतीत नाटक सहजच प्रेक्षकांना वश करून घेते. ही एक छान फँटसी आहे. दिलखुलास आणि गंमतशीर ! फलाटावर गाडी येणे, वेग कमी होत थांबणे, त्या गाडीच्या एका दारातून कुणी उतरणे, चढणे, पुन्हा गाडी जाणे, काही गाड्या न थांबता फास्ट निघून जाणे – या गोष्टी तर टाळ्याच घेतात ! आहे कशाबद्दल हे नाटक ? निरनिराळ्या माणसांना निरनिराळे त्यांच्या त्यांच्या आयुष्यातले आठवून, त्या त्या मार्गाने अर्थ समजू शकेल. मुख्यतः हे सर्वसामान्य आयुष्य जगणाऱ्या माणसाचे नाटक आहे. म्हटले तर किरकोळ पण त्याच्या दृष्टीने मोठे असे स्वप्न घेऊन जगणारा माणूस ! ते स्वप्न त्याच्या पिढ्या न पिढ्यांनी बाळगले पण त्यांतले कुणीही त्यात यश मिळवू शकले नाही. असे जगणे एका वेगळ्याच माहोलात मांडणारी अशी ही एक गंमतीशीर ‘ शोकात्मिका ‘ आहे. एक साधे उदाहरण घेऊ – एखाद्या नावडत्या गावात पोस्टिंग झालेला माणूस घ्या. तिथून त्याला अपेक्षित ठिकाणी बदली होईपर्यंत तो तिथेच अडकून पडतो – कारण नोकरी सोडू शकत नाही. या चक्रातून बाहेर पडण्याची संधीही त्याच्या आयुष्यात एकदोनदा येते पण ती घेण्याची तो हिंमत करू शकत नाही. या सगळ्या गोष्टींकडे हे नाटक एका ‘ विनोदी ‘ अँगलने पाहते – त्याची रडकथा करत नाही. तसे तर बहुसंख्य लोकांचे आयुष्य व्यावहारिक दृष्ट्या खूपच मर्यादित चौकटीतच जाते. याच सत्यावर केंद्रित असलेले हे नाटक आहे. मला या नाटकाचे लेखन आवडले. लेखक अजित देशमुख हे नक्कीच एक चांगले नाटककार मराठीला लाभलेले आहेत. असे नाटक लिहू धजणे हे एक ठीक पण ते व्यावसायिक रंगभूमीवर आणण्याची हिंमत करणे यासाठी अभिजित साटम आणि डॉ. विठ्ठल चौधरी या दोघांचेही खास अभिनंदन ! प्रियदर्शन जाधव यांचे दिग्दर्शन आणि प्रमुख भूमिकेतला अभिनय – दोन्ही उत्तम ! माझा मित्र सुशील इनामदार ( त्याचा हिटलर आठवतोय का ? ) याचा टीसी तर लाजवाबच आहे ! खरे तर त्याच्यासाठीच मी हे नाटक बघायला गेलो आणि ही सगळी रत्ने गवसली ! ‘ मराठी व्यावसायिक रंगभूमीवर वेगळे, नवे काही घडत नाही ‘ अशी तक्रार करणाऱ्यांनी तर हे नाटक अवश्य पाहायला हवे. एकूण प्रेक्षक तर काहीही अडचण न येता या नाटकाशी समरस होतात, ते एंजॉय करतात – असे मला दिसले. मी या नाटकाला, ‘ व्यावसायिक रंगभूमीवरच्या रटाळपणाची कोंडी फोडणारे नाटक ‘ असे म्हणेन. असे जिवंत, सळसळते काही करणाऱ्यांना दिलखुलास प्रतिसाद देणे हे आता प्रेक्षकांचे काम आहे. या नाटकाला भरघोस यश मिळो हीच मनःपूर्वक सदिच्छा !

--- ००० ---

अमुक अशा कोणत्याही विचारसरणीवाल्या समूहाचा ना मी सभासद आहे ना अनुयायी. त्यामुळे, मलाही कुणी फारसे ' आपला ' मानत नाहीत. हे लक्षात घेता, हिंदी चित्रपट गीतांतले माझे सर्वांत आवडते -- गाणे नंबर वन -- कोणते असेल, ते तुम्ही ओळखू शकाल. देवानंद सायकलवरून जात हे गाणे म्हणतो. चाल अशी भारी की सायकल उतारावरून जाते तेव्हा तो फील चालीतूनही यावा ! गाणे -- ' अकेला हूँ मै ' -- महंमद रफी -- संगीत एस डी बर्मन -- चित्रपट –

**' बात एक रात की ' --**

अकेला हूँ मैं इस दुनिया में
कोई साथी है तो मेरा साया

न तो परवाना और ना दीवाना, मैं किसी महफ़िल का
सुनी सुनी राहें थामती हैं बाहें, ग़म किसे मंज़िल का
मैं तो हूँ राही दिल का

जैसे कभी प्यारे, झील के किनारे, हंस अकेला निकले
वैसे ही देखो जी, ये मनमौजी, मौजों के सीनें पे चले
चाँद सितारों के तले
SEPTEMBER 12
--- ००० ---

हे एक गाणे बघा – चित्रपट **‘ जंगली ‘**
हे रफी आणि लता दोघांच्याही आवाजांत आहे.
संगीत – शंकर-जयकिशन.

एहसान तेरा होगा मुझपर
दिल चाहता है वो कहने दो
मुझे तुम से मोहब्बत हो गयी है
मुझे पलकों की छाँव में रहने दो

तुम ने मुझको हँसना सिखाया
रोने कहोगे रो लेंगे अब
आँसू का हमारे गम ना करो
वो बहते हैं तो बहने दो

चाहे बना दो चाहे मिटा दो
मर भी गए तो देंगे दुवाएं

उड़ उड़ के कहेगी ख़ाक सनम

ये दर्द-ए-मोहब्बत सहने दो

-- एक अगदी साधेसे, साध्या शब्दांचे गाणे आहे. पण, यात एक गंमत आहे। आपण रफीच्या आवाजातले विचारात घेऊ. ( लताच्या आवाजातले, मग, ज्याचे तो / ती पाहील. ) पहिल्या कडव्यात प्रेमाचे नुसते निवेदन आहे, पण, तेही ' पलकोंकी छाँवमें रहने दो ' असे रोमँटिक. दुसरे कडवे, थोडा दुरावा गृहीत धरणारे आहे. इथे ' मुझे ' च्या ऐवजी ' हमारे ' येते. माझ्या अश्रूंची तू खंत बाळगू नकोस, वाहू देत ते – या स्टेपला हे कडवे येते. तिसरे कडवे यावर कडी करते ! ' मर भी गए तो ' या थराला जातो विषय ! शेवटच्या दोन ओळी म्हणजे पूर्ण नष्ट होता होता काय होईल याच्या आहेत ! या गाण्यात एक सूक्ष्म डाव आहे – तिला जवळ करून घेण्याचा, दुरावा संपवण्याचा प्रयत्न करण्याचा डाव ! आता, यातल्या शाब्दिक मजा आणखीही पाहता येतील – विचार केल्यावर ते सुचत जाईल. पण, शंकर-जयकिशन यांनी लावलेल्या चालीमुळे या गाण्याची खुमारी खूपच वाढलेली आहे. कसे ते सांगतो.

या चालीची गंमत अशी आहे की पहिल्या कडव्याच्या शेवटच्या दोन ओळींत सुरुवातीला असणारा ' मुझे ' हा शब्द आधीच्या आणि नंतरच्या दोन्ही बाजूंच्या शब्दांना लागू पडतो – जोडला जातो. असे गाणे निर्माण होताना, रोमँटिक सिनेमाचा कथाकार, संवादलेखक, गीतकार आणि संगीतकार हे सर्वच थोड्याफार खुलेपणाने ' चावट ' – प्रेमातली गंमत समजणारे असावे लागतात. ते इथे जमून आलेले आहे. ( श्रोताही थोडा चावट असावा / वी लागतो / ते. ) या पद्धतीने एखाद्या शब्दाचे डबल आवर्तन झाल्यासारखे वाटणे कसे मजेदार आहे, ते इथे जाणवते. सगळे लिहीत बसत नाही. शेवटच्या कडव्याची गंमत बघा. हे कडवे एकदम उंच पट्टीवर जाते ! सुरांच्या तांत्रिक भाषेत कुणी याचे नीट वर्णन करू शकेल. इथे मरणाचा – नष्ट होण्याचा विषय आहे ! आणि शेवटची गंमत म्हणजे –' ये दर्द-ए-मोहोब्बत सहने दो ' या ओळीनंतर लगेच पुन्हा ' मुझे ' येते ! आणि ते पुढे ' तुमसे मोहोब्बत हो गई है ' या पालुपदालाही चिकटते !

हिंदी गाण्यांचे शौकीन खूप आहेत इथे आपल्या फ्रेंडसमध्ये – त्यांनीही मधून मधून त्यांना आवडणाऱ्या गाण्यांबद्दल – थोडे उलगडून दाखवत लिहावे – मजा येत राहील.

--- ००० ---

कोणते गाणे बरे ते – दिन, पंछी – काही केल्या आठवत नव्हते. अचानक उगीचच एखादे गाणे मनात येते पण आठवत नाही, असे झाले होते. ही आज दुपारचीच गोष्ट. नेटवरही शोधायचा प्रयत्न केला – नाही जमले. मग, नाद सोडून दिला. संध्याकाळी फिरायला गेलो असताना लोकशाहीर अण्णाभाऊ साठे रंगमंदिराबाहेर रफीच्या ८० गाण्यांच्या कार्यक्रमाचा बोर्ड लागलेला पाहिला – आणि काय चमत्कार ! मनात – याद न जाये बीते दिनोंकी – हे सुरूच झाले ! दिन, पंछी नव्हे –

ते – दिन जो पखेरू होते – असे आहे ! याचा अर्थ, मेंदूने ते काम सुरू ठेवलेले होते – माझ्यासाठी ते गाणे शोधूनही ठेवलेले होते – विषय समोर येताच झटकन त्याने मला ते दिलें ! मी स्वतः दिशा देत नसतानाही काम झालेले होते ! कमाल वाटली ! माझ्याच मेंदूची !

हे ते गाणे – रफी – **दिल एक मंदिर --**

याद ना जाये, बीते दिनों की
जा के ना आये जो दिन
दिल क्यों बुलाये, उन्हें दिल क्यों बुलाये?

दिन जो पखेरू होते, पिंजरें में मैं रख लेता
पालता उनको जतन से, मोती के दाने देता
सीने से रहता लगाये

तसवीर उनकी छूपा के, रख दू जहाँ जी चाहे
मन में बसी ये मूरत लेकिन मिटी ना मिटाये
कहने को हैं वो पराये
--- ००० ---

माझे तीन मित्र, डॉ Sharad Bhuthadia, Yogesh Soman , Ajit Satbhai हे तिघे ' **दृश्यम** ' मध्ये आहेत आणि त्या चित्रपटाबद्दल चांगलेही बोलले जात होते म्हणून काल तो पाहिला. मसाला पटाच्या अंगाने न जाणारा एक वेगळा चित्रपट पाहायला मिळाला. त्यातले तर्कदोष वगैरे काढत बसावे, असे वाटण्याइतका महत्त्वाचा नाही वाटला. पण, ठीक.

मला वेगळेच सांगायचे आहे. या निमित्ताने, अनेक वाद्यांच्या मेळातून तयार झालेली राष्ट्रगीतनिर्मिती पाहिली ! अप्रतिम ! अनेक वाद्ये, अनेक जातीधर्मप्रांत आणि स्त्री-पुरुष कलाकार यांनी घडवलेले हे वाद्यांचे राष्ट्रगीत खूपच आनंद देणारे वाटले ! सगळे जग, मानवजात एक होईल तेव्हा राष्ट्रगीतांचे अस्तित्व राहणार नाही -- तसे घडावे, असे वाटणे हे नॉर्मलच आहे -- पण, सध्या हा वाद्यमेळ पाहावाच / ऐकावाच, असा आहे ! दोन मिनिटांत घडणारी कमाल आहे ही ! तिथेच तिकिटाचे पैसे वसूल झाले, असे मला वाटले !

--- ००० ---

हिंदीत निघालेल्या आणि निघत असलेल्या असंख्य चित्रपटांमुळे, इथल्यासारखी अशी लाखो प्रेमगीते जगातल्या इतर कोणत्याच भाषेत नसतील, असे वाटते ! ( शिवाय इतर अनेक मूडसचीही असंख्य गाणी आहेतच ! ) भारतीय जनमानसाला या अद्वितीय वस्तुस्थितीमुळे थोडीफार तरी तरलता लाभत असावी ! हिंदी चित्रपटांचे हे सौंदर्य दुर्लक्षून चालणारच नाही !

--- ००० ---

काही छोटेमोठे आनंद-खेद, सुखदुःखे यांचा आपल्या मनाच्या घडणीत महत्त्वाचा वाटा असतो. अलिकडेच माझ्या मनात एका मोठ्या आनंदाची भर पडली. माणसाला सांस्कृतिक जिवंतपणा देणाऱ्या गानतपस्विनी **किशोरी अमोणकर** ' नांदी ' च्या १०० व्या प्रयोगाला उपस्थित होत्या ! ( हे अर्थात मला टीव्हीवर सादर झालेला तो प्रयोग पाहताना कळले. ) त्या नाटकात माझ्या एका नाटकातले एक दृश्य सादर झाले. आपल्या कलेचा एक, छोटा का असे ना, भाग त्यांनी पाहिला -- हा तो आनंद ! त्यांना आवडण्या-नावडण्याचा प्रश्न नव्हता, कारण पूर्ण नाटक काही सादर झालेले नव्हते. ज्यांच्यापुढे नतमस्तक होताना माझा अहंकार कणभरही आड येणार नाही, अशी ही महान व्यक्ती ! आपली कला कधीतरी आपल्याला एक वेगळीच समृद्धी देऊन जाते, ती अशी !

--- ००० ---

नसिरुद्दिन शहा त्याच्या एका शत्रूच्या हातात सापडलेला असतो. नसीरला काही सुनवून तो शत्रू त्याला गोळी घालणार असतो. पण ते सुनवण्याच्या वेळात नसिर डाव उलटवतो आणि त्यालाच मारून टाकतो. या वेळी नसीरच्या तोंडी एक संवाद आहे -- " हाथमे जब पिस्तोल हो तब गोली चलानी चाहिये -- जबान नही ! " -- आता, समजा, तुम्ही दिग्दर्शक आहात, तर हा संवाद कधी म्हणायला सांगाल तुम्ही नसीरला -- त्या शत्रूला गोळी घालण्या आधी की गोळी घातल्या नंतर ? सकारण उत्तर द्या. ( हा संवाद तर, जबान चालवणाऱ्या त्या शत्रूला उद्देशून आहे -- )

--- ००० ---

## ‘ असंभव ‘

हा सिनेमा जिथून लागला तिथून शेवटपर्यंत सुमारे अर्धापाऊण तास पाहिला. त्याची मूळ कल्पनाव भारताची अब्रू धुळीला मिळवणारी होती. भारताचे खुद्द राष्ट्रपतीच पाकिस्तानच्या अतिरेक्यांनी पळवलेले असून ते त्यांच्या ताब्यात होते ! भारताच्या सुरक्षाव्यवस्थेचा असा पंचनामा कुठेच झाला नसेल ! ‘ हमारा कश्मीर दो – तुम्हारा राष्ट्रपती लो ‘ – असा सौदा सादर झालेला होता ! चारपाच वेगवेगळ्या टोळ्या होत्या – कोण दे शभक्त, कोण देशद्रोही याचा गोंधळ होत राहावा, अशी योजना होती. नसिरुद्दिन शहा, प्रियांका चोपडा, असे भारी लोक होते. एक कॅप्टन नायक होता – त्याचे नाव माझ्या

लक्षात नाही. त्याने अर्थातच प्राणांची बाजी लावून शेवटी राष्ट्रपतींना सोडवले ! राष्ट्रपती होते आपले डॉ. मोहन आगाशे. फार चांगले बेयरिंग घेऊ नका, असे दिग्दर्शकाने त्यांना सांगितलेले असणार. पूर्ण बंडल पिक्चरमध्ये फक्त राष्ट्रपतीच ' खरा ' असे नको व्हायला. आपण एक खोटा सिनेमा काढतोय तर त्यात काहीच फार ' खरे ' वाटायला नकोय, असा योग्य विचार असणार. अतिरेक्यांनी राष्ट्रपतींना एका साध्या खुर्चीवर बसवल्यावर ते अगदीच एक कॉमन मॅन वाटत होते. त्यांच्या नजरेवरून त्यांना फारसे काही येत असेल, असे वाटतच नव्हते ! त्यामुळे, ज्या देशाचे राष्ट्रपती असे आहेत, त्या देशाचे राष्ट्रपती पळवले जाणे सहज शक्य आहे, हे पटत होते ! अशा या खरेपणामुळे, प्रेक्षकांना गुंगवून ठेवणे जमलेले होते ! वाईट पिक्चर काढतानाही टॅलेंट लागते ते असे ! मला मजेदार वाटला हा सगळा प्रकार ! आपापला जीवनपट जगून सादर करताना आपल्यालाही अशा टॅलेंटची गरज असते, असा एक छुपा संदेशच हा चित्रपट देतोय, हे जाणवल्याने त्याची कलात्मक उंचीही वाढल्यासारखे वाटले !

--- ००० ---

# ' कोर्ट '

पाहिला. एखादी गोष्ट नुसती सलग न मांडता ती, तिच्या आजूबाजूच्या माहोलासह आणि इतर संबंधितांच्या, त्यांच्या त्यांच्या जगण्याच्या नमून्यांसह मांडणे – ही आकलनाची एक महत्त्वाची पद्धत मराठीत तरी इथे प्रथमच आलेली असावी. एकच मुद्दा मला नीट कळला नाही किंवा नीट पोचलाही नसेल – तो असा – पोलिसांना आधीच भरपूर कामे असतात, अनावश्यक ( काही वेळा तर, आवश्यकही ) तक्रारी, केसेस टाळण्याकडे त्यांचा कल असतो – तर, या शाहीराला विनाकारण यात अडकवून स्वतःची कामे वाढवून घेण्याचे त्यांना कारणच काय ? यात कुणाचे काय इंटरेस्ट होते ? त्या पवारचा मृत्यू अपघाताने झाला अशी नोंद झाली असती तरी कुणाचे काय बिघडणार होते ? ( समजा, म्युनिसिपालिटीतल्या अमुक एका अधिकाऱ्याने त्या पवार या मयत सफाई कर्मचाऱ्याला संरक्षक साधने देणे अपेक्षित होते – ते न केल्यामुळे त्याच्यावर या बाबतीत शिस्तभंगाची कारवाई होऊ शकते -- तो भ्रष्टाचारी आहे – त्या संभाव्य कारवाईतून बचावण्यासाठी, पैसे चारून त्याने हे काही खोटे उभे केले असते तर या सिनेमातल्या ऍब्सर्डिटीला काही अर्थ आला असता का ? ) या सिनेमासाठी घेतलेली मेहनत आणि संबंधित-असंबंधित गुंफण लाजवाब आहे ! जो तो आपापले जगतो आहे, तरीही, बचावाचा वकील जामीनासाठी स्वतः एक लाख भरतो, हे वेगळे आहे ! ते असो. हा खोटा खटला उभा राहण्यासाठी एक ' खोटा भक्कम ' पाया निर्माण केला असता तर भारतातल्या अत्यंत महत्वाच्या सिनेमांत हा सिनेमा जाऊ शकला असता, असे वाटते. ' श्वास ' पेक्षा तर हा सिनेमा खूपच उजवा आहे ! मुख्य म्हणजे, ' श्वास ' पारंपरिकच होता. मला हा सिनेमा आवडला. आता मराठीतले माझे आवडते तीन झाले – ' चोरीचा मामला ', ' टिंग्या ', आणि हा – ' कोर्ट ' !

पण, काफ्काची ' ट्रायल ' आठवावी इतके यात काही नाहीय.

सिनेमा संपल्यावर बाहेर पडताना ऐकलेली तीन वाक्ये --

हंड्रेड परसेंट फ्लॉप !

ऍवॉर्ड विनिंग पिक्चर !

मॅनेज केले असणार !

आहे त्याच धूमधडाक्यात आणि बनवाबनवीत सगळ्यांना रमता येत राहो, हीच सदिच्छा !

--- ००० ---

' वो जब याद आये ' हे महंमद रफी आणि लता यांनी गायलेले गाणे एकाच गायकाने दोन्ही आवाज काढत हुबेहूब तसेच गायलेले काही दिवसांपूर्वी व्हाटसपवर कुणितरी मला दाखवले होते ! मला तर तो एक चमत्कारच वाटला ! कोण आहे तो गायक ?

-- साईराम अय्यर.

--- ००० ---

**लोकमान्य**

एकदा पाहायला हरकत नाही. मेहनत आहे, बऱ्यापैकी त्या काळाचा आभास आहे आणि भराभर काही भूतकाळी घटनांची उजळणी आहे. मी काही इथे परीक्षण करून मार्क्स द्यायला बसलेलो नाही. याच्यावरून मला दुसरेच काही सुचले असून, ते सांगायचेय. तुम्ही अमिताभच्या तरुणपणातले सिनेमे पाहिले असतील – जंजीर, दीवार, कूली, वगैरे. त्या सिनेमांचे एक वैशिष्ट्य असे – अमिताभ दोन मूडसमध्ये आलटून-पालटून असे – सहन करणे आणि क्रोध. तो कधी हसतबिसत नसे. त्याच दोन मूडसमध्ये इथे टिळक कायम असलेले दिसतात. लोकांना अशा क्लेशकारक मूडसचे सातत्य करमणूक म्हणून आवडते ! मध्यांतरापूर्वी तर “ डॉनको पकडना मुश्किलही नही, नामुमकिन है ! “ – या वाक्याचा थेट मराठी अनुवादच ऐकायला मिळतो ! पकडनाच्या ऐवजी दुसरे काही !

--- ००० ---

**एफबी पोस्ट २०१६ मधून --**

काल दोन नाटके पाहिली –

# १. अपूर्व मेघदूत

‘ मेघदूत ‘ हा गणेश दिघे याचा श्वास आहे, असे म्हणावे इतका त्याचा त्या बाबतीतला अभ्यास आहे. त्याची रंगावृत्ती असलेले ‘ अपूर्व मेघदूत ‘ काल पाहिले ! दिग्दर्शक होते स्वागत थोरात. हा प्रयोग खरोखरच अपूर्व होता ! हे नाटक सादर करत होते १९ अंध कलाकार ! एक पाऊलही न चुकता, आगमन-निर्गमन वेळा आणि हालचाली बिनचूक ठेवत ! यासाठी , अर्थातच सर्वांनी काही महिने अथक मेहनत घेतलेली होती ! आपण जगण्याच्या मुख्य प्रवाहातून कायम बाहेरच राहणार, असे वाटणाऱ्या या कलाकारांना घेऊन हे सादर करणे सोपे नव्हते. नाटकानंतर त्या सर्व कलाकारांना वाटणारे समाधान पाहून धन्य वाटले ! प्रयोग अंधांचा आहे म्हणून निर्मिती साधी, काटकसरी करू, असा विचार नव्हता ! जबरदस्त कपडेपट, आवश्यक ती सर्व प्रकाश योजना, गाण्यांचे उत्तम रेकॉर्डिंग, आणि आवश्यक ते सर्व मुखवटे आणि साधनसामुग्री यांनी युक्त असा हा एक समृद्ध प्रयोग होता ! आपण या सर्वांच्या आनंदात सहभागी होऊ शकलो याचे समाधान वाटले ! एकाच क्रमाने अनेकदा काही गोष्टी घडत राहिल्याने नाटकाला थोडा एकसुरीपणा येतो आहे – त्यात वैविध्य आणून कशी सुधारणा करता येईल, हे पाहावे.

या प्रयोगापासून असंख्यांना स्फूर्ती आणि ऊर्जा प्राप्त होईल, हे निश्चित !

# २. साखर खाल्लेला माणूस

दिग्दर्शक म्हणून जबाबदारी घेणारा विद्यासागर अध्यापक याला नेतृत्व देऊन आम्ही पुण्यात ‘ अवकाश कलामंच ‘ ही नाट्यसंस्था सुरू केली. आता तो कोल्हापुरात एका रेडियो स्टेशनचा प्रमुख असून उत्तमोत्तम नाटकेही लिहीत आहे. ‘ आधी बसू आणि मग बोलू ‘ या नावाचे त्याचे एक छान नाटक येऊन गेले. त्यात संजय नार्वेकरांची अभिनयातली कमाल बघायला मिळाली होती. आता त्यानेच लिहिलेले ‘ साखर खाल्लेला माणूस ‘ हे नाटक व्यावसायिक रंगभूमीवर आलेले आहे. मुख्य भूमिकेत प्रशांत दामले आहेत ! नाटकाच्या कणाकणात चैतन्य भरायला हा नट ऊर्जा आणतो कुठून, हा प्रश्न पडावा असा सगळा चौफेर टोलेबाजीचा खेळ ! बाकी सगळे सांगत बसत नाही. वेगात संवाद चालू असणे , त्याच वेळी फोन वाजणे, त्याच वेळी दारावरची बेल वाजणे, काही शोधाशोध सुरू असणे – असे आजच्या जगण्यातले बरेच वैतागवाणे तुकडे या नाटकात आहेत ! एका दिलखुलास, हलक्याफुलक्या पद्धतीने एक गंभीर विषय मांडणारे असे हे नाटक आहे. मजा आली !

--- 000 ---

आजच्या काळातल्या विस्कटलेल्या डोक्यांच्या आंतरभागाचा फोटो काढून समोर ठेवणारे नाटक **' अमर फोटो स्टुडिओ '** पाहिले.

नाटकाची रचनाही तुकड्यातुकड्यांची विषयाला साजेशी आहे. खास अशी गोष्टबिष्ट नाही. पण, दोन अंक धरून ठेवते नाटक. चांगला अभिनय, जोरदार संगीत, गाणी आणि नाचही आहेत. मनस्विनी लता रवींद्र हिचे हे नाटक निपुण धर्माधिकारीने नाट्यमाध्यमाच्या खुब्या वापरून चांगले बसवले आहे.

कोणत्याही काळात जाण्यायेण्याची फँटसी लोक सहज स्वीकारतात, हे नाटकाचे यश आहे !

नाटकाचा शेवट बराच लांबल्यासारखा वाटला.

असे नाटक व्यावसायिक रंगभूमीवर येणे आणि ते स्वीकारले जाणे हे रंगभूमीच्या प्रगतीचे लक्षण वाटले !

--- 000 ---

चित्रपट **' इश्क पर जोर नही '** ( मी पाहिलेला नाही. ) महंमद आणि लता.

गाणे ' ये दिल दिवाना है ' ! वा ! दिल दीवाना असण्याची आवर्तने ऐका ! हे ज्याला सुचले असेल तो जीनियस !

एकाच्याच तोंडूनही ती आवर्तने ऐकताना माणूस गुरफटून जाईल – इथे तर तो आणि ती –

दोघांचीही आवर्तने एकमेकांत मिसळताहेत ! प्रेमभावनेत बुडून बेभान होणे !

-- ये दिल दिवाना है, दिल तो दिवाना है, दीवाना दिल है ये, दिल दीवाना !

त्या वेळी, ऐकताना, या गाण्याला सलाम ठोकायचे राहून जाते – जरा वेळाने सलाम !

--- 000 ---

**सहा विद्वान सत्याच्या शोधात**

राज्यसभा या चॅनेलवरच्या **' सरोकार '** या कार्यक्रमात एक चर्चा ऐकली. दहा हजार चर्चा ज्या चर्चेवरून ओवाळून टाकाव्यात अशी चर्चा. या चर्चेच्या क्लिप्स जितके लोक पाहतील तितकी देशातली समज वाढेल. या चर्चेतले विद्वान खरोखरचे विद्वान होते आणि खूपच समजुतदार आणि एकमेकांचे ऐकून घेण्याची कुवत असलेले होते. सूत्रसंचालन करणाऱ्या बाईही विद्वानच होत्या. अशी चर्चा मी टीव्हीवर कधीच ऐकली नव्हती. आपापली मते नुसती गोंजारत बसणाऱ्या सर्वांसाठीच ही एक उद्बोधक चर्चा झाली. याची क्लिप कुठे असते का ते मला माहीत नाही, पण, असल्यास इथे जरूर शेयर करावी. या चर्चेचा विषय होता --

Politics of post-truth म्हणजे उत्तर-सत्याचे राजकारण ! म्हणजे खोटेपणाचे राजकारण, समजा !

वा रे वा ! दिल खुश हुवा ! विद्वानांच्या चर्चेतून ‘ सत्य ‘ म्हणजे काय, हे कळण्याची शक्यता नव्हतीच, पण, तो विषय जो चहू बाजूंनी ढवळला गेला ते मला खूपच आवडले ! ती चर्चा ट्रंप यांचे निवडून येणे, यावर मुख्यतः केंद्रित होती, पण, मधून मधून मोदींचे सरकार निवडून येणे, यावरही बोलले जात होते. ही पूर्ण चर्चा विद्यार्थ्यांच्या एका गटासमोर चालली होती. विद्यार्थीही नम्र, एकाग्रतेने ऐकणारे आणि भारी होते ! त्यांचे प्रश्न उत्तम होते !

जमल्यास मिळवून ऐका ! ये बार बार नही होता !

--- 000 ---

माझ्या शाळकरी वयात आम्ही मालाडला आणि माझी मावशी विलेपारल्याला, असे होते. माझा मावसभाऊ हा माझ्या निवडक मित्रांपैकी एक होता. त्यांच्या शेजारीच एका बऱ्यापैकी श्रीमंत कुटुंबाचा बंगला होता. बंगल्याभोवती मोठी मोकळी जागा, जामची झाडे वगैरे असलेला. त्या कुटुंबातल्या मुलांशी माझ्या मावसभावाची मैत्री होती. त्यामुळे, माझेही तिकडे जाणे व्हायचे. त्या कुटुंबातल्या मोठ्या मुलाने, जो आमच्यापेक्षा बराच मोठा होता, **‘ काला बाजार ‘** हा सिनेमा यायच्या आधीच त्याच्या गाण्यांच्या तबकड्या आणल्या होत्या ! हे प्रचंड सनसनाटी होते ! त्या ऐकण्याच्या कार्यक्रमाचे आम्ही पहिले लाभधारक होतो ! यामुळे शाळेतल्या मित्रांत काही दिवस मी एक स्पेशल माणूस होतो !

हे आठवायचे कारण, खरेच, आवडतेच मला हिंदी चित्रपटसंगीत ! माझे वडील शास्त्रीय संगीताचे भोक्ते आणि अभ्यासकही होते – ते गातही असत. ते म्हणत की या हिंदी गाण्यांच्या हजारपट समृद्ध आहे शास्त्रीय संगीत ! मलाही ते पटते, मी तेही अनेकदा तन्मय होऊन ऐकतो. तरीही, हिंदी चित्रपट गीतांचे महत्त्व काही कधी कमी वाटले नाही. याचे कारण काय असावे याचा विचार करता मला एक दिसते, ते असे की या गाण्यांमध्ये प्रचंड नाट्य आहे आणि त्याचेच मला खूप आकर्षण असणार. सुमारे ५५ ते ७०-७५ चा काळ हा या गाण्यांचा सुवर्णकाळ होता ! मी अभ्यासही गाणी ऐकत ( होता आमच्याकडे एक सेकंड हँड रेडिओ ! ) करत असे. बिनाका आणि नंतर सिबाका गीतमाला चुकणे म्हणजे प्राणसंकट वाटत असे ! अमीन सयानी हे खास आपले वाटत ! त्या काळात संगीतकारही एकापेक्षा एक भारी होते. शेकडो चाली – प्रचंड वैविध्य आणि तरलता, गोडवा, आक्रमण – सगळे ! शंकर-जयकिशन, एस. डी. बर्मन, सलील चौधरी, मदनमोहन, रवी, रोशन, चित्रगुप्त, गुलाम महंमद, नौशाद आणि ओ. पी. नय्यर ! सगळेच ग्रेट ! अजूनही मी ती गाणी जमेल तेव्हा ऐकतो. त्या वेळी प्रत्येक गाण्याचे सगळे तपशील – कुणी म्हटलेय, चित्रित कुणावर झालेय, वगैरे सगळे पाठ असत ! माझे दोन इंजिनियर आतेभाऊ आहेत – जे आपापल्या क्षेत्रात अद्वितीय ठरले – त्यांना तर ते सगळे अजूनही जसेच्या तसे पाठ आहे ! कोणता चित्रपट कोणत्या साली आला होता – यासह !

आताची गाणी, जगण्याला आलेल्या वेगामुळे सपाट झालेली वाटतात ! बडवत बसणे चाललेय नुसते, असे वाटते. त्यात नाट्यही फारसे दिसत नाही. प्रत्येक मागची पिढी असेच म्हणते, असे नाही म्हणता येणार. आजच्या पिढीचा विषय घेऊन लिहिलेले माझे एक नाटक हिंदीत अनुवाद होऊन मुंबईत झाले तेव्हा पूर्ण प्रेक्षक मुंबईतल्या मिश्र तरुण-तरुणींचा होता आणि त्या सर्वांना ते नाटक त्यांचे वाटले – खूप आवडले ! मी पुढच्या पिढीशीही जोडलेला आहे. असो.

हिंदी चित्रपट संगीत आणि त्यातले नाट्य अमर आहे !

--- ००० ---

गगन देव रिआर आणि महेश केसकर यांचे दिग्दर्शन

आणि

गगन देव रिआर आणि सारिका सिंग यांचा उत्तम अभिनय

यांनी युक्त असा, माझ्या **‘ प्रेमच म्हणू याला हवं तर … ‘** या नाटकाचा हिंदी अनुवाद

**‘ रिनोव्हेशन ‘** या नावाने मुंबईत पृथ्वी थिएटरमध्ये, फ्रिंज नाट्य महोत्सवात काल सादर झाला !

प्रकाश, नेपथ्य आणि संगीतही पूरक, छान होते !

प्रयोग उत्तम झाला ! माझ्याच संवादांवर मी पुन्हा एकदा खुश झालो !

प्रेक्षक तर खूपच खुश झाले !

मुंबईतल्या तरुणाईसमोर हिंदीतून माझे नाटक प्रथमच सादर झाले !

“ हम पुराने जमानेके जेलर हैं “ हे वाक्य मला कधीच म्हणावे लागणार नाही, याची खात्री पटली !

माझ्या नाटकांबद्दल उत्सुकता निर्माण झाली – हे एक छान घडले !

या नाटकाचे हिंदी आणि मराठीतून प्रयोग होत राहणार आहेत.

हे नाटक यापूर्वी आपले मित्र रवींद्र लाखे यांनी बसवले होते –

तो एक वेगळाच उत्तमपणा होता ! एकच नाटक किती वेगवेगळ्या प्रकारांनी मजा आणते

हे पाहून मस्त वाटले !

नाटक संपल्यावर प्रत्यक्ष भेटून अनेकांनी भरभरून प्रतिसाद दिला !

एकाच महिन्यात माझे ‘ ढोलताशे ‘ कानडीत आणि इकडे हे हिंदीत झाल्याने

आणि दोन्ही ठिकाणी ती नाटके उत्तम स्वीकारली गेल्याने,

आपली नाटके अन्य भाषिक प्रेक्षकांनाही चांगली पोचू शकतात याचे समाधान वाटले !

मूळ पृथ्वी थिएटरच्या समोरच आणखी एक मिनी थिएटर ( पृथ्वीचेच ) तयार झाल्याचे मी पहिल्यांदाच पाहिले.

८०-९० ची क्षमता असलेले हे एक छान आटोपशीर थिएटर आहे !

‘ रिनोव्हेशन ‘ तिथे झाले – थिएटर फुल होते !

शिवाय गिरीश पतके आणि विवेक जाधव या जिगरी मित्रांबरोबर गप्पा झाल्या !

आणि मुख्य म्हणजे आमच्यांत काही नवे प्लॅन्स शिजले !

एकूणात कालचा मुंबई दौरा छानच झाला !

--- ००० ---

**अपरिभाषित**

एका नव्या लेखक-दिग्दर्शकाचे हे नाटक पाहून आजचा रंगभूमीदिन साजरा केला. त्याचे नाव सौरभ दिघे. आस्तिक-नास्तिक, श्रद्धा-अंधश्रद्धा या विषयावर संवाद देणारे – भेदक व सखोल चर्चाही करणारे नाटक लिहिणे आणि ते सादर करणे, हे धाडसाचे काम आहे. सुदर्शन फुल भरलेले होते. आणि इतक्या प्रेक्षकांना नाटकाने छान बांधून ठेवलेले होते. एवढ्यावरूनच प्रयोगाची कमाल मान्य व्हावी. अलिकडे वेगवेगळी आव्हाने घेणारे काही चांगले लेखक या क्षेत्रात येत आहेत. अजित देशमुख, युगंधर देशपांडे, दत्ता पाटील, प्रणव सखदेव आणि आता हा सौरभ दिघे. अंगद, अनंत आणि अमृत यांची अभिनय-साथ आणि सर्व तांत्रिक अंगे उत्तम पूरक, यांमुळे प्रयोग चांगला झाला. काही वेळी काही प्रयोगांना भिडस्तपणे जाणे होते आणि मग वेळ वाया गेल्याची खंत वाटते. तसे इथे झाले नाही. वेळ खरोखरच सार्थकी लागला !

आजच्या रंगभूनीदिनी सौरभ दिघे या नव्या लेखक-दिग्दर्शकाचे स्वागत !

‘ प्रयोग ‘ संस्थेचे अभिनंदन !

--- ००० ---

एखाद्या प्रणयचतुर स्त्रीने प्रियकराच्या एखाद्या प्रश्नाचे उत्तर न देणेच ‘ दर्जेदार ‘ असते आणि तसे ते न देऊनही ती ते देऊन टाकत असते. हिंदी चित्रपटांच्या गाण्यांत अशा मस्त गंमती खूप असतात. आत्ताच **‘ ऐलान ‘** या चित्रपटातले, शंकर-जयकिशन यांची चाल असलेले एक मजेदार गाणे ऐकले –

रफी – आपकी राय मेरे बारे में क्या है क्या है कहिये

शारदा – सोचके बतायेंगे हम मिलते मिलते रहिये

-- दिलेय का उत्तर ? नाही ? याच्या इतके परिपूर्ण आणि दिल कब्जात घेणारे कोणते असू शकेल उत्तर ?

(अधिक उकल वा फोड करून हवी असेल तर – ‘ मिलते रहिये ‘ – यातच दिले गेलेय ना ते उत्तर !

हे एवढे तरी समजणारा असायला हवा प्रियकर, नाही तर, काय बोलावे -- )

--- 000 ---

अत्यंत सुमार, कंटाळवाणा, अनावश्यक ‘ प्रायोगिक ‘ असा एक मराठी चित्रपट पाहिला – **मिस्टर अँड मिसेस अनवाँटेड !** द्विपात्री चित्रपट ! असे धाडस यापूर्वी मराठीत झालेले नाही ! या चित्रपटामुळे माझ्याही डोक्यात आलाय विचार -- आपणच का लिहू नये एखादा चित्रपट ? मला हव्या त्या वेळेला हाच उपलब्ध होता म्हणून पाहिला ! बाल्कनीमध्ये आम्ही फक्त पाच प्रेक्षक होतो – मध्येच दोन निघून गेले ! रस्यातून गल्लोगल्ली भटका हवे तर तासदीड तास पण या सिनेमाच्या वाटेला नका जाऊ –

--- 000 ---

माझा दिग्दर्शक मित्र गिरीश पतके याने, दत्ता पाटील लिखित **‘ हंडाभर चांदण्या ‘** या दीर्घांकाची खूप स्तुती केलेली माझ्या लक्षात होती. काल या लेखकाच्या दोन दीर्घांकांचा पुण्यात प्रयोग होता आणि त्याने प्रेमाने बोलावले होते, त्यामुळे, ती संधी साधली. प्रयोगाचे उत्पन्न दुष्काळग्रस्तांना जाणार होते, त्यामुळे, तिकीट काढून प्रयोग पाहिला. प्रयोग पाहून धन्य वाटले ! माझे लक्ष, अर्थातच, आधी लेखनाकडेच जाणार. दत्ता पाटील हा मराठीला लाभलेला एक अत्युत्तम नाटककार आहे. माझा मित्र अभिजित झुंजारराव याने दिग्दर्शित केलेले या नाटककाराचे व्यावसायिक रंगभूमीवरचे ‘ स्ट्रोबेरी ‘ हे नाटकही पाहायचेच, असे मी आता ठरवलेले आहे. हे दोन्ही दीर्घांक सचिन शिंदे याने दिग्दर्शित केलेले आहेत.

समजून आणि उत्तम !

## ‘ हंडाभर चांदण्या ‘

पाणी नसलेल्या एका फक्त ३०० लोकवस्ती असलेल्या दुष्काळी गावात पाण्याच्या टँकरची वाट पाहिली जाणे, हा या दीर्घांकाचा विषय आहे. सूर्य पूर्वेकडून उगवतो तसा हा टँकरही पूर्वेकडूनच येणार आहे. कितीही अर्ज-विनंत्या करूनही कुणी लक्ष देत नसल्याने गावातला एक कार्यकर्ता संबंधित स्त्री-तहसिलदार व्यक्तीलाच पळवून आणतो आणि दबावाने टँकर मिळवायचा प्रयत्न करतो. पुढे सुमारे ७० मिनिटे नुसते वाट पाहणे दाखवले जातेय ! पाहणाऱ्याच्या घशाला कोरड पडावी असे जबरदस्त नाटक ! एक मिनिटही ढील न देणारे. सर्व टीमची उत्तम साथ लाभलेले. सुरुवात जरा पडेल झाली. मास्तर या पात्राचे संवाद नीट कळत नव्हते. काहीजण वाक्याचा शेवटचा भाग पाडत होते. या प्रयोगाला कुठेही ताकद

कमी पडून चालणार नाही, हे सर्वांनी लक्षात ठेवायला हवे. तांत्रिक अंगे उत्तम संभाळली गेली. पाणी खूप लांबून आणावे लागणे, त्याची खूपच कमतरता असणे म्हणजे काय याचा हा एक धगधगीत अनुभव होता. प्रत्येक क्षण जीवन-मरणाचा वाटावा, असा !

## ' गढीवरच्या पोरी '

हा दीर्घांक तर सर्वगुणसंपन्नच झाला ! यातल्या चारही मुलींनी तो अफलातून सादर केला. आशयाची समज आणि काळाचे अचूक भान असलेल्या या अभिनेत्री यांना सापडल्या कुठे, असा प्रश्न पडावा इतकी समरसून त्यांनी अभिव्यक्ती दिली ! या चार वेगवेगळ्या मुली फोनवर आलटून पालटून बोलतात, अशी ही रचना आहे. एक प्रकारे ती त्यांची स्वगतेच आहेत. अप्रतिम ! आपापल्या आयुष्यावर स्वार झालेल्या या स्त्रिया आहेत. त्यांच्या आयुष्यांतले अनेक प्रश्न हाताळण्याची त्यांची सहजता पाहता स्त्रियांचे राज्य सुरूच झाले की काय, असे वाटावे ! लोभस आणि भेदक ! यातल्या आशयाचे तपशील नाही सांगत. संधी मिळाल्यास अवश्य बघा, एवढेच सांगतो.

दत्ता पाटील या लेखकाचे नाट्यरचना आणि संवाद यांतले कौशल्य वादातीत आहे.
बऱ्याच दिवसांनी काही रसरशीत आणि अर्थपूर्ण पाहिले !

निर्माते प्रमोद गायकवाड यांचे अभिनंदन !

--- ००० ---

गणेश दिघे या मित्राचे **' मेघदूत '**
( कालिदासाच्या मूळ संस्कृत काव्याचे मराठीत दर्शन )

गणेश दिघे हा आपला मित्र म्हणजे एक वेगळेच रसायन आहे, हे त्याच्या इथल्या पोस्ट वाचून आपल्याला माहीतच असते. शेती, भटकंतीपासून ते वाईन बनवण्यापर्यंत सगळेच याला आवडते. झाडे, पाने, फळे आणि निसर्गातल्या असंख्य प्रक्रिया यांचे तर त्याला एक जिवंत भानच आहे. याच त्याच्या गुणामुळे तो कालिदसाच्या ' मेघदूत ' या महान काव्याच्या प्रेमात पडला असणार. ते त्याचे आयुष्यभरचे प्रेम आहे, हे त्याच्या ' मेघदूत ' वर त्याने मराठीत केलेल्या कामावरून दिसूनच येते. त्याचा पहिला श्राव्य प्रयोग त्याने बालगंधर्वला सादर केला त्याला आता काही वर्षे झाली. त्या प्रयोगाला त्याने अंध विद्यार्थ्यांना खास निमंत्रित म्हणून बोलावले होते. त्यानंतर त्याने मराठीतला एक बॅले म्हणून ' मेघदूत ' चा

एक साग्रसंगीत, भव्य प्रयोगही सादर केला होता. त्याचे अनेक ठिकाणी प्रयोग झाले होते. काल त्याने पुन्हा एकदा, आषाढाच्या प्रथम दिवसाचे औचित्य साधून, ‘ मेघदूत ‘ चा श्राव्य प्रयोग बालगंधर्वला सादर केला. हा जाहीर प्रयोग नव्हता. त्याने फक्त पाच जणांना निमंत्रित केले होते. त्यांतला एक असण्याचा बहुमान मला मिळालेला होता. तासाभराच्या अशा फक्त श्राव्य प्रयोगासाठी, तेही फक्त पाच श्रोत्यांसाठी, बालगंधर्व घेणे, हे मला वाटते, नुसते अपवादात्मकच नव्हे तर एकमेव घडले असणार !

राहुल घोरपडे यांचे संगीत, शौनक अभिषेकी, रवींद्र साठे आणि धनश्री गणात्रा यांचे ‘ बोलके ‘ आवाज आणि रवींद्र खरे यांचे निवेदन -- असे सगळे रिच होते ! मुख्य म्हणजे गणेशने केलेले त्याच्या प्राणप्रिय कलाकृतीचे मराठीतले लेखन ! पूर्ण रिकाम्या नाट्यगृहात आम्ही पाचजण एक तास डोळे मिटून ऐकत होतो. रंगमंचावर फक्त एक लामणदिवा होता. आपल्या प्रेयसीला निरोप देण्यासाठी यक्षाने निवडलेल्या त्या मेघरूप दूताचा पूर्ण प्रवास आम्ही अनुभवला ! हंस, इतर पशुपक्षी, नद्या, वीज, वारे यांचे आवाज -- असे सगळे भरगच्च होते. या महान काव्यात कालिदास, त्याची मुख्य पात्रे आणि पूर्ण विश्व यांची एकरूपता पाहतो आणि ते पाहणे विलक्षण आहे ! काल ऐकताना आणि इथल्या गणेशच्या पोस्ट वाचूनही, एक मोठे तत्त्वज्ञानत्मक सत्य जाणवले. कुबेराच्या मुंगुसाचे महादेवाच्या नागाकडे लक्ष गेल्याने क्रुद्ध होऊन त्याने कुबेराला शाप द्यावा, त्यातून पुढे कुबेराने त्या यक्षाला शाप देण्याची वेळ यावी आणि त्यातून पुढे या मेघाकडे दूताची भूमिका यावी – हे सगळे पाहता घटनांची साखळी कशी ‘ सगळे मिळून ‘ आणि ' असंख्ययुक्त ' असते, हे लक्षात येते. नुसते एकाच एखाद्या कर्माचे फळ म्हणून काही घडत नसते !

या महान कलाकृतीचा समृद्ध प्रत्यय दिल्याबद्दल गणेशचे मनःपूर्वक आभार ! गणेश स्वतः एक उत्तम कवी असल्यामुळे त्याच्या अभ्यासाला आणि या एकूणच कामाला एक खास जिवंतपणा आलेला आहे !

--- ००० ---

एखादा चित्रकार कधी त्याच्या चित्रात कुठेतरी एक वेगळ्याच रंगाचा ठिपका वा स्पर्श करून ठेवतो आणि तेवढ्याने ते चित्र संपन्न होऊन जाते. तसेच एका गाण्यात घडलेले आहे.

**‘ तुमसा नही देखा ‘** या सिनेमाचे शीर्षकगीत ऐका ! गायक -- महंमद रफी, संगीत – ओ पी नय्यर.

या गाण्यातल्या प्रत्येक कडव्याची शेवटची ओळ झाल्यानंतर येणारा जलतरंगाचा एक थेंब ऐका !

हा थेंब म्हणजे एक अवीट गोडीचा क्षण आहे ! कितीदाही ऐका !

उदाहरणार्थ –

‘ मानके तो देखो कभी किसी का कहा ‘

या ओळीनंतर अचूक क्षणावर पडणारा तो थेंब !

तेवढ्यासाठी ते गाणे मी अनेकदा ऐकतो !

JULY 2

--- ००० ---

May 13, 2016 12:16pm

# किंग लिअर -- राजा लिअर.

‘ प्रत्यय ‘, कोल्हापूर या संस्थेने शेक्सपियरचे ‘ किंग लिअर ‘ हे नाटक, म्हणजे विंदा करंदिकरांनी अनुवादित केलेले ‘ राजा लिअर ‘ हे नाटक, सुमारे वीस वर्षांपूर्वी रंगभूमीवर आणले होते आणि भारतभर गाजवले होते. तेच नाटक आता शेक्सपियरच्या ४०० व्या जयंती वर्षानिमित्त त्यांनी पुन्हा एकदा आपल्या समोर आणलेले आहे. या नाटकातली वैचारिक-भावनिक घुसळण, त्यातली कट-कारस्थाने आणि अनेक पात्रांचे भरगच्च जग यांचा डोलारा उभा करणे, हे सोपे काम नाही. तेव्हा आणि आताही डॉ. शरद भुथाडिया यांच्या समर्थ नेतृत्वाखाली ते शक्य झालेले आहे. भुथाडियांचेच दिग्दर्शन असून राजा लिअरची भूमिका त्यांनीच साकारलेली आहे. म्हातारपण, कन्याप्रेम, भ्रमनिरास, वेडेपणा, पश्चात्ताप, राग-संताप, हतबलता आणि प्रचंड शोक -- अशा असंख्य मानसिक अवस्थांतून जाणारी ही भूमिका साकारणे हे एक मोठेच आव्हान आहे. भुथाडिया, त्यांच्या सखोल अभिनयक्षमतेने हे आव्हान लीलया पेलताना दिसतात ! इतर पात्रांमधून अभिनय करणाऱ्या सर्वच व्यक्तींची आणि तंत्रज्ञांची त्यांना उत्तम साथ मिळतेय.
कालच्या पुण्यातल्या प्रयोगाच्या वेळी ध्वनियंत्रणेचा काही प्रश्न झाला होता, असे समजले. दुसऱ्या अंकात सुधारणा झाली. या नाटकातले संवाद हे या नाटकाचे महत्वाचे वैशिष्ट्य आणि बलस्थान असल्याने, असे काही मुळीच होऊ नये, याची काळजी घ्यायला हवी. यातला प्रत्येक शब्द प्रत्येक प्रेक्षकाला सार्थपणे नीट पोचणे अत्यावश्यक आहे. अशा नाटकाची सुरुवातीची घोषणाही अधिक स्पष्ट आणि सशक्त असायला हवी.
या किरकोळ त्रुटी दुरुस्त होतीलच. पण, भारतीय रंगभूमीवर पुन्हा एकदा ‘ प्रत्यय ‘ चे किंग लिअर आणि ‘ किंग लिअर ‘ चा प्रत्यय हे समीकरण घुमत राहील हे निश्चित ! अशी संधी मिळणे खूप अवघड असते, हे ओळखून कालच्या प्रयोगाला खूप गर्दी होती ! मला विशेष आनंद होण्याचे आणखी एक कारण म्हणजे मी ‘ प्रत्यय ‘ या संस्थेचा संस्थापक सभासद आहे ! हा प्रयोग पाहण्याची संधी कुणी चुकवू नये, ही एक दुर्मीळ गोष्ट आहे, हेच शेवटी सांगेन.

--- ००० ---

# सैराट

‘ सैराट ‘ पाहिला. काहीजण असे म्हणाले की याला जातवास्तवावरचा चित्रपट म्हणून पाहू नका – एक चांगला व्यावसायिक चित्रपट म्हणून पाहा. मला वाटते, हा एक जातवास्तवावरचा चांगला व्यावसायिक चित्रपट आहे. “ हाही एक पाटीलच आहे “ असे वाक्य झाल्यावर, “ असू दे की – पाटलाला तहान नाही लागत का ? “ अशा येणाऱ्या वाक्यातून ते वास्तव अधोरेखित होते.

पण, व्यावसायिक चित्रपट करायचा असल्याने, त्या जातवास्तवाची दाहकता सारखी जाणवत राहू नये, याची काळजी घेण्यात आलेली आहे. ते प्रेमिक पळून जाऊन दुसऱ्या गावातल्या झोपडपट्टीतले अत्यंत हालअपेष्टांचे जीवन जगत असतानाही मधे मधे त्यांच्या हसण्याचे, मजा घेण्याचे तुकडे आहेत. पतिपत्नीतल्या संशय-प्रश्नाचे तुकडेही आहेत.

हुशार, तडफदार, देखणा नायक आणि सुंदर नायिका यांच्यांतल्या आकर्षणाची -- प्रेमाची ही कथा आहे. नायक खालच्या जातीतला आणि नायिका समजा पाटील म्हणजे मराठा जातीतली समजू. राजकीय ताकद, हिंसक गुंडगिरीची ताकद हे नायिकेच्या वडिलांकडे आहे. स्टोरीतला पीळ म्हणजे अर्थातच त्यांचा या प्रेमाला विरोध असणे. प्रेमाची सुरुवातीची प्रक्रिया मजेत, छान चालते, पण, नायिकेच्या वडिलांना कळल्यावर प्रश्न सुरू होतात. सुशिक्षित-अशिक्षित, श्रीमंत-गरीब, भाषाभेदाचे वा धर्मभेदाचे प्रश्न, अशा सर्व शक्यतांचा विचार केला तर जातिभेदाचा प्रश्न घेणे कमी उपद्रवकारक आणि जास्त सनसनाटी होऊ शकते, हे आहेच.

हा नायक काही २०-२० जणांना लोळवणारा नाहीय. तरीही, त्याच्यावर संकटे तर येणारच. उदाहरणार्थ दोनदा त्याला आणि त्याच्या मित्रांना बेदम मारले जाते. अगदी ‘ नटसम्राट ‘ मध्ये पुलाखाली राहणाऱ्यांना लाथा-बुक्या-लाठ्यांनी पोलीस मारहाण करतात, तसेच आवाज येतात. पण, तिथल्यासारखेच, इथेही कुणाला फारसे काही लागत नाही. कुणाचा हातपाय मोडला तर इस्पितळात नेणार कोण, पैशांचे काय, आणि हे करू तरी दिले जाईल का, शिवाय अनावश्यक फाटे फुटतील -- त्यापेक्षा, इतका मार खाऊनही ते सगळे, चालू, पळू शकतात. तसेच परगावात असताना काहीजण वाईट उद्देशाने त्यांना एका बाजूला नेतात -- तिथे मारामारी सुरू होताच संतोषी मातेप्रमाणे एक दयाळू पण कडक भवानी बाई येऊन त्यांना वाचवते. संकटे तर यावीत पण फारशी इजा न होता त्यांनी त्यांतून सहीसलामत बाहेर पडावे, अशी योजना दिसते. अशा प्रकारच्या हिंदी सिनेमात हल्ले जरा अधिक आणि अधिक हिंसक होत असतात आणि नायक-नायिका त्यांतून पार होत राहतात. ते इथे शक्य नाही – इथे ते परिस्थितीशी झगडत, तिला तोंड देत राहतात.

शेवट कसा करायचा आणि तो कसा परिणामकारक करायचा हे ठरलेले असल्याने – एक इकडचे दृश्य, एक तिकडचे दृश्य असे घेतलेले नाही. तो सूडाग्नी वा क्रोधाग्नी धगधगतच होता हे शेवटी कळणारच आहे. ते दाखवत राहिल्यास अपेक्षित धक्का बसणार नाही, हा विचार दिसतो. योग्य वेळी शेजारीण मुलाला घेऊन जाते आणि सर्व झाल्यावर आणून सोडताना,

लांबूनच, जा आता घरी, म्हणते. वास्तवाच्या अंगाने चालल्यासारखा वाटणारा चित्रपट एकदम प्रतीकात्मक होतो. मुलगा निर्मनुष्य जगात बाहेर येणे आणि त्याच्या पावलांचे ते रक्त-ठसे. निष्पापांच्या हानीचे वाईट वाटणे, अरेरे वाटणे, कीव वाटणे, माणूस किती क्रूर असतो, असे वाटणे, असे कधीच कुणी वागू नये, असे वाटणे -- असे सगळे यातून घडू शकते.

उत्तम दृश्ये, संगीताचा दणका, नाच -- हे सगळे आहेच. चित्रपट तसा घटनात्मकच आहे – प्रश्नाच्या गांभीर्याच्या जास्त खोलात तो जात नाही. जातवास्तव वाईट, प्रतिष्ठेच्या खोट्या कल्पना वाईट, हिंसा वाईट -- हे एरवीही पटू शकणारे पुन्हा एकदा पटते. हा एक चांगला व्यावसायिक चित्रपट आहे, पण, व्यावसायिक होण्याच्या हव्यासामुळेच तो फार ग्रेट वगैरे काही होऊ शकलेला नाही. " हे बघा कसे वाईट आहे " असे म्हटले जाणे आणि आवश्यक त्या गांभीर्याने त्या ' वाईटा ' बाबतची सखोल चिंतनात्मकता व्यक्त होणे, यांत फरक असणारच. तशा सखोलतेचा इथे अभाव आहे.

हा चित्रपट पाहून आपण एक चांगला व्यावसायिक -- करमणूकप्रधान चित्रपट पाहिल्याचे समाधान नक्कीच मिळते.
--- ००० ---

## अगदीच शून्य

शून्य हे लहान असो, मोठे असो, महा असो की अगदीच असो, शेवटी ते शून्यच ! इथे थोडी निराशा, थोडे वैफल्य, थोडा उद्वेग मिसळून त्याला ' अगदीच शून्य ' म्हटले जाते ! हा दीर्घांक सुरू होताना ते आपण त्याचे ते नाव म्हणून ऐकतो – तो संपतानाही सांगितले जाते की सादर झालेला दीर्घांक ' अगदीच शून्य ' ! स्वतःलाही तेच म्हणवून घेणे ! या दीर्घांकाला निरर्थाची यशोगाथा किंवा उद्वेगाचे साम्राज्य म्हणता येईल.शेकडो विषयांची एका दमात हजेरी घेणारे – महत्त्वाचे आणि बिनमहत्त्वाचे सारख्याच पद्धतीने तोलणारे हे आजच्या पिढीच्या एका मोठ्या भागाचे प्रातिनिधिक नाटक आहे.
डाव्यांची एक ठरलेली ठरलेली खेळी असते. आधी बुद्धिप्रामाण्यवाद गळी उतरवायचा आणि मग आता भूमिका घ्या म्हणायचे ! भूमिका म्हणजे ' डावी ' च घ्यावी लागणार याची त्यांना खात्री असते ! इथे हा दीर्घांक बुद्धीनेच थेट या निरर्थकाला येऊन पोचलेला आहे ! म्हणजे, फार तर, ही ' निरर्थकतावादाची ' भूमिका आहे, असे म्हणता येईल !
कुणी एक पंत आणि एक राव असे दोन मित्र. काहीच चार्म नसलेले रटाळ आयुष्य जगणारे. अगदीच शून्य ! त्यांतल्या रावाचा शून्यापासून एकाकडे प्रवास होतो, त्यामुळे, पंताची मान जोरात दुखू लागते ! बास ! स्टोरी म्हणाल तर ही एवढीच आहे ! अर्थहीन, मूल्यहीन जगण्याचा सगळा पसारा मांडणारा हा दीर्घांक आहे. यात सीरिया, अफगाणिस्तान अशा जागतिक विषयांपासून एका वेटरचा एक मोठा पुढारी होणे -- हे सगळे आहे.
असा विषय, त्यातली नाट्यमयता पकडून रंगमंचावर सादर होणे, ही सोपी गोष्ट नाही. हे शक्य झालेय कारण पूर्ण टीमच छान जमून आलीय ! अक्षय शिंपी, अमोल कुलकर्णी आणि ॠतुराज फडके या तीनही कलावंतांनी कमाल केलेली आहे !

अभिनयाचा एक वस्तुपाठ म्हणून या तिघांच्या इथल्या टीमवर्ककडे पाहता येईल. याला अर्थातच मकरंद धर्माधिकारी यांची प्रकाशयोजना आणि प्रीतीश खंडागळे यांचे संगीत यांचा मोलाचा हातभार आहे. अत्यावश्यक तेवढेच ' आशयाला साजेसे ' मोजके नेपथ्य हेही या नाटकाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

यातले काही संवाद, त्यांतल्या ‘ कब्जा करण्याच्या ‘ पूर्ण अर्थासह दिग्दर्शक रवींद्र लाख्यांच्या आवाजात येतात आणि वाचिक अभिनयाचा एक प्रभावी नमूना पेश करून जातात. लाख्यांचे दिग्दर्शन हा या दीर्घांकाचा प्राण आहे ! इथला रटाळपणाही तुम्हाला एखाद्या ॲक्शनपॅक्ड चित्रपटाप्रमाणे पकडून ठेवतो ! आशयाबाबत मर्मदृष्टी असणारा आणि नाट्यकलेबाबत सखोल चिंतन आणि जाण असणारा दिग्दर्शकच हे करू शकतो. ( गंमत म्हणून बोलायचे तर, उद्या लाखे, रेल्वेचे टाईमटेबलही रंगमंचावर सादर करू शकतील ! )

युगंधर देशपांडे हा अलिकडे समोर आलेला एक चिंतनशील, सर्जक नाटककार आहे. नुसत्या करमणुकीच्या स्टोऱ्या सांगण्यापेक्षा जगण्यातल्या महत्त्वाच्या प्रश्नांनाच तो हात घालतो. आजच्या प्रायोगिक रंगभूमीवरचे हे एक महत्त्वाचे नाटक त्याने दिलेले आहे.

एकूण टीम, मिती चार आणि अस्तित्व यांचे अभिनंदन आणि असा एक चांगला सघन ‘ निरर्थपूर्ण ‘ प्रयोग पाहण्याची संधी दिल्याबद्दल आभार !

( कोणत्याही अनुभवाचे परिपूर्ण भान येणे म्हणजे त्या अनुभवाच्या बंधनातून सुटणे, अशी माझी एक थियरी -- उपपत्ती -- आहे -- ती इथे लावता येते ! )

APRIL 19

--- ००० ---

एक अगदी वेगळाच नाट्यप्रयोग पाहिला. एका फ्लॅटच्या हॉलमध्ये !

**डी एन ए ( दीर्घांक ).** प्रयोग क्रमांक – २७.

श्री. नीलेश व श्रद्धा कुंभोजकर यांचे घर.

मूळ ग्रीक लेखक – जिओर्गोस निओफायटू, मराठी भाषांतर – डॉ. श्यामला वनारसे,

संगीत – समीर दुबळे, रंगभूषा व वेषभूषा – आदिती वेंकटेश्वरन,

संकल्पना आणि दिग्दर्शन – डॉ. प्रसाद वनारसे,

कलाकार – ऋजुता सोमण, निखिल गाडगीळ, सुरभी नातू.

घरचा माणूस सैन्यात भरती होऊन युद्धावर गेलेला आहे. घरात आई आणि मुलगा आहेत. मुलाला एक जवळची मैत्रीण असून तिला वडील नाहीयत. मैत्रिणीची आई पुनर्विवाह करते पण या मुलाच्या आईला तिचे पती परत येणार याची खात्री आहे. काही वर्षे उलटूनही त्या भ्रमातून ती बाहेर पडू इच्छित नाही. जेव्हा मृत सैनिकांच्या आणि त्यांच्या मुलांच्या डी एन

ए चाचण्या घेऊन कोण मेले हे नक्की ठरवायची वेळ येते तेव्हा मुलगा म्हणतो, “ आता असं कोणतं सत्य असणार आहे की जे इतक्या जुन्या भ्रामक सत्यावर मात करेल ? ! “

खरेखोटे, जगणे-मरणे, भूतकाळ-वर्तमान काळ – या सर्व गोष्टींची घुसळण असलेले हे एक उत्तम नाटक आहे. हे विचारप्रधान आणि संवादप्रधान असे सखोल-सूक्ष्म नाट्याचे नाटक असल्याने यात फार हालचालींची गरजच नव्हती. हे नाटक एका घरात चालले आहे हे विसरलेच गेले. संगीत विशेष परिणाम साधणारे पण छान, सौम्य होते. रंगभूषा-वेषभूषा उत्तम.

माझा जुना मित्र प्रसाद वनारसे याने नाटकाची जातकुळी लक्षात घेऊन ते उत्तम बसवलेले होते. नाटकाच्या चिंतनशीलतेबरोबर हळुवारपणे प्रेक्षकांना सामील करून घेण्याचे कसब खास प्रसादचे होते.

आणि अर्थातच डॉ. श्यामला वनारसे यांचा उत्तम अनुवाद !

अशा प्रकारचे काहीसे गंभीर नाटक पाहण्याचेे महत्त्व वाटणाऱ्या कुणाच्याही घरी जाऊन हे नाटक सादर करायला तयार असलेला हा समूह आहे.

नक्कीच एक वेगळा, समृद्ध नाट्यानुभव !

--- ००० ---

# सेल्फी

लेखक – शिल्पा नवलकर आणि दिग्दर्शक – अजित भुरे.

आज पाहिले. ‘ चारचौघी ‘ नंतर बहुतेक हेच असावे असे स्त्री-प्रश्न-केंद्रित नाटक. स्त्रियांच्या प्रश्नांचे समाजात एकूण भानच कमी असते, असे म्हटले तरी चालेल. त्यामुळे, शिल्पा नवलकर यांनी या प्रश्नांना अभिव्यक्ती देणे आणि त्या प्रश्नांवर स्त्री पात्रांनाच साधक-बाधक बोलायला लावणे महत्त्वाचे ठरते. रेल्वे स्टेशनवरच्या एका महिला वेटिंग रूममध्ये पाच स्त्रिया एकत्र येतात आणि त्यांच्या एकमेकींशी होणाऱ्या संभाषणातून हे नाटक घडते. हळूहळू त्या एकमेकींशी मोकळेपणाने बोलू लागतात आणि प्रत्येकीचेच आयुष्य कसे या ना त्या प्रकारे समस्याग्रस्तच आहे ते समोर येते. स्वतःची समस्या नीट सोडवू न शकलेल्या या स्त्रिया इतर स्त्रियांना मात्र आपुलकीने ' योग्य ' सल्ले देतात. एकमेकींबाबत सदभावना बाळगतात. अशा प्रश्नांवर ‘ बोधप्रद ‘ असे काही सापडू शकत नसते, हे खरे असले तरी, काहीजणी सावरतात, इतर सावरतील अशी आशा निर्माण होते आणि नाटक संपते. माझा मित्र अजित भुरे याचे उत्तम दिग्दर्शन आणि सर्वच स्त्री कलाकारांचा उत्तम अभिनय यांमुळे प्रयोग छानच होतो. या अशा प्रश्नांचे समाजात भान वाढणे हे समाजाच्या आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.

मला हे नाटक आवडले.

--- ००० ---

डॉ. भालचंद्र नेमाडे यांच्या ‘ कोसला ‘ ( कादंबरी ) आणि ‘ देखणी ‘ ( कवितासंग्रह )

यांवर आधारित नाट्याविष्कार

# ‘ मी पांडुरंग सांगवीकर ‘

मूळ संकल्पना – अनिल कांबळे, रंगावृत्ती आणि दिग्दर्शन – मंदार देशपांडे, प्रमुख भूमिका – पद्मनाभ बिंड

एकाच लेखकाच्या दोन वेगवेगळ्या कलाकृतींचा मिलाफ करणारा असा नाट्याविष्कार, मला वाटते, हा प्रथमच घडतो आहे. त्यासाठी, मुळात या संकल्पनेला दाद द्यायला हवी. कादंबरीही आत्मचरित्रात्मक आणि कविताही व्यक्तिगत प्रतिक्रियांच्याच, त्यामुळे, ही संकल्पना सार्थ आणि यशस्वीही झालेली आहे.

कादंबरीतल्या प्रसंगांची निवड – पुण्यात येणे, वसतिगृह-जीवन, उंदीर मारणे, रात्री एक वाजता पाच वाजल्याचे पटवून एका साध्या मित्राची केलेली फजिती, नऊ हजार साली आताचा इतिहास कसा लिहिला जाईल त्याबाबतचे संभाषण, बहिणीचा मृत्यू, घरी परतणे, वगैरे – योग्यच आहे. कवितांची निवडही योग्य आणि चपखल वाटली.

पांडुरंगाचा सटरफटरपणा, गंमतीशीरपणा आणि भावुकपणा – हा आलेख नीट मांडला गेला नाही कारण पद्मनाभचे फारसे अधोरेखन झाले नाही. तो सहायक अभिनेत्यांत मिसळून गेला. कादंबरीतले प्रसंग त्या काळात खूप वेगळे, मजेशीरही वाटले तरी आता त्यात फारसा चार्म वाटला नाही. बहीण वारल्याचा प्रसंग पद्मनाभने त्याच्या ताकदीने केला..कवितांच्या बाबतीत फारच प्रश्न आले. सगळे भावनिकपणे सादर करायच्या नादात कवितांचे शब्द हरवत होते. प्रत्येक शब्द सुटा पण सलगपणे पोचत राहिला पाहिजे याची मुळीच काळजी घेतलेली नव्हती. एक कविता तर मुळीच नीट ऐकू न येता ती म्हणणाऱ्या नटाच्या ऊरबडवेपणालाच टाळ्या खाऊन गेली ! एकूणच हा प्रयोग दिग्दर्शनात कमी पडला, असे वाटले.

नेमाड्यांच्या गाजलेल्या कलाकृती वेगळ्या माध्यमातून सादर करणारा हा प्रयोग वैशिष्ट्यपूर्ण आहे, पण, अधिक विचार आणि, विशेषत: कवितांच्या बाबतीत अधिक कौशल्य आणि सफाई यांची आवश्यकता आहे, असे वाटले.

नेमाड्यांच्या लोकप्रियतेमुळे गर्दी खूप होती !

--- ००० ---

" तुम इतने डरपोक हो की तुम्हे मौका मिला तो भी तुम फायदा नही उठा पाओगे ! "

हे वाक्य नायिका नायकाजवळ ( विनालग्न ) झोपत असताना म्हणते ! चित्रपट --

## सनम रे

सरळ साधा मस्त रोमांटिक चित्रपट. सर्व तर्हेच्या नयनसुखाने युक्त !

वास्तवाची, पटण्या न पटण्याची चिंताच नाही ! वाटल्यास गावच्या गाव निर्मनुष्य -- हवे तर हवी तीच तेवढीच माणसे असणार !

एकदा स्वप्नरंजनाचा मूड पकडला की कुछ भी करते जाओ !

असे स्वप्नील चित्रपट जर लोकांना हवे आहेत तर तशा कादंबर्याही हव्या असतील --

का नाही लिहिल्या जात तशा कादंबर्या ?

--- ००० ---

## आय डी ( ओळख )

दोन अंकी नाटक, निर्मिती -- ' अभिनय ' कल्याण, लेखक – प्रणव सखदेव, दिग्दर्शक – अभिजित झुंजारराव.

खरी ओळख विदीर्ण असणे, त्यातून एक आभासी ओळख तयार करणे – तीही खऱ्याशी जुळती न करता खोटेपणा मिसळून करणे, नंतर खरी ओळख चोरली जाणे आणि फक्त आभासी ओळख टिकणे, मग काही काळ दुसऱ्याचीच ओळख स्वीकारावी लागणे आणि शेवटी मूळची ओळख परत मिळणे आणि पुन्हा आभासी ओळखीकडे जाण्याचा मार्ग मोकळा होणे – अशा टप्प्यांनी हे नाटक घडलेले आहे. नाटकासाठी विषय तसा अवघड आहे आणि त्या विषयाची हाताळणीही सरळ त्यातल्या तात्त्विक प्रश्नांना भिडतच केलेली आहे. आयडेंटिटी ( ओळख ) हा प्रकारच जर त्रासदायक, उपरा, खोटा असेल तर काय ? आणि नकोच ती ' ओळखी ' ची भानगड, असे म्हटले तर तुमचे जगणे ' तुमचे जगणे ' होणार कसे ? आधाराला, धरून ठेवायला काय असेल ? – अशा प्रश्नांचे हे नाटक आहे. नव्या लेखकांमध्ये जे आश्वासक, चांगले लेखक आहेत, त्यांतला प्रणव हा एक आहेच. आजच्या जगण्यातली गिचमिड आणि गोंधळ आणि त्यातून येणारी विदीर्णता आणि अस्वस्थता यांना भिडायचा त्याचा हा प्रयत्न नक्कीच धाडसाचा म्हणायला हवा. अभिजितने या वैचारिक-चिंतनात्मक नाटकाला उत्तम दृश्य कोंदण दिलेले आहे. कलाकारही सगळे आपापली कामे समजून करतात. ओळख-चोर मात्र एनर्जी कमी ठेवत होता, त्याचे काही संवादही नीट ऐकू आले नाहीत. बाकी, प्रयोग चांगला झाला, मला नाटक आवडले. एक मात्र असे वाटले की हे नाटक जरा लांबते आहे. आटोपशीर करून हे दीर्घांक रूपात सादर व्हावे.

नवे लेखक अशा चिंतनात्मक विषयांना हात घालताहेत हे नक्कीच स्वागतार्ह वाटते. आणि त्याचबरोबर त्यांना चांगले दिग्दर्शकही मिळताहेत.

माझ्या मते स्वागतार्ह नाटक !

--- ००० ---

## कोपनहेगन

‘ कोपनहेगन ‘ या नाटकाचे अभिवाचन. कोल्हापूरचा ‘ प्रत्यय ‘ हा आमचा ग्रुप. अनुवादक माझे मित्र डॉ. शरद नावरे. अभिवाचक सागर तळाशीकर, डॉ. शरद भुथाडिया आणि मेघना. अभिवाचन उत्तमच ! दोन ग्रेट शास्त्रज्ञ आणि त्यांतल्या वरिष्ठ शास्त्रज्ञाची पत्नी, अशी तीनच पात्रे. सापेक्षतावाद आणि अनिश्चिततेचे तत्त्व यांवर प्रामुख्याने चर्चा. त्यांच्या उपयोजिततेबद्दलच्या नैतिक प्रश्नांसह. खूपच किचकट. शेवटी, मानवी संबंधांच्या प्रश्नांबद्दल काय – हेच महत्त्वाचे ठरते कलेत. ते सापडणे खूपच अवघड जावे, असे हे नाटक. त्यामुळे, माझ्या मते, नाटक म्हणून मुळीच न जमलेले काम. शेवटी, हायझेनबर्ग म्हणतो – प्रत्येक माणसाचे वेगळे नैतिक मूल्यमापन शोधावे लागेल ! हेही एक बौद्धिक मत असणार का , बरोबर वा चूक असा शिक्का मारणारेच असणार का, यावर हे नाटक चूप राहते ! ही पात्रे सगळे बौद्धिकच बोलताहेत आणि त्याच कक्षेत समजणे वा न समजणे असणार आहे, हे त्यांचे पक्के ठरलेले दिसतेय ! मानवी संबंध हे मतांच्या स्तरावरच समजतात, असे जर या नाटकाचे म्हणणे असेल तर हे एक ‘ हुशार ‘ फालतू नाटक आहे. आपल्या मित्रांच्या कामाबद्दल तर खरेच आकलन व्यक्त करायला हवे. आणि आम्ही ‘ प्रत्यय ‘ वाले तर जबरदस्त वादांची परंपरा संभाळून आहोत !

--- ००० ---

## ढोलताशे

स्वत:च लिहिलेल्या नाटकाबद्दल लिहायला जावे तर ते समजावून दिल्यासारखे होण्याचा धोका असतो. त्यामुळे, आपणच ते मर्यादित केल्यासारखे होऊ शकते. हे नाटक मानवी संबंध, जगण्यातले व विचाराचे स्वातंत्र्य, प्रदूषण , ढोंगबाजी आणि मुख्यत: धर्म आणि धर्माच्या नावाखाली चालणारे सगळे -- या सगळ्याच गोष्टींबद्दलचे आहे. सध्या त्याच्या होत असलेल्या प्रयोगांबद्दल मी अत्यंत समाधानी आहे. प्रयोग समजून तर होताहेतच, शिवाय ते सगळे अत्यंत सहज आणि रंजकपणेही.छान पोचते आहे. एकूण टीमच जमून आलेली आहे. सर्व तांत्रिक अंगे तसेच अभिनय, दिग्दर्शन यांसह असणारी भद्रकालीची निर्मिती -- हे सगळेच अप्रतिम जमून आलेले आहे. प्रेक्षक नुसती मनोरंजनाची स्तुती करत नसून काही दर्जेदार पाहिल्याचे समाधान व्यक्त करताहेत. ललित हा एक उत्तम अभिनेता असल्याचे, तो मालिकेत जाण्याच्या पूर्वीपासून आम्ही अनेकजण समजून होतो. त्याचे पहिले व्यावसायिक नाटक हे असावे याचाही एक आनंद वाटतो. बाकी सगळे अनुभवी, कसलेल्या लोकांचे मनापासून केलेले सुंदर काम आहे !

प्रसाद कांबळीने कुठेही कसर राहू दिलेली नाही.

अशा टीमवर्कमुळे, आपण लिहिलेय त्यापेक्षा खूपच समृध्द काही घडू शकते याचा हा आनंददायक अनुभव मला मिळतो आहे ! जरूर बघा –

--- ००० ---

काल, अमृता सातभाई यांनी सादर केलेला

## ‘ अलौकिक रोमँटिक महानायिका मधुबाला ‘

हा कार्यक्रम पाहिला. तुडुंब गर्दी ! खूप लोक जागा न मिळाल्याने परत गेले. आता हा कार्यक्रम पुन्हा दिनांक २५ फेब्रुवारीला होणार आहे. मधुबालाचे चरित्र उलगडत जाणारा हा कार्यक्रम खूप मेहनतीने तयार केलेला आहे. तिच्या चित्रपटांतल्या गाण्यांचे तुकडे दाखवत दाखवत हा उत्तम कार्यक्रम सादर होतो. हृदयाच्या आतल्या पडद्याला छिद्र असण्याचा आजार असलेली ही सौंदर्यवती २० वर्षांत ७० चित्रपटांत भूमिका साकारून, त्याच आजाराने ३७ व्या वर्षी गेली !

किशोरकुमारबरोबर तिचे लग्न झालेले होते. त्याने तिला लंडनला नेऊन उपचार करून आणणे त्याच्या खर्चाने केले होते. शिवाय, तिच्या घरावर जप्ती आली तेव्हा आवश्यक ती रक्कम त्यानेच अदा केली होती. तिच्या दैनंदिन खर्चासाठीही तो पैसे देत असे. पण, तिला सतत साथ देत राहणे तो करत नव्हता. ती आजारी असली तरी तो खूप बिझी होता ना ! आणि दुसरी गोष्ट – त्या दोघांचे एकत्र असे चित्रपट असूनही त्या चित्रपटांतली गाणी न ऐकता ती तिच्या दिलीपकुमार बरोबरच्या चित्रपटांतली गाणी ऐकण्यात दंग असे – याने किशोरकुमार खवळतो, हे माहीत असूनही !

काही कौशल्ये जबरदस्त आत्मसात असलेल्या या व्यक्ती ! बाकी सगळ्या त्याच मानवी भावभावना !

गाणे हळूहळू फेड होणे आणि इकडे हळूहळू प्रकाश उजळणे, असे तंत्र जमले तर हा कार्यक्रम अधिकच उजळेल ! सध्या, सारखे दणके आणि धक्के बसताहेत ! ही दुरुस्ती जमावी --

--- ००० ---

' का रे दुरावा, का रे अबोला ' -- चित्रपट, **' मुंबईचा जावई '.**

आशा भोसले, गदिमा आणि सुधीर फडके.

गाणे दिसायला दुराव्याचे आहे, पण, शब्द, चाल आणि आशाबाईंचा आवाज

या सर्वांतच एक सूक्ष्म चावटपणा आहे !

ती फारशी दुःखीबिख्खी न होता तिच्या त्याला मनवतेय !

नीट ऐकले तर चेहऱ्यावर स्मित आलेच पाहिजे !

आशाबाई ग्रेटच !

--- ००० ---

# ' आविष्कार ' चा महत्त्वपूर्ण उपक्रम.

पूर्वी पं. सत्यदेव दुबे यांनी नाट्यलेखकांसाठी एक कार्यशाळा घेतली होती. त्याच धर्तीवर अलिकडेच ‘ आविष्कार ‘ ने काकडेकाकांच्या नेतृत्वाखाली आणि प्रदीप मुळे, जयंत पवार आणि शफाअत खान यांच्या मार्गदर्शनाखाली एक कार्यशाळा आयोजित केली होती. त्यातून सहा नाटककारांच्या सहा संहिता सादरीकरणासाठी निवडल्या गेलेल्या असून त्यांचे दिग्दर्शनही नव्या तरुण दिग्दर्शकांनी करावे, असे त्यांनी योजलेले आहे. त्यांतली दोन नाटके, कै. अरविंद देशपांडे महोत्सवात पाहिली. एक होते, ‘ त्रिशंकू ‘ – लेखन, सौरभ पाटील आणि दिग्दर्शन, अभिजित झुंजारराव यांचे आणि दुसरे होते, ‘ अस्वस्थ समुद्रावर बैल मेलाय ‘ – लेखन, युगंधर देशपांडे आणि दिग्दर्शन, ललित प्रभाकर यांचे. दोन्ही नाटकांचे आशय आणि घाट पठडीबाह्य होते. या कार्यशाळेतून हे दोन लेखक मराठी नाटकाला ‘ मिळाले ‘ असे म्हणायला हरकत नाही. हा पूर्ण उपक्रम आणि या नाटकांचे प्रयोग निश्चितच स्वागतार्ह आहेत. महाराष्ट्रात एकूण पाच ठिकाणी या नाटकांचे प्रयोग होणार आहेत. ज्यांना संधी मिळेल त्यांनी अवश्य ही नाटके पाहावीत. ही नक्कीच ' आजच्या ‘ जाणिवांची नाटके आहेत.

--- ००० ---

अहो, मी खूप महिन्यांनी असले उद्योग करतोय -- मला रिकामटेकडा नका समजू. आज कर्तव्यपूर्ती झाली -- आता काही दिवस तरी, काहीही पाहणार नाही. आज ' **बाजीराव-मस्तानी** ' पाहिला ! दिपून गेलोच ना ! पण, खूप गोडधोड खाल्ल्यासारखे झालेय.

यावर एकच उपाय -- जुन्या बाजाराकडे जातो -- तिकडे माझा मित्र ' **नटसम्राट** ' रोज येतोच -- एक गप्पा मारण्याची छान जागा आहे तिथे ! तो मला हळू आवाजात काही स्वगते म्हणून दाखवतो -- मीही त्याचा खूप गौरव करतो -- आपला मित्रच तर आहे ! विशेष म्हणजे, माझी एक ओळही न वाचता, तो मला भाषाप्रभू म्हणतो ! मस्त वाटते !

देवाणघेवाणीशिवाय प्रेम, मैत्री, ग्रेट असणे, होऊ शकते का ?

त्याची एक मुलाखत येणार आहे छापून -- त्यात त्याने, पुलंनंतरचा एक महत्त्वाचा लेखक, असा माझा उल्लेख केलेला आहे !

" असं नाटक असतं, राजा -- "

--- ००० ---

## ‘ **नटसम्राट** ‘ पाहिल्यानंतर –

पाहिला एकदाचा !

दुःख एंजॉय करायला देणारी कलाकृती म्हणजे दर्जेदार, असे खूपजण समजतात. ‘ वाह ‘ म्हणता येईल असे दुःखाचे लशीसारखे छोटे छोटे डोस घुटक्याघुटक्याने घेत राहताना आपोआप दर्जेदार वाटत राहते. असेही मानले जाते की अशा कलाकृतींचे कलावंत हे थोडे वा बरेच असे मानसिक ‘ सरकलेले ‘ वा किंचित वेडे असतात आणि मानवी जगण्याबद्दल ते काही मौल्यवान, सांस्कृतिक बोलत असले तरी प्रत्यक्ष जगण्याचा आणि त्याचा काही संबंध नसतो – ते फक्त त्यांचे एक कौशल्य असते, इतकेच. एंजॉय करण्यापलिकडे आपण ते गंभीरपणे घेऊ लागलो तर आपण वेडे होऊ शकतो. त्या कलावंतांकडे असलेल्या कौशल्यामुळे त्यांना वाहवा मिळते, याचा त्यांना आनंद असतो – त्यासाठी ते बिचारे आयुष्य उधळून वेडे व्हायला तयार होतात ! म्हणजे लोकांसाठीच का म्हणानात ! याचे, अर्थात लोकांना कौतुक असते ! बरेच ‘ रसिक ‘ आणि कलावंतही अशा दर्जेदार विचारांचे असतात. ( हा सिनेमाही त्याच अर्थाने ‘ दर्जेदार ‘ आहे ! ) तर, असल्याच बावळट विचारांचा एक नट म्हणजे हा नटसम्राट ! तो स्वतः स्वतःला आणि इतरही सगळे त्याला नटसम्राट म्हणताना ऐकून ऐकून कंटाळा येतो. अहो, किंग लियरचे संवाद त्याच्या स्वतःच्या जगण्यातून येतात – या नटसम्राटाचे जगणे तसे किरकोळच आहे – एखाद्या साध्या कारकुनासारखे. फार विचारप्रवर्तक बोलायचे खरे तर त्याला कारणच नाही. त्याला एक मुलगा आणि एक मुलगी. वडिलांच्या वाईट सवयी मुलांना चित्रपटातले प्रसंग घडल्यावर समजतात, हे पटत नाही. आपली आई किती सरळमार्गी आणि सोशिक आहे, हे दोघांनाही माहीत असणारच. ती मुलेही तशी निर्बुद्ध वा हायस्ट्रंग टाईप वाटत नाहीत. त्यामुळे, ती दोघेही त्यांच्या आईवडिलांशी असे वागतील, हेच पटत नाही. अचानक तुम्हाला वाटले म्हणून तुम्ही हे प्रसंग घडवताय, असेच वाटते. या अर्थाने या सिनेमाचा पायाच कच्चा आहे. लाखो लोकांसमोर सम्राटगिरी केलेल्या या माणसाला नंतर फक्त एक तो रामच भेटत राहतो ? बरे, तो काही विकलांग वा अधू झालेला नाहीय. या सिनेमात त्याला प्रभावी काम करता यावे म्हणून त्याला चांगला टुणटुणीत ठेवलाय ! ही एक गोचीच झालीय इथे. इतका भरभक्कम नट काम करायचा थांबला ? कधीपासून ? सुमारे ४५ व्या वर्षीच ? ( याच्या मुलीचे लग्न व्हायच्या आधीपासून हा रिकामा फिरतोय, हे लक्षात घ्या -- ) त्याचे नुसते यशच गृहीत धरायला लावले आहे. एखादी भूमिका समजून घेण्यासाठी त्याने काय केले, कसा विचार केला, हे दाखवले तर तालीम दाखवावी लागेल आणि मग हे सगळे लोक गेले कुठे, असा प्रश्न येईल ! हा ४५ / ४७ चा आहे म्हणजे याच्या जुन्या प्रेयस्या ३५-४० च्या असतील – त्यांचा उल्लेख – त्या म्हाताऱ्या झाल्यात, असा येतो ! हे ‘ बनवलेले ‘ बंडल पिक्चर वाटते ते अशा कारणांमुळे. असा एवढा मोठा असा हा नट असेल तर याचे काही वाचनबिचन असेल ना – काहीच नाही ! नुसते पाठ केलेले संवाद दिसतात ! नोकरीचा कंटाळा आला म्हणून ती सोडून देऊन हातभट्टीची पीत रस्तोरस्ती फिरणारा हा एक साधा अल्पशिक्षित मुकादम

वाटतो. मुळातच सगळे खोटेच असल्याने पाटेकरांच्या अभिनयाचे विशेष कौतुक राहात नाही. त्यातही बऱ्याच वेळी त्यांच्या संवादफेकीवर लागूंचा प्रभाव जाणवतो. यातला मला आवडलेला अभिनयाचा क्षण म्हणजे, रामची बायको मरत असताना त्याला वाटणारी मृत्यूबाबतची अगतिकता आणि एकटेपणाची भीती – हे जे विक्रम गोखल्यांनी दाखवले आहे, ते विशेष आहे ! असो. ती मुले नसती हो वागली अशी, काहीतरी समंजस मार्ग नक्कीच काढला असता त्यांनी – किती छान दिसतात बिचारी ! त्या मुलांच्यावर अन्याय करून आपली पोळी भाजून घेणारा असा सिनेमा काढणे, हे काही बरे नाही झाले – असेच वाटत राहते ! ( ता. क. -- यातले पोलीसही जरा सटकलेले कलावंतच वाटतात. दोन वेळा त्या पुलाखाली येऊन तिथे राहणाऱ्या त्या गरीब लोकांना ते लाथा-बुक्क्या-लाठ्यांनी बडवून काढतात ! त्या वेळच्या आवाजांचा नाट्यमय इफेक्ट मस्त येतो ! असे काही इफेक्ट हवेच होते मधे मधे ! पण, कुणाला फारसे काही लागत नाही, हेच एक त्यातले बरे म्हणायचे ! असे आणखीही काही इफेक्टस आहेत. लहान मुले कसे ' भो ' करून दचकवतात त्याप्रमाणे हा नटसम्राट एकदम मोठ्या आवाजात काही स्वगते वगैरे बोलायला सुरुवात करून लोकांना दचकवतो ! ही दचकवण्याची ट्रिक तो वारंवार वापरतो ! )

--- ००० ---

कलाकृती वा नाटक ' कळणे ' म्हणजे बातमीच्या वा माहितीच्या स्तरावर तिचा वास्तववादी समारोप झाला पाहिजे, असे काही नाही. मानवी नात्यांतले मानसिक गोंधळ आणि त्यांतले खरे-खोटे चकवे यांचे भान येणे हेही ' कळणे ' च असते. मराठी प्रेक्षकाने आता, एक परिपक्वता म्हणून कळण्याची ही व्याख्या स्वीकारायला हवी. असे जर घडले तर **' हा शेखर खोसला कोण आहे '** या नाटकाचा कलात्मक आनंद समृद्धपणे नक्कीच घेता येईल. मूळ गुजराती लेखक मधू राय यांचे हे एक उत्तम नाटक आहे. उत्तम नटसंच, उत्तम तंत्र आणि विजय केंकरे यांचे उत्तम दिग्दर्शन असलेल्या या नाटकाचा प्रयोग छानच होतो ! प्रेक्षकांनी थोडे मोकळे होऊन, सवयीच्या अपेक्षा सोडून हे नाटक जरूर पाहावे ! मी आज या नाटकाचा पुण्यातला पहिला प्रयोग पाहिला -- मला हे नाटक आवडले ! या वेगळ्या, नावीन्यपूर्ण निर्मितीसाठी ' भद्रकाली ' चे अभिनंदन !

**किबे थियेटर**

पुण्यातले प्रभात चित्रपटगृह बंद झाले म्हणून पुणेकर खूप हळहळले होते. ते बंद नव्हते झाले. मूळ मालकाने ते ताब्यात घेऊन त्याचे नूतनीकरण करून आता ते किबे या नावाने पुन्हा सुरू झाले आहे. मराठी चित्रपटांचे आणि मराठी प्रेक्षकांचे हे खास थियेटर. तुलनेने स्वस्तही ! तिथे काल ' नटसम्राट ' पाहिला. म्हटले, नूतनीकृत थियेटरही पाहून होईल. निराशा झाली. फक्त खुर्च्या आणि ध्वनियंत्रणा बदललेली आहे. खुर्च्या बदलायच्याच होत्या तर दोन रांगांत अंतर किती असावे याचे काही शास्त्र विचारात घेता आले असते ना ! अत्यंत कमी आहे अंतर ! लोक स्थानापन्न होण्याच्या प्रयत्नात असताना थियेटर मालकाला आणि एकमेकांना शिव्या देत असतात ! एवढे कुठले चित्रपट असे सारखे ओसंडून वाहाणार आहेत की

जास्तीत जास्त खुर्च्या कोंबाव्यात ? आतल्या पायऱ्याही अशा आहेत की प्रत्येक वेळी काही लोक तरी धडपडावेत ! मराठी माणसाला स्वस्त द्याच हो थियेटर, पण, त्याला इतका फालतूही नका ना समजू ! सुखाने घेऊ द्या की त्याला करमणुकीचा आनंद –

--- ००० ---

**एफबी पोस्ट २०१७ मधून –**

## ' चि. व चि. सौ. कां. '

काहीतरी वेगळीच तिरकस कल्पना लढवणे आणि एक खास अनपेक्षित ताजेपणा तयार करणे यात परेश आणि मधुगंधा माहीर आहेत ! ‘ चि. व चि. सौ. कां. ‘ या त्यांच्या चित्रपटातही तो अनुभव येतो. सोबत आमचा हीरो ललित आहे आणि मृण्मयी आणि आणखीही बरेच अभिनय-निपुण कलावंत ! मजा येते ! कोणत्याही तत्त्वांचा अतिरेक करून जगता येत नाही – हा एक उत्तम संदेश आहे !

‘ आहे मनोहर तरी ‘ मध्ये शंकरराव देव यांचा एक प्रसंग आहे. ते फक्त गाईचे दूध वा दही घेत असत. जेवताना त्यांना गाईच्या दुधाचे दही देण्याची आठवणीने सोय ठेवलेली होती. त्यांनी विचारले, “ गाईच्या दुधाचेच आहे ना दही ? “ त्यावर सुनीताबाई उत्तरल्या, “ दूध गाईचे मिळाले होते, पण, विरजण मात्र म्हशीच्या दह्याचे लावलेय – “ यावर त्यांनी ते दही घेण्याचे नाकारले !

मजा आहे – पण, वेगळी, ताजी मजा आहे ! ललित उत्तम !

--- ००० ---

**बाहुबली**

भारतात तयार झालेला पहिलाच इतका भव्य चित्रपट !
भव्यता आणि वेग यांमुळे सगळे खरे धरत पळता येते.
शौर्य, क्रौर्य, राग, प्रेम, द्वेष, डावपेच, युद्धे – यांबरोबरच
‘ अरेरे ‘ आणि ‘ वाह ‘ !
आणि पूर्ण मानवजातीला आवडणारे सुभाषित मनात येणे –
‘ माणसा, माणसा, माणूस हो ! ‘ – अजून काय हवे ?

तिकिटाच्या मानाने किती उंची करमणूक !

चांगल्याची बाजू घेण्याची भूमिका असलेला भव्य परिवर्तनवादी चित्रपट !

--- ००० ---

दिग्दर्शक इम्तियाझ अलीचा ‘ **तमाशा** ‘ हा चित्रपट बघा, असे इथेच कौशिक साऊळ यांनी सुचवले होते. तो आज बघितला. यशाच्या रेसमध्ये धावणाऱ्या माणसांच्या या जगात, तसे रोबो-जीवनच जगले पाहिजे का, हा प्रश्न एक वेळ पडू शकेल, पण, त्यावर हिंदी पिक्चर काढणे ? ते इथे घडलेले आहे ! यासाठी खरोखरच सॅल्यूट ! कारण, हा विषय पूर्ण सिनेमाचा करणे सोपे नाहीय. रणबीर कपूरने मजा आणलीय. सुरुवातीच्या भागात त्याचा, देवानंद, असरानी, अमिताभ यांच्यासारखा अभिनय खास आहे ! दीपिकाही उत्तमच ! या सिनेमाचा शेवट काय करणार ? कुछ भी चलेगा ! तसेच आहे ! पण, मला आवडला हा सिनेमा !

--- ००० ---

संगीतकार **शंकर-जयकिशन** या जोडगोळीतल्या शंकर यांची आज पुण्यतिथी. हिंदी चित्रपट संगीत हा भारतातला एक अमूल्य सांस्कृतिक खजिना आहे. संगीताबाबत शेक्सपियरने तर गौरवोद्गार काढलेलेच आहेत, शिवाय, शास्त्रानेही हे सिद्ध केलेले आहे की मानवी मेंदूतली अनेक केंद्रे तजेलदार ठेवण्याचे काम संगीत करते. हिंदी सिनेसंगीतात सम्राट म्हणावे असे अनेकजण होऊन गेले -- एकेका वेळी अनेक सम्राट आणि सम्राज्ञी, असेही घडून गेले ! त्यांतले हे शंकर-जयकिशन ! अनेक वर्षे पूर्ण भारताला सर्जक वेडात गुंतवून ठेवणारे महान संगीतकार ! माझ्या स्वत:च्या जगण्याचाही बराच भाग या लोकांनी व्यापलेला आहे याबद्दल मी कृतज्ञ आहे !

' बिनाका गीतमाला ‘ ऐकणे हे तर माझ्यासारख्या अनेकांचे धर्मकर्तव्यच झालेले होते !

‘ आये बहार बनके लुभा कर चले गये ‘ ( महंमद रफी – राजहठ ) असे म्हणून

शंकर यांच्या स्मृतीस अभिवादन !

--- ००० ---

‘ लंच बॉक्स ‘ आणि ‘ क्वीन ‘ हे सिनेमे ( इतरांपेक्षा खूप उशिरा ) पाहिले. न पटणाऱ्या कल्पना रेटून नेण्याचे दोन्ही चित्रपटांच्या दिग्दर्शकांचे कसब मानायला हवे. सिनेमे ठीक आहेत. इरफान खान, नवाजुद्दिन सिद्दिकी, निम्रत कौर आणि कंगना रनोत यांचा अभिनय उत्तमच. या दोन्ही सिनेमांतले एकेक दृश्य मला खास वाटले.

## १. क्वीन

कंगना एकटीच पॅरिसला हनिमूनला गेलेली आहे. तिथे एक तरुणी तिची मैत्रीण होते. दोघी बरीच बियर पितात. त्यानंतर दोघी टॅक्सीतून जात असताना कंगनाच्या त्या मैत्रिणीला ढेकर येते. कंगनाला हसू येते. ती म्हणते की इंडियात मुलींना हे

अलौडच नाहीय – अजिबात परवानगीच नाहीय मुलींना – अशी ढेकर देण्याची ! खूप गोष्टी अलौडच नाहीयत मुलींना ! असे म्हणून हसत ती स्वतः मुद्दाम दोनदा ढेकर देते – दोघीही हसतात !

## २. लंच बॉक्स

मुंबईतले जेवणाचे डबे पोचवणारे डबेवाले आपल्याला माहीत आहेत. नायिका तिच्या नवऱ्याला जो डबा पाठवत असते तो चुकून इरफानकडे जात असतो. नायिकेच्या नवऱ्याचे बाहेर काही ‘ प्रकरण ‘ चालू असते, वगैरे. नायिकेचे वडील खूप आजारी असतात आणि तिची आईच त्यांची सेवा करत असते. मधेच एक दृश्य तिच्या वडिलांच्या मृत्यूचे आहे. नायिका लगेचच तिकडे जाते. त्यांची शेवटची तयारी चालू असते. नायिकेची आई तिला हसत म्हणते की हे गेल्यावर माझे काय होणार याची सारखी चिंता वाटायची मला. आता ते गेलेयत तर सारखी भूकच लागतेय मला, खावेसेच वाटतेय !

--- ००० ---

## श्यामपट

( लेखन-दिग्दर्शन-नेपथ्य – योगेश सोमण ).

हे नाटक म्हणजे १०० मिनिटांत ‘ महाभारत ‘ आहे. महाभारतातले बरेच महत्त्वाचे प्रसंग इथे आहेत. आधी हे थोडेफार माहीत असणे बरे. घटना बऱ्याच असल्याने, माहीत नसल्यास अवघड वाटू शकते. महाभारताची संहिता तयार होण्याची प्रक्रिया – असे या नाटकाचे स्वरूप आहे. व्यासांच्या सांगण्यावरून त्यांचा लेखनिक असलेला गणपती ते लिहून घेतोय. एका महत्त्वाच्या ठिकाणी व्यास अडतात – पुढे काय लिहावे ते त्यांना सुचेनासे होते. तेव्हापासून श्रीकृष्णही एक लेखक म्हणून त्या प्रक्रियेत सहभागी होतो, अशी कल्पना आहे. हे सर्व शेवटी श्रीकृष्णाच्या मृत्यूच्या घटनेपर्यंत जाते. अंगठ्याला बाण लागलेला, तिथल्या रक्ताला मुंग्या लागताहेत आणि मृत्यू जवळ येतो आहे – त्या वेळी तो इतरांना तिथून जायला सांगतो आणि एकटा, शांतपणे मरण पावतो.

पात्रे खूप आहेत – नाटक पौराणिक, त्यामुळे, पुरेशा वेषभूषेचेही आहे. प्रश्न, म्हटला तर असा जाणवतो की – महाभारतातली पात्रे तशी भव्य, टोलेजंग आहेत, पण, इथे तर कथा खूप प्रसंगांचा समावेश करणारी असल्याने त्या सर्व पात्रांना त्या उंचीने सादर करायला वाव नाहीय. तसे भरदार आवाज आणि उत्तुंगता व्यक्त करणे इथे शक्य नाहीय.

कलाकारांची वये सुसंगत असण्याचीही इथे गरज नाहीय. थोडक्या वेळात तो माहोल उभा करायचा आहे. योगेशने त्याच्या नेहमीच्या शिताफीने नाटक बसवलेले आहे.

एकूण घटनांचे काही वेगळे अन्वय शोधणारे योगेशचे संवाद, हीही या नाटकाची एक जमेची बाजू आहे.

जगताना मधेच पुन्हा एकदा पौराणिक टच म्हणून हे नाटक अपेक्षित माप पूर्ण करते.

--- ००० ---

## सुखन

( जे जसे आहे त्या तशा जगण्याचा जल्लोष )

पुण्यातले टिळक स्मारक मंदिर – बाल्कनीसह पूर्ण हाऊसफुल !

प्रेम, प्रेमभंग, सुख, दुःख, यश, बरबादी, जगणे, मरणे – सगळे एकत्र घेऊन

एकूणच जगण्याचा गौरव म्हणा की ‘ जगणे तरी कुठाय ‘ अशा प्रश्नाचेही महत्त्व वाटावे – असा हा बहारदार, रंगतदार कार्यक्रम. निव्वळ धूमधडाका ! टाळ्यांनी प्रेक्षकांचा उदंड सहभाग घेणारा !

शब्दोच्चार आणि शब्दांचे अर्थवाही लाघव अप्रतिम ! गाणी, किस्से यांसह उर्दू आणि हिंदी कवितांचा उत्सव !

स्त्रीलिंगी आणि पुल्लिंगी शब्दांच्या गंमती सांगणारा किस्सा ( थोडा कंटाळवाणाच झालेला ) सोडला तर बाकी सर्वच चैतन्यमय !

गाणारे सर्व कलावंत आणि वादक उत्तम. कल्पक प्रकाशयोजनाही प्रेक्षकांना कार्यक्रमात सामील करून घेणारी.

ओम भुतकर आणि नचिकेत देवस्थळी ( याने पूर्वी माझ्या ‘ समतोल ‘ मध्ये एक भूमिका केली होती ) या दोघांचीही काव्यक्रीडा अत्युत्तम ! अर्थ समजून भाषेचा वापर होत राहिला तर तो कसा आनंद देऊ शकतो याचे हे प्रात्यक्षिकच !

गालिब वा सूफी कवींचे थोडे अधिक ऐकायला मिळेल असे वाटले होते. असो. जे आहे ते उत्तमच आहे ! अभिनंदन !

--- ००० ---

## यक्षिणी विलाप

लेखक – गणेश दिघे आणि दिग्दर्शक – सागर मोहन.

कुबेराने यक्षाला यक्षिणीपासून एक वर्ष विरहाचा शाप दिला – त्या काळात विरहतप्त यक्षाने एका मेघामार्फत त्याच्या प्रियेला त्याचा निरोप पाठवला – त्या उत्तुंग गोष्टीवर आधारित कालिदासाने ‘ मेघदूत ‘ लिहिले आणि त्या महान काव्यप्रतिभेने जग थक्क झाले ! त्या काव्याचे गणेशने केलेले नाट्यरूपांतर ‘ अपूर्व मेघदूत ‘ आपण पाहिले आहे. गणेशचा विचार त्यावर चालूच राहिला – तिकडे विरह भोगणाऱ्या यक्षाच्या मनःस्थितीचे सगळे समजले, पण, यक्षिणीचे कसे गेले असतील हे दिवस ? या विचारातून त्याने ‘ यक्षिणी विलाप ‘ हे काव्य-नृत्य-नाट्यमय असे अजब कल्पनारम्य नाटक लिहिले ! काल, महिला दिनाच्या पूर्व संध्येला, पुण्यातल्या बालगंधर्व मध्ये ते सादर झाले ! निर्मिती होती अखिल भारतीय नाट्य कलाप्रबोधिनी या संस्थेची. अशा प्रकारचा वेगाळ्याच बाजाचा दीर्घांक सादर करणे हे नक्कीच एक धाडस होते ! तेही विना काटकसर – भरजरी –संगीत, नृत्ये यांसह ! या नाटकाचे उद्घाटन करण्याची संधी मला देण्यात आली होती – त्याबद्दल सर्व संबंधितांचा मी आभारी आहे ! नाट्यगृहाच्या प्रवेशद्वाराजवळ, उद्घाटक लेखकाचा प्रचंड फोटो असलेला फ्लेक्स ! एखाद्या मराठी नाट्यलेखकाला असा मान दिला जाण्याची, मराठी नाट्येतिहासातली, ही पहिलीच, खास ‘ प्रायोगिक ‘ घटना असावी !

हे काही कथाभाग सांगण्याचे नाटक नाही. असे काव्यमय नाटक मराठीत क्वचितच सादर होत असते – ते प्रत्यक्ष पाहणे हे प्रेक्षकांच्या कलानुभवात मोलाची भर टाकणारे आहे. अनेक अंगांनी त्या विरहाचा प्रत्यय हे नाटक देते. सत्य, कल्पना, भास असे सगळे स्वतंत्रपणे वा एकमेकांत मिसळून हे घडत राहते ! यातली, मैना पक्षिणी आणि यक्षिणी यांची दृश्ये गणेशने उत्तम लिहिलेली आहेत ! यक्षाचे ‘ असणे ‘ आणि ‘ नसणे ‘ एकत्रच पाहण्याचा हा प्रकार सुंदर आहे !

पहिलाच प्रयोग होता. संगीत प्रत्यक्ष वादकांचे होते. वादक निष्णातच होते, पण, त्यांना आवाजाच्या नेमक्या व्हॉल्यूमचा – मोठेपणाचा -- नीट अंदाज आला नव्हता. त्यामुळे, त्या आवाजात काही संवाद नीट ऐकू आले नाहीत. काही संवाद पुटपुटल्यासारखे भरभर म्हटले गेले. अर्थात ही घासपूस होईलच. काव्यमय नाटक असल्याने, प्रत्येक शब्द नीट पोचायला हवा, याची विशेष काळजी घ्यावी लागेल. टीम चांगली आहे – ते होईलच !

सर्व संबंधितांचे अभिनंदन !

--- ००० ---

**द अनपॅरलेल्ड ऍडव्हेंचर ---**

भारंगममध्ये आज झालेले हे या महोत्सवातले शेवटचे नाटक होते. सादर करणारी संस्था इंग्लंडमधली होती.

एडगर ॲलन पो च्या एका काल्पनिक कथेवर आधारित असा हा एक एकपात्री प्रयोग होता. एक अनोखा माणूस गरम हवेच्या बलूनमधून चंद्रावर कसा जाऊन पोचतो, त्याची ही कथा. एकूण तंत्र, वाटेत येणाऱ्या अडचणी पार करणे आणि चंद्रावर पोचल्यानंतरचा भाग – असे सगळे अद्भुत होते ! हा प्रयोग नाटक म्हणून विशेष भावला नाही. सगळे तंत्रकौशल्य होते.

तरंगणे, चंद्रावर चालणे इत्यादी सर्व अभिनय अजब म्हणावा असा होता. शरीर हे नटाचे वाद्य असणे म्हणजे काय याचा हा मूर्तिमंत प्रत्यय होता ! हा अभिनय करायचा झाला तर आपले बरेच नट धडपडतील आणि जखमी होतील, असे वाटले ! लेखक, कवी जसा भाषेचा रियाझ करतात तसे आपल्या नटांनी फिट का राहू नये, असा प्रश्न पडला.

--- ००० ---

## पुटेरी साडोंग ( भारंग महोत्सवातले कालचे नाटक )

हा एकपात्री प्रयोग संपल्यावर आयोजक विदुषी म्हणाल्या, “ टेरिफिक पर्फोर्मन्स ! “ मलाही मनोमन तसेच वाटत होते ! लेखन, अभिनय आणि नृत्य यांतून ही कलाकृती साकारली होती साबेरा शेक या मलेशियन कलावतीने. अप्रतिम सौंदर्य ( म्हणजे उत्तानता नव्हे ) आणि सखोल परिपक्वता यांचा हा मनोज्ञ मिलाफ होता ! एका तासात मानवी जगण्यातल्या मूलभूत प्रश्नांना स्पर्श करणारा ! मला कुणी भोळाभाबडा म्हटले तरी चालेल, पण, हे नाटक मला प्रचंड आवडले !

एका मलाय राणीच्या तिथल्या दंतकथेवर आधारित असे हे नाटक होते. थोडक्यात कथा म्हणजे, ती एक रूपगर्विता असते. ती प्राप्त व्हावी म्हणून आजूबाजूचे राजे मरत असतात. त्यातल्याच एका सामर्थ्यवान राजाला नकार दिला जातो. तिचे तिच्या मामेभावावर प्रेम असते, त्याच्याशी तिचे लग्न होते. पण, नकाराने चिडलेला राजा तिच्या राज्यावर आक्रमण करतो. त्याच्या ताकदीला तोंड देण्याची तिच्या राज्याची क्षमता नसते. आपला प्रिय नवरा, देश आणि आपले लोक यांचा नाश होऊ नये म्हणून ती युद्धबंदी व्हायचे ठरवते. नवऱ्याला सांगते की मी शुद्ध राहीन आणि परत येईन, तोवर तू वाट बघ. ती चेटूकविद्यापारंगत असते. कालांतराने ती त्या समर्थ जेत्या राजाला आजारी पाडते. त्याच्या सर्वांगातून दुर्गंधी येऊ लागते. तिथले हकीम-वैद्य हात टेकतात. उपाय त्या बंदिवान राणीकडेच आहे, हे शेवटी त्यांना कळते. तिला मुक्त करण्याच्या अटीवर ती त्याला बरा करते. या प्रकारात तीन वर्षे जातात. ती परत येऊन पाहते तर तिच्या पतीने दुसऱ्या स्त्रीशी लग्न केलेले असते. ती संतापते. आणि त्याचा तिच्या हेयरपिनने खून करते. शेवटी बेपत्ता होते.

सगळे मानवी मनांचे खेळ ! यात भूमिका कसली घेणार डोंबलाची ? ! वस्तुतः ही कलावती स्त्रियांचे प्रश्न हाताळण्यासाठी प्रख्यात आहे. पण, ही कलाकृती स्त्रीप्रधान असूनही स्त्रीवाद आणि परिवर्तन हे हेतू ओलांडून समस्त मानवी जगण्यालाच प्रस्तुत होणारी आहे, असे वाटले ! यात असे कोण आहे की ज्या व्यक्तीने फार मोठा गुन्हा केला आहे, असे म्हणावे ? तिचा नकार समजुतदारपणे स्वीकारून त्या सामर्थ्यवान राजाने शहाणपणाने जगायला हवे होते, असे फार तर म्हणता येईल ! पण, सामान्यतः मानवी मन हे हवे ते मिळवण्याच्याच प्रयत्नात असते, मग त्या प्रयत्नात कितीही नाश होवो !

एक स्त्री आणि एक पुरुष असे दोन जगविख्यात मलेशियन गायक-वादक साथीला होते !

शेक बाईचा आदरणीय विद्या बाळ यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला ! दोघींनी एकमेकींना मिठीच मारली ! हा क्षण अत्यंत हृद्य वाटला !

स्त्रीचे सौंदर्य ही मानवी जगण्यातली एवढी प्रचंड समस्या का होते – हा प्रश्न मनात घोळत राहिला !

--- ००० ---

एका गोष्टीसाठी तुम्ही माझा सत्कार केला पाहिजे. बरोब्बर १९६७ साली मी, आयनेस्कोच्या जगप्रसिद्ध **' द लेसन '** या दीर्घांकाचा ' शिकवणी ' हा मराठी अनुवाद सादर झालेला पाहिला. अनुवादक आणि प्रमुख भूमिका साकारणारे होते कै. सुभाष जोशी. ( या निमित्ताने त्यांच्या स्मृतीला, अर्थातच, एक सलाम ! ) आणि काल बरोब्बर पन्नास वर्षांनी मी तोच दीर्घांक आपल्या बंगाली मित्रांनी सादर केलेला पाहिला ! ही अशी पन्नाशी पुरी करणारा मीच एकमेव भाग्यवान असणार आहे !

१९६७ च्या त्या प्रयोगातले एक मला आजही आठवते – टीचर त्यांच्या विद्यार्थिनीला जेव्हा विचारतात की तीन प्रमुख मोसम कोणते – तर, त्यावर तिला उन्हाळा आणि हिवाळा आठवतात, पण, पावसाळा आठवत नाही ! ते पाहून ते तिला आठवण्यासाठी मदत करतात – " पाव – आपण खातो तो – आणि आपण दप्तर घेऊन जातो, ती शाळा – पाव – शाळा – आठवतेय ? – "

तो प्रयोग, विशेष म्हणजे, पुण्यातल्या टिळक रोडवरच्या साहित्य परिषदेच्या छोट्या सभागृहात झाला होता.

कालच्या भारंगम मध्ये पाहिलेला दीर्घांक –

# नीलिमा

मुळात हे नाटक ‘ नीलिमा “ हे नाव देऊन त्या विद्यार्थिनीवर फोकस करणे, मला पटले नाही. ऍब्सर्डीटी म्हणजे असंगतता विसंगती, आंतरविरोध, निरर्थकता यांनी युक्त असे हे नाटक आहे. त्यात पुन्हा सहा विदूषकांची काय गरज होती, असे वाटले. त्यांनी प्रयोगात काही विशेष भर पडली असे वाटले नाही. बंगाली भाषा येत नसल्याने बरेचसे कळले नाही, पण, तो दीर्घांक माहीत असल्याने, बरेचसे कळलेही. प्रयोग एकूणात चांगला झाला. टीचरचे काम करणारा गौतम हलधर हा एक महा अजब ग्रेट नट होता ! त्याचा अभिनय अपवादात्मक चांगला वाटला !

हा दीर्घांक इंग्लिशमध्ये यू ट्यूबवर उपलब्ध आहे – तो ५० मिनिटांचा आहे. यांनी विदूषकांचा भाग बराच वाढवल्यामुळे यांचे नाटक दीड तासाचे झाले. आणि मधे मध्यांतरही दिले गेले !

एलियट, बेकेट यांना बेधडक दुय्यम लेखक म्हणणारे आपले, उथळ शेरेबाजीवले समीक्षक ह्या सोडून – ते आयनेस्कोलाही तिय्यम म्हणतील, अर्थात त्या मताची कारणे न देताच ! पण, असा कुणी जबाबदार समीक्षक आहे का की जो याचे रहस्य सांगू शकेल की आयनेस्कोच्या लेखनाने जगाला इतकी वर्षे का पकडून ठेवलेले आहे.

कालच्या प्रयोगाला, एवढ्या मोठ्या थियेटरमध्ये फक्त ५० लोक होते ! पुण्याची पूर्ण लाज निघाली ! यापुढे, लोक म्हणतील, पुणे ? नको, नको, तिथे कुणाला यात इंटरेस्ट नसते !

--- ००० ---

# लोरेटा

भारत रंगमहोत्सवातले हे नाटक काल पाहिले. कोकणातला ‘ तिआत्र ‘ नावाचा हा नाट्यप्रकार आहे. एक साधीशी कथा अत्यंत रंजकतेने इथे सादर केली जाते. प्रवेश बदलताना या नाट्यप्रकारात कोणत्याही विषयावर विनोदी प्रवेश सादर केले जाऊ शकतात. उदाहरणार्थ इथे ‘ इतिहासलेखन ‘ आणि ‘ महाराष्ट्रातले सेन्सॉर बोर्ड ‘ या विषयांवर खुमासदार प्रवेश सादर होतात. लोरेटा हे नाटकाच्या नायिकेचे नाव आहे. नाटकाची सुरुवातच दणक्यात नाचगाण्याने होते. प्रेक्षक खुश होत उत्सुक होतात. पुढे सव्वादोन तास मस्त धमाल चालते. हे काही खास ‘ ग्रेट ‘ वगैरे नाटक नाही, पण, उत्तम प्रकारे आणि पूर्ण ऊर्जेने सादर केले जाणारे एक साधे, सुंदर नाटक आहे. नाच, गाणी, मौज, मजा यांच्या मार्गाने जाणारा एक छान प्रयोग पाहिल्याचे समाधान लाभले !

या नाटकाचे नेपथ्य माझा मित्र विवेक जाधव याने केलेले आहे – केवळ अप्रतिम आणि सुंदर आणि आल्हादित करणारे ! क्षणात गोव्यातल्या त्या भागातच ते तुम्हाला घेऊन जाते. सगळे जिथे सुंदर, भरजरी, रंगतदारच करायचे असते तिथे असे नेपथ्य हा त्या नाटकाचा एक महत्त्वाचा गुणविशेष असतो ! हे नेपथ्य पाहूनच प्रेक्षक आधी उल्हसित होतो आणि लोरेटाच्या मूडशी ( ज्याला नाटकात विशेष महत्त्व आहे ) समरूप होतो !

आणि प्रकाशयोजना ! सुमारे शंभर तरी दिवे असतील ! झगमगीत, रंगीबेरंगी नाटक ! अशा नाटकाला अधिकाधिक खुलवणे, हेच तर करायचे असते !

सुनील शानबाग या माझ्या दिग्दर्शक मित्राची खूप वर्षांनी भेट झाली. नाटकाची जातकुळी ओळखून त्याने केलेले दिग्दर्शन आणि अभिनीत केलेला एक छोटासा रोल दोन्ही अप्रतिम होते. सर्वच कलाकार पूर्ण ऊर्जेने काम करत होते.

विवेक म्हणाला की अनेक मोठमोठ्या शहरांत या नाटकाचे तुडुंब गर्दीत हाऊसफुल प्रयोग होत असतात ! इथे काल सुमारे दीडशे लोक असावेत. जे होते ते खुश झाले !
--- ००० ---

# पार्टी

ले० महेश एलकुंचवार, दि० अनिरुद्ध खुटवड, निर्मिती० महाराष्ट्र कल्चरल सेंटर, पुणे.

काल हा प्रयोग पाहिला. हाऊसफुल होता. सर्व वयोगटांतल्या व्यक्तींना या नाटकाबद्दल उत्सुकता होती. मीही हे नाटक पूर्वी वाचले वा पाहिले नव्हते. यावरचा चित्रपट पाहिला होता. नोकरीमुळे गावोगाव फिरत असल्याने अशा अनेक गोष्टी राहून गेल्या होत्या. काल संधी मिळाली.

जिंदगी ख्वाब है – खाबमें झूठ क्या – और भला सच है क्या
या गाण्याचा आशय आणि हे नाटक भाऊभाऊच ! या नाटकात तीन लेखक आहेत. एक निव्वळ धंदेवाईक, दुसरा तरुण उभरता आणि तिसरा बनचुका. तर त्या बनचुक्या लेखकाला एक मोठे पारितोषिक मिळालेले असून त्याच्या सन्मानाप्रीत्यर्थ दमयंती या एका उच्चभ्रू स्त्रीने आयोजित केलेली ही एक घरगुती पार्टी आहे. पाचसहा स्त्रिया, पाचसहा पुरुष अशी अनेक पात्रे इथे आहेत. सगळेच थोडेफार दुभंगलेले, ढोंगी, मतलबी वा वैतागलेले आहेत. तरुण लेखक ओरिजिनल आहे, असे बोलले जाते, पण, म्हणजे काय आहे, हे कळत नाही. धंदेवाला तर कोणत्याही प्रश्नाबद्दल गंभीर

असायची अपेक्षाच नाही. मग, राहतात बनचुके बर्वे. या लेखकाला एकदा दिल्लीला जाऊन घ्यावे असे बऱ्यापैकी मोठे पारितोषिक मिळालेले असते. ते घ्यायला जाताना वाटेत योगायोगाने त्याला गरीबीचे दर्शन घडते. तेव्हा त्याला प्रश्न पडतो की या लोकांच्या समोर काय अर्थ आहे माझ्या कलेला ? असे हे तीन प्रकारचे फुटकळ लेखक या नाटकात आहेत. त्यामुळे, कलानिर्मिती, संस्कृती यांबाबतच्या मूलभूत प्रश्नांबाबत एखादे वाक्यही इथे येण्याची शक्यता दुरावते. बर्व्यांना गरीबी दिसणे आणि शेवटी, आदिवासी भागात काम करायला गेलेल्या अमृत या पात्राच्या खुनाची बातमी येणे, यामुळे, लेखनापेक्षाही समाजकार्यच महत्त्वाचे आहे, असा संदेश कुणाला मिळाला तर तो वावगा ठरू नये.

या संदर्भात, स्वतः एलकुंचवारांच्या एका मुलाखतीबाबत बोलले पाहिजे. प्रश्नकर्त्याने गोपूंचा उल्लेख करून असा प्रश्न विचारला की आधीचे एलकुंचवार बदलले, असा त्यांचा आरोप आहे, यावर तुमचे काय म्हणणे ? यावर त्यांचे उत्तर असे आहे की माणूस वा लेखक बदलतोच – त्याने एकच धरून बसले पाहिजे, असे नाही. गोपूंनी असे म्हणणे हा लेखक म्हणून माझा अपमान आहे, कारण, मी काही पैशासाठी वा प्रसिद्धीसाठी बदललेलो नाही. दुसऱ्या एका ठिकाणी ते म्हणतात की मृत्यूबाबतच्या प्रश्नांना उत्तरे द्यायचे मी टाळले कारण ते मलाच अजून काही समजलेले नाही, माझे त्यावर चिंतन चालू आहे. -- याचा अर्थ काय होतो ? टप्पाटप्प्याने लेखकाची समज वाढत जाते. असे जर आहे तर या नाटकातले तीन लेखक वेगवेगळ्या टप्प्यांवर आहेत, असे का म्हणू नये ? त्यांना तरी कंडेम का करावे ? आणि संस्कृती, दर्जा, मूल्य हे शब्द हवेत तरी कशाला, असा प्रश्न येऊ शकतो.

हे नाटक आहे सर्जकता आणि एकूण मानवी जगण्यातले गुंतागुंतीचे प्रश्न आणि गोंधळ यांबाबत. प्रश्नांचा अनुभव वा वर्णन म्हणजे समज वा भान नव्हे. नाटक बसवताना दिग्दर्शकाला याकडे समग्रतेने पाहता आले असते की नाही, असा इथे प्रश्न पडतो. अनिरुद्धने प्रत्येक तुकडा नीट बसवला आहे पण एकूण दिग्दर्शकीय उपस्थिती जाणवत नाही. अभिनयात म्हणाल तर प्रसाद वनारसे यांनी बर्वे, त्या पात्राच्या सर्व बारकाव्यांसह उत्तम उभे केले, पण, इतर सर्वचजण त्या मानाने कमी वाटले. असे नाटक, संहितेत फारशी मर्मदृष्टी नसली तरीही, सर्वांच्या चिंतनशीलतेतून एका उंचीला जाऊ शकते. तसे वाटले नाही. कदाचित, पहिलाच प्रयोग असल्यानेही तसे झाले असेल.

एलकुंचवारांनी स्वतः या नाटकाबद्दल असे म्हटलेले आहे – मला स्वतःलाच ते नाटक फारसे आवडत नाही. कारण ते तसं असहिष्णू नाटक आहे. नाट्यविश्वातील वा बुद्धिवंतांच्या जगातील जी माणसं आहेत, ती कशी खोटी आहेत, हे दाखवण्याचा तो प्रयत्न आहे. तो अपुरा आहे. कारण ही माणसं खोटी असली तरी माणसं आहेत. त्यांच्या पण काही दुखणाऱ्या जागा आहेत. त्याच्याबद्दल त्या वेळेला मला मुळीच सहानुभूती नव्हती, आदर नव्हता. त्या वेळी मला कळतही नव्हतं. तेव्हा इतका, ‘ होलियर दॅन दाऊ, बेटर दॅन दाऊ ‘, तुमच्यापेक्षा मी कसा शहाणा आहे, वेगळा आहे, हे दाखवण्याचा त्या लेखकाचा पवित्रा आहे. ते अतिशय गैर आहे, असं आज मला वाटतं. लोकांना आवडतं ते नाटक.

कारण कलावंतांची, बुद्धिवंतांची टिंगल केलेली, त्यांचे बुरखे फाडलेले आवडतं लोकांना. पण त्याच्या पाठीमागे काही तरी ठणकणारं असतं, त्याबद्दल, त्या वेळेला मला सहानुभूती वाटत नव्हती. – एलकुंचवारांच्या या प्रांजळपणाबद्दल त्यांना सलामच केला पाहिजे !

तरीही, हे नाटक अधिक वजनदारपणे सादर झाले तर प्रेक्षकांच्या मनांत काही महत्त्वाचे प्रश्न निर्माण करू शकेल, असे वाटते.
--- ००० ---

# सावित्री

समंजस मन हेही मनच असते आणि मन हे घर्षणाशिवाय असू शकत नाही. इथे सावित्रीचे समंजस मन, मनाप्रमाणे न घडण्याच्या परिस्थितीच्या घर्षणात आहे. समंजसपणामुळे हे घर्षण सौम्य आहे, त्यामुळे, या नाटकातले नाट्यही सौम्य आहे. ही सौम्यता आणि यात भरून असणारी तरल काव्यात्मता यांमुळे हा नाट्यप्रयोग अद्वितीय, अपवादात्मक झालेला आहे. पु. शि. रेगे यांची ‘ सावित्री ‘ ही कादंबरी १९६२ साली आली. त्या आधीच्या ‘ शब्दरंजन ‘ च्या दिवाळी अंकात यातले एक प्रकरण कविता विभागात आलेले होते. ते योग्यच होते. वास्तवातले अनावश्यक तपशील वगळून येणारी ही काव्यात्मता रंगमंचावर आणणे हे सोपे काम नव्हते. रवींद्र लाखे यांच्या नेतृत्वाखाली हे अत्यंत समृद्धपणे झालेले आहे ! या निमित्ताने प्रिया जामकर ही एक अत्यंत समर्थ अभिनेत्री मराठीला लाभलेली आहे. यापूर्वीही तिने काही चित्रपटांत भूमिका केल्याचे कळते. पण, तिची अपवादात्मक गुणवत्ता इथे भरपूर व्यक्त झालेली आहे. अभिनयातले खूप बारकावे तर ती दाखवतेच, पण, तिच्याकडून इतके उत्तम मराठी रंगमंचावरून प्राप्त होणे हे तर खूपच विशेष आहे ! लाख्यांची उत्तम रंगावृत्ती, सर्व बारकावे ध्यानात घेणारे उत्तम दिग्दर्शन, एकूण प्रयोगाला नृत्यमयता देण्याची कल्पना आणि सर्व टीम हाताळण्याचे अप्रतिम कौशल्य, या सर्व गोष्टींमुळे प्रयोग अपवादात्मक उंची गाठतो ! कौशल इनामदारचे संगीत हा या नाटकाचा मोठा गुणविशेष आहे. प्रकाश, नृत्य, रंगभूषा वेशभूषा – हे सर्वच उत्तम आहे. नाटकाच्या तरल, काव्यमय, गंभीर आणि भाषाप्रधान पोताला बाधा न आणणारे साधेच पण पुरेसे नेपथ्य हीही एक जमेची बाजूच म्हणायला हवी.

ही कलाकृती सावित्रीने तिच्या प्रियकरला लिहिलेल्या पत्रांतून अवतरते. फार सनसनाटी घटना नाहीत, प्रियकर-प्रेयसी यांचा मीलनासाठीचा संघर्षही नाही. त्या दोघांची एखाददुसरी भेट घडते फक्त. यातली गंभीर, चिंतनात्मक अशी जी वाक्ये आहेत ती इतर पात्रांच्या तोंडी आहेत. सावित्री ही एक आनंदभाविनी असून समोर आलेले आयुष्य समजुतदारपणे जगणारी आहे. ( हा अशा समजुतदारपणाचा प्रचार नाहीय. अन्याय, अत्याचार होत असले तर असे कसे जगता येईल, असे प्रश्न एखाद्याला सुचू शकतात म्हणून सांगितले. ) ती स्वतः आधी प्रेम व्यक्त करण्यात काही वावगे मानत नाही, तिला

मिळणाऱ्या प्रतिसादांनी ती खुश होते, मनासारखे न घडण्याने नाराजही होते. मग यात काय विशेष ? काय विशेष कृती आहे या कलाकृतीची ? आपण एक लक्षात घेतले पाहिजे की व्यक्तिगणिक मनांचे अगणित प्रकार असतात. चांगली कलाकृती ही नुसतेच एका वेगळ्या मनाचे दर्शन घडवत नसते. त्या निमित्ताने ती कलाकृती पूर्ण मानवी जगण्याचेच भान घेत असते. असे घडते तेव्हा ती कलाकृती सर्वच माणसांना प्रस्तुत आणि मौल्यवान ठरते. ते इथे घडत असल्याने ही कलाकृती महत्त्वाची ठरते.

या नाट्यप्रयोगाची एकूण प्रक्रिया आणि मांडणी यांवर जाणकारांनी खूप सविस्तर, अभ्यासपूर्वक लिहायला हवे. नुसती वर्तमानपत्री परीक्षणे ते काम करू शकणार नाहीत. फेसबुकवर एवढे खूप झाले !

‘ मिती- चार ‘ आणि ‘ अस्तित्व ‘ या संस्थांचे खास अभिनंदन आणि धन्यवाद !

हा नाट्यप्रयोग महाराष्ट्र कल्चरल सेंटर च्या रंगमहोत्सवात सादर झाला -- त्यांनाही मन:पूर्वक धन्यवाद !

--- ००० ---

**' नातं '** हा दीर्घांक मी '७४ साली म्हणजे ४३ वर्षांपूर्वी लिहिला होता. आतापर्यंत तो --

प्रकाश बुद्धिसागर, विनय आपटे, योगेश सोमण, प्रसन्न जी. कुलकर्णी, अनिरुद्ध खुटवड,

विजय पांचाळ, कुमार बडगुजर यांनी बसवला होता.

आता ' टिंग्या ' या मराठी चित्रपटात प्रमुख भूमिका करणारे

सुनील देव तो बसवत आहेत !

दूरदर्शन स्पर्धेत ८५ संघांत प्रथम येणे

आणि पुरुषोत्तम करंडक मिळवणे

अशा गोष्टी या दीर्घांकाने केलेल्या आहेत !

--- ००० ---

**नाटककाराच्या शोधात सहा पात्रे**

लुईजी पिरांदेल्लो ( १९३४ चे नोबेल मिळालेला इटालियन नाटककार. ) यांच्या या महान नाटकाचा माधव वाटवे यांनी केलेला हा अनुवाद प्रथम मुंबईच्या साहित्य संघाने सादर केला होता. त्या वेळची मराठीतली उत्तमोत्तम नटमंडळी त्यात होती. अरविंद देशपांडे, माधव वाटवे, दामू केंकरे यांबरोबरच मीना सुखटणकर म्हणजे आताच्या मीना नाईक हे सर्व मिळून अभिनयाचे सखोल, उत्तुंग दर्शन घडवत असत. विशेष म्हणजे यातल्या बापाच्या भूमिकेत असत नटवर्य मामा

पेंडसे. ‘ प्रायोगिक ‘ म्हटल्या जाणाऱ्या या नाटकात तेही जीव ओतून काम करत. ही सुमारे १९७० च्या आसपासची गोष्ट असावी. त्या टीमने केलेले या नाटकाचे तीन प्रयोग मी त्या वेळी पाहिले होते. माणसाच्या सांस्कृतिक प्रवाहातले हे एक अत्यंत महत्त्वाचे नाटक म्हणून जगभर मान्यताप्राप्त आहे. ‘ वेटिंग फॉर गोदो ‘ इतकेच असंख्यांना हे नाटक मौल्यवान वाटते. ( आपल्याला जे समजत नाही त्याची टिंगल करा, हा इथल्या विनोदी लेखकांनी घालून दिलेला धडा आपला एखादा ज्ञानपीठ विजेता समीक्षकही पाळताना दिसतो ! तो गोदोवाल्या लेखकाला सहज जाता जाता दुय्यम लेखक म्हणू शकतो, तसेच तो पिरांदेल्लोलाही नक्कीच म्हणेल ! कारण आशयाच्या पाण्यात उतरण्याची आपली भीती लपवण्याचा तोच एक मार्ग अशांना उपलब्ध असतो ! ) हे सगळे आठवायचे कारण म्हणजे, कालच, सोलापूरच्या ‘ आराधना ‘ या संस्थेने सादर केलेला या नाटकाचा प्रयोग पाहिला. विजय कुलकर्णी यांचे दिग्दर्शन होते. नाटकातल्या दिग्दर्शकाच्या भूमिकेत होते गुरुराज अवधानी आणि बापाच्या भूमिकेत होते डॉ. शरद भुथाडिया. दोघेही उत्तमच करतात काम ! ( डॉ. शरद हे नाटकाच्या चौकटीबाहेर माझे मित्रच आहेत – नाटकात मात्र ते ' किंग लियर ' वा ‘ बाप ‘ च असतात ! ) सावत्र मुलीच्या भूमिकेत श्रद्धा कुलकर्णी या अभिनेत्रीने आवश्यक ती बेधडक समजूत दाखवली. प्रयोगाची सुरुवात जरा कच्ची वाटली कारण तालमीतली नटमंडळी या नाटकाची उंची पकडण्यात कमी पडत होती. नंतर, सहा पात्रांचे आगमन झाल्यावर मात्र प्रयोग आशयाशी ईमान राखणारा असा रिच होत गेला !

मानवी जगण्यातले सत्य, असत्य, आभास आणि भ्रम हे पिरांदेल्लोच्या चिंतनातले महत्त्वाचे विषय आहेत. हेच विषय त्याच्या ‘ हेन्री द फोर्थ ‘ या नाटकातही एका वेगळ्याच माहोलात हाताळलेले आहेत. या नाटकातली पात्रे त्यांच्या अव्यक्त नाटकाच्या जगात बद्ध आहेत. तसे बद्ध असण्याला ती ‘ सत्य ‘ म्हणतात ! त्यांना कोणत्याही नट-नट्यांनी सादर करणे – अभिनीत करणे – हे त्यांना असत्य वाटते – आभास वाटतो ! त्या पात्रांच्या जीवनात जे घडलेले आहे ते एकदाच त्यांच्या संबंधांतच घडलेले असूनही, प्रत्येक पात्राचे सत्य वेगळे आहे – इतर कोणत्याही पात्राने त्याचे सत्य सांगितले तर ती संतापतात – ‘ ते असे मुळीच नव्हते ‘ म्हणतात ! -- हा सगळा सत्य-असत्य-आभास-भ्रम यांचा खेळ प्रत्यक्ष प्रयोग पाहात समजून घेणे खूपच अर्थपूर्ण होऊ शकते. आपली मते, स्वभाव, सुखदुःखे या सर्वांचाच पाया संशयास्पद होतो.

जगणे सखोलतेने समजावे, आपापली सुखदुःखे-मानापमान यांत बद्ध असेच जगावे लागणार का – अशा बाबतींत ज्यांना आच असते ते लोक ‘ याचा उपयोग काय ? ‘ असा प्रश्न विचारत नाहीत. सवयीच्या जगण्यात, धर्म-विचारसरण्यांत आणि मतमतांतरांत स्वतःला गाडून घेणे हेच नॉर्मल आणि महत्त्वाचे मानणाऱ्यांसाठी नसतात ही नाटके ! संस्कृती म्हणजे, आहे त्या रटाळ मनाने आदर्शांच्या गप्पा मारणे नव्हे, याची ही नाटके जाणीव करून देतात.

असे नाटक बसवणे आणि त्याचे प्रयोग करणे हे निश्चितच एक आव्हानात्मक काम आहे ! हे काम केल्याबद्दल ‘ आराधना ‘ या संस्थेचे अभिनंदन आणि त्यांच्या एकूणच टीमला धन्यवाद !

--- ००० ---

## मऊ

निर्मिती – आविष्कार, ले० संतोष गुजर, दिग्द० प्रदीप मुळ्ये.

अतिवास्तव शैलीतले एक अत्युत्तम नाटक. यापूर्वी मला अशा प्रकारचे आवडलेले नाटक म्हणजे आळेकरांचे ' महापूर '. या नाट्यप्रयोगात तंत्रज्ञांचाही भरपूर सहभाग आहे आणि तो दर्जेदार आणि बिनचूक आहे. लेखकाइतकेच दिग्दर्शकाचेही खूप महत्त्वाचे, सर्जक काम आहे. त्या सर्व गोष्टींची वर्णने करायची ही जागा नव्हे. प्रत्यक्ष पाहा, एवढेच म्हणेन. काकडे काकांच्या नेतृत्वाखाली एकूण टीमने हा नाट्यप्रयोग खूपच प्रभावी, भेदक आणि अर्थपूर्ण केलेला आहे.

विषय म्हणाल तर अर्थ हरवलेली कुटुंब व्यवस्था आणि बालसंगोपन वा पाल्याबाबतच्या जबाबदाऱ्या, असा म्हणता येईल. मला हा विषय हे एक निमित्त वाटले. त्याहून खोलातला विषय आहे – प्रत्येक व्यक्तीचे अलग पडत जाणे. लैंगिकता आणि हिंसा हे आजच्या जगण्याचे ' प्राणतत्त्व ' झालेले आहे. आणि यासह जगताना मुलांचे काय होते आहे याबाबत जणू ' नाइलाज ' ही स्थिती आहे. नाटकात आई, वडील आणि मुलगा, अशी तीनच पात्रे आहेत. तिन्ही पात्रे साकार करणाऱ्यांचा अभिनय उत्तम होता. एकूण तंत्रासह होणारे सादरीकरण खूप नाट्यमय होते. कोणताही किचकटपणा नव्हता – एक क्षणही नाटकावरून लक्ष ढळणे शक्य नव्हते. इतका सुविहित आणि नेटका प्रयोग पाहणे हा एक रिच अनुभव होता.

संतोष गुजर या लेखकाशी ओळख झाली. त्याने या आधी काही नाटके लिहिलेली असली तरी सादर होणारे हे त्याचे पहिलेच नाटक आहे ! आश्चर्य वाटावे असे भरगच्च नाटक आहे ! या नाटकाने एकूण मराठी नाटकात एक खूप मोलाची भर पडली आहे, असे मला वाटते. हा एक महत्त्वाचा नाटककार मराठी रंगभूमीला लाभला आहे, हे निश्चित ! या लेखकाच्या, पुढील कामाबद्दल नक्कीच उत्सुकता राहील !

आपापल्या कोषांत गुरफटत माणसांनी एकाकी, बेफिकीर आणि हिंसक होत जाणे – हे कशामुळे घडत असावे – हा प्रश्न मनात घोळवतच प्रेक्षक बाहेर पडतात. प्रेक्षकांना असे चिंतनप्रवृत्त करणे, हेच तर चांगल्या कलेचे काम असते.
--- ००० ---

तेव्हाचे हिंदी –
हो गई आधी रात, अब घर जाने दो

आताचे मराठी --

जाऊ द्या ना घरी, आता वाजले की बारा

आणि आताचे हिंदी –

रात के बज गये पावने दो, जो होता है होने दो

-- आताचे हिंदी जरा जास्त पुरोगमी वाटतेय ना ?

--- ००० ---

**रिंगण**

अगदी एखाद्या गरीब शेतकऱ्याच्या जीवनावर जरी असला चित्रपट तरीही त्याच्या सुखदुःखांत, संकटांत त्याला साथ देणारी त्याची पत्नी तरी असते त्या चित्रपटाची नायिका. या चित्रपटात नायिकाच नाही. फक्त एक बाप आणि त्याचा मुलगा ही दोनच महत्त्वाची पात्रे ! या अर्थाने हा एक स्त्रीपात्रविरहित चित्रपटच म्हणावा लागेल. विशेष म्हणजे, असे असूनही आणि काहीसा गंभीर असूनही हा चित्रपट प्रेक्षकांना पकडून ठेवतो ! याचे श्रेय अर्थातच शशांक शेंडे या आपल्या उत्तम अभिनेत्याला आणि त्याच्या मुलाचे काम करणाऱ्या साहिल जोशी ला जाते. एक साधी कथा लिहून तिला साजेसे दिग्दर्शन करणारा मकरंद माने आणि सर्व तंत्रज्ञ यांनाही जाते. असा हा एक साधा, छान चित्रपट निर्माण करून तो प्रेक्षकांपर्यंत आणणे हे खरेच एक कौतुकास्पद काम संबंधितांनी केलेले आहे. प्रत्यक्ष प्रदर्शनापूर्वीच या चित्रपटाला अनेक महत्त्वाच्या पारितोषिकांनी ( विशेषतः, सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपट – हा राष्ट्रीय पुरस्कार ) गौरवण्यात आलेले आहे. ते योग्यच आहे.

कल्पना इतकीच आहे की एका छोट्या शेतकऱ्याच्या मुलाची आई वारलेली आहे आणि ती देवाघरी गेलीय, असे त्याला सांगण्यात आलेले आहे. दुसरा भाग असा की त्या शेतकऱ्याची जमीन सावकाराकडे गहाण असून ती सोडवायची झाल्यास एक लाख रुपये लागणार आहेत. ते जमवणे अशक्य आहे. मुलाची समजूत घालणे आणि आपलेही गाऱ्हाणे देवापुढे मांडणे यासाठी ते बाप-मुलगा पंढरपुरात येतात. आई मिळणे शक्यच नसते पण, लाखाचा प्रश्न मात्र सुटतो. बाप-लेकांच्या चेहऱ्यांवर हसू उमटते !-- कोणताही भडकपणा वा ऊरबडवेपणा न करता ही कथा मांडण्यात आलेली आहे. त्याला उत्तम फोटोग्राफीची साथ आहे. असा साधा, छान चित्रपट मराठीत क्वचितच येतो. ढोबळ घटनात्मकतेच्या नादी न लागता निर्माण झालेला मराठीतला हा एक वेगळा चित्रपट आहे.

यात काही खटकतच नाही, असे नाही. मुळात एका दृश्यात त्या बापाला रस्त्यावर विठ्ठलमूर्ती कशी सापडते, ते कळले नाही. त्या मूर्तीशी बोलताना, " मी लबाड नाहीय म्हणून मला ही शिक्षा होय ? " हे वाक्य घुसडलेले वाटते. पुढे त्याच्या हातून लबाडीचा प्रसंग घडणार आहे, याच्या दिग्दर्शकीय पूर्वसूचनेसाठी ते वाक्य आलेले आहे, पण, ते ओघात असे जमलेले नाही. त्यांना राहायला एक अंधारी खोली दिली जाते – तिथल्या दिव्याचे बटण कुठे आहे, ते त्याला कसे कळते ? चोरलेले पन्नास हजार त्या अज्ञ मुलाने मालकाला नेऊन देणे, मालकाने त्याची गरज ओळखून पन्नास हजार त्याला देणे – अशा गोष्टींत ' पटणारा ' सहजपणा आणता आलेला नाही. आणि सामानासह गाडी कुठेतरी ठेवून ( कुणाला, लक्ष ठेवायला सांगायचाही प्रयत्न न करता ) तो कसा गावात हिंडत राहतो ? असो. हा एक सिनेमा आहे, हे समजून, एवढे स्वीकारायला प्रेक्षक तयार होतात.

साधेपणा, उत्तम अभिनय आणि विषय भावनिक असूनही भावनिक अवडंबर न माजवणे – यांमुळे हा सिनेमा ' श्वास ' पेक्षा ( आजोबा आणि नातू, अशी प्रमुख पात्रे असलेला ) चांगला वाटला. ' मराठी पाउल पडते पुढे ' असे म्हणता येईल !

--- ००० ---

पंढरपूरच्या वेश्या मराठी चित्रपटांना पावणाऱ्या आहेत ! पुरावे --

' एलिझाबेथ एकादशी ' आणि ' रिंगण ' !

--- ००० ---

**वाय** ( दोन अंकी नाटक ).

गेल्या २९ जूनला इथेच फेसबुकवर विश्वास पाटील यांच्या ' झुंडीचे मानसशास्त्र ' या पुस्तकाबाबत एक पोस्ट वाचली होती. तीवर माझी कॉमेंट होती – " महत्त्वाचा लेख ! झुंडीत न जाता एकटेपणाने जगायची हिंमत, असे काही असते का, याचेही शास्त्रीय विवेचन व्हावे. " आज ०२ जुलै रविवार च्या लोकसत्तेत मकरंद साठे यांचा एक लेख असून त्याचे शीर्षक आहे, ' झुंडशाही – जंगलच्या राज्याकडे ? ' याही लेखात, कोणत्याही झुंडीत सामील न होणारा माणूस, याबाबत काहीही मजकूर नाहीय. लोकसत्ताच्या त्याच आजच्या पुरवणीत, राजीव काळे यांचा, ' रिकाम्या खुर्चीचे वजन ' या शीर्षकाचा एक लेख आहे.त्यात, " चीनची एवढी मोठी अक्राळविक्राळ दमनवादी यंत्रणा " असे म्हटले आहे. म्हणजेच, तिलाही झुंडच म्हणावे लागते. त्याचबरोबर, हिंदुत्ववादी, इस्लामिक अशा झुंडींबाबतही आपण वाचत असतो. धर्म, जात, भाषा, विचार, ( या नाटकात असणारी तथाकथित संस्कृती ) एवढेच काय फुटबॉलच्या संघांच्या नावांनीही झुंडी असतात ! यांतल्या अमुक झुंडी चांगल्या आणि तमुक वाईट, हे कसे ठरवणार ? कारण ' झुंड ' या शब्दाच्या अर्थातच दमन, अत्याचार, हिंसा हे अंतर्भूत आहे. धर्माच्या पायावरची झुंड क्रूर आणि विचारसरणीच्या पायावरची झुंड सात्त्विक, असे म्हणता येत नाही. पण, या प्रश्नाला स्पर्श न करताच अनेक लेख व पुस्तके लिहिली जातात. कोणत्या तरी विचाराचे वा

नैतिकतेचे आदर्श मनात बाळगून, त्याव्यतिरिक्त असणाऱ्या इतर झुंडी कशा वाईट आहेत, हे सांगायचे प्रयत्न सातत्याने होत राहतात. कोणत्याही झुंडीत सामील न होता माणूस जगू शकतो का आणि ते अधिक सर्जक जगणे असू शकते का, यावर फारसे कुणी बोलत नाही. एकटा जगणारा माणूस म्हणजे काय ? तो कोणत्याही क्रौर्यापासून मुक्त असतो का ?

हे सगळे लिहिण्याचे कारण, मी काल पाहिलेले ' वाय ' हे नाटक. लेखक-दिग्दर्शक श्रीरंग गोडबोले आणि विभावरी देशपांडे. निर्मिती, महाराष्ट्र कल्चरल सेंटर, पुणे. या नाटकाचा विषय हाच, माहीत असलेलाच होता. आहे तीच माहिती नाट्यमयतेने मांडलेली होती. अपेक्षेप्रमाणे प्रयोग प्रभावी होता. अमुक एका संस्कृतिरक्षकांच्या झुंडीमध्ये एका तरुणाला सक्तीने सामील करून घेतले जाणे, हा विषय. तसे होणे वाईटच आहे, पण मग, शक्य काय आहे ? चांगले काय शक्य आहे ? डाव्या विचारांच्या झुंडीत जाणे की एकटे जगण्याचा प्रयोग करणे ? ' माणूस आणि झुंड ' – अशा पूर्ण प्रश्नाला हे नाटक स्पर्श करत नाही. असे का होत असावे ? की अमुक प्रकारचे विचार बाळगणाऱ्यांचा समूह म्हणजे झुंड नसते, असे काही सुचवायचे आहे ? किंवा झुंड वाईटच असली तरी अमुक झुंड कमी वाईट असते, असे सुचवायचे आहे ? काही निष्कर्ष गृहीत धरून आशयाला हाताळणारी कलाकृती ही पूर्ण मानवजातीला प्रस्तुत होत नाही, म्हणजेच, मर्यादित, छोटी ठरते. त्यामुळेच, हे एक लहान आवाक्याचे नाटक ठरते. ' रिकाम्या खुर्चीचे वजन ' दुर्लक्षूनच का असा आशय मांडला जातो ? संख्या, सत्ता, पैसा यांच्या पाठबळाने, साध्या समूहाचीही झुंड होते का ? या प्रश्नाचे समग्र भान घेणे हा या नाटकाचा हेतूच नाहीय. त्यामुळे, फक्त, अमुक प्रकारची झुंड नाकारणे हेच जणू पूर्ण मानवी मूल्य आहे, अशा प्रकारची मांडणी होते. मग, हे नुसतेच एक किरकोळ, प्रचारकी नाटक ठरते. पण, हा प्रचार, ही अमुक एक झुंड नाकारणे, यात वाईट काय आहे ? तर काही नाही. तरीही, एकूणच, झुंडवृत्तीच नाकारणे, असे काही असू शकते का, या प्रश्नाचे काय ?

--- ००० ---

**समाजस्वास्थ्य**

ओपन मॅरेज – खुला विवाह -- म्हणजे विवाह करून वा न करता स्त्री-पुरुषांनी असे एकत्र राहणे की ज्यात दोघांनाही अन्य शरीरसंबंधांची मुभा असते. अमेरिकेसारख्या देशातही अशा संबंधांचे प्रमाण १ ते ३ टक्क्यांपेक्षा जास्त नाहीय. जे काही असे संबंध आहेत त्यांतल्या ८० टक्के व्यक्ती मत्सरग्रस्त असतात, असे संशोधन आहे. आपल्या जोडीदाराव्यतिरिक्त अन्यत्र शरीरसंबंध करण्यास सगळीकडे -- जगभर -- फसवणूक, प्रतारणा, व्यभिचार वा विश्वासघातच म्हटले जाते. सुरक्षिततेची इच्छा, स्वामित्व भावना, असे सगळे यात असते. या विषयावर मी अगदी पुरोगामी, वैज्ञानिक दृष्टिकोणवाल्यांशीही बोललेलो आहे. तेही, जोडीदाराशी असे ' खोटे ' वागणे वाईटच म्हणतात. एकूण सामाजिक बंदोबस्त अशा कल्पनांचा असल्यामुळे व्यभिचाराचे संबंध हे चोरटेपणाने चालतात. कारण त्या संबंधांच्या सुखासाठी, असलेली घडी विस्कटायची

नसते. अशा वागण्याला काहीजण हलकटपणा वा भित्रेपणा म्हणतात. या चोरट्या संबंधांच्या जगाने कला-साहित्याला हजारो पोती भरून मालमसाला पुरवलेला आहे, हे सर्वांना माहीत असूनही हे असे असते.

सारांश, व्यभिचार सुखाचा असतो, उपकारक असतो, त्यात काहीही पाप नसते, देवादिकही तसेच होते, तो प्रकार समाजात रूढ झाला तर माणसाच्या जगण्यातले खूप प्रश्न कमी होतील -- हे सगळे बरोबरही असले समजा तरी ते नुसते वैचारिक पटून उपयोग काय ? प्रत्यक्ष स्त्री-पुरुष संबंधाची कृती हा खरे तर प्रश्नच नसतो. त्या भोवतीचे मानसिक जंजाळ हा असतो खरा प्रश्न. आसक्ती, सुख, मत्सर, द्वेष, सूड – यांचे काय करणार ? नुसत्या वैज्ञानिक आणि धाडसी भडिमाराचा उपयोग काय ? मानवी मनाची वर्तणूक समजून न घेता नुसती नैतिकतेची वा खुलेपणाची चर्चा व्यर्थच ठरणार. या जशा सगळ्या अशास्त्रीय, मानवनिर्मित कल्पना आहेत तशाच, राष्ट्रवाद धरून असंख्य अस्मिताही मानवनिर्मितच, अशास्त्रीयच तर असतात. मनाच्या अशा वर्तणुकीमुळेच तर जगण्यात असंख्य छळ आणि दुःखे येतात. या सगळ्या मुळातल्या गोष्टींकडे दुर्लक्ष करून र. धों. कर्वे समाजात काही प्रबोधन, सुधारणा घडवू पाहात होते, असे ‘ समाजस्वास्थ्य ‘ हे नाटक पाहून वाटले. एकूणात त्यांचा विवेक अनाठायी आणि निष्फळतेने खर्च होत राहिला आणि ते फुकटचे मनस्ताप ओढवून घेत बसले, असे वाटले. ( बाकी, संततिनियमन, आरोग्यविचार, वगैरे उत्तम ! )

कर्व्यांच्या एकूण कार्यावर लेखक अजित दळवी यांनी नाटक चांगलेच लिहिलेले आहे. अतुलच्या निष्णात दिग्दर्शनाखाली प्रयोगही उत्तमच होतो. नेपथ्य-कल्पना खास आहेत. बाकी सर्वच उत्तम आहे. उत्तम निर्मिती ! चरित्रनायकच जर विषयाच्या खोलात जाणारा नसेल तर चरित्रनाटक त्या मर्यादा कशा ओलांडणार ? विशेषतः नायक-गौरवाचे नाटक ?

तरीही आपले विचारविश्व ढवळून काढणारे, क्वचितच रंगमंचावर येणारे, असे हे एक वेगळे, विशेष नाटक आहे.

अजून ज्यांनी पाहिले नसेल त्यांनी जरूर पाहावे.

--- ००० ---

**ढिंचाक पूजा**चे आणखी एक गाणे ऐकले –

दिलोंका शूटर है मेरा स्कूटर

दिलोंका शूटर

कोई नही है मुझसे क्यूटर

दिलोंका शूटर

जो आहे त्या आवजात गाणार ! रियाझ, तपस्या, अभ्यास, वगैरे घाला सुरळीत ! या ढिंचाकची अत्यंत वाईट भाषेत टिंगलटवाळी किंबहुना तिला शिव्यागाळीही झालेली आहे. तिला त्याचे काही घेणे नाही. तुम्ही आम्हाला हे असले गलिच्छ जग दिलेत, वगैरे, मागच्या पिढीला बोल लावत बसण्यातही इंटरेस्ट नाहीय, वेळही नाहीय ! सगळी अनिश्चितता, घाण आणि हिंसा यांच्या या जगात आम्ही शोक करण्यात वेळ घालवणार नाही. आहे ते शरीर, आहे तो आवाज, सुचेल तसे गाणे यांनी आम्ही साजरे करत राहू आमचे जगणे ! आम्हाला हे सत्य कळलेय की फक्त हा एकच क्षण आहे जगायला – भोसड्यात गेली संस्कृती आणि अभिजातता आणि तर्क आणि मानवी मूल्येबिल्ये ! आम्ही जगाला लाथा घालून मजेत राहणार – जगाने हवे तर आम्हाला लाथा घालाव्यात ! तुम्हाला सुचतील, माहीत असतील तेवढ्या सगळ्या घाण शिव्या आम्हाला द्या ! बास ? झाले ?

आता ऐका – सेल्फी मैने ले ली आज –

अब एंजॉय करो – और हँसो भी, यार --

हा लेख ' गांभीर्याने ' वाचून त्यावर मते व्यक्त व्हावीत –

( ढिंचाक पूजावरचा ‘ अक्षरनामा ‘ मधला अमोल उदगीरकर यांचा लेख )

--- ००० ---

प्रत्यक्ष आणीबाणीच्या काळात आणि नंतरही मला विनोबा भावे आणि कुमार केतकर यांचेच पटत होते. एक तर, इंदिरा गांधींना आणीबाणी लादणे भाग पाडण्यात आले होते आणि दुसरे म्हणजे बेष्टपैकी शिस्त आलेली होती. नेहमीच पंधरा मिनिटे उशिरा येणारेही वेळेआधीच पंधरा मिनिटे त्यांच्या खुर्चीत स्थानापन्न होत होते. तर त्या वेळी --

काँग्रेस विरुद्ध संघपरिवारासह इतर सर्व – असे होते.

आणि आता --

संघपरिवार विरुद्ध काँग्रेससह इतर सर्व – असे आहे.

अशा वेळी मधुर भांडारकर यांचा **‘ इंदू सरकार ‘** हा आणीबाणीविरोधातला सिनेमा येतो आहे.

काहींना असे वाटतेय की तो सिनेमा काँग्रेस आणि गांधी घराणे यांच्या विरोधात आहे.

एकूणात त्या सिनेमाला काहींचा विरोध आहे.

आता येणार आहे अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा प्रश्न !

आपला प्रश्न बघा पडद्यावर --

सर्वांनी अभिव्यक्तिस्वातंत्र्याला महत्त्व दिले तर संघपरिवारविरोधी शक्तींचे राजकीय नुकसान होईल का ?

-- या प्रश्नावर बोलायला आज आपले मान्यवर पाहुणे आहेत --

-- कुणी नाही – फेसबुकवरचे आपणच सर्व फ्रेंडस --

**इंदू सरकार**

नागपूरचे कॉंग्रेसवाले म्हणाले की पत्रकार परिषद् कशी घेतात ते आम्ही बघू ! हा चित्रपट कुठे लागतो आणि ते थियेटर कसे चालते ते आम्ही बघू !

विशेष म्हणजे अजून कुणी हा चित्रपट पाहिलेला नाहीय -- त्यात काय आक्षेपार्ह आहे, तेही कुणाला माहीत नाहीय !

(आजच्या मटामध्ये आलेल्या जयंत पवारांच्या लेखात अशी माहिती आहे की सेन्सॉर बोर्डाने या चित्रपटातले -- आरेसेस, कम्युनिस्ट, अकाली, जयप्रकाश नारायण आणि किशोरकुमार -- हे शब्द् वगळायला सांगितलेले आहेत ! )

वरील प्रकारची भाषा आपण शिवसेना आणि मनसेकडून ऐकत आलो --

आता आणखी एक सात्त्विक संतापवाला वाढला !

इतर पक्षांनाही अशी संधी मिळेल, असे चित्रपट यायला हवेत !

पूर्ण भारत हा सात्त्विक संतापी आणि अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा झेंडा उंच धरणारा, अशा दोन्ही कारणांसाठी प्रसिद्ध व्हायला पाहिजे !

एखाद्या वेळेला येणारच की सात्त्विक संताप --

एरवी सतत अभिव्यक्तिस्वातंत्र्यच तर आवडते आपल्याला !

--- ००० ---

तत्त्वे खूप असतात हो -- विवेक महत्त्वाचा !

कन्हैया की मधुर, कुणाचे अभिव्यक्तिस्वातंत्र्य महत्त्वाचे

( आणि कुणाचे चेपायचे )

ते प्रत्येकाने आपापल्या विवेकाने ठरवायचे !

( ' विवेक ' म्हणजे काय, याबाबतही मतभेद असणारच ना ! )

--- ००० ---

काल संध्याकाळी **‘ यू, मी ॲन्ड चाय ‘** हा एक छान, साधा, सौम्य, रोमँटिक स्मित देणारा, प्रेममय कार्यक्रम ऐकला – पाहिला ! चहाच्या साक्षीने प्रेम जुळणे, तुटणे, व्यक्त होणे – न होणे, अस्फुट वा उघड व्यक्त होणे – अशा प्रेमाच्या अनेक छटा अभिव्यक्त करणारा हा कार्यक्रम आहे. आशुतोष जोशी, धनश्री गणात्रा, अवंती मेहता आणि अभिजित थिटे आणि त्यांचे तंत्रज्ञ यांनी मिळून साकारलेला. यात चैताली अहेर , दीपा मिट्टीमनी, अभिजित थिटे, अवंती मेहता, धनश्री गणात्रा

यांच्या गीतरचना सादर होतात. चैताली ही एक उत्तम कवयित्री आहे, हे माहीत होतेच, तशीच धनश्रीही बहारदार गीतकार आहे, हे दिसून आले ! उदाहरणादाखल मला खूप आवडलेली धनश्रीची ही रचना बघा –

कहनी थी इक बात,
दिल की दिल में ही रह गयी...
फिर एक प्याली चाय
डूबते सूरज पर उधार रह गयी... □

कभी तुम्हारे पास वक्त नहीं...
कभी हमे फुरसत नहीं...
तो कभी... हालात की इजाजत नहीं...
किसी न किसी बहाने
हर मुलाकात हाथों से फिसल गयी...
फिर एक प्याली चाय
डूबते सूरज पर उधार रह गयी... □

चलो रूबरू मुलाकात न सही,
सोचा फोन पर ही सही...
कम से कम बात तो हो जाये...
जाने अन्जाने में, बातों बातों में,
इजहार-ए-जज्बात हो जाये...
न फोन हुवा, न इजहार हुवा,
न कोई बात भी हुई...
फिर एक प्याली चाय
डूबते सूरज पर उधार रह गयी... □

अब तो सूरज भी ढला...
दूध-सा सफेद चांद बादलों से निकला...
चलो अब अपने अपने घर

तनहाई की महेफिल सजाते हैं...
कल तुमसे चाय पर मिलने का वादा
अपने आपसे कर लेते हैं...
कल तक इन मासूम खयालों को
यूं इंतजार ही करने दो...
कल तक फिर एक प्याली चाय
डूबते सूरज पर उधार ही रहेने दो.... □

□ धनश्री गणात्रा

इतरही गाणी मस्त स्वप्नील मूडमध्ये नेणारीच होती. सर्व गाण्यांना धनश्रीनेच संगीत दिलेले आहे. आशुतोष जोशीबरोबर तीच अर्थात प्रमुख गायिका आहे. तिचा आवाज उत्तम असून ती छान समरस होऊन गाते. दोन सुंदर तरुणी आणि दोन तडफदार तरुण यांना हा कार्यक्रम सादर करताना ‘ पाहणे ‘ हेही दिलखुश करणारे आहे ! धनश्री सध्या संगीत विषयात पीएचडी करते आहे ! इथे आशुतोष जोशी या गायकाचा विशेष उल्लेख करावा लागेल. आजच्या पिढीला आवडणारे अतिरेकी कृतिशीलतेचे भावनोद्रेकी गाणे तो उत्तम सादर करत होता ! अभिजित आणि अवंती यांच्या कवितांनीही बहार आणली !

मध्यमवर्गीय असण्याचा कोणताही न्यूनगंड न बाळगता उत्फुल्लपणे सादर होणारा हा एक हलका-फुलका कार्यक्रम आहे. मला आवडला !

वैराळकर अण्णांची प्रत्यक्ष भेट होणे आणि त्यांच्याबरोबर बसून हा कार्यक्रम आस्वादता येणे -- हा माझ्यासाठी एक अनपेक्षित विशेष बोनस होता !
Sureshkumar Vairalkar.
--- 000 ---

कसा मी दैवयोगाने तुझ्याशी बांधला गेलो
तुझ्या दैवात होतो मी मला मी पारखा झालो

--- ऐकून ऐकून आपणही दोन ओळी लिहाव्यात असे वाटले, म्हणून लिहिल्या !

आपल्या सुरेशकुमार वैराळकर अण्णा Sureshkumar Vairalkar यांच्या नेतृत्वाखाली चालणारा ' **गझलरंग** ' हा कार्यक्रम पाहिला/ऐकला. नऊ नवे गझलकार त्यांच्या गझला सादर करत होते आणि मधून मधून अण्णांचे अर्थवाही/रंजक सूत्रसंचालन होते.
सर्व रसिक प्रेक्षक हा कार्यक्रम दिलखुलास एंजॉय करतात ! मजा येते !

धन्यवाद, अण्णा !

--- ००० ---

**चेतन सशितल**

या महान माणसाचा आवाज आपण सर्वांनी कुठे कुठे, कधी कधी ऐकला असेल ते सांगता नाही येणार ! हा एक अजब चमत्कार आहे !
आत्ताच एबीपी माझाच्या कट्ट्यावर हे अवलिया चेतन सशितल आलेले होते ! त्यांनी आवाजाचे शास्त्र आणि आवाजाचा वापर यांचे जे काही भन्नाट प्रकार प्रात्यक्षिकांसह दाखवले ते पाहून स्तिमित होणे हे एकच शक्य होते ! डबिंगच्या क्षेत्रातला हा एक सम्राटच म्हणावा लागेल ! जॉनी वॉकर, ओम प्रकाश, अमिताभ, शत्रुघ्न, अमरीश पुरी यांपासून ते ऍनिमेशन चित्रपटांतले डबिंग या सगळ्यात यांची मास्टरी आहे ! संजय दत्त तुरुंगात असताना त्याच्या चित्रपटांचे डबिंग यांनीच केले ! शिवाय अनेक जाहिराती ! मंत्रपुष्पांजली आणि गायत्री मंत्र हे कसे म्हणायला हवेत, त्याचे आवाजासाठी फायदे काय आहेत, वगैरे खूपच माहिती त्यांनी दिली. इंग्रजी नटांचेही संवाद म्हणून दाखवले ! इतका भरगच्च कार्यक्रम क्वचितच बघायला मिळतो. हा कार्यक्रम यूट्यूबवर उपलब्ध असणार. बोलण्याच्या कामात असणाऱ्या सर्वांनी आणि सर्वच नटनट्यांनी पाहावा असा हा कार्यक्रम आहे.
संग्राह्य कार्यक्रम !
हे सज्जन मला आजच माहीत झाले ! त्यांना कडक सलाम !

--- 000 ---

**' पारसमणी '** हा चित्रपट १९६३ साली आला. लक्ष्मीकांत-प्यारेलाल यांचे संगीत असलेला पहिला चित्रपट. ' हंसता हुआ नूरानी चेहरा ' आणि ' वो जब याद आये ' या गाण्यांनी धुमाकूळ घातला ! यू ट्यूबवर जाऊन Sairam Iyyer -- हा सर्च द्या. हा माणूस महंमद रफी आणि लता या दोघांचेही आवाज काढत ' वो जब याद -- ' हुबेहूब म्हणतो ! भारत हा एक अशा चमत्कारांचा देश आहे, हे सर्वच मान्य करतील ! साईरामची आणखीही बरीच गाणी आहेत. त्याचे ' कुहू कुहू ' ऐकाल तर किमान एक आठवडाभर तरी थक्क कंडिशनमध्येच राहाल !

वो जब याद आये, बहोत याद आये

गम-ए-जिन्दगी के, अँधेरे में हमने
चिराग-ए-मोहब्बत जलाए, बुझाए

आहटे जाग उठी, रास्ते हँस दिए
थामकर दिल उठे, हम किसी के लिए
कई बार ऐसा भी धोखा हुआ हैं
चले आ रहे है, वो नज़रे झुकाए

दिल सुलगने लगा, अश्क बहाने लगे
जाने क्या क्या हमे, लोग कहने लगे
मगर रोते रोते हँसी आ गयी हैं
ख्यालों में आ के वो जब मुस्कुराये

वो जुदा क्या हुए, जिन्दगी खो गयी
शम्मा जलती रही, रोशनी खो गयी
बहूत कोशिशें की, मगर दिल ना बहला
कई साज छेडे, कई गीत गाए
गीतकार असद् भोपाली
--- ००० ---

## न्यूटन

मागच्या आपल्या ऑस्कर प्रवेशिकांची तुलना करण्यात इंटरेस्ट वाटू नये, असा एक दर्जेदार उत्तम चित्रपट ! आपल्या लोकशाहीचा कुठे कुठे कसा कसा बोजवारा उडत असतो, ते विषयद्रव्य असलेला ! हे लोकशाहीतच चालू शकते – हुकूमशाहीत चालते का असे, समजा, हुकूमशाहीतले दोष दाखवणे ? हा चित्रपट सेन्सॉर होणे आणि भारताची ऑस्कर प्रवेशिका म्हणून पुढे जाणे, हे अभिव्यक्तिस्वातंत्र्याच्या क्षेत्रातले एक सुचिन्ह वाटते !

“ गुंडे चुनके आये तो भी हर्ज नही मगर चुनावमे गुंडागर्दी नही होने देंगे ! “
किंवा --

प्रिसायडिंग ऑफिसर, त्याच्याबरोबर आलेल्या लेडी-क्लार्कला विचारतो, “ आप भी इनकी तरहही निराशावादी हैं ? “
यावर ती उत्तर देते, “ जी नहीं – मैं आदिवासी हूँ ! “
असे अनेक उत्तम संवाद आहेत. साधी एका प्रामाणिक कारकुनाची कथा ! तुम्ही म्हणाल, असा अद्वितीय कारकून सापडू शकतो भारतात ? तर होय, शक्य आहे. माझ्या माहितीत एक असा कारकून होता की लोक जाता जाता त्याच्या खिशात काही पैसे टाकून जात – एक रिवाज म्हणून – तर त्याने ती नोकरी सोडली आणि तो पोस्टात नोकरीला लागला ! आणि अशा चांगल्या सिनेमासाठी आपण हे सत्य म्हणून सहज स्वीकारू शकतो. हे नुसते विडंबन नाही – जगण्यातली अनेक आंतरद्वंद्वे इथे उघडी पडतात ! ही झाली जंगलातली, नक्षलाईट लोकांचा धोका असलेल्या आदिवासी भागातली निवडणूक – पण, शहरात तरी काय मोठे तत्त्वशील आणि वैचारिक चालू असते, हा विचार येतोच !

शेवटी तर, राहिलेल्या थोड्या वेळात, मतदानाला आलेल्यांचे मतदान, न्यूटन बऱ्याच संघर्षानंतर करून घेतो, त्यावर चिडून भारतीय सैनिकच त्याला बुकलून काढतात !

बाकी अभिनय वगैरे सर्वच उत्तम !
न जाणो, भारतीय लोकशाहीचे प्रश्न इथे आले असले तरी, चित्रपट म्हणून हा ‘ न्यूटन ‘ कदाचित भारताचे नाव रोशन करू शकेल !

गांभीर्य आणि विनोद यांचा असा मिलाफ क्वचितच पाहायला मिळतो !

--- ००० ---

**कासव**

“ दुःख – पण का ? “
“ आपण माणसांवर प्रेम करतो आणि त्यांच्यांत गुंततो – मग त्यातून आपण सुटकाही करून घेऊ पाहतो – कारण आपल्याला एकटेपणाही हवा असतो ! यातला समतोल नाही साधला जात – म्हणून दुःख ! – हा माणसाच्या जगण्याला मिळालेला एक शापच आहे ! – की वर म्हणू या ? “
-- हे तत्त्वज्ञान ! शाप म्हणा की वर म्हणा – आहे ते मान्य असणे ! ( यात आपण जगातली सर्व हिंसा, युद्धे, विषमता, अन्याय – हे सर्व मान्य करतो, हे कळतच नसावे ! ) खोलातले प्रश्न विचारायची गरजच नसणे ! एखाद्या प्रश्नातला खूप गुंता दिसावा आणि त्याचे बौद्धिक उत्तर सापडू नये आणि तरीही त्या गोंधळाच्या रचनेचे पूर्ण दर्शन व्हावे – असे इथे काही होत नाही.

एक ‘ गंभीर ‘ सिनेमा काढायचा हे ठरलेले आहे. एक मनोरुग्ण मुलगा आणि अशाच मनोविकारातून बरीच बरी झालेली एक स्त्री ! अब हो सकता है गंभीर पिक्चर ! ते पोरगे मनगटाची नस कापण्या इतपत बिघडलेले आहे – नंतर मात्र – कुठे ताट ढकलून दे, कुठे पाणी सांड – असे किरकोळ काही ते करते ! ते फारच हिंसक झाले असते तर त्याला तिथे कोकणात की गोव्यात ठेवून घेऊन असला खोटारडा गंभीर सिनेमा काढताच आला नसता ! ‘ वळू ‘ मध्ये जसे लोक वळूला घाबरताना दाखवायचे, पण, त्याची भयानक हिंसा दाखवायची नाही – कारण सिनेमा विनोदी काढायचा, हे ठरलेले आहे ! तसलाच हा प्रकार ! कासवाचा संबंध म्हणजे, कासव स्वसंरक्षणासाठी पाय पोटात घेऊन आक्रसून पडून राहते – तसेच हे इतरांपसून अलगणारे मनोरुग्ण ! धन्य ! पण कासवाचे नाट्यमय प्रसंग – अंडी घालणे – आणि मग पिल्लांनी बाहेर येऊन समुद्राकडे धाव घेणे – हे छान आहेत ! बाकी कोकणातला किंवा गोव्यातला असेल, निसर्गही छान ! सिनेमा गंभीर वाटण्यासाठी त्याची गती कमी ठेवलेली आहे ! एक सामाजिक टच म्हणून एकदोन लोकगीतेही आहेत !

पिक्चर खरोखर गंभीर असतो ना तेव्हा – अरे वा ! काय निसर्ग – काय सौंदर्य ! वा, वा ! – असे नाही करत राहता येत ! याला सुवर्णकमळ या सौंदर्याबद्दल आणि त्या अप्रस्तुत कासव दृश्यांबद्दलच ( आणि गती कमी ठेवल्याबद्दलही असेल ) मिळालेले असणार !

अन्यथा, सारांश म्हणाल तर हे एक बंडल गंभीर पिक्चर आहे !

--- ००० ---

१० ऑक्टोबर – मानसिक आरोग्य दिन आणि **‘ कासव ‘**

आज मानसिक आरोग्य दिन आहे आणि याच्याशी संबंधित असा ‘ कासव ‘ हा सिनेमा मी कालच पाहिला आहे. तो सिनेमा कसा बंडल आहे त्याची पोस्ट मी दिलेलीच आहे. आता जरा वेगळ्या प्रश्नावर बोलायचे आहे. ‘ कासव ‘ चा एक प्रमुख पात्र असलेला ( हीरो नाही म्हणत ) जो शिक्षण अर्धवट सोडलेला कॉलेज तरुण आहे, तो मनोरुग्ण आहे. तो दारू पीत होता, ड्रग्स घेत होता आणि मुख्य म्हणजे मनगटाची नस कापून आत्महत्येचा प्रयत्नही त्याने केलेला आहे. या चित्रपटातली जी एक प्रमुख स्त्री व्यक्ती आहे तीही थोडीफार मनोरुग्ण असून त्यातून बाहेर पडलेली आहे. ( तिला मात्र नायिकाच म्हटले पाहिजे कारण ती म्हणजे चांगले वागण्याचे एक उत्तुंग टोक आहे ! ) तरी, मधेच तिला एखादा झटका आलेला दिसतोच. आता हा तरुण तिला कुठल्यातरी गावातल्या हॉटेलात दिसतो. त्याची तिला काहीच माहिती नाही. तरीही ती त्याला स्वतःबरोबर गोव्यात न्यायचे ठरवते. प्रेक्षक घाबरलेले असतात. त्या मुलाचे काहीतरी आजारपण दाखवून डॉक्टर, औषधे – ही जी प्रेक्षकांची अपेक्षा असते ती पूर्ण करायचे ठरते. त्यासाठी त्या मुलाला फणफणून ताप आणला जातो ! म्हणजे त्याचा मानसिक उद्रेक दाखवायची गरज पुसली जाते ! आणि बऱ्याच प्रेक्षकांना हे माहीतच असते की डॉ. मोहन आगाशे हे एक मानसोपचार तज्ञ आहेत – त्यामुळे, अगदीच गरज पडल्यास ते सिनेमाबाहेर उभे राहून सिनेमातल्या त्या तरुणाला उपचार देतील ! हे विचारात घेता पात्रयोजना अत्यंत चपखल झालेली आहे, असे म्हणता येते !

एक स्वतः मानसिक रोगातून बाहेर पडलेली स्त्री दुसऱ्या एका तशाच रोग्याशी चांगले वागून त्याला कसे सुधारते, असा काही आशय हा चित्रपट काढणाऱ्यांच्या मनात असावा. पण, इथे काही प्रश्न पडतात --

१. नायिकेच्या चेहऱ्यावर, चांगले वागण्याचे समाधान मिळवण्याचा हावरटपणा स्पष्ट दिसतो. हा उत्तम अभिनय म्हणावा की तो आदर्श मान्य असणे म्हणावे ?

२. माहीत होऊनही एखाद्या अतज्ञ व्यक्तीने अशा धोक्याच्या रुग्णाची जबाबदारी घेणे, हे बेजबाबदरपणाचे नाही का ?

३. एखाद्या व्यक्तीला चांगले वागायचे आहे म्हणून तिने एखाद्या मनोरुग्णाला धोक्यात घालावे का ?

४. काही विपरित घडले तर, अशा रुग्णाला, पोलिसांना न कळवता, स्वतःबरोबर नेणे हा गुन्हा नाही ठरणार ?

५. इतके चांगले वागणाऱ्या नायिकेला, तिच्या घटस्फोटाच्या केससाठी अचानक कधीही अमेरिकेला जावे लागू शकते, हे समजत नव्हते ? आपण, असे अचानक चिठ्ठी ठेवून गेल्यावर त्याच्यावर काय परिणाम होऊ शकतो, ताबडतोब उपचारांची गरज पडली तर काय – याची काहीच तजवीज ती करत नाही ! म्हणजे, तो आता बरा झाला आहे असे तिचे ' तज्ञ मत ' झाले आहे का ?

६. असे रुग्ण अशा ढिसाळपणे हाताळायचा अधिकार कुणी स्वतःकडे घ्यावा का ?

-- याबाबत काही तकलुपी समर्थने आहेत – तो प्रश्न नाही – पण, या सिनेमाच्या निमित्ताने आणि आजच्या मानसिक आरोग्य दिनाच्या निमित्तानेही, अशा रुग्णांच्या बाबतीतली इतरांची जबाबदारी म्हणजे काय – याची चर्चा व्हायला हवी.

--- ००० ---

**महाराणी पद्मावती**

लौकरच येणाऱ्या या सिनेमावरचा एक कार्यक्रम पाहात होतो. या सिनेमात दीपिका पदुकोणने २० किलोचा लेहेंगा आणि २० किलोचे दागिने घालून नाच केला आहे म्हणतात ! एवढे ओझे काही माझ्या बुद्धीला झेपले नाही ! असेल हे खरे ?

दुसरे म्हणजे, परपुरुषाच्या हाती आपण लागू नये म्हणून जोहार करून तिने स्वतःला जाळून घेतले ! कल्पनाही भयानक वाटते ! आपल्याला आवडलेल्या स्त्रीची इच्छा असो वा नसो, ती मिळवायचीच ही विकृती पुरुषी मानसिकतेत नेहमीच दिसत आलेली आहे. आजही अशाच कारणांनी स्त्रियांच्या आत्महत्या होताना दिसतात. कोणतेही प्रबोधन वा धर्मशिक्षण वा कायदा यांनी हे बंद होत नाही. यावर उपाय काय ? असा प्रसंग आला तर स्त्रीने आत्महत्या करणे, हाच फक्त ? -- हा प्रश्नही भंजाळून टाकणारा आहे !

आणि तिसरे म्हणजे, मानवी नात्यांतले कित्येक प्रश्न असे

आणि तिसरे म्हणजे, मानवी नात्यांतले कित्येक प्र उत्तरे वा निराकरणे नसलेलेच आहेत, असे दिसते ! म्हणजे नाश हाच उपाय ?

बुद्धिप्रामाण्यवाद आणि वैज्ञानिक दृष्टिकोण यांचा प्रचारही खूप असतो, तरीही फरक पडत नाही !

जगणेच जटिल करणारे आणि दिङ्मूढ करणारे असे हे प्रश्न आहेत !

--- 000 ---

**दशक्रिया**

पाहिला. खरे तर या चित्रपटाविरोधात ब्राम्हणांनी आंदोलन करायचे काहीच कारण नाही. एक तर दशक्रिया हा या सिनेमाचा विषय नाही – फक्त तो एक माहोल आहे. बाकी माणसामाणसांतले स्वार्थासाठी चालणारे छोटेमोठे झगडे हाच आहे विषय. यात स्वार्थासाठी झगडणारी माणसे मुख्यतः ब्राम्हण आहेत, इतकेच. आपल्याला हवे ते मिळवण्यासाठी वा टिकवण्यासाठी सर्वच जातिधर्मांतली माणसे अशी लेव्हल सोडून वागत असतात. त्यामुळे, ब्राम्हणांना यात खास बदनामी वाटायचे काहीच कारण नाही. मुख्य म्हणजे या सिनेमात ब्राम्हणांच्या प्रचंड फायद्याची एक गोष्ट आहे. दशक्रियेची रूढी वा परंपरा ही एक फार महत्त्वाची गोष्ट असून ती चालू राहणेच अत्यावश्यक आहे, ही बाब या सिनेमाने अधोरेखित केलेली आहे ! हा विधीच बाद आहे, अनावश्यक आहे वा निरर्थक आहे – असे अस्पष्टसेही इथे काही नाही आलेले. हा एक साधा, परंपरेपुढे शेपूट घालणारा मनमिळावू सिनेमा आहे ! यात माणसाच्या जगण्याबाबत मूलभूत असे काहीही नाहीय ! हे विचारात घेतले तर, ब्राम्हणांच्या दक्षिणा आणि जेवणे हे सर्व अबाधित ठेवणारा असा हा सिनेमा आहे. हे समजून घेऊन ब्राम्हणांनी या सिनेमाचा निषेध करण्या ऐवजी त्याला एखादे पारितोषिकच द्यायला हवे, असे मला वाटते.

बाकी परीक्षण वगैरे करत बसत नाही. एक जरा वेगळ्या माहोलाचा पण नेहमीचाच करमणुकीचा मसाला देणारा हा सिनेमा आहे, इतकेच.

शेवटी त्या शकूचा मृत्यू उगीचच आहे, असे वाटू शकते, पण, मला वाटते, ‘ पथेर पांचाली ’ मधल्या एका भावनिक दृश्याचा उपयोग करणे, हा हेतू असावा ! तिथे सोन्याची साखळी पाण्यात फेकली जाते तर इथे बुगडी ! असो.

--- ००० ---

**शशी कपूर**

ते उत्तम अभिनेते तर होतेच, पण, आमच्यासारख्यांसाठी त्यांचे एक मोठे काम आहे. विशेषतः प्रायोगिक रंगभूमीसाठी त्यांनी दिलेले पृथ्वी थियेटर !

माझ्या ' नाणेफेक ' या नाटकाचे दुबेजी दिग्दर्शित पहिले दोन प्रयोग तिथे झाले होते. काही महिन्यांपूर्वी माझ्या ' रिनोव्हेशन ' या हिंदी नाटकाचा तिथे प्रयोग झाला तेव्हा मी तिकडे गेलो होतो. संध्याकाळच्या वेळी ते पृथ्वीच्या आवारात येऊन शांत बसून राहात. तसे बसलेले मी त्यांना त्या वेळी पाहिले. ते कुणाशी बोलत नव्हते वा त्यांना कुणी डिस्टर्ब करत नव्हते.

उत्तम रोमँटिक नायक, करडा इन्स्पेक्टर आणि ' चार दिवारी ' सारख्या काही वेगळ्या चित्रपटांचा नायक !

कै. शशी कपूर यांच्या स्मृतीस अभिवादन !

--- 000 --

' नागिन ' मधले ' मन डोले ' हे गाणे -- ते इसम बीन वाजवतेय आणि ही म्हणतेय, ' कौन बजाये बासुरिया ! '

**' पति गेले गं काठेवाडी '**

सुनील बर्वे यांच्या हर्बेरियम या उपक्रमात जुनी उत्तम नाटके पुनरुज्जीवीत केली जातात आणि त्यांचे प्रत्येकी २५ प्रयोग सादर केले जातात. त्यातच अवतरलेय हे ‘ पति गेले गं काठेवाडी ‘ ! १९६८ साली पहिल्यांदा येऊन गेलेले हे नाटक आज ५० वर्षांनंतर पुन्हा समोर आलेय ! हे पाहता आज या नाटकाचा बहुसंख्य प्रेक्षक नवाच असणार आहे. मी जुन्या संचातले नाटक पाहिले नव्हते, त्यामुळे, मलाही ते ‘ आजचे नवे ‘ नाटकच होते. काल पुण्यातला या नाटकाचा शेवटचा प्रयोग होता, तो मी पाहिला. बाल्कनीसह बालगंधर्व हाऊसफुल होते ! अशा हलक्याफुलक्या नाटकाला असा तुडुंब प्रेक्षक असला की अधिकच मजा येते ! कालचा याचा प्रयोग २२ वा होता. आता आणखी ३ प्रयोग मुंबईत करून मग याचे प्रयोग थांबवले जाणार आहेत. मुंबईतल्या लोकांनी हे नाटक पाहण्याची संधी हुकू देऊ नये, हे सांगून ठेवतो.

व्यंकटेश माडगुळकरांचे नाटक आणि विजय केंकरे यांचे दिग्दर्शन, म्हणजे मामला ‘ जमून आलेला ‘ असणार याची कल्पना होतीच. पोषाखी नाटक आणि अभिनेत्यांची उत्तम फळी ! या नाटकाला लोकनाट्याचा एक मजेदार बाज आहे.

एक छोटीशी, ‘ कल्पनातीत ‘ म्हणव्यात अशा गोष्टी साध्य करून दाखवण्याची कथा. अशी कथा खुलवत, फुलवत सादर करणे हे निव्वळ दिग्दर्शन आणि अभिनय यांचे बेमालून विणलेले असे अद्भूत काम असावे लागते. तसे ते इथे झालेले आहे. निखिल रत्नपारखी, अभिजित खांडकेकर, ललित प्रभाकर, ईशा केसकर आणि मृण्मयी गोडबोले, अशी जबरदस्त टीम आहे ! दिलखुलास प्रसन्न करून टाकतात ! यांच्याबरोबर असणारे गायक, नर्तक, वादक हेही मेजवानी म्हणावेत, असे आहेत ! राहुल रानड्यांचे संगीत, शीतल तळपद्यांची प्रकाशयोजना आणि प्रदीप मुळ्यांचे नेपथ्य बेश्टच ! एखाद्या नाटकाचा सर्वांगसुंदर प्रयोग म्हणजे काय, हे पाहायचे असेल तर हे नाटक पाहाच.

एक हलकेफुलके, दिलखुलास, मजेदार, सुंदर, प्रसन्न नाटक !

असे ‘ बनावट आणि बनेल ‘ नाट्य खूप दिवसांनी पाहिले. मजा आली !

--- ००० ---

**शुभा गोखले यांचे चित्रप्रदर्शन**

**‘ बाजार ‘**

बाजार हा इथे मासळी बाजार आहे. पण, भाषेत जसा तो त्रासिक अर्थाने येतो, तसा नाही. इथे मासळी बाजारातले नेहमीचे रूटीन वातावरण आहे. कोणतीही सनसनाटी घटना नाही किंवा खूप उग्र म्हणाव्यात अशा कुणाच्या प्रतिक्रियाही नाहीत. या चित्रांच्या नायिका आहेत मत्स्यगंधा – निरनिराळ्या वयांतल्या कोळणी आणि अर्थातच मासे. ( मासे ओळखीच्या आकारांपासून अमूर्त आकारांकडे जाणारे. ) सोबत टोपल्या, कोयते, कावळे, मांजरे -- हाही सर्व माहोल आहेच.

चित्रे समजून घेणे म्हणजे काय ? साहित्यात शब्द हे माध्यम असते – ते विचारक्रियेच्या अधिक जवळ असल्याने चित्रांपेक्षा समजायला अधिक सोयीचे असते का ? मला तसे नाही वाटत. कविता समजून घेणे आणि चित्र समजून घेणे यांतल्या काही प्रमाणातल्या विश्लेषक क्रियांतली भिन्नता सोडली तर ‘ साकल्यात्मक ‘ समजणे सारखेच असते, असे मला वाटते. काही दीर्घ काळाच्या निरीक्षणानंतर आणि चिंतनानंतर काढलेली ही चित्रे आहेत, हे उघडच आहे. या कोळणींबद्दल सहानुभूती वा अनुकंपा व्यक्त करण्यासाठी आहेत का ही चित्रे ? तसे वाटत नाही. त्यांची दुःखे, त्यांची संकटे यांचा अनुभव वा फील देण्यासाठी आहेत का ? तसेही नाही. त्यांच्या कष्टप्रद जीवनाचे उदात्तीकरण करणे, हाही उद्देश नाही वाटत. मला मुख्यतः जाणवली ती त्या कोळणींची रूटीन हाताळण्यातली सहजता – त्रासिक वा क्रोधी न होता असणारी त्यांची जगण्यातली परिपक्वता. इथले कावळे जसे याचक आहेत तसेच ते अतृप्त इच्छा-वासनांचेही निदर्शक आहेत. या कोळणींकडून ज्याला ज्या जशा हव्या तशा मागण्या होत राहणार आहेत. पण त्या ‘ शहाण्या ‘ आहेत. काय, कसे

हाताळायचे, हे त्यांना समजते. त्या कोळणींची ही ‘ समज ‘ व्यक्त करणारी ही चित्रे आहेत, असे मला जाणवले. हे आकलन, अर्थातच, कळत न कळत चित्रकर्तीमध्ये आलेले आहेच. त्याशिवाय ते चित्रांत येणे शक्यच नाही.

जगण्यातली ती सहजता, ती परिपक्वता आणि ते आकलन व्यक्त करणे हेच या चित्रांतल्या दर्जेदार, मौल्यवान सर्जकतेचे रहस्य आहे. त्यामुळेच, एक प्रकारे हे अभावग्रस्त व्यक्तींचे चित्रण असूनही उदासी निर्माण करत नाही. चित्रकर्तीनेही ही चित्रे काढणे हे एका आनंदाने केलेले काम वाटते. काही ठिकाणी असणारे चमकदार रंग, पोतांचे आणि परिमाणांचे प्रकार यांतून हे जाणवते. मौल्यवान कलेत अनुभव-द्रव्य कोणते आहे त्याचे स्वतंत्र महत्त्व राहात नाही ते या सर्जकतेमुळेच. चित्रकर्तीने हे असे सगळे जाणीवपूर्वक केले असेल, असे नव्हे. एक कलावंत म्हणून ते तिचे असणे आहे. ही चित्रे म्हणजे ते व्यक्त होण्याची प्रक्रिया. ज्या कोळणीच्या अंगाखांद्यावर अधिक कावळे बसले आहेत ती वयस्कर आहे – केस पिकलेली आहे. तिला हे सगळे ‘ सहज ‘ जगणे आहे. हे असे पशुपक्षी हे तिचे सुहृदही झालेले असू शकतील.

ही चित्रे, म्हटले तर, कोणताही संदेश देत नाहीत. ती काही सामाजिक भाष्यही करत नाहीत. ती व्यक्त करतात एक रूटीन, कष्टप्रद आणि तरीही परिपक्व जगणे.

ही आपल्यापर्यंत पोचणारी परिपक्वता हेच या चित्रांचे जगणे !

--- ००० ---

०१-१२-१७.

Chitra Rajendra Joshi's photo.

छान आहे लेख ! यातली संवेदनशीलता आणि समजून घेण्यासाठी लागणारा नम्रपणा -- हे आल्हाददायक वाटले ! ' निसर्गातील सजीवांचं अपरिहार्य साहचर्य ' आणि त्यातून येणारी एकमेकांबाबतची समजूत -- हे तुम्हाला या चित्रांतून जाणवले, याचा अर्थच तुम्ही ही चित्रे अत्यंत आत्मीयतेने आणि सजगतेने पाहिलेली आहेत ! तुम्ही उपस्थित केलेले प्रश्नही मोलाचे आहेत -- त्यांवर स्वतंत्र चर्चा व्हायला हव्यात. " दुसरा मला पडलेला प्रश्न, कोळीणींना कावळ्यांचा त्रास होत असेल ना? त्यावर तिने एक झोकदार ॲक्शन करून कोळीण कावळ्याकडे माशाचा तुकडा फेकून त्याला कशी दूर ठेवते हे दाखवले. " -- हा तुम्हा दोन सौंदर्यवतींतला संवाद, जगण्यातला साधेपणा व्यक्त करणारा एक उत्तम नाट्यक्षण वाटला ! तुम्ही एक वाचक-प्रेक्षक म्हणून लिहिता आणि तरीही त्यात एक समजून घेण्याची तीव्र उत्कटता असते ! भल्याभल्या समीक्षकांकडेही या गुणाचा अभाव असतो ! यासाठीच तुमचे लेखन मी उत्सुकतेने वाचत असतो. धन्यवाद !

३०-११-१७.

Champra Deshpande commented on Satish Tambe's post.

मासळी बाजारच काय, कलावंताने पाहिलेले कोणतेच वास्तव जसे च्या तसे वाचकाच्या वा रसिकाच्या परिचयाचे नसते. मुंबईचे अधोजग, वैमानिकाचे जीवन, ग्रामीण वास्तव, पंचतारांकित वास्तव, युद्धभूमीवरचे वास्तव, शेक्सपियर वा पिरांदेल्लो यांच्या नाटकांतले वास्तव -- हे सगळे अपरिचितच असते. ॲब्सर्ड नाटके वा काफ्काची ' ट्रायल ' यांतले वास्तव नवेच असते. हल्ली तर काहीजण म्हणतात की आजचे वास्तव इतके झपाट्याने बदलते आहे की त्याचे आकलन होणेच अशक्य झालेय ! कुणी असेही म्हटल्याचे वाचनात आले होते की इतिहास, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, मानववंशशास्त्र आणि शास्त्राची इतर अनेक शाखांतर्गत झालेली प्रगती -- यांचे भान असल्याशिवाय कलाकृती समजूच शकत नाही ! मला तर वाटते की कलेतून संपर्क होणे हे इतके जिकिरीचे असेल तर वाचक-रसिक तिला फाट्यावर मारून निघून जातील ! मला असे दिसते की कलेत आलेल्या वास्तवापेक्षा तिच्यातून येणारे मानवी संबंधांचे आकलन वा भान हेच महत्त्वाचे असते. कलेतले वास्तव कल्पनेने पुरेसे समजून घेता यावे, इतकेच. अति-वास्तववादी कलेत कदाचित कल्पनेचा खूपच अधिक वापर करावा लागेल. पण, कला ही ' जगणे ' देण्यासाठी नसून ' जगण्याचे भान ' देण्यासाठी आहे, असेच मला दिसते. ते भान म्हणजेच परिपक्वता, तेच मूल्य आणि तीच संस्कृती.

--- ००० ---

**दर्द-ए-डिस्को**

दोन अंकी नाटक -- ले०दिग्द० विद्यासागर अध्यापक.

' आधी बसू मग बोलू ' तसेच ' साखर खाल्लेला माणूस ' अशी छान वेगळ्या बाजाची विनोदी नाटके लिहिणारा हा लेखक. त्याच्या कॉलेज जीवनात तो नेहमीच माझ्या संपर्कात असे. आम्ही ' अवकाश कलामंच ' ही एक नाट्यसंस्थाही त्या काळात स्थापन केली होती. त्या काळात विद्यासागरने माझी दोन नाटके आणि दोन एकांकिका दिग्दर्शित केल्या होत्या. थोडक्यात म्हणजे माझ्या आत्मीयतेचा माणूस ! त्यामुळे, काल त्याचे ' दर्द-ए-डिस्को ' हे नाटक पाहिले. तीन जोडपी आणि एक मॅनेजर -- सगळे मरून स्वर्गात आलेले -- असा माहोल. " तुला आवडतेय तेच ती बोलतेय म्हणून तुला पटतेय -- ती जर म्हणाली की दारू पिणे खूप चांगले तर ते मलाही पटेल -- " -- असे काही मजेदार संवाद, तसेच, लैंगिक विकृती असलेल्या प्राध्यापकाची बायको त्याला म्हणते, " वर्गात तेच -- स्वर्गात तेच ! " असे काही कोटीबाज संवाद -- यांनी मजा येत राहते. विद्यासागर हा नुसताच एक करमणूकप्रधान लेखक नाहीय, हे जाणवते. तरीही, हे नाटक नीटसे जमलेले नाही. थोड्याच वेळात, इथे काय काय घडू शकेल याचा अंदाज येतो आणि खरोखरच त्यातले नावीन्य संपते. संहितेतली ताकद मर्यादित असल्याने तंत्र आणि दिग्दर्शन हे नाटकाला फारसे तारू शकत नाहीत.

तरीही, नव्या लेखकांतला हा एक चांगला आश्वासक लेखक आहे, हे नक्की !

--- ००० ---

**रंगवैखरी**

राज्य मराठी विकास संस्थेने आयोजित केलेल्या आंतरमहाविद्यालयीन नाट्याविष्कार स्पर्धेतल्या पुणे विभागाच्या अंतिम फेरीला काल मी उपस्थित होतो. साहित्यासह, नाट्य, चित्र, शिल्प, नृत्य आणि संगीत यांपैकी तीन कलांचा समावेश असेल असे नाट्याविष्कार सादर करायचे होते. ' महाराष्ट्री ते मराठी ' असा विषय दिलेला होता. मराठी भाषा, परंपरा आणि संस्कृती यांचा विद्यार्थ्यांनी खोलात जाऊन अभ्यास करावा आणि त्यावर आधारित अशी अभिव्यक्ती नाट्य माध्यमातून सादर करावी, ही खरोखरच एक अभिनव आणि अद्वितीय अशी कल्पना आहे. व्यवहारात आणि व्यावहारिक यशासाठी इंग्रजी अधिक उपयोगी आहे हे स्वीकारून मराठीकडे थोडेफार दुर्लक्ष होण्याच्या या काळात ही स्पर्धा अधिकाधिक महत्वाची ठरत जाईल, हे स्पष्टच आहे.

मराठी ही सुमारे आठ कोटी लोकांची भाषा असल्याने ती मरणार नाही – टिकून राहील, हे जरी खरे असले तरी तेवढ्यावर संतुष्ट राहणे योग्य होणार नाही. मराठी टिकणे म्हणजे काय ? ' पुण्याहून संगमनेरला जायला साडेपाच वाजता एसटी आहे ' अशा किरकोळ माहितीच्या देवाणघेवाणीपुरती भाषा वापरात राहणे म्हणजे ती टिकणे नव्हे. नुसती भाषा नव्हे तर भाषेची अभिव्यक्तीची शक्तीही टिकायला हवी आणि वाढत राहायला हवी. सूक्ष्म आणि गहन अर्थ या भाषेतून व्यक्त करणारे अनेक साहित्यिक या भाषेत होऊन गेलेले आहेत. त्यांचे साहित्य समजून घेणे आणि तशाच सशक्त, कसदार अशा नव्या अभिव्यक्तीही येत राहणे, हे भाषा सशक्तपणे जिवंत राहण्यासाठी आवश्यक आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून तसे प्रयत्न होत राहू शकतील, हे मराठीसाठी अत्यंत महत्त्वाचे वाटते.

पुढल्या वर्षापासून, या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा घेतल्या जाणार आहेत, असे समजले. त्याची गरज आहेच. ' नाट्य म्हणजे मानवी संबंधांतले ताणे-बाणे, गुंते, त्यांतल्या समस्या, संघर्ष ' याचे फारसे भान विद्यार्थ्यांना नसल्याचे जाणवले. सादर होणारे नाट्याविष्कार अधिक दर्जेदार आणि कसदार होण्यासाठी जगण्यातल्या प्रश्नांचे विद्यार्थ्यांचे भान कसे वाढेल आणि ते व्यक्त होण्यासाठी त्यांची भाषेवर आणि या स्पर्धेत समाविष्ट असलेल्या इतर सर्वच कला प्रकारांवर हुकुमत कशी वाढेल, हे पाहायला हवे.

ही स्पर्धा म्हणजे नुसताच माध्यमांना धार लावण्याचा उपक्रम न राहता, त्याला मानवी जगणे समजून घेण्याच्या प्रक्रियेची जोड मिळत राहिली तर हा उपक्रम अधिकाधिक मौल्यवान ठरत जाईल, हे निश्चित !

--- ००० ---

**ऑक्टोबर**

" Barkis is willing " म्हणजे " बार्किसची इच्छा आहे " या डिकन्सच्या वाक्याप्रमाणेच, " where is Dan ? " म्हणजे " डॅन कुठे आहे ? " हे वाक्य भाषेत रुळू शकते. प्रेमाचे किंचित अंकूर फुटले असतील-नसतील तेवढ्यात तिला अपघात होऊन ती कोमात जाते. पण, अपघात होण्यापूर्वीचे तिचे शेवटचे वाक्य असते, " डॅन कुठे आहे ? " या धाग्यावर त्याचे प्रेम फुलत जाते -- अगदी तिच्या मृत्यूनंतरही पूर्णतेला जाते ! -- प्रेमकथेची ही एक अद्वितीय कल्पना आहे ! यातून माणसाच्या मनोव्यापारांत खूप खोल मुसंडी मारणे शक्य होते. पण, ते घडत नाही. हा चित्रपट, सुचलेल्या कल्पनेचे नावीन्यच राबवत बसतो. त्यामुळे, अभिजाततेच्या दर्जाला न पोचता तो एक वेगळा, धाडसी, कौतुकास्पद चित्रपट -- या मर्यादेतच राहतो.

एक तर फाईव्ह स्टार -- श्रीमंती माहोल, मधेच येणारे इंग्रजी संवाद, उंची इस्पितळाचे खूप तपशील आणि सर्वच पात्रे रुबाबदार आणि आत्मविश्वासपूर्ण ( आणि करमणुकीचा नेहमीचा मसाला नसणे ) -- यांमुळे हा चित्रपट मासेसचा होणार नव्हताच. पण, अधिक खोलात जाणेही न झाल्याने तो ग्रेटही नाही होऊ शकलेला ! नुसताच धोका पत्करून पैसे वाया घालवले आहेत ! ( हे सर्व मी आशयदृष्ट्या लिहीत आहे. )

मी काल हा चित्रपट पाहिला तेव्हा थियेटरमध्ये मोजून बारा प्रेक्षक होते !

--- ००० ---

**जुगाड**

हे नाटक काल पाहिले.

वर्षातून दोनदा ( जयंती आणि पुण्यतिथीला ) ट्रॅफिक जॅम होईल असा महापुरुष असल्याशिवाय एखाद्या समाजाला ओळख मिळत नाही -- तसा महापुरुष नसेल तर खोटा इतिहास रचून त्याला जन्माला घालणे हाच उपाय ! -- या भन्नाट कल्पनेवरचे हे नाटक आहे. या कल्पनेत मोठ्या आवाक्याच्या आणि सखोल आशयाच्या शक्यता आहेत. पण, साधे एक करमणुकीचे नाटक करायचे, असे ठरवल्यामुळे त्या शक्यता हरवलेल्या आहेत.

एका आदिवासी समाजासाठी असा महापुरुष जन्माला घालायचा आहे ! हे लोक थोडीफार गुन्हेगारी करत चांगले जगताहेत, असे दिसते. टापटीप पोषाख आणि सुंदर स्त्री-पुरुष. जुनकट कपड्यांतले मळकट आदिवासी पाहणे कदाचित प्रेक्षणीय होणार नाही, असेही असेल. मालिकांमध्ये कसे सगळे मस्त नव्या कपड्यांत हिंडत असतात, तसेच.

अनेक नाट्यमय घटनांनी नाटक पुढे जात राहते. हृषिकेश जोशी आणि चिन्मय मांडलेकर हे निष्णात अभिनेते उथळ घटनाही तारून नेतात. काही ठिकाणी हृषिकेशचे ओरडून बोलणे आहे -- ते चालू नाटकाच्या प्रमाणाबाहेर ओरडले जाते. सुरुवातीचे प्रयोग आहेत -- पुढे हे नीट जुळवून घेतले जाईलच.

या नाटकाच्या कल्पनेच्या सहवासात प्रेक्षकांनी राहावे, हेही महत्त्वाचे वाटावे, असा हा प्रकार

.

कल्पना भारी -- नाटक ठीक !

--- 000 ---

**मांडूची पुनर्मांडणी**

**उत्पत्ती-स्थिती-लय यांचे एकत्र दर्शन**

चंद्रमोहन कुलकर्णी यांचे ' मांडू ' हे चित्र-शिल्प प्रदर्शन पाहून आलो.

चंद्रमोहन ही व्यक्ती आपल्या ओळखीची असू शकते पण, चित्रकार म्हणून त्यांना दिसते काय, हे त्यांच्या चित्रांतूनच दिसते – आणि ते एक पूर्ण अनोळखी जग असते. भूतकाळातल्या मांडूची पडझड झालेली असून आता त्याचे फक्त काही भग्न अवशेष – खंडहर शिल्लक आहेत. यांचे फोटो काढले तर नक्कीच खूप सूक्ष्म बारकावे टिपले जातील, पण, ते असे या चित्रांतल्या सारखे नसतील. चित्रकाराला आज तिथे नसलेलेही बारकावे दिसू शकतात आणि या वास्तूंचे मूळ सत्य उभे करण्याला महत्त्व देत तो प्रत्यक्षातल्या दृश्याची पुनर्मांडणीही करू शकतो. त्या काळातल्या धनिकांचे महाल, प्रार्थनामंदिरे, राजवाडे असे सगळे हे आज तिथल्या गोरख चिंचेच्या झाडांसारखेच ओकेबोके आणि रुक्ष झालेले आहेत. त्या पूर्ण परिसराचीच, म्हटले तर, जान गेलेली आहे. अशा वेळी हा चित्रकार तिथे पोचतो आणि त्याच्या सर्जक नजरेच्या स्पर्शाने पुन्हा तो परिसर जिवंत होतो. पण, आता त्याच जुन्या जगण्याची पुनरावृत्ती होणे शक्य नाही. आहे या स्थितीत, चित्रकलेतले वैभव म्हणून या मृत प्रदेशाला संजीवनी मिळते आहे. जगणे जसे परिपक्वतेचे निमित्त होऊ शकते तसेच हे ओसाडीचे सत्य त्रिकालाचा सर्जक आवाका घेतला जाण्याचे निमित्त घडते आहे. ही स्केचेस आणि शिल्पे म्हणजे त्या काळातले स्थितिरूप सौंदर्य, एका दीर्घ काळात होणारा विनाश आणि जन्ममृत्यूचा एकत्रित आवाका घेणारे अवशेष यांचे जिवंत भान घेणे आहे.. आणि हे सगळे शांत आणि सुंदर आहे. कोणत्याही भावनिक क्षुब्धतेशिवाय.

चंद्रमोहनांचे काम स्तिमित करणारे आहे. अनेक लहानमोठ्या आकारांतली ही चित्रे आणि शिल्पे,.काळ्यापांढऱ्या आणि क्वचित निळ्या रेषांचे हे अवर्णनीय मायाजाल आहे ! बहुतेकदा ते फक्त चित्रविषय तेवढाच चित्रित करतात पण काही वेळा, त्या विनाशाची जाणीव देणारे विखरून पडलेले दगड, एखादद्रुसरे हडकुळे भटके कुत्रे आणि गोरख चिंचेची रुक्ष झाडे असे काही सोबत दाखवतात. काळ्यापांढऱ्या आणि कधी निळ्याही रेषांतून जाणवणारा छायाप्रकाशाचा खेळ तर गुंगवून टाकणारा आहे !

तिथे मित्रवर्य दिग्दर्शक अतुल पेठे आणि चित्रकार मित्रवर्य जयंत जोशी भेटले – हा एक अलभ्य लाभच झाला !

--- 000---

**तेंडुलकर**

मकरंद साठ्यांनी घेतलेली तेंडुलकरांची मुलाखत फिल्म पाहिली. त्यावर आपसात आपण काही विचार करावा, असे वाटले, म्हणून ही पोस्ट.

सखाराम बाइंडरबद्दल बोलताना तेंडुलकर म्हणाले की तो कशा परिस्थितीतून वाढलाय यात त्याच्या हिंसेचा उगम आहे. निरनिराळ्या कारणांनी प्रत्येकात हिंसा येतेच. त्याचबरोबर ते असेही म्हणताना दाखवले गेले की काही माणसांना मारून टाकावे असे त्यांना वाटते, पण, ते तसे करू शकत नाहीत, याचे त्यांना दुःख आहे. शिवाय, ते असेही म्हणाले की ते त्यांच्या पात्रांकडे चांगला-वाईट असे पाहात नाहीत. तरीही, जिथे नाना निर्माण होतो तिथे एक घाशीरामही निर्माण होतो, असे ते म्हणाले. ( म्हणजे ‘ वाईट ‘ नाही ? )

एकीकडे हिंसेची कारणमीमांसा सहृदयपणे समजून घ्यायची आणि दुसरीकडे काही माणसांना मारून टाकावे, असेही म्हणायचे, हे जगण्यात एकत्र कसे असणार ? खुन्याला वा बलात्काऱ्याला फाशीची शिक्षा द्यावी, अशी समाजाची मागणी असते – ती चूक म्हणावी की बरोबर ?

आनुवंशिकता, जनुकरचना आणि परिस्थिती यांत हिंसेची कारणे समजा सापडू शकतात, तर काय ?

मग, हिंसेचे हे वेगवेगळे प्रकार पाहण्याचा सांस्कृतिक अर्थ काय ?

कुणीच दोषी नाही, हेही पटू शकते – मग, सारांश काय ? एकूणच क्रिया-प्रतिक्रियांचे जगणे चालूच तर असते. त्यातूनच हिंसा येते. मग काय ? आहे ते चालू द्या ?

हिंसेच्या नावीन्यातला सनसनाटीपणा उपभोगून झाल्यावर काय ?

--- 000 ---

**हॅम्लेट**

' जगप्रसिद्ध नाटककार विल्यम शेक्स्पियरचे चारशे वर्षांपूर्वीचे अजरामर नाटक – हॅम्लेट ! ' अशा घोषणेने हे नाटक सुरू होते. The play is the thing – म्हणजे नाटक हीच ती गोष्ट – हे एक आणि नाटकातच एक संवाद आहे – " प्रत्येकाचे डोळे आणि कान होतील चकित ! " तर एकूणात भव्य सगळे ! प्रकाशयोजनेची उधळण आणि राहुल रानडे यांनी नेमकी गरज ओळखून दाक्षिणात्य चित्रपटासारखे दिलेले धडाकेबाज पार्श्वसंगीत ! शिवाय स्टार्स, बाकीचा उत्तम नटसंच, भव्य नेपथ्य आणि उंची वेषभूषा वगैरे सर्व ! पैसे वसूल झाल्याचे समाधान मिळणार, हे नक्की ! तिकीट दर १०००, ८००, ५०० आणि ४०० ! मराठी रंगभूमीवर हेही भव्य ! पण, मुख्य म्हणजे, या जगात जन्माला आल्यासरशी शेक्स्पियरचे निदान एक तरी नाटक बघून होते ! मराठीत जन्माला येऊन ज्ञानेश्वर-तुकाराम न वाचता मरणे जसे वाया जाणे आहे तसेच या जगात जन्माला येऊन शेक्स्पियरच्या संपर्कात न येता मरणे आहे !

खुद्द शेक्स्पियरच्या सुरुवातीच्या काळात त्याची नाटके सूर्यप्रकाशात होत असत – प्रकाशयोजनेचा प्रश्नच नसे – त्यामुळेच शेक्पि‍ियरला त्याच्या शब्दांतून वातावरण-दृश्ये उभी करावी लागली, असे म्हणतात. कालांतराने नाटकाची तंत्रे सुधारत गेली आणि सादरीकरण समृद्ध होत गेले. ते जरी असले तरी मुख्य मुद्दा शे‍ेक्स्पियरचे नाटक पोचणे, हाच कधीही महत्त्वाचा असणार, मग सादर करताना तुम्ही ते तुमच्या कोणत्याही अन्वयाने सादर करा. या मराठी प्रयोगात ते घडते का, हे पाहायला हवे.

एकूण जागतिक रंगभूमीवरची ही एक महान शोकांतिका समजली जाते. मी इथे शेक्स्पियरचे मूळ नाटक आणि हा प्रयोग यांची तुलना करणारे असे अभ्यासपूर्ण काही लिहिणार नाही आहे. या प्रयोगाने काय घडते, तेवढेच लिहिणार आहे. शेक्स्पियरच्या गाजलेल्या चार शोकांतिकांचे एक महत्त्वाचे समान वैशिष्ट्य काय सांगितले जाते ? तर जे मुख्य पात्र म्हणजे नायक असतो तो बाकी छान, चांगला असतो पण त्याच्यात एक असा दुर्गुण असतो की ज्यामुळे त्याचा पूर्ण नायनाट होतो. त्याला ' शोकात्म दुर्गुण ' किंवा tragic flaw म्हणतात. अशा दुर्गुणामुळे होणारे ते प्रचंड अधःपतन पाहून प्रेक्षकांचे भावनिक विरेचन होते, असे म्हटले जाते. ( शोकात्म दुर्गुण आणि भावनिक विरेचन, या दोन्ही कल्पना मला पटत नाहीत, हा भाग वेगळा. ) हॅम्लेटचा सांगितला जाणारा असा दुर्गुण म्हणजे निर्णयशक्तीचा डळमळीतपणा – कृतीच्या बाबतीत गोंधळलेले असणे. या प्रयोगात ते जाणवते का ? क्लॉडियसने खरेच त्याच्या वडिलांचा खून केला आहे का, याची खात्री पटवून घेण्याचा एक मार्ग म्हणून त्याने नाट्यप्रयोगाचा उपयोग करणे, हा काही डाळमळीतपणा नव्हे. तो राजा प्रार्थना करत असताना त्याला मारल्यास तो स्वर्गात जाईल म्हणून त्या वेळी त्याला न मारणे, हेही तेव्हाच्या समजुतीप्रमाणे योग्यच वाटते. हॅम्लेट जेव्हा राणीशी म्हणजे त्याच्या आईशी तिच्या महालात बोलत असतो तेव्हा त्याला

तिथल्या पडद्यामागे कुणी असल्याचे जाणवते – तो क्लॉडियसच असणार असे समजून, क्षणाचाही वेळ न घालवता तो त्या व्याक्तीत तलवार खुपसतो ! तो क्लॉडियस नसून पोलोनियस असतो, हा भाग वेगळा. पण, हा काही डळमळीतपणा नक्कीच नव्हे. To be or not to be – असावे की नसावे ( काहीजण ' जगावे की मरावे ' असेही म्हणतात ) – यातही एक ओघात येणारी निराशा जाणवते – डळमळीतपणा नाही. ( हेच स्वगत की दुसरे कोणते ते आता नीट आठवत नाहीय – पण, भराभर म्हणून संपवले जाते, कारण, उगीच खोलात गेल्याने होणारा ताप नको, पण, कानावरून गेल्याचे समाधान मिळावे ! ) तसे तर हे नाटक हॅम्लेट केंद्रीही झालेय, असे म्हणता येणार नाही. त्याची अनुपस्थिती असलेलाही बराच भाग आहे नाटकात. आपल्या इथल्या बुद्धिप्रामाण्याच्या आणि विवेकशीलतेच्या पुरोगामी वातावरणात तर हॅम्लेटचा मानसिक-वैचारिक गोंधळ नीट जाणवायला हवा होता – तसे होत नाही. पण, काय काय घडले याची एकूण गोष्ट मात्र चटपटीतपणे सांगितली जाते. एकूण शेवट सगळा सगळे बरबाद करणारा असूनही भावनिक विरेचनाची वगैरे शक्यताही निर्माण होत नाही ! कारण, ' डोक्याला ताप नको ' या तत्त्वाचा प्रचंड ' शोकात्म दुर्गुण ' असलेल्या मराठी प्रेक्षकांपुढे हे सादर करून कोट्यवधींची उलाढाल करायची आहे, हे आधीच ठरलेले आहे !

सारांश म्हणजे मुद्दलातच या नाटकाच्या आशयाला हात घालणे एक तर जमलेले नाही किंवा टाळलेले आहे !

आता खूप लिहीत बसण्यापेक्षा, माझे व्यक्तिगत काही सांगतो. मला हे नाटक शोकांतिका वगैरे वाटलेच नाही – एकूणच क्रिया-प्रतिक्रियांच्या जगण्यातला सर्वच पात्रांचा गधडेपणा व्यक्त करणारे वाटले ! Absurd – असंगत वा व्यस्त नाटकाचा शिरोमणी वाटले ! या सगळ्याचा मूळ पाया काय तर भूत येऊन अमुक म्हणून सांगते, हा ! बाकी, पुढेही चांगले-वाईट असा खेळ गृहीत धरत पुढे जाणे ! – हे माझ्या सर्जकतेमुळे मला मस्त वाटले ! पण, हाच आशय म्हणून मांडलेला नाही आहे – तशी कुणाची हिंमतही नाही होणार !

एवढे खूप झाले ! माझ्या दृष्टीने हे एक सपाट आशयाचे ' भव्य ' नाटक आहे ! मराठी प्रेक्षकाचा जन्म धन्य करणारे !
( इथे आमच्या कोल्हापूरच्या ' प्रत्यय ' चे ' किंग लियर ' आठवा. त्यांनी ते आशयकेंद्री करायचा गंभीर प्रयत्न केलेला होता ! उलाढालीचा प्रश्नच नव्हता ! तसेही नाटक असते मराठी राजा ! )

--- ००० ---

**राजकुमार**

" इंडियामें हमारे बाद अगर कोई बडा ऍक्टर है तो वो है दिलीपकुमार -- हमारे सामनेवाले रोलमे वही ठीक होंगे ! " -- हे वाक्य आहे ' सौदागर ' ची बोलणी चाललेली असताना, राजकुमार या माझ्या आवडत्या नटाचे ! या बाबतीत मी एक

पिटातला प्रेक्षकच आहे ! लक्षात घ्या, त्या वेळी त्या दोन नटांत कट्टर शत्रुत्व होते -- आणि ' सौदागर ' मध्ये ते होते जिगरी दोस्त ! शूटिंगच्या वेळी दोन टोकांना दोघे बसून राहात -- एक शब्दही एकमेकांशी बोलत नसत ! पण, ' इमलीका बूटा ' हे गाणे बघा -- दंग रह जाओगे !

जशा निळू फुल्यांच्या अनेक कलाकृती मी निव्वळ निळूभाऊ आहेत म्हणून पाहिल्या तसेच राजकुमारच्या बाबतीतही केले ! दोघांचेही एक समान वैशिष्ठ्य म्हणजे -- कमीत कमी कष्टांत उत्तम अभिनय ! दोघांच्याही डोळ्यांत एक सखोल उदासी होती !

' माझा ' वर कार्यक्रम चालू होता -- तो माझा चुकला -- शेवटचा काही भाग पाहिला !

--- ००० ---

**लेथ जोशी**

मी बँकेत नोकरी केली. पुरेशा कार्यतत्परेतेने केली. तेव्हाच्या कामातले एक उदाहरण देतो. सेव्हिंग खात्यांची लेजर्स, हा विषय घेऊ. एकेका लेजरमध्ये तीनतीनशे खाती असत आणि एखाद्या शाखेत समजा अशी पन्नास लेजर्स असत. या प्रत्येक लेजरमध्ये, अर्थातच, प्रत्येक महिन्याला अनेक खात्यांत देवघेव – जमा-वजा, होई. ती सर्व लेजर्स दरमहा टॅली करावी लागत. त्या कामाचे तपशील सांगत बसत नाही. पण, समजा पन्नासपैकी बावीस-तेवीस लेजर्सना फरक लागत. प्रत्येक वेळी फरक किती आहे, कसा असू शकेल वगैरे अंदाज करून ते शोधून काढून ती लेजर्स टॅली करण्यात समजा आम्ही माहीर होतो – कलाकार होतो ! पण, आता काय त्याचे ? आता सर्व कामकाज संगणकीकृत आहे. सगळी लेजर्स प्रत्येक मिनिटाला टॅलीच आहेत – फरकाचा विषयच संपलेला आहे ! आता त्या वेळची आमची सनसनाटी आणि चित्तथरारक हुशारी कुणी ऐकून तरी घेईल का ? – बास ! हाच, असाच आहे या सिनेमाचा विषय ! पहिल्या दोनच मिनिटांत हे कळते – पुढे ते रेटत नेले आहे.

एक कामाच्या तिथले सहकारी सोडले तर या जोशीला कुणी मित्र, शेजारीबिजारी कुणी नाहीत ! हा इसम कुणाशी काही बोलतच नाही ! बरे, बायको चांगली आहे, त्यांचे काही बिनसलेय, असेही नाही. तरी हा इसम बायकोलाही हे सांगत नाही की बाबा, आता लेथवर काम करणे हे कालबाह्य झाल्याने त्याची नोकरी गेलीय ! बरे, तो नोकरी गेल्याने अचानक आर्थिक गर्तेत गेला आहे, असेही नाही. बायको खाद्यपदार्थांच्या ऑर्डर्स घेते, मुलगा संगणक दुरुस्तीवर कमावतो – एक छोटी चारचाकीही घेतो ! तो काहीच प्रश्न नाहीय. मुलगा, बायको आपापल्या कामांत आणि आई जपजाप्य आणि टीव्ही मालिका यांत रममाण ! मग राहते काय ? तर या जोशीची त्या लेथ मशीनबद्दलची आसक्ती ! सिनेमाचे नावही त्यालाच

महत्त्व देणारे आहे. ( त्याला ' तेच ' मशीन विकत घ्यायचे आहे ! ) जोशीचा हा भावनिक प्रश्न आहे. त्या प्रश्नाला हा सिनेमा स्पर्शच करत नाही ! एकदा, आपण आपले युनिट टाकावे, असे त्याला वाटते, पण ते होऊ शकत नाही, इतकेच ! एकदा तो स्वामींच्या मंदिरात गेलेला असताना त्याचा एक जुना सहकारी त्याला भेटतो – तो म्हणतो की येत जा इकडे, भजन-कीर्तनात मस्त वेळ जातो ! ते ठीक – तो, वेळ घालवण्याचा एक वेगळा मुद्दा झाला. या जोशीला टीव्ही, मोबाईल, भजन-कीर्तन वा इतर कसलीच आवड नाही आहे ! मग राहते काय ? मानसिक – भावनिक आसक्तीचा प्रश्न ! या प्रश्नाचा थोडाही वेध हा सिनेमा घेत नाही – त्याच्या खोलात जाणे तर राहूच द्या.

आपण काढतोय एक दर्जेदार सिनेमा – गती सावकाश राहू दे, गाणीबिणी नकोत, संवाद कमी, दृश्यमाध्यम हाताळलेले दिसले पाहिजे – हे सगळे आहे ! पण, मुख्य विषयालाच हात लावायची हिंमत होत नसेल तर दर्जेदार कसा होणार सिनेमा ? सिनेमाचा नायक कशाचाच काही परिणाम न होता उदासपणे सगळीकडे हिंडत राहतो ! बाकी, सगळ्यांची कामे, वगैरे सगळे छानच आहे ! पण, काय शेवटी ? त्या नायकाबरोबरच प्रेक्षकांनीही काळा चष्मा चढवून गप गुमान घरी जायची वेळ येते !

बाकी, मराठी सिनेमात इतकी मशिनरी आणि त्यांतल्या कामाचे काही तपशील हे प्रथमच आले असावेत !

--- ००० ---

मकबूल फिदा हुसेन..

मी एका ठिकाणी दिलेला -- मला जाणवलेला -- त्या सरस्वतीच्या चित्राचा अर्थ --

मुळात हे देवीचे, स्त्री म्हणून काढलेले उत्तान, नग्न चित्र आहे, ही कल्पनाच चुकीची आहे. स्त्रीदेहाचे आकर्षण वा मादकता व्यक्त करणारे असे कोणतेही अवयव तसे रेखाटलेले नाहीत. तो स्त्रीदेह आहे असे सांगण्यापुरतीच रूपरेखा आहे. मुळात सरस्वती ही बुद्धी आणि सखोल ज्ञानाचे प्रतीक आहे. ते ज्ञान खुले, अनावृत आहे. सरस्वतीचा उजवा हात पाण्याबाहेर आल्याचे दाखवले आहे आणि त्या हातात कमळ आहे. हे ज्ञानाचे बाहेर आविष्कृत झालेले सौंदर्य आणि ताजेपण आहे. तो हात पाण्याबाहेर आलेला दाखवणे याचा अर्थच ती सरस्वती ज्ञानाच्या सखोल, वाहत्या प्रवाहात आहे. तिचे केस तिच्या डावीकडून उजवीकडे वाहते, लहरते दाखवलेले आहेत – तेही त्या प्रवाहाचे निदर्शक आहेत. ज्ञान हे स्थितिशील नसते – सतत वाहते, नवे, ताजे असते – हेच यातून सुचवलेले आहे. वरच्या बाजूला एक मासा दाखवलेला आहे. मासा जगतोच मुळी पाण्यातल्या प्राणवायूवर – तो ज्ञानाचा प्राणवायू आहे. माशाच्या त्या ज्ञानग्रहण प्रक्रियेचे निदर्शक असे बुडबुडे दाखवलेले आहेत. इथे वीणा तिच्या मांडीवर आहे. ती कला कौशल्य, नादसौंदर्य, संगीत यांचे प्रतीक आहे. त्या

वीणेने सहजच योनीप्रदेश झाकला गेलेला आहे. ही लैंगिकतेला उत्तेजन न देणारी, उन्मादक नसलेली अशी कला आहे. मोर पिसारा फुलवून तिच्या मांडीवर नाचतो आहे. हे ज्ञानाचे फुलणे, आल्हादणे, व्यक्त होणे आहे. या सरस्वतीला व्यक्तिगत चेहरा नाहीय. ज्ञान व्यक्तिगततेच्या मर्यादा ओलांडणारे असते, हेच त्यातून सुचवलेले आहे. तिच्या कपाळावर आज्ञाचक्राच्या जागी कुंकवाचा टिळा आहे. बुद्धी आणि आध्यात्मिक ज्ञान यांचे ते केंद्र आहे. शिवाय ते स्त्रीच्या सौभाग्याचे लक्षण आहे. ती एक पत्नी आहे. पौराणिक संदर्भ धुंडाळून नक्कीच याचेही अधिक अर्थ लागतील. सरस्वती ही ब्रम्हाची पत्नी आहे. उत्पत्तीची, सर्जकतेची, निर्मितीची देवता आहे – हेही त्यातून व्यक्त होते. थोडक्यात, हे चित्र ज्ञानाची सर्जकता व्यक्त करते. मला यात आक्षेपार्ह तर काही वाटले नाहीच, उलट, या चित्रकाराने या देवतेचे सखोल प्रतिकात्मक अर्थ समजून घेऊन हे चित्र काढलेले आहे, असेच वाटले. यावर वाद झाले तेव्हा कुणी या चित्राचा हा अर्थ सांगितला होता की नाही, ते मला माहीत नाही. एकूणात, चुकीच्या पद्धतीने पाहून, चुकीचे अर्थ लावून, हुसेनांवर अन्याय झाला, असेच मला वाटते.

**--- ००० ---**

मी टीव्ही मालिकांच्या फंदात फारसा पडत नाही. तरीही घरात दोनतीन मालिकांचे वेगवेगळे शौकीन असल्याने त्या तीन मालिका घरात लावल्या जातात. मी, कधी जेवायला वाढणे चालू असते तेव्हा किंवा कधी सहजही कुणाशी काही बोलण्यासाठी हॉलमधे बसलेलो असताना, तेव्हा जे चालू असेल ते पाहतो. त्यामुळे, या जगात काय चाललेय याची मला थोडी कल्पना असते.

' माझ्या नवऱ्याची बायको ' या मालिकेत शनाया म्हणून रसिका सुनील अत्युत्तम काम करत होती. ती आता अमेरिकेला जात असून तिच्या जागी नवीन शनाया येणार, असे गेले ८-१० दिवस चालू होते. कोणती अभिनेत्री घेणार हे आव्हान, हा अगदी सनसनाटी प्रश्न झालेला होता ! आज तो नव्या शनायाच्या प्रवेशाचा भाग होणार होता ! ईशा केसकरने ते आव्हान स्वीकारलेले आहे ! ज्या भूमिकेचा इतका जबर पगडा जनमानसावर बसलेला आहे, ती भूमिका स्वीकारणे हे नक्कीच एक वेगळेच दिव्याचे काम आहे ! झाला आज ईशाचा नवी शनाया म्हणून प्रवेश ! गुरुनाथ चकित होत म्हणतो, " शनाया ! " असे, माहीत असले तरी एकदा ठसवले गेले की बाबा आता ही आहे शनाया आजपासून ! उत्तम ! माझ्या मते ईशाने बाजी मारली ! कुणाला काही, कुणाला काही जरा फरक वाटणारच होते, पण, ईशाचे दृश्य तिने अत्यंत आत्मविश्वासाने केले ! तिच्या वेगळ्या पद्धतीने ती या भूमिकेत काही वेगळे रंग भरेल, हे नक्की !

मालिका ठीक हो पण हे सगळे कलाकार तर मला आपले वाटणारच ना ! त्यामुळे, आजचा हा भाग मीही उत्सुकतेने पाहिला ! नव्या शनायाला पुरेसा ड्रामा आणि वाव या दृश्यात उपलब्ध करून देण्यात आलेला होता. जमेगा !

ईशा केसकरचे अभिनंदन आणि तिला खूप शुभेच्छा !

--- ००० ---

' तर्काच्या खुंटीवरून निसटलेलं रहस्य '

जयंत पवार यांची उत्तम कथा आणि अतुल पेठे यांचे उत्तम अभिवाचन ! मधे मधे आवश्यक तेवढे संगीत आणि प्रकाशाचे पूरक परिणाम ! एखादे पूर्ण नाटकच पाहिल्यासारखे वाटले !

रहस्यकथेप्रमाणेच जगण्यातही आपली तर्कावर फार भिस्त असते. सापडणारी, खोटी पडणारी आणि खरोखरची सत्ये अशा तर्कसंगती उलट्यापालट्या करणारी असतात -- हा अतिमहत्त्वाचा आणि अमर्याद आशय ही कथा देते. सत्य तर्कसंगत नसेल तर त्याचा उपयोगच काय ? -- हा एक गहन आणि उपरोधिक प्रश्न ही कथा आपल्यासमोर मांडते !

असेच एक तर्कविसंगत सत्य आल्बेर कामूच्या ' आऊटसायडर ' मध्ये होते, ते आठवले. अमुक माणसाच्या हातातल्या सुऱ्यावर सूर्यकिरण पडल्याने त्याची तिरीप नायकाच्या डोळ्यांवर आली, त्यामुळे त्याच्या हातातल्या पिस्तूलातून गोळी सुटून त्या माणसाचा मृत्यू झाला ! पण, लोक निरनिराळ्या साक्षी देऊन त्याला फाशीच्या शिक्षेपर्यंत पोचवतात !

जगण्यातली अनिश्चितता, तर्कसंगत असण्याची सततची गरज आणि निरर्थकताही -- हे सगळे या अभिवाचनातून पोचले !

अतुल पेठे आणि टीमचे अभिनंदन !

सदर प्रयोग हा भरत नाट्यमंदिरला १२४ वर्षे पूर्ण होऊन १२५ व्या वर्षात साजऱ्या होणाऱ्या अनेक कार्यक्रमांची सुरुवात म्हणून आयोजित झालेला होता. भरतने असंख्य स्पर्धा आणि असंख्य कलाकार यांना व्यासपीठ उपलब्ध करून दिलेले आहे आणि देत आहे -- हे नाट्यतीर्थक्षेत्रच आहे ! त्यांना शुभेच्छा !

--- ००० ---

झी २४ तास वर आत्ताच एक उत्कृष्ट कार्यक्रम पाहिला -- नंदेश उमप आणि त्यांचे साथीदार यांनी सादर केलेले ' देवी आख्यान ' आणि देवीचा पारंपरिक गोंधळ ! मी सश्रद्ध नसलो तरी इथल्या कोट्यवधी लोकांच्या रक्तातून जी भाषा आणि कला वाहते तो फील माझ्याही रक्तात असावा, असे मला वाटतेच ! फारच सुंदर वाटला मला हा कार्यक्रम -- मी रंगून गेलो होतो त्यात ! कुठे उपलब्ध असेल तर शोधा आणि कुणी इथे लिंक द्या आणि जरूर बघा !

( त्यात संबळ वाजवणारा तडफदार वादक तरुणपणातल्या शाहरुख खानसारखा दिसत होता ! )

--- ००० ---

' दिल देके देखो ' या सिनेमातले, ' बोलो बोलो, कुछ तो बोलो -- प्यार हो तो कह दो यस, प्यार नही तो कह दो नो -- फिर जो हो हो तो हो -- ' हे एक गंमतीशीर गाणे आहे ! प्यार आहेच, हे त्याला माहीत आहे पण ती तसे बोललेली नाहीय, इतकेच ! त्याला आता तो सस्पेन्स नकोय ! " काय ते एकदा सांगून टाक, मग जे होईल ते होईल " ! -- या लेव्हलला आलीय गाडी !

मानवी जगण्यातले असे नाजुक पण आल्हाददायक क्षण व्यक्त होत राहणे हे हिंदी चित्रपटसृष्टीचे वैभव आहे ! ( उषा खन्ना -- मजरूह -- रफी. )

--- ००० ---

nashe mein ham nashe mein tum..Suman Kalyanpur_Rafi_Jan Nisar Akhtar_N Dutta..a tribute

youtube.com

१९५९ साली आलेला चित्रपट ' ब्लॅक कॅट ' -- तेव्हा त्याचे नाव ' ब्लैक कैट ' असे लिहीत ! तर तो माझ्या बालपणाताला एक खास चित्रपट होता ! मी तेव्हा १३ वर्षांचा होतो. एकदा बघितला की कोणताही चित्रपट मला बारीकसारीक तपशीलांसकट पाठ होत असे. तसाच हाही मला पाठ होता. कोणतीही चार पोरे सापडली की या चित्रपटाची कथा सांगण्याचा माझा लाईव्ह पर्फॉर्मन्स चालू होई ! पोरेही डोळे विस्फारून पाहात राहात ! यात एका हॉटेलातले एक गाणे आहे. जॉनी वॉकर हा मुळात एक चांगला नट होताच -- इथे तो त्या नर्तकीला म्हणतो की आता तो दारू चढल्याचा अभिनय करेल आणि मग नंतर तिने अमुक करावे. यावर हे गाणे सुरू होते -- ' नशे मे हम, नशे मे तुम ' ! गायले आहे सुमन कल्याणपूर आणि रफी यांनी आणि संगीत आहे एन दत्तांचे. एक मजा म्हणून बघा -

आज जॉनी वॉकरची जयंती आहे --

--- ००० ---

आणि मीही पाहिला –

**‘ आणि डॉ. काशिनाथ घाणेकर ‘**

मेहनत खूप घेतलीय, सगळ्यांचा अभिनय चांगला आहे, हा असा माहोल निर्माण करणे सोपे नाही, जराही कुठे कंटाळा येत नाही – थोडक्यात, ' कडॅक ' झालीय निर्मिती – हे सगळे सुपरिचित मान्य ! सदर सिनेमा एक उथळ करमणुकीचा सिनेमा म्हणून धंदा करायला काढलाय – दुसऱ्याच कुठल्यातरी अपेक्षा घेऊन तो बघू नका – असेही म्हणावे लागणारच – म्हणजे तो ' ग्रेट ' का होऊ शकलेला नाही, हा विषयही मिटून जातो ! असा डोक्याला ताप न देणारा, उथळ करमणुकीचा सिनेमा काढण्यासाठी काय काय करावे लागते, ते या निमित्ताने मांडतोय –

१. सिनेमा घटनाप्रधान करायचा – कुठल्याही मानवी संबंधात खोलात जायचे नाही. काशिनाथची प्रेयसीसुद्धा इथे नुसतीच गोड दिसत बसते.

२. वादळी व्यक्तिमत्व तर घ्यायचे पण त्याच्या वा त्याच्या संपर्कात येणाऱ्या कुणाच्याही डोक्यातल्या कुठल्याही वादळाचा प्रेक्षकाला वाराही लागू द्यायचा नाही.

३. ग्लॅमरचे उदात्तीकरण, त्या व्यक्तीचे दोष सहन करणारी माणसे आणि प्रेयसी असा मूर्ख रोमँटिक माहोल घ्यायचा.

४. आपण खूप यशस्वी व्हावे, आपल्या तिरसटपणाला आणि लहरींना आणि बेजबाबदारपणालाही लोकांनी चालवून घ्यावे – अशी हाव असतेच सगळ्यांना – ती लुटायचीय, हे ध्येय ठेवावे.

५. नटावरचा सिनेमा असल्याने त्याच्या मुखी येऊन गेलेले काही लोकप्रिय संवाद, दृश्ये आणि गाणी यांचे तुकडे घ्यावेत.

६. अगदीच संघर्ष नाहीय असे वाटू नये म्हणून लागू-काशिनाथ अशी दोन डॉक्टरांची टसल घ्यावी.

७. शोकात्म दुर्गुण वगैरे फंदात पडू नये – नायक शेवटी मेला तरी इथल्या नाजुक मनाच्या प्रेक्षकांना फारसे सखोल दुःख होऊ नये, याची काळजी घ्यावी. भावनांचे विरेचन वगैरेची मराठीत गरज नसते.

८. मुळात इथल्या लोकप्रिय नाटकांत काम करून ग्लॅमर मिळवलेला नट ! ती नाटकेही फारशी जगण्याचा वेध वगैरे घेणारी नसतात. त्यामुळे, सिनेमाचा उथळपणा टिकवणे सोपे जाते.

९. या अशा उथळ उंचीवर पोचणेही सोपे नसते – ती प्रक्रिया फारशी घेऊ नये – तीत कुणाला इंटरेस्ट नसते – यश – यशाचे असते सर्वांना कौतुक – हे लक्षात ठेवावे.

१०. ' कोण आहेत इथे धुतल्या तांदळासारखे स्वच्छ ' असा तत्त्वज्ञानात्मक संवाद घेताना – इथे नीतीच्या न्यायनिवाड्यापेक्षा आपला धंदा नीट चालण्याची सर्व निर्मात्यांना काळजी आहे, इकडे दुर्लक्ष करावे.

११. तरीही ऑस्कर मिळवायची स्वप्ने बघायला काय हरकत आहे – त्याला कुठे पैसा पडतोय ?

-- खूप झाले विचाराला मुद्दे. या सिनेमाकडून नाहीय ' ग्रेट ' अपेक्षा, पण, निघावा मराठीत कधीतरी एखादा ग्रेट सिनेमा – ही इच्छा करायला तरी कुठे पैसा पडतोय ?

--- ००० ---

साथी न कोई मंजिल - Google Search

google.com

हे माझे एक अत्यंत आवडते गाणे -- साथी न कोई मंजिल -- ' बंबईका बाबू ' -- एसडी -- मजरूह -- देव आनंद. दिग्दर्शक राज खोसला आहेत. गाणे गंभीर आहे. फारशी हालचाल असणार नाही. सुरुवातीला कॅमेरा संथपणे चालतोय -- मग ती संथपणे चालत येताना दिसते. तो स्थिर आहे -- एका ठिकाणी -- गाणे सुरू होते. हा असाच राहील की काय ? आणि हलायचे, चालायचे कारणच काय अशा मूडी गाण्यात ? मग तर हे बोअर होईल की काय ? पण, कौशल्य बघा -- किती हळुवारपणे आणि बेमालूमपणे हालचाली सुरू होतात त्याच्या ! शिवाय तिची आणि कॅमेऱ्याची हालचाल आहेच ! हे एक गंभीर गाणे किती दृश्यात्मकही इंटरेस्टिंग झालेय ते पाहा --

--- ००० ---

" या सत्याचे सर्व पैलू मला माहीत नाहीत -- सत्याला किती पैलू असतात तेही मला माहीत नाही -- "

सारांश, ' **द अक्सिडेंटल प्राईम मिनिस्टर** ' पाहिला. लोकमान्य, बालगंधर्व, काशिनाथ आणि भाई यांच्यापेक्षा खूपच चांगला आहे !

या शोला आम्ही फक्त २० प्रेक्षक होतो ! कोण बघत बसणार हा गुंताडा -- शिवाय ना गाणी ना फायटिंग ! पीएम किंवा संजय गाणी कसे म्हणतील ?

आभास बऱ्यापैकी उभा केला आहे पण त्या त्या वेळचे ताण प्रेक्षकांना नीट पोचत नाहीत.

कामेबिमे सर्वांची उत्तम !

--- 000 ---

**आनंदी गोपाळ**

सुरुवातीला ती दोघे एकत्र असताना आणि इथला सामाजिक विरोध असताना जो ड्रामा आहे तसा ती अमेरिकेत गेल्यावर कसा असणार ? आणि वैद्यकीय शिक्षणातले कष्ट आणि खडतरता किती दाखवत बसता येणार ? त्यामुळे, आनंदीबाईचे प्राथमिक आणि पायाभूत शिक्षण व्हायला जेवढा वेळ लागतो त्या मानाने तिचे डॉक्टरी शिक्षण चुटकीसरशी होते. आणि तसे ते व्हावे अशी प्रेक्षकांची तयारीही झालेली असते ! तर ते मुख्य शिक्षण फारसे त्रासदायक न झाल्याने आणि त्याच काळात तिला क्षयही झाल्याने तिला या शिक्षणाने फारसा तडफदारपणा आलेला दिसला नाही -- ती तशीच अर्धशिक्षित वाटत राहिली !

परंपरा, रूढी, धर्म यांच्या विरोधात त्या काळात एखाद्या स्त्रीने डॉक्टर होणे महा कर्मकठीण होते, यात वादच नाही. ते घडण्याची ही बायोपिक यशोगाथा चांगलीच आहे. स्फूर्तिदायकही आहे. ' पटणारी ' ही झालेली आहे. थोडाफार तो माहोल, एकूण वातावरण, पटत जाणारे जमलेय. आणि, कपडे, दिवे, भावगीते, तडाखेबंद पार्श्वसंगीत किंवा मधेच अचानक वाजवीपेक्षा जास्त ओरडून बोलले जाणारे संवाद -- असल्या काही चुकांची चर्चा करत बसावे, याची गरज वाटत नाही. अपेक्षित हेतू साध्य होतोय, लोक आवडीने बघताहेत, हेच यश आहे. दिग्दर्शन, तंत्र, संवाद हे यासाठी पुरेसे काम करणारे आहेत.

पूर्वी ' अवर मॅन फ्लिंट ' नामक एक सिनेमा आला होता. तसा ' आमचा माणूस ' ललित ! ललितने ही चॉकलेटी नसलेली भूमिका स्वीकारणे आणि निभावणे खरेच चांगले झालेले आहे ! खरे तर, आनंदीबाईपेक्षा गोपाळरावांचीच कामगिरी वाखाणण्यासारखी आहे ! त्यांच्या जिद्दीमुळेच तर हे सर्व घडले ! पण, त्यांना तरी का बाबा इतकी जिद्द, याचे प्रेक्षकांच्या डोक्यांत निराकरण व्हावे म्हणून, स्त्रियांची बुद्धी वाया जाणे पाहून ते खंतावलेले असतात, हे दाखवलेले आहे. सारांश, चित्रपट ललितकेंद्री आहे आणि त्याने ते नीट पेललेले आहे.

आणखी एक पण अधिक बरा बायोपिक, असे म्हणता येईल !

--- ००० ---

## आर्टिफिशियल इंटेलिजन्स

AI ची तांत्रिक बाजू आणि तिचा मानवी जगण्याशी येणारा संबंध आणि त्याचे परिणाम यांबाबतीतले ' अधिकारी ' नाटक लिहू शकेल असा खात्रिशीर लेखक म्हणजे राहुल बनसोडे. तांत्रिकता, मानववंशशास्त्र, उत्क्रांती, मानसशास्त्र आणि तत्त्वज्ञान अशा सर्व अंगांनी या विषयाला भिडण्याचा यशस्वी प्रयत्न या नाटकात झालेला आहे. यंत्राचा कृत्रिमपणा आणि माणसाच्या जगण्यातला कृत्रिमपणा, माणसाच्या मनाप्रमाणेच, पण स्मृतीच्या बाबतीत त्याहून प्रचंड कार्यक्षम असणारे यंत्राचे प्रोग्रामिंग, नुसती माहिती आणि भावभावना आणि या सर्वांतून येणारा ' मृत्यू म्हणजे काय ' हा प्रश्न -- या सगळ्याचा आवाका घेणारे हे एक वेगळे नाटक आहे.

विषय किचकट आहे आणि नाटक हे शेवटी संबंधप्रक्रियांचेच असावे लागते -- या दोन महत्त्वाच्या गोष्टींचा तोल सावरत जाण्याचा प्रयत्न नाटकात दिसतो. पण, त्याची जातकुळी एकदा कळल्यावर लौकरच त्यातले नावीन्य कमी होत असल्याने याचा दोन अंकी पसारा जास्त वाटतो. योग्य ती काटछाट करून आणि मुख्य आशय न गमावता याचा दीर्घांक करायला हवा, असे वाटले.

हे एक महत्त्वाचे नाटक सादरकर्त्या समूहाला नीट पेलता आलेले नाही. मागेही यांचे मी राहुलचेच एक नाटक पाहिले होते, तेव्हाही हा प्रश्न होताच. माझ्या शेजारी एक अत्यंत अनुभवी नाट्यकर्मी बसलेले होते -- आमचे दोघांचेही हेच मत झाले. संवादफेक स्पष्ट -- एकही शब्द हरवू नये अशी असायलाच हवी, या, नाटकाच्या प्राथमिक अटीतच हा समूह नापास होतो. तोंडातल्या तोंडात बोलणे, अति भरभर बोलणे, हळू आवाजातले ऐकूच न येणे, वाक्याचे शेवटचे भाग गिळले जाणे -- हे सर्व दोष होते. अशा जरा अवघड नाटकात हे दोष आले की प्रेक्षकाच्या मनात चीड तयार होते. शिवाय, काही दृश्ये छोटी छोटी असल्याने सारखे अंधार-उजेड हेही त्रासदायक होत होते. हे दोष दिग्दर्शकीय सर्जकतेने घालवायला हवेत. आता घेतलेयत ना हातात हे नाटक, मग लागतील तेवढे कष्ट घ्या आणि नीट सादर करा -- असा माझा मैत्रीतला सल्ला आहे.

मराठी नाट्यसृष्टीत राहुल बनसोडे हे एक वेगळे आणि क्वचितच आणखी कुणाला जमणारे असे नाट्यलेखन करतो आहे. ही नाटके नीट सादर व्हायला हवीत.

राहूलचे अभिनंदन करून पूर्ण समूहाचा कान मैत्रीत पिरगाळत आहे !

--- ००० –

तंत्रज्ञानाच्या कचाट्यात

राहुल बनसोडेच्या AI या नाटकातल्या एका संवादातून, आपले रूटीन जगणे आणि खाजगीपणाही कसा तंत्रज्ञानाच्या कचाट्यात चालला आहे याचे विदारक दर्शन एका संवादातून घडते. तो संवाद, एक तंत्रयुक्त विक्रेता आणि त्याचा बॉस यांच्यांतला आहे --

बॉस -- तू कसे ठरवलेस की त्या स्त्रीकडे लहान बाळाचे कपडे, खेळणी, पावडरी, साबण, अशा गोष्टी विकाव्यात हे ?

विक्रेता -- सरळ आहे -- ती प्रेग्नंट आहे --

बॉस -- तुला कसे कळले, ती प्रेग्नंट आहे ते ?

विक्रेता -- सरळ आहे -- गेल्या काही महिन्यांत तिने सॅनिटरी नॅपकिन्स घेतलेलेच नाहीयत, हे मला तिच्या मॉल-मालाच्या याद्या पाहून समजले !

आपल्या मनांचा आणि जगण्याचा हुकमी कब्जा घेणे चालू आहे याची आपल्याला पुरेशी जाण नाही आहे याचे चकित करणारे ज्ञान आपल्याला एका मिनिटात होते !

--- 000 ---

बीबीसी वर अगदी थोडा वेळ Affordable Art -- ' परवडणारी चित्रकला ' -- हा कार्यक्रम पाहिला. चित्रकलेचे जगातले एक नंबरचे मार्केट हे अमेरिका असून, आश्चर्य म्हणजे, दोन नंबरचे मार्केट चीन आहे. यात हजारो कोटींचे व्यवहार होतात. यातून मनात एक विचार आला -- एखादे चित्र काढायला आणि कादंबरी लिहायला लागणारा वेळ समजा सारखाच आहे पण चित्र हे तुलनेने खूपच कमी वेळात पाहून होत असणार. विस्तृत आणि सखोल आशय अभिव्यक्त होण्याची प्रक्रिया आणि तो ' पोचण्याची ' प्रक्रिया यांत घड्याळाच्या वेळाचे कितपत महत्त्व असेल ? थोड्या वेगळ्या प्रकारे -- ५०० पानांच्या कादंबरी इतका आशय एका पानाच्या कवितेतून पोचू शकतो का ? आणखी एक प्रश्न असा पडला की महाग चित्रकला आणि परवडणारी चित्रकला यांत आशयाबाबतही काही तरतम असते का ?

--- 000 ---

**' अलबत्या-गलबत्या ' आणि चिन्मय केळकर**

जुने काही वाचायचे राहिलेले मधेच कधी वाचले जाते. त्याच विभागात, ' अलबत्या-गलबत्या ' या बालनाट्याचे चिन्मय केळकर यांनी ' रंगवाचा ' च्या ऑगस्ट २०१८ च्या अंकात केलेले परीक्षण वाचले. त्यांचे सगळेच मुद्दे पटले पाहिजेत असे नाही, पण, असे खुलेपणाने लिहिले तर गेले पाहिजे !

" अहो, मुलांना करमणूक -- मजा हवी असते -- जरा ओरडा, हसा, बास ! आणि मुख्य म्हणजे, पैसे मिळवणे हाच आमचा हेतू आहे -- बाकीची कोणतीही उदात्त ध्येये नाहीतच आमची ! " -- हे तर अबाधित, अलंघ्य आणि अजेय असे तत्त्व असतेच ! -- त्यापलिकडे जाऊनही विचार करणारे, बोलणारे काही लोक असायलाच हवेत. ते काम या लेखाने अत्युत्कृष्टपणे पार पाडलेले आहे. अभ्यास आणि स्वतःचे चिंतन यांची या परीक्षणाला जोड आहे. त्यामुळे, ' बालनाट्याचे परीक्षण ' म्हणून न वाचता ओलांडून पुढे जावे, असे हे नाहीय. सर्वच नाट्यकर्मींनी वाचावे असे मूल्य या परीक्षणाला प्राप्त झालेले आहे.

कथा, बालनाट्याबाबतच्या कल्पना, विनोदाबाबतच्या कल्पना, तंत्राचे, दूरगामी परिणाम होतील असे, दुरुपयोग -- अशा अनेक महत्त्वाच्या मुद्यांवर इथे विचारपूर्वक लिहिले गेलेले आहे. एखाद्या बालनाट्याचे इतके गांभीर्यपूर्वक लिहिले गेलेले हे परीक्षण अद्वितीयच म्हणावे असे झालेले आहे !

--- ००० ---

श्लील-अश्लील असणे, जातीय वा धार्मिक भावना दुखावणे, इतिहासाचे विकृतिकरण असणे, समाजमान्य नैतिकतेला आव्हान असणे -- अशा काही ' कलाबाह्य ' कारणांनी अभिव्यक्तिस्वातंत्र्याला अडथळे येतच असतात. आता एक नवीन ! निवडणुकीच्या आचारसंहितेच्या काळात **' पी एम मोदी '** हा चित्रपट प्रदर्शित होणे ! हे आचारसंहितेच्या विरोधात आहे, असे काहींचे म्हणणे आहे ! या काळात तो चित्रपट प्रदर्शित होता कामा नये, अशी ती भूमिका आहे !

आपल्याकडच्या काही विचारवंतांच्या मते प्रत्येक कलाकृती ही राजकीय भूमिकेने युक्तच असते -- उघड वा छुपेपणाने. आता हा एक उघडच मोदी-प्रचाराची भूमिका घेणारा चित्रपट असणार, असे दिसतेय. कलेचे क्षेत्र स्वायत्त ठेवायचे असेल तर आचारसंहितेची अडचण येऊ नये. पण, सामाजिक-राजकीय हित असा एक प्रकार विचारात घ्यायचा तर ' सध्या नको ' हे बंधन पाळावे लागेल !

इथे काय मोठ्या अगदी ग्रेट कलाकृती निर्माण होताहेत -- कशाला एवढा विचार -- हीही भूमिका अर्थपूर्ण आहेच ! काहीही असो -- कलावंतांच्या डोक्यांना खुराक होणार, असे मात्र दिसतेय !

--- 000 ---

बेंगळुरूला जाऊन आलो. २७ मार्चला जागतिक रंगभूमी दिन होता. त्या दिवशी माझ्या **' ढोलताशे '** या नाटकाचा कानडी अनुवाद ( **' रस्त्यावरचे घर घ्या ! '** ) तिथल्या रंगशंकरा या रंगमंदिरात सादर झाला. तो ३३ वा प्रयोग होता. सुमारे २०० प्रेक्षक होते. त्या दिवशी अनेक ठिकाणी नाटकाबाबतचे कार्यक्रम असल्याने लोक जरा कमी होते, असे कळले. अन्यथा, ३०० आसनक्षमतेचे हे थियेटर बऱ्याचदा हाऊसफुल असते, म्हणे. या ग्रुपने सदर नाटकाचे प्रयोग कर्नाटकातल्या अनेक शहरा-गावांत सादर केलेले आहेत. हे नाटक तिथल्या लोकांना खूपच आवडलेले आहे. वेगळ्या भाषेत नाटकाला मिळत असलेला प्रतिसाद अर्थातच आनंददायक होता !

तिथे वर्तमानपत्रांनी या नाटकाची कितपत दखल घेतली, काही परीक्षणे वा लेख असे काही आले होते का, असे विचारले असता असे कळले की तिथे तशी काही पद्धतच नाही. नाटकांवर फारसे काही लिहिले जात नाही. लोकच एकमेकांना सांगतात वा फोन, एफबी, कायप्पा यांवरून लोकांना कळवले जाते. जाहिरात करणे परवडत नाही. या बाबतीत त्या मानाने आपली परिस्थिती, अजून तरी बरी आहे, असे वाटते. पण, आपलीही अधोगती त्याच दिशेने चाललेली आहे, हेही जाणवते.

नाटक या अभिव्यक्तिप्रकारसाठी काही वेगळे मार्ग सुचायला हवेत, असे वाटले.

--- 000 ---

## दोन दीर्घांक

‘ आविष्कार ‘ ने अरुण काकडे यांच्या नेतृत्वाखाली सादर केलेले दोन दीर्घांक काल दिनांक ३१-०३-१९ रोजी पाहिले. दोन्ही दीर्घांक मला आवडले एवढेच नाही तर मौल्यवान कलाकृती म्हणून महत्त्वाचे वाटले. सविस्तर परीक्षण वगैरे नाही करणार, पण माझा प्रतिसाद नोंदवतो.

### भूमिकन्या सीता

मुळातले हे, मामा वरेरकरांनी १९५० साली लिहिलेले चार अंकी नाटक आहे. विश्वास सोहोनी यांनी त्या नाटकाची ही अर्करूप नाट्यसंहिता तयार केलेली असून तिच्या या प्रयोगाचे दिग्दर्शनही केलेले आहे. हे नाटक मी पूर्वी वाचलेले वा पाहिलेले नव्हते. जगण्यातले गुंते असे जाणीवपूर्वक पाहणारे हे असे नाटक आपल्या मराठीत लिहिले गेलेले आहे याचा आनंदधक्का बसला !

राम, सीता, वगैरे पात्रे असली तरी कुणालाही देवत्व न देता लिहिले गेलेले हे नाटक आहे. मानवी मनाचे सामान्य गुणदोष आणि मर्यादा यांनी युक्त अशी ही पात्रे आहेत. हे नाटक स्त्रीवादी असल्याने आजही प्रस्तुत ठरते, असे कुठे तरी वाचनात आले होते. मामा वरेरकर हे परिवर्तनवादी नाटककार म्हणून प्रसिद्धही आहेत. मला हे नाटक स्त्रीवादी वाटण्यापेक्षा अधिक मोठ्या आवाक्याचे – मानवी जगण्याचेच नाटक वाटले ! कोणतीच मानवी कृती ही परिपूर्ण वा सार्वकालीन नैतिक वा मौल्यवान असू शकत नाही याचे अत्यंत परिपक्व भान हे नाटक देते. एखाद्या चांगल्या कलाकृतीत, लेखकाच्या ठरलेल्या उद्दिष्टापेक्षा त्याचे भान खूपच अधिक आवाक्याने व्यक्त होते, तसे इथे झाले असावे.

सीतेचे अग्निदिव्य, रामाचा राज्याभिषेक हे सर्व होऊन गेल्यावरच्या काळात हे नाटक सुरू होते. वनवास संपणे हे वस्तुतः कुणीही चांगलेच म्हणेल – पण, सीतेची खंत अशी आहे की राम राजा झाल्यानंतर तिच्या वाट्याला फारसा येतच नाहीय ! पूर्ण समाधानकारक परिस्थितीही असू शकत नाही वा वागणेही असू शकत नाही – हे व्यक्त करणारे अनेक संवाद या नाटकात आहेत. राम हा लोकानुरंजनी राजा आहे – तो आदर्श राजा होऊ इच्छितो – त्यामुळे, त्याला सीतेच्या अपेक्षांकडे दुर्लक्ष करणे भाग आहे. लक्ष्मण परत आलेला असला तरी तो त्याचा थोरला भाऊ, लोकानुरंजनी राजा राम याचा सेवक या भूमिकेत आहे. तो तर जणू ऊर्मिलेला विसरूनच गेलेला आहे ! आताच्या भाषेत बोलायचे झाल्यास, एका स्थिर नैतिक प्रोग्रामिंगमध्ये मृतवत झालेल्या पात्राचे हे चित्रण आहे ! परिणामतः, कहर म्हणजे, एका ठिकाणी ऊर्मिला खंतावून म्हणते की तिच्यावर मात्र कुणी कधीच संशय घेतला नाही ! संशय घेतला न जाणे हे चांगले की वाईट ? – या

सरधोपट प्रश्नापलिकडे या नाटककाराची दृष्टी पोचते ! असे अनेक प्रसंग आणि वाक्ये या नाटकात आहेत. सगळे इथे सविस्तर सांगत बसत नाही. सीता आणि ऊर्मिला यांचे अन्यायग्रस्ततेला विरोध करणे, हे महत्वाचे आहेच – पण, त्याह्नही महत्वाची आहे या लेखकाची मानवी जगण्याचा आवाका घेणारी मर्मदृष्टी !

काकडेकाका आणि विश्वास सोहोनी यांचे या नाटकसाठी विशेष अभिनंदन ! पूर्ण टीमच या नाटकाच्या उत्तम दर्जाशी समरूप झालेली आहे ! या सर्वांनाच धन्यवाद !

**चार-दोन-तुकडे**

लेखक-दिग्दर्शक युगंधर देशपांडे हा. नव्या पिढीचा एक ताकदवर आणि महत्त्वाचा नाट्यकर्मी ! हे नाटकही, त्याचे माणसाच्या जगण्याचे आकलन सहज तीव्रतेने व्यक्त करणारे आहे !

‘ दि इक्वल्स ‘ ( सर्व समान ) हे इथल्या मॉलचे नाव आहे. तिथे वा त्याच्या पार्शभूमीवर हे नाटक घडते. या नाटकातल्या पात्रांच्या जगण्यात एक मूलभूत समानता आहे – ती म्हणजे गोंधळलेले असणे आणि आत्मकेंद्रित असणे ! समाजातल्या अनेक आर्थिक, सामाजिक स्तरांतली माणसे इथे एकमेकांच्या संबंधांत येतात आणि त्या मूलभूत समानतेने फाटून जातात. “ कितीही अडवेतिडवे विचार केले तरी क्रांती काही घडत नाही ! “ असे एक भेदक वाक्य या नाटकात आहे. गोंधळ आणि आत्मकेंद्रितता असल्यावर कसली क्रांती आणि कसली समानता – असा हा विषय आहे. एकदा यातले एक पात्र म्हणते की आता मी जरा विचार करतो – आणि विचाराचे दृश्य स्वरूप ते पात्र आपल्याला दाखवत राहते – अंग पिरगाळणे-मुरगाळणे, वर चढणे, खाली उतरणे, पडणे, वगैरे ! मानवी विचाराची अशी सत्यस्फोटक टर उडवलेली मी कुठेच पाहिलेली नाही ! या नाटकाचे प्रमुख नेपथ्य आहे तीन वेगवेगळ्या प्रतिक्रिया देणारे तीन कार्टून चेहरे ! केवळ प्रतिक्रियारूप जगण्याचे हे नाटक आहे !

एका दृश्यात लग्न जमवण्यासाठी एकत्र येऊन एकमेकांना जाणून घेणारे तरुण-तरुणी आहेत. त्याला सात लाखांचे पॅकेज आहे तर ती म्हणते की तिचे नुक्तेच नऊ लाख झालेले आहे ! असे त्यांचे बरेच मुद्दे जुळत येतात, पण, शेवटी, मुलाची ‘ संपत आलेली ‘ आई या मुद्यावर गाडी अडते. ती तरुणी यावर ‘ नाही ‘ म्हणू लागते तर तो म्हणतो, “ अगं ती मुकी आहे – बोलणार नाही – घे ना जमवून, प्लीज ! “ कुठे ना कुठे गाडी अडत जमवण्यात नापास होत आलेली ही पात्रे आहेत ! शेवटी तर तो म्हणतो, “ मला सदोतीस पूर्ण व्हायच्या आत निदान एक साखरपुडा तरी मला करायचाच आहे ! “ व्यवहारातली, बाजारी भाषा मानवी संबंधांत येणे, हे तर या नाटकाचे एक जहाल वैशिष्ट्यच आहे ! यात मॉल मालकिणीची एक अमर मांजरी आहे, तिचेही एक प्रेमप्रकरण आहे ! ती तिच्या पेशवे काळापासूनच्या आठवणी सांगते ! बाहेरचा

माहोल बदलत जातो पण माणसाचा मूलभूत भंगारपणा बदलत नाही – हे या नाटकात सतत जाणवत राहते. “ प्रेम करायचे ठरलेय ना आपले ! “ – यावर, “ होय, पण, प्रेमात दुःख नाही आणायचे, हेही ठरलेय ! “ – असले भारी संवाद या नाटकात आहेत !

किती वर्णन करत बसू ? मला हे नाटक खूपच आवडले हाच सारांश सांगून संपवतो !

मस्त नाटक ! जय हो युगंधर !

या निमित्ताने रवी सावंत आणि सीताराम मामा यांचीही खूप दिवसांनी भेट झाली, हे अधिकचे समाधान !

--- ००० ---

## काका

मराठी रंगभूमीचे, विशेषतः प्रायोगिक रंगभूमीचे प्रिय काका म्हणजेच काकडेकाका वयाच्या ८९ व्या वर्षी आज दुपारी निधन पावले ! वयाची फिकीर न करता रंगभूमीसाठी ते अखेरपर्यंत चैतन्यशील होते ! त्यांच्या कार्यकतृत्वाची ओळख होण्यासाठी त्यांचे आत्मचरित्र ' अमका ' हे जरूर वाचावे. स्वतःला अमका(तमका) म्हणणाऱ्या या माणसाने मराठी रंगभूमीवर कार्याचे डोंगर उभे केले याची सर्वच रंगकर्मींना सादर जाणीव आहे.

रंगायनच्या काळात माझी ' बस ' ही एकांकिका रमाकांत देशपांडे यांनी बसवली होती -- तीत काकांनी एक भूमिका केली होती. त्यानंतर ' आविष्कार ' तर्फे त्यांच्या नेतृत्वाखाली माझी पाच नाटके आली -- ' नाणेफेक ', ' ढोलताशे ', ' जणू काही वास्तव ', ' इराक ', आणि ' डावेदार. '

काका एक उत्तम अभिनेते तर होतेच पण संयोजक म्हणून त्यांनी केलेले काम निव्वळ अद्वितीय होते. त्या प्रचंड कामाची जाण त्यांना नाट्यसंमेलनाचे अध्यक्ष म्हणून निवडून सर्वांनी व्यक्त केली. बालरंगभूमीसाठी काकांनी केलेले काम थक्क व्हावे असेच होते. अनेक लहान मुलांना घेऊन दौरे करणे आणि त्यांचे रुसवेफुगवे संभाळत प्रयोग पार पाडणे, ही साधी गोष्ट नव्हती.

काका दोनतीनदा मला म्हणाले होते की, " तुझ्या नाटकांचा महोत्सव करायचे मनात आहे -- कधी जमते ते पाहू -- " ते अर्थातच आता राहून गेलेले आहे.

कै. प्रिय काकडेकाकांच्या स्मृतीस सविनय सादर नमन !

--- ००० ---

**हिमालयाची सावली**

लेखनपूर्व माफी मागून ठेवतो.

कानेटकरांचे हे नाटक प्रेक्षकांना खूपच खिळवून ठेवते आणि खूपच आवडते, हे आधीच नमूद करतो.

जसे आहे नाटक तसे राजेश देशपांडे यांनी उत्तम बसवलेय आणि या नाटकाला लागणारा अभिनय यात पुरेपूर आहे, हेही कबूल करून ठेवतो. शृजा प्रभुदेसाई आणि शरद पोंक्षे उत्तमच.

ही अशी सुरुवात करायचे कारण म्हणजे मला हे नाटक माथेफिरू, बिनडोक पात्रांचे फडतूस, भंगार आणि कंटाळवाणे नाटक वाटले. स्वतः महर्षी आणि त्यांचे कुटुंबीय असे होते ? धन्य ते त्यांचे एकत्र जगणे ! महर्षी कुणी मोठे, परिपक्व वाटावेत असे नाटकात काहीच नाही. सतत त्यांच्या मोठेपणाची बकवास चाललेली. ते महर्षी आणि त्यांच्या मोठेपणाचे अवडंबर डोक्यांत घेऊन फिरणारे इतरेजन यांत फारसा फरक वाटला नाही.

पण, हेच नाटक एक ग्रेट नाटक होऊ शकते. त्याला ऍब्सर्डिटीची ( मानवी जगण्यातल्या गधडेपणाची ) जाण असलेला दिग्दर्शक हवा. हेच नाटक एक ऍब्सर्ड नाटक म्हणून बसवायचे. प्रचंड विनोदी होईल. प्रेक्षक लोटपोट होतील – हसून हसून लोळतील. गर्दी अशीच, इतकीच होईल – प्रचंड मजा येईल ! फरक एकच पडेल – सध्या आहे असे हे नाटक ज्यांना आवडतेय त्यांना हे नाटक अधिकच डल म्हणजे निर्बुद्ध करण्याचा धोका आहे. लोक मनोरुग्णतेकडे जातील. मी म्हणतो अशा पद्धतीने जर हेच नाटक सादर झाले तर प्रेक्षकांना ते प्रचंड करमणुकीबरोबरच शहाणपण आणि परिपक्वताही देईल. एक मनात आले ते नम्रपणे सांगितलेय. पुन्हा एकदा, माफी असावी.

पुन्हा सांगतो – नाटक जरूर पाहा.

--- ००० ---

अभिवाचन

**विदुर** ( कादंबरी ) – ले० डॉ. कमलेश सोमण

या कादंबरीच्या प्रकाशनाला जाऊन आलो. आम्ही पुण्यात ‘ अवकाश कलामंच ‘ नामक एक नाट्यसंस्था काढली होती तेव्हापासून कमलेश मित्र आहेत. त्यांचा प्रबंध महेश एलकुंचवारांच्या नाटकांवर असून त्याचेही एक दर्जेदार पुस्तक निघालेले आहे. या प्रकाशनाच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने या कादंबरीतल्या दोन प्रकरणांचे अभिवाचन आयोजित केलेले होते. अभिवाचक होते, स्वतः कमलेश आणि गौरी लागू. पार्श्वसंगीत होते अक्षय सोमण आणि त्यांचा चमू यांचे. ( नंतर प्रमुख वक्ते होते श्री. श्री. वा. कुलकर्णी आणि प्रमुख पाहुणे होते कलर्सवरील ‘ स्वामिनी ‘ फेम अभिनेते गुरुराज अवधानी. त्या दोघांच्या भाषणांना मी थांबू शकलो नाही कारण मला ८ वाजता माझ्या धाकट्या नातीला तिच्या क्लासवरून घरी घेऊन जायचे होते. )

दोघेही अभिवाचक अत्युत्तम असल्याने सुमारे ६०-७० श्रोते पूर्ण मग्न होऊन ऐकत होते. कमलेशांनी ही कादंबरी, महाभारतातले तत्त्वचिंतन स्वतःत पूर्ण मुरवून लिहिलेली आहे, हे जाणवले. युद्धातला सगळा संहार होऊन गेल्यानंतर पांडव आणि श्रीकृष्ण, धृतराष्ट्र आणि गांधारी यांना भेटायला येतात, तो कथाभाग होता. ते येण्यापूर्वी विदुर धृतराष्ट्राशी बोलतो आणि नंतर तसेच गांधारीशीही बोलतो. पांडव आणि कृष्ण यांना क्षमा करावी आणि त्यांच्याबरोबर पुढे आनंदात राहावे, असे त्याचे सांगणे असते. धृतराष्ट्रही त्याचा राग आवरू शकत नाही आणि नंतर गांधारीही. ते सर्व मुळातूनच ऐकण्या-वाचण्यासारखे आहे.

एवढ्या कथाभागातही हे व्यक्त झालेले आहे की मनाने घडलेली कोणतीच कृती ही पूर्ण बरोबर वा पूर्ण चूक अशी नसते. पांडवांच्या बाजूने सगळे समर्थनीय असले तरी धृतराष्ट्र आणि गांधारी यांचा क्रोधही समर्थनीय असतो. दोन्ही बाजूंनी काही ना काही चुकाही झालेल्या असतात. मानवी जगण्यातल्या या गुंतागुंतीचे आणि सर्वतः अमुकच बाजू घ्यावी असे काही नसते, याचे उत्तम भान या अभिवाचनाने दिले. इतका मोठा संहार घडून गेल्यानंतर क्षमेचा विषय समोर येणे हे जगण्यातले प्रतिक्रियेचे सातत्य तोडण्याचे तत्त्वज्ञान असते. अशा पद्धतीने पाहिल्यास नुसतेच या कादंबरीचे महाभारताचा कथाभाग म्हणून उदात्तीकरण करावे लागणार नाही. शेवटी जगण्याचे सार्थक घटनांच्या बाहेर आणि प्रतिक्रियांच्या बाहेर असल्याचे हे तत्त्वचिंतन हीच या कादंबरीची मूल्यात्मकता आहे.

मला खरे तर ऐतिहासिक वा पौराणिक असल्या प्रकारांची मानसिक ऍलर्जीच आहे. मी या प्रकारांच्या फंदातच पडत नाही. पण कमलेशांच्या मैत्रीमुळे गेलो आणि जाऊन येण्याचे पूर्ण सार्थक झाले.

--- ००० ---

**‘ अध्यात मी, सध्यात तू, मध्यात म कुणी नाही ’** ( दीर्घांक ) – निर्मिती – महाराष्ट्र कल्चरल सेंटर, पुणे, ले० स्वप्नील चव्हाण, दिग्द० अपूर्व साठे, गीते० प्रमोद काळे आणि संगीत० चैतन्य आडकर.

-- स्त्रीपात्रविरहित अनेक पुरुषपात्रांचे दंगानाट्य.

स्वप्नील हा एक आजचा महत्त्वाचा नाटककार आहे. त्यामुळे, परतताना रिक्षा मिळायला कितीही त्रास होवो, हे बघणे तर भागच होते. शिवाय पावसाळाही संपलेला दिसतोय. हे सर्व विचारात घेऊन जाऊन पाहून आलो हे नाटक.

हे नाटक सुरू होण्यापूर्वी खाली एक १५ मि०चे अंगणनाटक होते. स्त्री-भ्रूणहत्या आणि बलात्कार यांवरचे. ते अर्थातच स्त्री-समस्या जोरकसपणे मांडणारे होते. प्रभावी होते. अनेक तरुण-तरुणी होत्या. त्यात, मधून मधून, परेड अमुक करेगा, परेड तमुक करेगा अशा जोरकस ऑर्डर्स होत्या – त्यांतली एक होती, ‘ परेऽऽड – सोचना बंद ! ’ जोरदार परिणामकारक !

समस्या काय आहेत आणि काय घडायला हवेय याचे हे नाटक पाहिल्यावर मग, ‘ अध्यात मी --- ’ पाहिले !

स्वप्नीलच्या नाटकात समस्या शेकड्यांनी आहेत पण त्या निरुत्तर करणाऱ्या, बौद्धिक निराकरणे नसलेल्या आहेत. कारण त्या जगण्यातल्या मूलभूत म्हणता येतील अशा समस्या आहेत. क्रौर्य, भीती, सेक्स या सर्वच बाबतींत एका ब्लॅक वॉलपाशी ( कृष्णसीमेशी ) इथे जाऊन धडकणे आहे. कुणी मारत असताना मरणाऱ्याला घाम फुटतो आणि ते घाम फुटणे त्याच्या ताब्यात नसणे – अशा म्हटल्या तर लहान समस्यांपासून ते हस्तमैथुनापर्यंत सर्व जगणे या नाटकात आहे. कमोडवर बसणे आणि हस्तमैथून करणे या कृतीही बिनदिक्कतपणे इथे एकूण जगण्याचा भाग म्हणून येतात. आजच्या जगण्यातल्या तुकड्यांप्रमाणेच नाटकाची रचना आहे. एका माणसाचे जगणे जसे फुटलेले आहे तसेच समाजाचेही असंख्य घटनांनी फुटलेले आहे. धर्म, भाषा, विचार हे सगळेच निरर्थक ठरते आहे. आणि तरीही मन मूलभूत समस्यांकडे वळतेच आहे. उत्तर-आधुनिक नाटकाची सर्वच वैशिष्ट्ये या नाटकात आहेत.

सगळे बोंबललेलेच आहे तर मग जे आहे ते साजरे करत जगा – हे उत्तर-आधुनिकतेचे अंतिम उत्तर या नाटकातल्या गाण्यांनी अधोरेखित होते. जगणे बोंबललेला भंगार आशय, नांदी, पोवाडा, नाट्यगीत, भजन, भैरवी अशा प्रकारांतून इथे उत्सवीपणे सादर होत राहतो. प्रमोद काळ्यांची गाणी आणि चैतन्य आडकरांचे संगीत हा ‘ आनंदी उपरोध ’ जोरकसपणे हाणतात.

हा सगळा डोलारा अपूर्व साठे यांनी समर्थपणे दिग्दर्शित केलेला असून सर्व कलाकार आणि तंत्रज्ञांनी त्यांना उत्तम साथ दिलेली आहे.

उत्तर-आधुनिक आशयाचे, त्याच प्रकारच्या शैलीतले हे एक महत्त्वाचे नाटक आहे. विशेष म्हणजे यात निरर्थकाचा दंगा असूनही जगण्यातला meditative असण्याचा – चिंतनात्मकतेचा धागा हे नाटक सोडत नाही. हा या नाटकाचा उत्तर-उत्तर-आधुनिक विशेष म्हणता येतो. हे असे सगळे ठरवून – चिकित्सेने नाही घडत – ती भट्टी जमून यावी लागते.

मला हे एक, भट्टी जमून आलेले, मराठी नाट्यसृष्टीत हलचल निर्माण करू शकेल असे छान नाटक वाटले !
सर्व टीमला उत्तरोत्तर अधिकच आधुनिकता लाभो हीच सदिच्छा !
--- ००० ---

प्रयोग पुणे निर्मित

**येते आई !**

( मार्शा नॉर्मन यांच्या ‘ नाईट मदर ‘ या मूळ नाटकावर आधारित. )
ले० डॉ. चंद्रशेखर फणसाळकर, दिग्द० सुबोध पंडे, संगीत – राहुल रानडे,
कलाकार – सुजाता देशपांडे आणि ऋता पंडित.

हे मुख्यतः संवादांचे आणि संवादफेकींचे नाटक आहे. डॉ. फणसाळकरांचे संवाद उत्तमच आहेत. नाटक बसवताना सुबोध पंडे यांनी ते सहज, अन्वर्थक हालचालींत छानच बांधलेले आहे. नाटक दोन अंकी आहे आणि यात फक्त दोनच पात्रे आहेत. या नाटकात कुठेही ढील नाही. प्रत्येक शब्द आणि प्रत्येक वाक्य लक्षपूर्वक ऐकले गेलेच पाहिजे. अशा प्रकारच्या या नाटकात वाचिक अभिनय अर्थातच खूप महत्त्वाचा ठरतो. सुजाता देशपांडे आणि ऋता पंडित यांनी ते काम समर्थपणे केलेले आहे. त्या दोघींच्या उत्तम संवादफेकीसाठीही हे नाटक पाहायला हरकत नाही. ऋता पंडित यांना एकदोनदा मोठ्या आवाजात बोलायचे संवाद आहेत. त्या वेळी मात्र त्या अचानक, चाललेल्या आवाज संगतींशी बरेच विसंगत वाटेल असे ओरडतात, तेव्हा ‘ भो ‘ केल्यासारखे दचकायला होते. तसे होऊ नये.

आई-मुलगी हे या दोघींतले नाते आणि त्यांची इतरही नाती खतम झाली आहेत वा होत आहेत, असा एकूण माहोल. यातल्या नाशाचा अनुभव देणे हा आहे नाटकाचा आशय. सुरुवातीला सहज चाललेल्या संवादांत पिस्तूल हा शब्द येऊ लागला तर मला वाटले की कृष्णसुखनाट्य ( ब्लॅक कॉमेडी ) आहे की काय. पण तसे नाहीय. सरळ वास्तववादाच्या अंगाने जाणारे हे एक नात्यांच्या नाशाचे नाटक आहे. कदाचित, ही एक नाशजंतूनाशक लस ठरू शकेल. असेही घडू शकते – असेही वाट्याला येऊ शकते – हे भान प्रेक्षकांना येऊ शकते. पण, याहून अधिक या नाटकाची पोच नाही. “ हे बघा, कसे घडले – “ – असा एकूण प्रकार. अशा घटना आणि आयुष्यचित्रे हल्ली माध्यमांमुळे अनेक प्रकारे लोकांच्या

मनांवर आदळत असतात. त्यामुळे, नाटकाचा आशय, ‘ अरेरे ‘ म्हणून संपू शकतो. तो नाशप्रक्रियेच्या खोलात जात नाही.

हे नाटक पाहावे ते उत्तम संवाद, उत्तम अभिनय, उत्तम तंत्र आणि मुख्य म्हणजे उत्तम बांधणी, यांसाठी. पूर्ण नाटक दोन तास प्रेक्षकांना खिळवून ठेवते. दोन्ही अभिनेत्रींनी या नाटकाचे आव्हान चांगले पेललेले आहे.

‘ येते आई ! ‘ हे शीर्षक जरा गैरसमज निर्माण करणारे वाटले. आईचे भव्य प्रेम आणि प्रभुत्व हे जर असेल तर यात तसे एखाद्या स्टार अभिनेत्रीचे नाव दिसत नाही ! आणि काही वेगळ्या प्रकारच्या नाटकांची अपेक्षा असलेल्या लोकांना वाटणार, “ हं, हं, ते आई वगैरे – “ ! दोन्ही प्रेक्षक दुरावू नयेत म्हणजे झाले. तेवढे सोडले तर, अवश्य बघावे असे उत्तम नाटक. फार ग्रेट वगैरे नाही, पण, दर्जेदार !

--- 000 ---

चर्चेसाठी नाही -- फक्त माहितीसाठी -- आणि ज्याचा त्याने, वाटल्यास, विचार करण्यासाठी --ऑस्कर विजेत्या ' पॅरासाईट ' ( बांडगुळ ) या चित्रपटाचा दिग्दर्शक काय म्हणतो ते पाहा --

“There are people who are fighting hard to change society. I like those people, and I’m always rooting for them, but making the audience feel something naked and raw is one of the greatest powers of cinema,” he says. “I’m not making a documentary or propaganda here. It’s not about telling you how to change the world or how you should act because something is bad, but rather showing you the terrible, explosive weight of reality. That’s what I believe is the beauty of cinema.”

-- Bong Joon-ho

काही मित्रांनी मागितल्यामुळे अनुवाद --

" काही लोक सामाजिक परिवर्तनासाठी नेटाने लढा देणारे असतात. मला ते आवडतात आणि माझा नेहमीच त्यांना नैतिक पाठिंबा असतो. पण, प्रेक्षकांना काही नग्न आणि खडतर याची अनुभूती देणे ही सिनेमाची एक मोठी शक्ती आहे, " तो म्हणतो, " मी एखादा माहितिपट वा प्रचारपट करत नाहीय. तुम्ही जग कसे बदलावे किंवा अमुक एक काही वाईट आहे

म्हणून तुम्ही कोणती कृती करावी, हे सांगण्यासाठी नाही मी करत चित्रपट. उलट तुम्हाला वास्तवाचे भयानक आणि स्फोटक दडपण जाणवावे, हा माझा हेतू असतो. आणि हेच सिनेमाचे सौंदर्य असते, असे मी समजतो. " ( यातल्या शेवटच्या वाक्यात ' सौंदर्य ' ऐवजी शान, गुणवत्ता, वैभव, महत्त्वलक्षण, आशयघनता -- असे अर्थही घेता येतील. )

-- बाँग जून-हो ( दक्षिण कोरिया. )

**वेडा घोटाळा** ( दोन अंकी नाटक ).

पीडीए ची निर्मिती आणि दिलीप वेंगुर्लेकरांचे दिग्दर्शन. प्रयोग खणखणीत वाजणार याची खात्री होतीच. त्यात, चार पोलीस पात्रे ! त्यामुळे आणखीनच दणक्यात जबरदस्त ! दारिया फो च्या नाटकावरून वेंगुर्लेकरांनीच केलेले हे रूपांतर. एकूण पोलीस स्टेशनात घडणारे पूर्ण नाटक. आवश्यक तेवढे शाम भुतकरांचे उत्तम नेपथ्य. अथर्व भास्कर यांची उत्तम प्रकाशयोजना आणि रोहन फडके यांचे अगदी योग्य असे उडाणटप्पू पार्श्वसंगीत. सर्वांचाच अभिनय उत्तम – आशुतोष नेर्लेकर, योगेश कुलकर्णी, सारंग जोशी, संगीता डोंगरे-कुलकर्णी, यशवंत कुलकर्णी आणि प्रमुख भूमिकेत दिलीप वेंगुर्लेकर – असा एकूण तडफदार संच. नाटकाला गुन्हेगारी आणि पोलीसजग यांचा माहोल असल्याने सतत सनसनाटीपणा टिकवत चाललेला अजब प्रकार. एक रेल्वे कर्मचारी अतिरेकी म्हणून पोलिसांनी ताब्यात घेतलेला असताना तो त्या पोलीस स्टेशनातूनच खाली उडी मारून आत्महत्या करतो – या विषयाभोवती फिरणारे हे नाटक. त्या गुन्ह्याच्या सत्याहून प्रखरपणे आपल्या जगण्यातल्या सत्याला उघडे पाडणारे !

या नाटकाचे इतर तपशील इथे सांगणार नाही. ते नाटक पाहता पाहताच समजत जाणे इष्ट. तर्क, वितर्क, कुतर्क, तपशीलांची केली जाणारी वाकवावाकवी, खोटे सत्य उभे करण्याचे प्रकार, आक्रमकता आणि शेपूट घालण्याचे प्रकार – असे सगळे जणू वास्तवाच्या बाहेरून आपल्या भानावर आदळत राहते. खूप खोलात चालल्याचे भासत असताना एकूणच उथळपणाचा अनुभव येणे, हे एक या नाटकाचे भारी वैशिष्ट्य आहे. म्हटले तर वास्तववादी पद्धतीने चालणारे हे एक अप्रतिम असे ॲब्सर्ड नाटक आहे. प्रत्येक गोष्टीची अर्थपूर्णता पाहात असल्याचे नाटक करत जगण्यातल्या निरर्थकतेला स्पर्श करणारे. इथला बाँबस्फोट म्हणजे एक असत्यस्फोटच ! इथे ना कथेची उकल महत्त्वाची ना एखादा सर्वमान्य संदेश देणे. अशी नाटके रंगभूमीवर क्वचितच येत असतात, हे लक्षात घेऊन, काही चांगले पाहणे महत्त्वाचे मानणाऱ्या सर्वांनी पाहावे, असे हे नाटक आहे.

सखोल कलात्मकतेचा एक उंच प्रत्यय निर्माण केल्याबद्दल पीडीए ला धन्यवाद !

--- ००० ---

**अमिताभ बच्चन आणि मी**

मराठीत ' एबी आणि सीडी ' या नावाचा एक चित्रपट येतो आहे. त्यातले एबी म्हणजे अमिताभ बच्चन हे पात्र स्वतः अमिताभ बच्चन साकारत आहेत. आणि दुसरे सीडी म्हणजे चंद्रकांत देशपांडे हे माझ्या नावाचे पात्र विक्रम गोखले साकारत आहेत. त्याच नावाचा मी प्रत्यक्ष उपलब्ध असताना असे त्यांनी का केले असावे, ते सोडून देऊ. विक्रम गोखल्यांना ती संधी मिळालीय याचे दुःख नाही. पण, केला विचार की बाबा माझ्या नावाचे जे पात्र आहे ते समजा मीच साकारले असते तर काय झाले असते ? अमिताभ बच्चन कितीही व्यावसायिक यशस्वी असले तरी माझी प्रायोगिकता त्यांच्यावर हावी झाली असती आणि तो सिनेमा दणक्यात आपटला असता ! म्हणजेच, व्यावसायिकता म्हणजे ' मिळवणे ' आहे तर प्रायोगिकता म्हणजे ' घालवणे ' आहे. प्रायोगिकता म्हणजे ' अहो पंडितजन । तुका टाकावा थुंकोन ।। ' ! तुम्ही म्हणून जे काही आहात ते सगळे थुंकून टाकणे ! म्हणूनच, ती माझी भूमिका मलाच दिली असती तर अमिताभ बच्चन यांनी त्यांची भूमिका नाकारून यशस्वी माघार घेतली असती ! माघारच पण ' यशस्वी ' !

ती माझ्या नावाची भूमिका नेमकी काय आहे ते माहीत नाही -- उगीच आपली निरर्थक गंमत, असे समजा ! म्हणजे प्रायोगिकच ! व्यावसायिकला कणभरही निरर्थकता नाही चालणार ! पटतेय का ?

--- ००० ---

नाटकघर, पुणे निर्मित

## ।। शब्दांची रोजनिशी ।।

लेखक -- रामू रामनाथन, अनुवाद – अमर देवगावकर, रंगावृत्ती-प्रकाशयोजना-दिग्दर्शन – अतुल पेठे,
कलाकार – केतकी थत्ते आणि अतुल पेठे.

कालच इथे एका डच चित्रकाराचे एक उद्धृत मी विचारार्थ दिले होते – ते असे होते --

"abstract art is not the creation of another reality but the true vision of reality."

-- Piet Mondrian

अमूर्तता म्हणजे दुसऱ्या वास्तवाची निर्मिती नव्हे तर वास्तवाकडे ' सत्य पाहणे ' –

ते या नाटकाबद्दल लिहिताना प्रस्तुत वाटते. या नाटकाची सुरुवातच एका अमूर्त चित्रफितीने होते. मी प्रथमच अशी चित्रफीत पाहिली आणि ती अशी अत्युत्तम ! नाटकाच्या आशयाला समृद्ध करणारी अशी ही बाब आहे. हे नाटकही अमूर्त शैलीतच लिहिलेले – सादर केलेले आहे. वास्तवातल्या अनावश्यक भागांची काटछाट करून आवश्यक तेच धारदारपणे

सादर करणारे असे हे नाटक आहे. हे नाटक नुसते अमूर्त नसून निकॅनोर पाराच्या न- कवितेप्रमाणे ( Anti poetry ) नाटकाचे बरेचसे परंपरागत स्वरूप टाळणारेही आहे. हे ना व्यक्तिगत भावनिक उद्रेकांचे नाटक आहे ना एखादी वास्तवातली कथा सांगणारे. याला घटनाप्रक्रियेची सलगताही नाहीय. अमुक अशी ही दोन पात्रे आहेत सतत समोर हीच यातली सलगता. उपरोध, विनोद, शोकात्मता हे सगळे एकत्र पेलणारे असे हे एक वजनदार नाटक आहे. आणि त्याच वेळी निरर्थकतेकडे झुकणारे म्हणून हलकेफुलकेही.

भाषांचा मृत्यू हा या नाटकाचा पायाभूत विषय आहे. जगातले सगळे शिक्षणतज्ञ जरी मातृभाषेतून शिक्षण होण्याचे महत्त्व सांगत असले तरी शेकड्यांनी अनेकांच्या मातृभाषा मरत जाणे. व्यावहारिक – पोटापाण्याचे उपयोग नसतील तर भाषा मागे पडत जाते, हे आपण मराठीच्या बाबतीतही पाहात आहोत. इंग्रजी माध्यमाचे वेड प्रचंड वाढलेले आहे. भारतातल्या निवडक चौदा भाषांपैकी असणाऱ्या मराठीपुढे जर हे आव्हान आहे तर बाकीच्या छोट्या आणि कमी लोकसंख्येत बोलल्या जाणाऱ्या भाषांचे काय ! भाषा वाचवल्या पाहिजेत असे गळे काढून उपयोग काय ? पण, हे नाटक म्हणजे नुसताच एक भाषाविनाशाचा माहितिपट नाही. ही प्रत्यक्ष मानवी जगण्यातली एक महत्त्वाची समस्या म्हणून इथे पाहिली जाते. आणि भाषा हे संपर्काचे, अर्थांच्या देवघेवीचे साधन आहे हे अधोरेखित करत एक स्त्री आणि एक पुरुष अशी दोन पात्रे इथे आहेत. दोघेही घटस्फोटित असून पुनर्विवाहासाठी चाचपणी करण्यासाठी ते एकत्र आलेले आहेत. त्या स्त्रीला एक बाळ असून ते अमुक भाषेचे म्हणून जन्मलेय. त्याला वाढवणे, त्याचे संगोपन करणे हे अध्याहृत आहे. त्यांच्या बोलण्यात, वेगळे अनाकलनीय शब्द, शब्द न आठवणे, आठवले तर नीट उच्चारता न येणे, मनात आहे त्यापेक्षा वेगळेच काही बोलले जाणे, कधी नुसतेच विचित्र आवाजांनी संपर्क साधण्याचे प्रयत्न करणे – असे असंख्य अडथळे आहेत. शब्द, भाषा, अनेक लेखक हे विरत, लुप्त होत चाललेले आहेत आणि या अशा वातावरणात दोन व्यक्ती एकत्र येण्याचा, प्रेमाचा प्रयत्न करताहेत.

केतकीचा अभिनय आणि गाणी अत्युत्तमच आहेत. अतुलनेही अक्षरशः कमाल केलेली आहे. त्याचा वाचिक ( म्हणजे बिघडत चाललेल्या वाचेचा ) अभिनय म्हणजे हे नाटक आपल्या नसानसांत पोचवणारी बाब आहे. बाकी तांत्रिक अंगेही उत्तमच आहेत.

शब्द म्हणजे भूतकाळ – त्याला वाळवी लागत चाललेली आहे – तो नष्ट होत चाललेला आहे. हे या नाटकातल्या समस्येचे तत्त्वज्ञानात्मक अंग आहे. जे. कृष्णमूर्ती म्हणतात -- We live by words and words become our prison. – आपण शब्दांनी जगतो आणि शब्द आपला तुरुंग बनतात. आता शब्दांची ही एक वेगळीच समस्या आहे. शब्द तर हवेतच पण ते परिपूर्ण नसणे, विदीर्ण असणे आणि वेगवेगळे तुरुंगही असणे. – या सगळ्या अवस्थेचे भान हे नाटक आपल्याला देत जाते. मग जुळते का त्यांचे लग्न, मग त्यानंतर ते जगतात का आनंदात – अशा प्रश्नांची कथा

सांगणारे हे नाटक नाही. म्हटले तर ते आपल्या मनांची आणि मानवी संबंधांची कथा सांगतेय. एखादी भूमिका घेऊन उत्तर देता येईल किंवा निराकरण करता येईल असा हा प्रश्न नाही. किंबहुना अमुकच एक बौद्धिक उत्तर नसल्याने जागरूकतेने भान घेत शहाणे व्हावे, अशी इथे मागणी आहे.

कलेतून परिपक्वता निर्माण करणारे हे नाटक मराठीत सादर होणे, हे खूपच महत्त्वाचे काही घडते आहे !

या एकूण टीमला धन्यवाद !

--- ००० ---

**' प्रत्यय ', ' किंग लियर ', आणि डॉ. शरद भुथाडिया.**

काल, ' प्रत्यय ' या कोल्हापूरच्या नाट्यसंस्थेतर्फे एक एफबी लाईव्ह कार्यक्रम झाला. तो विशेषतः ' प्रत्यय ' ने १९९३ साली सादर केलेले शेक्सपियरचे ' किंग लियर ' हे नाटक आणि त्यातली लियरची प्रमुख भूमिका आणि दिग्दर्शन करणारे आमचे मित्रवर्य डॉ. शरद भुथाडिया यांच्याबद्दल होता. आमचा मित्र आणि उत्तम नट सागर तळाशीकर याने तो अत्युत्तमपणे सादर केला. मी कोल्हापुरात असताना काही वर्षे या टीमबरोबर होतो, त्यामुळे, मला त्यांच्याबद्दल विशेष आत्मीयता आहे.

त्या कार्यक्रमात सागरने तेंडुलकरांचा एक लेख वाचला. ते त्या वेळी लोकसत्तेत ' रामप्रहर ' नावाचे सदर लिहीत असत, त्यात तो आला होता. ( दिनांक २८ मे १९९३. ) त्यात तेंडुलकरांनी त्या प्रयोगाची आणि विशेषतः डॉ. भुथाडियांच्या अभिनय-दिग्दर्शनाची थोरवी, शब्दांची अजिबात काटकसर न करता सांगितलेली आहे ! ती अर्थात योग्यच आहे, असे मीही म्हणू शकतो कारण ते नाटक मीही पाहिले होते.

त्याच लेखात **' मोठे नाटक म्हणजे काय ' यावरही तेंडुलकर बोललेले आहेत.** त्यांच्या मते, नुसत्या कथेतल्या गुंतागुंतीने नाटक मोठे ठरत नाही. ते मुख्यतः मानवी स्वभावातील गुंतागुंत, मानवी कृतींतली गूढ अतार्किकता, त्याची स्खलनशीलता आणि नियतीच्या निर्दय न्यायाचा सखोल वेध यांमुळे मौल्यवान ठरते. ( डॉ. लागू आणि तेंडुलकर यांच्या एका जाहीर संवादात, ते नियती मानतात, असे तेंडुलकरांनी सांगितले होते, त्याची आठवण झाली.) ते प्रेक्षकाची तर्कबुद्धी विकल करणाऱ्या प्रखर सत्याचे दर्शन घडवत त्याला हेलपाटून टाकते. थोडक्यात, ते अमुक एक पटवायला वा अमुक एक

भूमिका मांडणारे एकरेषीय नाटक नसते. ते समग्र अस्तित्वाचा आवाका घेणारे, कोणत्याही स्पष्टीकरणाशिवाय जगण्याच्या भानाचा झपाटा व्यक्त करणारे असते. ( ही वाक्ये शब्दशः नाहीत -- स्मरणावर आधारित आहेत. )

चांगल्या, मोठ्या नाटकाबाबतचे हे तेंडुलकरांचे विचार मला पूर्ण पटतात. चांगले नाटक हे मानवी संबंधांचेच असावे लागते. तुम्ही एखाद्या पात्राची महती गाऊ लागलात तर मानवी संबंधांना सपाटता येते आणि कलाकृतीतली ' दर्शनाची जान ' संपून जाते.

ही पोस्ट फ्रेंडसच्या विचारार्थ दिलेली आहे. माझ्या सर्व 'प्रत्यय ' मित्रांचे अभिनंदन आणि त्यांच्या पुढील वाटचालीला खूप शुभेच्छा !

--- ०००  ---

**कादरखान**

या माणसाची महती मला इथले आपले मित्र राजू कुलकर्णी यांच्याकडून समजली. एके काळच्या अनेक हिंदी चित्रपटांचे पटकथा आणि संवाद लेखक. अजब, अतर्क्य घटना आणि आगापिछा ओलांडून वा निरर्थक म्हटले तरी चालेल असे मॅड संवाद, ही या कलावंताची वैशिष्ट्ये. राजू कुलकर्णी यांची कादरखानांच्या संवादांवर नंबरी मास्टरी आहे. त्या माहोलात एकदा सुमारे एक तास ' बरबाद मजा ' आली होती ! हे आठवायचे कारण म्हणजे आत्ताच जरा वेळ ' हीरो नं. 1 ' हा चित्रपट पाहिला. त्यात कादरखान यांनी गोविंदाच्या पित्याची भूमिका केलेली आहे. यात गोविंदा वेश बदलून करिश्माच्या घरी नोकर म्हणून आलेला असतो. त्या बाबतीतला एक संवाद -- " लैला का मजनू बनके रास्ते पे कपडे फाडते हुए घूमना आसान है मगर किसी के घर के कपडे धोना बहुत कठिन है ! " -- मजा आली !

मी उल्लेख केलेल्या आपल्या वकील मित्राचे नेमके नाव ( राजूच ना ? ) कृपया पुढील मित्रांपैकी कुणी सांगू शकतील, त्यांनी सांगावे, ही विनंती --

सतीश तांबे, युसुफ शेख, आनंद थत्ते

( आता नाव नीट समजले आहे -- ॲडव्होकेट राज कुलकर्णी. )

त्याच चित्रपटात परेश रावलचा मुलगा बाहेरून येतो आणि त्याला सांगतो की त्याला विक्रमी लाखो रुपयांच्या पॉलिसीज मिळाल्या -- आणि हे सांगून तो घरात जातो. तिथे गोविंदा उभा असतो. परेश रावल त्याच्याकडे पाहात वैतागून म्हणतो -- " देखा ? कितना कंजूस है -- इतनी बडी बात होने के बाद भी एक मिठाईका बक्सा भी नही लाया -- इसकी माँ अगर जिंदा होती तो फिरसे मर जाती -- "

--- ००० ---

**नाट्यकर्मींचे अण्णा**

पुण्यातल्या ' मनोरंजन ' या नाट्यव्यवस्थापन संस्थेचे अण्णा तथा मनोहरपंत कुलकर्णी हे निवर्तल्याचे समजते. माझ्यासारख्या अनेक नाट्यकर्मींचे ते अण्णा होते. नव्या हौशी नाट्यसंस्थांचे तर एक आधारच. पैसे ' नंतर ' दिले तरी चालवून घेणारे ! मला त्यांची विशेष आपुलकी म्हणजे माझ्या अनेक नाटकांना त्यांनी दिलेली उपस्थिती. त्यांचा खास अभिप्राय म्हणजे मंद स्मित करत पाठीवर हात ठेवणे ! ते नुसता व्यवसाय करत नसत. नव्या नाट्यकर्मींचे कौतुक करणे, त्यांना प्रोत्साहन देणे, हेही ते करत. पुण्यातल्या तर बहुतेक सगळ्याच आणि बाहेरगावच्याही असंख्य नाट्यसंस्थांचे ' मनोरंजन ' शी संबंध येत असत. त्यांच्या स्मृतीस अत्यादरपूर्वक अभिवादन !

अण्णांचे पुत्र मोहन कुलकर्णी हेही अण्णांची परंपराच चालवत आलेले आहेत. त्यांच्या दुःखात माझ्यासारखे असंख्य नाट्यकर्मी सहभागी आहेत !

--- ००० ---

**द फिल्म ऑफ डिस्काएट**

एखाद्या कारणाने वा संकटामुळे वा समस्येमुळे वा घटनेमुळे आलेली अस्वस्थता वा अशांतता नव्हे -- मन म्हणजेच अस्वस्थता वा अशांतता असल्याचे दिसणे, समजणे, जाणवणे ! ग्रेट कवी फर्नांडो पेसोआ याच्या जगप्रसिद्ध अशा, ' द बुक ऑफ डिस्काएट ' या लेखनावर आधारित हा चित्रपट पाहिला ! मित्रवर्य रवीन्द्र लाखे यांनी इथे लिंक दिल्यामुळे हे जमून आले ! एका कवीने लिहिलेला चिंतनशील मजकूर आणि त्याच्या कविता, चित्रपट या माध्यमातून अभिव्यक्त करण्यासाठी दोन तासांचा असा चित्रपट घडवणे हेच एक प्रचंड आव्हान होते ! हे सुचणे आणि या सर्जक प्रक्रियेतून कुणी जाणे ही एक महान जागतिक महत्त्वाची घटना आहे. एकूण मजकूराला आणि कवितांना अनुरूप -- तो अर्थ व्यक्त होईल अशी एकामागोमाग येणारी दृश्ये हीच या चित्रपटाची पटकथा आहे. यात निवडलेला मजकूर आणि कवितांच्या ओळी अस्तित्व ढवळून काढणाऱ्या आहेत !

चित्रपट म्हणजे असे काही असले तरी चालेल किंबहुना तसेच हवे आहे, असे वाटणाऱ्यांनी हा चित्रपट जरूर बघावा.

--- ००० ---

**मतकरी**

आदरणीय रत्नाकर मतकरी यांच्याशी कधी माझी भेट वा प्रत्यक्ष ओळख अशी झालेली नव्हती. त्यांची अनेक नाटके मात्र मी पाहात आलेलो आहे. त्यांचे ' जावई माझा भला ' हे नाटक एके काळी खूप गाजले होते. त्या वेळी मी ते पाहिले नव्हते. दोनच दिवसांपूर्वी, ते नेटवर उपलब्ध असल्याचे पाहून मी ते पूर्ण नाटक पाहिले. संवाद आणि नाट्यतंत्र यांवर अजब हुकुमत असलेला लेखक !

मतकरींचा माझ्याशी आलेला एक संस्मरणीय संबंध म्हणजे – एकदा एकदा ' लोकमत ' ने अनेक नामवंतांकडून मराठीतल्या सर्वकाळ महत्त्वाच्या अशा दहा नाटकांच्या याद्या मागवल्या होत्या -- त्यात मतकरी यांनी माझ्या ' बुद्धिबळ आणि झब्बू ' या नाटकाचा समावेश केलेला होता. त्याचा साभिमान उल्लेख मी माझ्या संकेतस्थळावरही केलेला आहे.

मराठी रंगभूमीवरच्या या महत्त्वाच्या लेखकाच्या स्मृतीस माझा सादर प्रणाम !
--- ००० ---

**गिरीश साळवी**

एक अत्युत्तम अभिनेता आणि माझा एक छान मित्र गेला ! गिरीश पतकेने बसवलेला, त्याने अभिनीत केलेला, तेंडुलकरांचा, ' चौऱ्याहत्तर पावसाळ्यांचा जमाखर्च ' हा एकपात्री दीर्घांक म्हणजे त्याच्या अभिनयाचा कळस होता ! सहज, साधा वावर, अर्थपूर्ण, उत्तम संवादोच्चारण, टायमिंग आणि नाटकाच्या लयीचे उत्तम भान, हे सर्वच त्यात पूर्णतेला पोचलेले होते ! ग्रेटच ! पण, वेडा होता ! अरे, मी म्हणायचो, तू एक उत्तम अभिनेता आहेस, शरीराची काळजी घ्यायला हवीस ! खरे आहे तुमचे, तो म्हणायचा ! मी कधी मुंबईला गेलो तर हे दोन गिरीश आणि मी यांचा गप्पांचा म्हणजे ग्रंथवाचनाचा कार्यक्रम हमखास ठरलेलाच असायचा ! गिरीश पतके त्याची शेवटची गाडी पकडे, पण हा, मी एशियाडमधून पुण्याला रवाना होईपर्यंत माझ्याबरोबर असे ! माझ्या ' बुद्धिबळ आणि झब्बू ' या नाटकात त्याने केलेली एक भूमिका पाहणाऱ्यांच्या कायम लक्षात राहिलेली आहे ! माझ्याच, ' झालं गेलं विसरून जाऊ ' या नाटकातही त्याने त्याच्या ग्रेट अभिनयाचा प्रत्यय दिला होता ! सिद्धार्थ तांबे यांच्या, गिरीश पतकेनेच बसवलेल्या, ' जाता नाही जात ' या गाजलेल्या नाटकातही त्याच्या अभिनयाचा कारनामा होताच ! हे सर्व ठीकच, पण, असे प्रेमळ मित्र असतात किती माणसाला ?

गिरीशच्या स्मृतीस अत्यंत स्नेहपूर्ण अभिवादन !

--- ००० ---

दहा काही नाही जमणार, पण, माझा नंबर वन आवडता चित्रपट, झेकोस्लोवाकिया चा ' द फनी ओल्ड मॅन ' याचा एक फोटो सापडला, तो देतोय. या चित्रपटाची कण न कण कथा मी चिंत्र्यंना सांगितली होती. त्यांनाही ते इतके आवडले की ' कल्पना एका झेक चित्रपटावरून ' असे लिहून त्यांनी ' अज्ञात कबुतरे ' या नावाची एक लघुकादंबरी लिहिली !

--- ००० ---

आनंदक्षण

‘ दिनकर पुरोहितचा खून ‘ हे माझे नाटक प्रकाश बुद्धिसागरने राज्यनाट्यस्पर्धेत सादर केले. प्रयोग धूमधमाल झाला. पण, बक्षिसे शून्य मिळाली ! त्यानंतर काही मित्रांच्या डोक्यात आले की हे नाटक व्यावसायिकवर व्हावे. आणि ते घडलेही ! ‘ पोत्यातून गोत्यात ‘ या नावाने ते प्रकाशच्याच नेतृत्वाखाली व्यावसायिकवर आले ! एकदाच घडलेला मराठी रंगभूमीवरचा अनुपम्य विनोदसोहळा म्हणजे त्या नाटकात प्रमुख भूमिकांत होते माधव वाटवे आणि आत्माराम भेंडे हे दिग्गज नट ! प्रचंड धमाल येई ! एका प्रयोगाला निळू फुले आणि राम नगरकर आले होते. प्रयोगाच्या मध्यांतरात चहा पिताना माधवराव आनंदाने म्हणाले होते, “ आज ग्रेट दुक्कल आलीय प्रयोगाला ! “ सारांश काय तर निळू फुले आणि राम नगरकर यांनी मला खूप हसवलेले असले तरी मीही माझ्या नाटकातून त्यांनाही एकदा मनमुराद हसवले होते, हे या महाराष्ट्राने विसरू नये ! ( अरे सॉरी, एकदा नाही, दोनदा ! ही दुक्कल माझ्या ' ढोलताशे ' लाही आली होती. ते नाटक पाहून निळूभाऊ म्हणाले की जो ढोलताशे पाहणार नाही त्याला मोक्ष मिळणार नाही ! निळूभाऊंचे हे वाक्य माझ्या संकेतस्थळावर ' अभिप्राय ' मध्ये घेतलेले आहे ! )

--- ००० ---

Ehsaan Tera Hoga Mujhpar - Junglee

youtube.com

शम्मी कपूर

१४ ऑगस्ट २०११ ला आमचा एक आवडता हीरो वारला. शम्मी कपूर. आज त्याची पुण्यतिथी. बऱ्याच हिरॉईन्सचे पहिले काम त्याच्याबरोबर झाले होते ! त्याच्याबद्दल आदर आणि हेवा वाटण्याचे ते एक कारण होते. तो काही नृत्यनिपुण वगैरे नव्हता पण गाण्याच्या चालीबरोबर अंगाला झटके देण्याची एक त्याची विशेष स्टाईल होती. त्यामुळे, मी त्याचे नाव लचक मुरारी असे पाडले होते. अनेक चित्रपट पडल्यानंतर यश मिळत गेलेला हा नट होता. त्याच्या चित्रपटांतली खूप गाणी प्रचंड लोकप्रिय झाली होती. आताच्या मुलांना आवडणारा स्पीड असलेलीही त्याची गाणी आहेत तशीच संथ

गोडवा असलेलीही आहेत. मला आवडणारे त्याचे एक गाणे देतोय – संगीतकार सदाबहार शंकर-जयकिशन आणि गायक अमर अष्टपैलू महंमद रफी – गीत हसरत जयपुरी – चित्रपट ' जंगली ' -- एहसान तेरा होगा मुझपर –

--- 000 ---

**माझ्या नावाचे पात्र**

एक तर मी शिक्षक नव्हतो आणि माझी चित्रकला कधीच चांगली नव्हती, त्यामुळे, एकूणात, साम्य शून्य ! पण, एक मजा ! -- AB & CD म्हणजे, अमिताभ बच्चन आणि चंद्रकांत देशपांडे -- हा मराठी चित्रपट आज सोनीवर पाहिला. त्यातला चंद्रकांत देशपांडे हा मेनरोल विक्रम गोखले यांनी केलेला आहे. एकूण माणसे ग्लॅमरला कशी हपापलेली असतात, या कल्पनेवर असलेला हा एक मजेदार चित्रपट आहे. मीही याचा जरा उपयोग केला -- एका कार्यक्रमात विक्रम गोखले अध्यक्ष होते आणि मी प्रमुख पाहुणा होतो, तेव्हा त्यांनी माझे भाषण ऐकलेले आहे, त्याचप्रमाणे, कोल्हापूरचा सागर तळाशिकर माझा मित्रच आहे, तसेच, सीमा देशमुख हिने माझ्या एका नाटकात काम केले होते आणि शिवाय एकाच सीनमध्ये चमक दाखवून गेलेला मिलिंद शिंत्रे हा तर माझा जुना मित्रच आहे -- हे सर्व मी माझ्या दोन नातींना सांगितले. शिवाय यालाच जोडून सुबोध भावे मला ओळखतो आणि ' आई कुठे काय करते ' मधली मधुराणीही मला ओळखते, हेही सांगितले ! आणि ललित प्रभाकरने तर ' ढोलताशे ' त कामच केले होते ! नाती म्हणाल्या, " आजोबा तुम्ही ग्रेट आहात ! " यावर मी म्हणालो, " मी ग्रेट आहे, हे बरोबर आहे, पण का, कशामुळे, हे परीक्षाबिरीक्षा या जंजाळातून बाहेर पडल्यावर समजून घ्या ! " चार प्रायोगिक नाटके आणि काही कविता, हे लेखन -- तेही कुणाला फारसे माहीत नसलेले -- हे आपले कर्तृत्व -- याची जाणीव असतेच हो, उगीच एक आपली गंमत !

--- ००० ---

**आई कुठे काय करते**

स्टार प्रवाहवरची ही मालिका आमच्या घरात रोज पाहिली जाते. मीही मधून मधून पाहात असे. सुरुवात सरधोपट वाटली होती. पण नंतर, पुढे पुढे या मालिकेतली समस्या स्पष्ट होत गेली. पारंपरिक समाजमान्य नीतिमत्तेच्या कल्पना आणि त्या एखाद्या व्यक्तीकडून न पाळल्या गेल्यामुळे काय काय होऊ शकते, वगैरे. अमुक एक मान्यताप्राप्त नमूनाच कसा योग्य, अशा प्रकारची मांडणी दिसते. उद्दिष्ट ठरलेले असल्याने या समस्येतले सर्व गुंताडे पाहणे इथे घडणार नाही आणि पात्रेही त्या उद्दिष्टाला पूरकच असणार, हेही ठीक. त्यावर इथे बोलायचेच नाहीय. मला यातले खास आवडतेय ते म्हणजे ( अर्थात या मालिकेचा साचा दुर्लक्षून ) मधुराणीचा अत्युत्कृष्ट असा संयत आणि समजुतदार अभिनय ! सर्व बारकावे समजून घेऊन त्यातला भावनिक आणि वैचारिक भाग ती उत्तम समतोल राखत व्यक्त करतेय ! तिच्याइतकीच मला इथे स्तुती करायचीय

ती मुग्धा गोडबोलेची. अशा मालिकेत इतक्या समृद्ध संवादांची उपस्थिती चकित करणारी आहे ! आहे त्या सामुग्रीतले भूत-भविष्याचे, सर्व पात्रांचे, सर्व क्रियाप्रतिक्रियांचे आणि घडणाऱ्या घटनांबद्दलच्या विविध समजुतींचे फारच अर्थपूर्ण भान बाळगत ती संवाद लिहिते आहे. टीव्ही मालिकेत असे संवाद हा एक महासुखद अपवाद आहे !
बाकी सगळेच आपापली कामे छानच करताहेत आणि रवींद्र करमरकरांचे दिग्दर्शनही खास म्हणावे असे आहे, तरीही, मधुराणी आणि मुग्धा यांचे विशेष मनःपूर्वक अभिनंदन ! तुम्हा दोघींसाठी पाहतोय मी ही मालिका !

--- ००० ---

**नातं**

मी ७५ साली लिहिलेला माझा ' नातं ' हा दीर्घांक बरेचजण मराठीतला एक अद्वितीय खास प्रकार मानतात. सर्वप्रथम हा दीर्घांक दूरदर्शन स्पर्धेत प्रकाश बुद्धिसागरच्या दिग्दर्शनाखाली सादर झाला. त्या स्पर्धेत ८५ स्पर्धकांतून याने पहिला नंबर मिळवला. नंतर, योगेश सोमणच्या दिग्दर्शनाखाली हा पुरुषोत्तममध्येही सादर झाला आणि करंडक प्राप्त करता झाला. प्रख्यात नट-दिग्दर्शक विनय आपटे, अनिरुद्ध खुटवड, इथले आपले मित्र प्रसन्न जी. कुलकर्णी, विजय पांचाळ आणि कुमार बडगुजर यांच्याही दिग्दर्शनांखाली याचे प्रयोग झाले होते.
काही दिवसांपूर्वी स्मिता पोतनीस या मुंबईच्या व्यक्तीने हा दीर्घांक झूम वर सादर करायची परवानगी मागितली. ही ' सृजन दि क्रियेशन्स ' नामक, ख्यातनाम दिग्दर्शक राजेश देशपांडे यांच्या नेतृत्वाखाली चालणारी संस्था आहे. हे कसे काय होणार मला माहीत नव्हते. पण आज प्रत्यक्ष पाहून मी खुश झालो ! स्त्रिया दिग्दर्शक कमी आहेत म्हणून मी मुद्दाम उल्लेख करेन की स्मिता पोतनीस या दिग्दर्शिकेने हे सगळे उत्तम जमवून आणलेले आहे. संवाद नीट पोचणे हे यात महत्त्वाचे होते. रंगमंचावर उपलब्ध असणारी नेपथ्य, संगीत, प्रकाशयोजना आणि पूर्ण अभिनय ही आयुधे इथे उपलब्ध नव्हती. या कोव्हिड काळात माझा हा दीर्घांक अशा पद्धतीने सादर झाला आहे याचे मला समाधान आहे. जरा अवजड आहे -- मेंदूला दूधबीध पाजून निवांतपणे पाहायला हवा. या टीमने हे काम उत्तम केले आहे. त्या सर्वांचे मी मनःपूर्वक अभिनंदन करतो. याची लिंक खाली देतो आहे -- सवडीने शांतपणे बघा असे सुचवतो. लिंक -

--- ००० ---

**काही सुचवणे --**

माझ्या ' नातं ' चा झूम प्रयोग पाहिल्यानंतर अशा प्रयोगासाठी माझ्या काही एकांकिका सुचवाव्यात असे वाटले --

१. ' साक्ष मावळत्या सूर्याची ' -- ही एकांकिका पुणे विद्यापीठाने पुरुषोत्तमला सादर केली होती. तेव्हा ती सर्वोत्तम प्रायोगिक एकांकिका ठरली होती. दिग्दर्शन विद्यासागर अध्यापकचे होते आणि कलाकार होते आनंद आलकुंटे आणि प्रगती गोसावी. ही एक अगदी वेगळ्या धाटणीची गंभीर एकांकिका आहे.

२. ' स्थळ दिवाणखाना ' हीच एकांकिका ' मन ' या नावाने दीर्घांकरूपातही आहे. हिचा एकच प्रयोग रवींद्र लाख्यांच्या दिग्दर्शनाखाली ' मनाचे शोक ' या नावाने झाला होता. खरे तर हे एकपात्री प्रकरण आहे, लाख्यांनी आणखी आही आजूबाजूची पात्रे घेतली होती. गंभीर प्रकार आहे. एकपात्रीच व्हायला हवा. हे जो समर्थपणे करेल त्याला नटसम्राट म्हणावे, असे मी म्हणत असतो.

३. ' संसाराणुपेंडघार ' या एकांकिकेला आय एन टी मध्ये सर्वोत्कृष्ट लेखनाचे पारितोषिक होते. प्रकाश बुद्धिसागरने दिग्दर्शन केले होते. या एकांकिकेबद्दल माझ्याशी चर्चा करण्यासाठी प्रकाश मुंबईहून, मी त्या वेळी जिथे होतो त्या नगर जिल्ह्यातल्या वाळकी या गावी आला होता. संवाद आणि कृती यांत भेद ठेवून लिहिलेली ही मराठीतली एकमेव, म्हटले तर गंमतीची एकांकिका आहे.

४. ' वेषांतर ' या एकांकिकेचा समाधानकारक प्रयोग अजून झालेलाच नाही. एक गंभीर गंमत आहे. समोर जे चाललेय ते मान्य करत प्रेक्षकांनी पाहात जायचे. मजेदार गुंता तयार करणारी एकांकिका आहे.

-- झूम माध्यमासाठी उत्सुक कलाकारांनी वरील संहिता जरूर वाचून पाहाव्यात. हे सर्व माझ्या खालील संकेतस्थळावर फ्री उपलब्ध आहे –

--- ००० ---

धर्म

मधून मधून मी संगीत ऐकत असतोच पण कालपासून माझा संगीत समारोहच चालू आहे. काल बराच वेळ किशोरी आमोणकर ऐकल्या, आज बडे गुलाम अलि खान, अब्दुल करीम खान आणि आत्ताच कौशिकी चक्रवर्ती ! शिवाय इकडचे आपले भीमसेन जोशी, कुमार गंधर्व, वसंतराव देशपांडे हेही असतातच. अशा अत्युच्च भानाच्या कलावंतांबरोबर मी अनेकदा माझे मन देतो सोडून आणि शिकू देतो त्याला कलेतले असंख्य बारकावे आणि येऊ देतो फिरून असंख्य शिखरांवरून. ही सगळी संतमंडळी आहेत ! यांना धर्म आणि विचारसरण्या बांधून नाही ठेवू शकत. हे सर्वजण, कोणतेही नाव नसलेला पण पूर्ण मानवासाठी असलेला असा एक अगाध धर्मच व्यक्त करत असतात. अनाम पण प्रत्यक्ष धर्म ! याच्या संपर्कात जर जास्तीत जास्त माणसे राहतील तर जगातली सर्व युद्धे थांबतील. शास्त्रज्ञ किंवा कारखानदारच महत्त्वाचे असे मुळीच नाही. राजकारणी तर सोडूनच द्या. मनुष्य प्राणी टिकेल तर तो यांच्यामुळेच टिकेल.

तर कौशिकी चक्रवर्ती ! संत व्यक्तीने स्त्री असू नये, सुंदर असू नये, तरुण असू नये, असे थोडेच आहे ? ही मुळात अतिसुंदर आहेच पण तिच्यातल्या गहन सर्जकतेमुळे तिच्या सौंदर्याला मर्यादाच राहिलेली नाही ! आत्ताच तिचा शुद्ध सारंग ऐकला यू ट्यूबवर ( मला राग कळत नाहीत – तुम्हीही ऐकावा म्हणून तुमच्या माहितीसाठी रागाचे नाव दिलेय ). ही स्त्री म्हणजे मला एक तळपता चमत्कारच वाटते ! स्वरांचे आख्खे विश्व ती सहज फिरवून आणते आपल्याला ! अजब आहे

! तिचे साथीदारही जबरदस्त आहेत ! मधेच ती साथीदारांच्या महानतेची कदर व्यक्त करते ते खरोखर ' आपण सगळे एकत्र ' हाच भाव दाखवते.

हिच्यामुळेच माझे मन इतके विशाल होते की त्यात तीही सामावली जाते ! तिच्या सबोध मनाला ते कळायची गरजच काय ? हा तर एकतर्फी नव्हे तर एकमात्र अमर्याद प्रेमाचा मामला आहे ! जियो !!!

--- ००० ---

ग्रेट मुलाखत

परवा संगीतविषयक एक पोस्ट दिली आणि मग त्या निमित्ताने नेटवर काही पाहिले -- कौशिकी चक्रवर्ती या महान गायिकेची ही महान मुलाखत त्यामुळे समोर आली ! इतकी गंभीर चिंतनात्मक मुलाखत फार क्वचितच ऐकायला मिळते ! " धर्म नव्हे, आध्यात्मिकता ", " संगीतातला सर्वात महत्त्वाचा क्षण म्हणजे गायला सुरुवात करण्यापूर्वीची शांतता " ! ग्रेट ! ज्यांचे आधीच काही पूर्वग्रह असतील त्यांनी द्या सोडून, पण बाकीच्यांनी खुल्या मनांनी ऐकावी अशी एक खास मुलाखत ! माझे तर या बाईंना दोन सॅल्यूट आहेत -- एक गायनाबद्दल आणि दुसरा या मुलाखतीबद्दल –

--- 000 ---

मै चला जिधर ये दिल निकल पडे -- मिस बॉम्बे

मै तो चला जिधर चले रस्ता -- धडकन

मै जिंदगी का साथ निभाता चला गया -- हम दोनो

चल अकेला चल अकेला -- संबंध

आ चल के तुझे मै लेके चलूं -- दूर गगन की छांव मे

-- हिंदी सिनेमांतली अशी बरीच गाणी तुम्हालाही आठवतील. सारखे कुठेतरी जावेसे का वाटते माणसाला ? तेही बेफिकिरीने ? अशी कुठेतरी निघून जाण्याची गाणी का इतकी आवडत असतील आपल्याला ?

भारतीय समाजाला कुठे जायचेय निघून ?

की आहे ते जगतच मनाने निघून जाता येते ?

--- 000 ---

कानडीतले ' बुद्धिबळ आणि झब्बू ' लौकरच आणखी प्रयोग होतील –

16 मार्च 2021.

पुन्हा विशाखा आणि समीर ( सोनी मराठी टीव्हीवरची महाराष्ट्राची हास्यजत्रा )

दोन नामचीन वेडे ! तुम्ही म्हणाल, नामचीन तर गुंडांना म्हणतात, नामांकित म्हणायचेय का ? नाही, नामचीनच ! गुंडच आहेत हे ! प्रचंड दरारा असलेले ! महाराष्ट्राच्या हास्यजगतात ! घाबरून घाबरून प्रेमाने हसतच राहावे असे ! आत्ताच त्यांची दिवाळी पहाट पाहिली ! विशाखा ही भावगीत गायिका आणि तबलासाथ समीर ! आख्ख्या दुनियेची वाट लावतात हे दोघे ! भावगीत म्हणत नसतानाची जी भावगीत गायिका विशाखाने दाखवली त्याला तोडच नाही ! समीरची साथ म्हणजे चोरावर मोर ! थेट उस्तादाचा टोप घालून त्याने बरबाद करून टाकले सगळे ! गेल्या कित्येक महिन्यांत मी असा खळखळून हसलो नव्हतो ! माझा दोन वर्षांचा हास्ययोग पूर्ण झाला ! इतक्या थोड्या वेळात इतका जबरदस्त परफॉर्मन्स ! विशाखाला माझ्यातर्फे बोलाचाच कंठा आणि समीरला वडगाव डग्गा ची वतनदारी ! मजा करा, जा !!!

--- ००० ---

महाग्रेट ! महाआनंद ! आशा भोसले झाल्या महाराष्ट्र भूषण ! त्या तर आधीच कोट्यवधींच्या जिंदगी भूषण आहेत !

दोन वर्षांपूर्वीच्या कानडी ' ढोलताशे ' ची आठवण --

Sushma Rao

is with Vijay V Kulkarni

and Shrunga BV

at Ranga Shankara

.

McactfrmSchfgrp h27ftgonms, 2log0rc1red9 • Bangalore •

What joy to meet the playwright before the show.....!

This World Theatre Day just gets better...!!

Playwright Cham Pra Deshapande is here to watch the show

Beediyolagondu Maneya Madi

directed by Mohit Takalkar.

कोंडी

अतुल पेठेच्या ' कचराकोंडी ' या लघुचित्रपटाने माझ्या मनाला कायमची एक खोल जखम केलेली आहे. काही माणसांना ही अशी घाणीत बुडून कामे करावी लागण्याची या समाजाला गरज असावी ही एक अत्यंत शरमेची बाब आहे. त्यातही त्यांना ना पुरेशी संरक्षक साधने ना त्यांना आणि त्यांच्या कुटुंबांना पुरेशा आरोग्य सुविधा ! ही शरमेची जखम पुन्हा उचकटली गेली ती वाझे प्रकरणातल्या शोधाची टीव्हीवरील दृष्ये पाहून. घृणास्पद -- अत्यंत ओकारीच आणेल अशा मिठी नदीच्या घाण पाण्यात उतरून तिकडे वाझेने टाकलेल्या वस्तू काही माणसे तळातून शिताफीने शोधून काढत होती ! पोलिस एखाद्या गुन्ह्याचे धागेदोरे पाताळातूनही उकरून काढू शकतात हे आपण साभिमान ऐकून असतोच. मुळात ही अशी कामे करायची सतत गरज निर्माण होणे हेच पूर्ण मानवजातीलाच शरमेचे आहे. इतके तंत्रज्ञान प्रगत झाले आहे म्हणतात तर माणसांना अशा घाणीत काम करावे लागू नये असे तंत्र नाही सापडू शकत ? की आपल्याला त्याचे काही महत्त्वच वाटत नसल्याने ते कधीच अग्रक्रमात येत नाही ?

तो गुन्ह्याचा तपास लागत जाणे याचे अर्थातच कौतुक होत राहील पण त्या घाण पाण्यात उतरलेल्या माणसांना आणि त्यांच्या कुटुंबांना उत्तम आरोग्यसुविधा उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. घाण पाण्यातून कसे सगळे काढले बाहेर या शौर्याच्या स्तुतीपेक्षा त्या वीर कामगारांना माणसाचे सन्मानाचे जगणे मिळणे अधिक महत्त्वाचे आहे.

गुन्ह्याचे धागेदोरे शोधून काढण्याच्या मानवी हुशारीत माणुसकीचे धागे गहाळ होऊ नयेत. गुन्ह्याच्या रहस्याच्या कोंडीबरोबरच माणुसकीहीनतेची कोंडीही त्याच निकडीने फुटायला हवी !

--- ००० ---

**पुन्हा एकदा, ‘ आई कुठे काय करते ‘ --**

स्टार प्रवाह वरच्या या मालिकेत आईच्या प्रमुख भूमिकेत आहे मधुराणी गोखले. ती कॉलेज विद्यार्थिनी असताना आमच्या एका नाट्यसंस्थेशी संबंधित होती. नंतर एकदा एका एकांकिका अभिवाचन उपक्रमात तिने आणि सुबोध भावेने माझ्या एका एकांकिकेचे अभिवाचन सादर केले होते. त्यानंतर तिने माझ्या ‘ बुद्धिबळ आणि झब्बू ‘ या नाटकात एक महत्त्वाची भूमिकाही केली होती. या सर्व कारणांमुळे, फक्त ती कसे करतेय काम या मालिकेत या उत्सुकतेपोटी मी ही मालिका बघू लागलो. तिचे काम उत्तम होत असले तरी ही मालिका फारच चीप असणार असे सुरुवातीला वाटले होते. पण काही भागांनंतर हा समज कमी होत गेला. याचे प्रमुख कारण म्हणजे नमिता वर्तक आणि मुग्धा गोडबोले यांचे लेखन. मानवी संबंधांचे आणि त्यांतल्या एक प्रकारच्या बंदिस्त अटळपणाचे भान बाळगणारी मांडणी आणि तीच गोची व्यक्त करणारे ‘ समझदार ‘ संवाद हे मला आवडू लागले. एकूण टीमच उत्कृष्ट असून रवींद्र करमरकरांचे दिग्दर्शनही मानवी जगण्यातला हा आवाका नेमका घेत जाणारे आहे, हे एकूणच आश्चर्ययुक्त सुखावणारे होते.

अमिताभ गुन्हेगार झाला, अधोजगताचा किंग झाला तर लहानपणी त्याचे आयुष्य कसे वाईट गेले होते ते त्याच्या समर्थनार्थ दाखवायची पद्धत होती. पण अमजद खान का खलनायक झाला त्याचा शोध कधी घेतला जात नसे. नुसत्याच समाजमान्य नीतीतत्त्वांची भलावण करणाऱ्या सामान्यत: सर्वच ‘ धंदेवाईक ‘ कलाकृती हेच करतात. या मालिकेचे मला

वाटणारे वैशिष्ट्य हे आहे की ही मालिका प्रत्येक पात्राला त्याचे त्याचे फूटेज देत आहे. ' सामान्यत: ' अमूकच बरोबर असे वाटत असले तरी प्रत्यक्ष जगण्यात तसे काही असू शकत नाही, ही मानवी जगण्यातली गोची ही मालिका जाणीवपूर्वक उत्तम प्रकारे व्यक्त करत आहे. ही मला या मालिकेची आशयसमृद्धी वाटते. आणखी कोणत्या एखाद्या मालिकेने जाणीवपूर्वक हा आशय पाहिला होता का, हे मला माहीत नाही, पण, इथे हे काही विशेष घडते आहे, असे मला वाटते. बरोबर काय घडायला हवे याच्या सेट अपेक्षा असणाऱ्या प्रेक्षकांना इथे सतत खरचटणारे असे काही ना काही घडत असते आणि तरीही कुणालाही दोष देणे कठीण होऊन बसते. उदाहरणार्थ त्यातल्या अनिरुद्धच्या आईने वा ईशा या पात्राने असे वागणे-बोलणे इष्ट आहे का, असे विचारले तर कुणीही नाहीच म्हणेल पण ती पात्रे आपापल्या साच्यात बद्ध आहेत, जसे आपण सगळेच असतो, त्यामुळे दोष कसा देणार, असे एक वेगळेच भान ही मालिका प्रेक्षकांना देते. विशेष म्हणजे ही पूर्ण टीमच हा आशय समजून काम करते आहे, हे थक्क करणारे आहे ! मानवी समस्यांना बौद्धिक निराकरणे नसतात – हे समजणे आणि ते टीव्ही मालिकेतून व्यक्त होणे हे अनपेक्षित महत्त्वाचे काही घडत आहे !
टीव्ही मालिकेच्या रूपातली ही एक उत्तम आबसर्ड – व्यस्ततायुक्त कलाकृती आहे, असे मी म्हणेन. मराठीत अशी उत्तरहीन मालिका येणे हे नक्कीच एक अघटित आहे ! या मालिकेच्या टीमला आणि स्टार प्रवाह ला धन्यवाद !
--- ००० ---

Madhurani Gokhale Prabhulkar

is with Champra Deshpande

.

clSAdfltdpordsil u3 astnSrstap 1on:sotor40e PMd •

चं.प्र. देशपांडे हे माझ्यासकट आणि अनेक रंगकर्मीसाठी गेल्या काही दशकातले अत्यंत महत्वाचे नाटककार आहेत...! त्यांची नाटकं समजणं, भूमिकेची खोली कळणं, त्यांची वाक्यं तोंडात बसवून ती सअर्थ पोहचवणं हे कुठल्याही नटासाठी प्रचंड मोठं आव्हान असतं... सुरुवातीच्या काळातच त्यांची नाटकं करायला मिळणं हा माझ्या अभिनेत्री आणि माणूस म्हणून होणाऱ्या जडणघडणीतला मोलाचा भाग होता आणि आहे ... त्यासाठी मी स्वतःला भाग्यवान समजते.
त्यांची नाटकं ज्यांनी वाचली नसतील त्यांनी www.champralekhan.com इथे जाऊन… See More

Champra Deshpande

clSAdfltdpordsil u3 astnSrstap 9on:sotor49e AMd • Shared with Public

Public

--- 000 ---

अत्युत्तम कार्यक्रम आणि मिलिंदचे लाजवाब सादरीकरण !

( मिलिंद शिंत्रे )

मोहोब्बत

' पहेली पहेली बार मोहोब्बत की है ' ( चित्रपट ' सिर्फ तुम ' ) असे गाणे जेव्हा एखादी नायिका म्हणत असते तेव्हा तिला काय सांगायचे असते, तर, ही माझी मोहोब्बत करायची पहिलीच वेळ आहे, काही चुकलेमाकले तर चालवून घे, थोडा सराव झाला की मी दुसऱ्या-तिसऱ्या मोहोब्बतकडे जाणार आहे. आणि जर ती असे गाणे म्हणू लागली की, ' तिसरी-चौथी बार मोहोब्बत की है ' तर त्याचा अर्थ काय होईल, तर, मला चांगला अनुभव आहे, तू मला अक्कल शिकवू नकोस ! पण सामान्यत: पहिल्या प्रकारचेच गाणे म्हणायची पद्धत आहे, दुसऱ्या प्रकारच्या गाण्याला ( ते खरे असले तरी ) लोक नाराज होण्याची शक्यता असते !

--- ००० ---

सकाळी सह्याद्री वाहिनीवर ' तराने पुराने ' या कार्यक्रमात ' जुडवा ' या सिनेमातले अन्नू मलिक ने संगीत दिलेले ' दुनिया में आये हो तो ' हे गाणे ऐकले-पाहिले. मस्त फ्रेश शुभारंभ झाला दिवसाचा ! अप्रतिम निर्बुद्ध निरर्थक सुंदर गाणे ! तीनचार मिनिटांत प्रेम, मृत्यू बित्यू सगळा दंगा ! अशी असंख्य गाणी आणि निरर्थकतेचे वैभव इथली जनता बाळकडू म्हणून आस्वादत आलेली असल्याने कोरोना-बिरोना ला इथे कुणी घाबरत नाही –

--- 000 ---

वस्तुत: तिच्या डोळ्यांत दोष होता -- एक डोळा चंद्रासारखा होता तर दुसरा सूर्यासारखा ! पण  प्रेमात त्याचाही आनंद होतो -- जसा देवानंदला झाला --

तेरे ये दो नैना चाँद और सूरज मेरे !

ओ मेरे जीवनसाथी !

( चित्रपट ' गाईड ' )

01 May 2021.

**कौशल इनामदार**

अत्यंत अभ्यासू आणि स्वत:ची मर्मदृष्टी असलेला संगीतकार आणि आमचा जुना मित्र कौशल इनामदार याची दिनेश अडावदकरांनी घेतलेली मुलाखत आत्ताच दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर पाहिली. अडावदकरांचे प्रश्न तर चांगले होतेच पण कौशलची सर्जकता अधिक कशी व्यक्त होईल याचीही त्यांनी काळजी घेतली होती. चाली तयार होण्यामागची कलाप्रक्रिया कौशलने छान उलगडून दाखवली. पुल, कुसुमाग्रज यांच्याबाबतच्या त्याच्या आठवणीही खास होत्या. मराठीतल्या एका दर्जेदार, चिंतनशील संगीतकाराची ही मुलाखत, कौशलने थोडेफार गाऊनही दाखवल्यामुळे विशेष श्रवणीय झालेली आहे.

छान वाटले !

--- ००० ---

चोरून ऐकणाऱ्या पात्रांची मालिका

सध्या एका मालिकेत असे दिसतेय की, निरपवादपणे, मुख्य पात्रापासून ते इतर सर्वच पात्रांपर्यंत सर्वांनाच चोरून ऐकायची सवय आहे ! कोणतीही दोन पात्रे बोलत असली की तिसरे एखादे पात्र येऊन कडेला उभे राहून त्यांचे संभाषण ऐकत राहते आणि मग जरा वेळाने त्या संभाषणात प्रतिक्रियारूप भाग घेते ! लहान, मोठ्या सर्वच पात्रांचे हे वागणे पाहून, इथे महाराष्ट्रात चोरून ऐकणे हा एक सर्वमान्य, सभ्य प्रकार असणार, असा समज सर्वदूर पसरू लागलेला आहे !

' आई कुठे --- ' वाले, वेगळ्या काही युक्त्या काढा ना शोधून !

--- ००० ---

**दिठी**

किशोर कदमने दु:खाचा धक्का बसलेला, विठ्ठलाबाबत भ्रमनिरास झालेला, पराभूत रामजी पूर्ण समजुतीने वठवलेला आहे. त्यासाठी त्याला १०० टक्के गुण. इतरही सर्वांचा अभिनय चित्रपटातल्या ‘ सांगण्या ‘ ला बढावा देणारा. बाकी सतत पाऊस असणे आणि जगण्याला एक मलूल, नाइलाजाची गती असणे, हेही नीट आलेले आहे. परंतु, हा चित्रपट पाहिल्यावर मनात काही प्रश्न आले, ते इथे चर्चेसाठी मांडणार आहे. जे लोक फारच भावनिक वा जराही काही वेगळे विचार सहन होत नाहीत असे टची असतील त्यांची आधीच माफी मागून ठेवतो.

चित्रपटातले मुख्य पात्र रामजी हे आहे. त्याचा मुलगा नदीच्या पाण्यात वाहून गेलेला असल्याने त्याला दु:खाचा धक्का बसलेला आहे. “ मी तीस वर्षे वारी आणि विठ्ठलाची भक्ती करतो आहे, तरीही त्याने असे का करावे ? मी एवढे केले त्याचे पुण्य कुठे गेले ? “ – हे तर त्याच्या डोक्यात आहेच पण शिवाय याच सुमारास सुनेला मुलगी झाल्याने त्याचे

वंशसातत्यही खुंटणार आहे, त्यानेही तो व्यथित आहे. नुसता व्यथित नाही तर, एवढ्या दु:खातही क्रोधाविष्ट होऊन तो सुनेला तिच्या बाळासह घर सोडून जायला सांगतो !

यातला ' माणुसकी ' चा भाग असा आहे की याही दु:खद परिस्थितीत तो एका अडलेल्या गायीची प्रसूती नीट करून तिला सोडवतो आणि सर्वांसाठी सुखनिर्मिती करतो. रामजी हा या कामात निष्णात आहे पण तो दु:खात असताना त्याला कसे बोलवावे ही विवंचना असते. पण त्याला यासाठी बोलावल्यावर तो दु:ख विसरून माणुसकीने वागतो. गायीला कालवड होते, त्याचा सर्वांना आनंद होतो. त्या एकूण प्रकारानंतर रामजीला उपरती होते आणि तो सुनेला घरातच राहायला सांगतो.

मग शेवटचे ज्ञानेश्वरांच्या ओवीचे गाणे येते. अज्ञान हे ज्ञानात विलीन होते आणि शेवटी दोन्ही नष्ट होऊन एक रिकामीक हे सत्य उरते, वगैरे. या चित्रपटाला या असल्या तत्त्वज्ञानात काही इंटरेस्ट आहे, असे दिसत नाही. संदेश हाच येतोय की देवबीव काही नाही आहे, देव कुणाचे रक्षणबिक्षण करत नाही, देवाला आपल्या सुखदु:खांचे काही देणेघेणे नाही, पण, त्याचा, रंगून जाण्याची एक पळवाट म्हणून फक्त उपयोग आहे, इतकेच. प्रत्यक्ष जगण्यात माणुसकीने वागणे, लिंगभेद न करणे, वंशसातत्याच्या वेडगळ कल्पना सोडून देणे, हेच खरे तर महत्त्वाचे आहे.

नाही तरी लोक म्हणतच असतात – खुद्द देवाचे मंदिर लुटले वा पाडले तरी देव काही करू शकला नाही, देव कोणताही अपघात टाळू शकत नाही, देवदर्शनाहून येतानासुद्धा दुर्घटना घडतात, देव दुष्काळ, कोव्हिड यांपासून रक्षण करू शकत नाही, वगैरे. जणू काही देव म्हणजे मानवी मनासारखेच एक करप्ट, विकृत अस्तित्व असून त्याने देवाणघेवाणीचे नियम-नीती पाळत चालले पाहिजे ! ' देवाला रिटायर करा ' असे म्हणणारे सांस्कृतिक नेतृत्वही इथे काही जणांनी मान्य केलेले होतेच. म्हणजे काय रिटायर करा – मूर्त्या आणि श्रद्धा ? की तुकाराम म्हणतो ते ' एकविध मन ' ?

समजा इथला धर्म, भक्ती वगैरे भंगार आहे, ज्ञानेश्वर-तुकाराम बोगस आहेत, याचाच अर्थ सर्वच धर्म खोटे आहेत, असा नाही होत ? म्हणजेच, माणुसकी आणि जमेल त्या समाजसुधारणा हीच फक्त मूल्ये आहेत ? या प्रश्नांवर ' दिठी ' च्या निमित्ताने विचार व्हावा.

--- ००० ---

16 June 2021.

चुकून, ' नाद आहे या घटाला अन घटाच्या भोवती ' असे लक्षात राहिले होते -- अत्युत्तम ओळ म्हणून लक्षात होते, पण, हे कुणाचे आहे ते आठवत नव्हते. शोधून सापडले शेवटी ! ते ग्रेट कवी आरती प्रभूच निघाले ! --

गीत – आरती प्रभु

संगीत – पं. हृदयनाथ मंगेशकर

स्वर – लता मंगेशकर

अल्बम – मैत्र जिवाचे

दुःख ना आनंदही अन् अंत ना आरंभही,

नाव आहे चाललेली कालही अन् आजही.

मी तसा प्रत्यक्ष नाही, ना विदेशी मी जसा,

मी नव्हें की बिंब माझें ! मी न माझा आरसा.

याद नाही, साद नाही, ना सखी वा सोबती,

नाद आहे या घड्याला अन् घड्याच्या भोवती.

सांध्यछाया आणि काया जोडुनी यांचा दुवा

नाव आहे चाललेली, दूरची हाले हवा.

एकला मी नाहि जैसा, नाहि नाहि मी दुणा

जीवनाला ऐल नाही, पैल, तैसा मध्य ना.

--- ००० ---

०८ जुलै २०२१.

द पिझ्झा

महेंद्र डोंगरे यांनी दिग्दर्शित केलेला ' द पिझ्झा ' हा लघुचित्रपट पाहिला. ज्येष्ठांमध्ये पसरत चाललेला एकाकीपणाचा रोग हा विषय आहे. एक ज्येष्ठ माणूस. त्याची बायको वारलेली असून त्याचा मुलगा ऑस्ट्रेलियात आहे. एका मोठ्या शहरातल्या एका आलीशान फ्लॅटमध्ये तो एकटाच राहतो आहे. सुरुवातीलाच एका मूकदृष्यातून त्याचा एकाकीपणा प्रस्थापित केला जातो. घरात खायला काही नाही आहे. तो पिझ्झा मागावतो. पिझ्झा तयार होण्याच्या प्रक्रियेपासून सर्व काही दाखवले जाते. यातून त्या ज्येष्ठाचा एकाकीपणा अधिकाधिक ताणला जात राहतो. मग तो पिझ्झा घेऊन डिलिव्हरी बॉय निघतो. खूप रस्ता आणि रहदारी पार करून तो योग्य इमारतीपर्यंत पोचतो. तिथली लिफ्ट बंद असते. त्या ज्येष्ठाने फ्लॅट नंबर चुकीचा दिलेला असतो. शिवाय त्या इमारतीत तीन शुक्ला असतात ! हे सगळे पार करून तो त्या ज्येष्ठाच्या घरी पोचतो. त्यानंतर त्या ज्येष्ठाने त्याला घरात बोलावणे, थोडा पिझ्झा खायला लावणे आणि गप्पा मारत आग्रहाने बसवून ठेवणे घडते. त्या डिलिव्हरी बॉय ची कहाणीही जरा शोकात्मच असते. शेवटी उशीर झाला म्हणून तो निघतो. तो ज्येष्ठ म्हणतो, " मी उद्या पुन्हा ऑर्डर करेन पिझ्झा ! " जाहिद नाव असलेला तो डिलिव्हरी बॉय चांगला तगडा आहे, त्यामुळे, त्याने केलेली जिन्यांची चढउतर खरी वाटते. शिवाय गप्पा मारतानाही त्याचे त्या ज्येष्ठात रमणे छान आले आहे. त्या ज्येष्ठाचा गप्पांसाठीचा अधाशीपणा चांगला आला आहे.

भारतात ज्येष्ठांपैकी निम्मे लोक या एकाकीपणाच्या समस्येने ग्रस्त आहेत. २०३० पर्यंत ही समस्या खूप उग्र होणार आहे, असे अभ्यासक म्हणताहेत.

कोणतीही भाषणबाजी वा आकडेवारीची प्रबोधनबाजी न करता निव्वळ दृश्यात्मकतेतून या समस्येचे गांभीर्य मांडण्यात हा लघुपट यशस्वी झालेला आहे. चांगले काम !

--- ००० ---

मन्ना, लता आणि शंकर-जयकिशन ! १९५९. चित्रपट ' उजाला ' ! या गाण्याने प्रचंड धमाल उडवून दिली होती त्या वेळी ! त्यात अमीन सायानींचे सनसनाटी निर्माण करणारे निवेदन ! ग्रेट ! बिनाकाचे हे सरताज गीत होते ! आता बघताना जाणवते -- गरिबांच्या या गाण्याची लोकेशन्स बघा -- इथल्या इथे प्रचंड बहार ! कशाला हवे इंग्लंड-अमिरिका ? ( झूमता मौसम मस्त महीना )

--- ००० ---

**१३ ऑगस्ट २०२१ पर्यंत**

जयंत पवार

आमच्या फार काही भेटी झाल्या असे नाही. तीनचारदा भेटी आणि दोनचारदा फोन. पण एकमेकांबद्दल आम्हाला आस्था आणि आपुलकी होती. माझ्या अनेक नाटकांची परीक्षणे त्याने मटातून लिहिली. त्याचे स्वत:चे काही विचार असले तरी कलेकडे व्यापक मानवी दृष्टिकोणातून पाहू शकणारा असा तो एक खरोखरचा स्वतंत्र समीक्षक, लेखक, कलावंत होता. त्याची एकूणच नाट्यसमीक्षणे वाचणे हे एक नाट्यप्रशिक्षणच असे. माझ्या नाटकाबाबत लिहिताना, कुणालाही न सुचलेला असा एक मुद्दा त्याने मांडला होता – तो होता अभिनयाबद्दलचा. माझ्या नाटकात अभिनय वेगळा का, कसा लागतो हे त्याने सांगितले होते. हा एक स्वत:चे चिंतन असलेला लेखक होता. त्याच्या चिंतनात असलेला एक महत्त्वाचा प्रश्न माझ्या लक्षात आहे. त्याला असे दिसत होते की वास्तव फार वेगाने बदलते आहे. त्यामुळे, लेखकाला-कलावंताला या बदलत्या वास्तवाचे आकलन होऊन ते त्याच्या कलेतून अभिव्यक्त व्हायच्या आतच वास्तव खूपच बदलून गेलेले असते. मग लेखक ‘ आजचे ‘ कसे लिहिणार ? असे गंभीर प्रश्न पडणे हेच खरे तर कोणत्याही सर्जकतेचे लक्षण आहे. त्याच्या या प्रश्नावर मी एक लेख लिहिला होता. ' ढोलताशे ' या माझ्या नाटकाच्या निमित्ताने, अरुण नाईकांच्या ' नाटक ' या त्रैमासिकासाठी त्याने माझी एक मुलाखत घेतली होती.

या प्रेमळ, शहाण्या मित्राला मन:पूर्वक आदरांजली !

--- ००० ---

कुमार गोखले

सुप्रसिद्ध छायाचित्रकार आणि जाहिरातकार कुमार गोखले यांचे निधन झाले आहे. माझ्या ' सध्या तरी शेवट गोड ' या नाटकाचे सुंदर, आकर्षक ब्रोचर त्यांनी तयार केले होते. त्या नाटकाचे पुण्यातल्या अक्टिव्ह थिएटर्स ने २५ प्रयोग केले होते.

कुमार गोखले यांच्या स्मृतीस मन:पूर्वक अभिवादन !

--- ००० ---

**२८-०९-२०२१.**

‘ धडपड ‘ निर्मित

#मी_तू ( दोन अंकी नाटक )

लेखन-दिग्दर्शन – अश्विनी शिंगरे देशपांडे.

मराठीत आलेले हे नवे अत्युत्तम नाटक संगणकावर पाहिले. आजचे जगणे शारीरिक व मानसिक सर्वच दृष्टींनी रोगट झालेले आहे, असे आपण म्हणत असतो. आपण हे जे म्हणतो ते प्रामुख्याने या जगण्याचा आपल्याला जो त्रास होतो, सतत जे संघर्षात राहावे लागते, त्यामुळे असते. पण, या रोगाची प्रक्रिया, त्याचे पूर्ण दर्शन वा समज आपल्यासमोर नसते. ती समज हे नाटक समग्रतेने उभी करते. यापूर्वी मराठीत या रोगाचे असेच दर्शन राजीव नाईक यांच्या, ‘ साठेचं काय करायचं ‘ या नाटकाने घडवले होते. मानसिक समस्येचे साकल्याने दर्शन घडणे हे त्या क्षणी तिच्यातून बाहेर पडणेच असते. कारण ती समस्या अशी पूर्णतेने पाहताना तुम्ही तिचा भाग नाही राहू शकत. स्त्री-पुरुष भेदाचा जरी काही प्रश्न नसला तरी, आपल्याकडे उत्तम स्त्री-नाटककार खूपच कमी आहेत, या पार्श्वभूमीवर या नाटकाची लेखिका म्हणजे मराठीतला एक विशेष टप्पा आहे, असेच म्हणावे लागेल. त्यातही आणखी विशेष म्हणजे ती एक अत्युत्तम दिग्दर्शिकाही आहे हे स्पष्टच दिसते आहे. या नाटकातले संवाद, त्यांचे उच्चारण आणि फेक आणि मुख्य म्हणजे प्रत्येक संवादासोबत घडत जाणाऱ्या, बोलणाऱ्या व उपस्थित असलेल्या पात्रांच्या सर्व मानसिक प्रक्रियांचा वेधही इथे दृश्य रूपात व्यक्त होत राहतो. अर्थातच सर्वच कलाकार आणि तंत्रज्ञ यांची सर्जक साथ असल्याशिवाय ते घडू शकले नसते, हे खरेच आहे.

पैसे खूप मिळवणे आणि उच्च दर्जाचे राहणीमान ठेवणे, हे तर आहेच, पण, मला प्रचंड यशस्वी व्हायचे आहे, टॉपची व्यक्ती व्हायचे आहे – ही मानसिक हाव हा आजच्या जगाचा एक असाध्य रोग आहे. आणि तसे यश साध्य करण्याची बौद्धिक कुवत असलेल्या व्यक्ती एकाच कुटुंबात असतील तर ? या प्रश्नाचे उत्तर म्हणजे हे नाटक आहे. उत्तर म्हणजे निराकरण या अर्थी नव्हे तर दर्शन या अर्थी. असे उच्च दर्जाचे बौद्धिक जगणे आणि वातावरण यांच्याशी परिचित असलेले, ते माहीत असलेले लोक मुळात कमीच असतात. त्यांतली एखादी व्यक्ती असे नाटक उभे करू शकावी ही एक फारच वेगळी आणि अपवादात्मक घटना आहे. या कुटुंबातला पुरुष एका आंतरराष्ट्रीय कंपनीत मोठ्या पदावर आहे, त्याची पत्नी एका बँकेत जनरल मॅनेजर आहे आणि मुलगी, तिच्या एका मित्राच्या साहाय्याने एक यशाच्या इमल्यांची स्वप्ने असलेला उद्योग उभा करत आहे. घरातले तिघेही असे पराकोटीचे महत्त्वाकांक्षी असल्यावर त्यांच्यांतल्या संबंधांचे आणि एकूणच जगण्याचे काय होईल ते म्हणजे हे नाटक ! या नाटकात, वर उल्लेख केलेल्या रोगाची एक तीव्र अवस्था आपल्याला दिसते. यातच लिंगभेदामुळे आपल्यावर अन्याय झाला आहे, हे पाहून जखमी झालेली या नाटकातल्या पुरुषाची एक प्रिय सहकारी स्त्री त्याच्यावर लैंगिक दुर्वर्तनाचा आरोप करते. अशा, म्हटले तर घातक अशा कौटुंबिक संकटाच्या वेळीही प्रत्येक व्यक्ती स्वविचारात राहणे हे एक अजब क्रौर्य आपल्याला इथे दिसते. गंमत म्हणजे, हे सगळे या जगण्याचा एक ' नॉर्मल ' भाग म्हणून यांनी स्वीकारलेले आहे ! फारसा ऊरबडवेपणा नाही ! एखाद्या वर्तमानपत्री रुक्षपणाने हे सगळे आपल्याला दिसत जाते !

ही अशी कलाकृती लिहून सादर होणे ही मराठीतली एक महत्त्वाची घटना ठरावी. असे नाटक जमून येऊन प्रेक्षकांसमोर यायला असंख्य बाबी जमून याव्या लागतात. ते इथे घडलेले आहे. त्यामुळे, या एकूणच टीमचे मन:पूर्वक स्वागत आणि धन्यवाद ! ही मराठीत एका ' खास ' नाटकाची भर आहे !

--- ००० ---

ओ. पी नय्यर यांचा आज जन्मदिवस. हा एक हिट गाण्यांचा सम्राट होऊन गेला ! त्यांनी संगीत दिलेले ' आरपार ' या सिनेमातले गाणे खाली देतोय. यात गुरुदत्त या महान कलाकाराचेही दर्शन होते.

पूर्वी लग्नात सिनेमातली गाणी लावायची पद्धत होती. एकाने हे गाणे लावले ! धावत जाऊन ते बंद करायला लावावे लागले ! ( अशाच कहाण्या मी ' दो हंसोंका जोडा बिछड गया रे ' आणि ' इसे मार दिया जाय या छोड दिया जाय ' या गाण्यांबाबतही ऐकल्या होत्या ! ) ----- ( बाबूजी धीरे चलना – आरपार ).

धन्यवाद, सांगलीकर आणि नाटकाची सर्व टीम !

Anmol Kothadiya is with Tanvi Naik and 3 others

.

2JtSm6an0uairy 170fc a0t s88:14 8A1M •

ढोलताशे

झुंडशाहीचा उन्माद विरुद्ध व्यक्तीचा विवेक यातील विचारसंघर्ष रंगमंचावर खिळवून ठेवणाऱ्या "ढोलताशे" या नाटकाचा प्रयोग जितका रंजक तितकाच विचारप्रवर्तक झाला. यात सांप्रदायिक उन्मादापासून, धर्माच्या खऱ्या व्यक्तिगत अध्यात्मिक अर्थाकडे नेण्याचा विवेकी प्रयत्न आहे. आजच्या सत्तालोलुप धर्मकारणावर आणि राजकारणावरही भाष्य आहे. उथळ मनोरंजन असो वा तथाकथित धार्मिक परंपरेच्या नावाखाली चालणाऱ्या बाबी, सुख बाहेरून ओरबडून घेण्याच्या लागलेल्या मानसिकतेवरही भाष्य आहे. नायकाच्या तोंडी येणारे काही संवाद जणू काही या नाटकाची आशयसूत्रेच आहेत- उदा. 'खरं शोधणारा घातक नसतो, खोटं टिकवणारा घातक असतो!'

अर्थात या नाटकात रंगमंचावर जशी विवेकी व्यक्तिरेखा एकटीच पडते, तशीच समाजातही विवेकी हे अल्पसंख्यांकच उरतात, याचे शल्य टोचत राहणे, हे या आजही कालोचित असणाऱ्या नाटकात अभिप्रेत आहे. या प्रयोगातील क्लायमॅक्स प्रसंग तोच मात्र दृश्यतपशीलातील ट्रीटमेंटच्या दृष्टीने काहीसा फोकस शिफ्ट वाटला. बाकी किरकोळ तपशिलात न जाता, हे नाटक पेलण्याचा चांगला प्रयत्न येथे अनुभवता आला. काही कलाकार किरकोळ आजारी असूनही, प्रयोगात अपेक्षित ऊर्जा राखण्याचा त्यांचा प्रयत्नही कौतुकास्पद होता. सर्व टीमचे अभिनंदन

.

.

राज्य हौशी नाट्य स्पर्धा १५ जानेवारी या निर्धारित तारखेस सुरु होईल की नाही, अशी शंका होतीच. तेव्हा स्पर्धेअगोदच्या दिवशी रंगीत तालीम म्हणून प्रयोगच ठेवण्याची या मंडळींची युक्ती चांगलीच होती. स्पर्धा झाल्यास एक रिहर्सल आणि न झाल्यास किमान केलेल्या प्रॅक्टिसचे, घेतलेल्या कष्टांचे काहीतरी मूर्त फळ तरी! स्पर्धा पुढे गेली म्हणून नाउमेद न होता, किमान तात्पुरती दुधाची तहान ताकावर तरी सांगली येथील "ढोल ताशे" च्या टीमला भागवता आली. प्रेक्षकांचा प्रतिसादही चांगला मिळाला. याचे आणखीन प्रयोग होत राहावेत...

.

१४ जानेवारी २०२२ / विष्णुदास भावे नाट्य मंदिर, सांगली

.

"ढोलताशे"

लेखक- चं.प्र. देशपांडे

दिग्दर्शक- डॉ. दयानंद नाईक

निर्मिती संस्था- अखिल महाराष्ट्र नाट्य विद्या मंदिर समिती, सांगली,

निर्माता- डॉ. शरद कराळे

कार्यकारी निर्माता- आर्कि. विवेक देशपांडे

नेपथ्य- आर्कि. नंदिनी देशपांडे

नेपथ्य निर्माण- मुकुंद पटवर्धन

पार्श्वसंगीत- डॉ. तन्वी नाईक

प्रकाशयोजना- शशांक लिमये

रंगभूषा- प्रसाद गद्रे

वेषभूषा- धनश्री कुलकर्णी

रंगमंच व्यवस्था- सायली दौंडे, वृषाली देशपांडे

रंगमंच सहाय्यक- गोमटेश अंकलखोपे, देवांतक पाटील

व्यवस्थापन- प्रकाश पाटील

व्यवस्थापन सहाय्य- हेमंत सुतार, दिगंबर कोईकडे

विशेष आभार- दातार साऊंड, राजू सुपेकर, रविकांत बरगाले, हरमन चहा

पात्र परिचय

अवंती- कविता गडकरी

अक्षय- यशोधन गडकरी

काकू- सुप्रिया उकिडवे

अश्विनी- कल्याणी खाडिलकर

समीर- प्रसाद बर्वे

बळवंतराव- सचिन कुलकर्णी

काकासाहेब जोशी- मुकुंद पटवर्धन

फोटोग्राफर- सायली दौंडे

घारपुरे- आर्कि. विवेक देशपांडे

पारसनीस- भालचंद्र चितळे

सौ पारसनीस- धनश्री कुलकर्णी

अतिथी कलाकार- मृणाल बर्वे, मृणाल कुलकर्णी, वृषाली देशपांडे, कांची गडकरी, सागर देशपांडे, अबीर देशपांडे

Abhimanyu Bhupathi

Janu0matrcgSy 17 oat 1i9:n50so0 t7P9dMucc •

Please do come and watch! 🎭

This Wednesday at 7:30 pm at Rangashankara.

Panchamukhi Natara Samuha D.S. Chougale Champra Deshpande Madhusudhan Maddy Shivanna Prema Mahesh Kalavati Kamadolli Prabhakara Rao Anu Latha Sachin Ranganath ಮಂಜು ನಾರಾಯಣ್ Pavan Subramanya Ravi Shankar S Mahantesh Doddamani

**माझ्या ' बुद्धिबळ आणि झब्बू ' चा कानडी अवतार ---**

Abhimanyu Bhupathi is with Prabhakara Rao and 11 others

·

tSpFoebnru31thuaryf h3 ag0t 1e07d:143 2A6Mu •

"Chess and Donkey" in the play Bangalore

Tomorrow evening at 6 pm

In the village of art

Come on, be encouraged.

Today evening at 6 pm

🍁

Panchamukhi actors group (R) acting

#Chess_and_Donkey drama

🍁

Champra Deshpande / D. S. Chougale / Abhimanyu Bhupathi

🍁

Kalagrama Mallatthalli, near Bangalore VV,

Bangalore...

🍀Watch it without fail🍀

०४-०२-२२.

भारतरत्न लता मंगेशकर

आपल्या या महान गायिका आपल्यांतून आज गेल्या आहेत !

कोट्यवधी लोकांच्या आयुषयांतले तासंतास व्यापून माणसांचे जगणे घडवणारी ही व्यक्ती होती. संगीताचा आणि कल्पनाशक्तीचा खूप संबंध असतो असे मानसशास्त्रीय सत्य वाचनात आले होते. एकूणच भारताची कल्पकता म्हणजे लताजी होत्या ! मला संगीताची भाषा नाही माहीत पण कोणत्याही चालीत आणि त्या चालीच्या आजूबाजूला असणाऱ्या सर्व बारीकसारीक जागाही घेत-भरत जाणारा हा एक अजब आवाज होता. हे नुसत्या निसर्गदत्त आवाजाने नाही घडत. त्यामागे असते एक अत्यंत तरल आणि संवेदनशील मन. ते एक निर्भय मन असते. अमुक हे घडेल का याची भीती वा हे असे व्हावे याची चिंताच नसलेला आवाज. हे नुसतेच व्यक्तिमाहात्म्य नसते. ‘ परि त्या विश्वंभरे बोलविले ‘ असे म्हणताना तुकाराम जे म्हणतात तीच असते ही प्रक्रिया. अमुक अभ्यासक्रम, तमुक प्रमाणपत्रे वगैरेंच्या कक्षा ओलांडणारे हे काही असते. विशेषत: भारतीयांच्या मानसिक जडणघडणीत प्रचंड सहभाग असलेली ही एक अद्वितीय कलावंत व्यक्ती होती. निरनिराळ्या विचारसरणी, पक्ष, धर्म, जाती यांचा स्थितिशील प्रभाव गाजवणाऱ्या अशा या काळात, जेव्हा उद्वेगाने ‘ माझ्या मना बन दगड ‘ असे म्हणायची वेळ येते आहे, अशा वेळी लताजींची तरलता विशेष महत्त्वाची ठरते. कोणतीही कला ही माणसाला स्थितिशील क्रौर्यापासून वाचवत असते. ते कार्य लताजींच्या गाण्यांनी किती केलेले आहे याचे मोजमाप करता येणे शक्यच नाही.

असंख्य चाहत्यांच्या जगण्याला समृद्धी, अर्थपूर्णता आणि शहाणपण देणाऱ्या लताजींना अंत:करणपूर्वक अभिवादन ! असे कलावंत देशात, समाजात असणे हा नुसता टाईमपास कधीच नसतो. ती तर जगणे शिकण्याची प्रक्रिया असते. पुन्हा एकदा त्यांच्या प्रती कृतज्ञता आणि अभिवादन !

--- ००० ---

०६-०२-२२.

Niranjan Kulkarni

3Ftel3brSu0oarcy 22 at u2ah11:tc553 PMd ·

आज एक सुरेख नाटक पाहायचा योग आला-ढोल ताशे!

कालपासून राज्य नाट्य स्पर्धा सुरू झालीय. हे पहिलेच नाटक. सांगली-मिरजेच्या हौशी रंगकर्मींनी सादर केलं. प्रचंड गर्दीत. आणि नूतनीकरण झालेल्या मिरजेच्या 'बालगंधर्व रंगमंदिर'मध्ये. त्यामुळे उत्सुकता वेगळीच होती…

पुण्यामधील भर वस्तीतील, वरच्या मजल्यावरील घर. तिथं राहणारं अक्षय-अवंतीचं कुटुंब. रात्र आहे अनंत चतुर्दशीची. आणि अक्षयनं ठरवलय की आज मिरवणूक पहायची नाही. गॅलरीचे दरवाजे बंद. आणि मग दीर्घाङ्क सुरू

होतो त्याला विरोध करण्याचा आणि त्याने पटवून देण्याचा. मग प्रतिपक्षांत एकेक जणांची भर पडत जाते. अक्षयचा युक्तिवाद प्रखर होत जातो. देव म्हणजे काय? धर्माचा खरा अर्थ काय? अशा तात्विक चर्चेबरोबरच अस्तित्व, ओळख, विवेक, जगण्याचा हक्क अशा मूलभूत मूल्यांपर्यंत या चर्चेची घुसळण होत राहते.

नाटकातील प्रत्येक पात्राने अगदी जिवंत अनुभव दिला. अर्थात अक्षय, अवंती याबरोबरच काकू, बळवंतराव, समीर यांच्याही भूमिका ठळक लक्षात राहतात; आपल्यातीलच वाटतात. यशोधन गडकरी यांनी जो अक्षय आपल्यासमोर मांडलाय तो ही विलक्षण संयतपणे आणि तितक्याच मजबुतीने!

'चर्चा' ही संहिता असणारे नाटक आपल्याला फारसे पेलवत नाही हे मात्र खरं. कारण तशी सवय व्हावी लागते. मजबूत नाटकाला प्रेक्षक ही तितकाच मजबूत असावा लागतो. हे थोडंसं भौतिक शास्त्राच्या नियमांसारखं आहे.

दुसऱ्या अंकात नाटकाचं ताण थोडासा सैलावल्यासारखा वाटतो. कदाचित हे हेतूपुरस्सरही असण्याची शक्यता आहे. मात्र शेवट अगदी प्रभावी आहे. भीषण आहे. आणि अगदीच मानसिक स्तरावर पाहिलं तर तो हिंसक ही आहे!

मी सुन्न झालो!

... बाकी नाटक संपल्यावर टाळ्यांचा गजर झालाच. आश्चर्य म्हणजे 'गणपती बाप्पा मोरया' अशा घोषणाही काहीनी दिल्या. 'ढोल ताशे' सारख्या नाटकांची कशी गरज असते ते यातून कळून चुकलं!

आणखी एक अभिप्राय -- धन्यवाद पोळजी --

ढोल ताशे  या चं प्र देशपांडे लिखित आणि  डॉ  दयानंद नाईक दिग्दर्शत नाटकाने मिरज येथिल राज्य नाट्य स्पर्धेला सुरुवात .

अवघड विषय अतिशय सहज सोप्या पद्धतीने मांडण्यासाठी टिम ढोल ताशे नी आपले कौशल्य  पणाला लावले  .

पुण्यातील  गणपतीची मिरवणूक पाहायची उत्सुकता  आणि न पाहू देणारा एक तटस्थ विचार धर्माचे अंतरंग  ,धर्म आतून समजून घेतला पाहिजे,या साठी मिरवणूकच पाहयची नाही यासाठी आपल्या घराच्या बाल्कनीचे दार बंद करुन खरतर चंगळवादावर  बहिष्कार  टाकणारा बंड  करणारा विचार .

बाल्कनीचे बंद दार  प्रतीकात्मक होते परंपरेबरो बरोबर आलेल्या चंगळवादाने

धर्माच्या नावावर  कुठेतरी समाजाची दिशा भरकट आहे. देवाची मूर्ती लहान मोठी थोर  तिचे स्थान  यावर संतांचे दाखले देऊन आपले मत पटवून देण्यासाठी  केलेला अटटाहास समाजाच्या परंपरेच्या  विरोधात कुठे तरी जातोय हे तळमलून सांगणारा विचारआणि जे काय चाललय ते किती सुंदर आहे हे पटवून देणारी विचार धारा यातील शीतयुद्ध म्हणजे ढोल ताशे  .

खर बोलणा-या माणसापेक्षा परंपरान सोबत आलेल्या चांगळवादाला   खतपाणी घालणारा  घातक आसतो हे सांगण्याचा  व प्रेक्षकांना विचार करायला करायला भाग पाडणारे नाटक

शेवटी दार बाल्कनीचे दार उघडले हे कुठेतरी मनाला चटका लाऊन जाणारे होते हे नाटकाचे यश .

तांत्रिक सुंदर एकंदरीत नाटक घरी जाताना प्रेक्षकाना विचार घेऊन जायला भाग पाडणारे होते.

ले. राजेश शंकर पोळ

मिरज .दि-२३ फेब्रुवारी २०२२

धन्यवाद !

चं. प्र. देशपांडे लिखित अभिजित झुंझारराव दिग्दर्शित कबीर आर्ह्स कणकवली निर्मित "ए आपण चहा घ्यायचा का?" या नाट्यप्रयोगाचा शुभारंभ झाला. आपल्या माणसांची निर्मिती म्हटली कि छाती २" फुगतेच. खूप छान झाला प्रयोग! सर्वांनीच आपली भूमिका ताकदीने साकारली. दिग्दर्शनही छान!

एकंदरीत आपले स्वभाव, वृत्ती बदलली नाही तर विनाश अटळ आहे...हे अधोरेखित करणारा हा हलका फुलका प्रयोग आम्हाला जगाचा समतोल साधण्यात मदत करेल का?...एकत्र नांदण्यासाठी आम्हाला हे जुळवून घेणं शक्य होईल का? असे प्रश्न उपस्थित करून गेला.

सर्वांनी अवश्य पहा हा प्रयोग! शक्य असल्यास प्रयोग arrange करा.

--मनोज मेस्त्री, कणकवली.

contact Nilesh Pawar, 86003 72606

हा चहा एकत्र बसून घेतला तर सर्वांना आपापल्या प्रश्नांची उत्तरे सापडतील हे नक्की. प्रयोग सुंदर झाला. प्रामाणिक प्रयत्न केला तर किती दर्जेदार नाटक करता येतं हे सहज कळून आलं.

- राजेंद्र चव्हाण, कणाकवली.

प्रयोग खूपच आवडला. बऱ्याच गॅपनंतर मनमुराद हसविणारा बांधेसूद प्रयोग पाहिला. अभिजित यांचे खास अभिनंदन. संचातील सर्व stage, backstage कलावंताचे अगदी मनापासून अभिनंदन.

खूप खूप शुभेच्छा.

- डॉ.अनिल फराकटे,

कणकवली कॉलेज

Abhijeet

आजचा प्रयोग वाजला दिग्दर्शकाने जीव ओतलाय नाटकात.

- विलास खानोलकर, कणकवली

Abhijeet

Abhijeet Zunjarrao

नाटक आवडलं. प्रयोग उत्तम. सगळ्या कलाकारांची कामं छान झाली. सहजपणा होता. पहिला प्रयोग असूनही सफाईदारपणा होता. नाटककाराचं म्हणणं दिग्दर्शकाने नेमकेपणानं पोचवलं, हे मोठं यश. सर्वांचं अभिनंदन.

- प्रवीण बांदेकर

( ए, आपण चहा घ्यायचा ? – या नाटकाचा कणकावलीतला प्रयोग ).

09-03-22.

झुंड

“ अरे, तुम्हाला ओळखपत्र पाहिजे पण त्यासाठी कुणी ओळखायला तर हवे ना तुम्हाला ! “ हा या चित्रपटातला पोलिस पाटलाचा संवाद म्हणजे मास्टर-स्ट्रोक आहे ! चित्रपटातली मोनिका म्हणजे आपली आर्ची म्हणजेच रिंकू राजगुरू हिला परदेशात जायचे तर पासपोर्ट लागणार – त्या धडपडीतला हा संवाद आहे. अगदी साधेच काम पण रिंकूने सहज आणि अत्युत्तम केलेले आहे. अमिताभ तर आहेतच ! पण, अतिमहत्त्वाचे म्हणजे, अनुराग कश्यप म्हणाल्याप्रमाणे, इतके नॉन-अक्टर्स इतके उत्तम कलाकार म्हणून समोर येण्याची ही पहिलीच वेळ असावी ! प्रबोधनाचा आव न आणता, अस्पृश्यतेच्या प्रश्नामुळे वंचित राहिलेल्या समाजाच्या या समस्येच्या निमित्ताने नागराज मंजुळे यांनी एकूणच जिजीविषा देणारा चित्रपट सादर केलेला आहे. यातला संदेश एका जातीपुरता मर्यादित न राहता, कोणत्याही प्रकारे नाकारल्या गेलेल्या सर्वांनाच पोचू शकतो. आदरणीय मंजुळेजींनी कथा-पटकथा-संवाद-दिग्दर्शन या सर्वच जबाबदाऱ्या नुसत्या लीलयाच नव्हे तर अर्थपूर्णतेने पार पाडलेल्या आहेत. भूतकाळावर दगड मारण्याची पायरी ओलांडून हा चित्रपट भविषयाकडे विमान उडवणारा झालेला आहे ! फारच छान !

गुंतागुंतीच्या घटनांचे कथानक, प्रेम, गाणी, गुन्हेगारी, हिंसा हे फारसे काहीच नसताना हा चित्रपट इतका इंटरेस्टिंग करणे हे मुळीच सोपे काम नव्हते. आणि तरीही हा चित्रपट गतिमान आणि चैतन्यपूर्ण झालेला आहे. ही अर्थात सर्वांचे अभिनय, दिग्दर्शन, फोटोग्राफी आणि इतर सर्वच तंत्रांची कमाल आहे. नागराज मंजुळे हे फक्त मराठीतलेच नव्हे तर भारतातले एक महत्त्वाचे चित्रकर्मी आहेत हे या चित्रपटाने मान्य व्हावे !

खरे तर मध्यांतरापर्यंत चित्रपटाचा आशय पूर्णच झाला असे वाटत असते. आता काय आणखी – हा प्रश्न मनात घेऊनच आपण पुढील चित्रपट पाहतो. आणि होय, गुणवत्ता असूनही किती अडीअडचणी येतात मार्गात याचे दर्शन घडते.

किशोर आणि आकाश आणि इतर सर्वच या चित्रपटातले ज्या त्या वेळी जे ते स्पर्श देऊन जाणारे कलाकार लक्षात राहणारेच आहेत. आणि कळस म्हणजे अमिताभ बच्चन ! प्रत्येक दृश्य खरे करून टाकण्याची या माणसाची प्रतिभा अगाध आहे ! कोर्टातला त्यांचा जरा दीर्घ असलेला संवाद खूपच प्रभावी झालेला आहे. प्रचंड ग्लॅमर असलेला अभिनेता ते सगळे टाकून देऊन कसा अभिनयातला एक वेगळा मार्ग चोखाळू शकतो हे पाहण्यासारखे आहे. मानवी जगण्यातला टाळता न येणारा किंचित रोमांसही या चित्रपटात आहे पण अर्थातच बागा आणि धबधबे या लोकेशनमधली गाणी नाहीत. चित्रपटाची लय न बिघडवता करमणुकीसाठी आवश्यक ते सर्व इथे आहे.

सुंदर चित्रपट !

--- ००० ---

14-03-22.

कश्मिर फाइल्स

बघितला. सकाळी सव्वानऊच्या शोला गेलो होतो. तरीही भरपूर गर्दी होती.

“ पाच लाख नाही, फक्त दोन लाख विस्थापित झाले – “

“ त्यांनीच स्वत:च्या माणसांना मारले आणि आमच्यावर आळ घेतला – “

“ एवढे दिवस माहीतच नव्हते हे – लपवले गेले – “

“ भयानक आहेत या जखमा – “

--- अशा प्रकारची विविध वाक्ये कानावर येतात. मुळात हे सगळे घडले तरी का, इथपासून चर्चा करणारे लोक आहेत. निरनिराळे विद्वान ही संधी घेणारच. त्याचे धागेदोरे काढ, इतर काही फाटे दाखव, त्यांनी यांच्यावर नव्हे, यांनीच त्यांच्यावर अत्याचार केले होते, असे म्हण, हे असे कानावर येत राहते. दिग्दर्शक विवेक अग्निहोत्री आणि पल्लवी जोशी म्हणतात की त्यांनी चार वर्षे याचा अभ्यास केलेला आहे आणि प्रत्यक्ष त्या अत्याचारातून, दु:खातून गेलेल्या अनेकांच्या मुलाखती घेतलेल्या आहेत. सत्य जाणून घेण्याची विशेषत: तरुण पिढीला खूप आच आहे आणि देशविदेशांत हा चित्रपट पाहायला लोक खूप गर्दी करत आहेत.

‘ राशोमान ‘ हा अकिरा कुरुसोवाचा चित्रपट १९५० साली आला. सत्य हा प्रकार कसा फसवा आहे आणि प्रत्येकाकडे एकाच घटनेबाबत कशी ‘ वेगवेगळी सत्ये ‘ असतात, हे दाखवणारा तो चित्रपट होता. सत्याबाबतचा हा समान न्याय, खरोखरच अत्याचार भोगलेल्यांनाही लावावा का, ते नुसतेच अकादेमिक हुशारीचे होणार नाही का, असा प्रश्न इथे येऊ शकतो. आता तर सत्योत्तर कालखंड चालू आहे, असे जगभर बोलले जाते. खरे तर तसा कालखंड माणसाचे डोके चालायला लागले तेव्हापासूनच सुरू झाला, असे म्हणता येईल. तर काय ? विद्वानच जर वेगवेगळे बोलत असतील तर

सामान्य प्रेक्षकाने काय करावे ? तो काही वर्षानुवर्षे पुरावे तपासत अभ्यास करत बसणे शक्य नाही. सामान्य माणूस त्याचे उपजत शहाणपण वापरतो. या घटना जर जनतेपासून लपवल्या गेल्या असतील तर त्याची काय असावीत कारणे याबाबत स्वत:च्या विचारातून काही उत्तरे तयार करून तो ती स्वीकारत जातो. आणि एकूणच या पूर्ण प्रकाराबद्दल तो स्वत:चे मत बनवतो. हा चित्रपट अथपासून इतिपर्यंत विषयाचे गांभीर्य राखून काढलेला आहे. एकूण हा चित्रपट पाहून क्षुब्धता येते, असे दिसते. कुणीही काहीही म्हणत असले तरीही प्रेक्षक या चित्रपटाच्या सत्यावर विश्वास ठेवतात, असे दिसून येते. त्यामुळे, घडलेल्या अत्याचारांबद्दल क्रोध आणि आपले दुर्लक्ष झाल्याबद्दल अपराधी भाव आशा मन:स्थितीत प्रेक्षक जातो. चित्रपट संपला तरीही एक शब्दही कुणी कुणाशी काही बोलत नाही.

कुणी म्हणते कशाला ते जुने मुडदे उकरून काढता, कुणी म्हणते, त्या पीडितांना न्याय मिळायला हवा. या वादात आणखीही काही घटनांचे उल्लेख केले जातात, ते जाऊ द्या. ही एक कलाकृती आहे. प्रश्न असा येतो की आज ही कलाकृती काय काम करते ? त्या पीडितांना न्याय मिळावा, त्यांना पुन्हा सन्मानाने आपल्या भूमीवर जाता यावे, अशी एक सकारात्मक भावना तयार करते. शिवाय मनात एक प्रश्न निर्माण करते – आता यापुढे पुन्हा असे कुठे काही घडता कामा नये यासाठी काय करायला हवे ? इथे सध्याचे एक चालू उदाहरण उपयोगी पडू शकते. रशियाने सरळ धमकीच दिली की यात कुणीही युक्रेनच्या बाजूने युद्धात उतराल तर महायुद्धच होईल – अणुयुद्धच होईल आणि जगाचा खूप विनाश होईल ! कुणी हरीचा लाल, तितकीच शक्ती असूनही धजला नाही. ( याला हजार कारणांची विद्वत्ता असेल, मी सामान्य माणसाचे बोलतोय. आणि या दोन्हींत फारसा गुणात्मक फरक नसतो, सगळे अर्धवटच असते, हे इथे लक्षात घ्यायला हवे. ) याचा अर्थ, एकमेकांत शांतता हवी असेल तर एकमेकांची एकमेकांना भीती वाटायला हवी ! शांतता ही फक्त भीतीवर आधारित अशीच असू शकते ! मानवी बुद्धी कसली, त्याच्या अक्कलेची ही मर्यादा आहे ! त्या मार्गाने तयार होत राहणे, हाच उपाय ! आर्थिक दृष्ट्या आणि शस्त्रास्त्रांनी सुसज्ज असणे हीच चांगली जिंदगी ! आणि एकदा तुम्ही संरक्षणव्यवस्था आणि शस्त्रसंचय केलात की आज ना उद्या त्यांचा वापर होणारच ! त्यालाही तयार राहण्याचे शौर्य हवेच !

भंगार मानवी बुद्धीला होऊ शकणारे आजच्या जगातले हे अत्युच्च आकलन आहे. दरम्यानच्या काळात मानवी बुद्धीचे गोडवे गात राहावे आणि विवेक म्हणजे काय ते एकमेकांना शिकवत राहावे. पुरोगामी म्हणजे काय, प्रतिगामी म्हणजे काय यावर चर्चा घेत राहाव्यात. आणि मुख्य म्हणजे दर वर्षी न चुकता बंधुता संमेलन आणि शांतता परिषद घेत राहावे ! आपण योग्य मार्गावर चालत आहोत असे वाटायला त्याची गरज आहे !

--- ००० ---

17-03-22.

**गिरीश साळवी**

' बुद्धिबळ आणि झब्बू ' तसेच ' डावेदार ' या माझ्या दोन नाटकांना तर गिरीशने ( गिरीश साळवी ) समृद्ध केलेच पण ' चौऱ्याहत्तर पावसाळ्यांचा जमाखर्च ' या तेंडुलकरांच्या कथेवर आधारित एकपात्री प्रयोगातला गिरीशचा अभिनय आणि संवादफेक ग्रेट होती ! गिरीश पतकेच्या दिग्दर्शनाचे सोने करणारा हा अभिनेता होता !

( गिरीश पतके ची पोस्ट ).

२६-०५-२२.

अडलंय का ... ?

नाटक कंपनीचे बहुचर्चित नाटक.

पहिली गोष्ट म्हणजे प्रयोग उत्तम ! अतुलसारख्या बाप कलाकाराबरोबर न डगमगता तोडीस तोड उभी राहणारी त्याची कन्या पर्ण ! मराठी रंगभूमीवर घडणारी ही एक अत्यंत अपवादात्मक आणि बहर वाटावी अशी घटना आहे. त्यामुळे, अभिनय हा विभाग परिपूर्णच आहे. या नाटकात म्हटले तर पात्रे दोनच आहेत पण म्हटले तर प्रॉपर्टीतली प्रत्येक वस्तू, प्रकाशयोजना, नेपथ्यरचना ही सगळीही ‘ बोलणारी ‘ पात्रेच आहेत. या पात्रांसह हे नाटक बिनचूकपणे पार पाडणे ही नक्कीच एक विशेष करामत आहे. सलग १०० मिनिटे प्रेक्षकांना ‘ वैचारिक धरून ठेवणे ‘ हे तसे अवघड काम इथे जमून जाते. यात अर्थातच दिग्दर्शक निपुण धर्माधिकारी आणि सर्व तंत्रज्ञ यांचेही महत्त्वाचे योगदान आहे. सारांश, उत्तम प्रयोगाबद्दल अभिनंदन !

आता नाटकाबद्दल म्हणजे संहितेबद्दल. मूळ नाटक मी वाचलेले नाही – मला माहीत नाही. भाषांतर करताना भाषांतरकार शौनक चांदोरकर आणि सहकारी यांनी काही काटछाट वा बदल केले आहेत का तेही मला माहीत नाही. पण, सध्या समोर जे नाटक आहे ते नाट्यमय प्रसंग थोडेफार उभे करण्यापेक्षा आणखी काही करते असे मला वाटत नाही. स्पष्टच बोलायचे तर हे एक मेलेले गाढव असून कितीही धोपटले तरी ते जिवंत होऊन काही हालचाल करण्याची शक्यता दिसत नाही. प्रश्न हा आहे की आजच्या या प्रगत, डिजिटल जगात नाटकाला ( वा एकूणच कलेला ) स्थान काय असू शकेल – असू शकेल का मुळात. सर्व गोष्टी उत्पादन, उपयुक्तता आणि आर्थिक व्यवहार यांवरच केंद्रित झाल्यावर थिएटर्स हवीत कशाला, या प्रश्नाचे उत्तर काय असू शकेल ? नाटक बंद पडले तर नाट्यकर्मी मरतील आणि कलेला महत्त्व देऊन वागल्यास यातल्या स्त्री पात्राची नोकरी जाईल आणि तिचे आणखीही बरेच नुकसान होईल. तर मार्ग काय ? हा प्रश्न नुसता इथे मांडला जातो – याच्या आकलनात शिरण्याचा कवडीचा प्रयत्न होत नाही. उदाहरणार्थ, थिएटरच्या खर्चात २० टक्के कपात राजकारण्यांना आवडेल पण थिएटर्स बंदच करण्याच्या प्रस्तावाला ते नकार देतील. उलट, पर्यावरण, आपला इतिहास, परंपरा, संस्कृती यांना उजाळा देणारी नाटके लिहा, असे ते म्हणतील. कारण राजकारण्यांना कलेशी काही देणेघेणेच

नसते, पण त्यांना कला-संस्कृतीवाल्यांची मते हवी असतात. इथे खरे तर एका महत्त्वाच्या प्रश्नात खोलात शिरायची जागा होती. राजकारण्यांचे एक ठीक, पण, कला हे राजकारणच असते, प्रत्येक कलाकाराने राजकीय भूमिका घ्यायलाच हवी, असे म्हणणाऱ्यांचे काय ? त्यांना असते का कलेशी काही देणे-घेणे ? एका एका संकुचित उद्दिष्टासाठी कलेचा वापर करू पाहणारे सगळेच कलेचे हत्यारे नसतात का ? आपल्या पर्यावरणात हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. आणि मग प्रश्न येतो, अशी संकुचित उद्दिष्टे नसलेल्या ' निरुपयोगी ' कलेचे काय स्थान असते माणसाच्या जगण्यात ? आपापले धर्म, आपापल्या विचारसरण्या वगैरेंत सतत भंगत जाणारे, विदीर्ण होत राहणारे समूह आणि त्यातून येणारी हिंसा या बाबतीत काय असू शकते कलेची कृती ? – अशा अंगाने कणभरही न जाता हे नाटक ' सहावा पाय शोधणे ' हे एक खोटे, स्वप्नील गौरवमूल्य सादर करत राहते. विषय मोठा घ्यायचा पण त्याच्या आव्हानाला अजिबातच सामोरे जायचे नाही, असा हा प्रकार आहे.

सारांश, मला प्रयोग आवडला पण नाटक मुळीच आवडले नाही.

--- ००० ---

आर्ट एक्स्पो पुणे

काल हे चित्र-शिल्प प्रदर्शन पाहिले. माझ्या धाकट्या नातीला चित्रकलेची आवड असल्याने तीही बरोबर आलेली होती. तिथे आत प्रवेश करताच समोर पेन्सिलने केलेली प्रचंड आणि अगाध म्हणावीत अशी नाक्षिचित्रे होती. चकित व्हावे अशी ! मी चित्रकारांची नावे नोंदवून घेतली नाहीत पण त्यांचे काम पाहून झालेला आनंद तोडीस तोड व्यक्त केला. यानंतर मात्र, मधले स्टॉल्स सोडून सरळ १८ नंबरला गेलो. हा स्टॉल होता माझे कोल्हापूरचे मित्र अनिल सडोलीकर यांचा मुलगा निस्सीम याचा. तो आर्किटेक्ट असून चित्रकारही आहे. अनिल स्वत:ही चित्रकार आहे. ( ' कोरी कविता ' नामक माझा एक कवितासंग्रह पूर्वी निघाला होता, त्याचे मुखपृष्ठ अनिलचे होते. ) अनिलच्या पत्नी म्हणजे सुनीता याही बाटीक चित्रकलेत प्रवीण आहेत. त्यांचीही काही चित्रे तिथे होती. निस्सीमसुद्धा  ती कला त्यांच्याकडून शिकतो आहे. तिथल्या एका बाटिक चित्रात, त्यातल्या काही भागांच्या कडेकडेने पांढऱ्या जाड दोऱ्याची एक टीप घालण्यात आलेली आहे – ती ते चित्र छानच उठावदार करणारी आहे. त्यांच्याच या स्टॉलवर त्यांचे मित्र पिता-पुत्र शरच्चंद्र आणि ऋषिकेष मोघे यांचीही चित्रे आहेत. वास्तववादर्शी आणि अमूर्त अशा अनेक प्रकारच्या चित्रांचे संमेलन इथे पाहिले. दिल खुश हुवा ! अनिलच्या सूनबाई या उत्कृष्ट शास्त्रीय गायिका आहेत. पुण्यात मी तिचे गाणे ऐकले होते. हे पूर्ण कुटुंबच या ना त्या कलेशी संबंधित आहे ! अपवादात्मक म्हणावे असेच हे आहे ! या सर्वांवर कळस म्हणजे निस्सीमचा छोटा मुलगा ! त्याला मी त्याचे नाव विचारले तर म्हणाला – हमीर – हमीर म्हणजे राग – आपल्याला येतो तो नव्हे, गाण्यातला राग ! मग मी विचारले, कितवीत आहेस – यावर सदर चिरंजीव म्हणाले की थांबा जरा, मला एक फोन आलाय, तो घेऊन येतो ! – असे म्हणून तो

सरळ समोरच्या स्टॉलकडे निघून गेला ! अनिलशी खूप गप्पा झाल्या. त्यात माझ्या विशेष लक्षात राहिले ते हे की प्रख्यात अक्षरकवी र. कृ. जोशी जेव्हा कोल्हापुरात आले होते तेव्हा ते खूपच आस्थेने आमचा कविमित्र अनिल द्रविड याचा शोध घेत होते आणि या अनिलने त्यांची भेट घडवून आणली होती !

ते प्रदर्शन खूप मोठे होते. अनेक स्टॉल्स होते. नव्याजुन्यांचा संगम होता. एका स्टॉलवर दोन सुमारे पन्नाशीतल्या चित्रकार मित्रांची चित्रे होती. एक वास्तवदर्शी चित्रकलेतला मास्टर होता तर दूसरा अमूर्त शैलीतला. अत्युत्तम होती चित्रे. अक्षरक्षः चकित व्हावे अशी. माझ्या चेहऱ्यावर ते आलेच असणार. त्यांनी अभिप्राय देण्याची विनंती केली. चित्रांबद्दल काय वाटले ते लिहून शेवटी मी लिहिले की या चित्रांनी जो आनंद दिला त्याबद्दल मनापासून आभारी आहे ! तो त्यांना वाचूनही दाखवला. ते तर खुश झालेच पण आमच्या शेजारी एक कॉलेज कन्यका उभी होती – तीही माझ्या या अभिप्रायाने आनंदली !

पुढेही खूप तरुण व मध्यवयीन असे अनेक चित्रकार भेटले. एका ठिकाणची दोन अमूर्त चित्रे मला खूप आवडली. मी त्या चित्रकाराला म्हणालो – ही चित्रे हे सांगताहेत की stop thinking and see ! मी कुणी मोठा समीक्षक वगैरे असणार असे वाटून त्याने आनंदाने हस्तांदोलन केले ! माझी नात, काही तिला आवडलेल्या चित्रांचे फोटो काढून घेत होती. एका ठिकाणी, तिच्या चित्रांइतकीच सुंदर एक चित्रकार होती. चित्रे पाहण्यातली आमची आस्था पाहून किती काय बोलू या चित्रांबद्दल, असे तिला झाले ! एक तर तरुण स्त्री इंजिनियर झालेली असून तिने तीन वर्षे नोकरीही केली होती. पण, चित्रकलेचे प्रेम तिला तिकडे रमू देई ना – नोकरी सोडून, होईल ते होईल म्हणून ती या क्षेत्रात आली ! असे खूप काही पाहिले आणि अनेक चित्रकारांशी संवादही साधला.

हे सगळे पाहून एक प्रश्न आला डोक्यात – नुसत्या या एका प्रदर्शनात जर इतके आणि इतक्या विविध प्रकारचे कलाकार आहेत तर असे देशात, जगात किती असतील ? ! हे सगळे थोडेच क्ली वा पोलोक वा पिकॅसो वा गायतोंडे वा हुसेन होणार आहेत ? पण यांतल्या बऱ्याचजणांची तशी स्वप्ने असूही शकतील. मग या सगळ्या प्रकाराला एक वेडेपणाच म्हणावे का ? कोणताही कलाकार काहीतरी होण्यासाठी वा काहीतरी मिळवण्यासाठी त्याच्या कलेचा वापर करेल तर त्याच्या कलेला त्या उद्दिष्टाची मर्यादा पडून ती कला खुजी होईल, असे मला दिसते. ‘ मोठे ‘ होण्याची उद्दिष्टे तुम्ही व्यावसायिक कलेत ठेवू शकता पण गंभीर सर्जक कलेत नाही. या अर्थाने कला ही व्यावहारिक उपयोगाची चीजच नाही. कीर्तन करून दक्षिणेची अभिलाषा ठेवणाऱ्याला तुकाराम धि:कारतो, हे इथे लक्षात घ्यायला हवे. जगणे समजून घेण्याची प्रक्रिया हेच असू शकते, या अर्थाने व्यक्तिनिरपेक्ष असणाऱ्या सर्जक कलेचे काम. त्यामुळे, कुणीही कुणालाही वेडे म्हणण्यात अर्थ नाही. हे असे ‘ निरुपयोगी ‘ काम हेच आपले मिशन आहे, असे काहींना वाटणे हे त्या त्या समाजाचे भाग्यच म्हणावे लागेल. याचे काय होईल, एखादे चित्र कोटीत जाईल का, असे प्रश्न इथे अप्रस्तुतच ठरणार.

हे सर्व पाहून पुढे गेलो, पण तिथून बाहेर पडायचा मार्ग आहे का की पुन्हा मागे फिरून जावे लागेल हे माहीत नव्हते. तिथे बाहेर एका खुर्चीवर एक माणूस बसलेला होता. त्याला विचारले की इथून बाहेर पडता येते का ? तर तो एकदम विचलितच

झाला ! चिडलाच ! तिकडे पुढे विचारा, म्हणाला. अरे बेटा, आपले डोके सदोदित बिथरत का असते याचा शोध घेणारा समुद्र आहे रे तुझ्या जवळ, इथेच , पण करंटे हो तुम – असे मनात म्हणत पुढे गेलो.

--- ००० ---

मंगेश नारायणराव काळे

या मित्राचे चित्रप्रदर्शन.

आज सुदर्शन हॉलमध्ये पाहिले. हे २५ जूनपर्यंत रोज संध्याकाळी ५ ते ८ या वेळात पाहता येणार आहे.
भन्नाट, जबरदस्त आहेत ही चित्रे ! प्रथमदर्शनी जाणवणारे वैशिष्ट्य म्हणजे या सर्व चित्रांना एक समान शैली आहे. ती अद्वितीय आहे. चित्रांचे विषय वा आधार पुराणकथा, मिथके, तंत्रविद्या वा आदिवासी जीवन व कला, काहीही असू शकतात, पण ते सर्व मंगेशच्या या विशिष्ट शैलीतूनच येते. काही चित्रकार म्हणतात की चित्राची जागा ही पूर्ण चित्राची असते – त्यात चित्रकाराचे नाव वा सही हे अतिक्रमण असते. मंगेशच्याही चित्रांवर त्याच्या सह्या दिसत नाहीत. एका प्रकारे हा चित्रकाराचा अलिप्तपणाही म्हणता येईल. असाच अलिप्तपणा मला यातल्या शैलीतही जाणवला. विषय कधी दु:खाचे वा अगदी चेहरा पिळवटून टाकणारेही असतात पण त्यांचा चित्रकाराच्या सर्जकतेवर प्रभाव पडत नाही. ही शैली अत्यंत गुंतागुंतीच्या कोरीवकामासारखी आणि सूक्ष्म  असून सुंदरही आहे. इथल्या प्रत्येक चित्राला एक शिस्त वा व्यवस्था आहे. याचाच अर्थ चित्रकाराला समोरच्या अनुभव द्रव्यावरच्या त्याच्या प्रतिक्रिया द्यायच्या नसून त्यांना सुखदु:खबाह्य वा ‘ पवित्राबाह्य ‘ सर्जक अभिव्यक्ती द्यायची आहे. बहुतेक सर्वच चित्रे काळ्या रंगात आहेत, क्वचित काही रंगीतही आहेत. इथे रंगलेपन असे खूपच कमी असून विषयाच्या आंतररचना पाहण्यावर भर आहे. या रचना इतक्या व्यामिश्र आहेत की त्या पूर्वनियोजित असणे शक्यच नाही. याचाच अर्थ, या चित्रांतली शिस्त ही उत्स्फूर्त आहे ! रचनेचा इतका बांधीवपणा आणि उत्स्फूर्तता हे एक अजब रसायन इथे पाहायला मिळते.

इथे क्लीं चित्रमालिका आहे. हा एक कामनापूर्तीचा मंत्र आहे. असे काही असू शकते का हा भाग वेगळा पण मानवी जगण्यात हा प्रकार कल्पना, भ्रम वा अनुभवजन्य सत्य म्हणून कसा का असे ना, अस्तित्वात आहे. त्याकडे ही चित्रे त्याच अलिप्ततेने पाहतात. ६४ योगिनी हे स्त्रियांचे वा स्त्री-देहांचे प्रकार आहेत – त्या मालिकेतलीही काही चित्रे इथे आहेत. एका चित्रात मानवी चेहरा वेदनेने मुरगाळला गेलेला दिसतो. कुठे एकच चेहरा अनेक अंगांनी पाहिल्यामुळे त्याच्या एकमेकांत मिसळलेल्या प्रतिमा, अनेक डोळे दिसतात. या सर्वच अनुभव द्रव्याकडे चित्रकार त्याच्या ‘ व्यवस्थेसह ‘ पाहतो. सारांश, इथे चित्रे ‘ कळणे ‘ याचा अर्थ समोरच्या अनुभव द्रव्याने सुखी वा दु:खी होणेही नाही वा त्यावर काही मत व्यक्त करणेही नाही. ही एक प्रकारे जगण्यातल्या तपशीलांपासून आणि घटितांपासून मुक्ती ठरते. ही चित्रे पूर्ण अमूर्त नाहीत – बरेच आकार ओळखताही येतात, पण, ती वास्तवदर्शीही नाहीत. कलावंताची सर्जकता प्रेक्षकाला त्याच्या सवयीच्या रटाळतेतून कशी बाहेर काढते त्याचा इथे प्रत्यय येतो.

मंगेशला त्याचे चिंतन आणि कौशल्य यांतून सापडलेला अभिव्यक्तीचा हा त्याचा मार्ग आहे. त्याच्याशी बोलताना असे समजले की यापुढे रंगांना अधिक वाव देत तो पुढील वाटचाल करणार आहे. ते घडले तरीही मंगेशची उत्स्फूर्तता आपले काम करतच राहील यात शंका नाही. या सर्व गोष्टी विचारपूर्वक, ठरवून नुसतेच कौशल्य म्हणून घडत नाहीत. ती चित्रकाराची आकलन प्रक्रिया असते.

मंगेशच्या एका चित्राला अलीकडेच राष्ट्रीय स्तरावरचा टागोर पुरस्कार मिळाला आहे. ते चित्रही इथे आहे ! आपल्या मित्रमैत्रिणींनी हे प्रदर्शन जरूर पाहावे. ‘ पाहण्या ‘ ची दृष्टी अधिक प्रगल्भ होईल, हे नक्की.

--- ००० ---

२८-०६-२२.

मकबूल फिदा हुसेन..

मी एका ठिकाणी दिलेला -- मला जाणवलेला -- त्या सरस्वतीच्या चित्राचा अर्थ --

मुळात हे देवीचे, स्त्री म्हणून काढलेले उत्तान, नग्न चित्र आहे, ही कल्पनाच चुकीची आहे. स्त्रीदेहाचे आकर्षण वा मादकता व्यक्त करणारे असे कोणतेही अवयव तसे रेखाटलेले नाहीत. तो स्त्रीदेह आहे असे सांगण्यापुरतीच रूपरेखा आहे. मुळात सरस्वती ही बुद्धी आणि सखोल ज्ञानाचे प्रतीक आहे. ते ज्ञान खुले, अनावृत आहे. सरस्वतीचा उजवा हात पाण्याबाहेर आल्याचे दाखवले आहे आणि त्या हातात कमळ आहे. हे ज्ञानाचे बाहेर आविष्कृत झालेले सौंदर्य आणि ताजेपण आहे. तो हात पाण्याबाहेर आलेला दाखवणे याचा अर्थच ती सरस्वती ज्ञानाच्या सखोल, वाहत्या प्रवाहात आहे. तिचे केस तिच्या डावीकडून उजवीकडे वाहते, लहरते दाखवलेले आहेत – तेही त्या प्रवाहाचे निदर्शक आहेत. ज्ञान हे स्थितिशील नसते – सतत वाहते, नवे, ताजे असते – हेच यातून सुचवलेले आहे. वरच्या बाजूला एक मासा दाखवलेला आहे. मासा जगतोच मुळी पाण्यातल्या प्राणवायूवर – तो ज्ञानाचा प्राणवायू आहे. माशाच्या त्या ज्ञानग्रहण प्रक्रियेचे निदर्शक असे बुडबुडे दाखवलेले आहेत. इथे वीणा तिच्या मांडीवर आहे. ती कला कौशल्य, नादसौंदर्य, संगीत यांचे प्रतीक आहे. त्या वीणेने सहजच योनीप्रदेश झाकला गेलेला आहे. ही लैंगिकतेला उत्तेजन न देणारी, उन्मादक नसलेली अशी कला आहे. मोर पिसारा फुलवून तिच्या मांडीवर नाचतो आहे. हे ज्ञानाचे फुलणे, आल्हादणे, व्यक्त होणे आहे. या सरस्वतीला व्यक्तिगत चेहरा नाहीय. ज्ञान व्यक्तिगततेच्या मर्यादा ओलांडणारे असते, हेच त्यातून सुचवलेले आहे. तिच्या कपाळावर आज्ञाचक्राच्या जागी कुंकवाचा टिळा आहे. बुद्धी आणि आध्यात्मिक ज्ञान यांचे ते केंद्र आहे. शिवाय ते स्त्रीच्या सौभाग्याचे लक्षण आहे. ती एक पत्नी आहे. पौराणिक संदर्भ धुंडाळून नक्कीच याचेही अधिक अर्थ लागतील. सरस्वती ही ब्रम्हाची पत्नी आहे. उत्पत्तीची, सर्जकतेची, निर्मितीची देवता आहे – हेही त्यातून व्यक्त होते. थोडक्यात, हे चित्र ज्ञानाची सर्जकता व्यक्त

करते. मला यात आक्षेपार्ह तर काही वाटले नाहीच, उलट, या चित्रकाराने या देवतेचे सखोल प्रतिकात्मक अर्थ समजून घेऊन हे चित्र काढलेले आहे, असेच वाटले. यावर वाद झाले तेव्हा कुणी या चित्राचा हा अर्थ सांगितला होता की नाही, ते मला माहीत नाही. एकूणात, चुकीच्या पद्धतीने पाहून, चुकीचे अर्थ लावून, हुसेनांवर अन्याय झाला, असेच मला वाटते.

--- ००० ---

२८-०६-२२.

प्रदीप पटवर्धन --

' चल, काहीतरीच काय ! '

-- आठवले ! -- स्मृतीस अभिवादन !

२३-०८-२०२२.

खालील मजकूर घ्यायचा राहिला होता --

मनाचे श्लोक आणि

उदास गाणी

मनाचे श्लोक

तुम्ही पाठवलेला आणि आणखीही काही श्लोक यांच्या क्लिप्स पाहिल्या. उत्तम ! मुख्यत: तुम्ही हे लहान मुलांसाठी करत आहात. त्यामुळे, त्यातल्या आध्यात्मिक अर्थावर भर न देता तुम्ही ते सतत जगण्यातल्या चांगुलपणाकडे नेत  आहात, हे फारच महत्त्वाचे वाटले. हे श्लोक म्हणणारी मुलेमुली आणि तुमचे सहकारीही हे काम समजून करत आहेत. अर्थनिरूपण समजण्यासाठी तुम्ही घेत असलेले संदर्भ दृश्य रूपात दिसतात, यामागे असलेली तुमची मेहनत लक्षात येते. तुम्ही घेतलेला श्लोक सतत एका कोपऱ्यात दिसत राहावा, असे वाटले. पाच मिनिटांत संपवायचे असल्याने गती थोडी जास्त होतेय. तुमचे समजावणे, बोलणे उत्तमच आहे. अर्थवाही उच्चार आणि संवादफेक नक्कीच अपेक्षित परिणाम साधणारे आहेत. हा उपक्रम छानच आहे, यात शंकाच नाही. परंतु, महाराष्ट्रातल्या जातीय वातावरणात याचे मोल मान्य होणार नाही. इथे ज्ञानदेव-तुकाराम म्हटले जाते पण रामदासांचे नाव टाळले जाते. कारण ते चातुर्वर्ण्यवाले होते हा त्यांच्यावर ठपका ठेवला जातो. जो माणूस ‘ आत्माराम ‘ लिहितो तो भेदभाव करत असेल, असे वाटत नाही. पण, यावर बोलणेही एक गुन्हा आहे. या असल्या दृष्टीमुळे लोक रामदासांनी दिलेल्या शहाणपणाच्या साठ्याला मुकतात. असो. व्हाटस अप

वर माधव किल्लेदार नामक एकजण रामदासांचे व्यवस्थापन शास्त्र यावर लिहीत असतात. जमल्यास बघा. तुम्ही काम उत्तमच करत आहात पण फार मोठ्या प्रतिसादाची अपेक्षा ठेवू नका. शुभेच्छा !

--- 000 ---

उदास गाणी

जे का रंजले गांजले – हे लिहिणारा तुकाराम काही एखादा पंडित वा प्रयोगशाळेत प्रयोग करून सिद्धांत सांगणारा माणूस नव्हता. माणसाच्या मनाचे सखोल उत्खनन करणे आणि उलट प्रक्रियेने बाहेरून पूर्ण मन पाहणे हे त्याला त्याच्या चिंतनातून साध्य झालेले होते. Empathy या शब्दाला नेमका मराठी शब्द वापरात नाही. मला सापडलेला ' समानुभूती ' हा शब्द मला योग्य वाटतो. किंवा मग ' संवेदनशीलता ' आहेच. दु:ख वा औदासीन्य यांच्या कल्पनेने घेतलेल्या अनुभवानेही मेंदूत आरोग्यकारक आणि सर्जक क्रिया घडतात, असे संशोधन आहे. शोकांतिका पाहून जगण्यात विरेचन ( catharsis ) ही क्रिया घडते असे अरिस्टॉटल म्हणून गेला. त्यातून एक प्रकारची प्रगल्भता येते, अशी ती मांडणी होती. अलीकडच्या काळात झालेले संगीतविषयक संशोधन हेच सांगते आहे. आपण उदास गाणी का ऐकतो, विशेषत: आपल्या तरुणपणातली आपली आवडती उदास गाणी आपल्या मेंदूत काय घडवतात यावर संशोधन झालेले आहे. अशी गाणी मेंदूची कल्पनाशक्ती आणि सर्जकता वाढवतात कारण अशा गाण्यांमुळे मेंदूतल्या आंतरजोडण्या अधिक सक्षम होतात आणि मेंदूत आरोग्यकारक रसायने उद्दीपित होतात, असे दिसून आलेले आहे. संगीत म्हणजे नुसते लिखित गीत नव्हे तर त्याची चाल, वाद्यमेळ, गायकाचा चिंतनशीलतायुक्त आवाज, हे सगळेच असते. त्यामुळे, इथे एक लक्षात घ्यावे लागते की मंगेश पाडगावकर, ग. दि. माडगूळकर, शांता शेळके, सुरेश भट, जगदीश खेबुडकर, गुरू ठाकूर, वैभव जोशी, संदीप खरे – हे गीतकारही मराठी लोकांचे आरोग्य जोपासत आलेले आहेत. हिंदी चित्रपट संगीताची इथली वर्षानुवर्षांची लोकप्रियताही हेच काम करत आलेली आहे. संगीताचा हा अप्रत्यक्ष गुण आपल्या अवधानात नसतो, पण, ही एक अत्यंत महत्त्वाची बाब आहे. संगीत खिन्नता घालवू शकते, काळजी आणि वेदनाही कमी करू शकते, असे संशोधन आहे. ' साथी न कोई मंजिल ', ' कोई हमदम न रहा ', ' अकेला हूं मै ', ' सौ बार जनम लेंगे ' वगैरे पूर्वी आपल्याला आवडून गेलेली आणि आता ऐकताना तो काळ मनात जिवंत करणारी गाणी अशा बाबतीत विशेष कार्यक्षम असतात. ज्यांना शास्त्रीय संगीत समजते आणि आवडते ते तर या बाबतीत श्रीमंतच म्हणायला हवेत.

सगळेच संगीत असे हितकारक असते, असे नाही. कानठळ्या बसवणारे, क्रोध-संताप व्यक्त करणारे, आक्रमक वा हिंसक संगीत जगण्यात असे अर्थपूर्ण तर नाहीच ठरत, पण, अहितकारक ठरते. मानवी जगणे बिघडवणारे, सौहार्द नष्ट करणारे ठरते. इथे हेही लक्षात घ्यायला हवे की संगीत-शत्रू असणे ही काही फारशी भूषणावह बाब नाही. तसे असणे म्हणजे स्वत:च्या जगण्यातली समृद्धी कमी करून घेणे तर आहेच, पण, नीट, मानवी जगण्याच्या शक्यताही घालवून घेणे आहे.

महाराष्ट्रात संतवाङ्मय , कीर्तने, भजने, लोकगीते ही दिलासा देण्याबरोबरच आरोग्याचेही काम करत आलेली आहेत, हे लक्षात घ्यायला हवे.

कला म्हणजे नुसतीच करमणूक वा टाईमपास नव्हे. इतरांची सुखदु:खे ही आपली सर्वांची सुखदु:खे आहेत याची जाणीव आणि समज कला देत असते. धर्म, तत्त्वज्ञान आणि विचारसरण्या माणसाचे भले करण्यात फेल गेलेल्या आहेत – अपयशी झालेल्या आहेत. आता विविध कलांचे अस्तित्व हीच फक्त आशा आहे. कला क्षेत्रातल्या सर्व शक्यता ओपन – खुल्या ठेवणे आणि कलेतल्या समावेशकतेचे महत्त्व ओळखणे – समजणे, हे फार महत्त्वाचे आहे. तीच, तेवढीच फक्त आता मानवी जगण्यात मौलिकता येण्याची आणि सतत प्रवाही राहण्याची शक्यता आहे.

--- ००० ---

25-10-22.

मित्रवर्य जयंत बी. जोशी यांचे चित्रप्रदर्शन

हे प्रदर्शन पुण्यात चालू आहे. आज पाहिले. मला या कलेची तांत्रिक माहिती नाही पण शास्त्रीय संगीताप्रमाणेच कलावंत ज्या उंचीला नेईल तिथवर मी जाऊ शकतो, असे मला वाटते. त्या आधारावरच लिहितो आहे.

जोशींची चित्रे पाहताना प्रथमच हे लक्षात येते की हे कसेही आकार एकमेकांना खेटून बसलेले आहेत. जणू ते जखडलेलेच आहेत. ते आकार सौन्दर्यपूर्ण नसून बरेचसे कुरूप म्हणावेत असेच आहेत. कधी त्यात माणसे वा चेहरे असले तर ते विखंडित आहेत. कधी गाल सुजलेले वाटावेत, कधी चेहरा मुरगळलेला असावा, अशी अवस्था. ही माणसे चित्रित केलेली नसून त्यांचे जगणेच इथे पाहिले गेलेले आहे. आपल्या मनाची अवस्था म्हणून पाहिले तर ते चित्र म्हणजे आपल्याला दाखवलेला आरसाच आहे, असे वाटते. विकृत, कसेही वाढलेले, ताणमय जगणे !

अशा चित्रांत उजळपणा कमी आणि उदास डार्क रंग आधिक असतात. याला अतिवास्तववाद म्हणण्यापेक्षा अति-वास्तववाद म्हटले तरी चालेल. पण हे तथाकथित सत्याच्या आतले, तुकडे झालेले विदीर्ण जगणे आहे. ही शैली वेगळीच आहे, पण अतिवास्तववादाचीच आहे. भ्रम आणि भय यांचे मिश्रणही जाणवते. हे चित्र आहे, हे खोटे आहे, हे म्हणजे आपण नव्हे याची जाणीव असूनही यांतले एखादे चित्र घाबरवून टाकते ! कधी तर आपण भुताटकीच्या जगात आहोत, असे वाटते. पुढे काय होईल याच्या कल्पनेने नव्हे तर ‘ हे आहे आपले जगणे ‘ – या प्रश्नार्थक दर्शनाने. हातापायांचे तुकडे झालेली रुग्ण माणसे वाटतात ही ! पूर्वी जोशी रंगांचे वैविध्यही फारसे ठेवत नसत. आता ते वैविध्य आणतात, ते अधिकच आक्रमक वाटते. आजच्या आपल्या जगण्याचे भान देणारी अशी ही अजब पण सखोल चित्रे आहेत.

याउलट काही चित्रे आल्हाद वाटावा अशीही आहेत. या बाबतीत मी हिरव्या रंगाच्या छटा असलेल्या चित्राचे उदाहरण देईन. अशा चित्रांत उन्माद नसून एक समंजस आनंद दिसतो. नुसत्या रंगांच्या सरमिसळ रचनांची त्यांची आणखीही

काही चित्रे आहेत. त्या सगळ्या मनाच्या विविध अवस्था वाटतात. पण या अवस्था भावनिक तीव्रतेने रंगवलेल्या वाटत नाहीत. एक संयत अवधान असल्याप्रमाणे त्या पाहिलेल्या आहेत.
प्रत्येक चित्राच्या तांत्रिक बाजूंचे फारसे विश्लेषण मी करणार नाही. आणि अशा विश्लेषणाची मला गरजही वाटत नाही. पण मला एक प्रश्न मात्र पडला. या चित्रांत दिसणारा प्रकाश हा चित्रात काढलेलाच आहे की फोटो असल्यामुळे तसे वाटते ? एकेका चित्रावरही लिहिता येईल पण इथे ते अपेक्षित नाही. आणि प्रत्येक चित्र समोर दाखवत लिहावे असे तंत्र मला अवगत नाही. पण एक नक्की की हे प्रदर्शन पाहिल्यावर एका प्रगल्भ कलानुभवातून आपण जाऊन आलो, हे जाणवते. तिथले वातावरणही अशा चित्रांना आवश्यक असेच शांत आहे. ते सजावटीच्या दगडांचे दुकान आहे. आत जाताना असणारी रचना तर अगदी भूलभुलैया सारखी आहे. एका प्रगल्भ गुंतागुंतीचा हा प्रत्यय कदाचित न योजलेला पण सहज उपलब्ध झालेला आहे.
मला हे प्रदर्शन खूप आवडले ! धन्यवाद, मित्रवर्य !
--- ००० ---

तरडे चित्रप्रदर्शन

शरद आणि सुचिता तरडे या दोघांची चित्रे असलेले चित्रप्रदर्शन पु. ना. गाडगीळ आर्ट गॅलरी , कर्वे रोड, पुणे इथे पाहून आलो. सुंदर, ऊंची माहोल, उत्तम प्रकाशयोजना आणि तशीच उत्तम चित्रे यांचा बेष्ट मिलाफ होता. शिवाय दर्जेदार कॉफी !
मी, चित्रकार शरद यांना एक प्रश्न विचारला – चित्र काढताना तुमच्या मनात एखादा मूड असतो की रंगांच्या साहचर्याची आवडणारी विविधता की एखादे तत्त्वचिंतन ? त्यांनी दिलेले उत्तर मार्मिक होते – तिन्हीही नाही ! त्यांचे म्हणणे असे की आपल्या व्यक्तित्वाच्या भूतकाळात ते चित्र जखडले जाता कामा नये. मी हा मीच असणार पण ते चित्र हे फक्त माझा भूतकाळ नसावे. स्वत:पासून दूर होण्याची अशी ती प्रक्रिया असते. तसे नाही घडले, एखादे चित्र काढत असतानाच ती पुनरावृत्ती वा रिपिटिशन वाटायला लागली तर ते मी रद्द करतो. त्यांनी खरोखरच अशी रद्द करून वेगळ्या मार्गाने गेलेली चित्रे दाखवली. श्री तरडे आधी शिल्पकलेत होते, अलीकडेच ते चित्रे काढू लागलेले आहेत. या अर्थाने सुचिता त्यांना वरिष्ठ आहेत आणि ही गोष्ट ते आवर्जून सांगतातही. चित्रप्रदर्शनाबरोबरच पति-पत्नींतला हा मिलाफ पाहणेही विलोभनीय होते !
नेमकी कोणती चित्रे कोणाची असे आता लक्षात नाही पण बऱ्याच चित्रांमध्ये सफाई आणि माध्यम-प्रभुत्व दिसत होते. क्वचित काही चित्रे मला विस्कटलेली, अर्धवट वाटली पण त्यांनी ते जाणीवपूर्वकच, आहे तसे ठेवलेले आहे. ‘ नंतर दुरुस्ती ’ ते फारशी करत नाहीत.

या चित्रांमध्ये अमुक वस्तू वा दृश्ये असे काही चित्रकाराने कल्पिलेले नाही. पण, अर्थात पाहणाऱ्याला त्यात त्याच्या दृष्टीने काही जाणवू शकते. वेगवेगळ्या आकारांतले वेगवेगळे रंग आहेत, त्या सर्वांच्या सह-अस्तित्वात एक सामंजस्य आहे. संघर्ष जाणवत नाही. मला हा सहजीवनाचा मंत्रच वाटला. रंगांच्या वैविध्यामुळे चित्र बराच वेळ पाहात राहावे, असे वाटते.

मग अर्थ काय या चित्रांचा ? यावर मला सुचले ते असे की अर्थ हा वैचारिक असतो आणि ही चित्रे तर वैचारिक वा निर्धारित मनस्थितीची नाहीत. ती पाहायची तर आपणही सवयीचे अर्थ शोधणे थांबवायला हवे.

बोलता बोलता तरडे म्हणाले की काढून पूर्ण झालेली चित्रे त्यांच्या दृष्टीने आता मागे पडलेली आहेत. कुणाच्या अभिप्रायातून त्या चित्रांबाबत काही वेगळे समोर आले तर ते पुढील प्रवासाचा भाग बनेल. पण त्याचाही बंधनकारक भूतकाळ बनू नये याबाबत ते सावध राहतील.

दोघेही पति-पत्नी अत्यंत अगत्यशील आहेत. तेच त्यांचे ‘ असणे ‘ आहे. त्यांच्या चित्रांतही ते येते. गोंधळ वा संघर्ष यांचे रण उभे न करता अमूर्ततेतून सामंजस्य आणि सौंदर्य निर्मिण्याकडे त्यांचा कल दिसतो.

नमून्यादाखल एक चित्र सोबत देत आहे.

--- ००० ---

विक्रम गोखले

उत्तम संवादफेक आणि अभिनयातले अनेक बारकावे यांनी युक्त असे हे एक मोठे अभिनेते होते ! ' एबी अँड सीडी ' या मराठी चित्रपटात त्यांनी चंद्रकांत देशपांडे या माझ्या नावाच्या पात्राची भूमिका केली होती ! परेश एजन्सी च्या एका प्रकाशन सोहळ्यात आम्ही एकत्र रंगमंचावर होतो. त्या वेळी त्यांनी माझे भाषण ऐकले होते ! ( त्यांचे संवाद तर आपण अनेकदा ऐकत होतो. )

या महत्त्वाच्या अभिनेत्याच्या स्मृतीस सादर अभिवादन !

--- ००० ---

देविका घोरपडे

ही आमच्या शेजारच्याच फ्लॅटमध्ये राहणाऱ्या कुटुंबातली मुलगी आहे. विश्वविक्रमी ! आजच्या पुणे मटाच्या पहिलाच पानावर तिची बातमी आहे. ५२ किलो गटाच्या महिला बॉक्सिंग मधल्या जागतिक प्रावीण्य स्पर्धेत तिने भारतासाठी सुवर्णपदक मिळवले आहे. ही स्पर्धा स्पेनमध्ये झाली ! शेवटी तिने इंग्लंडच्या लॉरेन मॅकीला ५--० असे हरवले ! ही अर्थातच देशाच्या अभिमानाची बाब आहे -- आणि आमच्या तर विशेष अभिमानाची ! एरवी बघाल तर ही मुलगी अत्यंत नम्र स्वभावाची आहे. आम्ही या कुटुंबाचे अभिनंदन कालच केले -- देविका अजून परत यायची आहे.

देविकाचे पुन्हा एकदा मन:पूर्वक अभिनंदन आणि तिच्या पुढील वाटचालीला शुभेच्छा !

--- ००० ---

१९५८ साली साहिर साहेबांनी हे उत्तर उत्तर आधुनिक गाणे लिहून ठेवले ---

आसमां पे है खुदा और जमीं पे हम (फिर सुबह होगी -1958) Aasmaan pe hai khuda aur zami pe hum (Phir subah hogi-1958)

आसमां पे है खुदा और जमीं पे हम
आज कल इस तरफ देखता है  कम ..
आसमां पे है खुदा और जमीं पे हम
आजकल किसी को वो टोकता नहीं
चाहे कुछ भी कीजिये रोकता नहीं
हो रही है लूटमार फट रहें हैं बम
आसमां पे है खुदा और जमीं पे हम
आज कल इस तरफ देखता है  कम ..
किसको भेजे वो यहाँ खाक छानने
इस तमाम भीड़ का हाल जानने
आदमी हैं अनगिनत देवता हैं कम
आसमां पे है खुदा और जमीं पे हम
आज कल इस तरफ देखता है  कम ..
जो भी है वो ठीक है जिक्र क्यों करे
हम ही सब जहान की फ़िक्र क्यों करें
जब उसे ही गम नहीं तो क्यों हमें हो  गम
आसमां पे है खुदा और जमीं पे हम
आज कल इस तरफ देखता है  कम ..

-- यातली ' जब उसे ही गम नही तो क्यों हमे हो गम ' -- ही ओळ तर अमर म्हणायला हरकत नाही अशी आहे ! -- मला स्वत:ला जगायला खुदाबिदा नाही लागत पण हे गाणे मात्र अति-मस्त आहे !

--- ००० ---

मुलगा कुठे काय करतो

नमिता वर्तक, मुग्धा गोडबोले, मधुराणी गोखले आणि ‘ आई कुठे – ‘ ची एकूणच टीम आपापली कामे चोख करतात, हे एक कारण आणि घरातले नातेसंबंध बदलत जाण्याचा काळ हाताळणारी ही मालिका असणे म्हणून, मी ‘ आई कुठे काय करते ‘ ही मालिका बघत असतो. एकही मालिका नाही बघत, असे इतके शुद्ध आणि पवित्र राहणे मला नको असते, हेही एक कारण आहे. आता मी जे लिहिणार आहे ते खूपच विवाद्य आहे / असणार हे मला माहीत आहे. या विषयावर कर्मठ, कट्टर मते मांडत जिंकण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा आपल्या जगण्यातले हे महत्त्वाचे क्षेत्र सावकाशपणे समजून घ्यायला हवे असे वाटते.

कालच्या भागात आईने मुलाला मारून, पिटून, बदडून, तुडवून काढल्याचे पाहिले. हा नीतीचा विषय आहे. बायकोचे डोहाळजेवण असताना मुलगा अभी ( अभी नही तो कभी नही, या विचाराने ) आदल्या रात्री एका मुलीबरोबर हॉटेलात राहिला, यावरून हे रणकंदन घडते. ते पोरगे म्हणते की तसे काही नाहीय, ते तात्पुरते होते, त्याचे त्याच्या बायकोवर पूर्ण प्रेम आहे. पण नैतिकतेचा झेंडा फारच जोरात फडफडावा, असे ते घर आहे. आजच्या काळात त्या दुटप्पी अभीचे ( आईने कसे वागावे याचे मानदंड त्याचे वेगळे असतात ! ) खरेही असू शकते. लगेच काही तो त्याच्या बायकोपासून दुरावतो आहे, असे म्हणावे का, हा प्रश्न कुणीच विचारात घेत नाही. त्याचा परिणाम प्रचंड विध्वंसात व्हायला सुरुवात होते !

एक लक्षात घ्यायला हवे की माणसाचे मन कसे चालते आणि नीतीच्या अपेक्षा काय आहेत यांत नेहमीच एक दुफळी असते. ‘ मनाला आवर घालायलाच हवा ‘ ही यावर मांडणी असते. त्यामुळे असंख्य लोकांच्या जगण्यात लपवाछपवी आणि खोटेपणा येतात, हे नाकारता येणार नाही. भ्रष्टाचार, खून करणे, बलात्कार करणे यांतही मन आवरले पाहिजे, हे असतेच ना ! एका बाजूला कडक नैतिक रचना आणि दुसऱ्या बाजूला अनेक सुखसंधी उपलब्ध – असे हे वातावरण आहे. अहंकार सुखावणे हाही एक भाग आहेच.

तर करावे काय ? इथे, उदाहरणार्थ, प्रतारणा झाली म्हणून थेट गोळ्याच घालायच्या ? असे करणाऱ्यांचे स्वत:चे सगळे जगणे समर्थनीय असते का ? एक तर बेमुर्वतपणे सगळ्यांना धुडकावून लावणे किंवा आहे ती रचना धरून ठेवण्यासाठी स्वत:ला सारखे चेपत राहणे, किंवा आणखी काही ! यांतली कोणती पद्धत आदर्श म्हणता येते ? बरे, आपण ज्याला नैतिकता म्हणतो ती काळाप्रमाणे आणि प्रदेशाप्रमाणे बदलत असते, हे कुणीच नाकारू शकणार नाही.

तर करावे काय ? हाणामारी ? आणि यातला मुख्य प्रश्न काय – माणसाला असंख्य बाबतींत आंतरविरोधातच जगावे लागणार का, हा ! त्या प्रश्नाचे काय करायचे ?

--- ००० ---

चित्रपटांसोबत नाटक आणि जगण्याचेही डी-कन्स्ट्रक्शन

'गोळ्या काढलेले पिस्तुल'

चित्रपटांसोबत नाटक आणि जगण्याचेही डी-कन्स्ट्रक्शन करीत, प्रतिमा आणि प्रत्यक्ष यांतील विसंगतीवर चं. प्र. देशपांडे लिखित 'गोळ्या काढलेले पिस्तुल' हे नाटक तिरकसपणे भाष्य करीत राहते. आशयाची ही अॅब्सर्ड प्रकृती मग फॉर्ममध्ये देखील साजेश्या अॅब्सर्डपणासह उतरते आणि तेही दुर्बोधपणाचा अवगुण टाळून!

नाटकं सिनेमॅटिक सादर करण्याचा ट्रेंड असण्याच्या काळात, कथानकात पलायनवादी साचेबद्ध मसाला चित्रपटांचा कॅनव्हास असतानादेखील हे नाटक आपली नाट्यात्मकता सोडत नाही. सुविद्य कुलकर्णी दिग्दर्शित हे नाटक अभिरुची, कोल्हापूरने राज्य नाट्य स्पर्धेत सादर केले.

पलायनवादी साचेबद्ध मसाला चित्रपटांतील अनेक क्लिशेज आणि धारणा यात वापरल्या आहेत. त्यामुळे वरकरणी हे नाटक उथळ विनोदी मसालेवाईक असल्यासारखे काहीजणांना भासू शकते, पण तसे ते नाही. खरेतर हा खुलासा करण्याची आवश्यकता नाही, पण अशा अर्थी काही प्रतिक्रिया कानावर आल्या म्हणून! आपल्याकडे नाटकं लोक आवडीने पाहत असतीलही, पण नाट्यसाक्षरता किती हा प्रश्नच आहे!

पुरुषप्रधान व्यवस्थेतील मनोरंजनात मध्यवर्ती व्यक्तिरेखा पुरुष नायकच असणार आणि नायिका केवळ शोभेची बाहुली. सज्जन, नीतिमान चरित्र व्यक्तिरेखा केवळ संकटात सापडून नायकास त्याचे खलनायकाविरुद्धचे नायकत्व सिद्ध करण्यासाठीच. सहनायिकेचे बलिदानही तसेच. सर्व कथानक आणि सिनेमातील साऱ्यांचे जगणं हे नायकाभोवतीच. 'सत्यमेव जयते' 'लॉस्ट अँड फाउंड' 'सेक्स अपीलचे नीती शास्त्र' अशा अनेक बाबी विशेषतः ९०च्या दशकातील चित्रपटांतील संदर्भ विडंबनात्मक पद्धतीने येथे येतात. येथे अभिनेत्यांना निव्वळ साचेबद्ध व्यक्तिरेखा साकारायच्या नव्हत्या तर त्या साकारत असतानाच त्यातील ठिसूळपणाही डी-कन्स्ट्रक्ट करून दाखवायचा आहे. तो सर्वच अभिनयसंचाने अगदी साजेसा केला आहे.

नाटकातील बहुतांश भाग हा रजतपटावर घडतोय, असे सूचित करायचंय म्हणून तो भाग शुभ्र पांढऱ्या रंगात खेळवला आहे. याद्दष्टीने नेपथ्य विचार आणि प्रकाशविचार असो वा डी-कन्स्ट्रक्शनच्या दृष्टीने दाराच्या चौकटीचे सतत होणारे स्थानांतरही, सारेच घटक कल्पकतेने वापरले आहेत. त्यामुळे अगदी दृश्य स्तरावर देखील हे नाटक वेधक वाटू लागते. नायिका म्हणजे केवळ शोभेची बाहुली हे प्रस्थापित करताना प्रत्येक प्रसंगात तिचा वेगवेगळा आकर्षक वेष हा भुषा विचार गंमतही आणतो आणि जाणीवही देतो. 'हे चैतन्य नसलेलं शरीर असो' वा 'आशय नसलेली नुसतीच खिळवून ठेवणारी साचेबद्ध मनोरंजक माध्यमं असोत', या साऱ्यास अगदी समर्पक असणारे नाटकाचे वेधक शीर्षक सार्थच आहे ते म्हणजे 'गोळ्या काढलेले पिस्तुल' जे अंतिमतः निव्वळ टाइमपास करमणूक उपभोगू पाहणाऱ्या प्रेक्षक मानसिकतेचाही वेध घेते.

नेपथ्य- सुविद्य कुलकर्णी

प्रकाशयोजना- कपिल मुळे.

पार्श्वसंगीत- प्रसाद कोडोलीकर,हर्षवर्धन रणनवरे.

वेशभूषा- अपर्णा कुलकर्णी.

रंगमंच व्यवस्था : आनंद रणनवरे, सचिन वारके, अथर्व गोडसे, यश बुरुंग, अन्वी वालावलकर.

अभिनय संच- ऋतुराज आमते, साक्षी कवडे, धनंजय पाटील, आशुतोष देसाई, सीमा मकोटे, दृप्ता कुलकर्णी, विशाल कलंगले, धीरेन पाटील, बाळ वालावलकर, अवधूत पोतदार, अन्वी वालावलकर.

.

डॉ. अनमोल कोठाडिया

हौशी राज्य नाट्य स्पर्धा

केशवराव भोसले नाट्यगृह

१५ डिसेंबर २०२२

फोटो क्रेडिट - प्रफुल्ल सप्रे आणि राजा मकोटे

--- ० ---

२०-१२-२२ पर्यंत आले.

मुलगा कुठे काय करतो

नमिता वर्तक, मुग्धा गोडबोले, मधुराणी गोखले आणि ‘ आई कुठे – ‘ ची एकूणच टीम आपापली कामे चोख करतात, हे एक कारण आणि घरातले नातेसंबंध बदलत जाण्याचा काळ हाताळणारी ही मालिका असणे म्हणून, मी ‘ आई कुठे काय करते ‘ ही मालिका बघत असतो. एकही मालिका नाही बघत, असे इतके शुद्ध आणि पवित्र राहणे मला नको असते, हेही एक कारण आहे. आता  मी जे लिहिणार आहे ते खूपच विवाद्य आहे / असणार हे मला माहीत आहे. या विषयावर कर्मठ, कट्टर मते मांडत जिंकण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा आपल्या जगण्यातले हे महत्त्वाचे क्षेत्र सावकाशपणे समजून घ्यायला  हवे असे वाटते.

कालच्या भागात आईने मुलाला मारून, पिटून, बदडून, तुडवून काढल्याचे पाहिले. हा नीतीचा विषय आहे. बायकोचे डोहाळजेवण असताना मुलगा अभी ( अभी नहीं तो कभी नहीं, या विचाराने ) आदल्या रात्री एका मुलीबरोबर हॉटेलात राहिला, यावरून हे रणकंदन घडते. ते पोरगे म्हणते की तसे  काही नाहीय, ते तात्पुरते होते, त्याचे त्याच्या बायकोवर पूर्ण प्रेम आहे. पण नैतिकतेचा झेंडा फारच जोरात फडफडावा, असे ते घर आहे. आजच्या काळात त्या दुटप्पी अभीचे ( आईने कसे वागावे याचे मानदंड त्याचे वेगळे असतात ! )  खरेही असू शकते. लगेच काही तो त्याच्या बायकोपासून दुरावतो आहे, असे म्हणावे का, हा प्रश्न कुणीच विचारात घेत नाही. त्याचा परिणाम प्रचंड विध्वंसात व्हायला सुरुवात होते ! एक लक्षात घ्यायला हवे की माणसाचे मन कसे चालते आणि नीतीच्या अपेक्षा काय आहेत यांत नेहमीच एक दुफळी असते. ‘ मनाला आवर घालायलाच हवा ‘ ही यावर मांडणी असते. त्यामुळे असंख्य लोकांच्या जगण्यात लपवाछपवी आणि खोटेपणा येतात, हे नाकारता येणार नाही. भ्रष्टाचार, खून करणे, बलात्कार करणे यांतही मन आवरले पाहिजे, हे

असतेच ना ! एका बाजूला कडक नैतिक रचना आणि दुसऱ्या बाजूला अनेक सुखसंधी उपलब्ध – असे हे वातावरण आहे. अहंकार सुखावणे हाही एक भाग आहेच.

तर करावे काय ? इथे, उदाहरणार्थ, प्रतारणा झाली म्हणून थेट गोळ्याच घालायच्या ? असे करणाऱ्यांचे स्वत:चे सगळे जगणे समर्थनीय असते का ? एक तर बेमुर्वतपणे सगळ्यांना धुडकावून लावणे किंवा आहे ती रचना धरून ठेवण्यासाठी स्वत:ला सारखे चेपत राहणे, किंवा आणखी काही ! यांतली कोणती पद्धत आदर्श म्हणता येते ? बरे, आपण ज्याला नैतिकता म्हणतो ती काळाप्रमाणे आणि प्रदेशाप्रमाणे बदलत असते, हे कुणीच नाकारू शकणार नाही.

तर करावे काय ? हाणामारी ? आणि यातला मुख्य प्रश्न काय – माणसाला असंख्य बाबतींत आंतरविरोधातच जगावे लागणार का, हा ! त्या प्रश्नाचे काय करायचे ?

--- ००० ---

चित्रपटांसोबत नाटक आणि जगण्याचेही डी-कन्स्ट्रक्शन

'गोळ्या काढलेले पिस्तुल'

चित्रपटांसोबत नाटक आणि जगण्याचेही डी-कन्स्ट्रक्शन करीत, प्रतिमा आणि प्रत्यक्ष यांतील विसंगतीवर चं. प्र. देशपांडे लिखित 'गोळ्या काढलेले पिस्तुल' हे नाटक तिरकसपणे भाष्य करीत राहते. आशयाची ही ॲब्सर्ड प्रकृती मग फॉर्ममध्ये देखील साजेश्या ॲब्सर्डपणासह उतरते आणि तेही दुर्बोधपणाचा अवगुण टाळून!

नाटकं सिनेमॅटिक सादर करण्याचा ट्रेंड असण्याच्या काळात, कथानकात पलायनवादी साचेबद्ध मसाला चित्रपटांचा कॅनव्हास असतानादेखील हे नाटक आपली नाट्यात्मकता सोडत नाही. सुविद्य कुलकर्णी दिग्दर्शित हे नाटक अभिरुची, कोल्हापूरने राज्य नाट्य स्पर्धेत सादर केले.

पलायनवादी साचेबद्ध मसाला चित्रपटांतील अनेक क्लिशेज आणि धारणा यात वापरल्या आहेत. त्यामुळे वरकरणी हे नाटक उथळ विनोदी मसालेवाईक असल्यासारखे काहीजणांना भासू शकते, पण तसे ते नाही. खरेतर हा खुलासा करण्याची आवश्यकता नाही, पण अशा अर्थी काही प्रतिक्रिया कानावर आल्या म्हणून! आपल्याकडे नाटकं लोक आवडीने पाहत असतीलही, पण नाट्यसाक्षरता किती हा प्रश्नच आहे!

पुरुषप्रधान व्यवस्थेतील मनोरंजनात मध्यवर्ती व्यक्तिरेखा पुरुष नायकच असणार आणि नायिका केवळ शोभेची बाहुली. सज्जन, नीतिमान चरित्र व्यक्तिरेखा केवळ संकटात सापडून नायकास त्याचे खलनायकाविरुद्धचे नायकत्व सिद्ध करण्यासाठीच. सहनायिकेचे बलिदानही तसेच. सर्व कथानक आणि सिनेमातील साऱ्यांचे जगणं हे नायकाभोवतीच. 'सत्यमेव जयते' 'लॉस्ट अँड फाउंड' 'सेक्स अपीलचे नीती शास्त्र' अशा अनेक बाबी विशेषतः ९०च्या दशकातील चित्रपटांतील संदर्भ विडंबनात्मक पद्धतीने येथे येतात. येथे अभिनेत्यांना निव्वळ साचेबद्ध व्यक्तिरेखा साकारायच्या नव्हत्या

तर त्या साकारत असतानाच त्यातील ठिसूळपणाही डी-कन्स्ट्रक्ट करून दाखवायचा आहे. तो सर्वच अभिनयसंचाने अगदी साजेसा केला आहे.

नाटकातील बहुतांश भाग हा रजतपटावर घडतोय, असे सूचित करायचंय म्हणून तो भाग शुभ्र पांढऱ्या रंगात खेळवला आहे. याद्दष्टीने नेपथ्य विचार आणि प्रकाशविचार असो वा डी-कन्स्ट्रक्शनच्या दृष्टीने दाराच्या चौकटीचे सतत होणारे स्थानांतरही, सारेच घटक कल्पकतेने वापरले आहेत. त्यामुळे अगदी दृश्य स्तरावर देखील हे नाटक वेधक वाटू लागते. नायिका म्हणजे केवळ शोभेची बाहुली हे प्रस्थापित करताना प्रत्येक प्रसंगात तिचा वेगवेगळा आकर्षक वेष हा भुषा विचार गंमतही आणतो आणि जाणीवही देतो. 'हे चैतन्य नसलेलं शरीर असो' वा 'आशय नसलेली नुसतीच खिळवून ठेवणारी साचेबद्ध मनोरंजक माध्यमं असोत', या साऱ्यास अगदी समर्पक असणारे नाटकाचे वेधक शीर्षक सार्थच आहे ते म्हणजे 'गोळ्या काढलेले पिस्तुल' जे अंतिमतः निव्वळ टाइमपास करमणूक उपभोगू पाहणाऱ्या प्रेक्षक मानसिकतेचाही वेध घेते.

नेपथ्य- सुविद्य कुलकर्णी

प्रकाशयोजना- कपिल मुळे.

पार्श्वसंगीत- प्रसाद कोडोलीकर,हर्षवर्धन रणनवरे.

वेशभूषा- अपर्णा कुलकर्णी.

रंगमंच व्यवस्था : आनंद रणनवरे, सचिन वारके, अथर्व गोडसे, यश बुरुंग, अन्वी वालावलकर.

अभिनय संच- ऋतुराज आमते, साक्षी कवडे, धनंजय पाटील, आशुतोष देसाई, सीमा मकोटे, दृप्ता कुलकर्णी, विशाल कलंगले, धीरेन पाटील, बाळ वालावलकर, अवधूत पोतदार, अन्वी वालावलकर.

.

डॉ. अनमोल कोठाडिया

हौशी राज्य नाट्य स्पर्धा

केशवराव भोसले नाट्यगृह

१५ डिसेंबर २०२२

फोटो क्रेडिट - प्रफुल्ल सप्रे आणि राजा मकोटे

--- 0 ---

विजय केंकरे

हे मराठीतले एक आघाडीचे नाट्यदिग्दर्शक आहेत, हे आपण जाणतोच. अलीकडेच त्यांचा १०० नाटके दिग्दर्शित करण्याचा विक्रम पूर्ण झालेला आहे. ( त्यांतले एक माझे, ‘ ढोलताशे ‘ हे नाटक होते. ) व्यावसायिक रंगभूमीवर आणि विशेषत: विनोदी नाटकांच्या बाबतीत विजयला मराठीतल्या लाखो प्रेक्षकांचा मनोमन सलाम असतो. एवढी प्रदीर्घ

कारकीर्द सतत ताजीतवानी आणि खळाळती ठेवणे हे खरोखरच एक मोठे काम आहे ! आज ज्योत्स्ना भोळे सभागृहात विजयचे ' दिग्दर्शक आणि नाटक ' या विषयावर व्याख्यान किंवा प्रेक्षकांशी त्याचे अनुभव शेयर करणे म्हणा, होते. विजय सुमारे दीड तास बोलला. नाट्यक्षेत्रातील त्याच्या प्रवेशापासून ते आजअखेरपर्यंतचा त्याचा सर्व प्रवास त्याने उलगडून दाखवला. दिग्दर्शनातल्या महत्त्वाच्या बाबी तो कशा शिकत गेला ते त्याने काहीही हातचे राखून न ठेवता सांगितले. विशेषत: तरुण नाट्यकर्मींसाठी ही एक पर्वणीच होती. त्यांची बऱ्यापैकी गर्दीही होती. दिग्दर्शनातल्या अनेक खाचाखोचा आणि रहस्ये त्याने सोदाहरण विशद केली. हे अर्थातच एक संग्राह्य व्याख्यान झाले. याचे रेकॉर्डिंग केलेले आहे असे समजले. म्हणजे याचे शब्दांकन करून पुढेमागे याचा लेखही उपलब्ध होईल. आपण केलेल्या कामातून प्राप्त झालेले ज्ञान पुढील पिढ्यांना देत राहणे हा खरे तर एक सततचा प्रवाह असायला हवा. विजय या बाबतीतले त्याचे काम करत आहे हे महत्त्वाचे वाटले.

महाराष्ट्र कल्चरल सेंटर, पुणे यांनी हे विशेष व्याख्यान आयोजित केलेले होते. त्यांचे अभिनंदन आणि धन्यवाद !

--- ००० ---

या खालील गाण्याची एक गंमत आहे. याच्या चालीवर तुम्ही कोणतीही अक्षरे बसवू शकता ! तसे केले की याचे एक उत्तम बडबडगीत तयार होते ! या गीताच्या उपयोगाने मनाची पोकळी हा प्रश्नच नाही राहात ! मग एकच पायरी राहते. त्या बडबडगीताला लेट गो म्हणजे जाऊ दे करायचे की तुम्ही क्षणात एक मुक्त पक्षी होता ! करून बघा --- ( सांझ ढली --- काला बाजार. )

चित्र कळणे

मी काही चित्रकलेचे रीतसर प्रशिक्षण वगैरे घेतलेले नाही. थोडेफार वाचन आणि काही ‘ पाहणे ‘ हीच माझी या कलेतली संपर्क-सामुग्री. पण त्यामुळेच मी या विषयावर लिहिले पाहिजे असे वाटले. कोणतीही कला ही काही फक्त प्रशिक्षितांसाठी नसते – ती सर्वच इच्छुकांसाठी आणि उत्सुकांसाठी असते, हे जर खरे असेल तर मीही या विषयावर लिहायला हरकत नाही. काही वेळा, एखादा म्हणतो की अमुक कविता दुर्बोध आहे, तिच्यात काही ऐवजच नाही किंवा अमुक नाटक कितीही प्रामाणिकपणे पाहिले तरी ‘ हाताला काही लागत नाही ‘, म्हणजे काय असते हे हाताला लागणे ? त्यांनाही जेव्हा एखादी कलाकृती आवडते तेव्हा काय घडत असावे ? ते म्हणजे ‘ नको तिथंच पडला अवचित माझा हात ‘ असे काही असेल का ? बऱ्याच लोकांना नाटक पाहिले की ‘ नाट्यात्म विधान ‘ सापडावे लागते, म्हणजे मगच ते नाटक त्यांना समजले, असे वाटते. याचा अर्थ त्यांना त्याची एक वैचारिक कॅप्सूल करता यावी लागते, हे उघड आहे. हे असले सगळे घोळ कोणत्याही कलेच्या संपर्कात येताना असतातच. संगीत ऐकताना मनात वीरभावना निर्माण झाली, दु:ख वा विरह जाणवला म्हणजे ते कळले असे वाटत असावे.

चित्राच्या बाबतीत, फोटोग्राफिक चित्र काढता येणे हीही काही सोपी गोष्ट नसते, त्यालाही प्रचंड कौशल्य लागतेच. पण तेवढ्याच बाबीला सर्जक कला असे म्हणता येईल का, असा प्रश्न येतो. ज्याला इंप्रेशनिस्टिक किंवा ठसावादी वा प्रभाववादी कला म्हणता येईल तिच्यात आकार ओळखू येतात पण ते ‘ जसेच्या तसे ‘ नसतात. रंग, आकार, पोत, रचना हे सगळेच कॉपिबहाद्दरगिरीपासून लांब असते. हे नव्यानेच पाहणे आणि घडवणे असते. हे नवे काय आहे, वास्तवापासून यात वेगळे काय आहे, त्यामुळे काय घडते आहे – असा विचार  करत आणि ‘ पाहात ‘ गेले की त्या चित्रातली सर्जकता उलगडू लागते. कोणत्याही कलेत, तीत अंतर्भूत असलेल्या सर्जकतेबरोबर जाणे म्हणजे ती कळणे, हे इथे लक्षात घ्यावे. यासाठी, अर्थातच, पूर्वग्रहविरहित दृष्टीने चित्र पाहता यायला हवे. कळणे म्हणजे ‘ आपल्या सवयीत बसवणे ‘ हा विचार सोडला पाहिजे. संगीताच्या एखाद्या उत्तुंग आविष्कारात, आपल्याला हा अमुक राग आहे असे कळले नाही तरीही, आपण त्या गायकाच्या सर्जकतेबरोबर राहू शकतो. तसेच चित्रात आहे. चित्र ‘ आवडणे ‘ पासून ते ते ‘ ग्रेट आहे ‘  इथपर्यंत जाणे म्हणजे त्यातल्या सवयबाह्यतेचा, ‘ माहीत नसण्याचा ‘ प्रत्यय येणे.

अमूर्त चित्रकला तर ओळखीचे जग घेतच नाही संदर्भाला. हे अमुक आहे असे म्हणून तिथे काही संपत नाही. सर्जकता असलेली कोणतीही कलाकृती ही ‘ कळून संपली ‘ असे होऊ शकत नाही. म्हणजे प्रत्येक अमूर्त चित्र ग्रेट असते का ? उगीचच काहीही गिचमिड केले तर त्याला अमूर्त चित्र म्हणता येईल का ? या प्रश्नावर विचार करता हे लक्षात येते की प्रथमतः माध्यमावरची हुकूमत जाणवतेच. आणि त्या चित्रात जे काही आहे ते चित्रकाराच्या सखोल चिंतनप्रक्रियेतून आलेले असते. आता हे कशावरून ? तर ते चित्र पाहात राहावे असे आपल्याला वाटते आणि खुल्या मनाने आपण ते पाहात राहिलो तर त्या सर्जकतेच्या प्रक्रियेत आपण जाऊ शकतो. चित्र पाहावेसे वाटणे, आपले पूर्वग्रह सोडावेसे वाटणे आणि सवयबाह्य आशयाची जाणीव होणे ही चांगल्या चित्राची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत.

यावरून एक प्रश्न असा येतो की एखादे उत्तम चित्रप्रदर्शन मी पाहिले आणि आता मला त्यावर लिहायचे आहे तर मी काय, कसे लिहिणे अपेक्षित आहे ? तर, थोडक्यात, कोणकोणत्या प्रक्रियांनी ती चित्रे ‘ नवा ‘ म्हणजे सवयबाह्य आशय देत आहेत, हे सांगायला हवे. तेही वैचारिक सारांश न काढता.

--- ००० ---

मला जरा एक वेगळा मुद्दा दिसतो आहे -- त्याच्या सत्यतेबद्दल खात्री नाही. इतर कलांमध्ये घड्याळाचा काळ आणि मानसिक काळ या दोन्हींचे नियोजन कलावंताच्या हातात असते. चित्र आणि शिल्प हा फक्त मानसिक काळ असतो. तिथे क्रमाचे नियोजन नसते. मी असे वाचले होते की इंग्लंडमधली एक अभिनेत्री ए बी सी पासून झेड पर्यंत असे म्हणत जायची की लोकांच्या डोळ्यांत पाणी येई !

त्याने ( प्रसाद वनारसे ) आणि अतुल कुलकर्णीने चालवलेल्या रंगवर्धन या उपक्रमामुळे अनेक प्रायोगिक नाटकांचे महाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी प्रयोग होऊ शकले ! त्यांत माझे ' बुद्धिबळ आणि झब्बू ' हेही होते ! प्रिय मित्र प्रसादचे मन:पूर्वक अभिनंदन !

15-02-23.

नाटकघर, ऋजुता सोमण कल्चरल अकादमी आणि द बॉक्स निर्मित नृत्यनाट्य

मॉल प्रॅक्टीस अँड द शो

संकल्पना-दिग्दर्शन : अतुल पेठे, प्रकाशयोजना : प्रदीप वैद्य

कलाकार : ऋजुता सोमण, संगीतसाथ : उमेश वारभुवन

मालप्रॅक्टीस हा शब्द आपण अनेकदा ऐकतो. त्याचा अर्थ असतो बेकायदेशीर, वाईट, अनैतिक, शोषक वा भ्रष्टाचारी कृती. त्याची आठवण व्हावी असाच हा मॉल आहे. खरेदीचे, चंगळ करण्याचे, बेछूट ठिकाण. हे नृत्यनाट्य स्त्रीजीवनाला आलेले वस्तूचे स्वरूप विदारकपणे दाखवते.

एक नर्तिका आहे. छान, निरागस, हौसेने नृत्य करणारी. अचानक तिचे आयुष्य बदलते आणि ती निव्वळ एक उपभोग्य वस्तू बनते. नृत्य ही कला म्हणून तिच्या आयुष्यात राहात नाही. ती ज्या पद्धतीने तिचे पैंजण काढून टाकते वा त्यांचे जणू अखेरचे चुंबन घेते त्यावरून हे जाणवते. अत्यंत उच्चभ्रू वर्गापासून ते अगदी रानटीपणा वाटावा अशा वातावरणाचे दर्शन इथे घडत राहते. सुरुवातीचे तिचे छान आत्मविश्वासपूर्ण चालणे आता जणू गायब होते. ( सुरुवातीचे तिचे चालणे आणि “ पोचतेच आहे – ट्रॅफिक खूप आहे “ हे एकच वाक्य तिचे रूटीन जगणे तर सुचवतेच पण हे एक शहर आहे हेही सुचवते. ) तिच्या जगण्यात झालेला बदल एका धक्का तंत्राने आपल्यावर आदळतो. लैंगिक बाबतीतले सर्व बरेवाईट शब्द, कृती यांचे पडद्यावर कुरूप दर्शन घडते.

मध्यंतरी ती स्त्री कपडे उतरवते. सर्व आकार प्रदर्शित होतील असे. आणि तीच – वा, छान आणि कमाल – हे तीन शब्द अनेक प्रकारे म्हणते. पण हे दृश्य सादर असे होते की मुळीच उत्तेजकता दिसत नाही. नंतर एका प्रचंड काळ्या बुरख्यातून तिच्या हालचाली दिसतात. जणू तिचे व्यक्तित्व संपूनच गेलेले आहे.

या सगळ्याच्या आधी तिची एकदोन नृत्ये आहेत. पाऊस येण्याच्या नृत्यात तिची मास्टरी दिसते. सोबत पुरेसे यथायोग्य वाद्यसंगीतही आहे.

अमुक अशी एक शाब्दिक कथा सांगणे वा संवादांतून प्रेक्षकांना काही पोचवणे असे हे नाटक नाही. नृत्य, हालचाली आणि कृती यांतून आशय पोचवणारे हे नृत्यनाट्य आहे. शब्द जवळ जवळ नाहीतच. ऋजुता सोमण ही एकच कलावती हे एकपात्री ‘ जगणे ‘ पेलून नेते. अत्यंत सहज आणि गरजेप्रमाणे बिनधास्त असे सर्व प्रकार ती पार पाडते. हे उत्तेजकही वाटू नये आणि बीभत्सही वाटू नये – अशा असिधारेवरून आशय पोचवण्याचे हे अवघड काम ती सशक्तपणे पार पाडते.

यात अर्थातच दिग्दर्शन आणि तांत्रिक अंगे याची मोलाची साथ आहेच. अतुलचे नाटक म्हणजे ते किमान एका दर्जाचे असणारच – हे इथे पुन्हा एकदा सिद्ध होते.

मी असे हे नृत्यनाट्य पहिल्यांदाच पाहिले आहे. मला जाणवले तसे लिहिले आहे. एक प्रकारे हे अमूर्त नाटक आहे, त्यामुळे, ते समजून घेण्याचे स्वातंत्र्य प्रेक्षकाला आहेच. तरीही, यात चूकभूल असू शकते याची मला जाणीव आहे. सर्व टीमला धन्यवाद !

--- ००० ---

गोंदणगाव द स्टुडिओ

चित्रप्रदर्शन – चित्रकर्ती – शुभा गोखले.

हे चित्रप्रदर्शन पाहिले. मी चित्रे पाहतो म्हणजे काय करतो ? मला त्यात वापरलेल्या तंत्रातले बारकावे कळतात का ? तर नाही. आणि मला त्याची गरज वाटत नाही. संगीत ऐकताना जसे राग वा स्वरज्ञान वा त्यांतल्या तांत्रिक प्रभुत्वाच्या बाबी हे न कळताही मी त्या संगीतापुढे पूर्ण खुला होऊन त्याच्याशी संवाद साधू शकतो तसेच हे आहे. चित्रासाठी वापरलेले साहित्य, रंगांचे प्रकार वगैरे न समजताही माझा चित्रांशी संवाद होऊ शकतो, असे मला वाटते. नाटकाची तांत्रिक अंगे न समजताही प्रेक्षक नाटक पूर्णपणे ‘ पाहू ‘ शकतात. त्याच, तशाच पाहण्यानंतर ही पोस्ट लिहीत आहे.

काही काळापूर्वी मी शुभा गोखले यांचे ‘ बाजार ‘ हे चित्रप्रदर्शन पाहिले होते. त्याबाबत मी लिहिलेले एक वाक्य असे होते – “ एक प्रकारे हे अभावग्रस्त व्यक्तींचे चित्रण असूनही ते उदासी निर्माण करत नाही. “ त्याचा इथे संबंध आहे. या दालनात प्रवेश करताना आधी काही मजकूर दिसतो. त्यात असे म्हटले आहे की ‘ भरून आलेल्या जखमा सुंदर दिसतात. ‘ म्हणजेच ही चित्रे तडक दु:खाला अभिव्यक्ती देणारी नाहीत. दु:ख हा मानवी जगण्याचा भाग म्हणून त्याकडे पाहणारी आहेत. त्यामुळे इथे पिळवटलेले, जखमी झालेले, तुटले-फुटलेले चेहरे दाखवण्याला महत्त्व नाही. ही एक अधिक परिपक्वतेची प्रक्रिया आहे. या दृष्टीने आपण कठपुतळी मालिकेतली चित्रे पाहू शकतो. असंख्य प्रभावांनी युक्त असे आपले जगणे चालू असते, आपले निर्णय घेणेही प्रभावबाधितच असते. यालाच आपण ‘ मीबाह्य प्रभावांचे – म्हणजेच कठपुतळीचे जगणे ‘ म्हणू शकतो. याची माणसाला सतत जागती जाणीव असते असे नाही, पण, हे जाणवलेले असते. या चित्रांमधले स्त्री-पुरुषांचे चेहरे वा देहबोली अशाच दिसतात. या व्यक्ती ‘ त्या ‘ दोऱ्यांनी बद्ध आहेत पण त्यामुळे वैतागलेल्या वा हतबल झालेल्या नाहीत. त्यांचे मानवी जगणे सरावाने चाललेले दिसते. एक तरुण आपल्या प्रेयसीला सोबत घेत असल्याचे दिसते. या पात्रांना त्यांच्या कृती या जणू त्यांच्या स्वतंत्र कृती वाटतात. चित्रकर्ती मात्र हे सगळे ‘ समग्रपणे ‘ पाहते आहे. तसेच आपणही पाहतो. असे पाहिले जाणे हे जणू त्या बद्धतेचा तुरुंग भेदणेच ठरते.

तोच प्रकार वेगळ्या पद्धतीने, चावीवाला, चांभार, शिंपी ही कामे करणाऱ्यांच्या मालिकेतही जाणवतो. ही माणसेही प्रचंड दु:खी वगैरे दिसत नाहीत. पण इथे असे दिसते की यांतल्या कुणाचेही पूर्ण लक्ष कामात नाही आहे. सरावाने ते कामे करत

आहेत पण डोक्यात काही वेगळे विचार वा मूडस आहेत. मनाची ही एक दुभंग अवस्था आहे. माणूस पूर्णपणे वर्तमानात कधीच जगत नाही, या शोकात्म जगण्याची ही चित्रे आहेत. मासे विकणाऱ्या कोळणींच्या चित्रांतही रूटीनच्या त्रासापेक्षा ते सहज सरावाने हाताळणे आहे.

खाली पार्श्वभूमी वेगळी आणि वरील अक्रिलिक फ्रेमवर मुख्य चित्र अशी ही तांत्रिक कौशल्य एंजॉय करणारीही काही चित्रे आहेत. काही न्यूड चित्रेही अप्रतिम आहेत.

एका चित्रात एक स्त्री-पुरुष जोडी आहे. स्त्रीचा हात कमरेवर असून त्याने विरुद्ध बाजूच्या हाताने तिचा दंड धरलेला आहे. पुरुषाच्या डाव्या हाताला जरा उजळ अशी फिकट तपकिरी पार्श्वभूमी आहे, मध्ये फिकट केशरी आणि स्त्रीच्या उजव्या हाताला फिकट पोपटी. पार्श्वभूमी ना उत्साही ना क्षुब्ध आहे. तसेच त्या दोघांचे चेहरेही आपापले जे आहे ते व्यक्तित्व घेऊन अविचल आहेत. पुरुषाच्या पाहण्यात किंचित साहस आहे पण स्त्री सहज पाहते आहे. या चित्रातला कहर वेगळाच आहे. पुरुषाच्या उजव्या हातात दोन चेहऱ्यांवरून काढलेले मुखवटे आहेत. ते अर्थात त्या दोघांचेच आहेत. मुखवट्यांचे डोळे कोणतेही भाव दाखवत नाहीत पण चेहरे मात्र स्मित दाखवत आहेत. म्हणजे आता बाहेरचे औपचारिक मुखवटे उतरवून ती दोघे एकत्र आहेत. या त्यांच्या एकत्र असण्यात पुरुषाला थोडे साहस लागते आहे पण ती मात्र सहज आहे. जे आहे ते त्यांनी आहे तसे स्वीकारलेले आहे. हे असेच का असावे असा प्रश्न न विचारता.

असे किती लिहीत बसणार ? प्रत्येक चित्र आपण शांतपणे आणि खुलेपणाने पाहात गेलो तर ते आपल्याशी संवाद साधू लागते. निसर्गचित्रेही संवाद साधतात. अशा बऱ्याच चित्रांची इथे रेलचेल आहे. हे सगळे काम एकत्रितपणे पाहताना थक्क व्हायला होते.

शिवाय असंख्य प्रकारचे रंगीत दागिने, बरण्या, जार्स यांचे कौशल्यपूर्ण निर्माण आहे. स्वत: शुभा गोखले उपस्थित राहून प्रेक्षकांचे स्वागत करणे आणि त्यांच्याशी चित्रांबाबत चर्चा करणे हे करत आहेत.

या सर्व चित्रांबाबत मला विशेषत्वाने जाणवले ते असे की यांतून कोणताही संदेश देण्याचे काम घडत नाही आहे. जे आहे ते पाहणे आहे. काही ठिकाणी ' भरून आलेल्या, सुंदर दिसणाऱ्या ' जखमा आहेत तर इतरत्र, बऱ्याच ठिकाणी दुभंगत्व स्वीकारणे आहे. असेच जगायला हवे का हा प्रश्नही त्यांना पडत नसावा असे हे सवयीचे जगणे दिसते आहे.

पण, चित्रकर्तीचा हेतू असो वा नसो प्रेक्षकाच्या मनात मात्र असे प्रश्न येऊ शकतात. कोणत्याही सनसनाटीपणाशिवाय चाललेल्या सवयीच्या जगण्यात जे दुभंगत्व आणि ' स्वीकारून चालणे ' पणा दिसतो आहे तो, म्हटले तर, आपल्याही जगण्यात आहे. जाणीवपूर्वक त्याच्याकडे आपण पाहात नाही. अशी चित्रे पाहून आपण ते पाहण्याची, सजग होण्याची शक्यता आहे.

असे घडणे हाच मला सांस्कृतिक जिवंतपणा म्हणजेच शहाणपणा वाटतो.

--- ००० ---

19-04-23.

बोक्या सातबंडे ( बालनाट्य )

मूळ कथा – दिलीप प्रभावळकर, नाट्यरूपांतर – डॉ. नीलेश माने, दिग्दर्शक – विक्रम पाटील आणि दीप्ती जोशी, दृश्यसंकल्पना – प्रणव जोशी, निर्मिती – अनामिका भूमिका थिएटर्स.

सुट्ट्या सुरू झाल्या आहेत आणि हा काळ नेमका पकडत अनेक बालनाट्ये येताहेत. त्यांतले हे आज पाहिले. याच्या आधी मी तशी खूप कमी बालनाट्ये पाहिली आहेत. एक म्हणजे ‘ आविष्कार -- चंद्रशाळा ‘ चे ‘ दुर्गा झाली गौरी ‘, दुसरे, प्रकाश बुद्धिसागरने बसवलेले, ‘ आला अडाण्याचा गाडा ‘ आणि काही ग्रिप्सची नाटके. माझ्या स्मरणाप्रमाणे या नाटकांना एक साधीशी गोष्ट असते -- उदा ० हट्टी राजकन्या ताळ्यावर येणे किंवा मुलांनी एखादा गुन्हेगार पकडून देणे, असे काही. पण, हे बालनाट्य वेगळे आहे. याला अमुक एक अशी सलग कथा नाही. पात्रे तीच असली तरी पहिला अंक आणि दुसरा अंक हे तसे वेगळ्या घटनांवर रचलेले आहेत. मला हा प्रकार विशेष आवडला. ‘ पुढे काय ‘ याचा फारसा हुक न लावता मुलांना धरून ठेवणे तसे सोपे नाही. ते यशस्वीपणे इथे साध्य झालेले आहे. पहिला अंक प्राणिमैत्री च्या अंगाने जातो तर दुसरा झाडे लावा-जगवा या अंगाने. मुलांना आवडणारी भरपूर कृतिशीलता हे या नाटकाचे खास वैशिष्ट्य आहे. चापट्या मारणे, ढकलणे, पाडणे किंवा पडणे – असे काही दिसले की मुले दणकून हसतात ! शिवाय उत्तम गाणी आणि नाच आहेत – तेही उत्तम नेपथ्य आणि दिलखेचक प्रकाशयोजनेच्या पार्श्वभूमीवर. ‘ बोक्या सातबंडे ‘ हे गाणे तर मुलांमध्ये तिथल्या तिथे प्रिय झाले ! मध्यांतरात बरीच मुले ते गाणे म्हणत एंजॉय करत होती ! मुलांच्या खळखळाटात बसून हे नाटक पाहायला मलाही खूप मजा आली !

अशा नाटकाचे दिग्दर्शन सोपे नसणार. सगळ्यांकडून असे बिनचूक कामे करून घेणे – तेही ती मुले एंजॉय करतील अशा पद्धतीने ही खरोखर एक करामतच आहे ! हरणाचे पिल्लू या भूमिकेत तर एक तीनचार वर्षांची मुलगी होती ! टीम बरीच मोठी आहे – पण बोक्याच्या भूमिकेत आरुष बेडेकर मजा आणतो. नाटकाच्या शेवटच्या गाण्यात नाटकातल्या पात्रांनी प्रेक्षकांत येऊन मुलांना त्यात सामील करून घेतल्याने खूप मजा आली ! संगीत दणाणून टाकणारे – आजच्या पिढीचे आहे !

रूढ चाकोरी सोडून जरा वेगळ्या मार्गाने जाणारे, मुलांना मस्त खुश करणारे हे नाटक रंगभूमीवर आणल्याबद्दल निर्माते आणि सर्व टीमचे अभिनंदन !

--- ००० ---

काठपदर

मूळ लेखक – जिआ झेने, मूळ नाटक – द मेडस, मराठी नाट्यरूपांतर – दिलीप जगताप,

निर्मिती – लक्ष्मणझुला थिएटर्स, प्रभादेवी, मुंबई, सौजन्य – महाराष्ट्र कल्चरल सेंटर, पुणे.

हे नाटक काल पाहिले. राज्य नाट्यस्पर्धेत विविध पारितोषिके मिळवून गाजलेले असे हे नाटक आहे. जगभर मान्यताप्राप्त आणि अनेक भाषांत रूपांतरित झालेले आणि अजूनही प्रयोग होत असलेले असे हे नाटक आहे. दिलीप जगताप या

नाटकात मुरलेल्या लेखकाने केलेले हे रूपांतर असल्याने, म्हटले तर संवादप्रधान असलेले हे नाटक नाट्यमय होते, प्रेक्षकांना पकडून ठेवते. एक लक्षात घ्यायला हवे की अशी नाटके सादर करायला स्टार कलाकार सहसा येत नसतात. बहुतेक वेळा नव्या नट-नट्या आणि तंत्रज्ञ हेच धाडसाने अशी आव्हाने पेलत असतात. रंगायन, साहित्य संघ अशा नामवंत संस्था आणि समूह अशी नाटके सादर करताहेत, असे फारसे वातावरण नाही. त्यामुळे काही क्वचित रफनेस वाटला तरी या अशा प्रयोगांचे दिलखुलास स्वागत व्हायला हवे. हे म्हणत असतानाच मी इथे आधीच सांगू इच्छितो की हा प्रयोग उत्तम होतो आहे. ज्यांना झेनेचे हे अजरामर नाटक पाहायचे आहे त्यांनी संधी सोडू नये.

झेने हा एक अब्सर्ड ( मृषा ) नाटककार होता आणि तो क्रौर्य- नाटकाचाही एक पुरस्कर्ता होता. या नाटकात एक मालकीण आणि तिच्या दोन घरसेविका ( मोलकरणी वा दासी हे शब्द मुद्दाम टाळत आहे ) या तीन पात्रांमध्ये घडणारे मानवी भावभावनांचे घमासान आहे. त्या दोन घरसेविका, त्यांची मालकीण घरात नसताना आपसात एक खेळ खेळत असतात -- एकीने मालकीण व्हायचे आणि दुसरीने घरसेविका, असा तो खेळ असतो. या निमित्ताने त्या एकमेकींबाबतचे आणि मालकिणीबाबतचे मनातले सर्व गरळ ओकत राहतात. प्रेम, राग, लोभ, मत्सर, तिरस्कार अशा सर्व आविष्कारांचे एक चोंबाळे या नाटकात दिसते. कधी ना कधी आपण मालकिणीचा खून करावा असे त्यांचे स्वप्न असते. मालकिणीला द्यायच्या चहामध्ये दहा गोळ्या टाकायची शक्कल त्या लढवतात. आणखी दोन पात्रांचे उल्लेख नाटकात येतात, ती म्हणजे, मालकिणीचा प्रियकर/नवरा आणि या दोघींवर लट्टू असलेला गवळी. सर्व तपशील सांगत बसत नाही. तसे करायचे तर पूर्ण नाटकच सांगावे लागेल.

काहीजणांना हे नाटक सामाजिक वा राजकीय शोषक-शोषित यांचे वाटते, काहींना मालक-नोकर यांच्यांतल्या अन्यायी संबंधांचे वाटते तर काहींना ते समसंभोगी व्यक्तींमधल्या नातेसंबंधांचे वाटते. घरसेविकांऐवजी दोन घरसेवक घेऊन त्यांच्यांतल्या संबंधांचे नाटक, असेही हे सादर केले गेलेले आहे. याचाच अर्थ असा की वास्तव म्हणून, अमुक म्हणजे अमूकच असा ठामपणा न ठेवता अनेक प्रकारे जाणवू शकेल, असे हे नाटक आहे. इथे मी मात्र ते मानवी संबंधांतले वर्चस्व, गुलामी, छळणूक आणि सूडभावना यांचा गुंताडा म्हणून पाहतो. कोणत्याही पद्धतीने पाहिले तरी त्याने जगण्यातली वैचारिक निरर्थकता आणि एक हेतूविहीनता या या नाटकाच्या आशयाला बाधा पोचत नाही, असे मला दिसते.

नाटक पाहून झाल्यावर आम्हा मित्रांत काही चर्चा झाली. त्या अनुषंगानेही इथे काही बोलावेसे वाटते. एक म्हणजे त्या घरसेविकांचा पोषाख. परकर-पोलक्यासारखे हे असले पोषाख कुठे कोण वापरते ? मला वाटते असले वास्तव शोधणारे प्रश्न इथे अप्रस्तुत आहेत. सवयीच्या नसलेल्या या पोषाखांमुळे प्रेक्षकांत आणि नाटकात अंतर निर्माण होत असेल तर ते योग्यच आहे. यातल्या पात्रांच्या भावभावनांशी प्रेक्षकांनी समरूप व्हावे अशी इथे अपेक्षाच नाही. दुसरे म्हणजे त्या दोघींची भाषा. एकमेकींशी बोलताना त्या मधेच ग्रामीण भाषेत बोलतात पण मुख्यत: शहरी भाषेतच बोलतात. यात काहीच चुकीचे नाही. त्यांचे मूळ रूपही दिसावे एवढाच त्यात हेतू आहे. बाकी सतत त्या शहरी भाषेचा मुखवटाच वापरतात. त्यामुळे आमच्या एका मित्राला त्या पुण्यातल्या कोथरुडमधल्या घरसेविका वाटल्या ! त्याने काहीच फरक पडत नाही.

जगात कुठेही घडू शकणारे हे नाटक आहे. यातल्या वास्तवाचे निश्चितीकरण करायची मला गरज वाटत नाही. याच चर्चेत असाही एक प्रश्न आला की मुळातले झेनेचे नाटक आणि हे मराठीतले नाटक यांची तुलना करत हे नाटक बघावे का ? माझ्या मते नाही, तसे बघू नये. ज्या नाटकाचे अनेक अन्वय सादर होतात त्याच्या बाबतीत मुळातले नाटक कुठले ? मूळ आशय समजणे आणि तिथे पोचणे घडते आहे की नाही, हेच महत्त्वाचे समजायला हवे. तुलनात्मक अभ्यासू दृष्टीने पाहणे याचा अर्थ मुळातच गोंधळून पाहणे वा एक काहीतरी मुळातले म्हणून गृहीत धरून पाहणे ठरते. याचा परिणाम, अर्थातच, समोर चाललेले मराठी नाटक न पाहण्यातच होणार. तसे न करता हे एक स्वतंत्र नाटक म्हणूनच पाहिले जायला हवे, असे मला वाटते.

या नाटकाच्या सादरीकरणाबाबत माझा एक मुद्दा होता. नाटकात अनेक दृश्यांत अनेक पातळ्या आहेत, त्या अधोरेखित करत वा लक्षात घेत नाटक सादर न झाल्याने त्यातले नाट्य उणावते. याच्याच जोडीला चर्मवाद्याचे एक संगीत कमीअधिक आवाजात जवळ जवळ सतत चालू असते, त्यामुळे नाटकाला एकसुरीपणा येतो. असे झाल्यामुळे मिनिटभर का असे ना बघणाऱ्याचे अवधान हलते – नीट टिकत नाही. आणि या नाटकात तर प्रत्येक संवाद, प्रत्येक घडणे हे महत्त्वाचे आहे. या बाबतीत दिग्दर्शकाशी मी बोललो. त्याने याचा सखोल विचार केलेला दिसला. तो असे म्हणाला की हे नाटक म्हणजे, वास्तव, सत्य, असत्य, स्वप्न, भास या  सर्वांचे मिश्रण आहे. यातले अमुक सत्य आणि तमुक भास, असे मला वाटत नाही – हे एकाच वेळी हे सगळेच आहे. त्यामुळे तसा वेगळेपणा घेतलेला नाही. – हे मला शंभर टक्के पटले ! नाटकातली एखादी असली समस्या सोडवताना असा निर्णय घ्यावाच लागणार. सादरीकरणात त्या मानसिक पातळ्यांचे वेगळे वेधही घेतले असते तर कदाचित अभिनयाचा पोतही अधिक नाट्यमय झाला असता. पण, दिग्दर्शकाने केलेला विचार पाहता आपणच हे नाटक अधिक सजगपणे पाहायला हवे, हे लक्षात आले.

आता नेपथ्य आणि प्रकाश योजना. नेपथ्य काही टाळी घेणारे नाही. पुरेसे आणि योग्य आहे. पहिला अंक संपताना मालकिणीचा प्रवेश समोरच्या खिडकीत दिसण्याने तो शेवट प्रभावी झाला. प्रकाशयोजना मात्र टाळी घेणारी होती. पण, ती मन:स्थितींची तीव्रता दाखवणारी असल्याने योग्य होती. शिवाय नाटकाच्या चालू प्रक्रियेला बाध आणणारी नव्हती. ( शिवाय, राज्य नाट्य स्पर्धेत काही असे ‘ दाखवणे ‘ ठीकही म्हणता येते. )

तिन्ही अभिनेत्रींनी आपापल्या भूमिका छान वठवल्या. त्यासाठी त्यांनी घेतलेली मेहनत जाणवत होती. नाटकाची निवडलेली शैली पाहता इथे ‘ स्टार ‘ अभिनय अपेक्षितच नव्हता. नाटकाला महत्त्व देत ते सादर होणे हेच महत्त्वाचे होते. ‘ तीन सुंदर मुलींचे दणदणीत नाटक ‘ अशी त्यांना शाबासकी दिली !

एक लक्षातच ठेवावे लागते अशा नाटकात -- कसले निनावी पत्र, कसला अपराध, मालकिणीचा नवरा तुरुंगात कसा गेला, जामिनावर सुटून कसा आला – असे वास्तव चाचपणारे प्रश्न विचारायचेच नसतात. नाहीतर आयनेस्कोचे ‘ द न्यू टेनंट ‘ बघताना आपण विचारू की आपले सामान या खोलीत मावेल की नाही ते त्या भाडेकरूला आधी कळले नाही ? घेतलेच कसे त्याने ते घर ? अशा नाटकांत समोरच्या घटनांचे शारीरिक नव्हे तर मानसिक वास्तव अनेकदा व्यक्त होत असते, हे समजून घ्यायला हवे.

जाता जाता एक सांगतो. या नाटकाच्या लेखनाची प्रक्रिया मी घडताना पाहिलेली आहे. ‘ काठपदर ‘ हे नाव जगतापांना मीच सुचवले होते आणि तेच त्यांनी मुक्रर केले !

निर्माते, मुख्यत: दिग्दर्शक राजीव वेंगुर्लेकर आणि पूर्ण टीमचे अभिनंदन ! कुछ भी रहने दो मतभेद, डोक्याला जागे करणारे, चालना देणारे हे नाटक आहे ! जय हो !

--- चं. प्र. देशपांडे.

--- 000 ---

मी लिहिलेल्या, ‘ काठपदर ‘ या नाटकाच्या परीक्षणाबाबत

आदरणीय नाट्यगुरू प्रा. कमलाकर सोनटक्के यांचा प्रतिसाद ---

आपण पाठवलेल्या " काठपदर " या नाटकाच्या परीक्षणासाठी धन्यवाद.

चं प्र देशपांडे यांचं " काठपदर " या दिलीप जगताप लिखित पुरस्कार विजेत्या नाटकाचं आणि नाट्यप्रयोगाचं विश्लेषण अतिशय अभ्यासू आणि व्यासंग पूर्ण वाटलं.

चं प्र यांनी जां जेने यांच्या मूळ " द मेडस " या नाटकाची गहराई, त्यामागचा साग्र विचार, नाट्याची जातकुळी याचंही विश्लेषण केलं आहे आणि त्याबरोबरच दिलीप जगताप यांनी मराठीत केलेल्या " काठपदर " या रूपांतराचं मर्म ही अधोरेखित करून दाखवण्याचा प्रयत्न केला आहे.

सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे लेखकानं आणि दिग्दर्शकांनं या नाटकासाठी वापरलेल्या अर्ध ग्रामीण, अर्ध नागर भाषेचा केलेला वापर: याचे अन्वय त्यांनी व्यवहाराच्या पातळीवर मोठ्या कुशलतापूर्वक उलगडून दाखवले आहेत.

चं. प्र देशपांडे हे एक निष्णात प्रयोगशील नाटककार आणि नाटकावरील भाष्यकार सुद्धा आहेत. त्यांनी एक प्रकारे या नाटकाच्या रचनेपासून तो सादरीकरणा पर्यंत आणि अभिनय शैलीपर्यंत मांडलेली मतं, मग ती त्यांच्या मित्रांच्या प्रश्नाद्वारे असोत किंवा त्यांच्या स्वतःच्या मतांप्रमाणे असोत, ती खूपच प्रभावी वाटतात.

आज आमच्या आधुनिक प्रायोगिक रंगभूमीवर अशा प्रकारचे रचनात्मक भाष्यकार मिळणे ही दुर्मिळ गोष्ट झालेली गोष्ट आहे. चं प्र देशपांडे यांनी ही पोकळी सार्थपणे भरून काढली आहे.

मी स्वतः या नाटकाचे इंग्रजी भाषेत तसंच हिंदी भाषेत सुद्धा प्रयोग बघितले आहेत. या चौफेर परीक्षणामुळे हे नाटक पहिल्यांदा मला अधिक तपशीलवार अर्थांसह कळलं. यासाठी या परीक्षणाचं विशेष महत्त्व मला वाटतं.

पुन्हा एक वार दिलीप जगताप, नाटकाचे दिग्दर्शक कलावंत आणि अशा प्रकारची आशय गहन समीक्षा करणारे चं प्र देशपांडे यांचं मनापासून अभिनंदन.

कमलाकर सोनटक्के, मुंबई.

--- 000 ---

अमेरिकास्थित आमचे मित्रवर्य डॉ. अरुण प्रभुणे यांचा ' काठपदर ' बाबतचा प्रतिसाद --

चं. प्र. सारख्या प्रतिभावान नाटककार असलेल्या चोखंदळ रसिकाने आस्वादात्मक प्रतिक्रिया अगदी मनापासून लिहिली आहे.   ही प्रतिक्रिया सविस्तर, तपशीलपूर्वक लिहिलेली असून मूल्यमापनात्मकही आहेच, पण खरे म्हणजे एका निर्मितिक्षम व आस्वादक्षम मनाने अनुभवलेला नाट्यानुभवच इथं शब्दबद्ध केला गेला आहे असे ही प्रतिक्रिया वाचून वाटले.  'काठपदर'च्या नामजनकाचे व काठपदर'च्या निर्मितिजनकाचे मनापासून अभिनंदन !

--- डॉ. अरुण प्रभुणे, अमेरिका.

आमचे आणखी एक मित्रवर्य सर्वप्रिय अमोल पालेकर, ' काठपदर ' बाबत --

चंप्र आणि सोनटक्के सारख्या नाट्यकलेची सखोल जाण असणा-या नाट्यकर्मींच्या प्रतिक्रिया वाचून छान वाटलं. पुनश्च एकदा अभिनंदन! ▯▯▯

--- अमोल पालेकर.

वस्तुत: तिच्या डोळ्यांत दोष होता -- एक डोळा चंद्रासारखा होता तर दुसरा सूर्यासारखा ! पण  प्रेमात त्याचाही आनंद होतो -- जसा देवानंदला झाला --

तेरे ये दो नैना चाँद और सूरज मेरे !

ओ मेरे जीवनसाथी !

( चित्रपट ' गाईड ' )

अत्यंत बुद्धिमान निर्बुद्धपणा ---

अमर अकबर अँथनी

पूर्वी हा सिनेमा पाहिला तेव्हा एक साधा चेष्टेचा विषय वाटला होता. तीन हीरो, तीन हिरॉईन्स, एक दुरावलेले आईवडील, ज्यांनी संभाळ केला ते बाप, वगैरे, म्हटले तर खूप पसारा असलेली कथा. एक एक प्रेमप्रकरण फुलवत कधी नेणार आणि बाकीचा ड्रामा कधी दाखवणार ? पण नो प्रॉब्लेम ! मनमोहन देसाई हे ग्रेट मास्टर होते, हे आज पटले ! कथेतला एकही धागा मोकळा, अनुत्तरित न सोडणारी आणि सगळे जुने हिशोब चुकते करणारी कथा ! हा इथे कुठून आला, ती इकडे कुठे आली, हे विचारायचेच नाही ! एकदा तर परवीन बाबीचा काही गुंड पाठलाग करत असताना ती झाडाझुडुपातून, शेतातून पळत असते तर तिथे बुजगावणे म्हणून अमिताभ उभा ! हा कसा काय इथे -- पूछनेका नही ! असे खूप आहे. मी तर हा सिनेमा थोडी माझी निरर्थकतेची देन मिसळत पाहिला ! खूप मजा आली ! ही एक अबसर्ड सुखात्मिकाच म्हणता येईल ! या माझ्या पद्धतीने मी हा सिनेमा मनातल्या मनात पोट धरून हसत पाहिला ! या सिनेमावर अक्षरक्ष: एक मोठा ' दर्जेदार ' लेख लिहिता येईल ! पण मीच किती काय काय करणार ? !

माझ्या लेखनाच्याच एका कामाच्या संदर्भात मला हा सिनेमा पाहणे गरजेचे होते. तो आज पाहिला आणि प्रचंड खुश झालो. घटना या एकूणात कशाही घडतात -- या अर्थाने त्या निरर्थकच असतात -- हे व्यक्त करणारा हा सिनेमा म्हणजे आपला एक मास्टरपीस आहे ! यातला कण न कण विचारपूर्वक योजलेला आहे. इथले तर्कशास्त्रच वेगळे आहे -- पण तेही एक शास्त्रच आहे ! ते एकदा स्वीकारले की मजाच मजा -- धूम धमाल !
आता अलीकडे इतका बुद्धिमान निर्बुद्धपणा चालत नसावा. त्यामुळे, लोकांची कल्पनाशक्ती आणि घटनांकडे ' जरा वेगळ्या ' दृष्टीने पाहणेच बंद झालेले आहे ! लोक नुसतेच सवयीच्या तर्कशास्त्रात जगत स्वयंचलित जगता-मरताहेत ! आता यापुढे वेळ मिळेल तसे मी मनमोहन देसाईंचे सिनेमे पुन्हा बघत जाणार आहे ! जीनियस माणूस !
--- 000 ---

मनमोहन देसाई म्हणत की माझ्या चित्रपटाची कथा खोटी असते पण त्यातली पात्रे खरी असतात !

आदरणीय अशोक राणेजी

अशोक राणे हे आंतरराष्ट्रीय चित्रपटाचे अभ्यासक, लेखक आणि शिक्षक आहेत. मी लिहिलेली ' अमर अकबर अँथनी ' या चित्रपटावरची पोस्ट त्यांना खूप आवडली. त्यांच्या मते हा चित्रपट एक महत्त्वाचा भारतीय चित्रपट आहे. या मतामुळे काही लोक त्यांना हसत. पण मी एक समानधर्मा भेटल्यामुळे त्यांना आनंद वाटला. त्या निमित्ताने फोनवर आमचे सुमारे अर्धा तास बोलणे झाले. राण्यांनी मनमोहन देसाईंची एक प्रदीर्घ मुलाखत घेतली होती, त्याचीही आठवण त्यांनी सांगितली. अँथनी च्या भूमिकेसाठी आधी धर्मेंद्रला घ्यायचे ठरले होते, पण, त्याला वेळ नव्हता म्हणून अमिताभला घेतले गेले ! अमिताभने अर्थात त्याचे सोने केले. देसाईंच्या चित्रपटात काम करताना कलाकारांना त्यांच्या अनेक कल्पना मूर्खपणाच्या वाटत, पण, देसाईंना त्यांच्या कल्पनांबाबत पूर्ण खात्री असे ! इस्पितळात तीन मुलांनी रांगेत झोपून पाईपालाईन्स जोडल्याप्रमाणे एकाच वेळी त्यांच्या आईला रक्त देण्याचा सीन करण्यापूर्वी सगळे कलाकार पोट दुखेस्तोवर हसले होते, पण, ते दृष्य प्रत्यक्षात जबरदस्त हिट ठरले ! असे रक्त नाही दिले जात, हे सगळ्यांना माहीत असते, पण, लोक त्यामागची भावना पाहतात, असे ते म्हणत !
आ. राणे यांना मागे एकदा मी ' धूसर ' या चित्रपटावर लिहिलेले, 'लोकसत्ता ' मध्ये आलेले माझे टिपणही खूप आवडले होते. तेव्हाही आमचे फोनवर बोलणे झाले होते. मी काही चित्रपटाचा अभ्यासक वगैरे नाही पण त्या बाबतीतले माझे काही लेखन राण्यांसारख्या विचक्षण अभ्यासकाला आवडते याचा मला आनंद वाटला ! प्रत्यक्ष आमची भेट झालेली नसली तरी त्यांनी माझी अनेक नाटके बघितलेली आहेत आणि त्यांना ती आवडलेली आहेत, हे त्यांनी सांगितले. छान वाटले !
--- 000 ---

केरळ स्टोरी आणि जे. कृष्णमूर्ती

अनी बेझंट यांच्या थिऑसऑफिकल सोसायटीने जे. कृष्णमूर्ती यांना दत्तक घेतलेले होते. त्यांच्या सोसायटीच्या भाकिताप्रमाणे जन्माला आलेले विश्वगुरू ते हेच आहेत असे जाहीर करण्यात आले होते. त्यासाठी ‘ ऑर्डर ऑफ स्टार ’ नामक एक संस्था उभारण्यात आली होती. अमाप संपत्ती जमा झालेली होती. परंतु, कृष्णमूर्तींनी हे सगळे एक दिवशी बरखास्त करून टाकले. लोकांचे पैसे परत दिले. धर्म संघटित झाला की तो घातक होतो, हिंसक होतो हे त्यांना समजले होते. कोणत्याही धर्माशी, विचारसरणीशी वा राष्ट्राशी होणारी समरूपता ही माणसामाणसात फूट पाडते, संघर्ष निर्माण करते आणि हिंसा घडवते, असे त्यांचे आकलन होते. त्यांच्या स्वच्छ आकलनाप्रमाणे लोकांशी संवाद साधत त्यांनी जगभर भ्रमंती केली. ‘ मी तुमचा गुरू नाही, तुम्ही माझे शिष्य नाही ’ असे ते सांगत. त्यांच्यासह कुणावरही विश्वास ठेवू नका – जे बोलले जाते आहे त्याची सत्यता वा असत्यता स्वत:च्या जगण्यात स्वत: बघा, असे ते म्हणत. कोणताही संबंध हे आकलनाचे प्रवेशद्वार असते, असे ते सांगत. अमुक प्रणाली, तमुक कलमे, कट्टर शिस्त वा प्रचंड परिश्रम यांचा आणि सत्याचा काही संबंध नसून सत्य हा एक पथहीन प्रांत आहे, असे ते स्पष्ट करत.

धर्मवाले असोत की विचारसरणीवाले असोत, आपले मत, आपला वैचारिक ढाचा म्हणजेच सत्य असे जगभर मानले जाते. नि:शंकपणे ! त्याचे परिणाम आपण वर्षानुवर्षे पाहतो-भोगतो आहोत. तशाच एका समस्येबाबतचा हा एक सिनेमा आलेला आहे – ‘ द केरला स्टोरी ’. ही कथा खरी आहे का, हीतले तपशील खरे आहेत का, दोन समाजांत फूट पाडण्यासाठी हा सिनेमा आला आहे का, राजकीय प्रचारासाठी याची निर्मिती झाली आहे का, वगैरे अनेक प्रश्न चर्चेत आहेत. भारतात दर तीन महिन्यांत कोणत्या ना कोणत्या निवडणुका असतातच, मग असा सिनेमा काढायचाच नाही का, असे विचारले जाते आहे. हा सिनेमा अतिरेकी कारवायांपासून सावध राहण्याचा संदेश देतो आणि अतिरेक्यांना तर अमुक धर्माचे म्हणूच नये, असे आपण म्हणतो – तर मग या सिनेमाने फूट कशी पडेल, वगैरे विचारही मांडले जात आहेत. यात बाजू कोणती घ्यावी, याबाबत मत कसे मांडावे, हिताचे काय असेल, असे महत्त्वाचे प्रश्न समोर येत आहेत. या सिनेमात काही प्रश्न समोर आणले जातात – उदा – तुमच्या देवाची बायको मुळात कुणी पळवून कशी नेतो आणि तिला परत आणायला जर त्याला वानरसेनेची मदत लागते तर तसला देव कुणाचे रक्षण कसे करू शकेल, किंवा, तुमच्या देवाच्या मुलाला सुळी दिले जाते तरी तुमचा तो देव त्याला वाचवू शकत नाही, तो तुमचे रक्षण काय करणार ? आता या प्रश्नांना शाळकरी म्हणावे की सखोल म्हणावे यावरही मतभेद होतील. किंवा त्याच दर्जाचे प्रतिवादही कुणाला सुचू शकतील. मला ते महत्त्वाचे नाही वाटत. धार्मिक कट्टरता फूट पाडते हे स्पष्टच आहे, पण, त्याहून वाईट असते शहाजोग अशी वैचारिक कट्टरता. मलाच माणसाचे हित समजते हा वैचारिक भ्रम. हाही एक वैचारिक साचाच असल्याने तो अलगतेच्या, फुटीच्याच प्रक्रियेला बळ देत असतो, तिला तीव्र करत असतो, असे मला दिसते. या सिनेमाबाबतचे वाद जिंकण्याहरण्यापेक्षा यातल्या समस्येचे आकलन होणे अधिक महत्त्वाचे आहे. आपल्या शिक्षणव्यवस्थेत कुठेही या वा अशा गंभीर समस्यांच्या आकलनाला जागा नाही. त्यामुळे कोणतीही कट्टरता कोणत्याही निर्बुद्ध मतावर ‘ सत्यतेने ’ जगत राहू शकते !

दुर्दैवाचा भाग असा आहे की ‘ मत ‘ हेच स्वातंत्र्य आणि तेच सत्य या खात्रीत सगळ्यांनाच जगायचे आहे. त्यामुळे, आपापली विद्वत्ता पाजळत राहायला हा आणखी एक विषय, एवढेच याचे आपल्या जगण्यात स्थान राहील ! कशाचाही दोष दुसऱ्याला द्यायचा आणि खापर दुसऱ्यावर फोडायचे, यात आपण प्रचंड माहीर आहोतच !

--- 000 ---

' वेटिंग फॉर गोदो ' मध्ये गोदोची वाट पाहणे म्हणजे मानवी समस्येच्या बौद्धिक निराकरणाची वाट पाहणे !

प्रकाश बाळ जोशी

हे प्रख्यात चित्रकार इथे आपले एफबी मित्र आहेत. इथे ते फारसे कृतिशील नसले तरी ते अनेक पोस्ट वाचत असतात आणि त्यांच्याही विविध ठिकाणांच्या चित्र-प्रदर्शनांची माहिती देत असतात. भारतातील काही प्रमुख शहरांसह अनेक इतर देशांतही त्यांची प्रदर्शने होत असतात हे आपण जाणतोच. जोशींची माझी ओळख माझा जुना मित्र अनिल किणिकर याच्यामुळे झाली. त्यानंतर जोशींनी माझे बरेच साहित्य वाचले आणि मला सुमारे 25 चित्रे माझ्या संकेतस्थळासाठी काढून पाठवली. ती मी अर्थातच माझ्या नाटकांसाठी वापरलेली आहेत. जोशींच्या व्यक्तिमत्वाची प्रथमदर्शनी जाणवणारी महत्त्वाची वैशिष्ट्ये म्हणजे शांत, परिपक्व स्वभाव, सौम्य, शांत आणि अनाक्रमक बोलणे आणि बहुश्रुतता.

काल बऱ्याच वर्षांनी त्यांची भेट झाली. पुण्यातल्या त्यांच्या स्टुडिओत मी गेलो होतो. त्यांच्याशी सुमारे दोन तास गप्पा झाल्या. त्यांची अनेक चित्रे पाहिली. अक्षरक्ष: खजिना आहे. नुसती या स्टुडिओत असलेली चित्रे म्हटली तरी प्रचंड काम आहे. ते टाइम्स ऑफ इंडियामध्ये नोकरीला होते. त्यांनी इंग्रजीतून आणि मराठीतून बरेच लेखन केलेले आहे. टीव्हीवरच्या अनेक राजकीय चर्चांमधून त्यांचे विचार व्यक्त करताना आपण त्यांना पाहिलेले आहे. नंतर बरेचसे व्याप कमी करून त्यांनी पूर्ण आयुष्य चित्रकलेला वाहून घेतलेले आहे. त्यांची चित्रे पाहणे म्हणजे एक विशेष वेगळा अनुभव आहे.

लहानपणी, पोहायला येत नसूनही, इतरांचे बघून त्यांनी नदीत उडी मारली होती, नाकातोंडात पाणी जाणे आणि मृत्यूच्या भोज्याला स्पर्श करणे घडले होते. अर्थातच कुणितरी त्यांना वाचवले होते. तेव्हापासून नदी या प्रकाराने जणू त्यांचे मन पछाडले गेले होते. तो प्रभाव अजूनही त्यांच्या जगण्यात आहे, असे ते म्हणतात. नदीची विविध रूपे आणि रंग हे अनेकदा त्यांचे विषय असतात. हुसेनांची वादग्रस्त ‘ सरस्वती ‘ आपल्याला माहीत आहे. जोश्यांचेही त्याच नावाचे एक चित्र आहे, पण ते आहे, लुप्त झालेल्या सरस्वती नदीचे. नदीत बुडून आपण नष्ट होणे आणि स्वत: नदीचेच नष्ट होणे याचे हे एक विचित्र भावमिश्रण असावे. नदीचा दृश्य गडद निळा, त्यातल्या छटांसह असणारा शांत प्रवाहीपाणा आणि तिच्या आतला, खोलातला भाव-लाव्हा यांचे हे एक तटस्थ चित्र आहे.

माहीत असल्यामुळे हे काही तपशील दिले असले तरी ही चित्रे पाहण्यासाठी चित्रकाराची माहिती असायची गरज नाही. त्यांची अनेक चित्रे पाहिल्यावर एक बाब प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे वरून वा खालून असणारे अर्धगोल. अनेक प्रकारे,

अनेक रंगांत हे येतात. क्षितिजाचा प्रचंड विस्तार आणि अंतर्मनाचे एक प्रतिविश्व यांचा समतोल दर्शवणारी ही चित्रे वाटतात. सर्वच चित्रे अमूर्त शैलीतली आहेत. अमुक म्हणजे तमुक असे ओळखण्याचा इथे प्रश्न नाही. विचारक्रिया ही मर्यादित असते, तिचा त्याग केल्यावरच जगण्यातली मूलतत्त्वे जाणवतात, असे जोशी म्हणतात. त्यांच्या सर्वच चित्रांत रंगलेपनाची आणि रंगांच्या विविध छटांच्या लीलेची मास्टरी जाणवते. आधुनिक चित्रकला म्हणजे संघर्ष, हिंसा, गोंधळ, विदीर्णता, विनाश अशा कल्पना समोर येतात. ही चित्रे मुळीच तशी नाहीत. एका शांत तटस्थतेने स्पर्शिलेली अशी ही चित्रे आहेत. काही चित्रांची नावे अशी आहेत ( मराठी भाषांतर -- ) गोठलेल्या प्रवाहाखालचे जगणे, अनंत, वर्षावानंतरची शांतता, समुद्रगर्भ, अदृश्य होणारी नदी, आतले उद्रेक, अप्राप्य, अमाप आशा, मरण-स्वप्न, सर्वस्व गमावणे, नदीची पूजा, हिरवा मेळ, स्वप्नपक्षी उडताना, वितळणे, वगैरे. भाषेत वर्णन करत बसायची ही चित्रे नाहीत. आपले पूर्वग्रह आणि विचार-सवयी त्यागून ही चित्रे पाहिल्यास ती सखोल चिंतने ( meditations ) ठरतील.

-- 000 ---

38, कृष्ण व्हिला ( दोन अंकी नाटक )

आधीच सांगतो, हे नाटक मला आवडले. हे प्रेक्षकांनाही आवडते आहे हे पाहून आनंद वाटला. दोनच पात्रे असलेले आणि काहीसे गंभीर संवादप्रधान असलेले असे नाटक येणे ही मराठी रंगभूमीवरची एक अपवादात्मक घटना आहे. अशा नाटकाला ‘ चर्चानाट्य ‘ म्हणायची पद्धत कुणी पाडली मला माहीत नाही. मला तो शब्द अयोग्य आणि गैरसमज निर्माण करणारा वाटतो. ‘ 21 व्या शतकात राजकारणाचे साहित्यावर होत असलेले परिणाम ‘ असा एखादा विषय घेऊन आयोजित केलेला एखादा सेमिनार वा परिसंवाद ही पात्रे सादर करत नसतात. ती एखाद्या मानवी समस्येवर केंद्रित होत असतात. नुसतीच सुखदु:खे व्यक्त करणारी नसतात. मीही काहीसा एक नाटककार असून माझ्या नाटकांनाही चर्चानाट्य म्हटले जाते. हा एक समान धागा असल्याने, या नाटकाच्या लेखिका श्वेता पेंडसे यांचे मी अभिनंदन करतो. उत्तम रचना, अत्यंत कुशल कलाटण्या आणि छान, वैचारिक संवाद ( त्यात काही अशी टाळ्यांची वाक्ये – “ आपल्या हातात पत्ते कुठले यावेत हे आपल्या हातात नसले तरी हाती आलेल्या पत्त्यांनी चांगला खेळ खेळणे हे आपल्या हातात असते ! “ – वा असेच काहीसे. ) ही या संहितेतली विशेष वैशिष्ट्ये आहेत. विजय केंकरे यांच्यासारखे, ही विचार-प्रक्रिया समजून घेऊन, तिच्यातले नाट्य पकडून ते उभे करणारे दिग्दर्शक लाभणे ही या नाटकाची एक मोठी जमेची बाजू आहे. केंकऱ्यांच्या नेतृत्वाखाली बाकी सगळे तंत्रज्ञही उत्तम आहेत. दोनच पात्रांचे हे फारसे घटनाप्रधान नसलेले नाटक एका तोलामोलाने अभिनीत होणे आवश्यक होते. गिरीश ओक आणि त्यांच्यासमोर कुठेही कमी न पडता श्वेता पेंडसे यांनी ते काम खूपच सशक्तपणे पार पाडलेले आहे. काही ठिकाणी लोक अभिनय शिकायला जात असतात – मी असे म्हणेन की भाषेचे समर्थ, सुयोग्य उच्चारण, वाक्यांतल्या मधल्या जागांतला अर्थ व्यक्त करणे, अशा अनेक बाबींसाठी अभिनयाच्या विद्यार्थ्यांनी हे नाटक पाहायला हवे.

प्रश्न असा आहे की या नाटकातली पार्श्वकथा न सांगता मला इथे लिहायचे आहे. कारण पहिल्यांदा तरी प्रेक्षकांनी यातल्या कलाटण्या प्रत्यक्ष रंगमंचावर पाहणेच योग्य होईल. दुसरा एक मला जाणवलेला भाग म्हणजे नुसतेच नाटक आवडले वा नाही आवडले, एवढ्यापुरते हे मर्यादित राहू नये असे वाटते. या नाटकाच्या निमित्तानेही काही बोलले जाणे महत्त्वाचे वाटते.

योग, प्राणायाम वगैरे शिकण्यासाठी, उपचार म्हणून ते जगण्यात स्वीकारण्यासाठी मी एका योगाश्रमात एक महिनाभर राहिलो होतो. त्या काळात तिथल्या एका स्वामींचे भाषण ऐकले होते. श्रोते म्हणजे, तिथला स्टाफ आणि आम्ही 20-25 पेशंट एवढेच होतो. त्या स्वामींनी त्यांचा एक अनुभव सांगितला की एकदा त्यांच्या उपासनेत असे घडले होते की बाळकृष्ण त्यांच्या मांडीवर आला होता आणि त्यांनी त्याला चमच्याने दूध पाजले होते. ते त्यांना अत्यानंद देणारे घडले होते. पण त्यानंतर मात्र ते पुन्हा घडत नव्हते. कितीही तीव्र इच्छेने आणि प्राणपणाने प्रयत्न केला तरी ते घडत नव्हते. हे सांगत असताना त्या स्वामींचे डोळे भरून आले आणि आमच्यासमोर ते अक्षरक्ष: रडले ! यावर मला काहीही भाष्य करायचे नाही. कारण तो स्वामींचा भ्रम असेल असे आपण म्हणू जावे तर असे अनेक भ्रम बाळगत आपणही जगत असतो. कदाचित, ते तसेच पुन्हा घडावे ही तीव्र इच्छा आणि कदाचित ते पुन्हा घडणारही नाही याची भीती – हाच एक मानसिक अडथळा घडत असणे शक्य आहे. इथे जे. कृष्णमूर्तींचे एक वाक्य आठवते – creativity is effortless – सर्जकता ही प्रयासहीन असते !

यातला नायक लेखक, त्याला साहित्य अकॅडेमी पुरस्कार मिळाल्यावर, पुन्हा त्याच दर्जाचे होईल का लिहून या विचाराने घाबरलेला आहे. त्या भीतीने त्याचे लेखनच थांबलेले आहे. यशाची प्रचंड हाव हीच त्याची सर्जकता व्यक्त होण्यातला अडथळा ठरते आहे. एकाला यशाची हाव आहे तर दुसरा एक लेखक लोक-संपर्काला घाबरतो आहे. आपली प्रतिमा नीट सादर होईल की नाही याची भीती, हीच समस्या याच्या मुळाशी आहे. या अशा दोन गोष्टींच्या एकत्र येण्यातून ही एक रंजक कथा सादर होत राहते. विषय मानसिक असला तरी त्या मानसिक समस्येकडे पाहणे, हा नाटकाचा हेतू नाही. ती समस्या गृहीत धरून एक ' समृद्ध ' नाटक सादर करणे हाच हेतू आहे. जगण्यात ज्याप्रमाणे आपण समस्यांपासून दूर जाण्यासाठी काही पळवाटा वापरतो तसेच हे आहे. पण, असे न करता, त्या समस्या हाच नाटकाचा विषय केला तर प्रेक्षकांच्या सवयीच्या मन:स्थितींना ते आव्हान ठरणार. ते कसे चालेल प्रेक्षकांना ?

' व्यवस्था बदलायला हवी ' हे वाक्य वारंवार आपल्या कानावर पडत असते. आपण जी व्यवस्था म्हणतो ती असते आपल्या सर्वांच्या मानसिक हालचालींची एकत्रित परिणती. मग बदलणार काय ? थोडे हे बदल, थोडे ते बदल, असे घडते, पण, एकूणात सामाजिक रोगटपणा आणि विकृती वाढतच जाते. आपल्या जगण्यातल्या मानसिक समस्यांकडे हे नाटक निर्देश करते हे महत्त्वाचेच समजावे लागेल.

वर्चस्व हवे आहे, सुरक्षितता हवी आहे आणि अहंकाराचे पोषण हवे आहे. आणि या तिन्हींची खात्री नाही. आपापला देश सुरक्षित राहावा म्हणून सर्वांनी अण्वस्त्रधारी व्हावे आणि सगळी सुरक्षितता घालवून बसावे, तसेच हे आहे. जे हवे आहे ते न घडण्याच्या भीतीमुळे सतत समस्याग्रस्त जगणे ! हे अर्थातच प्रेक्षकांना मान्य असते आणि सहानुभूतियोग्य वाटते.

विचारच करायचा असेल तर कलेचा आणि यशाचा संबंध काय – हा प्रश्न विचारायला हवा. साहित्य म्हणजे काय अनुभवांचे रसायन घेऊन नशा निर्माण करण्याचा कुटिरोद्योग असतो का ? – हा प्रश्न समोर आला पाहिजे. पण तसे होत नाही. महत्त्वाकांक्षा असणारच ना, युद्ध तर होणारच ना – अशी मानसिकता सर्वांनी स्वीकारलेली असते. त्यामुळे, झालेले रोग आणि ओढवून घेतलेले रोग यांत फारसा फरक राहात नाही. दोन्ही अटळच मानून त्याच्या सुसह्य माफक डोसात रमून जावे, त्या पात्रांबद्दल सहानुभूती बाळगावी, अत्यंत संवेदनशीलपणे डोळे जरा पाणावूही द्यावेत आणि वा, छान म्हणावे, हेच बरे पडते. एक कला समस्यांकडे पाहण्याचे धाडस करते तर एक कला समस्यांचा वापर त्या पाहणे टाळण्यासाठी करते.

या नाटकाच्या निमित्ताने हे सगळे लिहावेसे वाटणे हाच माझा खुला अभिप्राय समजावा. नुसते काही साधक-बाधक लिहून संपवावे, असे हे नाटक नाही. सर्व टीमचे अभिनंदन आणि धन्यवाद !

--- चं. प्र. देशपांडे.

--- 000 ---

अनिल भागवत

अनिल भागवत आणि मी एकाच बँकेत म्हणजे सेंट्रल बँक ऑफ इंडिया मध्ये नोकरीला होतो. नाटक हा आम्हाला जोडणारा सेतू होता. त्यामुळे, आमची मैत्री जमली. पुढे त्याने माझ्या ‘ धागेदोरे ‘ या विद्यासागर अध्यापक दिग्दर्शित नाटकात प्रमुख भूमिका केली. हे नाटक आम्ही नव्यानेच स्थापन केलेल्या ‘ अवकाश कलामंच ‘ या संस्थेतर्फे आले होते. त्या वेळी मा. कृ. पारधी हे नाट्यसमीक्षक ‘ पुणे हेरॉल्ड ‘ मधून इंग्रजीत  नाट्यसमीक्षा लिहीत असत. आमच्या या नाटकाला त्यांनी मराठीतले एक अपवादात्मक न-नाटक म्हटले होते. अनिलने सादर केलेले ‘ मोहिले साहेब ‘ हे पात्र म्हणजे मराठीतला पहिला अँटी हीरो – न-नायक आहे, असे त्यांनी म्हटले होते. अनिल खरोखरच उत्तम करायचा अभिनय. तसा तो थिएटर अकॅडेमीचा नट. अनिलने निळू फुले, नाना पाटेकर यांच्याबरोबरही अभिनय केला होता. या कसदार नटाला त्याच्या पायाच्या दुखण्यामुळे ब्रेक लागला. परवाच आमच्या अधिवेशनात त्याची भेट झाली होती. आता तो फारसा घराबाहेर पडत नाही, फोनवर अधून मधून आमच्या गप्पा होतात. आज माझ्या या दिलखुलास मित्राचा वाढदिवस आहे ! त्याला मन:पूर्वक भरपूर शुभेच्छा !

--- 000 ---

21-06-23.

‘ विशाल सह्याद्री ‘ या दैनिकात माझे ‘ उडत्या तबकड्या ‘ हे सदर दर रविवारी प्रसिद्ध होत असे. त्यात मी लिहिलेला हा लेख बघा. मी त्या वेळी २२ वर्षांचा होतो. हा लेख पाहूनच नंतर ना. वि. काकतकर यांनी ‘ सुसा ‘ दिवाळी अंकासाठी निळूभाऊंची मुलाखत घेण्याची कामगिरी माझ्यावर सोपवली होती.

निळू फुले

'कथा अकलेच्या कांद्याची' मध्ये मी या माणसाला पहिल्यांदा पाहिलं. पाहिलं आणि ठरवलं हा माणूस ज्यात आहे असं काहीही चुकवायचं नाही. म्हणून मग परवा 'लवंगी मिरची कोल्हापूरची' पाहिलं. ' एक गाव...' वगैरे पाहणं अजून काही जमलेलं नाही. पण म्हणजे एकंदरीत सांगायचा उद्देश असा की मराठी रंगभूमीवर एवढ्या प्रचंड ताकदीनं उभी राहणारी वल्ली दुसरी नाही. हे इतकं भयंकर अफलातून असं हे एवढं एकच पात्र.

लोकनाट्यातला सोंगाड्या किंवा विदूषक हा बहुधा अतिशय गतिमान असतो. एरवीच्या विनोदात शरीर - उच्चार यांचे आणखी दोन कडक वळसे तो मिसळणारच. सारांश, अभिनय म्हणजे इरसाल, उडता, फार्सिकल प्रकार. पण निळू फुले ही असली ' गडबड गोंधळ जरा पहा ' ची धमाल धुमाकूळ अजिबात करत नाही. या माणसाचा शारीरिक अभिनय म्हणजे हिंदीतल्या राजकुमारसारखा अत्यंत माफक, कमीतकमी हालचालींनी प्रचंडात प्रचंड परिणाम साधून जाणारा.

हे या माणसाला का साधत असावं याचा मी बराच विचार केला. पण ते रहस्य पूर्णपणे कळलंय असं बोलायचं धाडस होणार नाही. म्हणजे मोनालिसाच्या स्मितासारखं काहीतरी होतं. अनेक गोष्टी जाणवतात, सुचतात आणि या सगळयांची बेरीज म्हणजेसुध्दा पूर्ण फुले नव्हे असं वाटत राहतं. आणि हे वाटणं म्हणजेच या माणसाच्या शक्तीची ओळख पटणं. या माणसाच्या व्यक्तिमत्वातलं हे गूढतेचं अस्तित्व हेच त्याच्या साध्या-सरळ पण गहन अभिनयाचं मूळ.

इतर नट आपले एक पांघरलेलं व्यक्तिमत्व घेऊन एका दिशेनं रोख लावून उभे असतात. सरळसोट स्पष्ट माणसं. पण याचं तस नाही. हा दारुड्या असेल, शिक्षक असेल, बीटनिक असेल, मंत्री असेल किंवा हल्या असेल - तो जे काय असेल ते वठवत असतो सुसंगतपणे -- पण सारखं असं वाटतं की या सगळयांपासून हा कुठंतरी दूर आहे. असं वाटतं की निळू फुले नामक एक माणूस मंत्र्याची भूमिका वठवत असून खचून भरलेला क्षणाक्षणाला हास्यानं फुलणारा प्रेक्षक समुदाय हे पाहतो आहे -- या सगळयाचं एक संपूर्ण अवधान या माणसाला असावं. त्यामुळे हा माणूस उघड उघड आपल्यासमोर अभिनय करतोय हेही जाणवत राहतं.( काहीजणांना त्याचा हा मिस्किलपणा आहे असं वाटून रागही येण्याची शक्यता आहे !) आणि तरीहि आपण स्वत:च स्वीकारलेला समोर चाललेल्या गोष्टीच्या खरेपणाचा भ्रम अबाधित राहतो, त्याचा भंग होण्याऐवजी उलट निळूनं निर्माण केलेल्या या अंतरामुळे त्या खरेपणाला जणू एक तिसरं परिमाणच लाभतं.

राम नगरकर हा माणूस एक भाबडा टारगटपणा किंवा टारगट भाबडेपणा करण्यात अस्सल पटाईत. पण त्याच्यात प्रेक्षकांवर एक सरळ सरळ आक्रमण असतं. निळूच्या अभिनयात हा आक्रमणाचा भाग नाही. तो अलिप्त असतो. हा माणूस नेहमी एक खोल गांभीर्य घेऊन उभा आहे हे आपल्याला जाणवत असतं. या माणसाचा आवाज, डोळे, बारीकसारीक हालचाली या सगळयांतून ते गांभीर्यवलय जाणवत राहतं. आणि म्हणूनच त्याच्या विनोदावर उथळपणे भडभडून हसणं शक्य होत नाही. आणि हेच या वल्लीतलं खास. आपण हसत असतो आणि आतून कुठंतरी सुटत असतो, साघे होत असतो,गंभीर होत असतो. एक निळं आभाळ फुलत असतं.

( २० ऑक्टोबर १९६८ )

Sameer S. Dalvi is with Vinayak Marathe and

- 

माझा मित्र Vinit Marathe आकाशवाणीच्या एफ एम गोल्ड आणि रेनबो या वाहिन्यांवर रेडिओ जॉकी म्हणून काम करतो. आजच्या त्याच्या शो चा विषय होता 'रंग'. त्यानिमीत्ताने त्याने माझ्याकडे विचारणा केली असता मी त्याला ज्येष्ठ साहित्यिक चं. प्र. देशपांड्यांनी चित्रकार व्ही. एस. गायतोंडेंच्या चित्रांवर लिहीलेली कवितांची मालिका सुचवली होती. आजच्या प्रसारणात त्याने या मालिकेतल्या दोनेक कविता उपलब्ध आणि मर्यादित वेळेत का होईना पण लाईव्ह वाचल्या. श्रोत्यांचा त्याला उत्तम प्रतिसाद मिळाला. हे प्रसारण ऐकणारे श्रोतेगण जगभर पसरलेले आहेत, असे मला विनितकडून कळले.

खूप आनंद झाला ! --- समीर दळवी.

मोहन आगाशे यांच्या निमित्ताने

मोहन आगाशे हे भारतातले एक मोठे आणि गाजलेले अभिनेते आहेत, हे आपण जाणतोच. शिवाय त्यांची सामाजिक प्रश्नांबाबतची सजगताही प्रसिद्ध आहे. त्यांना आज पुण्यात ' पुण्यभूषण ' हा पुरस्कार दिला जाणार आहे. हे अर्थातच आनंदाचे आणि अभिनंदनीय आहे. या निमित्ताने आजच्या ( २३-०७-२३ ) पुणे मटा मध्ये डॉ. जब्बार पटेलांचा एक लेख आलेला आहे. त्यातला हा ' जैत रे जैत ' मधल्या एका दृश्याबाबतचा भाग पहा – " माशांचे मोहोळ उठते, असा एक प्रसंग चित्रपटात आहे. हा प्रसंग जिवंत वाटावा यासाठी मोहनने महाबळेश्वरहून माशा आणायला लावल्या. चित्रीकरणादरम्यान हजार ते दोन हजार माशा आम्ही त्याच्या अंगावर सोडल्या. मोहनचे अंग लालबुंद झाले. चारपाच तास तो लहान मुलाप्रमाणे रडत होता. वेदनेने विव्हळत होता. त्या त्रासातही त्याचा प्रश्न होता, " शॉट चांगला झाला ना ? " कामाचा ध्यास आणखी वेगळा काय असतो ? "

अशाच कामाच्या ध्यासाबद्दलचा अशोक कुमार यांचा एक किस्सा ऐकल्याचे आठवते. त्यांना खूप आजारी असल्याचा एक सीन करायचा होता, तर त्यांनी काय केले असेल ? एकदा बर्फ खायचा मग त्यावर लगेच गरम कॉफी प्यायची मग पुन्हा बर्फ आणि पुन्हा गरम कॉफी असे करून त्यांनी स्वत:च्या घशाची वाट लावून घेतली आणि मग तो सीन खरेच आजारी पडून हुबेहूब खराच वाटावा असा रंगवला ! तसाच एक प्रकार ' गुमराह ' या चित्रपटाबाबत ऐकला होता. बायकोशी भांडणाचा सीन घ्यायचा होता तर त्यातले बारकावे यावेत म्हणून तो दिग्दर्शक की नट खरोखरच घरी बायकोशी भांडून आला होता ! एका चित्रपटात, बहुतेक ' खूनपसीना ' असावा, त्यात अमिताभची एका वाघाबरोबरची मारामारी दाखवलेली आहे ! त्या वेळी खरोखरचा वाघ अमिताभच्या अंगावर सोडला होता का, ते मला माहीत नाही. पण नसावा, कारण पुढे आणि अजूनही तो अनेक चित्रपटांतून कामे करतो आहे !

मला प्रश्न असा पडतो की अभिनय प्रभावी व्हावा म्हणून खरेच असे नटाचे वा नटीचे हाल करायची गरज असते का ? तसे असेल तर हे अमानुष नाही वाटत ? ' या चित्रपटात पशुपक्ष्यांचे कोणतेही, कसलेही हाल करण्यात आलेले नाहीत ' असे

एक निवेदन चित्रपटापूर्वी दिले पाहिजे, असा एक कायदा आहे. त्याचप्रमाणे ' या चित्रपटातील कोणत्याही कलाकार व्यक्तीचे कसलेही हाल करण्यात आलेले नाहीत ' असे एक निवेदनही बंधनकारक करावे का ?
एखाद्या मित्राला गंमतीने म्हटले जाते, " ती वेड्याची भूमिका तू उत्तमच वठवशील – तुला अभिनय करायची गरजच नाही ! " तर ते असो. खऱ्या गोष्टींची अभिनय म्हणून दाद मिळवणे हे कितपत योग्य वाटते ? मग तर एखाद्या चलती असलेल्या हीरोची चंगळच होईल ! त्याच्या चित्रपटातल्या त्याच्या प्रत्येक प्रेयसीला त्याच्यावर खरोखरचे प्रेम करायला लावावे लागेल !
पण मग एखादा चित्रपट स्टुडिओ जळल्यावर त्या स्टुडिओच्या मालकाला खूप दु:ख होते, असे दृश्य घ्यायचे असेल तर खरोखर पेटवून द्यायचा एखादा स्टुडिओ ? आणि मग भ्रष्टाचारात पकडला गेल्याने खजील झालेल्या किंवा बलात्काराच्या गुन्ह्यात एकजण फाशी जाणार आहे, असे दृश्य घ्यायचे असेल तर ?
काहीतरी चुकते आहे, असे नाही वाटत ?
--- ००० ---

जगण्यात थोडी मोकळी स्पेस हवी -- बघा -- यू ट्यूबवर आयनेस्कोची फक्त ३० मिनिटांची एकांकिका –
' द न्यू टेनंट '.

दादासाहेब फाळके पुरस्काराबद्दल वहीदा रहमान यांचे अभिनंदन ! या निमित्ताने त्यांचे हे एक सुंदर गाणे ---
लाली लाली डोलिया मे –

माझी तेलगी लिंक --
२०१७ साली, माझे, ' प्रेमच म्हणू याला हवं तर -- ' हे नाटक, ' रिनोव्हेशन ' या नावाने हिंदीत आले होते. ' अ व्हेरी सीरीयस कॉमेडी ' ( एक अत्यंत गंभीर हास्यात्मिका ) अशी त्याची जाहिरात होती. सर्व जातिधर्मांच्या प्रेक्षकांची याला गर्दी होत असे. त्यात, गगन देव रियार आणि मंजिरी पुपाला हे दोन कलाकार काम करत असत. विशेष म्हणजे, त्यातला गगन देव सध्या तेलगीच्या भूमिकेत गाजतो आहे ! म्हणजे पाहिलेत ना -- अखिल भारतीय कीर्ती संपादन केलेला एक पाताळयंत्री वीर तेलगी आणि माझ्यासारखा एक साधा निरुपद्रवी लेखक यांची कशी लिंक लागते ते !

या कामासाठी माझ्या मुलाच्या एका मित्राने त्याला हे श्री. शंतनू पांडे यांचे नाव सुचवले. ते घरी आले तेव्हा मी फोनवर कुणाशीतरी माझ्या पुस्तकांबाबत बोलत होतो. ते ऐकून त्यांनी मुलाकडे सहज चौकशी केली. तर तो मी आहे हे कळल्यावर त्यांना खूप आनंद झाला ! नाट्यक्षेत्रात त्यांनीही लेखन, दिग्दर्शन, अभिनय असे बरेच काम केलेले आहे -- तेही मराठीतल्या अनेक दिग्गजांबरोबर ! या ओळखीमुळे आमच्या बऱ्याच गप्पा झाल्या. माझाही दिवस छान गेला !

मजा आली !

--- ० ---

आज -- कोल्हापुरात -- काफ्काची जगन्मान्य कादंबरी -- नाट्यरूपात रंगमंचावर ! -- शक्य असेल त्यांनी जरूर बघा ---- ट्रायल.

परवा २०-१२-२३ ला कोल्हापुरात सादर झाले -- ' ट्रायल ' –

ट्रायल – परीक्षणांवरच्या दोन पोस्ट.

आज रात्री ९-३० वाजता, भरत नाट्यमंदिर, पुणे इथे, माझे नाटक
-- ' ढोलताशे '

चंद्रकांत कल्लोळी

हा माझा मित्र आणि मी, आम्ही ' प्रत्यय ' वाले ! कोल्हापूरचा एक नाट्यमंच ! १९७६ ते ७९ या काळात आम्ही एकत्र होतो. अनेकदा भेटीगाठी होत. माझ्या, ' एक गगनभेदी किंचाळी ' या नाटकात त्याने मोरेकाका या एका ज्येष्ठ चाळकऱ्याची भूमिका केली होती. शक्य तो भांडण नको, एकोपा राहावा अशा वृत्तीचे हे एक सगळ्यांच्या डोक्यांवर वरदहस्त ठेवणारे पात्र होते. ते त्याने अप्रतिम वठवले होते. " विचार केला पाहिजे यावर ! " या संवादात कुठे आहे विनोद ? पण ते तो असे म्हणे की दिलखुलास हसू यावे !

एक चांगला नाट्यसमूह म्हणून आमची जरा प्रसिद्धी होती. त्यामुळे काही नाटककार आमच्याकडे त्यांची नाटके वाचून दाखवत. असेच एक भावोत्कट, अतिनाट्य एका लेखकाने वाचले होते. त्यात मधून मधून अत्यंत कृतक म्हणावेत असे नाट्यमय संवाद होते. तसा संवाद आला की हा आमचा मित्र, स्वत:च्या डोक्यावरचे केस पुढे ओढून, त्याच्या चष्म्यातून, चकितपणे त्या लेखकाकडे पाहात असे ! ही त्याची कृती माझ्या तरी डोक्यात अमर झालेली आहे ! ( निदान मी असेपर्यंत तरी ! ) पण असे प्रकार न हसता, गंभीरपणे पचवण्याची कला आम्हा सर्वांनाच अवगत होती !

कुणालाही माहीत असण्याची शक्यता नाही अशी त्याची एक आठवण सांगतो. मी सेंट्रल बँक ऑफ इंडियात आणि तो बँक ऑफ इंडियात होता. त्याच्या बँकेकडून मागणी झालेला एक चेक आमच्या बँकेकडून पेमेंट झाला होता. आणि तो चेक आमच्या संबंधित खातेदाराकडून ' स्टॉप पेमेंट ' म्हणजे ' हा माझा चेक पास करू नये ' अशी सूचना दिलेला होता. माझ्या एका सहकाऱ्याकडून तो चुकून पास झाला होता ! ते पाहून तो संबंधित खातेदार ओरडत होता. माझ्या एकदोन सहकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई होण्याचा धोका होता ! या माझ्या मित्राची शाखा जवळच होती. मी जाऊन त्याला

गाठले. ते पेमेंट अजून पुढे गेलेले नाही याची खात्री करून घेतली. त्या वेळी या माझ्या मित्राने  पूर्ण सहकार्य देऊन तो चेक परत घेणे आणि आमच्या बँकेचे पैसे परत देणे हे काम करून माझ्या सहकाऱ्यांवरचे संकट टाळले होते ! त्याच्या ऑफिसातल्या अनेकांनी त्याच्या सांगण्यावरून हे काम करणे ही एक विशेष बाब होती !
गेली काही वर्षे आमचा फारसा संपर्क नव्हता. फेसबुकवर अनेकदा त्याच्या कलात्मक फोटोग्राफीचे मात्र दर्शन होत होते. खरोखर छान, दिलखुलास मित्र ! त्याच्या स्मृतीस मनापासून अभिवादन !
--- ००० ---

आदरणीय प्रिय पै. मोहंमद रफी यांचे जन्मशताब्दी वर्ष सुरू झाले आहे, असे वाचनात आले. त्या निमित्ताने, त्यांनी गायलेले माझे हे एक आवडते गाणे --- साथी ना कोई मंजिल –
--- 2023 posts  end –

हजारो पात्रांचे जन्मदाते ! स्मृतीस अभिवादन ! ( रंगभूषाकार प्रभाकर भावे )।

माझ्या, ' एक गगनभेदी किंचाळी ' या नाटकातले अविस्मरणीय मोरेकाका ! ( चंद्रकांत कल्लोळी )

माझ्या ' ढोलताशे ' चा पहिला हीरो ! खूप शुभेच्छा ! ( अजित भुरे )

पुस्तक तर महत्त्वाचे आहेच, त्याचप्रमाणे, तुझे ते समजून घेण्याची प्रक्रिया मांडणेही ! उत्तम !
( लाख्यांच्या ‘ नाटक : मुक्त चिंतन ‘ – या पुस्तकावरची समीर दळवी यांची पोस्ट ).

( माझ्या ‘ वस्तू ‘ या नाटकावरच्या लाख्यांच्या पोस्टवर – )
हे नाटक कै. अरविंद देशपांडे महोत्सवात झाले तेव्हा सुलभा देशपांडे आणि रोहिणी हट्टंगडी आल्या होत्या. त्या दोघींनाही नाटक खूप आवडले होते.

गिरीश साळवी हा माझा एक उत्तम दोस्त आणि मोठा नट होता. तेंडुलकरांच्या कथेवर आधारित, ' चौऱ्याहत्तर पावसाळ्यांचा जमाखर्च ' हा गिरीशचा एकपात्री दीर्घांक ज्यांनी त्या वेळी बघितला त्यांनी मराठी रंगभूमीवरचा एक अपवादात्मक चांगला प्रयोग बघितला, असे मी म्हणेन. संवादफेक आणि टाइमिंग यांत तो मास्टर होता. तो दीर्घांक गिरीश पतके या माझ्या बुद्धिमान दिग्दर्शक मित्राने बसवलेला होता. आम्ही अनेकदा एकत्र येत असू. रात्री उशिरा मला पुण्याच्या एशियाड मध्ये बसवून मगच घरी जायचे हे त्याचे व्रत होते ! आपला लेखक म्हणजे जीव की प्राण असे

मानणारा एक वेडा माणूस ! माझ्या ' बुद्धिबळ आणि झब्बू ' मध्ये त्याने ठाकूर ही इरसाल भूमिका केली होती. माझ्या, गिरीश पतकेनेच बसवलेल्या ' डावेदार ' या नाटकातला कनफ्यूज्ड कम्युनिस्ट त्याने अप्रतिम रंगवला होता. दोन्ही गिरीश एकमेकांना भटा आणि जाड्या यांसह अनेक अर्वाच्य शिव्या देत. मजा येई ! तो मूर्ख माणूस, आम्ही अनेकदा ' काळजी घे ' असे सांगत असूनही लौकर गेला !

चेतनने माझे ' इराक ' हे नाटक दिग्दर्शित केले होते ! स्मृतीस अभिवादन !

Swapnil Chavhan
माझ्या करिअर मधले एक अविस्मरणीय नाटक! वस्तू!!
Champra Deshpande
Swapnil Chavhan जबरदस्त व्हायचा तुमचा प्रयोग ! भले भले अवाक व्हायचे !

सुरेशचंद्र पाध्ये यांनी माझ्या अनेक नाटकांवर विचक्षण समीक्षा लिहिली होती. त्याबद्दल अर्थातच मी ऋणी आहे. त्यांना मिळालेल्या या सन्मानाबद्दल मी त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो !

2024 ---

अनिल भागवत
हा माझा एक जवळचा मित्र आज गेला. आम्ही दोघेही सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे कर्मचारी म्हणून सेंट्रलाईटस. तसेच आणखी एक महत्त्वाचे म्हणजे तो माझ्या ‘ धागेदोरे ‘ या नाटकाचा नायक होता. खरे तर न-नायक ! त्या नाटकाची अनेक ठिकाणी परीक्षणे आली होती – त्यांतले एक होते मा.कृ. पारधी यांचे पूना हेराल्ड मध्ये आलेले इंग्रजी परीक्षण. त्यात त्यांनी म्हटले होते की हा मराठीतला पहिला अँटि-हीरो आहे ! तो खरोखरच उत्तम काम करायचा. तो थिएटर ॲकॅडेमीचा एक महत्त्वाचा नट होता. तसाच, पी डी ए चा एक महत्त्वाचा नट असलेला आमचा आमच्या बँकेतलाच एक सहकारी कै. विश्वास गद्रे हाही त्या नाटकात होता. विश्वास तसा साधा, सज्जन पण अनिल जरा टगेगिरी करायचा. विश्वासच्या तो अनेकदा फिरक्या घ्यायचा. त्या दोघांचे संवाद ऐकणे हा एक विशेष आनंद असायचा.
अनिलने थिएटर ॲकॅडेमीच्या अनेक नाटकांतून कामे केली. एका टीव्हीपटात तो निळू फुल्यांबरोबरही होता. ‘ पक पक पकाक ‘ या चित्रपटात त्याने नाना पाटेकरांबरोबरही काम केले होते. बँकेचे जग हाताळणाऱ्या एका टीव्ही मालिकेत त्याने एक महत्त्वाची भूमिका केली होती. उत्तम नट आणि दिलखुलास मित्र ! आम्ही दोघेही एकमेकांना मध्येच कधीतरी निव्वळ आठवण आली म्हणून फोन करायचो. अलीकडे त्याला पायाचाही त्रास होता. तो फारसा बाहेर पडत नसे. पण सुमारे दोन

महिन्यांपूर्वी आमचे एक निवृत्तांचे अधिवेशन झाले होते, तेव्हा आमच्याच एका सहकाऱ्याच्या मदतीने तो आला होता. तेव्हा आमचे बोलणे झाले होते.

त्याची एकच काय, अनेक स्मृती आहेत – त्या सर्व स्मृतींना सादर अभिवादन !

--- चं. प्र. देशपांडे.

तो राजहंस एक ( दीर्घांक )

ले ० दत्ता पाटील, दिग्द ० सचिन शिंदे,

निर्मिती ० सोशल नेटवर्किंग फोरम आणि परिवर्तन.

हे एक अप्रतिम, उत्तम नाटक काल पाहिले. दत्ता पाटील हे एक उत्तम लेखक आणि सचिन शिंदे हे एक उत्तम दिग्दर्शक असल्याचे मला माहीत होते कारण या द्वयीचे दोन दीर्घांक, ' हंडाभर चांदण्या ' आणि ' गढीवरच्या पोरी ' हे मी पूर्वी पाहिलेले होते. हाही दीर्घांक तसाच दर्जेदार म्हणावा असा होता.

याचे नाव जरा रोमँटिक होते पण, विषय-आशय परखड, लहान शेतकऱ्याच्या मुलाच्या समस्या हा होता. यातला नायक हा शेतकऱ्याचा मुलगा असून एम ए झालेला आहे. शेतीतले तुटपुंजे उत्पन्न, कर्जाचा बोजा, नोकरी नसणे आणि या सगळ्या परिस्थितीमुळे लग्नाच्या जगात मुलींकडून सारखे नकार येत जाणे, असे हे उजाड जगणे आहे. चौतीस नकारांनंतर तो पस्तीसाव्या नकाराच्या वेळी मात्र त्या मुलीशी बोलायचे ठरवतो. ते दृश्य, प्राजक्त देशमुख आणि ईशा संजय यांनी त्यातल्या सर्व गुंत्यासह प्रभावीपणे सादर केले. या नायकाचे लग्न होत नसल्याने तो आपल्या बायकोकडे ' वाईट ' नजरेने पाहतो, असा त्याच्या भावाला संशय आहे. नायकाच्या दु:खावर भयानक डागण्या देणारा हा प्रकार आहे. या सगळ्या प्रकारात त्याचा पब्या नावाचा मित्र मात्र त्याची साथ देत राहतो आहे. त्याची आई गेलेली असून वडील परिस्थितीने गांजलेले आहेत.

हा सुस्वभावी, साधा, सज्जन नायक कवीही आहे. त्याच्या दु:खी अनुभवातून येणाऱ्या कविता तो लिहितो. " कविता लिहून काही नाही होत " हे पालुपद तो अनेकदा उच्चारतो. विशेष म्हणजे त्याच्या कवितांतून हत्ती, राजहंस – अशा प्रतिमा येतात. हत्ती नसला की त्याच्या त्या रिकाम्या जागेत आपण आपला हत्ती तयार करायचा, असे काही तो बोलतो. आपल्या भूतकाळाने आपण आपला वर्तमानकाळ भरून टाकतो – असे सखोल म्हणावे असेही त्याला काही सुचते. तो एक संवेदनशील आणि चिंतनशीलही असा एक कवी आहे. कविता लिहून काही होत नाही असे म्हणणाऱ्या या कवीला आपल्या हातून जागतिक दर्जाचे काही लिहून होत नाही याची खंत आहे आणि त्या बाबतीत तो निराशावादीही आहे. इतके दु:ख असूनही त्यातून जागतिक महत्त्वाचे असे का नाही काही निर्माण होत, असा एक प्रश्न हे नाटक समोर आणते. इथे शेतकऱ्याने आत्महत्या करण्या ऐवजी त्याच्या मुलाने या विचित्र समस्यायुक्त परिस्थितीने आत्महत्या करण्याची शक्यता व्यक्त होते. " आत्महत्या करायची तर मागे ठेवायच्या चिठ्ठीतला मजकूर एकाच पानात मावला पाहिजे, अशी पद्धत आहे " असे उपरोधिक वाक्य तो बोलतो.

दत्ता पाटील या अलीकडच्या काळातील सशक्त लेखकाने हे नाटक म्हणजे नुसतीच एक विद्रोही, परिवर्तनवादी प्रतिक्रिया म्हणून लिहिलेले नसून या समस्येचे सर्वांगीण भान व्यक्त करणे, हा व्यापक आवाका घेतलेला आहे. त्यामुळे हे एक ' वेगळे ' नाटक ठरते. अर्धवट, अपूर्ण वाक्यांचे संवाद, काही रोमँटिक वा अतिवास्तववादी कविता यांच्या योगाने त्यांनी या संहितेला एक व्यापक परिमाण दिलेले आहे. या सशक्त संहितेला रंगमंचावर सादर करण्यात दिग्दर्शक सचिन शिंदेही तोडीस तोड यशस्वी झालेले आहेत. ही जोडगोळी मराठीत अशा अनेक उत्तमोत्तम कलाकृती सादर करत राहील, यात शंका वाटत नाही.

विशेष उल्लेख केला पाहिजे तो म्हणजे प्राजक्त देशमुखचा. या नाटकातली त्याची नायकाची भूमिका खूपच आव्हानात्मक होती. साधारणत: भरकटण्याच्या काठावर असलेला पण तरीही बराचसा नीट असलेला असा हा नायक उभा करणे सोपे नाही. हालचाली, विराम, आवाजातले चढ-उतार यांचे खूपच वैविध्य प्राजक्तने दाखवले. हा अभिनयातला सूक्ष्मपणा इतका आहे की तो प्रत्येक प्रयोगात वेगळाच असणे भाग आहे. प्रत्येक वेळी नव्याने सादर करायची ही भूमिका आहे. प्राजक्त हा एक मराठीला मिळालेला खूपच आश्वासक, चिंतनशील नट आहे, असे मला वाटते.

साधेसे नेपथ्य, पुरेसे संगीत, प्रकाशयोजना – हे सर्व उत्तम ! सर्व टीमचे खूप खूप अभिनंदन !

--- ००० ---

कोट्यवधी भारतीयांचा प्यारा आवाज -- अमिन सायानी ! बिनाका गीतमाला ऐकणे हे आमचे बुधवार-व्रत होते ! सादरीकरणातले अजब नाट्य ! सलाम !!!

एकाच वेळी मराठीत ( पुणे ) आणि इंग्रजीत ( अमेरिका )
वाजणारे --- ( ढोलताशे )

पुन्हा उत्तर-आधुनिक ---

रूम नं. १३

ले ० दिग ० दिलीप वेंगुर्लेकर, निर्मिती – पी डी ए , पुणे.

प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशन, पुणे या संस्थेने माझी चार नाटके पूर्वी सादर केलेली आहेत – नाणेफेक, एक गगनभेदी किंचाळी, सामसूम आणि जिंदगी ख्वाब है. त्यामुळे, अर्थातच मला या संस्थेबद्दल आत्मीयता आहे. तर ते असो. कालच मी उत्तर-आधुनिक या विषयावर लिहिले तर आज हे उत्तर-आधुनिक म्हणावे असे नाटक ! याच्या नावातला १३ हा आकडा बघून आपल्याला वाटते की शुभाशुभाबद्दल काही असणार ! आणि रूम नंबर वगैरे म्हणजे ते रहस्यमय असणार ! उत्तर-आधुनिकतावाद हा बुद्धिप्रामाण्यवाद नाकारतो, एवढेच इथे सांगून ठेवतो.

आमची मुले लहान असताना आणि पत्नीच्या भाचे-भाचीला मी एक उंटाची गोष्ट सांगत असे. उंटावर बसलेला व्यापारी आणि वाळवंटातून चाललेला उंट. कधी सकाळ, कधी रात्र, कधी वादळ, वगैरे. मग तो उजवीकडे वळे, मग त्याला लांब एक गाव दिसे. तिथल्या हॉटेलात जाऊन तो उंटाला चारापाणी करे, मस्त आंघोळ करे, वगैरे. पुन्हा सकाळी सुरू. अनंत गोष्ट. मुले रंगून जात. ते सगळे आता मोठे झाले आहेत पण अजूनही त्यांना ती उंटाची गोष्ट आठवते ! तसेच हे नाटक. तुम्हाला गुंगवल्याशी मतलब. तर्क वा कथेचे गांभीर्य वगैरे शोधायचेच नाही.

" ओहोटी लागली की कळते कोण कोण कपड्यांशिवाय पोहत होते, ते ! " तुम्ही सवयीने जरा हसाल पण याचा काही गंभीर अर्थ असावा असे समजून विचारात पडाल. इथे तुम्ही फसाल. या नाटकात अर्थबिर्थ लावत बसायला मनाई आहे. आणि तरीही आपल्या जगण्याचा असाच तर आहे पट हे जाणवून तुम्ही घरी जाताना पुन्हा एकदा हसाल.

उत्तर-आधुनिक चे म्हणणे आहे की सत्यबित्य, सखोलबिखोल, मूल्यात्मक वगैरे असे काही नसते. आपले जगणेही निरर्थक आणि उथळ असते, तशीच कलाही उथळच असते ! काही विनोद चांगले आहेत, काही हालचालींतून विनोद घडतात, पण, बरेचसे विनोद तुमच्या-आमच्यांतले हौशी विनोदवीर करतील तसेही आहेत ! कुछ फरक नही पडता. पहिलाच प्रयोग होता, सफाई येत जाईल. कंप्लीट तथ्यहीन, उथळ, उत्तर-आधुनिक नाटक ! हे निश्चितच समजून-उमजून उत्तर-आधुनिक म्हणून लिहिलेले नाटक नाही. हा काळाचा महिमा आहे. या काळाने त्याची प्रतिकृती या नाटकातून सादर केलेली आहे.

कलाकार सगळे नवीन आहेत, पण, नवखे आणि कच्चे नाही वाटले. वेंगुर्लेकरांनी छान कामे करून घेतलेली आहेत. त्या बबनच्या साथीदार झालेल्या मुलीला अजून खूप मजा करणे शक्य आहे. तिने नाटकात जरा जास्त गुंगून जाणे आवश्यक आहे. बाकीचेही अधिकाधिक सफाई आणत जातीलच.

नेपथ्य, प्रकाश, संगीत नाटकाची रंगत वाढवण्याचे काम करतात.

हे नाटक प्रायोगिक आहे की व्यावसायिक ? प्रायोगिक समजून चौकोनी चेहरे करून नका जाऊ. मजा म्हणून जा आणि आपल्याच जगण्याची झेरॉक्स पाहून खुश व्हा !

या भवसागरात आपणच पोहत आहोत – हे नाटक म्हणजे त्या सागरातली ओहोटी आहे ! यावरून काय समजायचे ते समजा !

पी डी ए झिंदाबाद !

--- ००० ---

स्वातंत्र्यवीर सावरकर ( २०२४ )

हा चित्रपट पाहिला.

रणदीप हुड्डा चा आवाज आणि अभिनय उत्तम.

त्याने घेतलेले कष्टही जाणवतात.

पण

एकाच पोतडीत खूप गोष्टी कोंबण्याचे प्रयत्न

आणि सतत वाजणारे अति-भव्य पार्श्वसंगीत

या दोन गोष्टी या चित्रपटाला मारक ठरलेल्या आहेत.

बाकी राहिला प्रश्न इतिहासाचा.

इतिहास कधीच माझ्या आवडीचा विषय नव्हता आणि नाही.

निदान दोन महायुद्धांचे तरी नीट अभ्यासून डोक्यात साठवून ठेवावे म्हणून मी अनेकदा प्रयत्न केले.

ते फेल गेले.

मी ‘ इराक ‘ हे नाटक लिहिले तेव्हा त्या विषयाचा खूप अभ्यास केला होता.

ते नाटक माझ्या मते उत्तम लिहून झाले पण आता ते तपशील गेले आहेत डोक्यातून.

सारांश, इतिहास हा माझा विषय नाही.

त्यासाठी भले भले जंगी पैलवान खूप आहेत आपल्याकडे !

--- ००० ---

१९५८ साली येऊन गेलेल्या ' साधना ' या चित्रपटातला एन. दत्ता यांच्या जबरदस्त संगीताने नटलेला नृत्यसम्राज्ञी वैजयंतीमाला यांचा बेफाम नृत्याविष्कार ---गायिका ग्रेट लता मंगेशकर ---

‘ कहो जी तुम क्या क्या --- ‘ .

इवलेसे रोप ( दोन अंकी नाटक )

ले ० आणि दिग ० सई परांजपे, निर्मिती -- खेळिया प्रॉडक्शन्स, मुंबई.

“ ते रोप कशासाठी होते नाटकात ? त्याला इवलेसे का म्हटले ? “ असे प्रश्न प्रेक्षकांना पडले नाहीत. अगदीच सरळ माहितीच्या रूपात नसलेले आणि उलगडून न सांगितलेले प्रेक्षकांनी स्वीकारले, हे छान वाटले. नुसताच थोडाफार जाणवू शकणारा असा अर्थ काहीसा वास्तववादाच्या पुढे गेल्याचे समाधान वाटले. एका साध्या, सामान्य जोडप्याचे हे नाटक. आता दोघेही वयस्कर आहेत पण त्यांचा काही भूतकाळही त्यांच्या बरोबर आहे. वर्तमान आणि भूतकाळ यांत हे नाटक हेलकावत राहते. तीच दोन पात्रे आलटून-पालटून तरुण व वृद्ध अशी दिसत राहतात. मंगेश कदम आणि लीना भागवत यांच्या उत्तम अभिनयाबरोबरच त्यांची वयबदलातली सफाईही दिसत राहते. बाकी रूटीन असलेल्या आयुष्यात दोनच जरा धक्कादायक म्हणाव्यात अशा घटना घडलेल्या असतात. ( कोणत्या ते नाही सांगत ) नाटक तसे त्या दोघांच्या मृत्यूपर्यंत जाते पण विशेष म्हणजे चक्क एक नाट्यगत खोटेपणा वापरून शेवट गोड होतो ! या नाटकातले सौम्य नाट्य, हलकेसे विनोद आणि विशेषत: इतकी वर्षे टिकलेल्या पति-पत्नी आसक्तीची दृश्ये यांमुळे हे एक गोड, गुलाबी, रोमँटिक

नाटक प्रेक्षकांना खुश करत राहते. या नाटकातले रोप आणि शेवटाकडचा नाट्य माध्यमाचा उपयोग हे छान वाटले. आयुष्यात काही घटना घडून गेलेल्या असल्या तरीही त्यांचे प्रभाव टाकून देऊन जगता येऊ शकते, अशा जाणिवेचा शेवट छान वाटला.

लीना भागवत आणि मंगेश कदम हे कसलेले कलाकार आहेत. प्रदीप मुळ्ये यांचे जादुई सादरीकरणासाठीचे आसान नेपथ्य, सुंदर प्रकाश योजना आणि सौम्यसे साजेसे संगीत ! या सर्वांमुळे, भडक नाट्य नसलेला हा प्रयोग प्रेक्षकांना आवडत जातो.

एका साध्या हलक्याफुलक्या वातावरणात, काही आव्हानात्मक आशय वा थोडक्यात म्हणजे ‘ डोक्याला ताप ‘ नको असेल तर छान आहे हे नाटक. थकल्या-भागल्या मराठी प्रेक्षकांना हे नक्कीच सुखावत राहील.

तसे हे नाटक म्हणजेही एक इवलेसे रोपच आहे.

--- ००० ---

चाणक्य ( दोन अंकी नाटक )

मूळ हिंदी लेखक – मिहिर भूता, मराठी अनुवाद – शैलेश दातार, दिग्दर्शक – प्रणव जोशी,

नेपथ्य – संदेश बेंद्रे, पार्श्वसंगीत- निनाद म्हैसाळकर, प्रकाशयोजना- राहुल जोगळेकर,

रंगभूषा - कमलेश बीचे, वेशभूषा - नीरजा पटवर्धन

निर्माते- सुहास दातार, हरिहर केशव म्हैसकर, प्रसाद व्यवहारे

सूत्रधार - दीपक गोडबोले.

हे सगळे उल्लेख करणे अत्यावश्यक आहे, असे हे नाटक आहे.

इतके भव्य, भरजरी नाटक यापूर्वी मी कधी, कोणते पाहिले होते ते आठवत नाही. विविध दृश्यांचे साजेसे नेपथ्य आणि तशीच उत्तम प्रकाशयोजना यांमुळे सुरुवातीपासूनच भव्यतेचा अनुभव येऊ लागतो. निरनिराळे ध्वनी आणि संगीत यांनी नाटक खुलत जाते. रंगभूषा अगदी ती म्हणजे तीच पात्रे, अशी. विशेष उल्लेख वेशभूषेचा करायला हवा. त्याच काळाचा भास निर्माण व्हावा आणि प्रत्येक पात्राचे त्या समाजातले स्थानही जाणवावे अशी विचारपूर्वक केलेली वेशभूषा आहे. या सर्व पोषाखांची कल्पना करून ते सर्व प्रत्यक्षात आणणे हे खरेच विशेष आहे. थोडक्यात म्हणजे अशा ऐतिहासिक नाटकाला लागणारे सर्व काही उत्तम स्वरूपात इथे आहे.

चाणक्य या विद्वान आणि धूर्त ब्राम्हणाच्या प्रमुख भूमिकेत आहे शैलेश दातार. तो माझ्या एका नाटकाच्या तालमी करत होता त्यामुळे मला माहीत होता. ते काही घडले नाही पण या नाटकातला त्याचा उत्तम अभिनय पाहून छान वाटले. या नाटकाचा एकूणच अभिनय विभागही सशक्त आहे. आणि हे सगळे हाताळणारे दिग्दर्शक प्रणव जोशी ! प्रत्येक दृश्य कसून बसवलेले आहे. या नाटकातले संवाद त्या ऐतिहासिक भव्यतेला शोभणारे आहेत. सर्व पात्रांनी ते सहजपणे म्हणणे यातही

दिग्दर्शकाची कमाल आहेच. मूळ नाटक हिंदीतले असून त्याचा चांगला अनुवाद शैलेशनेच केलेला आहे. प्रयोग अर्थातच सुविहीत, छान होतो.

अखंड भारताचे उत्तुंग ध्येय चाणक्याच्या मनात असते. ते तो अनेक प्रयत्न करत, कपट-कारस्थानेही करत कसे पुढे नेत राहतो त्याची ही कथा आहे. लोक साधन-शुचितेबद्दल बोलतात पण इथे ध्येय मोठे असणे हेच महत्त्वाचे मानलेले आहे. त्यासाठी कोणतेही उपाय वापरायला हरकत नाही, असे हे तत्त्वज्ञान आहे. नाटकात, खरे-खोटे, कपट , निष्ठा, विश्वासघात, विषप्रयोग, खून – असे सर्व काही आहे. नाट्यमय घटना आणि नाट्यमय संवाद यांमुळे प्रयोग प्रेक्षकांना पकडून ठेवतो.

हे सगळे ठीक पण हे नाटक प्रचारकीही आहे, हे लक्षात घ्यावे लागते. प्रत्येक कलाकृतीत काही एक राजकीय भूमिका असायला हवी असे म्हणणाऱ्यांची अपेक्षा हे नाटक पूर्ण करते. इथली ही भूमिका अर्थातच सर्वांना पटणारी असू शकत नाही. नाटकाला गर्दी होती आणि त्या उपस्थित प्रेक्षकांनी अनेकदा पसंतीच्या टाळ्या दिल्या. शिवाय पुण्यातल्या बीजेपीच्या नेत्या मेधाताई कुलकर्णी यांनीही निम्म्या प्रयोगाला उपस्थिती दिली. नाटकाचा जो हेतू आहे तो साध्य होत राहतो हे दिसतेच.

मी स्वत: मात्र प्रचारकी कला नाकारत आलेलो आहे. भूमिका डावी असो की उजवी, कलाकृती प्रचारकी असली की ती एका मर्यादेत फिट होते असे मला वाटते. मानवी जीवनाचा विस्तार पाहणारी, त्याला अमुक एक वळण वा दिशा न देणारी कलाकृतीच एकूणात मौल्यवान असते असे मी मानतो. त्यामुळे मला हे नाटक ग्रेट वगैरे काही वाटले नाही. ठीक वाटले. नाटकाच्या सुरुवातीच्या भागात चाणक्याच्या तोंडी ‘ विचारव्याधी ‘ असा शब्द येतो. मला तो महत्त्वाचा वाटतो. एकूणच भूमिका आणि राजकीय कट्टरता या विचारव्याधीच असतात. या व्याधीचा समाजातला अतिरेक आपण अनुभवतो आहोत. दोन्ही बाजूंना तपाशीलांचे ढीग, खंडन-मंडनाचे जंगी उत्सव, खऱ्याखोट्याची गरजच नष्ट होणे, चारित्र्यहनन, आणि अनेक प्रकारची हिंसा दिसते – ही पूर्ण समाजाला लागलेली विचारव्याधीच आहे. दोन्ही बाजूंचे लोक म्हणतील की आमची सत्याची, न्यायाची बाजू आहे, हे सगळ्यांनी मान्य करा म्हणजे ही व्याधी जाईल. एवढे भाबडे तर काही घडणार नाही. आपापल्या उत्तुंग ध्येयासाठी सगळे लढतील, साधनशुचिता वगैरे तत्त्वे निरर्थक ठरतील आणि त्यातून जे घडेल ते घडेल. ‘ तुम्ही माझ्या बाजूचे नाही म्हणजे तुम्ही नालायक आहात ‘ असा या सध्याच्या विचारव्याधीचा सारांश आहे. हे वाचून काही बावळट लोक मला विचारतील की, ते ठीक, पण तुमचे मत काय ? माझे उत्तर असे असेल – योग्य वेळी माझ्या दृष्टीने विचार करून ज्याला द्यायचे त्याला मी मत देईन, पण, कलाकृती ही मतवाली असू नये. जगणेही सतत राजकीय घाणीने परिप्लुत नसावे. शेवटी, ज्याचीत्याची मर्जी !

--- ००० ---

राजन बापट --

आपल्या सर्वांची नाटकांची आवड न संपणारी. नाटकाच्या हौशीबद्दल नव्याने लिहायचं ते काय?

एक पूर्ण नाटक बसवायचं तर त्यामागचा व्याप मोठा. थिएटर बुक करण्याचा खर्च, वेषभूषा-रंगभूषा-नेपथ्य-प्रकाश या सर्वांचा जामानिमा. ते सर्व माहिती असणाऱ्या तंत्रज्ञांची उपलब्धता. नटांनी करायची पाठांतरं, त्यांच्या वाचिक आणि आंगिक अभिनयाचा कस. प्रेक्षक येतील का? तिकिटं काढतील का? पैसे बुडतील की खर्च भरून निघेल? आणि हे सर्व करून शेवटी प्रेक्षकांना ते बरं वाटेल की बहुतांश लोक नाकंच मुरडतील?

हे सर्व प्रश्न अनिवार्य खरे. त्यामुळे नाटक उभं करायचं तर वेळ, परिश्रम, पैसे आणि मानसिक तयारी भरपूर हवी. प्रेक्षकांच्या अभिरुचीचा विचार आला म्हणजे नाटकाच्या विषयांवर. अभिव्यक्तीवर नाही म्हण्टलं तरी थोडासा लोकानुनयी विचार करण्याची गरज आली.

नाट्यवाचनासारख्या गोष्टींमुळे यातल्या बऱ्याच गोष्टीतून सुटका होते खरी. नाटकांचं स्क्रिप्ट वाचतात कसं? कुठल्या संहिता वाचाव्यात? त्यात काही प्रयोग करणं शक्य आहे का? यांसारख्या प्रश्नांची प्रयोगशाळा म्हणजे नाट्यवाचन. वॉशिंग्टनच्या मराठी रसिकांकरता ही प्रयोगशाळा घेऊन येतो आहोत. कधी? कुठे? साधारण किती वेळ? ती सारी उत्तरं सोबतच्या फ्लायरमधे.

ह्या आमच्या उपक्रमाला सर्व नाटककारांनी त्यांची परवानगी दिली ह्याबद्दल त्यांचे अनेक आभार. ह्या नाटककारांमधे पुण्याचे ज्येष्ठ नाटककार चं प्र देशपांडे Champra Deshpande ह्यांचाही समावेश आहे, ह्या सर्व बाबी हुरूप वाढवणाऱ्या आहेत.

नाटकांच्या वाचनानंतर त्यातल्या वाचक कलाकारांशी तुम्हाला संवाद साधता येईल. नाट्यविषयक चर्चा म्हणा, गप्पा म्हणा. आणि हे नेहमीप्रमाणेच चहा कॉफी आणि थोड्याश्या संध्याकळच्या नाश्त्याबरोबर - एका रविवारी दुपारी.

सोबत फ्लायर आणि Evite ची लिंक जोडतो आहे. येण्याचं ठरवत असलात तर Evite वर नक्की RSVP पाठवा.

सर्वांचं स्वागत आहे. कार्यक्रम विनामूल्य आहे.

https://www.evite.com/event/002EINHTNQ3MC4EWSEPO6ISZTNTP4I

रवीन्द्र दामोदर लाखे

Champra Deshpande यांची एक कविता ( अभिवाचन क्लिप ).

कविता – स्पर्श.

१९-०४-२०२४.

मी सिनेमा म्हणूनच पाहिला आणि नाही आवडला. ( सावरकर ).

२०-०४-२०२४.

ठकीशी संवाद

( दीर्घांक ) -- ले ० सतीश आळेकर, दिग्द० अनुपम बर्वे, निर्मिती – अमेय गोसावी.

मजेशीर आहे नाटक. मला आवडले. आयनेस्को च्या ‘ द न्यू टेनंट ’ ची आठवण व्हावी असे अनेक पार्सल्सच्या खोक्यांनी भरलेले नेपथ्य आणि दोनच पात्रे – धनी आणि ठकी. अमुक एक सलग गोष्ट वा एखादा निश्चित विषय असे काही नाही. कोरोना काळातल्या लॉक डाऊनमुळे कंटाळलेला माणूस आणि तो आहे करमणुकीच्या शोधात. एवढेच. नाटकातले त्याचे सुरुवातीचे स्वगत उत्तम आहे. कंटाळा म्हणजे काय ? तो येतो म्हणजे कुणाला येतो ? मग मी कोण ? अशा नेहमी टाळल्या जाणाऱ्या प्रश्नांचे हे स्वगत आहे. गंमत सुरू होते ती गडकऱ्यांनी दिवाकरांना एक लखोटा देण्यापासून. त्यातून मग, दिवाकर, त्यांचा मुलगा, वि. वि. बोकील, दि. बा. मोकाशी, तेंडुलकर अशी एक हास्यास्पद परंपरेची साखळी विणली जाते. ही एक प्रकारे विश्लेषक समीक्षेची टवाळीही म्हणता येते. पण, मजा येते. असे खूप आहे. निरनिराळ्या काळांचा आणि संस्कृतींचा अभ्यास यांचीही थोडी टर उडवली जाते. मजा येते. एकूणात या नाटकातला करगोटा अमर होत जातो. सगळे सांगत नाही बसत. मेलडी खाओ और खुद जान जाओ !

सुव्रत जोशी आणि गिरिजा ओक अप्रतिम ! स्वच्छ वाणीची सुंदर तरुणी आणि उत्तम संवादफेकीचा वयस्कर इसम – बेष्ट जोडी ! ही त्याची कोण वगैरे न विचारता पाहात जायचे नाटक. ( शेवटी होतो तो रहस्यभेद. ) यात टिळक, गांधी, सावरकर, नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी असे अनेक उल्लेख येतात. बाबरी, गोंध्राही येते. पण, हे नाटक अमुक एक भूमिका घेऊन प्रचार करते आहे, असे मला वाटले नाही. सर्वच गोष्टींना एका क्षुद्र परिसाचा स्पर्श घडवून त्यांना हास्यास्पद करणारे हे नाटक आहे. मजा येते.

संगीत, नेपथ्य, भरपूर प्रकाश योजना आणि समोरच्या पडद्यावर दिसणारी जुनी-नवी दृश्ये यांनी नाटकाची खुमारी वाढत राहते. आणि त्याचा रिचनेसही वाढत राहतो.

एकूणात सर्वांगसुंदर, सुविहित, देखणा प्रयोग होतो !

हे मराठीतले एक वेगळ्या प्रकारचे विनोदी नाटक आहे. निरनिराळ्या वादांच्या, अभ्यासाच्या आणि व्यक्तिगत कंटाळ्याच्या व एकाकीपणाच्या जाचातून थोडाफार विसावा देणारे. पण हे काही ॲब्सर्ड नाटक नव्हे. करगोट्याच्या स्पर्शाने अनेक गोष्टी हास्यास्पद करत जाणे याला ॲब्सर्ड वा मृषा नाट्य नाही म्हणता येणार. मृषा नाट्यात पूर्ण जगण्यातल्या अतार्किकतेची, निरर्थकतेची जाण व्यक्त होत असते. मोठ्या गोष्टी हास्यास्पद होणे वेगळे आणि लहान-मोठ्या हा भेदच मावळून सगळे जगणेच गधडेपणाचे जाणवणे वेगळे.

शेवटी ठकी म्हणते, पंचप्राणातला शेवटचा पाचवा प्राण जाताना निरोप म्हणून हात नका हलवू – लोकांना वाटायचे, मरताना तुम्ही काँग्रेसच्या भूमिकेत होता ! – हे छान वाटले !

--- ००० ---

11-07-24.

रवी सावंत

' आविष्कार ' आणि रवी-रसिक हे नाते अतूट होते ! त्यात रवी-रसिक मधला रवी म्हणजे रवी सावंत ! माझ्या अनेक नाटकांना जेव्हा जिथे जसा हवा तसा प्रकाश ( आणि नेपथ्यही ) देणारा माणूस ! कै. काकडे काका गेल्यानंतर तर मला वाटते, ' आविष्कार ' च्या बऱ्याच व्यावहारिक कामांची धुराही तो सांभाळत होता ! मराठी रंगभूमीच्या दृष्टीने हे शंकर-जयकिशन मधला जयकिशन जाणे आहे !

या प्रिय मित्राला दिलखुलास मैत्रीचा रामराम !

--- ००० ---

केशवराव भोसले रंगमंदिर

माझे पहिले जमलेले नाटक, ' एक गगनभेदी किंचाळी ' हे प्रसन्न कुलकर्णींच्या दिग्दर्शनाखाली, ' टु फ्रेंडस थिएटर युनिट ' या संस्थेतर्फे आणि नंतर ' प्रत्यय ' तर्फे कोल्हापूरच्या केशवराव भोसले रंगमंदिरात सादर झाले होते ! त्या प्रक्रियेत त्या वेळी सहभागी असणाऱ्यांना त्याच्या खूप सकस आणि मजेदार आठवणी असणार आहेत ! ते रंगमंदिर कोल्हापूरची शान होते ! ते जळून खाक होणे हे प्रचंड नुकसान आहे ! ते पुन्हा तिथे नव्या दिमाखात उभे राहो, हीच सदिच्छा !

--- ००० ---

तळ – Bottomland.

स्वप्नील ऋषिकांत शेटे यांचा लघुचित्रपट.

( निर्मिती -- जेजुरी आर्टस अँड मेडिया वर्क्स. )

विषय सामाजिक बांधिलकीचा – दलितांवरील अन्याय-अत्याचाराचा आहे. त्यातली स्त्री आणि तिची मुलगी यांचे निर्घृण खून कसे झाले हे प्रेक्षकांना दाखवलेले आहे – शंकेला जागाच नाही – म्हणजेच बाजू घेतलेली आहे. अशा असंख्य घटना घडत असणारच आहेत, त्यामुळे, बाजू घेणे योग्यच आहे. ‘ हे फार वाईट आहे, मानवतेला काळिमा आहे, क्रूर आहे ‘ अशा प्रेक्षकांच्या प्रतिक्रिया इथे नक्कीच येतात. रसेलने त्याच्या एका निबंधात असे उदाहरण दिले आहे की नाटक पाहताना लहान मुलांच्या हत्यांबाबत तिडिक, तिरस्कार जाणवणारे लोक बाहेर गेल्यावर, आपल्या सरकारमार्फत चाललेल्या तशाच कृत्यांना समर्थन देत असतात ! तरीही, अन्याय, क्रौर्य यांचे दर्शन घडवून काही मानवी मूल्यांची जाणीव प्रेक्षकांना देत राहणे महत्त्वाचेच आहे, हे कुणालाही मान्य होईल. हे तसेच काही आहे असे समजून मी सुरुवातीला हा चित्रपट ‘ माहीत असणे ‘ या विभागात पाहिला. माझी कलेबाबतची धारणा वेगळी असल्याने, यावर माझा अभिप्राय विचारणे म्हणजे माझी परीक्षा घेणे तर नसेल, अशीही शंका येऊन गेली. पण, विचार करता माझ्या लक्षात आले की हा चित्रपट नुसतेच अन्यायाचे दर्शन घडवून एका भूमिकेची भलावण करत नसून त्याहून अधिक आवाक्याचे काही करतो आहे. वडील निवर्तलेले आणि आई व बहीण यांचे खून झालेले असा भाऊ फक्त उरलेला. जमिनीच्या वादावरून झालेले खून अट्रोसिटी

कसे म्हणावेत असा प्रश्न इन्स्पेक्टर विचारतो. पुरावा उपलब्ध नाही, शिवाय काहीजण या कायद्याचा दुरुपयोगही करतात, हे लक्षात घेता लगेच एक्शन कशी घेणार, हा त्याचा प्रश्न असतो. त्यात, मालदार, सवर्ण आरोपी न्यायालयाबाहेरचाही एक डाव खेळतात. ते त्या मुलालाच विनयभंगाच्या आरोपात अडकवू पाहतात. या सगळ्या प्रकारात शेवटी त्याला गप्प बसावे लागते ! शेवटी उद्वेगाने तो जमिनीवर काटकी आपटताना दिसतो. ही मन:स्थिती असंख्य लोकांना अनुभवावी लागते, हे आपल्या लक्षात येते. सत्ताधाऱ्याच्या जुलुमापुढे झुकावे लागणे ! ‘ मै इन्साफ मांगता नही हूं , छीन लेता हूं ‘ अशा अमिताभच्या वाक्याला आख्खा भारत टाळ्या वाजवतो याचे कारण हेच आहे. पण, प्रत्यक्षात अमिताभ होणे अशक्य असते.

हा चित्रपट थोडक्या वेळात, मानवी जगण्यातल्या मूलभूत प्रश्नाला हात घालतो, असे मला वाटते. बहुसंख्य नात्यांत, देशादेशांतही गुमान सहन करण्याची अवस्था का येते ? मी हा चित्रपट दुसऱ्यांदा पाहिला तेव्हा त्याचा हा आयाम लक्षात आला. जिथे जिथे मानवी जगण्यात अशा अवस्था येतात तिथे तिथे कोणतीही बौद्धिक उत्तरे उपलब्ध नाहीत, हे दिसते ! म्हणजे माथेफिरू व्हा किंवा युद्ध करा ! जगभर अशा मन:स्थितीत मानवजात होरपळत असेल तर यांतल्या प्रत्येक एकेका प्रश्नावर स्वतंत्र उत्तर सापडू शकेल ? – हा प्रश्न इथे समोर येतो. या दृष्टीने पाहता या लघुचित्रपटाचा आवाका मोठा आहे, हे समजते !

--- ००० ---

‘ अवकाश कलामंच ‘ पुणे

ही नाट्यसंस्था आम्ही १९९६ साली स्थापन केली. सगळे शून्यातून सुरुवात करणारे होते. त्यांपैकी खालील पाच व्यक्ती कलाक्षेत्रात महत्त्वाची कामे करत आहेत ---

विद्यासागर अध्यापक

आनंद अलकुंटे

प्रशांत तपस्वी

गणेश सागडे

मधुराणी गोखले ( हिने त्या वेळी आमच्या निर्मितीत अभिनय नव्हता केला. नंतर माझ्या एका नाटकात तिने काम केले. )

--- या सर्वांबद्दल आम्हा अवकाशवाल्यांना विशेष आस्था वाटणे साहजिक आहे. विद्यासागरने दिग्दर्शित केलेला एक चित्रपट आंतर राष्ट्रीय महोत्सवांत गाजतो आहे, त्यामुळे हे सर्व मांडले. ‘ अवकाश ‘ चा एक संस्थापक सदस्य म्हणून मी या सर्वांचे खूप अभिनंदन करतो आणि त्यांना भरभरून शुभेच्छा देतो !

--- ००० ---

मंगेश कुलकर्णी

प्रकाश बुद्धिसागर हा माझ्या नाटकांचा दिग्दर्शक आणि त्यामुळे मित्र. मंगेश हा प्रकाशचा मित्र, त्यामुळे, माझाही मित्र झाला होता. अनेकदा संध्याकाळच्या गप्पांसाठी आम्ही एकत्र असायचो. एकदा तर, प्रकाशच्या त्या ऐतिहासिक बाईकवर प्रकाश, मंगेश आणि मी असे ट्रिपल सीट दादर पासून मंगेशच्या चेंबूरच्या घरी गेलो होतो ! त्याच्या मराठीतल्या कामाबद्दल अनेकजण लिहितीलच, पण, तो ' यस बॉस ' या हिंदी चित्रपटाच्या तीन लेखकांपैकी एक होता, हे नमूद करावेसे वाटते. माझ्या आठवणीप्रमाणे, ' आवारा पागल दीवाना ' हे नाव मंगेशने सुचवल्याचे त्याने सांगितले होते. त्या चित्रपटाचा पटकथा लेखक म्हणून त्याच्या नावाचा उल्लेख आहे. एक छान, चांगला मित्र गेला !

मंगेशच्या स्मृतीस अभिवादन !

--- ००० ---

सहा विद्वान सत्याच्या शोधात

राज्यसभा या चॅनेलवरच्या ‘ सरोकार ‘ या कार्यक्रमात एक चर्चा ऐकली. दहा हजार चर्चा ज्या चर्चेवरून ओवाळून टाकाव्यात अशी चर्चा. या चर्चेच्या क्लिप्स जितके लोक पाहतील तितकी देशातली समज वाढेल. या चर्चेतले विद्वान खरोखरचे विद्वान होते आणि खूपच समजुतदार आणि एकमेकांचे ऐकून घेण्याची कुवत असलेले होते. सूत्रसंचालन करणाऱ्या बाईही विद्वानच होत्या. अशी चर्चा मी टीव्हीवर कधीच ऐकली नव्हती. आपापली मते नुसती गोंजारत बसणाऱ्या सर्वांसाठीच ही एक उद्बोधक चर्चा झाली. याची क्लिप कुठे असते का ते मला माहीत नाही, पण, असल्यास इथे जरूर शेयर करावी. या चर्चेचा विषय होता --

Politics of post-truth म्हणजे उत्तर-सत्याचे राजकारण ! म्हणजे खोटेपणाचे राजकारण, समजा !

वा रे वा ! दिल खुश हुवा ! विद्वानांच्या चर्चेतून ‘ सत्य ‘ म्हणजे काय, हे कळण्याची शक्यता नव्हतीच, पण, तो विषय जो चहू बाजूंनी ढवळला गेला ते मला खूपच आवडले ! ती चर्चा ट्रंप यांचे निवडून येणे, यावर मुख्यतः केंद्रित होती, पण, मधून मधून मोदींचे सरकार निवडून येणे, यावरही बोलले जात होते. ही पूर्ण चर्चा विद्यार्थ्यांच्या एका गटासमोर चालली होती. विद्यार्थीही नम्र, एकाग्रतेने ऐकणारे आणि भारी होते ! त्यांचे प्रश्न उत्तम होते !

जमल्यास मिळवून ऐका ! ये बार बार नही होता !

गणित आणि झाकीरभाई !

अजब होता तो ! अत्यंत अवघड गणिते स्वत:च रचे आणि स्वत:च ती सोडवे ! लोक तोंडात बोटे घालत ! तो म्हणे, तो काळ, ते गणित आणि ते काळाचे तुकडे अनुभवत पुन्हा एकसंध होणारे गणित – सगळे मिळून एकच ते ! ! सगळे मिळून एकच ते ! तुम और हम – सबको जहां मिलना है वही वह प्युअर रिलीफका क्षण ! जिथे तुम्ही, आम्ही आणि काळ सगळेच क्षणभंगूर ! एक सत्य म्हणून ! शेवटची जुगलबंदी त्याने खुद्द काळाबरोबर केली ! पाताळ, भूलोक आणि स्वर्ग असा सर्व

प्रांत ओलांडत चाललेले प्रदीर्घ आवर्तन सगळी स्टेशने सोडून देत पुढे जात राहिले ! श्वास रोखले गेले आणि एका क्षणाला टाळीचा आवाज आला ! ती त्याने काळाला दिली की काळाने त्याला, कोण जाणे ! पूर्ण विश्वाने निःश्वास टाकला ! सुखदु:ख नाही ! झाकीरभाई, अब तुम नही हो और हम तुम्हारे साथ हैं ! मतलब, कला का ये अंतिम पडाव है ! यहीं पे मिलते रहेंगे ! सरताजभाई !

--- ००० ---

डॉ. लागू स्वतंत्रपणे मोठे होतेच पण निळूभाऊ फुले यांच्याबरोबर जोडलेले नाव म्हणूनही मराठी मनात त्यांचे एक विशेष स्थान आहे. त्यांच्या मोठेपणाची एक आठवण --

पुण्यातले मनोहर मंगल कार्यालय. दोघेतिघे मिळून निळूभाऊ फुले यांची मुलाखत घेत होते -- त्यांतले एक होते डॉ. लागू. तुडुंब भरलेल्या त्या हॉलमध्ये डॉ. लागूंनी प्रश्न विचारला -- " तुमचे ' सखाराम बाइंडर ' पाहिल्यावर मी तुमचे पाय धरले होते, ते आठवतेय का ? " निळूभाऊ नम्र स्मित करत म्हणाले, " होय। आठवतेय -- " एका एवढ्या प्रचंड यशस्वी नटाने दुसऱ्या एका तुल्यबळ नटाला असा भर सभेत मानाचा मुजरा करावा हा प्रसंग एक अत्यंत हृद्य प्रसंग म्हणून लक्षात राहिलाय !

डॉक्टरांच्या स्मृतीस अभिवादन !

' एक गगनभेदी किंचाळी ' या ' नाट्यशुभांगी ' ने केलेल्या माझ्या नाटकाला अनागरी राज्यनाट्यस्पर्धेत राज्यातले प्रथम पारितोषिक मिळाले होते, हे आठवले ! प्रा. अरुण पाटील हा माझा चांगला मित्र होता.

कै. प्रा. अरुण पाटील

अरुण पाटीलशी माझी ओळख विजय कारेकरमुळे झाली असावी किंवा तो आमच्या कोल्हापूरच्या नाट्य-ग्रुपमध्ये येत असे तिथे झाली असावी. पुढे ती मैत्री कायम राहिली. अरुण, विजय, दिलीप जगताप आणि मी अशी आमची अमर चौकडी होती. अनेकदा आमच्या भेटीगाठी, गप्पा होत असत. अनेकदा तर आम्ही अरुणच्या घरीच साग्रसंगीत भेटायचो. त्याच्या घरी तयार झालेल्या चिकन-मटणासह. एक-दोनदा मी सांगलीला अरुणबरोबर त्याच्या तिथल्या बंगल्यावरही राहिलो होतो. तिथे तो एकटाच असे. तो येणार म्हटल्यावर बंगला चकाचक करून ठेवणारी त्याची टीम होती. तिथेच, त्याच्यामुळेच, माझी हातकणंगलेकर सरांशी ओळख झाली. ते अरुणचे जुने मित्र होते. सरांबरोबर संगीत गप्पा ही एक विशेष मेजवानी असे. आज संजय पाटीलने, जयसिंगपूरच्या ‘ नाट्यशुभांगी ‘ या नाट्य संस्थेबाबत दिलेल्या पोस्टमुळे हे सगळे आठवले. संजयने माझे ‘ दिनकर पुरोहितचा खून ‘ हे नाटक राज्य साठी सांगलीत बसवले होते. अत्युत्तम प्रयोग होई. त्यातला विवेक देशपांडे यांचा कर्नल तर अनेकांच्या डोक्यांत अमर असेल ! अरुण आणि संजयही मित्र होते. मी सांगलीत आलो आहे हे कळल्यावर संजयने फर्मान सोडले की दुसऱ्या दिवशी मी आणि अरुणने आकाशवाणीवर यावे –

तिथे तो नोकरी करत होता – आणि तिथे अरुण माझी मुलाखत घेईल – ती रेकॉर्ड करून सांगली केंद्रावरून ती प्रसारित होईल ! त्याप्रमाणे अर्थात सगळे पार पडले.

अरुणने ‘ नाट्यशुभांगी ‘ या संस्थेतर्फे बसवलेले माझे ‘ एक गगनभेदी किंचाळी ‘ हे नाटक अनागरी राज्य नाट्य स्पर्धेत राज्यात पहिले आले ही एक अरुणमुळे घडलेली चांगली घटना. लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत बरीच स्त्री-पुरुष पात्रे होती. अरुण हातात पट्टी घेऊनच तालमी घेत असे असे मी ऐकून आहे. ते ठीक. अरुणचे माझ्या आयुष्यातले त्याहून मोठे देणे म्हणजे माझे पहिले दोन अंकी नाटक सांगली बँकेतर्फे त्याने रंगमंचावर आणले ! नाटकाचे नाव होते, ‘ राज्य ‘ . आपल्या नाटकासाठी नेपथ्य मांडले जातेय, प्रकाश योजनेचे टेस्टिंग होतेय – हा पहिला अनुभव अरुणमुळे मिळाला ! ते नाटक मुळीच चांगले नव्हते. म्हटले तर रद्दडच होते. नंतर मी ते कुठेही सामील केले नाही. ती संहिता एक प्रकारे फेकूनच दिली. आमचा कोल्हापूरचा ग्रुप म्हणजे निर्दय, चिकित्सक होता. मीही तसाच होतो. त्या नाटकाचा प्रयोग झाल्यावर माझ्या प्रेमळ मित्रांनी माझी यथेच्छ खिल्ली उडवली होती ! अर्थात ते योग्यच होते.

तरीही, माझे पहिले दोन अंकी नाटक रंगमंचावर आणणारा दिग्दर्शक-मित्र म्हणून अरुण कायम माझ्या स्मरणात आहे – राहील.

या निमित्ताने अरुणच्या स्मृतीला अभिवादन !

--- ००० ---

प्रवीण कांबळे

माझा नाशिकचा मित्र आणि अविरत नाट्यकर्मी प्रवीण कांबळे तरुण वयातच हृदय विकाराने निवर्तल्याचे कळले. हे फार वाईट झाले. त्याच्या पत्नीकडून मला हे कळले आणि वाईट वाटले. आमची समक्ष भेट कधी झाली नव्हती पण त्याच्या कार्यकर्तृत्वाकडे मी नेहमीच पाहात असे. अत्यंत उमेदीचा हा नाटकाची तीव्र आच असलेला असा हा मराठीतला एक उत्तम नट / दिग्दर्शक आणि नाट्यसंस्था चालक आपल्याला सोडून गेलेला आहे. माझ्या ' स्टालिन ' या एकांकिकेचे दीर्घांक स्वरूपात त्याने बरेच प्रयोग केले.

प्रवीणच्या कुटुंबियांच्या दु:खात मी सहभागी आहे. प्रवीणच्या स्मृतीला माझे अभिवादन !

--- ००० ---

प्रेमा साखरदांडे

‘ आविष्कार ‘ निर्मित आणि विजय केंकरे दिग्दर्शित माझ्या ‘ ढोलताशे ‘ या नाटकातली ‘ काकू ‘ ही भूमिका जोरकसपणे सादर करणाऱ्या प्रेमा साखरदांडे निवर्तल्या आहेत. त्या नाटकातल्या नाट्याला योग्य तो बढावा आणि ताण देणे हे त्या भूमिकेचे काम होते. त्या ती भूमिका चोख पार पाडत. ज्यांनी ते नाटक पाहिले असेल त्यांना त्यांचा खालील संवाद आठवत असेल --

“माझं जीवन सगळं हालअपेष्टांत गेलेलं आहे हे लक्षात ठेवा -- पोरं लहान असताना हे वारले -- पोरांना मोठं करणं, शिकवणं, त्यांच्या नोकऱ्या, लग्नं ही सगळी काही खाऊची गोष्ट नाही -- माझ्या भावाची मदत घेऊन केलंय मी सगळं -- किती त्रास झाला असेल -- कशा परिस्थितीतून जावं लागलं असेल -- विचार करा जरा -- मला या वयात आता तत्त्वज्ञान सांगत बसू नका -- इतकं दु:ख सहन करणं -- अपमान सहन करणं -- मधनंमधनं मुलांची आजारपणं काढणं -- यांनी कशी मन:स्थिती होईल माणसाची -- जरा विचार करा -- कुण्णाचा उपयोग नसतो अशा वेळी -- मुलं मोठी झाल्यावर, त्यांना नोकऱ्याबिकऱ्या लागल्यावर पुन्हा सगळे जवळ करतात -- अडचणीच्या वेळी लांबच राहतात सगळे -- इतकं सगळं मनाविरुध्द सहन करत आलेय मी -- आता मला त्रास देऊ नका -- मीसुध्दा संतांचं वाचलंय -- नामस्मरणसुध्दा करते -- पण ते वेगळे, आपण वेगळे, आपण काही संत नाही -- आपण फक्त सामान्य माणसं ! -- कळलं ? “

शिक्षणात नाट्यतंत्राचा कसा उपयोग होऊ शकतो यावर त्यांनी काही पुस्तकेही लिहिलेली आहेत.

प्रेमा साखरदांडे यांच्या स्मृतीला माझे आदरपूर्वक अभिवादन !

--- ००० ---

11-03-25